ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : सेनापति बापट वाङ्मय समग्र ग्रंथ

संग्राहक : धुंडिराज विष्णु देव

प्रकाशक : धुंडिराज विष्णु देव, पुणे

प्रकाशन वर्ष : १९३९

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर – २०२१

—सेनापति बापट वाङ्मय—

# समग्र ग्रंथ

864.2

दत्तो वामन पोतदार.
१८० शनवार पेठ पुणे २

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00950

संग्राहक,
धुं. वि. देव.

—: सेनापति बापट वाङ्मय :—

# समग्र-ग्रंथ



अशा या सेनापतींच्या वाङ्मयावर वास्तविक अभिप्रायाची जरूरी नाहीं. रत्न काय ओपसराच्या प्रकाशानें का उजाळ होणार आहे ! रत्न हें स्वभावतःच उजाळ आहे...सेनापतींचें वाङ्मय बहुतेक पद्यांतच आहे. त्यांच्या काव्यांत जीवनाची मीमांसा उच्च अध्यात्माच्या भूमिकेवरून केलेली आहे. त्यांना जो संदेश मिळाला तो त्यांच्यांत नुसता स्फूर्तिरूपानें राहिला नाहीं. त्यांनीं तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, धर्म, काव्य इत्यादिकांवरील प्राचीन, अर्वाचीन, पौर्वात्य, पाश्चात्य असे ग्रंथ वाचले—नव्हे पचवले. अशा रीतीनें वेगवेगळ्या धर्मांचा, तत्त्वज्ञानांचा अभ्यास केल्यानें त्यांच्या मतांना एक प्रकारची व्यापकता प्राप्त झाली आहे. पण महाराष्ट्रास यांत कौतुकास्पद जर असेल तर तें हें कीं इतका सर्व अभ्यास करून सेनापति हे महाराष्ट्राची परंपरा——उपनिषदें, गीता, शंकराचार्य, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास— यांचेच सर्वस्वीं पूजक आहेत. समर्थांच्या प्रमाणें सेनापतींना 'आदेश' राष्ट्रकार्याचा असल्यानें हें तत्त्वज्ञान राष्ट्रसेवा, राष्ट्रोद्धार या विषयींच्या काव्यांतून बाहेर पडलेलें आहे.

हरिभक्त प्रो. सोनोपंत दांडेकर.

टीपः— संपूर्ण अभिप्राय ग्रंथांत शेवटीं दिला आहे. —संग्राहक.

ॐ

जप मना जनतारक तो हरी
तप तुझें असुं दे जनचाकरी।
खपवि तेथ बळा हरिच्या मतें
हरिमतेंच सदा सुख लाभतें॥

रत्ना. तुरुंगांतील कविता
२१ मनास शिकवण

—ः सेनापति बापट वाङ्मय ः—

# समग्र-ग्रंथ

आत्मचरित्र, तुरुंगांतील पत्रें, रत्नागिरी तुरुंगांतील
स्फुट-कविता, येरवड्यांतील निरोप वगैरे

व

## चैतन्यगाथा

किंमत दोन रुपये

प्रकाशक :
धुंडिराज विष्णु देव.
१९६/९ सदाशिव पेठ, पुणें २.

म/9022.

मुद्रक :
लक्ष्मण नारायण चापेकर.
आर्यसंस्कृति मुद्रणालय,
१९८/१७ सदाशिव, पुणें २.

864.2
Bap/Deo

## वाचकजनांस—

कारागारीं खडतर अशा, तोडण्या मातृ-पाशा ।
वर्षें सोळा सतत वसुनी निर्मिली राष्ट्रि आशा ॥
आदर्शें जो रविसम सदा जीवन-स्फूर्ति-कारी ।
वाणी तैशी कराणि प्रकटे संत हा भ्रांतिहारी ॥१॥

कारागारीं करि सुकविता जीवनानंदकारी ।
प्रेरी ज्यातें हृदयिं वसुनी वेणुधारी मुरारी ॥
काव्यानें जो नव निपजवी राष्ट्रि संजीवनाला ।
काव्यीं त्याचें कवन करणें आवडे सत्कवीला ॥२॥

गाथा, गीताहृदय, स्फुट तें काव्य, पुत्रांस पत्रें ।
सारीं ज्याचीं भरलिं असती पूर्ण स्वातंत्र्य-मंत्रें ॥
स्वातंत्र्या जो प्रकटित अहोरात्र लोकार्थ तापे ।
तेजाळावें परिवर जसें पेटुनीयां प्रदीपें ॥३॥

ज्याच्या कोशीं मुळिं न गवसे शोधितां स्वार्थ शब्द ।
ज्याच्यापाशीं निशिदिनिं असे मृत्युशीं झुंज युद्ध ॥
देहानें जो दिसत परि ज्या ना दिसे देहभान ।
कर्ता, ज्ञाता जणुं मज गमे रामदासासमान ॥४॥

चारित्र्यसंशोभि भवच्चरित्रं ।
स्वातंत्र्यमार्गे खलु दीपरूपम् ॥
प्रकाशितं राष्ट्रहितैषुणा मया ।
जनाय स्वातंत्र्य-हितैक-कांक्षिणे ॥५॥

पुत्रास पत्रें बहु बोधकारी ।
मुलांस राष्ट्रांतिल बोधणारीं ॥
स्वातंत्र्यमंत्रान्वित काव्य-वाणी ।
हृदीं हृदीं सिंचिल स्फूर्ति-पाणी ॥६॥

---

१. सेनापतींस उद्देशून हा श्लोक आहे.

चैतन्यगाथा जन चेतवी ही ।
जडत्व दाही जडिं स्फूर्ति दे ही ॥
जो कोणि अभ्यासिल पोरथोर ।
ठसेल तच्चित्ति परोपकार ॥७॥

'समग्र-ग्रंथ' हा वाचा ।
'वाचा' यांतील सक्रिय ॥
स्वदेश-ध्येय-सिद्ध्यर्थ ।
पहा स्वमनिं प्रत्यय ॥८॥

॥ वंदे मातरम् ॥

२४।८।३९ — धुं. वि. देव

कै. म. म. ... द. वा. पोत... ग्रंथालय
... 86339
8९1:2 / Bap
किंमत ........ तारीख 12/5/...

# संकल्पपूर्ति

नूतन पिढीकरितां समग्र 'सेनापति-बापट-वाङ्मय' प्रकाशित करण्याचा संकल्प १९३७ च्या नोव्हेंबरमध्यें सेनापतींच्या वाढदिवसानिमित्त भाग पहिला प्रसिद्ध करून आम्हीं प्रकट केला होता. आमच्या परिस्थितीप्रमाणें प्रसंगानुसाराचें प्रकाशन सुरू केलें होतें. वाङ्मयाचे तीन भाग व दे. भ. बाळूकाका कानिटकर उर्फ सेवक सेवानंद यांनीं लिहिलेलें सेनापतींचें चरित्र इतकें वाङ्मय आतांपर्यंत प्रकाशित केलें गेलें. आज कृत-संकल्पाची या गद्यपद्य समग्र ग्रंथानें पूर्ति होत आहे.

महाराष्ट्रांत तुरुंगवाङ्मयास लोकमान्यांपासून सुरुवात झाली. 'गीता-रहस्य' या जगप्रसिद्ध ग्रंथानंतर थोडें थोडें गद्यपद्य तुरुंगवाङ्मय मराठी भाषेंत येत गेलें आहे. त्यांत उल्लेखनीय म्हणजे दे. भ साने गुरुजी यांची 'पत्री' हा पद्य ग्रंथ होय. हा बहुतेक निरनिराळ्या तुरुंगांत रचला गेला आहे; व तो ईश्वरविषयक सकरुण व देशभक्तिपर कर्तव्यकर्मप्रेरक अशा सरस कवनांनीं भरलेला आहे. तो वाचीत असतां सेनापतींच्या काव्या-सारखाच भास होतो.

सेनापतींना मुळशीसंग्राम व भारतीय शांतिसंग्राम मिळून अनुक्रमें २+७+७ मिळून सोळा वर्षें कारावासांत काढावीं लागलीं. एक चैतन्यगाथा वगळला म्हणजे बाकी सेनापतींचें सर्व वाङ्मय हें या सोळा वर्षांतील तुरुंग-वाङ्मय आहे. हें तुरुंगवाङ्मय हैद्राबाद (सिंध) येरवडा, रत्नागिरी व बेळगांव या तुरुंगांतील असून तें इंग्रजी व मराठी आहे. इंग्रजीपैकीं फक्त 'Holy Song' हें प्रकाशित केलें गेलें आहे. शिल्लक असलेलें पुष्कळ अप्रकाशित आहे. मराठी वाङ्मयापैकीं संन्यास कर्मयोगाचा ऊहापोह करणाऱ्या गीता-रहस्याप्रमाणें हिंसा-अहिंसेचा ऊहापोह करणारें 'गीताहृदय' सेनापतींनीं तुरुंगांतच लिहिलें असून तें दोनदां प्रकाशित झालें आहे. भाग दुसरा म्हणून तें दुसऱ्या वेळेस आम्हीं प्रकाशित केलें आहे. सेनापतींचें गद्य असें

फारसें लिखाणच नाहीं. नाहीं म्हणावयास प्रसंगपरत्वें त्यांनीं जीं इंग्रजी व मराठी पत्रकें प्रसिद्ध केलीं व वर्तमानपत्रांत आपला आशय स्पष्ट करण्याकरितां खुलासा म्हणून जे इंग्रजी व मराठी लेख लिहिले तेवढेंच काय तें त्यांचें गद्य लेखन. कारावासांतच पुष्कळ आयुष्य गेल्यामुळें सेनापतींची महाराष्ट्रास व्हावी तशी ओळख होऊं शकली नाहीं असें दिसून आल्यामुळें, आणि व्यक्तीचें अंतःकरण व्यक्तीच्या वाणींतून व्यक्त होत असतें म्हणून स्वदेशार्थ सर्वस्वाचा होम करणाऱ्या, ध्येयावर ध्रुववत् अढळ राहाणाऱ्या, ध्येयवादी, ध्येयनिष्ठ—ठाम बैठकीच्या—ऐकोनि आवडि लागावी । देखोनि बळकटचि व्हावी । सलगीनें आपली पदवी । सेवकामधें ॥ (दा.बो.) अशा या एकमेवाद्वितीय थोर विदेही विभूतीचें गूढ व विशाल अंतःकरण अखिल महाराष्ट्र समाजास स्पष्ट कळण्याकरितां त्यांचें समग्र मराठी वाङ्मय आम्हीं प्रकाशित व प्रसारित करून त्यांची कारावासांत जन्म पावलेली अमर वाङ्मयमूर्ति महाराष्ट्रांत घरोघरीं उभी करण्याचें ठरविलें व ठरविल्याप्रमाणें आज तें कार्य पुरें होत आहे. सेनापति सुटून आल्यानंतर त्यांचेबरोबर वारंवार दौऱ्यावर जावें लागे त्यामुळें प्रकाशनकार्य तात्पुरतें थांबे. तसेंच १९३८ च्या ऑक्टोबरमध्यें निजाम हैदराबाद सत्याग्रहाचा सर्वप्रथम पुरस्कार सेनापतींनीं केला होता त्यांतही त्यांचेबरोबर आम्ही गेलों होतों व महिना सवा महिना तुरुंगांत पडलों तेव्हां हें कार्य लांबणीवरच गेलें असें वाटलें. नंतर सुटून आल्यावर हें सर्व एकदमच छापून यांतून लौकर मोकळें व्हावें असें ठरवून हा **'समग्र-ग्रंथ'** तयार केला आहे.

महाराष्ट्र वा राष्ट्र-संजीवनी अशा या समग्र ग्रंथांत रत्नागिरी, येरवडा व बेळगांव या तुरुंगांत लिहिलेलें, 'भाग दुसरा', 'गीताहृदय' खेरीज करून सर्व पद्य वाङ्मय आलें आहे. अनुक्रमें २२ व १८ पद्यांचा भाग पहिला व तिसरा यांत आला असून यांत संपूर्ण चैतन्यगाथा घातला आहे. ग्रंथ चारशें पृष्ठांवर गेला आहे. हा एक ग्रंथ घेतला कीं सेनापतींचें सर्व वाङ्मय वाचकांस एकत्र वाचण्याची सोय झाली आहे. शिवाय तुरुंगांतून मुलांस पाठविलेलीं पत्रें यांतच समाविष्ट केलीं आहेत. तीं गद्य आहेत. असो.

देश-काल-वर्तमान-प्रसंगसापेक्ष, उत्साहप्रद समग्र-ग्रंथास पूज्य 'पत्री'कार साने गुरुजी यांची प्रस्तावना लाभली आहे. सेनापतींचें चारित्र लिहिण्यास त्यांना मीं फारसा परिचय नसतांच विनंति केली होती. ती त्यांनीं अमान्य केली नव्हती. पण त्यांची त्या वेळेस मनःस्थिति व परिस्थिति अनुकूल नव्हती. या समग्र-ग्रंथाला आपण प्रस्तावना लिहावीच असा याहि वेळेस आम्हीं खमंग गोष्ट्या-प्रमाणें आग्रह केला. तो त्यांनीं मानून प्रस्तावना लिहून दिली. या वेळेसही कामेंच कामें भोंवतीं असतांनाच त्यांना हें काम करावें लागलें आहे. असें असतांना सुद्धां प्रस्तावना किती सुंदर, साधी, वेधक बोधक झाली आहे! सेनापतींचा साक्षात् फारसा परिचय नसतांना सुद्धां थोडक्यांत पण सर्वांगानें सेनापतींचें सूक्ष्मावलोकनयुक्त संक्षिप्त चरित्रच तींत कौशल्यानें येऊन गेलें आहे. वेष धरावा बावळा। अंतरीं असाव्या नाना कळा॥ (दा.बो.) अशी ही श्री. साने गुरुजींची महाराष्ट्रांतील एक साधुशील स्वकर्तव्यरत, ध्येय-वादी, परमप्रेमळ कलावंत काळीसावळी बुटकी मूर्ति आहे. यांचे आभार मानण्यास कोणते शब्द लिहावे? त्यांनीं चरित्र लिहूं शकत नाहीं असें सुचविलें तेव्हां सुंदर लेखणींतून उतरलेलें सेनापतींचें चरित्र महाराष्ट्रास लाभत नाहीं म्हणून हळहळ वाटली. आतां आभारास शब्द नाहींत म्हणून हळहळण्याची पाळी! हळहळत कृतज्ञ आहें इतकेंच लिहितों.

या प्रमुख कार्यकर्त्यांच्या आभारानंतर मला माझ्या मित्रमंडळीकडे वळलें पाहिजे. माझ्या आतांपर्यंच्या प्रकाशनकार्यांत माझ्या मित्रमंडळींनीं मला अत्यंत साह्य केलें. ज्याला जें करतां येईल त्यानें तें केलें. सेनापतींबद्दल त्यांनाही अत्यंत आदर व हें कार्य व्हावेंच अशी त्यांचीही इच्छा. दे. भ. सेवक सेवानंद यांनीं महाराष्ट्राची सेनापतींचें चरित्र लिहून मराठी वाङ्मयाची बहुमोल सेवा केली आहे. महाराष्ट्रास त्यांनीं उपकृत करून ठेवलें आहे. त्यांचेबद्दल मनांत सदैव कृतज्ञ राहणें हें मी माझें कर्तव्य समजतों. माझे मित्र रा. विनायकराव उर्फ बू. साठे यांचा मी ऋणी आहें. तद्वत्च माझे मित्र रा. दत्तोपंत गोखले यांना मी विसरणें शक्य नाहीं. आणखी माझे मुळशी संग्रामापासून अत्यंत परिचित कष्टाळू, त्यागी असे मित्र श्री. सखारामपंत भागवत यांच्या मदतीला सीमा नाहीं. पुस्तकप्रसाराचे कामांत यांनीं फार मेहनत घेतली. शिवाय सेनापति बापटप्रेमी देणगीदारांचा मी अत्यंत

आभारी आहें. या अल्प द्रव्यबळावर मी काम करूं शकलों. अस्तु. 'समग्र-ग्रंथां'त सेनापति, त्यांचें कुटुंब व मुलें यांचीं चित्रें घातलीं आहेत. ब्लाक्स् सुंदर व वेळेवर करून दिल्याबद्दल रा. पोतनीस यांचा मी आभारी आहें. मुद्रितें बहुतेक आमच्या निकटच्या मित्रानें तपासलीं. आभार मानणें कृत्रिमपणाचें वाटतें. मन आभारानें भरलेलें आहे. वाचकांस विनंति करितों कीं नजरचुकीनें छपाईत अशुद्धें राहिलीं आहेत, तीं शुद्धिपत्रांत शुद्ध केलीं आहेत. क्षमस्व.

अखेर पूज्य साने गुरुजींच्या शब्दांत प्रार्थना हीच कीं मृताला अमृत-स्पर्श करणारी ही समग्र-ग्रंथरूपी गीता महाराष्ट्रास त्याच्या निद्रेंतून लवकर जागी करो इतकें लिहून वाचकांची रजा घेतों.

शुभं भवतु ।

धुंडिराज विष्णु देव
संग्राहक

२४।८।३९

# प्रस्तावना

आज मोठ्या पहांटे उठून महर्षि सेनापतींच्या या गद्यपद्यमय साहित्य-संग्रहाला मी कोणते दोन शब्द जोडूं याचा विचार करीत होतों. मीं आधीं स्नान केलें. डोक्यावर पाणी घेतांना म्हणत होतों कीं डोक्यांतील खळमळ सारा धुवून जावो. सेनापतींच्या साहित्याला दोन शब्द लिहिण्यापूर्वीं मनानें, बुद्धीनें जरा निर्मळ हो. सेनापतींचें सारें जीवन महाराष्ट्रांतील, महाभारतांतील अंतर्बाह्य घाण जाळून टाकण्यासाठीं आज चाळीस वर्षें धडधड धडधड पेटत आहे.

महर्षि सेनापतींचें चरित्र मी लिहिणार होतों. परंतु मी भांबावून गेलों. या महापुरुषाचें चरित्र लिहावयास आपण असमर्थ असें वाटलें. मीं शेवटीं नम्रपणें नाहीं असें कळविलें. श्री. सेवानंदांनीं तें लिहून महाराष्ट्रावर महदुपकार केले आहेत. परंतु आज या साहित्यसंग्रहाला दोन शब्द लिहिण्याचें काम अंगावर आलें आहे. मीं त्याला संमति दिली होती. चरित्र-लेखनाचें अंगीकृत कार्य मीं शेवटीं नाकारलें, तसेंच याहि वेळेस होणार होतें. परंतु तें बरें दिसणार नाहीं असें वाटलें. शेवटीं आज पहांटे हे शब्द मी लिहीत आहें.

सेनापतींचा व माझा तसा फार परिचय नाहीं. मी त्यांचेजवळ कधीं फार बोललों नाहीं. मी त्यांच्या कोणत्याहि चळवळींत पडलों नाहीं. पुण्याला कॉलेजमध्यें शिकत असतां मी माझ्या मामांकडे कधीं कधीं जात असें. त्या वेळेस सेनापति श्लोक व गाणीं म्हणत मामांच्या दारावरून जात. मामा म्हणत "हे बापट हो. हे व मी एका वर्गांत होतों. यांचें इंग्रजी चांगलें असे, माझें गणित." आपले मामा व सेनापति एका वर्गांत होते या गोष्टीनें मला आनंद झाला. एकप्रकारें आपणही सेनापतींशीं यामुळें जोडले गेलों असें वाटलें.

परंतु सेनापतींच्या मुळशीच्या त्या करुणवीर सत्याग्रहांत मी कोठें

सामील झालों होतों ! त्या वेळेस मी लिखतपढत बसलों होतों. सेनापतींशीं त्यांच्या सेवाधर्मात तल्लीन होऊन मी जोडला गेलों नाहीं. परंतु काय असेल तें असो. सेनापतींशीं माझा मनोमय भक्तिप्रेमाचा संबंध एकप्रकारें अनिर्वचनीय असा आहे. सेनापति १९३७ मध्यें खानदेशांत आले. त्या वेळेस एरंडोल एथें मीं प्रथम त्यांना जवळून पाहिलें. त्यांच्या भावना पाहिल्या, त्यांची वाणी ऐकिली. मला एकप्रकारें कृतार्थ वाटलें. त्यानंतर जळगांव, अमळनेर वगैरे ठिकाणीं त्यांच्याशीं आणखी परिचय झाला. जळगांव अमळनेरला त्यांच्याबरोबर सफाईचें काम दोन तास करायला मिळालें. तो प्रसंग मी कधीं विसरणार नाहीं. माझ्या हृदयांतून त्या वेळेस आनंदाचे व धन्यतेचे झरे बुडबुड करीत जणुं बाहेर फुटत होते.

सेनापतींशीं मीं कसलीहि चर्चा कधीं केली नाहीं. माझ्या मानस-मंदिरांत मी त्यांची अर्चा करीत बसतों. महाराष्ट्रांतील दोन थोर विभूति माझ्या जीवनांत एकदम येऊन बसल्या. जणुं त्यांचे माझे ऋणानुबंध होते. जणुं पूर्वजन्मींचा मी त्यांचा पुजारी आहें. या दोन विभूति म्हणजे सेनापति व वर्ध्यांचे विनोबाजी. या दोन महापुरुषांविषयीं मला अत्यंत प्रेम व भक्ति वाटते. माझें प्रेम मुकें आहे. भक्ति भित्री आहे, लाजरी आहे. पुण्याला गेलों तर सेनापतींना भेटावयास मी लाजतों. त्यांच्या घरापर्यंत जाऊन मी माघारा वळतों. मीं पूज्य विनोबाजींना असेंच एकदां लिहिलें होतें. "मी वर्ध्याला येईन. परंतु तुमच्या नकळत तुम्हांला पाहीन व निघून जाईन." हें कोडें मला उलगडत नाहीं. रवीन्द्रनाथांच्या कादंबरींत कोठें-तरी एक वाक्य मीं वाचलें होतें. "माझ्या देवाची त्याला नकळत मी पूजा करतों" असें तें वाक्य होतें. त्या वाक्याचा अशा वेळीं मला अनुभव येतो.

आपण कर्महीन आहोंत, सेवेंत प्रत्येक क्षण जात नाहीं, या महापुरुषांना पाहिजे तशी सेवा आपल्या हातून होत नाहीं, आपण अद्याप केवळ निर्मम व निर्मळ झालेलो नाहीं, या सर्व गोष्टी मनांत येऊन कदाचित् मी अशा थोरांपासून दूर रहात असेन. परंतु दूर दूर राहिलों तरी त्यांच्याविषयींचा एक प्रकारचा गूढ भक्तिभाव माझ्या जीवनांत भरून राहिला आहे यांत संशय नाहीं. फुलें सूर्यापासून दूर राहतात, परंतु त्याचा प्रकाश घेऊन फुलतात;

कृतज्ञतेनें त्याच्याकडे तोंड करून आपल्या सुगंधाची पूजा त्याला अर्पितात. मीहि थोरांमोठ्यांपासून दूर राहून माझें जीवनरोपटें वाढविण्याची यथाशक्ति खटपट करीत असतों.

सेनापतींचें जीवन अद्‌भुतरम्य आहे. किती हृदयभेदक प्रसंग, किती रोमांचकारी गोष्टी ! ज्याच्या आधीन त्यांनीं आपलें सारें जीवन केलें आहे त्या श्रीहरीनें त्यांचें चरित्र अपूर्व रंगानें रंगविलें आहे. ते स्वतःच आत्मचरित्रपर कवितेंत लिहितात :—

चमत्कारमयी माझी कहाणी मज वाटते
मदर्थ हरिचे कष्ट पाहुनी प्रेम दाटतें

लहानपणीं पाण्यांत बुडतांना सेनापति वांचले. इंग्रजी शिकण्याचें असेंच कसें तरी जमलें. कॉलेजमध्यें सेनापति होते. बंडखोर व स्वतंत्र वृत्तीचे म्हणून ते प्रसिद्ध झाले. परंतु ही बंडखोर वृत्ति कोणत्या गोष्टीकडे वळणार होती ? श्रीहरि वळण देण्याला उभा राहिला. जीवनांत कधीं कधीं विवक्षित क्षण येतात. ते क्रान्तीचे क्षण असतात. जीवन अंतर्बाह्य निराळें होतें. परमेश्वर हा सर्वांत मोठा क्रान्तिकारक आहे. तो कोणाच्या जीवनांत कधीं कोठें स्फोट करवील त्याचा नेम नाहीं. सेनापतींच्या जीवनांत स्फोट झाला व अत्यंत मंगल वस्तु जन्माला आली.

ती संध्या सेनापतींच्या जीवनांत अमर झाली आहे. सूर्य अस्तास जात होता. लाल दिसत होता. रात्रीला भेटावयास सूर्य जात होता. रात्रीच्या घरांत तो अदृश्य होणार होता. गोरजमुहूर्ताची ती वेळ. वधूवरांचीं लग्नें बहुधा या मुहुर्तावर लागतात. सेनापतींचें त्या दिवशीं आध्यात्मिक लग्न लागलें. भौतिक लग्न पूर्वीं लागलें होतें. त्या सायंकाळीं सेनापतींनीं भवानी तलवारेची शपथ घेऊन सारें जीवन राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं देण्याची प्रतिज्ञा केली. त्या पवित्र प्रशान्त वेळेस हें होमकुंड त्यांनीं पेटविलें. सेनापतींना त्या प्रसंगाची स्मृति येतांच उचंबळून येतें. तो प्रसंग वर्णितांना ते भावनोत्कट होतात. ते आत्मचरित्रांत लिहितात :—

अहा तो विधि दुर्वर्ण्य मंगलीं अतिमंगल
हरिक्रिया तो; तो दे ही मधुरा शांति निश्चल

विधि झाला; दिनकरीं निशा माझी दिली तयें
मांगल्यमय तें मातें केलें श्रीहरिनें स्वयें

ते पत्रांत लिहितात :—

"१९०२ सालीं श्रीहरीनें मुरलीचा मोहक आवाज त्या सायंकाळीं माझ्या हृदयांत भरला. तो तेथें कमी अधिक प्रमाणांत निरनिराळ्या रागदारींत आजवर सारखा घुमत आहे. तो श्रीहरि तुम्हांलाहि तसा मधुर आवाज ऐकवील."

सेनापतींचें जीवन श्रीहरीच्या मुरलीच्या तालावर चाललें आहे. त्या देशभक्तिरूप वधूचा हात धरून ते नाचत आहेत. "माझी प्यारी" या गाण्यांत ते म्हणतात :—

अहा तो भाग्याचा दिवस
माझिया सौख्याचा कळस
हिंद-भू-भक्ति मला प्यारी
माझि ही खुबसूरत नारी

अशा रीतीनें जनसेवेशीं ज्यांचें चिरंतन लग्न लागतें ते धन्य होत. श्रीहरीच्या कृपेशिवाय तें शक्य नसतें.

सेनापति विलायतेंत यंत्रविद्या शिकण्यासाठीं गेले. सरकारी शिष्यवृत्ति मिळाली व इतर साहाय्य मिळालें. परंतु ही हिंदभूभक्ति त्यांना आतां थोडीच सोडणार होती ! तेथील सभांतून ते बोलूं लागले. इंग्रजी राज्यावर त्यांनीं कडक टीका केली. हातांत रिव्हाल्वर घेऊन सभेंत उभे राहिले. हे वृत्तान्त हिंदुस्थानांत येऊन त्यांची शिष्यवृत्ति बंद झाली. पुस्तकी विद्या संपली. स्वातंत्र्यविद्येचा अभ्यास सुरू झाला. पॅरिसला बॉंब-विद्या शिकण्यासाठीं ते गेले. तेथें रशियन क्रांतिकारकांशीं ओळखी झाल्या. बॉंबच्या कृतीचें एक रशियन पुस्तक त्यांना मिळालें. परंतु तें समजणार कसें ! एका रशियन विद्यार्थिनीनें आपली परीक्षा दूर करून त्या पुस्तकाचें भाषान्तर करून दिलें. रशियन देशभक्तांच्या त्यागाचा सेनापतींच्या हृदयावर खोल ठसा उमटला आहे.

सहामाही बुडवुनी भाषान्तरित ती तिणें
केली स्नेहार्थ सेवार्थ धन्य धन्य तिचें जिणें

देशाची सेवा ज्यांना करावयाची असेल ते त्यागमय बनले पाहिजेत. वाचाळांच्या हातून देशसेवा होणें कठीण. ज्यांच्या जीवनांत एकच ध्यास, एकच वेड, एकच प्रबळ भावना भरून राहिली असेल तेच कांहीं करूं शकतील. पोषाखी पंचरंगी पोपट फुकट आहेत. सुखासीन व भोगासीन जीव ध्येयाला केव्हां कसे भेटणार? देशाचीं कामें करूं इच्छिणाऱ्यांनीं वासनांचा होम केला पाहिजे, क्षुद्र सुखांवर निखारे ठेवले पाहिजेत. ही गोष्ट सेनापतींनीं अनेक ठिकाणीं सांगितली आहे.

कामी असंयमी भोगी   रोगी ते कार्यनाशक
निकामी क्रान्तिकार्यांत   असोत बहुभाषक
संयमी उद्धरी राष्ट्र   आत्मोद्धारक संयमी
शीलाविणें जनोद्धारा   उभे जे मग्न ते तमीं

देवाच्या पायीं न हुंगलेलें फूल आपण वाहतों त्याप्रमाणें मातृभूमीच्या चरणींही इतर वासनाविकारांनीं अनाघ्रात असें जीवनपुष्प ज्याला वाहतां येईल त्याची थोरवी किती वर्णावी! किती सांगावी!

सेनापति व त्यांचे सखे स्वातंत्र्यसाधनांच्या अभ्यासांत रमूं लागले. इकडे हिंदुस्थानांत सरकारी अत्याचार वाढत होते. लाला लजपतरायांस अटक झाली. सेनापति मित्रांस म्हणाले, "अमुक दिवसांत लालाजींना सोडलें तर ठीक नाहीं तर आम्ही बदला घेऊं" असें जाहीर करा. पार्लमेंट उडवून द्यावें असेंहि या वीराच्या मनांत येऊं लागलें. परंतु या तरुणाचे नायक स्वातंत्र्यवीर श्री. बॅ. सावरकर यांनीं सेनापतींस सांगितलें, "असें विजेसारखें चमकून जाण्यांत अर्थ नाहीं. संघटना वाढविली पाहिजे. तुम्ही हिंदुस्थानीं परत जा. बॉंबविद्येचा प्रचार करा." आज्ञा मानून सेनापति मातृभूमीस परत आले. ते बंगालमध्यें गेले. तेथील क्रांतिकारकांस भेटले. परंतु कार्यपद्धतीबद्दल मतभेद झाले. सेनापति महाराष्ट्रांत परत आले. त्यांनीं लोकमान्यांची भेट घेतली. लोकमान्य म्हणाले, "सिंहगडावर या. तेथें मोकळेपणें बोलूं." परंतु लोकमान्यांना एकदम अटक झाली. सिंहगडावर होणारें बोलणें झालें नाहीं. तिकडे बंगालमध्यें क्रांतिकारक पकडले गेले. एक माफीचा साक्षीदार गोस्वामी यानें सारें सांगितलें. त्यांत सेनापतींचें नांवहि सांगण्यांत आलें!

सेनापति तुळशीबागेजवळून जात होते. ज्ञानप्रकाशांतील हें वृत्त त्यांना सांगण्यांत आलें. तत्क्षणीं ते अदृश्य झाले. जनतासागरांत हा जनसेवक बुडून गेला. कित्येक वर्षें हा फकीर अज्ञातवासांत राहिला. नानारूपें त्यांना धारण करावीं लागलीं. कधीं आचारी बनावें, कधीं भंगी बनावें, कधीं शिक्षक बनावें, कधीं विद्यार्थी बनावें, असा खेळ चालला.

या अज्ञातवासांत त्यांच्या जीवनांत एक क्रान्ति झाली. सेनापति ध्येयपूजक बनले होते. परंतु ध्येयरूप देवाहून आणखी कोणी निराळा परात्पर श्रीहरि आहे असें त्यांना वाटत नव्हतें. ध्येयावर श्रद्धा होती. परंतु ईश्वरावरची नाहींशी झाली होती. परंतु सारीं ध्येयें ज्याच्यासाठीं आहेत, तो परमेश्वर त्यांच्या जीवनांत या अज्ञातवासांत पुन्हा दाखल झाला. स्वतःला श्रीहरीच्या हातांतील एक खेळणें करून या अज्ञात-वासांतून ते बाहेर आले.

या अज्ञातवासांतील एक अत्यन्त करुण उदात्त असा प्रसंग आहे. सेनापतींनीं हिंदुस्थानांत गतधवांची स्थिति काय आहे ती पाहिली. स्त्रियांचा या समाजांत कसा कोंडमारा होतो तें त्यांनीं पाहिलें. सेनापतींना स्वतःच्या पत्नीची आठवण झाली. त्यांनीं तिला पत्र लिहिलें, "तूं पुन्हां विवाह कर." एका मित्राला लिहिलें, "माझ्या पत्नीला तूं वर." सहानुभूतीनें दुसऱ्याच्या जीवनाचा जो विचार करूं लागतो तो किती उंच जाऊं शकतो त्याचें हें भव्य उदाहरण आहे. महाराष्ट्रा, ज्यांच्या जीवनांत असे अमर प्रसंग आहेत, त्यांच्या जीवनाला तूं अमूल्य ठेव्याप्रमाणें जप. अशीं जीवनें हींच राष्ट्राची खरी संपत्ति, हाच राष्ट्राचा वारसा.

सेनापतींचा सरकारला सुगावा लागला. ते पकडले गेले. त्यांना मुंबईस आणण्यांत आलें. ज्या खोलींत त्यांना ठेवण्यांत आलें होतें तेथें घाण होती. ते अधिकाऱ्यांस म्हणाले, "आधीं केरसुणी द्या. येथें मला सारें स्वच्छ करूं दे." सेनापतींस घाण सहन होत नाहीं. भारतीय संसार अंतर्बाह्य प्रकाशानें भरावा, स्वच्छ सुंदर व्हावा, अशी तहान त्यांना आहे.

शेवटीं सेनापतींस सोडून देण्यांत आलें. मातृभूमीच्या सेवेसाठीं परागंदा झालेला पुत्र पारनेरला वृद्ध मायबापांजवळ आला. श्रीहरीनें ज्या हातांत पिस्तूल दिलें, त्या हातांत आतां झाडू दिला. सरकारी गुलामगिरी व

रूढीची गुलामगिरी. या दोन्हींवर बाँब टाकल्याशिवाय क्रान्ति होत नसते. सेनापति म्हणतात :—

दिला झाडू दिलें खोरें  दिलें खापर तें करीं
रस्ते गटारें झाडावीं  दिली ही मज चाकरी

परंतु या गोष्टीचा गांवांत गलबला झाला. सेनापतींचे वडील अत्यन्त धार्मिक व गणपतीचे पुजारी. त्यांना दुःख झालें. सेनापति नम्रपणें म्हणाले :

तुम्ही पूजक देवाचे  देवाचा मीहि पूजक
सर्वव्यापी देव माझा  त्याची मी झाडिं बैठक
तुम्ही बैठक झाडीतां  सान मंगलमूर्तिंची
आन कांहीं न करिं मी  मीहि सेवा करीं तिची
रुष्ट ते जाहले तुष्ट  स्पष्ट होतां मदाशय
आई दादा न सामान्य  थोर ते विमलाशय

अशा रीतीनें सेनापति विराट् देवाची बैठक स्वच्छ करूं लागले. गांवांतील कोणी वडिलांजवळ जर बोलूं लागले तर ते वडील म्हणत, "माझ्या पांडुरंगाप्रमाणें पवित्र दुसरा कोण आहे !"

सेनापति रोज सकाळीं ३।४ तास सफाईचें काम करीत. सायंकाळीं पांच वाजतां रस्त्यावरच ज्ञानेश्वरीवर प्रवचन करीत. नंतर शेतकऱ्यांच्या मुलांना शिकवीत. आणि रात्रीं महारवाड्यांत जाऊन तेथें शिकवीत. असा हा विधायक कार्यक्रम चालला. हें काम करतांना सेनापति नवीन नवीन गाणीं, कविता रचीत व त्या त्या वेळेस म्हणत. अज्ञातवासांत "स्वतंत्रता-सप्तशती, क्रान्तिगीता" वगैरे लिहिलेलें वाङ्मय नष्ट झालें होतें. आणि पारनेरला सेवा करतांना जें लिहिलें तेंहि सारें राहिलें नाहीं. सेनापति सांगतात :—

चाकरी करितां ही जें  लिहिलें बहु त्यांतुनी
बहुसें नष्ट मीं केलें  एकया खेदमयीं दिनीं

सेनापति आतां थोडे संसारी झाले. देशाचा फाटलेला संसार तर सारखा डोळ्यांसमोर होताच. अज्ञातवासांत त्यांचें चिंतन करून राहिलेली पत्नी, तिला थोडी जागा त्यांनीं जीवनांत दिली. दोन मुलें झालीं. वामन

व कमल. वामन जन्मला असेल त्या वेळेस त्यांनीं "माझा बाळ" ही कविता लिहिली असावी.

ब्रह्माचा तूं वांटा ब्रह्मरूप बाळा
आलासी वेल्हाळा माझे घरीं

असें गहिंवरून ते म्हणत आहेत. ईश्वरच हें लहानसें रूप घेऊन घरीं आला असें त्यांना वाटलें. बाळ जन्माला आलें तें रडत आलें. कां बरें? सेनापति म्हणतात, "कामवृत्ति आवडूं लागली म्हणजे बाळ जन्माला येतें. तें रडून सांगतें तुझ्या कामवृत्तींतून मी जन्मलों." जणुं वैराग्याचा उपदेश करायला श्रीहरिच बाळरूपानें अवतरला. ते लिहितातः—

बाळ एक येई व्यग्र मन होई
जनकासि नेई वैराग्यांत

सेनापतींचें आपल्या मुलांवर अत्यन्त प्रेम आहे. लहान मुलांना ते प्रेमानें पोटाशीं धरावयाचे, खांद्यावर नाचवायचे. कमल ही अशक्त होती. सेनापतींनीं तिला कसें वाढवलें याचें सुंदर वर्णन त्यांनीं केलेलें आहे. दोन मुलें देऊन सेनापतींची पत्नी देवाघरीं गेली. ते म्हणतात :—

गृहांत गृहिणी-अर्चा घडली न मुळीं बरी
मद्पात्रत्व बघुनी मत्कांता श्रीहरी हरी

देशभक्तीशीं लग्न लागलेला घरांतील पत्नीशीं कसा नीट वागणार?

पारनेर सोडून सेनापति या वेळेस पुण्यास आले होते. लोकमान्य टिळक सुटून आले होते. राष्ट्रीय पक्षानें पुन्हा कॉंग्रेसमध्यें प्रवेश केला होता. विजापूरला मोठी परिषद् भरली. त्या वेळेस युरोपांत महायुद्ध सुरू होतें. हिंदुस्थानांत रिक्रूटभरतीचा असह्य जुलूम होता. सेनापति विजापूर येथें बोलतांना संतापानें जणुं बेशुद्ध झाले. लोकमान्य भावनाभरानें म्हणाले, "त्याचें अंतःकरण एक मी ओळखतों."

केसरी कचेरींत सेनापति १९१५ सालीं काम करूं लागले. १९१७ साल आलें. रशियांतील क्रान्तीची पहिली बातमी आली होती. केसरी कचेरींतील कांहीं म्हणाले, "कसली क्रांन्ति नी काय. संस्कृतीची सारी होळी केली त्यांनीं. शिमगा सुरू केला आहे बेट्यांनीं." सेनापति म्हणाले, "कोट्यवधि श्रमजीवींच्या संसारांची होळी होत होती. तेथें आतां दिवाळी

येत आहे. प्रत्येकाचा विकास होईल. सर्वांच्या जीवनांत आनंद व प्रकाश होईल. मी हा दिवस साजरा करतों." असें म्हणून त्यांनीं डाळें मुरमुरे आणले. लोक हंसले. ते म्हणाले, "हें लेनिनमिक्श्चर आहे. श्रमजीवी जनतेच्या क्रान्तीच्या दिवशीं असलाच खाना शोभतो."

केसरी ऑफीस सोडून पुढें ते ज्ञानकोशांत काम करूं लागले. त्या वेळींच पत्नी वारली. सेनापतींची पत्नी वारली तेव्हां तेथील मित्र म्हणाले, "आज ज्ञानकोश कचेरीला सुटी देऊं." ते म्हणाले, "तुम्ही वाटलें तर घ्या सुटी. मी येऊन काम करीन !"

घरचा संसार क्षणभर थाटलेला मिटला. श्रीहरि दुसरा महान् संसार त्यांच्यासाठीं मांडीत होता. साबरमतीच्या महात्म्यानें सत्याग्रहाचा मंत्र राष्ट्रास दिला. हिंदुस्थानभर चैतन्याची प्रचंड लाट उसळली. ब्रिटिश सत्ता क्षणभर जरा हादरली. इकडे महाराष्ट्रांत कोट्यधीश टाटा मुळशी पेट्यांत धरण बांधूं लागले. बारा हजार मावळे भिकेस लागणार होते. ज्या मावळ्यांनीं महाराष्ट्रास महान् इतिहास दिला, ते हांकलले जाणार होते. सत्याग्रह करावा असे शब्द उच्चारले जाऊं लागले. सेनापति या वेळेस मुंबईला होते. भंग्यांचा संप लढवण्यासाठीं ते गेले होते. राजबंदी सुटावे म्हणून राजबंदी सोडा अशा अक्षरांची फळी गळ्यांत अडकवून सेनापति त्यासाठीं हजारों सह्या गोळा करीत त्या वेळेस हिंडत असत. अशा वेळेस सत्याग्रहाची हांक आली. अंतरंगांतील श्रीहरीशीं त्यांनीं चर्चा केली. त्यांचीं मतें निश्चित होतीं. स्वातंत्र्य रणाशिवाय मिळत नसतें. मारण-मरणाशिवाय मोक्ष नाहीं. तरीहि सामसत्याग्रहाचा प्रयोग करावयास ते उभे राहिले. सामसत्याग्रह व शुद्धसत्याग्रह असे दोन भेद त्यांनीं केले आहेत. या दोहोंचे पुन्हां आणखी दोन प्रकार त्यांनीं कल्पिले आहेत. प्राथमिक व प्रागतिक. प्राथमिक सामसत्याग्रह म्हणजे शत्रूच्या पायावर डोकें ठेवून विनविणें, त्याला नम्रपणें सांगणें व तो देईल ती शिक्षा सोसणें. प्रागतिक सामसत्याग्रह म्हणजे शत्रूला न दुखवतां त्याची मालमत्ता नष्ट करणें. शुद्ध सत्याग्रहांतील प्राथमिक प्रकार म्हणजे शत्रूला नुसतें जखमी करणें. आणि प्रागतिक म्हणजे शत्रूला ठार करणें. सामसत्याग्रहाचा प्रयोग करून पाहूं या. नाहीं तर अशा शुद्ध सत्याग्रह मग अवलंबूं. असें सेनापतींनीं

ठरविलें. ते सांगतात :—

हठ माझी दृढमति जनकार्य अनल्प जें
तें न साधे साम-वादें विपक्षमत जैं खुजें
येतों मी बोलतों मित्रां तुम्ही व्यर्थ मरा जरी
मरणें तुमच्या संगें योग्य वाटे मला तरी

लहानसहान कामें कदाचित् सामसत्याग्रहानें सिद्धीस जातील. परंतु जीं महान् स्वराज्यसंपादनासारखीं कामें आहेत तीं यानें साधणार नाहींत. कारण शत्रूचें मन मोठें दिलदार नसतें. क्षुद्र मनाच्या शत्रूजवळ आपल्या या बलिदानाचा काय उपयोग? परंतु जगांत फुकट कांहीं जात नाहीं. राष्ट्रांत या बलिदानानें शुद्धि येईल. त्यागाचें वातावरण निर्मिलें जाईल. शत्रूचीहि खरी परीक्षा होईल. शत्रु परीक्षेंत नापास झाला तर मग शुद्ध सत्याग्रह आहेच. अशी सेनापतींची विचारसरणी होती. देशांत कोठून तरी तेज प्रकट व्हावें यासाठीं त्यांचा जीव तडफडत होता. महाराष्ट्रांतील पक्षोपपक्ष मुळशीचा विचार करायला जमले हें पाहून सेनापति आनंदले. ते म्हणूं लागले

महाराष्ट्रमूळशीपरिषदीं तिन्ही पक्ष जमले
दक्षत्वाच्या वीरत्वाच्या सुविचारीं रमले
विश्वसलें मन जिवंत आहे थोर महाराष्ट्र
महाराष्ट्र निजतेजें उठविल अखिल हिंदराष्ट्र

सेनापति शान्त राहतील कीं नाहीं, सामसत्याग्रहाची शिस्त पाळतील कीं नाहीं अशी कांहींना शंका वाटली. सेनापतींसारखे पुरुष जें हातीं घेतील तें नीट पार पाडतील एवढीहि त्यांना खात्री वाटेना! परंतु पुढें या शंका गेल्या. सेनापतींजवळ लपंडाव नाहीं. घाव घालायचा झाला तर तसें जाहीर करून घाव घालतील. घाव शान्तपणें शिरावर झेलावयाचा ठरलें तर त्याप्रमाणें अक्षरशः वागतील. सेनापति शिस्तमूर्ति आहेत. व्रतमूर्ति आहेत.

मुळशीचा सत्याग्रह म्हणजे महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासांतील एक तेजोमय प्रकरण आहे. स्त्रीपुरुषांनीं त्या प्रसंगीं जें तेज प्रकट केलें तें अवर्णनीय आहे. आधणाचें पाणी वीरांनीं व वीरललनांनीं अंगावर घेतलें. मावळे व मावळिणी यांनीं अद्‌भुत धैर्य व शौर्य प्रकट केलें. या सत्याग्रहांतच

सेनापति ही पदवी सेनापतींस मिळाली. सेनापति पुनःपुन्हा तुरुंगांत जात होते. तुरुंगांत ते सर्वांना धीर देत. सर्वांची चौकशी करीत. सर्वांच्या भाकऱ्या एकत्र कुस्करून काला करीत. गोकुळांतील गोपाळकृष्णाचा प्रेमधर्म ते तुरुंगांत शिकवूं लागले. प्रेमधर्माचे सेनापति आचार्य आहेत. भेदभाव जावेत म्हणून ते तडफडतात. तुरुंगांतून बाहेरच्या सैनिकांस ते तेजस्वी संदेश पाठवीत. सत्याग्रह्यांना तुरुंगांत ते कविता पाठ करायला सांगत. अशा रीतीनें हें काव्य बाहेर येई. पुष्कळसें काव्य या वेळेस त्यांनीं दिलें. "अरे, हा शिवबाचा महाराष्ट्र. त्या मावळ्यांनीं पूर्वी रक्ताचे सडे घालून येथें स्वराज्य स्थापिलें. आनंदवनभुवन निर्मिलें. महाराष्ट्राला दिव्य इतिहास दिला. त्या मावळ्यांचे ते अनन्त उपकार स्मरून आजच्या सर्व सुशिक्षितांनीं उठून कांहीं ऋण फेडावें. तीन हजार सत्याग्रही नाहीं का महाराष्ट्र देणार ! महाराष्ट्र का मेला !" अशा गर्जनांनीं सेनापति महाराष्ट्राची सुप्त तेजस्विता जागवूं बघत होते. कोणी म्हणूं लागले, "सेनापति वेडे आहेत. आज यंत्रयुग आहे. वीज निर्माण केली पाहिजे. धरणें बांधलीं पाहिजेत." सेनापति यंत्रविरोधी नाहींत. त्यांनाहि विजली पाहिजे आहे.

बिजलीयुग हें व्हावी बिजली परि भाकरी
बारा हजार दीनांची काढणें न परी बरी

एवढेंच त्यांचें म्हणणें होतें. सेनापतींच्या हांकेस ओ देऊन सत्याग्रही येत होते. त्यांना सेनापति शिस्तीचे धडे देऊन तयार करीत. शिस्तीची महती सुंदर कवितांतून त्यांनीं गायिली आहे. राष्ट्रें चढतात व पडतात. कां !

हें पडणें हें चढणें याला मूळ एक शिस्त
शिस्तयुक्त ते चढले पडलों आम्ही बेशिस्त

असें त्यांनीं बजावलें आहे. बावळट व बेशिस्त लोक कुचकामाचे. संयमानेंच स्वराज्य वा स्वाराज्य लाभतें. संसार वा परमार्थ, उभयत्र शिस्तीला महत्त्व आहे.

जी शिस्त तीच शाही
शिस्तींत राज्य राही

शिस्त शिकलेत म्हणजे राज्य आलेंच हा मंत्र त्यांनीं पटविला. सामसत्याग्रह जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत शत्रूनें कितीहि जाच केला तरी सहन

करा. ते म्हणत :—

अम्ही पांडवांसारखी शिस्त पाळूं
मनींच्या मनीं आमुचा क्रोध जाळूं
पुढें धर्मयुद्धीं करूं दोन हात
परी तोंवरी राहणें शान्त शान्त

जेव्हां प्रकटपणें मारणमरण सुरू करूं, तेव्हां दे घाव घे घाव अशी टिप्परघाई खेळूं. त्या सत्याग्रहांत कधीं कधीं जुलूम इतका असह्य होई कीं सेनापति बेभान होत. एकदां तर ते टाटांच्या लोकांच्या अंगावर धांवून जाणार होते. परंतु मित्रांनीं त्यांना आंवरिलें.

एकदां कोपलों भारी भारी दुष्टत्व पाहुनी
मित्रें धरूनियां मातें शान्त केलें तया क्षणीं

सेनापति अत्यन्त शान्तपणें टाटांच्या लोकांजवळ जाऊन मुळशीच्या शेतकऱ्यांचीं दुःखें सांगत. त्या वेळेस सेनापति रडत असत.

आंसवें गळती माझ्या नयनांतून याचितां
मुळशीकर दुःखाचा पाढा दुःसह वाचितां

परंतु त्या आंसवांची दानवी सरकारला कदर वाटली नाहीं. द्रव्यान्ध भांडवलवाल्यांनीं त्या अश्रूंची टर केली. तीन वर्षें सामसत्याग्रह करून मग गीताप्रणीत शुद्ध सत्याग्रहाची सेनापतींनीं वीरघोषणा केली. या शुद्ध सत्याग्रहांतील शत्रूला नुसतें जखमी करणें हा प्राथमिक भाग त्यांनीं उचलला. त्यांना व त्यांच्या साथीदारांस शिक्षा झाल्या. सेनापति आपल्या कैफियतींत म्हणाले, "मला ठार मारावयाचें नव्हतें. तसा आरोप मजवर करतां येणार नाहीं. माझ्या मनांत तसें असतें तर मी त्या वेळेस त्यांना जखमी करण्याऐवजीं ठार केलें असतें. परंतु शुद्ध सत्याग्रहाचा प्राथमिक मार्ग आम्हीं आंखला होता." सेनापतींच्या स्पष्ट वाणीचा न्यायाधीशावरहि परिणाम झाला. शेवटीं सात वर्षें ते तुरुंगांत गेले.

त्या शिक्षेतून १९३१ सालीं ते मुक्त झाले. महाराष्ट्रानें त्यांना प्रांतिक कॉंग्रेसचें अध्यक्षपद दिलें. महाराष्ट्रांतील घाण दूर करावयास त्यांनीं दौरा काढला. गांवोगांव रस्ते झाडावे, परदेशी कापड सीलबंद करावें, असा दौरा सुरू झाला. या प्रचारांतच रत्नागिरी येथें ते कांहीं बोलले. खुनास

उत्तेजन देणारें भाषण असें ठरून त्यांना पुन्हा सात वर्षें शिक्षा झाली. १९३७ मध्यें पुन्हा ते बाहेर आले. बाहेर येतांना एक दिव्य विचार घेऊन आले. आपलें जीवन समाप्त करावें असें ठरवून बाहेर आले. राष्ट्रांतील दुही, भेद पाहून त्यांचें हृदय शरमतें, करपतें. या भेदांना नष्ट करण्याची सद्बुद्धि राष्ट्राला कधीं येईल असें त्यांना वाटतें. देशाचा अपमान त्यांना क्षणभर सहन होत नाहीं. १९३९ च्या जुलैच्या २३ तारखेस ऐक्याची महती राष्ट्राला पटावी म्हणून ते प्राणांची पूर्णाहुति देणार होते. परंतु श्रीहरीनें त्यांची योजना सध्या तरी दूर ठेविली आहे. त्याची सदय लीला सेनापति आपणांत वावरवीत आहे.

आज चाळीस वर्षें ज्यानें आपलें जीवन धगधगित पेटवून ठेवलें आहे, जगेन तर राष्ट्रासाठीं, मरेन तर राष्ट्रासाठीं अशी प्रतिज्ञा १९०२ मध्यें घेतल्यापासून प्रत्येक श्वासोच्छ्वास तदनुसार ज्याचा चालला आहे, त्याच्या लेखनाचें हें पुस्तक आहे. हें प्राणमय पुस्तक आहे. चैतन्याची ही गाथा आहे. मृतराष्ट्राला अमृतस्पर्श करणारी ही गीता आहे. या पुस्तकांतील ओळन् ओळ केवळ पवित्र आहे. सूर्याजवळ अंधार नाहीं. समुद्राजवळ थिल्लरपणा नाहीं. या संग्रहांत चाउटी वाउगी वल्गना नाहीं. ज्यानें स्वतःचें जीवनच काव्यमय केलें आहे, जो स्वतः महाकाव्याचा महान् विषय शोभेल, अशाचें लिहिणें येथें आहे. पित्यानें तुरुंगांच्या दारांतून मुलांना पाठवलेलीं प्रेमळ पत्रें यांत आहेत. राष्ट्रांतील बंधुभगिनींस दिलेली शिकवण येथें आहे. महर्षींचा प्रबोध व सेनापतींचा प्रताप या पुस्तकांत आहे. कोमलता, प्रखरता, उत्कटता, उदात्तता सारें येथें आहे. सेनापतींची ही वाङ्मयी मूर्ति आहे.

सेनापतींनीं वामन व कमल यांना लिहिलेलीं पत्रें किती सुंदर आहेत! तात्यांनीं आपणांसच पत्र लिहावें म्हणून वामन व कमल यांचें भांडण असायचें. तात्या त्यांची समजूत घालीत आहेत. किती गोड वाटतो तो प्रसंग! मुलांच्या बारिक सारिक गोष्टींत ते रस घेत आहेत. कमल लिहितें, "तात्या, एक संस्कृत श्लोक करून पाठवा." तात्या संस्कृत श्लोक करून पाठवताहेत. सारें जीवन देशाच्या संसारांत रस यावा म्हणून तुरुंगांत

चाललेलें. स्वतःच्या मुलांना फार जवळ घेतां आलें नाहीं, त्यांना खाऊ देतां आला नाहीं. परंतु हा प्रेमळ पिता कवितांचा खाऊ पाठवीत आहे. पत्रांतून कधीं कधीं शिकण्यासंबंधीं बहुमोल सूचना देत आहे. ईश्वर ज्याप्रमाणें ढगांआड, किरणांआड, ताऱ्यांआड, पानांआड लपून सूचना देतो, त्याप्रमाणें सेनापति प्रिय मुलांना तुरुंगाच्या गजांतून सूचना देत आहेत. प्रोफेसरांबद्दल वामननें कांहीं तक्रार लिहिली. सेनापति लिहितात,

"माणूस कितीहि मोठा असला तरी त्याला निर्दोष समजूं नये व त्याबरोबर हेंहि मीं वर सांगितलें कीं कितीहि दोषपूर्ण दिसला तरी त्यांत कांहीं गुण असतो. विद्यार्थी या नात्यानें तूं या दुसऱ्या सांगणीकडे विशेष लक्ष देऊन तूं तुझ्या कॉलेजांतील अध्यापकांचा जेवढा फायदा घेतां येईल तेवढा घे."

कमलला काय शिकावें याविषयीं सांगतात :—

"तूं श्रमयुगांत जन्मली आहेस. युगानुसार व योगानुसार शिक्षण घे. किसानमजुरांचें दुःख कष्ट थोड्या अंशानें का होईना कमी करण्याची लायकी तुजमध्यें आणून देईल असें आयुर्वेदाचें शिक्षण घे. पोटापुरतें मॅट्रिक पुरे. परंतु लोकार्थदृष्टीनें अधिक शिक्षणाचा विचार करणें योग्य आहे."

अशा रीतीनें केवळ पोटार्थी शिक्षण न घेतां ज्या शिक्षणानें आपली उपजीविकाहि चालेल आणि लोकांच्या उपयोगींहि पडतां येईल असें शिक्षण घेण्यास ते सांगतात. परंतु आयुर्वेद महाविद्यालयांत अधिक अभ्यास, अधिक कष्ट. त्याबद्दल ते लिहितात,

"तरुणपणांत कष्टांना, Hard Work ला भ्यावयाचें तर पुढें काय करावयाचें ?" वामनच्या पत्रांत इंग्रजी शब्दांचें स्पेलिंग चुकलें असलें तर तेंहि तात्या कळवतात. सर्व गोष्टी नीट झाल्या पाहिजेत यावर तात्यांचा फार कटाक्ष. तात्यांची शिक्षा संपेल, मग आपण एकत्र राहूं, प्रेमळ पित्याच्या प्रेमाचा भरपूर उपयोग घेऊं असे गोड मनोरथ कमल मनांत खेळवी. ती तसें पत्रांत लिही. परंतु सेनापति "माझें जीवन आतां संपणार आहे. तुम्हीं त्यासाठीं मन सिद्ध ठेवलें पाहिजे. मला श्रीहरि नाचवील तसें वागणें भाग आहे" अशा अर्थाचें लिहितात. तें लिहितांना त्यांना कसें

वाटत असेल, वाचतांना मुलांना काय वाटत असेल ! तात्या लिहितात :—

"तुम्ही सुटून आल्यावर आपण पुण्याला राहूं वगैरे तुझे गोड विचार वाचून माझें हृदय भरून आलें. डोळे डबडबले."

परंतु हें छोटें प्रेमसागर वाक्य लिहून पुढें जलसमाधीच्या गंभीर गोष्टी त्यांनीं सुरू केल्या. ते म्हणतात :—

"कमल, आपलें कुटुंब केवढें मोठें ! एक वेडा पीर त्यांत निघाला म्हणजे फार नाहीं. ईश्वराच्या विश्वनाटकांत अशा वेड्यांची जरूर असते. ज्या परीनें कोणालाहि देवकार्य समजेल, त्या परीनें तें कार्य त्यानें करावें हें योग्य व हेंच योग्य. माझ्या परीनें मी करीत आहें. ही माझी 'पर' वेडेपणाची आहे हें मला कबूल.

**दुनियेच्या बऱ्यासाठीं दुनियेला कायमचा रामराम स्वखुषीनें ठोकण्याची बऱ्याच जणांची तयारी असेल तरच दुनियेचें बरें होत जातें असा दुनियेचा अनुभव व दुनियेचा इतिहास सांगतो."**

महात्माजी गोलमेज परिषदेला लंडनला गेले. तेथें महात्माजींनीं एकमुखी मागणी करण्यासाठीं किती खटपट केली परंतु इतर मुत्सद्दी ऐकेनात. जगासमोर भारताचें हंसें झालें. मांजरासमोर तुकड्यासाठीं उंदीर भांडत बसले. सेनापतींना तुरुंगांत याची चीड आली. जीवन असह्य झालें. पसतीस कोटि लोकांचें हंसें या लोकांना करवतें कसें त्यांना वाटलें. हिंदुमुसल्मान, स्पृश्यापृश्य सर्वांनीं संयमानें एकत्र येऊन मिळतें घेऊन एकमुखी मागणी कां करूं नये असें त्यांच्या मनांत येई. राष्ट्राला, राष्ट्रांतील पुढाऱ्यांना अशा गोष्टीची तहान कधीं लागेल ! गंजलेला दरवाजा उघडायचा असेल तर तेथें भरपूर तेल लावलें पाहिजे. स्वार्थानें बरबटलेल्या आमच्या हृदयास शुद्ध करण्यासाठीं जीवनार्पणें केलीं पाहिजेत. बलिदान, अपार बलिदान, झाल्याशिवाय स्वातंत्र्याचे प्रश्न सुटणार नाहींत असें सेनापतींस सदैव वाटतें. त्यांच्या सर्व जीवनाचा हा संदेश आहे.

हत्ती व्हावा तरी मोल द्या हत्तीचें
येथें मुर्वतीचें काम नाहीं ॥

अशी स्पष्ट जाणीव त्यांना करून द्यायची आहे. देहाची आसक्ति सोडून

मरणाला मिठी मारणारे लाखों लोक जेव्हां उभे राहतील तेव्हांच राष्ट्र उभें राहील.

स्वातंत्र्याचा मार्ग म्हणजे बलिदानाचा. बलिदान कोणाचें ? सेनापति म्हणतात "स्वतःचें करा." तेवढ्यानें न भागलें तर दुसऱ्याचेंहि करावयास निर्मोहपणें सिद्ध व्हा. हिंसा व अहिंसा यांचा वाद कित्येक वर्षं माजून राहिला आहे. लोकमान्य टिळकांनीं गीतारहस्यांत याचा ऊहापोह केला. महात्माजींचा व लोकमान्यांचा वाद झाला. दोघेहि श्रीगीतेचे उपासक. सेनापतिहि गीतेलाच मानतात.

गीतेचा मी भक्त पुरातन श्रीहरिचा प्यारा
गीतागायक नायक माझ्या विचार आचारा ॥

सेनापति म्हणतात, "केवळ अहिंसाधर्म एकांगी आहे. हिंसा व अहिंसा दोघांचाहि अवलंब जगाच्या कल्याणासाठीं करणें धर्म आहे." अहिंसा एवढेंच का देवाचें रूप ? हिंसा हेंहि देवाचें रूप आहे. दयाघन तोच व कराल काली तोच. मारणारा हात व तारणारा हात—एकाच आईचा. त्यांतील कोणता अधिक गोड ?

गीता हिंसा-अहिंसा सांगत नसून मोह दूर करून वागा एवढेंच सांगत आहे. कर्तव्याच्या आड जर देहाच्या आसक्तीचे दाट पडदे येतील तर ते निःशंकपणें फाडून टाक असें गीता गर्जना करून शिकवीत आहे. स्वदेशाला मुक्त करणें, कोट्यवधि दलित जनतेला सुखी करणें, या मार्गाच्या आड गोरे येवोत वा काळे येवोत, स्वकीय येवोत वा परकीय येवोत, दोघांना दूर कर असें गीता सांगते. ज्याच्याजवळ जी शक्ति असेल, जो वर्ण असेल, त्या रीतीनें अनासक्तपणें सेवा करावी म्हणजे झालें.

ज्याच्या मनांत यत्किंचितहि वैयक्तिक स्वार्थ नाहीं त्याचें मारणें मारणेंच नाहीं. निःस्वार्थ हिंसा म्हणजे संपूर्ण अहिंसाच आहे. रामानें रावणाला मारलें. परंतु रावण उद्धरून गेला असें आपण म्हणतों. याचा अर्थ काय ? याचा अर्थ हा कीं तें रामाचें मारणें तारणें होतें. आईनें मुलाला मारलें. त्याचें कल्याण यांतून जन्मलें. कुंभार थापट्या मारून मडक्याचा आकार देतो. त्यां थापट्या नवजीवन देणाऱ्या आहेत. आईनें मारलें तर मुलगा विचार करूं लागतो. त्या मननानें तो सुधारतो. दुष्ट

लोकहि विचार करूं लागतील. अत्यन्त निःस्वार्थ लोंक आपणांस मारावयास कां वरें तयार झाले ! असें त्यांच्या मनांत येऊन ते सुधारतील. आपण पूज्य ठरावयाऐवजीं वध्य कां ठरलों ! हवे हवे असें वाटण्याऐवजीं हननाई कां ठरलों !

तनुवधें मन कीं मनना करी
मनन रोग खलत्व करी दुरी ॥

खलहिंसेनें, निःस्वार्थ खलहिंसेनें अनाथांचा उद्धार होईल व खलांचाहि उद्धार होईल अशी सेनापतींची विचारसरणी आहे.

परंतु या मुद्द्याच्या अगदीं विरुद्ध मुद्दा दुसरे लोक उभा करतील. ते म्हणतील, "खल सुधारण्याऐवजीं आणखीच दुष्ट तो होईल. ज्यानें आपणांस मारलें त्याचा सूड घ्यावा या हेतूनें तो अधिकच क्रूर होऊन जगांत जन्मेल. खलाला सुधारणारी शेवटीं हिंसा नसून अहिंसा आहे. मुलगा शिक्षकाच्या काठीनें सुधारणार नाहीं असें शिक्षणशास्त्र सांगतें. मानवसमाजाच्या विराट् शाळेंतहि अहिंसेचेंच साधन वापरणें अधिक शास्त्रीय ठरेल."

थोरामोठ्यांच्या या वादांत मी काय सांगणार ! सेनापतींचें एक म्हणणें मात्र पटतें. आपण स्वतःच्या देहाला तुच्छ मानतों, मग दुसऱ्यांच्या देहांना कां तुच्छ मानूं नये ! सत्याच्या प्रकाशासाठीं मार्ग मोकळा केला पाहिजे. मी माझ्या देहाचें मडकें फोडावयास सिद्ध आहें. दुसऱ्याच्या मडक्याला जर तें गरिबांच्या आड येत असेल तर कां फोडूं नये ! दुसऱ्याच्या देहांची आसक्ति कां ! ही करुणा आहे, कोमलता आहे. ज्यांना स्वतःच्या देहाचें बलिदान करवतें, दुसऱ्यांच्या देहांचें करवत नाहीं, ते संपूर्ण ज्ञानी नव्हत. संपूर्ण ज्ञान्याला सारें सारखें वाटेल.

आधीं इतर उपाय करून पाहिल्यावर मग जालीम उपाय आपण योजतों. त्याप्रमाणें शत्रुहननाचा मार्ग एकदम घेऊं नये. हिंसा म्हणजे कांहीं मौज नाहीं. दुःखानें परंतु कर्तव्य म्हणून शेवटीं नाइलाजास्तव हिंसा करावयाची. आणि त्या वेळेस ती धर्म्य आहे असें सेनापतींसारखे सांगत आहेत. आज राष्ट्रांत अहिंसेचा महान् प्रयोग सुरू आहे. त्यालाहि सेनापतींची तयारी आहे. 'करून पहा' ते म्हणतात. परंतु त्यांना त्या प्रयो-

गांत उत्कटता पाहिजे आहे. लाखों लोकांनीं उठावें व या इंग्रजी राज्याचा आम्ही निषेध करतों असें म्हणून स्वतःच्या माना उतरून ठेवाव्या असें त्यांना वाटतें.

न जों समूहें मरती भक्त हे शांति घोषुनी
शांतिवीर न जों होती राष्ट्रवीरांपरी जनीं
न तों सुज्ञांहि मानावी शाब्दिकी शांतिघोषणा
करोत कितिही कोणी निर्वीर्या कंठशोषणा

असे जथेच्या जथे जोंपर्यंत आत्महोम करीत नाहींत, तोंपर्यंत अहिंसेचा प्रयोग कसा व्हावयाचा ?

तेहतीस कोटी स्वतंत्र व्हाया तेहतीस लक्ष तरी
देह हेमिणें पडेल आम्हा स्वतंत्रता समरीं

असें तें सांगतात. महात्माजींच्याहि मनांत असे विचार असतील. शांति-सेना स्थापाव्या असें ते एकदां मागें म्हणाले. कॉंग्रेसमंत्र्यांना लाठीमार, गोळीबार अपरिहार्य म्हणून करावाच लागतो. त्या वेळेस कॉंग्रेसचे अहिंसक जथे तेथें मरावयास पाठवतां आले पाहिजेत. तशी तयारी नसेल होत तर ? जर मंत्र्यांना गोळीबार अपरिहार्य होतो, तर आम्हांला स्वातंत्र्यसंपादनार्थ तो सुतरां अपरिहार्य असें कोणीं म्हटलें तर आपण काय उत्तर देणार ?

उत्तर एकच देऊं. शस्त्रास्त्रांनीं परसत्तेजवळ लढाई देणें आज आपणांस अशक्य आहे. परंतु शक्याशक्यतेचा म्हणजे धोरणाचा प्रश्न आला. तत्त्वज्ञान दूर राहिलें. कदाचित् आपण असें म्हणूं, "अहिंसा असमर्थ नाहीं. परंतु ती संपूर्ण अहिंसा जीवनांत आणण्यास असमर्थ असल्यामुळें आम्ही हिंसेचा आतां स्वीकार करतों." परंतु सेनापति हिंसेला, निःस्वार्थ खल-हिंसेला, अधर्म्य मानावयास तयार नाहींत. तिला कमी मानावयास तयार नाहींत. परंतु संपूर्ण अनासक्त हिंसा तरी शक्य आहे का ? सूड, द्वेष त्यांत नसेल का ? सेनापति म्हणतात, "हळुहळूच मनुष्य सुधारतो. एकदम तो अनासक्त कसा होईल ? आसक्तियुक्त हिंसाकर्महि त्याज्य नाहीं. आसक्तियुक्त इतर कर्मे ज्याप्रमाणें आपण सोडीत नाहीं, हळुहळू विकास करीत सुधा-रत जातों, तसेंच हिंसेचें. हळुहळू हिंसाहि निर्मळ, केवळ पवित्र होईल. तें आईचें मारणें होईल."

हे प्रश्न वादानें सुटणार नाहींत. हे श्रद्धेचे प्रश्न आहेत. एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. परधर्म भयावह आहे. अहिंसा ज्यांना झेपत नसेल त्यांच्यावर ती लादण्यानें कल्याण होणार नाहीं. प्रत्येकाचा विकास त्याच्या त्याच्या मार्गानेंच होईल. अर्जुनाच्या रोमरोमांत क्षात्रवृत्ति भरलेली होती. एकदम तो संन्यासी कसा व्हावयाचा ! श्रीकृष्णानें परधर्म त्याच्यावर लादला नाहीं. परधर्माचें पांघरूण अंगावर घेऊं दिलें नाहीं. हिंदुस्थानांत अहिंसेचें वातावरण आहे असें महात्माजी मानतात. राष्ट्राचा तो स्वधर्म आहे असें त्यांना वाटतें. परंतु अखिल राष्ट्राचा हा स्वधर्म होऊं शकणार नाहीं असें जर त्यांना दिसलें तर ते राष्ट्राला मारणमरणाचा उपदेश देतील. "अहिंसा झेपत नसेल तर हिंसा उचला. परंतु गुलाम राहूं नका" असें त्यांनीं अनेकदां सांगितलेंहि आहे.

जगांत हिंसा भरपूर आहे. मारण्याचा उपदेश करावा लागत नाहीं. खाणें, झोपणें, राग येणें या स्वाभाविक क्रिया आहेत. त्यांतून आपणांस वर जायचें असतें. तूं खातोसच, परंतु नियमितपणें खा असें शास्त्र सांगतें. त्याप्रमाणें हिंसा आपण करतोंच. शास्त्र सांगेल, येतां जातां हिंसा करूं नकोस. तिच्यांतहि संयम आण. अहिंसक हो थोडा. हिंसेचीं उपनिषदें गाण्याची जरूरी नाहीं. अहिंसेचीं गाण्याची जरूरी आहे. परंतु शेंकडों लाथा बसत असतांहि भेकडपणें हात न उचलणाऱ्या बावळटांस हिंसेचींहि उपनिषदें ऐकण्याची आवश्यकता असते. अहिंसा हें बलवंतांचें शास्त्र आहे. भ्याडांचें नाहीं. भ्याडांना आधीं झुंजार बनवा. आणि त्या झुंजारांना मग अहिंसक असे उदात्त वीर बनवा.

हिंसा वा अहिंसा, कोणता तरी मार्ग प्रखरपणें उचला; हें मेंगरूळ जीवन नको, असें सेनापतींस वाटतें. भारताची, या प्राचीन पवित्र देशाची दीनता त्यांना बघवत नाहीं.

> रक्ताळलें शरीर भडका जिवांत झाला
> आईस सोडवाया येणार कोण बोला

असें ते सर्वांना पुन:पुन्हा विचारीत आहेत. कोण उत्तर देणार ! कितीसे उत्तर देणार !

स्वातंत्र्यार्थ स्व-पर-बलिदानाची जशी तयारी हवी, त्याप्रमाणें इतर

गोष्टीहि हव्यात. बहुसंख्य लोकांनीं अल्पसंख्य लोकांत विश्वास उत्पन्न केला पाहिजे. त्यांना संतुष्ट केलें पाहिजे. त्यांच्या शंका दूर केल्या पाहिजेत. ऐक्यासाठीं वाटेल ती किंमत द्या. येथील परकी सत्ता आधीं दूर करा.

येथील पाश्चिमात्यांच्या साम्राज्या द्यावया गति
अवश्य दृढभावाची हिंदुमुस्लीमसंहति
आम्हां चालेल मुस्लीम शास्ता, परि न पश्चिमी
कां हिंदूंत न व्हावी ही भावना आत्मसंयमी
देश देशीय शास्त्यांच्या हातीं येईल सर्वथा
ती गोष्ट करणें आधीं दुज्या खटपटी वृथा

हिंदुस्थानांतील सर्व जातींनीं व धर्मांनीं एक व्हावें एवढेंच नाहीं. पाश्चिमात्यांच्या कुरघोडीला आळा घालण्यासाठीं रशियासह सर्व पौर्वात्य राष्ट्रांनीं एक संघ कां निर्मू नये असें ते विचारतात.

देशासाठीं मारणमरणाचा मार्ग स्वीकारणें हा शूरांचा धर्म आहे. परंतु आपणां सर्वांस कांहीं ना कांहीं करतां येईल. उपकारधर्माचा आज लोप झाला आहे. सेनापति म्हणतात, "मीं सारे धर्म नीट अभ्यासिले. सर्वांचें सार उपकार हें आहे." आज भारतांत सर्वत्र उदासीनता आहे. शेंकडा ९० लोकांना लिहितां वाचतां येत नाहीं. शिकलेले लोक अशिक्षितांस शिकविण्यासाठीं कां उभे रहात नाहींत!

करा देशसेवा करा लोकसेवा
तुम्हांला जरी तो हवा मोक्षमेवा
जनां ज्ञान द्या हा हरीचा निरोप
जनां ज्ञान द्या टाकुनी दुष्ट झोंप

असें सेनापति सांगत आहेत. लोकांची सेवा करावयास हजारों उठतील तेव्हांच अंधार दूर होईल. मोक्षप्रभा फांकेल.

सेनापति देशासाठीं प्राण हातीं घेऊन उभे आहेत. परंतु ज्यांना सेनापतींचें हें दिव्यरूप पाहवणार नाहीं, त्यांनीं सेनापतींचीं सौम्य रूपें पहावीं. महाराष्ट्रांतील हा महापुरुष झाडू घेऊन रस्ते झाडीत आहे. म्हातारपणीं पुण्याच्या रस्त्यांतून स्वदेशी मालाची ढकलगाडी लोटीत आहे. साक्षरताप्रसारासाठीं स्वयंसेवक म्हणून नांव नोंदवीत आहे. सेवेचें कोणतें काम

त्यांनीं करावयाचें ठेवलें ! ज्याला जें शक्य तें त्यानें देश वर आणण्यासाठीं करावें. ते कवींना परोपरीनें म्हणतात, "स्वातंत्र्याचें वातावरण निर्मा." परंतु महाराष्ट्रांतील कवि तितक्या त्वेषानें उठत नाहींत हें पाहून ते स्वतः कवि झाले. काव्याची भाषा गांवोगांव उडत जाते. शब्दांना पंख फुटले कीं ते सर्वत्र जातात. सेनापति कां बरें कविता लिहूं लागले ! त्यांच्या हातांतील लेखणी म्हणजे धमनी आहे. देशांतील लोकांच्या चैतन्यावरील राख फुंकून टाकण्यासाठीं ते उभे राहिले.

उघडा हो उघडा हो हृद्भवनाचीं झणी तुम्ही द्वारें
आत्माग्निकणावरती घालूं द्या मजसि आज फुंकारे ॥

... ... ... ...

विझलें, विझो हरीनें करिं माझ्या दीधली असे धमनी
आत्मस्फुलिंग फुंकुनि अग्नि करायासि सिद्ध हृद्भवनीं ॥

त्यांनीं आपल्या कवितांस 'चैतन्यगाथा' हें नांव दिलें आहे. देशाला उठवण्यासाठीं तें काव्य जन्मलेलें आहे.

देशाचा संसार आहे माझ्या शिरीं
ऐसें थोडें तरी वाटूं द्या हो

असें सर्वांना वाटावें म्हणून त्यांची आटाआटी. ललितसुंदर कोमल काव्याची त्यांना जरूर भासत नाहीं. वाग्देवतेला ते म्हणतात, "मला सतार व वीणा नको. माझ्या हातीं रणशिंग दे, भेरी दे."

वीणा सतारी मृदू नाद सारा नको आज माते तया आंवरीं
भेरी तुतारी महानाद व्हावा करीं देवि तो या जनां सांवरीं
टाकी तरुच्छत्र टाकी क्षणीं या शिलेचें तसें भव्य सिंहासन
टाकी सरिद्भाव, त्या हंसलीला करी पालथे दुष्ट दुःशासन

इतिहासाचार्य राजवाडे यांनीं असेच उद्गार काढले होते. "स्त्रैण व विलासी बनविणारीं किरटीं वाद्यें नकोत. नगारे वाजवा" असें त्यांनीं लिहिलें होतें.

सेनापतींची रचना साधी आहे. सरळपणा व उत्कटपणा यांतच तिचें सौंदर्य आहे. प्रखरतेंत तिची मनोहरता आहे. इंग्रजींत म्हणतातः—"The very bareness was beauty"—खोलींत तसबिरी, हंड्या, झुंबरें, गालिचे वगैरे कांहीं नाहीं. परंतु स्वच्छ प्रकाश मात्र आहे. प्रकाशाची शोभा येथें आहे. हिमालयांतील स्वच्छ बर्फावर सर्वत्र सूर्याचा प्रकाश

पडलेला असावा. तेथें त्या निर्भेळ प्रकाशाचीच जशी एक अवर्णनीय शोभा असते तसें येथें आहे. असली शोभा सामान्य लोकांस दिपविते. त्यांना भिन्न रंग हवे असतात. सेनापतींजवळ रागरंग नाहीं. एक स्वातंत्र्याचा अमर अनुराग आहे. स्वातंत्र्याचा सुगंध त्यांच्या शब्दाशब्दाला लागलेला आहे. त्यांच्या हृदयांतील चैतन्यसिंधूंतून प्रत्येक शब्द चुबकळून वर आलेला आहे. देशसेवेसाठींच काव्याचीहि उपासना त्यांनीं केली. पुढील जन्मीं मी मोठा कवि होईन असें ते मनांत म्हणतात. मोठा कविहि जनसेवेसाठींच व्हावयाचें.

मी पद्यकार, कवि मी न, कवित्व सार्थ
लाभो मला जनुशतीं जनसेवनार्थ
भावूनियां मनिं असे शुभभाव कांहीं
बांधूनि छंदिं मुरलीधरपायिं वाहीं

जनसेवेसाठीं ते कवि झाले. देशभक्तीनें काव्य लिहूं लागले. स्वतः-च्या मुलांना कवितारूप खाऊ देतां यावा, मुलांची करमणूक व्हावी, म्हणूनहि ते कविता लिहीत. परंतु थोरांची करमणूक तीसुद्धां जीवनाला थोर करणारी असते.

सेनापति भाषेकडे, वृत्तांकडे फारसें लक्ष देत नाहींत. चैतन्याला मिठी मारणारा मातीकडे कसें लक्ष देईल ! परंतु त्यांनीं मनांत आणलें तर ते सर्व वृत्तांतून सुंदर कविता लिहूं शकतात. वामन पंडिताप्रमाणें अनुप्रास-प्रास करण्याचीहि त्यांना आवड आहे. नवनीताचा अभ्यास पुष्कळ ठिकाणीं दिसून येतो. तुरुंगांत असतांना प्रख्यात मराठी कवि यशवंत यांचें 'यशोधन' हें अमर पुस्तक त्यांना वाचायला मिळालें. सेनापतींस मित्रानें विचारिलें, "आवडलें का पुस्तक !"

"धालों मी मज काव्य हें बहु रुचे ऐसें वदें मी यश."

तेव्हां मित्र म्हणाला, "यांतील नवनवीन चाली पाहिल्यात का !" सेनापति म्हणाले, "चालींना घेऊन काय करूं ! यांतील मालाचें महत्त्व आहे. चाली प्रयत्नसाध्य आहेत. परंतु अर्थरूप व्हावयास, लिहिलेलें कृतींत आणावयास शतजन्म लागतील." मित्र म्हणाला, "तुम्ही दाखवा बरें या चालींत कविता करून !" सेनापति "बरें" म्हणाले. 'यशोधनरागरंग'

या नांवानें ४३ कविता यशोघनांतील चाली घेऊन त्यांनीं रचिल्या आहेत. या कवितांतील श्रीशारदावन्दन, येणार कोण बोला, पाशयन्त्रावर, नवा नकाशा वगैरे कविता भावनांनीं बहरलेल्या आहेत. त्यांतील चैतन्य, तळमळ, कळकळ निस्तुल आहे. या नाना चालींतील कविता रचतांना ते म्हणतात :—

देवा तूं मजलागिं जी पुरविली चैतन्यपाणी दवा
ती मीं आजवरी कशीतरि दिली प्रेमें बहू बांधवां
नाना रंगि कुप्यांत आज भरिं मी ती कांहिं भाईस्तव
कोणी कीं मज बोलला रुचतसे आम्हां कुपी-वैभव

रंगीबेरंगी बाटल्यांत भरून ही चैतन्यमय औषधी आम्हांस द्या असें कांहींनीं म्हटलें म्हणून सेनापतींनीं 'यशोघनरागरंग' जनतेला दिला. कोणी बाहेरच्या बाटलीचेंच विचारे कौतुक करतात. सेनापतींना रसाची गोडी आहे. द्रोण असो वा चांदीचा पेला असो, आंतील पेय अमृतमय असूं दे म्हणजे झालें.

सेनापति आध्यात्मिक भूमिकेवर उभे आहेत. माझ्या अल्पमतें आज हिंदुस्थानांत अध्यात्माच्या इतक्या उच्च भूमिकेवर वावरणारे फार थोडे पुरुष असतील. त्यांच्या सर्व कृतींत श्रीहरि भरलेला आहे. त्यांच्या जीवनाला देशभक्तीचा वास आहे. परंतु देशभक्तीला देवभक्तीनें अधिकच मधुर केलें आहे. जीवनांतील सारी घाण त्यांनीं काढून टाकिली आहे. श्रीहरीच्या हातांतील एक साधन म्हणून, एक खेळणें म्हणून, ते वावरतात. श्रीहरीच्या वेणूचा आवाज त्यांच्या जीवनांतून प्रकट होत आहे. देवावर सर्वांची निष्ठा असावी असें त्यांना वाटतें. रशियाबद्दल त्यांना अभिमान वाटतो. परंतु रशिया आस्तिक झाला तर सोन्याहून पिवळें होईल असें त्यांना वाटतें. एक दिवस सारे श्रीहरीकडे येतील अशी श्रद्धा त्यांनीं प्रकट केली आहे. ते एका पत्रांत लिहितात :—

"श्रीहरीचें यंत्र बनण्याचा आनंद स्वतंत्रतेच्या आनंदापेक्षां फार मोठा आहे असा माझा अनुभव आहे."

तुलसीदासांनीं असेच धन्योद्गार काढले. कबीरानें—

मैं गुलाम मैं गुलाम मैं गुलाम तेरा । तूं साहब मेरा

असे उद्गार नाचत नाचत काढले. सेनापति अशाच स्थितींतील मुक्त पुरुष आहेत.

सेनापति अनेक योजना, अनेक बेत करतात. परंतु त्यांत बदल होतो. त्याचें त्यांना वाईट वाटत नाहीं. ते पत्रांत लिहितात:—

"मी त्या सूत्रधारावर अत्यन्त प्रेम करणारांपैकीं आहें. त्यानें कांहींहि केलें तरी मला बरोबर वाटतें. क्षणभर, घटकाभर हें बरोबर नाहीं देव करीत, अशी ऊर्मि उठते. परंतु थोड्या विचारानें ही ऊर्मि नाहींशी होऊन हें बरोबर आहे, हें बरोबर असलें पाहिजे, असा विश्वास दृढ होतो. हा माझा स्थायिभाव आहे. माझ्या योजना त्यानें नापास केल्या तरी मला राग येत नाहीं. कारण खेळ त्याचा. आपण आपलें काम नीट करण्याचा यत्न करावा व बाकी त्यावर सोंपवावें. हाच मार्ग खरा.

देवा खेळे खेळ तुझाये आवडी
न जाईन रडी कांहीं केल्या

असा यशोघनरागरंग प्रकरणाचा शेवट आहे. तो औपचारिक नाहीं. निश्चयात्मक आहे."

"देवा, तुझी इच्छा प्रमाण, माझी नाहीं" असें कितीकांना म्हणता येईल बरें!

सेनापतींची महाराष्ट्राला अद्याप व्हावी तशी ओळख झालेली नाहीं. त्यांचा महान् आत्मा फारच थोड्यांना समजला असेल. फुलाहून कोमल व वज्राहून कठोर असा हा पुण्यप्रतापी पुरुष आहे. त्यांच्या ठिकाणीं वीरांची वीरता अधिक आहे कीं संन्याशाची संन्यस्तता अधिक आहे, तें मी काय सांगू! वीरपुरुषच संन्यासी होऊं शकतो. सेनापति जणु निसर्गाप्रमाणें आज बनले आहेत. क्षणांत रडतील, क्षणांत हंसतील, क्षणांत येथें जातील, क्षणांत तेथें. सूर्यप्रकाशानें कोठेंहि जावें. जेथें जाईल तेथें तो फुलवील. तेथील मलिनता दूर करील. ही भूमिका सामान्य जनांना झेंपण्यासारखी नाहीं. सामान्य लोक गट करून, कंपू करून राहतात. कोणाचे लहान कंपू, कोणाचे मोठे. सेनापतींना आज कंपू नाहीं. त्यांना कोठें संकोच वाटत नाहीं. ते देवाचा निर्मळ वारा झाले आहेत.

सेनापतींना भारताचा अभिमान वाटतो. आणि महाराष्ट्राचाहि वाटतो.

महाराष्ट्रानें भारताचा भार अधिक प्रमाणांत घ्यावा असें त्यांना वाटतें. शिवबाचा महाराष्ट्र, वीरांचा व संतांचा महाराष्ट्र, मागें राहूं नये म्हणून त्यांची कासाविशी होत असते. महाराष्ट्रानें आघाडीवर राहिलें पाहिजे. त्यासाठीं त्याग करावा.

हिंदराष्ट्र हें सत्वर व्हावें खरेंखरें राष्ट्र
राष्ट्रीकरणीं पुढें असावा थोर महाराष्ट्र
मनीं वांछितों गोड गोष्टि या सर्व जीवभावें
मनोराज्य हें जनीं कशानें मूर्तरूप व्हावें

महाराष्ट्राबद्दलच्या या त्यांच्या आशा-आकांक्षा कशा सफळ होणार ! कधीं सफळ होणार !

महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेलें
मराठ्या-विना राष्ट्रगाडा न चाले

असें सात्त्विक अभिमानानें त्यांनीं म्हटलें आहे. परंतु महाराष्ट्रांतील लोक मरणाला न भिणारे खरे मराठे होतील तेव्हांच सेनापतींचे बोल खरे ठरतील.

देशाला, महाराष्ट्राला जागें करावयास त्यांनीं सारें दिलें आहे. त्यासाठीं हातीं पिस्तुल घेतलें, हातीं झाडू घेतला, हातीं लेखणी घेतली. अशांचे उतराई कसे होणार ! आज भारताच्या राजकीय अंबरांत सेनापति एका पवित्र ताऱ्याप्रमाणें दूर शोभत आहेत. त्यांच्याभोंवतीं संघटना दिसत नाहीं. ते एकटे दिसतात. त्यांच्याबरोबर उड्डाण करण्याचें सामर्थ्य फार थोड्यांत आहे. हा तेजस्वी तारा आपलें पावित्र्य व तेज सर्वत्र पसरीत आहे. हें तेजोमया पावित्र्यमया तुला अनंत प्रणाम !

सेनापति म्हणजे मला शिवाजी, रामदास व तुकाराम यांची त्रिमूर्ति वाटते. सेनापति म्हणजे लोकमान्य, महात्माजी व स्वातंत्र्य-वीर सावरकर यांचें अपूर्व असें मधुर मिश्रण वाटतें. भक्ति, ज्ञान व सेवा यांची ही त्रिपदा गायत्री आहे. अहंकार त्यांनीं नष्ट केला आहे. त्यांचें हंसणें किती गोड व मोकळें असतें ! मुक्त पुरुषाचें तें हंसूं असतें. कृत्रिमतेला जीवनांत स्थानच उरलें नाहीं. बोलण्या-चालण्यांत केवळ सहजता भरून राहिली आहे. मुक्त पुरुष मुलाप्रमाणें असतात हें त्यांना पाहून पटतें.

रशियांतील गोष्टी वाचून नाचूं लागतात. आकाशवाणीनें रशियांतील वार्ता ऐकायला अधीर होतात. तिकडेच जाऊं चला सारे असें म्हणतात. रस्त्यांत कोणी भेटला तर त्याचा हात धरतील व घेऊन जातील. सारें जीवन जसें गोड झालें आहे. आणि असें हें परम मंगल, परम पावन, परम तेजस्वी, परम मधुर जीवन शेवटची आहुति म्हणून द्यावयास ते अधीर झाले आहेत.

महाराष्ट्राची ही पुण्याई आहे, पराक्रम आहे. त्यांनीं स्वतःला जें वतन मिळविलें तें महाराष्ट्राला त्यांनीं ठेवलें आहे. कोणतें त्यांचें वतन ?

मेरा वतन भलाई । मेरा वतन भलाई

सेनापतींची ही कविता कितीदां वाचली तरी मला तृप्ति होत नाहीं. त्या हिंदी कवितेचा मी भावार्थ देतों.

"जगाचें भलें करणें हें माझें वतन आहे. देवानें दिलेल्या बुद्धीप्रमाणें श्रम करून जगाचें भलें मला करायचें आहे. कोणी मला नांवें ठेवतील, कोणी माझी स्तुति करतील. ज्याची जशी दृष्टि, तसें त्याला दुसऱ्याचें कर्तृत्व दिसतें. देवाची इच्छा एवढीच आहे कीं त्यानें जी बुद्धि तुम्हांला दिली असेल, तिला अनुसरून तुम्हीं जगाचें भलें करावें. माझ्या वाणीनें व करणीनें ईश्वराची ती इच्छा सर्वांना समजून देणें हें माझ्या जीवनाचें ध्येय आहे. लोभाला व मोहाला माझ्या जीवनांत स्थान नाहीं. कधींचेंच मीं माझें जीवन अर्पण केलें आहे. कोणी मला भिववूं पाहील म्हणून का भियेन ? मी देवाचा आहें. भिणें माझा धर्म नाहीं. देवाची सुद्धां मला भीति वाटत नाहीं. मी त्याचा आवडता आहें. मी त्याच्या घरचा बुलबुल आहें. ज्याला देवाची सुद्धां थोडी देखील भीति वाटत नाहीं, त्याला कोण भीति घालणार ? भिणारे भिवोत. मी असा अभागी नाहीं हें ध्यानांत धरा. देवाच्या सर्व लेंकरांची कष्ट करून सेवा करणें म्हणजेच पवित्र जीवन. हेंच एक मी शिकलों. हेंच माझें व्रत. हें व्रत मी कधीं सोडणार नाहीं. सेवा कधीं विसरणार नाहीं. कांहींहि होवो. मी सदा आनंदांत असेन."

असें हें दिव्य गान आहे. जगाची सेवा करतां आपत्ति आल्या तरी त्या त्यांना आनंदरूपच आहेत. सेनापतींना त्यांचे कांहीं मित्र 'दुःखानंद' असें विनोदानें म्हणतात. दुःखांतहि ते देवाचा हात पाहतात. ज्यानें स्वतःला

भलाईचा गुलाम केलें आहे, सच्चाईचा गुलाम केलें आहे, श्रीहरीचा गुलाम केलें आहे, त्याचें भाग्य कोठवर वर्णावें ! आणि ज्या भारतांत, ज्या महाराष्ट्रांत असे देवाचे लाडके बुलबुल, असे देवाचे लाडके गरुत्मान् निर्माण होतात त्या भारताचें, त्या महाराष्ट्राचेंहि भाग्य किती थोर! पण खरें भाग्य त्या दिवशीं लाभेल ज्या दिवशीं आपसांतील दुही दूर करून "मेरा वतन भलाई" असें आपण नाचत म्हणूं व तत्प्रीत्यर्थ सुखानें मरूं.

१५-८-३९ साने गुरुजी

# अनुक्रमणिका

दत्तो वामन पोतदार.
१८० शनवार पेठ पुणे २.


| | रचनाकाल | पृष्ठें |
|---|---|---|
| (१) आत्मचरित्र— | | |
| (अ) मुलांची मागणी | २३–२–३३ | १-२२ |
| (ब) दीन-होम | २४–१–३४ | २३-३५ |
| (२) तुरुंगांतील पत्रें— | | |
| पत्र १ लें | २–२–३२ | ३६-३८ |
| ,, २ रें | ३१–५–३२ | ३९-४० |
| ,, ३ रें | २९–८–३२ | ४१-४४ |
| ,, ४ थें | २८-११-३२ | ४५-४६ |
| ,, ५ वें | २७–२–३३ | ४७-४८ |
| ,, ६ वें | १–९–३३ | ४८-५० |
| ,, ७ वें | ४–१२–३३ | ५१-५२ |
| ,, ८ वें | २७–३–३४ | ५३-५४ |
| ,, ९ वें | ५–६–३४ | ५५-५६ |
| ,, १० वें | २९-११-३४ | ५६-५७ |
| ,, ११ वें | २८–२–३५ | ५८-६० |
| ,, १२ वें | १२–५–३५ | ६१-६३ |
| ,, १३ वें | २२-११-३५ | ६३-६५ |
| ,, १४ वें | २८–२–३६ | ६६-६९ |
| ,, १५ वें | २–६–३६ | ६९-७२ |
| ,, १६ वें | २३-११-३६ | ७३-७४ |
| ,, १७ वें | २७–२–३७ | ७४-७८ |

| | रचनाकाल | पृष्ठें |
|---|---|---|
| (३) रत्नागिरी तुरुंगांतील स्फुट कविता— | | |
| १ सर्व ठीक | २–२–३२ | ७९ |
| २ दुःखाचें स्वागत | ,, | ७९ |
| ३ प्रेमाचा अंकित | ,, | ८० |
| ४ हरिस्मरणी | ,, | ८१-८२ |
| ५ हरीची योजना | ३१–५–३२ | ८३-८७ |
| ६ कमलका हुक्म | २९–८–३२ | ८७-८८ |
| ७ हरिकृतिसप्तक | २४-११-३२ | ८९ |
| ८ हरिनीतिसप्तक | ,, | ८९-९० |
| ९ हरिदयाष्टक | ,, | ९०-९१ |
| १० हरिवेडदशक | ,, | ९१-९२ |
| ११ पंतभक्ति | ,, | ९३ |
| १२ सुखसप्तक | ,, | ९३-९६ |
| १३ अजाणसप्तक | ,, | ९६-९९ |
| १४ देवसप्तक | ,, | ९९-१०१ |
| १५ हरिदास्यपंचक | ,, | १०२-१०६ |
| १६ प्रेमएकादशी | ,, | १०६-१०७ |
| १७ हरीपाशीं मागणी | १६–१–३३ | १०७-१०८ |
| १८ हरीची सुई | २७–२–३३ | १०८-११५ |
| १९ आईसाठीं निरोप | १–९–३३ | ११६ |
| २० वामन-कमलसाठीं निरोप | ,, | ११६ |
| २१ मनास शिकवण | १९ ते २७–९–३३ | ११६-१२८ |
| २२ भावभेट | २८–९–३३ ते २–१०–३३ | १२८-१३१ |
| २३ हरिभजन | १६ ते २१-१०-३३ | १३१-१३३ |
| २४ देवकथा | २५-१०-३३ ते ३-११-३३ | १३३-१४१ |
| २५ समाजस्वास्थ्य | २४–३–३४ | १४१-१४४ |
| २६ तारक-नीति | ३१–५–३४ | १४४-१४६ |
| २७ भविष्य-पुराण | १९ ते २६-११-३४ | १४६-१५४ |

| | रचनाकाल | पृष्ठें |
|---|---|---|
| २८ भावना-पुराण | १ ते ४–२–३५ | १५४-१५८ |
| २९ देवाशीं वाद | ५ ते ८–२–३५ | १५८-१५९ |
| ३० नवश्लोकी | ३–४–३४ | १६० |
| ३१ पुण्यस्मरण | २० ते २४–८–३४ | १६०-१६४ |
| ३२ पुण्यस्मरण (पुरवणी) | २८–३–३५ | १६४-१६५ |
| ३३ आमचा लक्ष्मण | ३० व ३१–५–३५ | १६५-१६६ |
| ३४ तूं- तूं | ६-११-३३ | १६६-१६७ |
| ३५ तीन मार्ग | ७-११-३३ | १६७ |
| ३६ यमपंचक | ९ व १०-११-३३ | १६८ |
| ३७ सेवकोत्तम | २०-११-३३ | १६९ |
| ३८ श्रीहरीचें शांतिशास्त्र | २९–८–३२ | १६९-१७१ |
| ३९ विहारी हरि | ३१–५–३२ | १७१-१७३ |
| ४० हरीची भूल | ,, | १७३-१७४ |
| ४१ हरीच्या चरणीं | | १७४-१८९ |
| ४२ दहावा योग | ३–४–३५ ते २–५–३५ | १८९-१९३ |
| (४) यशोधनरागरंग— | ३१-१-३४ ते ८-३-३४ | |
| ४३ नमन | | १९३ |
| ४४ पांखरास | | १९४ |
| ४५ पाणपोई | | १९४ |
| ४६ श्रीशारदावन्दन | | १९५ |
| ४७ निष्फळ प्रतिज्ञा | | १९५ |
| ४८ आळवणी | | १९६ |
| ४९ गिरीविहार | | १९७-१९८ |
| ५० यशवंती | | १९८-१९९ |
| ५१ बंधु मुसल्मान | | १९९ |
| ५२ बंधु हरिजन | | १९९-२०० |
| ५३ नवहिन्दो ! | | २०० |
| ५४ महाराष्ट्रीय नवहिंदूंनो ! | | २००-२०१ |

| | रचनाकाल | पृष्ठें |
|---|---|---|
| ५५ भारतीय नवहिंदूंनो ! | | २०२ |
| ५६ नवें हरिगीत | | २०२ |
| ५७ येणार कोण बोला ! | | २०३-२०४ |
| ५८ पाशयंत्रावर | | २०४-२०५ |
| ५९ जन्मठेपी | | २०५-२०६ |
| ६० पुढची गत | | २०६-२०७ |
| ६१ नवा नकाशा | | २०७-२०८ |
| ६२ गुरूंनो ! | | २०८-२०९ |
| ६३ इतिहास | | २०९-२१० |
| ६४ फार दूर | | २११ |
| ६५ चढ तूं | | २११ |
| ६६ भारती गाडा | | २१२ |
| ६७ इष्टमालिका | | २१२-२१३ |
| ६८ वागवा चित्तीं सदा | | २१३-२१४ |
| ६९ करीं तपास | | २१४ |
| ७० आंधळा भाव | | २१४-२१५ |
| ७१ म्हसोबादि देव-देवता | | २१५-२१६ |
| ७२ त्रिधींचा जाच | | २१६ |
| ७३ तनु-विक्रय | | २१६ |
| ७४ मजूर आणि भांडवलदार | | २१७-२१८ |
| ७५ साम्यवाद | | २१८ |
| ७६ श्रमयुग | | २१९ |
| ७७ नवीन यादवी | | २१९-२२० |
| ७८ पहिला ध्यास | | २२०-२२१ |
| ७९ विरोध विकासवाद इत्यादि | | २२१ |
| ८० आत्मघात | | २२२ |
| ८१ एकतानता | | २२२-२२३ |
| ८२ दोन नट | | २२३-२२४ |

| | रचनाकाल | पृष्ठें |
|---|---|---|
| ८३ नास्तिक्याचें गूज | | २२४-२२५ |
| ८४ सर्व तूंच तूं | | २२५ |
| ८५ मी त्वत्पदिं लीन | | २२६ |
| ८६ धिंड | | २२६-२२७ |
| ८७ माझा धंदा | | २२८ |
| ८८ प्रेमकथा | १९-१२-३३ ते १७-१-३४ | २२८-२६० |

(५) येरवडा तुरुंगांतील कविता— डिसेंबर १९२२ ते फेब्रु. १९२३

(अ) मुळशी संग्राम चालू असतां पाठविलेले निरोप.

| | | |
|---|---|---|
| १ निरोप पहिला | | २६१-२६५ |
| २ ,, दुसरा | | २६५-२६६ |
| ३ ,, तिसरा | | २६६-२६७ |
| ४ ,, चवथा | | २६७-२६८ |
| ५ ,, पांचवा | | २६८-२६९ |
| ६ ,, सहावा | | २६९-२७० |
| ७ ,, सातवा | | २७० |
| ८ ,, आठवा | | २७१-२७४ |
| ९ ,, नववा | | २७५ |

(ब) झेंडागीतें व शिस्तगीतें—

| | | |
|---|---|---|
| १ झेंडागीत पहिले | | २७७-२७८ |
| २ ,, दुसरें | | २७८ |
| ३ ,, तिसरें | | २७८-२७९ |
| ४ शिस्तगीत पहिलें | | २८० |
| ५ ,, दुसरें | | २८०-२८२ |


(६) रत्नागिरी तुरुंगांतून सुटल्यावर—

| | | |
|---|---|---|
| १ झाडू-अष्टक | २९-९-३७ | २८२-२८३ |
| २ आरोग्याची ध्वजा | २९-९-३७ | २८३ |
| ३ राष्ट्रीय-जूट | | २८४ |

| | रचनाकाळ | पृष्ठें |
|---|---|---|
| ४ हैदराबाद-सत्याग्रह प्रभातफेरी | २६-१०-३८ | २८४-२८५ |
| ५ माझें वेड—स्वातंत्र्य, समता, बंधुप्रेमसत्ता | २३-१२-३७ | २८५-२८७ |
| ६ सत्यधर्म | मार्च १९३२ | २८७ |
| (७) चैतन्यगाथा— | | |
| १ संसाराचें सार (अभंग) | | २८९ |
| २ मुलांस बोध (श्लोक वगैरे) | | २८९ |
| ३ विद्या (गीत) | | २९० |
| ४ देशाचा संसार (अभंग) | | २९१ |
| ५ भगिनींस विनंति (दिंड्या) | | २९२ |
| ६ सत्याग्रही यज्ञ (अभंग) | | २९४ |
| ७ सर्वांचा संसार (गीत) | | २९५ |
| ८ कवींस विनवणी (गीत) | | २९७ |
| ९ मानवी वर्ग (गीत) | | २९८ |
| १० दैन्यहांक (अभंग) | | ३०० |
| ११ हिंदु (अभंग) | | ३०१ |
| १२ अध्यात्माचा डंका (अभंग) | | ३०४ |
| १३ अध्यात्माचें सार (अभंग) | | ३०५ |
| १४ देहाचा क्षोभ (अभंग) | | ३०७ |
| १५ देहाचा अधिकार (अभंग) | | ३०८ |
| १६ देहाचा उद्धार (अभंग) | | ३११ |
| १७ अभंगगीता—गीतेचें स्वरूप (अभंग) | | ३१३ |
| १८ ,, सत्यसत्याग्रह (अभंग) | | ३१४ |
| १९ विद्या (गीत) | | ३१७ |
| २० हृदय उघडा (गीत) | | ३१८ |
| २१ मोक्षमार्ग (गीत) | | ३२० |
| २२ आनंदाचा धंदा (अभंग) | | ३२१ |
| २३ विद्या (गीत) | | ३२३ |

| | पृष्ठें |
|---|---|
| २४ शिकण्याचें सार (अभंग) | ३२४ |
| २५ देशभक्ति (गीत) | ३२६ |
| २६ कन्या (अभंग) | ३२८ |
| २७ कवींस विनवणी (गीत) | ३३२ |
| २८ खेळाडू हरि (गीत) | ३३३ |
| २९ झाडू (आर्या) | ३३४ |
| ३० विद्या (दिंडी व पृथ्वी | ३३५ |
| ३१ देश-पिसें (गीत) | ३३६ |
| ३२ गतघवेस दीपावलिभेट (आर्या) | ३३७ |
| ३३ कवींस विनवणी (गीत) | ३४० |
| ३४ राष्ट्रभक्तीचा उदय (गीत) | ३४१ |
| ३५ धर्म (अभंग) | ३४३ |
| ३६ मुक्तीसाठीं तळमळ (गीत) | ३४४ |
| ३७ हरीचें विश्व (गीत) | ३४५ |
| ३८ संसाराचें सौंदर्य (गीत) | ३४६ |
| ३९ देशदेव (अभंग) | ३४७ |
| ४० कवींस विनवणी (गीत) | ३४८ |
| ४१ कर्तव्य (गीत) | ३४९ |
| ४२ लोकमान्य (स्वागता) | ३५० |
| ४३ लोकमान्यो जयत्विह (अनुष्टुप्) | ३५२ |
| ४४ नित्यसुख (गीत) | ३५३ |
| ४५ हरीची वाणी (गीत) | ३५४ |
| ४६ सांचलेली घाण (श्लोक) | ३५५ |
| ४७ कीटत्व (गीत) | ३५६ |
| ४८ दीनदीन-हरहर (गीत) | ३५८ |
| ४९ कवींस विनवणी (गीत) | ३५९ |
| ५० सत्ता व शहाणपण (श्लोक) | ३६० |
| ५१ रिकामा शीण (अभंग) | ३६० |

| | | पृष्ठें |
|---|---|---|
| ५२ | अभंगगीता–पार्थमोह | ३६२ |
| ५३ | ,, धर्मवार्ता | ३६६ |
| ५४ | ,, अद्वैतविशिष्ट द्वैत | ३६७ |
| ५५ | ,, प्रेम व श्रेय | ३७० |
| ५६ | माझी प्यारी (गीत) | ३७९ |
| ५७ | माझा बाळ (अभंग) | ३७९ |
| ५८ | तरुजन (शिखरिणी) | ३८० |
| ५९ | खरा मार्ग (अभंग) | ३८१ |
| ६० | जनसेवा (गीत) | ३८२ |
| ६१ | उत्तम कल्याण (गीत) | ३८४ |
| ६२ | ब्रह्मचर्य आणि विवाह (विविध वृत्तें) | ३८५ |
| ६३ | दुही (विविध वृत्तें) | ३८८ |
| ६४ | खरा धर्म (श्लोक) | ३९४ |
| ६५ | करंटा (अभंग) | ३९४ |
| ६६ | आयुष्याचा नाश (अभंग) | ३९५ |
| ६७ | मित्राचें पत्र (श्लोक) | ३९६ |
| ६८ | मित्रास उत्तर (श्लोक) | ३९६ |
| ६९ | विद्या (श्लोक) | ३९८ |
| ७० | कवींद्राचा अश्व (अभंग) | ३९९ |
| ७१ | सत्ताग्रह व सत्याग्रह (श्लोक) | ४०० |
| ७२ | गृहीं गृहीं (रथोद्धता) | ४०१ |
| ७३ | फिरफिरून (गीत) | ४०२ |
| ७४ | हंसणें रडणें (श्लोक) | ४०२ |
| ७५ | क्षतधन महराष्ट्र (अभंग) | ४०३ |
| ७६ | फुंकारे (आर्या) | ४०४ |
| ७७ | हरीचा धर्म (आर्या) | ४०६ |
| ७८ | उपकारधर्म (ओव्या) | ४८७ |
| ७९ | मेरा वतन (गीत) | ४१० |



"हजारों कुटुंबें निमाळीं निराधार, झाळीं जशीं स्थूल-भू-कंपनें
हजारों मनोभूमि-कंपें तशीं व्हाविं" ही घोकणी घेतली मन्मनें
न दास्यांतुनी मुक्ति देशासि जों मृत्यु नाहीं अम्हां मित्रसा भासत
न दास्यांतुनी मुक्ति जों होमकुंडीं हजारों न घेती उडी हांसत.

रत्ना. तुरुंगांतील कविता, ६१ नवा नकाशा.

# आत्मचरित

## मुलांची मागणी (अनुष्टुप्)

शिकावें काय मीं सांगा करावें काय मीं पुढें  
मागणी ही लाडक्यांनीं मागतां मोहिं मी बुडे १

मोह माझ्या मोहनांचा हरिच्या मोहिनीसम  
करी दृढा दृढतरा कर्तव्यदृढता मम २

वासना कमळे तुम्ही शिका जें शिकण्या मिळे  
करा तें पुढती जें का शक्य हो तुमच्या बळें ३

आवडी तुमची कांहीं असेल; पुरवूं कशी !  
हरीचा मी सदा बन्दी स्वातंत्र्य मुळिं ना मशीं ४

पुरे न शिकणें माझें जाहलें आवडीपरी  
हरीनें हांक देतां तें सोडुनी त्यासि मी वरीं ५

हरीच्या संगतीनें मीं केलें तें शक्य जें मला  
गेलें तारुण्य सरुनी वार्धक्यदिन पातला ६

आलें समाप्त व्हायासी आयु हें क्षणभंगुर  
आठवीतां तुम्हां सर्वा येतो हा भरुनी उर ७

पिता माता अंध पंगु सेवा न घडली मुळीं  
सुते सुता दूर दूर सारिलें पडतां गळीं ८

गृहांत मी एकटा जैं शिकलेला तदा गृहा  
बरे दिवस आणाया करिती बहु आग्रहा ९

हितेच्छु वदले जें कां हिताचें त्यांसि भासलें  
परी न वळलें चित्त हरिमंत्रें उदासलें १०

महा विद्यालयीं एक्या दिनीं संध्या तया जई
निशाकरीं द्यावयासी येउनी ठाकली तई ११
निशा माझी दिन-करीं द्यावया ठाकला कुणी
संध्याशील संधिकाल साधु संध्यर्थ साधुनी १२
विधि झाला दिन-करीं निशा माझी दिली तयें
मांगल्यमय तैं मातें केलें श्रीहरिनें स्वयें १३
मांगल्य तें अमांगल्य उजळी पूर्वसंचित
त्याचे बळें पश्चिमेंत राहिलों पूर्व-संस्थित १४
दृष्टीआड हरी झाला नास्तिक्य कवळी मला
परी सांध्यविधीनें त्या राखिलें सात्त्विका बला १५
चमत्कारमयी माझी कहाणी मज वाटते
मदर्थ हरिचे कष्ट पाहुनी प्रेम दाटतें १६
क्षुद्र मी भद्रता-हीन अभद्रमय कीटक
मला रक्षी हरी लक्षी प्रेमानें लावुनी टक १७
टांक्यांत आपुल्या माझी गच्छन्ती शिशुतेंमधीं
नववे वर्षि होण्याची न होऊं देई तो विधि १८
तिथे भाऊ टांकियांत भरलेल्या पुरापुर
होतों खेळत काठीचा करूनी सुळक्या सुर १९
कांठावरी टांकियांच्या शेवाळानें निसूरड्या
फिरुनी सुरकाठी ती जळीं फेंकितसूं गड्या २०
लहानगा मी आनंदें सुरकाठी दुरावली
धरण्या लांबवी हात तों गेलों पडलों जळीं २१
बावरे जाहले भाऊ कोणाही पोहतां न ये
चाललों दूर टांक्यांत तैं एका अवधान ये २२
बेभान मी सुरा ऐसा बुडुनीयां वहावतां
शिखा विखुरली माझी 'हातीं येईल' पाहतां २३
अप्पांनीं लांबवूनीयां हात ती धरिली त्वरें

हरी रक्षीत मजला यापरी बंधुच्या करें २४
अपघातीं किती ऐशा किती व्याधिमुखांतरीं
किती आहारत्यागाच्या प्राणांतिक पणांतरीं २५
रक्षिलें लक्ष देऊनी हरिनें प्रेमसागरें
क्षुद्रता न तया क्षुद्र अभद्रहि तया बरें ! २६
रक्षितो मजसा सर्वा लक्षितो मजसां तयां
कहाणी सर्व जीवांची चमत्कारकथामया २७
जीव हाचि चमत्कार जडता जननी जरी
जडताहि चमत्कार जन्मतां चिन्मयोदरीं २८
लाडक्यांनो ! तुम्हां मोठी ही गोष्ट शिकण्या हवी
चमत्कारमयी सारी जडता जीवता भवीं २९
"बोध आद्यंत जगता मध्यें ही जड-जीवता
मानी कुणी कुणी मानी आदि अंत अबोधता ३०
जडाकारीं सर्व झालें जीव झाले कसे तरी
जीवांत मानव तसे देव ते मानवोदरीं ३१
नसे देव खरा कोणी देव मानव कल्पना
नसे जन्म पुढें मागें वृथा ती मूर्खवल्गना ३२
देवाचें चोज मूर्खत्व जीवाचें अन्य त्याहुनी
स्वतांचें एकाचें चोज धर्म हाचि खरा जनीं" ३३
"बोधाकारें सर्व केलें जीव केले कसे तरी
जीवांत मानव तसे देव ते मानवोदरीं ३४
असे देव खरा एक त्या भेटे प्रज्ञ-कल्पना
असे जन्म पुढें मागें 'नसे' ही अज्ञ-कल्पना ३५
देवाचें चोज साधुत्व जीवाचें अन्य त्याहुनी
स्वतःचें एकाचें चोज धर्म आसुर हा जनीं" ३६
मतें प्रधान हीं दोन यांसी सृष्टिउभारणी
चमत्कारमयी मान्य बुद्धि चाले न कारणीं ३७

मानवी करणी सारी जन्म घे सृष्टिकारणीं
जाणुनी हें स्मरा तुम्ही हरिला सृष्टिच्या रणीं ३८
नसे आग्रह कांहींही माझा कोणासही जनीं
नसें तुम्हाही, हरिला विस्मरा वा स्मरा मनीं ३९
मी स्मरें हरिला आज प्रेमस्थान मला हरि
परी हें नव्हतें ऐसें सर्वदा गोष्ट ही खरी ४०
एक ठावें मला, त्यातें विस्मरा वा स्मरा तुम्ही
स्मरे तो आपणां सर्वां त्याचीं बाळेंच कीं अम्ही ४१
बाळ मातेसि विसरे तीही बाळासि कारणें
हरि तैसा न; चालेना कोणाचें कीं तयाविणें ४२
माता पिता बंधु सखा भगिनी प्रेमला सखी
तो एक भवि जीवांसी झटतो करण्या सुखी ४३
तो मला वर्षि दशम गुरू दे गुरुसत्तम
मराठी चवथीमध्यें जाहला तो सखा मम ४४
तेणें दादासि कथिलें आग्रहें परमादरें
मुलांनीं तुमच्या आतां इंग्रजी शिकणें बरें ४५
मी सोय लावितो यांची माझा एक सखा असे
पाठ देईल यांना तो त्यासि मी शिकवीतसें ४६
सोय झाली गुरुसखा जाहला गुरु डॉक्टर
शिकलों मी बुकें दोन मराठीच्या बरोबर ४७
"पुण्यासि पाठवा याला बरें होईल सर्वथा
बुद्धि तीक्ष्ण मुलाची या व्यर्थ जाईल अन्यथा" ४८
गुरुद्वयें आग्रहानें दादांसि समजाविलें
दादांच्या एक मित्रानें मला स्वगृहिं ठेविलें ४९
मित्र तो प्लेगनें नेला सातवी न तदा पुरी
वर्षें दोन घरीं गेलीं पुस्तकें जाहलीं दुरी ५०
कुसंगतींत पडलों कुभाव उठले मनीं

कुभावां कुफळें आलीं  गेलीं सद्भाव बोधुनी  ५१
पुस्तकें जवळी केलीं  दूर केली कुसंगति
केली सद्भाव-अभ्यासें  विशुद्ध मळली मति  ५२
विवाह ठरला; वाटे  विवाह नसला बरा
लिहिलें श्वशुरा पत्र  "नको लग्न क्षमा करा"  ५३
आला भावि श्वशुर तो  पत्र तें मिळतां तया
कळली मज ती गोष्ट  लपलों शोधण्या नया  ५४
ठरला नय दादांचें  सांगणें ऐकणें बरें
आलों घरीं; 'होय' शब्दें  तुष्टले भावि सासरे  ५५
जाहलें लग्न नगरीं  मावशीच्या तईं घरीं
राहुनी सातवी केली  परीक्षा जाहली बरी  ५६
संस्कृताची शिष्यवृत्ति  दुसरी मिळतां तदा
महाविद्यालयीं गेलों  मिळाया ज्ञानसंपदा  ५७
खेळ झाला अधिकसा  अभ्यास पडला उणा
परीक्षा दुसरी झाली  न्यूनता तेथ ये गुणा  ५८
लाभला दुसरा वर्ग  शिष्यवृत्ति न लाभली
साह्य देई तदा मातें  मित्रांची मित्रता भली  ५९
परीक्षा तिसरी झाली  तेथही वर्ग दूसरा
मास्तरी वरिली तेव्हां  अभ्यास करण्या पुरा  ६०
'मास्टरी' तत्त्वज्ञानांत  पटुता कायद्यांतली
मिळाया दोन्ही वर्गांचीं  पुस्तकें करिं घेतलीं  ६१
दोनही वर्गिं बसलों  मास दोन असा तसा
पुढें गेलों आंग्लभूस  आला योग तसा जसा  ६२
यंत्रविद्यावार्गी तेथें  यंत्रविद्यालयीं महा
जाहलें वर्ष तों आला  श्रीहरी हांक देत हा  ६३
ध्येयरूप तदा होता  झाकुनी देवरूपडें
देवरूप पुढें तो घे  सर्व ध्येया पलीकडे  ६४

देवपूजक मी बाल शिशु मी देवपूजक
पूर्वयौवनिं झालों मी मानव्यध्येयपूजक ६५
देहपूजक नास्तिक्य माझ्या न शिरलें मनीं
देवपूजक आस्तिक्य सोडिलें पूर्वयौवनीं ६६
त्या सांध्यविधिनें मोठा ध्येय-देव मला दिला
मानव्यसेवा-ध्येयाला मीं मदात्मा समर्पिला ६७
ध्येयरूप हरी आला हांक देत परोपरी
यंत्रविद्यामोह तेव्हां सोडूनी त्यासि मी वरीं ६८
तयाच्या सांगणीनें मी कर्तव्या हात घातला
कालें तो स्वीयरूपांत मुरलीसह पातला ६९
त्या सांध्यविधिला झालीं तीस वर्षें पुरीं अतां
दश वर्षें श्रीहरीनें धरिली ध्येयरूपता ७०
ध्येयरूपें करीं माझ्या करवीलें बरावर
तें सर्व देवरूपांत आपणी मुरलीधर ७१
आपणीलें जुनें कार्य नवें कार्य कथीयलें
झाडू हातांत दिधला गांव तें झाडवीयलें ७२
अब्रह्मण्य बहू झालें दादा शोकांत बूडले
उपाय माझा चालेना कांहीं दिवस कूढले ७३
"तुम्ही पूजक देवाचे देवाचा मीहि पूजक
सर्वव्यापी देव माझा त्याची मी झाडिं बैठक ७४
तुम्ही बैठक झाडीतां सान मंगल-मूर्तिची
आन कांहीं न करिं मी मीहि सेवा करीं तिची" ७५
रुष्ट ते जाहले तुष्ट स्पष्ट होतां मदाशय
आई दादा न सामान्य थोर ते विमलाशय ७६
थोरवी हृदयांची त्या मीं यापूर्वींच पाहिली
आंग्लभूतूनि म्यां जेव्हां वार्ता एक तयां दिली ७७
आंग्लभूत बहू मोह यौवना; मोह तो मला

मोहवी; मोहिनी एक पाहुनी जीव लोभला ७८
लिहीलें पत्र दादांना मित्रांनाहि तसें तईं
कथिली विस्तरें माझी कहाणी करुणामयी ७९
प्रार्थिलें अंतिं कीं "दादा, आई, एक तुम्ही करा
म्हणा होत्रो तुझी पत्नी व्हावी जी तुज सुंदरा ८०
धरा विश्वास माझा कीं पत्नी मी न करीन ती
या जन्मीं शक्य तें नाहीं ध्येया मी अर्पिली मति ८१
परी पुढील जन्मींची व्यवस्था आज ही मम
समजूनि म्हणा 'होय' आदरा प्रेमसंभ्रम" ८२
मित्रांसही यापरीच प्रार्थिलें; मित्र-उत्तर
रोषपूर्ण मला आलें घरचें 'होय' सत्वर ८३
येथेंच दुसरी गोष्ट— पत्नीस लिहिलें मियां
'मोह यौवनिंचा येथें आला प्रबल प्रत्यया ८४
जसा मी तूं तशी; मोहें मोहिलें जरि तुजला
मी तुझा पक्ष घेणार; माझा कीं जीव भाजला" ८५
वासना कमले आतां यौवनीं तुमचें पद
हळू पडावया आलें तयाचा न बरा मद ८६
न्यायमंदिरिं बैसूनी एका बांकावरी अम्ही
गोष्टी करीत असतां बोललों हें तुम्हांस मी ८७
"कहाणी माझी सांगेन वर्षें हीं सात संपतां
आकळेल तुम्हां तेव्हां आकळेल न जें अतां" ८८
सात वर्षें संपवूनी घरीं मीं तुमच्यासवें
सुखें बैसुनि सांगावी कहाणी—हें मला हवें ८९
परी हवें जें अम्हां तें सारें तो हरि देइना
दे कांहीं तो न दे कांहीं सारें त्या शक्य होइना ९०
त्याला न माझा तुमचा मोह अन्यविवर्जित
सकलांचा मोह त्याला सर्वांचें त्या हवें हित ९१

सर्वभूतहिता नाहीं विरोधी असुचें 'हवें'
सर्वभूतात्मभूतात्मा त्या हें लागेच पाहवें ९२
"घरीं आपण भेटावें" 'हवें' हें देउं तो शके
याची ग्वाही न मन दे त्वरें कीं देह हा थके ९३
म्हणूनी यौवनापूर्वी तुमच्या न तुम्हा कळे
पुरेपणें, असेंही मी आज सांगतसें बळें ९४
कहाणी मानवी सत्य बहुरंगी बरी बुरी
असावयाची ही गोष्ट सर्वथा सर्वदा खरी ९५
पुढच्यासी ठेंच लागे मागचा होय शाहणा
न्याय हा धरुनी ध्यानीं पहा माझा उणेपणा ९६
उणा गुणीं मी अगुणीं गुणी बहु म्हणा तुम्ही
तुम्ही गुणीं गुणी व्हावें यासाठीं हें लिहीत मी ९७
यौवनीं संयमें स्वास्थ्य स्वैरता घोर पातक
यंत्रें तंत्रें व्यर्थ सर्व समाज-स्वास्थ्य-घातक ९८
संयमार्थ बरी कांहीं देवसेवा जुनी नवी
इष्टमूर्ति जुना देव इष्टध्येय नवा भवीं ९९
मूर्तिरूप ध्येयरूप अमूर्त ध्येय-आकर
त्रिरूपी तो हरी एक चिन्मायामुरलीधर १००
कमलेचा हरी देव 'सुशीलेचाहि देव' तो
वामनाचा, मन्मनाचा उन्मनाचाहि देव तो १०१
'सुशीला' मोहिते एका 'हरिणी' मोहिते दुज्या
मोहिते मुरली मातें दोघीही त्या यदात्मजा १०२
मूर्तिपूजक बालत्व ध्येयपूजक यौवन
भोगूनि आज मी भोगीं हरीचें मुरलीधन १०३
ध्येयपूजा संयमासी साह्य दे ठाउकें मला
मूर्तिपूजाहि कोणासी मूर्तिस्था जो विलोभला १०४
समाजस्वास्थ्यकारांच्या यंत्रतंत्राहुनी बरें

बहू बरें योगियांचें आसनादि खरेंखुरें १०५
श्रीगीतागीतिं गाईलें गायकें लोकनायकें
संयमाचें श्रेष्ठ तंत्र बली काम जयें थके १०६
देवसद्भक्ति-अभ्यास अभ्यास समदृष्टिचा
ज्ञानविज्ञानअभ्यास सेवाभ्यास समष्टिचा १०७
सदभ्यासबलें एका यौवनीं स्वाथ्य राहुनी
अध्यात्मतेज उजळे वरी ज्या शांति पाहुनी १०८
शांति जी निश्चला राहे महादुःखीं सुखीं महा
महासुखा सुखें सोडी महादुःखा म्हणे 'रहा' १०९
अहा ती शांति मधुरा सखी माझी हरिप्रिया
तिचा माझ्यावरी लोभ जो कांहीं ती हरिक्रिया ११०
अहा तो विधि दुर्वर्ण्य मंगलीं अतिमंगल
हरिक्रिया तो; तो दे ही मधुरा शांति निश्चल १११
विधी झाला दिन-करीं निशा माझी दिली तयें
मांगल्यमय तैं मातें केलें श्रीहरिनें स्वयें ११२
मांगल्य तें अमांगल्य उजळी पूर्वसंचित
त्याचे बळें पश्चिमेंत राहिलों पूर्वसंस्थित ११३
दृष्टिआड हरी झाला नास्तिक्य कवळी मला
परी सांध्य विधीनें त्या राखिलें सात्विका बला ११४
विधी तो नव्हता झाला गृहसेवा तदा मम
चित्तासि वाटे परम इष्ट गोष्ट दुज्यांसम ११५
"त्या सेवेची परमता विश्वसेवेपुढें नसे
तिचें साधन सर्वत्र देशस्वातंत्र्य हें असे" ११६
माझीनीची आणि माझी नीति यापरि तो विधि
करी एक; निशा माझी गेली दिनकरीं तधीं ११७
विधी झाला पुढें झाली परीक्षा तिसरी; पुढें
आंग्लभूसी जाउनीयां यंत्रविद्या क्रमे पढें ११८

*

माझ्या विद्यादि संसारा  बहुतीं बहु वाहिलें
या जन्मीं पाहिजे त्यांच्या  ऋणांत मज राहिलें  ११९
एक भेटूनि वदला  स्नेहार्द्र स्वमनोगत
ऋण जें ऋण तें नाहीं  चालवा आपुलें व्रत  १२०
'ऋणाचें काय !' ऐसें मीं  पत्र दोघांसि धाडिलें
त्यांहीं मद्व्रत पाहूनी  आपुलें ऋण सोडिलें  १२१
मित्र स्निग्ध तसे आप्त  यांचा अनृण मी ऋणी
वेडा मी ! धर्म वेड्याचा  इष्टमित्रांसि जाचणी !  १२२
वेडा मी सांध्यविधिनें  केलों स्वातंत्र्यपूजक
विधिकर्ता पुढें आला  विद्याग्रामीं हरी ठक  १२३
ठकबाजी कशी केली  ऐका तें वृत्त अल्पसें
रविवारीं सुटी तेव्हां  ग्रामीं हिंडत मी असें  १२४
रस्तोरस्तीं बहूचौकीं  बोलती बोल वेंचक
धर्म-मद्यनिषेधादि—  मंडळांचे प्रचारक  १२५
एका मद्यनिषेधाच्या  वक्त्यानें पाहुनी मला
उभा श्रोत्यांत विनयें  वक्तृत्वांतीं 'नमो' दिला  १२६
"आमुच्या मंडळाचे व्हा  सदस्य विनवीतसे
सदस्यता हिताची ती  अस्मद् ध्येयासि होतसे"  १२७
'ठीक' बोलूनि झालों मी  सदस्य पुढतीं मला
समाजसत्तेचा भोक्ता  मित्रत्वा तेथ भेटला  १२८
"स्वतंत्र कामगारांच्या  संघीं हेमंतमालिका
व्याख्यानांची, तिथें सांगा  भारतीराज्यलापिका"  १२९
ऐसा आग्रह मित्रानें  चालवीला पुनःपुन्हा
पुनःपुन्हा मीं म्हटलें  न जाणे राजकारणा  १३०
खरें तें होतें सर्वस्वीं  अज्ञ मी सर्वथा तदा
होतों स्वदेशाविषयीं  वाहिलों जरि तत्पदा  १३१
परी न ऐके हट्टी तो  म्हणे कीं "पदवीधर

तुम्ही; नकार ना घेऊं, लिहूं नांव पटावर" १३२
"लिही बाबा; वाचुनी मी काहीं सांगेन जें खरें"
"आभारी मी; नमो तुम्हां" म्हणुनी कर घे करें १३३
थोरासि एका लिहिलें "पुस्तकें वाचुं कोणतीं ?"
तीं वाचिली; वाचितांना भार्थे गडकलें अति १३४
'ठीक' निश्चय मीं केला "शिष्यवृत्ते नमो तुला"
प्रबंध सानसा एक वाचिला आणि छापिला १३५
मुम्बाविद्यामंडळाचें पत्र आलें "प्रबंध हा
अयोग्य कैसा लिहिला याचा आम्हां जबाब द्या" १३६
दिला जबाब विस्तारें टीका केली कठोरशी
लिहिलें कीं "मतें हींच यावरी तुमची खुशी" १३७
संपली तैं शिष्यवृत्ति झालों मी मोकळा पुरा
केलों मी मोकळा तेणें ठक जो कां खराखुरा १३८
'मास्टरी' तत्वज्ञानाची पटुता कायद्यांतली
न लाभली तशी आतां यंत्रविद्या न लाभली १३९
युद्धविद्यार्थ तेथींच्या विद्यामंडलिंच्या दलीं
स्वयंसैनिकना केली तीही विद्या न लाभली १४०
न लाभलें इष्ट माझें मला, हरि–समीहित
हरीसि लाभलें तेणें मीहि झालों समाहित १४१
गेलों मुख्य पुरीमध्यें आंग्लभूच्या रहावया
आलें कीं पत्र 'थोराचें' 'या तुम्ही इकडेच या' १४२
तेथें राजा एक होता आलेला भटकावया
त्यासि भेटूनि कथिलें नवभारत-आशया १४३
"नकोत आम्हांसी राजे पाहिजे लोकशासन"
"मलाहि वाटतें तैसें; भेटा भारतिं आपण" १४४
यापरी बोलणें झालें भेटलों नाहिं त्या परी
कारणें सांगणें व्यर्थ एक कारण श्रीहरी १४५

आंग्लराजपुरीं दोन  प्रबंध लिहिले मियां
एक राष्ट्रसभास्थानीं  पाठवी छापवूनीयां  १४६
"सोडा पूर्वपथा; जोडा  स्वावलंबन–सत्पथा
बहिष्कारा स्वदेशीतें  वरा; शर्म न अन्यथा"  १४७
प्रबंध दुसरा होता  पूर्वग्रामियवांछित
"भारतीय स्थिति पुढें  वर्षें झाल्यावरी शत"  १४८
प्रबंधीं या स्पष्टतेनें  मार्ग जो कां सनातन
स्वातंत्र्याचा तयाचें मीं  केलें होतें निरूपण  १४९
प्रबंधांतीं प्रश्नकालीं  मेजावरतिं ठेवलें
गोलिकायंत्र भरलें  अध्यक्ष गरमावले  १५०
"न्यायमंदिरिं जाण्याचें  पडेल..." बहु बोलले
पुढें पोस्टाचे मार्गानें  यंत्र तें मज पावलें  १५१
त्या दिनीं ओळखी झाली  एका रूसी कुमारिची;
विद्यार्थिनी वैद्यकाची  होती; धन्य असे तिची  १५२
मिळालें हस्तलिखित  पुढें रूसी मुनीकडे
त्याचें हिच्या श्रमें झालें  आंग्लभाषेंत चोपडें  १५३
परीक्षा जवळी होती  वर्जी ती या श्रमार्थ ती
सहामाही बुडविली  सेवाधर्मार्थ; धन्य ती  १५४
मानव्यसेवाधर्माची  मूर्ति ती गुणसुंदरा
अशांहीं रूस तो केला  लोकतंत्र पुरा पुरा  १५५
"लोकतंत्रस्थिति बरी  लोकयत्नांहिं भारतीं
यावयाची, आणणार  मुख्यत्वें असिधार ती  १५६
प्रबंधें या भारतीया  आंग्लाहि श्रोतयां भल्या
विद्याग्रामीं हलविलें—  गोष्टी हलविती खुल्या  १५७
गोष्टी समाजसत्तेच्या  भोक्स्यासम भले जन
स्पष्ट आदरिती; त्यांचें  उदार असतें मन  १५८
"आम्ही तुम्हांसम असूं  अन्याय दडपी अम्हां

न्याय एक उठा तुम्ही | योग्य तें सर्वथा तुम्हा १५९
आमुचे आप्त असती | सेनेमध्यें जलीं स्थलीं
कांहींस बोधूं बसवूं | चालतां तेथ दंगली १६०
इतुकेंच अम्हा हातीं | बाकी सर्व तुम्हांकडे
शिष्टांची तुमच्या येथें | शिष्टाई न पुरी पडे'' १६१
ऐसे बोल मला तेथें | मिळाले बहु ऐकण्या
न राज्यें मिळती कोणा | दातांच्या करुनी कण्या १६२
एक आचार्य इंग्रेज | इतिहासगुरू अम्हा
एकदां सागतां झाला— | ''उठणें योग्य तें तुम्हा' १६३
आणि आम्हांसि हें योग्य | शिरें उडविणें तधीं''
घडलें पुण्यपुरि हें | महाविद्यालयामधीं १६४
प्रबंधानंतर दुज्या | आंग्लभूंत बहुस्थलीं.
जागवावे भारतीय | योजना अशि सूचली १६५
परी अकल्पित घडे | घटना, घडवी हरी !
प्रबंधादि विचारा जी | हटवी सर्वतोपरी १६६
लालां उचलिलें झाला | हलकल्लोळ गोंधळ
विचार करण्या बैसे | विचारीजनमंडळ १६७
सूचना मांडिल्या कोणीं | कोणी त्या उपसूचना
म्हटलें मीं, मला कांहीं | यांतील पटतेंच ना १६८
करा तुम्ही सभा सर्व | हिंदींची आंग्लभूगत
नसें तिचा विरोधी मी | ऐका माझें मनोगत १६९
व्यर्थ भाषाविषा रोषें | ओकणें टाकणें भलें
भाषा सौम्य; म्हणा, लाला | त्रिमासांत करा खुलें १७०
जरी खुले न ते झाले | खुल्या मंत्रिवरावरी
यंत्र माझें चालवीन | यथायश हरीकरीं १७१
''नको हें'' ठरलें त्यांचें | माझेंहि ठरलें तदा
''नको भाषा; मधुपुरीं | जातों, मज करा विदा'' १७२

शिक्षात्याग तसा झाला भाषात्याग अशापरी
त्यागवी त्यागभोक्ता तो आगलाव्या जगीं हरी १७३
लागली आग चित्ताला पुस्तकें राजकारणी
वाहिलीं एक मित्राच्या पायीं जो लेखकाग्रणी १७४
झाला चंदा, ध्येयवंदा गेलों धंदा शिकावया
राहिलों तीन एकत्र धंदागुरु पढावया १७५
एकें शिकविलें कांहीं ओनामा तो कसाबसा
घोकीत असतां झाला स्नेह तेथें बहूतसा १७६
तीन रूसी विश्वसेवा– ध्येयपूजक भेटले
वृत्त त्यांचें पाहुनीयां आश्चर्य बहु वाटलें १७७
दाटलें चित्त प्रेमानें आटाआटी बघुनियां
तया प्रेमल वीरांची धन्य ती रूस-दुनिया १७८
रूसी वीर क्रांतिकारी कशीं घडिति मंडळें
तें वृत्त कथिलें त्यांनीं जशी श्रद्धा तशीं फळें १७९
पिढीपाठीं पिढी जाडी श्रद्धेनें शोधिते गडी
रगडाया रिपू हाडीं घोर सोसुनियां नडी १८०
रूसी क्रांति-मंडळांच्या घडणीची कथा मियां
टिपिली ती पुढें आली छापुनी निजदेशिं या १८१
डाव टाकिति बुद्धीचे हाव सात्त्विक साधण्या
रावरंक एक होती रिपुचा ठाव खोदण्या १८२
नरनारी यौवनाच्या जोमाचा क्रांतिकारणीं
करिती व्यय आनंदें संयमें काम वारुनी १८३
कामी असंयमी भोगी रोगी ते कार्यनाशक
निकामी क्रांतिकार्यांत असोत बहुभाषक १८४
संयमी उद्धरी राष्ट्र आत्मोद्धारक संयमी
शीलाविणें जनोद्धारा उभे जे मग्न ते तमीं १८५
रूसी ते वीर अज्ञात प्रकारें तेथ राहती

आम्हासी सांगण्या गोष्टी आपुल्या गृहिं बाहत्ती १८६
एक आचार्य त्यांतील संस्कृतज्ञ तया घरीं
जमूं आम्ही विचारार्थ योजुनी योग्य चातुरी १८७
संहारी रिपुचा वैरी प्रतिसंहारकारक
मंडळाचा मुख्य तेथें भेटला सत्वधारक १८८
सत्त्व तें बुद्धि ती श्रद्धा ती जी त्या त्रयिं पाहिली
ती झाली विजयी अंतीं राष्ट्रसेवेसि वाहिली १८९
जाहला रूस विश्वांत अग्रगामी सु-शासित
वाहिले कीं तदुद्धारा संयमी आत्मशासित १९०
शिंपी, आचार्य, तिसरा प्रतिसंहारकाग्रणी
रूसी हे तीन बसले खोल जाउनियां मनीं १९१
खोल यांहूनिही बैसे एक रूसी महामुनि
जो सूचिपट्ट आम्हांतें प्रेमें भेटवि आणुनि १९२
ठेंगणा रुंद बांध्यानें दाढी स्वच्छ रुळे उरीं
वृद्ध तो युवका ऐसा उत्साहें करि चाकरी १९३
चाकरी निजराष्ट्राची विश्वाची तो महामति
करी रसायनाचार्य शिकवी गोलकक्रुति १९४
न घेई धन कांहींहि अतीव मितभाषणी
देई सुविद्याधन तें गोलकीय रसायनी १९५
तेणें आम्हासि दिधली गोलकक्रुति-पुस्तिका
रूसी ती हस्तलिखिता सुख्या तग्दतपत्रिका १९६
छायाचित्रें पत्रिकांचीं आम्ही घेउनि ठेविलीं
पुढें मीं वार्ता ती माझ्या रूसी मैत्रिणिसी दिली १९७
होकार स्नेहरुचिर येतां संकल्पित स्थला
गेलों मी शर्मनगरा द्यावया पुस्तिका तिला १९८
बहू निरीक्षणें झालीं मार्गांतील स्थलीं स्थलीं
परी निरीक्षकां हातीं पुस्तिका ती न लागली १९९

के. म. रा. द. वा. पातवीच
ग्रंथ संग्रह

मी माझ्या तर्कबुद्धीचा उपेयाग यथामति
करीत होतों, परि तो रक्षिता अंतिं श्रीपति २००
राहिलों शर्मनगरीं जाउनी दिन चाराचि
तेथें नवागतांचा कीं शोध बारीक फारचि २०१
ब्रिन्हार्ड दोन तरिही झालीं माझीं दिनांत या
टाळाया शोधकर्म्यांसी वरिलें योग्य त्या नया २०२
आली सखी दिली पोथी गेली ती आंग्लभूकडे
मीहि आलों मधुपुरीं नयाचे घेउनी धडे २०३
सहामाही बुडवुनी भाषान्तरित ती तिणें
केलें स्नेहार्थ सेवार्थ धन्य धन्य तिचें जिणें २०४
भाषान्तराच्या वेगानें प्रति कांहीं करूनीयां
पाठविल्या मित्रहस्तें येथें तेथें स्वदेशियां २०५
मित्रां दोघां पाठवीलें भारतीं पुस्तिकांसह
राहिलों मी एकटाचि कराया ज्ञानसंग्रह २०६
ज्ञान कांहीं नवें नाहीं मिळालें परि कल्पना
एक येतां नवी गेलों आंग्लराजपुरीं पुन्हा २०७
"आंग्ललोकसभास्थानीं टाकावा रसगोलक
वाटे, पटे जरी तुम्हां तुम्ही कीं मुख्य चालक" २०८
"नको; जसा तुटे तारा चमके; पुढती तम;
तसें होईल हें कर्म व्यर्थ हें; हा नको श्रम २०९
जा तुम्ही भारता आतां माथें शांत करा अति
ठरल्या रीतिनें चाला नको व्यर्थ चमत्कृति २१०
ज्ञानप्रसार करणें तसा गोलकसंग्रह
जागजागीं भारतांत पुढें येतील सु-ग्रह" २११
कल्पना टाकिली माझी मुख्यासी आदरूनियां
निघालों यावया देशा चित्ता शांत करूनियां २१२
नामान्तरें पातलों मी देशीं मुम्बापुरीं तदा

यंत्रें दोन तशा पोथ्या होती जवळिं संपदा २१३
भेटलों तेथ मित्रांसी पाहिलीं गुप्तमंडळें
मग कालिपुरा गेलों पाहण्या काय चाललें २१४
तेथ माझ्या पूर्वमित्रें पूर्वनिश्चित योजना
टाकुनी चालवीलीशी दिसली अन्य कल्पना २१५
बहुमित्र दुजे तेथें मित्राचे मज भेटले
त्या सर्वांचेंचि दिसलें कांहीं निश्चित घाटलें २१६
"हें कसें !" मी पुसें मित्रा "बरें हें न दिसे मला"
"करावें काय !" तो बोले "दाविणें पडतें कला २१७
"कला घेउनि आलां ती दाखवा काहिंशी अम्हां
अन्यथा साह्य ना मागा आम्हासीहि करा क्षमा" २१८
'ऐसें म्हणति दातार साह्याचे; साह्य संपतां
न चालेल कला कांहीं म्हणुनी मार्ग हा अतां' २१९
दिन एक तिथें होतों ज्वर आला दुज्या दिनीं
म्हणुनी गृहिं येण्यासी निघें सत्वर तेथुनी २२०
परि मार्गीं मित्रगृहीं अतीव व्याधि वाढला
आराम पडण्या तेथें एक सप्ताह काढला २२१
शुश्रूषा प्रेमपूर्णा ती कधीं न विसरेन मी
तिच्याविणें राहतों न देहिं या ज्वर संगमीं २२२
गेलों घरीं तिथें दोन महिने शयनावरी
पडलों मी ज्वरें, अंतीं जाहली प्रकृती बरी २२३
स्वास्थ्य होतां पुण्यपुरा आलों कार्यार्थ खासगी
भेटलों श्रेष्ठा कथिलें योजिलें करुं जें जगीं २२४
"जाणार मी सिंहगडीं थोड्याच दिनिं; या तुम्ही
तेथें; रहा मास दोन बोलूं स्वस्थपणें अम्ही २२५
आज मुम्बापुरीं जाणें पंतांच्या खटल्यास्तव
येतों त्वरेंचि माघारा नका जाउं कुठें तंव" २२६

गेले मुम्बापुरीं श्रेष्ठ; तेथें अटक त्यांजला
जाहली; तें वृत्त वाचीं रस्त्यानें; तों कुणी मला २२७
मारिली हांक; दावीलें वृत्त कालिपुरांतलें
गोस्वामींनीं उघडिलें मुख तें विष ओकलें २२८
झालों अंतर्हित तदा बुद्धीचा खेळ मांडिला
मित्रत्व बहु ये कामा मित्रीं मित्र न सांडिला २२९
हरीची दुर्गमा माया भवीं अमृत ती असे
विषही तीचि; नटतें वेळीं त्याला हवें तसे २३०
गोस्वामी ओकले त्याला विष मीं म्हटलें तदा
परी तें मत एकांगी; भवीं अमृत आपदा २३१
व्यक्ति-इच्छित तें सारें व्यक्तिसीहि नसे हित
नसे हित समष्टीतें जें कां हरिसमीहित २३२
त्याच्या मनांत योजी तो योजना ज्या बरावर
तत्त्वें चालतें सारें व्यक्ति-स्थिति-मतान्तर २३३
जाहलों बल्लव कुठें कुठें कृषक जाहलों
मुद्रायंत्रीं कुठें कोठें शालाध्यापक जाहलों २३४
अध्यायकहि झालों मी सातवी शिकलों पुन्हा
दिली परीक्षा; पहिला वर्ग मेळविला पुन्हा २३५
तेणें माझें इष्ट एक– हरिचें इष्ट-साधलें
परीक्षेच्याविणें तैशा असतें तें न लाधलें २३६
तें एक इष्ट हरिचें अंतर्धान तयास्तव
माझें घडविलें तेणें हें तदहृद्गत बास्तव २३७
समाजा! बालविधवा संन्यासीं टाकिशी बळें
बलात्कारा तया येती अतीव कडवीं फळें २३८
यौवनीं बालविधवा टाकिती पद तेधवां
धन्य त्या वाहवीते ना ज्यांसि ती यौवनी हवा २३९
अधिकांशांहिं पुरुष मूळ स्त्रीदूषणीं दिसे



कै. सौ. रुक्मिणीबाई

असो तें सत्य कांहींहि घोर यौवन हें असे २४०
थोरही सत्तपोनिष्ठ भ्रष्टवी मत्त मन्मथ
जाणूनीही स्त्रियां देती बलात् संन्यासिनीव्रत २४१
नष्टे, मृते, प्रव्रजिते, क्लीबे, कलहदारुणे,
पतिते च पतौ पत्न्याः पतिरन्यो विधीयते २४२
सूत्र हें मान्य मजला पत्र पत्नीस मी तदा
अज्ञातवासीं लिहिलें जाणूनी यौवनापदा २४३
"नष्ट मी; नष्ट मजला जाण, लग्न करीं प्रिये
न होवो यौवनाचा या ताप दुःसह मत्प्रिये" २४४
अविवाहित मित्रासी एका त्या समयींच मी
लिहिलें "मम पत्नीतें वरा सदय व्हा तुम्ही" २४५
असो तें; इष्ट हरिचें साधलें, रत्न लाधलें
बालरत्न–तयासाठीं गोस्वामी मज बाधले २४६
आपत्तिकाल सरूनी पितरां बाल लाधलें
लाधावें तें याचसाठीं गोस्वामी मज बाधलें २४७
दुरावलें सहा वर्षें तें यत्नें रत्न लाधलें
लाधावें तें याचसाठीं गोस्वामी मज बाधले २४८
साधलें इष्ट हरिचें मीही आलों तदा घरीं
सा मास वरुषें चार अज्ञातीं करूनी पुरीं २४९
अज्ञातीं लाभला मित्र तद्बुद्धि फिरवी हरि
साधतां इष्ट अपुलें मला आणविण्या घरीं ! २५०
मास अन्तिम अज्ञातीं दश काशींत काढिले
तेथें एक दिनीं आलें सन्मित्रें पत्र धाडिलें २५१
"आज बाळ्या म्हणे पत्ता पंतांचा द्या मला त्वरें
न होतां हें नव्हे आतां परिणामा मुळीं बरें २५२
गोऱ्या चाराधिकाऱ्यातें हा पत्ता कळला असे
येणार तो"...दिनीं त्याचि निघालों क्षुब्धमानसें २५३

क्षोभ हा कीं पोंचण्याचे    पूर्वीं आला कुणी तरी
तरी होईल मित्राला    त्रास फार परोपरी    २५४
न झालें तेवढें; गेलों    बाळ्यासी भेटलों स्वतां
विचारलें "कसें काय    मांडिलें काय हें अतां    २५५
म्हणे बाळ्या "चला जाऊं    बिन्हार्डी करूं बोलणें"
बिन्हार्डी तीन दिवस    बोललों मोकळेंपणें    २५६
बाळ्या दूत तयाचा जो    अज्ञातीं मित्र लाभला
बाळ्याही मित्र, त्याला मीं    बोध केला तदा भला    २५७
मला निरोप होता कीं    "तुम्ही मुम्बापुरीस या
स्वाधीन व्हा, बरें हेंचि;    बरें हें उरकूनि घ्या"    २५८
"बड्या मित्रा लिही, बाळ्या,    बडेपण तुम्हा असे
परी एक्या मतें जाणें    रिपुहस्तीं बरें नसे    २५९
तुम्ही नवे मित्र माझे    जुने तेहि मला बडे
ठावे तुम्हा ते; तुमचें    मत मांडा तयांपुढें    २६०
ठरवा सर्व मिळुनी    कांहींही मान्य तें मला
एकसत्ता बरी नाहीं    लढा लोकार्थ चालला"    २६१
बोध केला बहू; बाळ्या    म्हणे मी लिहितों असें;
बाह्य हें; आंतुनी तेणें    केलें तें ठाउकें नसे    २६२
चवथ्या दिनिं गौरांग    आणि त्याचा लवाजमा
आला; झाला नमस्कार;    झालों बंदींत मी जमा    २६३
एक्या मासें बन्दिता ती    संपली; हरि यापरी
फिरवूनी मित्रबुद्धि    आणवी मजला घरीं    २६४
स्वतंत्रता-सप्तशती,    क्रांतिगीता अपूर्णशी
अज्ञातीं लिहियेलीं तीं    नष्ट झालीं अशीं तशीं    २६५
पोथ्या, यंत्रें नष्ट झालीं    नष्ट झाली कृतिस्मृति
घरीं आणूनि हरिनें    नवी आदेशिली कृति    २६६
दिला झाडू दिलें खोरें    दिलें खापर तें करीं

रस्ते गटारें झाडावीं दिली ही मज चाकरी २६७
चाकरी करितां ही जें लिहिलें बहु त्यांतुनी
बहुसें नष्ट मीं केलें एक्या खेदमयीं दिनीं २६८
उणा गुणीं मी, अगुणी गुणी बहु, म्हणा तुम्ही
तुम्ही गुणीं गुणी व्हावें यासाठीं हें लिहीत मी २६९
"शिकावें काय मी सांगा करावें काय मीं पुढें"
नका व्यर्थ करूं चिंता संसारीं हरि बागडे २७०
नका व्यर्थ करूं चिंता शिका जें शिकण्या मिळे
नका व्यर्थ करूं चिंता करा तें शक्य जें बळें २७१
शिकलों काय मी सांगा केलें मीं काय त्यापुढें !
नका व्यर्थ करूं चिंता संसारीं हरि बागडे २७२
करा कष्ट परी नष्ट व्हायाचें इष्ट जाणुनी
कष्टें करा हरी तुष्ट आत्मभ्रष्ट न व्हा कुणी २७३
आत्मा तो प्रेम जें शुद्ध परार्थ झिजवीतसे
देहा मना आपुलिया; महाशांति तिथें वसे २७४
आत्मभ्रष्टा न ती शांति; आत्मनिष्ठासि ती वरी
महासुख भवीं दुःख जीवा शांति न जोंवरी २७५
शांत्यर्थ सारा संसार आटाआटी करीतसे
लाभे ती त्या तया प्रेमीं शुद्ध निष्काम जें असे २७६
ज्ञानसंग्रह देईना शांति ती प्रेम देत जी
कर्मसंग्रह देईना शांति ती प्रेम देत जी २७७
शिकणें करणें सर्व होय व्यर्थ अनर्थ वा
प्रेम निष्काम विमल व्यापीना जोंवरी भवा २७८
करा चिंता एक याची या प्रेमाची सदैवही
नसतां हें व्यर्थ होय संसारीं या सुदैवही २७९
शिकणें करणें व्हावें; प्रेम दुर्बल त्याविणें
विनाज्ञान विनाकर्म प्रेम धर्मगुणीं उणें २८०

परी प्रेम अधिष्ठान; शिकणें करणें जनीं
सर्व प्रेमार्थ व्हावें तें येणें शांति मिळे मनीं २८१
शिकणें तें आपणां जें शिकवील परिस्थिति
करणें तें आपणां जें करवील परिस्थिति २८२
अंतरीं प्रेमाची स्फूर्ति बाहेरीं स्वपरिस्थिति
शिकणें करणें सारें या दोहोंची असो कृति २८३
प्रेम आत्मा; देह मन आणि बाह्य दुजी स्थिति
त्रयी ही तुम्ही जाणावी आत्म्याची त्या परिस्थिति २८४
देहशक्ति मनःशक्ति धनशक्ति जशी असे
शिकणें करणें तैसें; मी तुम्हां सांगु तें कसें ! २८५

हरी तुम्हां तें शिकवील कांहीं
हरी तुम्हां तें करवील कांहीं
ज्या शिक्षणीं ज्या करण्यांत त्यातें
होईल आनंद जगत्पित्यातें २८६
त्या जें सुखाचें मज तें सुखाचें
तुम्हांसिही होइल तें सुखाचें
स्मरूं तया प्रेममया सदाही
शिकूं करूं प्रेमनियुक्त कांहीं २८७

---

## कांहीं टीपा

महाविद्यालय = डेक्कन कॉलेज. विद्याग्राम = एडिंबरो. आंग्लराजपुर = लंडन. मधुपुर = पॅरिस. शर्मनगर = बर्लिन. कालिपुर = कलकत्ता. थोर (१४२) = श्यामजी कृष्णवर्मा. राजा (१४३) = सयाजीराव गायकवाड. मुख्य चालक (२०८) = बॅ. सावरकर. श्रेष्ठ (२२४) = लोकमान्य टिळक. पंत (२२६) = शिवरामपंत परांजपे; गौरांग (२६३) = विन्सेंट. लाला (१६७) = लाला लजपतराय.

## दीनहोम (अनुष्टुप्)

हरीची हांक आली कीं दीनहोम करी खळ
ही न वेळा विवादाची जा सेवी दीन दुर्बळ १
विवाद बहु मीं केला रात्रौ त्या; सोमवार तो×
निजलों; हरिहांकेनें सजलों; भौमवार तो २
सजलों जावया संगें मित्रांच्या पुण्यपत्तनीं
मुंबापुरी सोडुनीयां सोडुनी हठ जो मनीं ३
हठ, माझी दृढ मति, जनकार्य अनल्प जें
तें न साधे सामवादें विपक्ष-मन जै खुजें ४
बोललों बहु मी मित्रां व्यर्थ हा सत्य-आग्रह
होणार मजला वाटे येथें कीं दुर्ग्रहाग्रह ५
बोललों बहु रात्रौ त्यां सकाळीं त्यांबरोबर
निघालों; हरिहांकेनें केलों कीं मीं निरुत्तर ६
'येतों मी' बोललों मित्रां "तुम्ही व्यर्थ मरा जरी
मरणें तुमच्यासंगें योग्य वाटे मला तरी" ७
दुर्ग्रहाग्रह ज्यां नाहीं सत्याचे आग्रही पुरे
दंड साम यथाकाल योजिती सत्य-आदरें ८
ऐसे वीर अनासक्त कर्तव्य-प्रेमिं रंगले
शोधितां दुर्लभ मला जाहले मन भंगलें ९
मनोभंग-मनोरंग— कर्ता श्रीरंग एकला
रुसवी हंसवी मातें त्याची नाना गुणी कला १०
भ्रमणक्रम अज्ञात संपवूनी मला घरीं
आणूनि झाडु दिधला श्रीरंगें माझिया करीं ११

---

× १९२१ एप्रिल ११.

वर्षें आठ पुढें माझा    गृहसंसार पाहिला
जोडा गोड अपत्यांचा    तेणें मजसि वाहिला    १२
हिंडवीलें याच काळीं    धुंडाया वीर सज्जन
मांडवीलें सांडवीलें    अल्पस्वल्प जनार्चन    १३
गृहांत गृहिणी-अर्चा    घडली न मुळीं बरी
मदपात्रत्व बघुनी    मत्कांता श्रीहरी हरी    १४
संपला गृहसंसार    संपवी सर्व-नायक
जुंपवी मज त्या कार्या    ज्या मी अधिक लायक    १५
हांक दे आग्रहें मातें    विवाद न करी खुळा
ही न वेळा विवादाची    जा सेवी दीन-दुर्बळा    १६
"येतों मी" बोललों मित्रां    "तुम्ही व्यर्थ मरा जरी
मरणें तुमच्या संगें    योग्य वाटे मला तरी"    १७
गेलों मी पुण्यनगरा    तेथें श्रेष्ठ+ पथीं कुणी
भेटला; वदला मातें    ससंदेह बहू मनीं    १८
"तुम्ही, तुम्ही कां येथें ! अँ !"    "आलों सत्याग्रहास्तव"
"असें, असें कां हँ, तुम्ही–    तुम्ही जाणें असंभव    १९
जाणें तुम्ही-कशाला तें–    न जाणें हें दिसे बरें
असो, असो" अशी भाषा    करुनी हो पुढें त्वरें    २०
रात्रीं त्या मंडळीमध्यें    वाद कांहीं असातसा
थोडासा होउनी अंतीं    झालों पास कसाबसा    २१
श्रेष्ठ प्रमुखसा कोणी    तेणें भरियली हमी
"येऊंद्या, भीति नलगे    तो शिस्तींत नसे कमी    २२
मतें त्याचीं भिन्न कांहीं    परी येथें सभा-मत
मानील तो; तो होईल    स्वयंसैनिक सद्व्रत"    २३
यापरी पास होऊनी    गेलों सत्याग्रह-स्थलीं
फिरलों भुस्कुटेसंगें    गांवें कित्येक तेथलीं    २४

+ कै. शिवरामपंत परांजपे.

उत्साह होता विपुल    आशा सर्वत्र उत्कट
सत्याग्रहें कीं क्षेत्राचें    नष्ट होईल संकट    २५
नष्ट झालें क्षेत्र सारें    विजयी जाहला खळ
बारा हजार दीनांचा    होम झाला अमंगळ    २६
धनी-दीन धनी-दीन    धनी-दीन लढा जिथें
धनी हीन धनोपायें    दीनां जाळीतसे तिथें    २७
होळी सुदीनबंधूंची    अमंगळ अनर्गळ
पाहुनी सर्व जगतीं    सन्मनीं होय गोंधळ    २८
नको धनी नको दीन    नको वैषम्य घातक
सन्मनीं मति ही जागे    जागवी धनि-पातक    २९
शेतें बुडविलीं सारीं    हांकलीले कृषीवल
बळें छळें वा बांधूनी    पदरीं धन केवल    ३०
धनी केवल या मार्गें    जाहले धनवत्तर
दीनांसी ऋण-मग्नांसी    आलें दैन्य महत्तर    ३१
धन आलें तसें गेलें    सावकार उभा घना
राहिलें अल्पसें कोठें    किती तें पुरतें कुणा    ३१
चिलींपिलीं दीन कष्टी    मातापितर बायका–
बारा हजार! "हा देवा!    हा देवा!" मारिती हँका    ३३
हँका त्या न फुका जाती    देव दैवहि आयके
यथाकाल यथान्याय    जाळित्या जाळितें निकें    ३४
बिजली-युग हें; व्हावी    बिजली; परि भाकरी
बारा हजार दीनांची    काढणें न परी बरी    ३५
भाकरीची सोय त्यांची    न्याय्य जी जनतामतीं
करूनी ही मग दुजी    करणें उद्यमोन्नति    ३६
हा धर्म ही खरी नीति    धनांधा दिसते न ती
हा धर्म ही खरी नीति    सत्तांधा दिसते न ती    ३७
महाराष्ट्रीय अखिल    बोलले परिषन्मुखें

"नका बुडवुं या क्षेत्रा" गेलें तें बोलणें फुकें ३८
बुडवीलें क्षेत्र सारें क्षेत्री मारियले भुके
क्षेत्रासि बुडवीणारे धनी वावरती सुखें ३९
अपमान महाराष्ट्र अखिला चारिला सुखें
बुडवीलें क्षेत्र सारें हजारों मारिले भुके ४०
व्यक्तीच्या अपमानाची चीड मोठी असे कुणा
चीड संघापमानाची असे मोठी दुज्या कुणा ४१
प्रांत-राष्ट्रापमानाची चीड माझ्या मनीं बहू
दीन दुर्बल-होमाची चीड माझ्या मनीं बहू ४२
चीड ही राहिली मागें बुडाले मूळशी-जन
काढीं मी हरिच्या संगें विचारीं बंधनीं दिन ४३
बुडे बुडवि तो एक चिडवी तो चिडेहि तो
बदला न्याय्य देई तो पीडवी तो पिडेहि तो ४४
पुढचें एक तो जाणे गाणें मागील गाउं या
कल्पनेनें त्वरें मागें तेरा वत्सर जाउं या ४५
मी बैसलों भाकरीच्या कामीं मुंबापुरीमधीं
वाचीं मी वृत्तपत्रांत कांहीं वृत्त कधीं कधीं ४६
आलें वृत्त 'गरीबांची छळणा मूळशीमधीं
चालली ती निवाराया प्रयत्न करिती सुधी ४७
सत्याग्रह-तिथी राम- नवमी ठरली असे'
वाचूनि वृत्त हें चित्तीं अशांति स्थान घेतसे ४८
वृत्त पूर्वील पुढती विस्तरें कळलें मला
सत्याग्रह न घाईनें सज्जनांहीं पुकारला ४९
दोन वर्षें सानथोर शिष्ट अर्ज करूनियां
भेटूनियां शासकांसी दमले विनवूनियां ५०
टाटा कंपनिचे लोक गोरे काळे अनर्गळ
दीन मूळशिवाल्यांसी छळिती योजुनी बळ ५१

बेकायदा बहू कृत्यें करिती बेगुमान ते
शिष्ट सांगूनि दमले पावले अपमान ते ५२
भाताच्या जमिनी थोर भात उत्तम सर्वथा
दहाहजार खंडी त्या देती सहज वाहतां ५३
डोंगरीं माल भरला झाडें नाना प्रकारचीं
नानागुणी फळें देतीं तीं हजारों हजारचीं ५४
बावन्न गावें वसति सुखें वसति मावळे
एक ठाणें पोलिसाचें गुन्हा क्वचित आढळे ५५
नका बुडवुं हें क्षेत्र हाहाकार करूं नका
बारा हजार वसति सुखाची उठवूं नका ५६
सांगूनि दमले शिष्ट सांगणें जाहलें वृथा
महात्माजी पुण्यपुरीं येतां त्यां सांगती कथा ५७
"बसा पायांत, येवोत कोणी अंगावरी, बसा
बसा, सत्याग्रह करा शांतिपूर्ण सदा असा" ५८
या महात्म-वचा "होय" बोलले बहुसे तरी
शंका आली पुढें कांहीं शिष्टां शिष्टाचियापरी ५९
"पहा, किती लोक येळीं येतील; फिरूनी पहा
सह्या आणा बहुतशा, न बोलावरती रहा" ६०
या शिष्ट-आग्रहासाठीं बहुसे मूळशीकर
सहीबद्ध करी शीघ्र भुस्कुटे सत्यकिंकर ६१
यावरी मंडळ निघे सत्याग्रह-सहायक
पुणेकर भले थोर झाले मंडळ-नायक ६२
तिथि सत्याग्रहासाठीं ठरली कळली मला
अशांति घुसली चित्तीं तों सोमदिन पातला ६३
आले मित्र; तयांसंगें वाद केला अनावर
रात्रौ; सकाळीं उठलों गेलों त्यांचेबरोबर ६४
मित्र आले पुसायासी कांहीं गोष्टी महात्मया

ते न आले मला घ्याया सहजीं भेटलों तयां
सहजीं भेटलों त्यांसी वाद केला अनावर ६५

रात्रौ; सकाळीं उठलों गेलों त्यांचेबरोबर ६६
गेलों सत्याग्रहस्थानीं फिरलों भुस्कुटेसवें

कांहीं गांवें; पाहिलें मीं तेथें दृश्य बरें नवें ६७
उत्साह होता विपुल आशा सर्वत्र उत्कट

सत्याग्रहें कीं क्षेत्राचें नष्ट होईल संकट ६८
आलों फिरूनी परत सत्याग्रहतळावरी

अष्टमीच्या रात्रिं तेथें मंडळी जमली बरी ६९
भाषणें जाहलीं तेथें सकलां समजाविलें

उदईक रणामध्यें पाहिजे केविं वागलें ७०
आशामय बहू झालीं तेजोवर्धक बोलणीं

बोललों मीहि थोडेंसें होतें जें माझिया मनीं ७१
"प्रयोग हा सत्प्रयोग करूं सोत्साह-आदरें

परी आशा बहू आशा करणें न असे बरें" ७२
नवमीस सुरू झाला सत्याग्रहलढा तिथें

पायांत बसले लोक बसवीले जिथें जिथें ७३
स्त्रिया मुलें वृद्ध लोक बसले तरुणांसह

पुणेकरांच्या नेतृत्वें कराया सत्य-आग्रह ७४
सत्य-आग्रह-सेनानी करंदीकर 'केसरी'

अनेक दुय्यमांमध्यें माझी दुय्यम चाकरी ७५
कंपनीचे कामवाले कारागीर मुकादम

मजूर बाया पुरुष यांचा पाहुनियां क्रम ७६
पायां मी पडलों त्यांच्या तयांसी हात जोडुनी

याचिलें—"जाच न करा काम हें द्याच सोडुनी" ७७
आसवें गळती माझ्या नयनांतूनि याचितां

मूळशीकर-दुःखाचा पाढा दुःसह वाचितां ७८

थांबलें काम; कामाचे लोक झाले मृदू मनीं
परी ही मृदुता नित्य टिकली न तया जनीं ७९
पायाचा व्याप बहुत टोळ्या सत्याग्रही तिथें
जागा धरूनि बसल्या कामवाले जिथें जिथें ८०
कोठें त्रास बहू झाला कोठें थोडा अशा रिती
दोन सप्ताह लढतां तेथें पालटली स्थिति ८१
कंपनीचा सूत्रधार सत्याग्रह-सहायकां
शिष्टां भेटूनि वदला “आमुचें एक आयका ८२
थांबवीतों काम आम्ही पायाचें महिने सहा
चालवूं दुसरें काम थांबवा सत्य-आग्रहा” ८३
कंपनी-सूत्रधाराची यशस्वी होय चातुरी
मी त्वेषें दाविली माझी नापसंती पुरी पुरी ८४
“सारिखें लढणें योग्य विपक्ष—बल मारण्या
सारिखें लढणें योग्य मूळशीकर तारण्या ८५
सा मास फंदफितुर कंपनी करणार ही
आजचा शुद्ध उत्साह कंपनी मारणार ही” ८६

... ... ... ... ... ...

इत्यादि वदलों त्वेषें त्वेष तो जाहला वृथा
लढा थांबूनि तळ तो सुटला; पुढची कथा ८७
रस्ता पुण्याचा क्रमतां शेरे गांवांतले कुणी
गाड्यांपुढें येउनीयां कांहीं करित मागणी ८८
“बड्या टाटा कंपनीनें आपुली माल—वाहणी
चालवीली आगगाडी बैल—रस्त्यांत आणुनी ८९
रस्ता लहान, बैलाच्या गाडीचा; रूळ त्यावरी
बुजती बैल, पळती, पडतीहि रूळावरी ९०
धोका हा सर्व लोकांना; सत्याग्रह करावया
सिद्ध आम्ही; तुम्ही कोणी या आम्हां साह्य द्यावया” ९१

आम्ही उतरलों तीन उत्साहानें तया स्थलीं
"शेरे रस्ता लढाई" ती पांच सप्ताह चालली ९२
प्रमुखत्वें चालवीणें पडलें तो लढा मज
यशस्वी हरिनें केला तेथ सत्याग्रह-ध्वज ९३
रूळावरी बसूं आम्हीं गाडी अडवुं यापरी
गाडीचे रूळ उखळूं देऊं फेंकुनिया दुरी ९४
सोशिलें बहु त्या ठायीं आम्हीं सत्याग्रही जनीं
एकदा कोपलों भारी भारी दुष्टत्व पाहुनी ९५
मित्रें धरूनियां मातें शांत केलें तया क्षणीं
हरीच्छा ती; नको होता तया तैं खटला खुनी ९६
जाहला खटला; गेलों दोघे सा मास बंधनीं
परी रस्ता खुला जाला खटला होय मागुनी ९७
खटला हा चार मास चालला मंदमंदसा
विचार केला या कालीं मी सुसूक्ष्म अमंदसा ९८
विचार हरिच्या संगें करूनी तत्त्व-संग्रह
केला कराया सुस्पष्ट सुजनां सत्य-आग्रह ९९
सामसत्याग्रह तसा शुद्ध नामक दूसरा
सत्याग्रहाचे हे वर्ग दोन स्पष्ट सदंतरा १००
प्रत्येकीं पायऱ्या दोन व्यवहारक्रमास्तव
प्राथमिक, प्रागतिक; असें हें सत्य-आहव १०१
सत्याग्रह प्राथमिक साम, जैं सत्य-हस्तक
प्रतिपक्षीय बंधूंच्या पायीं ठेवीत मस्तक १०२
नीतिबोध न्यायबोध विपक्ष-क्रम-रोधन
आघात सोसुनी सर्व विपक्ष-प्रतिबोधन १०३
हा साम पहिला यांत माल बुद्धया न नासणें
दुज्यांत माऊाचा नाश करुनी फल सोसणें १०४
सत्याग्रह प्राथमिक शुद्ध जैं सत्य-हस्तक

प्रतिपक्षा दुखावूनी फळा नमवि मस्तक १०५
सत्याग्रह प्रागतिक शुद्ध जैं सत्यहस्तक
प्रतिपक्षा वधूनीयां फळा नमवि मस्तक १०६
या सत्याग्रहकार्याची शक्य ती पूर्वसूचना
विपक्षा देणें कर्तव्य असे सत्याग्रही जना १०७
या आणि दुसऱ्या कांहीं तत्त्वांचा अल्प संग्रह
केला प्रकाशित मियां नाशाया जन-दुर्ग्रह १०८
खटल्यांतहि हीं तत्त्वें माझ्या कैफियतीमधीं
सर्व छापूनि दिधलीं बोधाया सरकार-धी १०९
या चार मासीं फिरलों प्रचारार्थहि अल्पसा
कथिली सत्य-मीमांसा आणि मूळशिची दशा ११०
"महाराष्ट्रांत सर्वत्र सरकारी कचेरिया
सत्याग्रहें निरोधाव्या मूळशी वांचवावया" १११
नासीक-नागपूरीय प्रदेशीं हा प्रचार मी
करूनि फिरलों मागें जावया बंधनाश्रमीं ११२
जाले सा मास, सुटलों, गेलों भेटावया घरीं
आली तों तार कीं येणें मूळशि-तळि सत्वरीं ११३
गेलों तळावरी, तेथें थोर थोर पुणेंकर
मूळशीकर-साह्यार्थ होते हजर सादर ११४
मोठ्या सत्याग्रहासाठीं मे मास पहिला दिन
ठरवूनी मला त्यांनीं केलें होतें निमंत्रण ११५
निमंत्रणाप्रमाणें मी गेलों जैं मूळशींतळीं
सेनानीत्व प्रमुख तैं पडलें माझिया गळीं ११६
सत्याग्रहाच्या साह्यार्थ जें मंडळ सहायक
होतें तेणेंहि मजला नेमिलें मुख्य नायक ११७
थोरां सत्याग्रहासाठीं पाठवूनि मियां त्वरें
मूळशी-पत्रक नवें लिहिलें सत्य-आदरें ११८

त्या पत्रकांत लिहुनी मूळशीची खरी स्थिति
माझीं सत्याग्रही तत्त्वें जोडिलीं मी तयाप्रति ११९
सा मास बंधनीं होतों तेव्हां कार्य-विवंचना
करितां खोल मजला सुचली एक योजना १२०
तीहि त्या पत्रकीं अल्प शब्दीं सांगितली मियां
हेतु कीं जोमें चालावी सत्याग्रह-रण-क्रिया १२१
पत्रिका एक दुसरी लिहिली तीवरी सह्या
झाल्या त्वरित बत्तीस होउनी वचन-क्रिया १२२
जिल्हा-अधिपतीसाठीं मजकूर तिच्यामधीं
होता कीं, "कळतें, क्षुब्ध जाहली सरकार-धी १२३
"सांगणें कीं बंदुकांचा उपयोग करूनियां
"मारा न भलते कोणी मानावें विनतीस या १२४
"आम्ही तयार उत्साहें मृत्यूस कवटाळण्या
"आम्हां मारा मरूं आम्ही मूळशी-मृत्यु टाळण्या" १२५
लिखाणें दोन हीं शीघ्र प्रकाशित करूनियां
मुंबापुरीस गेलों मी साहाय्य मिळवावया १२६
तेथें मीं क्रॉनिकल् पत्रीं त्वरेनें माझि योजना
प्रसिद्ध केली कळण्या महाराष्ट्रीय सज्जनां १२७
माझी सत्याग्रही नीति साम-शुद्ध नयात्मक
त्या पत्रीं स्पष्ट लिहिली जन विभ्रम-शामक १२८
योजना पटली; झाली परिषद् त्या पुरीमधीं
महाराष्ट्रीय अखिल बोलले तन्मुखें तधीं १२९
"मूळशीतें न बुडवा दीनां मारूं नका भुके"
घनीं धनमदें मत्त गेलें तें बोलणें फुकें १३०
अपमान महाराष्ट्रा अखिला चारिला सुखें
बुडवीलें मूळशीतें हजारों मारिले भुके १३१
महाराष्ट्रापमानाची चीड माझ्या मनीं बहू

दीन-दुर्बल-होमाची चीड माझ्या मनीं बहू १३२
चीड ही राहिली मागें बुडाले मूळशी-जन
काहीं मी हरिच्यासंगें विचारीं बंधनीं दिन १३३
पुढचें एक तो जाणे गाणें मागील गाउं या
परिषद्-बैठकीमध्यें थोडेसे क्षण जाउं या १३४
विनवीलें मियां तेथें "द्या मला मिति निश्चित
"सामसत्याग्रह नसे हरि-मान्य सदोदित १३५
"पायावरी विपक्षाच्या डोई हा सत्य-आग्रह
"डोईवरी विपक्षाच्या पाय हा सत्य-आग्रह १३६
"यथाधर्म यथान्याय पायरी पायरी क्रमें
"सत्याग्रहाची चढणें हें सुयोग्य मला गमे १३७
"योग्य काल तुम्हां वाटे सामसत्याग्रहक्रमा
"द्यावा तो; तोंवरी पाळूं पूर्णतेनें मनःशमा १३८
"पुढें हरी करो कांहीं, करवो कांहिं जें बरें
"तया गमेल करणें त्याच्या भक्तांचिया करें" १३९
वर्षें तीन असो द्यावा सामसत्याग्रह—क्रम
असा ठराव ठरला फळला परिषत्-श्रम १४०
परिषद् संपतां कांहीं प्रचारार्थ फिरूनियां
सत्याग्रह-स्थलीं गेलों सत्याग्रह करावया १४१
सा मास बंधनीं गेलों सत्याग्रह करूनियां
निरोप रचिले तेथें उद्देशूनि मराठियां १४२
सान थोर गुणी होते सहकारी सदाग्रही
त्यांहीं निरोप ते नेले बाहेरी स्मृति-संग्रहीं १४३
सा मास भरले झालों रुजू कामावरी पुन्हा
पुण्यास करुनी काम निघालों फिरण्या पुन्हा १४४
फिरतां कार्य करितां बेळगांवीं सजा पुन्हा

एक वर्ष मिळाली ती संपली; सुटलों पुन्हा १४५
संपलीं तीन वर्षें जीं ठरली परिषन्मुखें
झाले सा मास अधिक राहवे न मला सुखें १४६
फिरलों शेवटीं तेव्हां सर्वत्र कथिलें मिया
"नेमिली तीन वर्षांची सामसत्याग्रहक्रिया १४७
"येणारी रामनवमी तोचि शेवटला दिन
"त्या दिना पुढती तेथें शुद्ध सत्याग्रही रण १४८
"आशीर्वाद असों द्यावा हरिचें करणें हरी
करील; चिंता न लगे; झटावें आपुल्या परी" १४९
कथिलें हें; सजा आली; अखेर नवमी दिन
होऊनि झाले सा मास जप हा करि मन्मन १५०
करीत जप हा गेलों भेटलों घरच्या जनां
आलों भेटुनीया शीघ्र माघारा पुण्यपत्तना १५१
मूळशीविषयीं एक छापिलें सानपत्रक
"विराम अर्ध" हें नांव दिलें त्यासि समर्पक १५२
नसे सत्याग्रह पुरा माझा अद्यापि जाहला
कांहीं प्रयत्न अद्यापि करणेंच असे मला १५३
अशी त्या पत्रकद्वारा केली जाहीर मन्मति
एक मासें पुढें केली शुद्धसत्याग्रही कृति १५४
सूचना या कृतीची ही दिली छापुनि पत्रक
"विराम पूर्ण" हे नांव देउनी त्या समर्पक १५५
शुद्ध सत्याग्रहासाठीं जाणार मुळशीप्रति
कळतां सजले कोणी जावया मजसंगतीं १५६
"वीरा सत्याग्रही तंत्रीं पाशयंत्रींहि आवडे
मृत्यू, परी जन्मठेप बहु वीरांसि नावडे १५७
तयारी जन्मठेपेची मरणाची जशी तशी
असेल तरि या तुम्ही; करा स्वमनिं चौकशी" १५८

अशी साग्रह सप्रेम सांगणी ऐकुनी मम
सज्ज ते राहिले सज्ज झाला सत्याग्रहक्रम १५९

सत्याग्रह प्राथमिक शुद्ध देवेंच साधिला
सात वर्षें बंधनाचा लाभ तेणें मला दिला १६०

गोरे आणीक कुकडे देव मोडक बाभळे
यांसही बंधनफल देवें विविधसें दिलें १६१

फल तें संपलें आलों केलें मूळशि-दर्शन
पाहूनि भव्य धरण जाहलें रोमहर्षण १६२

अभव्य करुनी होम दीनांचा अतिगर्हित
अपमान महाराष्ट्रा चारूनि अतिगर्हित १६३

बांधिलें भव्य तें काम ज्यांहीं लोभमदास्तव
त्यांचा मी योग्य तो केला स्वमनीं कौशलस्तव १६४

स्वमनींचें लिहूनीयां कंपनीचालकांकडे
धाडिलें कीं "काम झालें उत्कृष्ट; परि बापुडे १६५

मूळशीचे दीन लोक लोभें बुडवीले तुम्हीं
महाराष्ट्र-ठरावाला मर्दे लाथाडिलें तुम्हीं १६६

अनुताप तुम्हां कांहीं व्हावा याचा निजांतरीं
तुम्ही तो दोन शब्दांहीं दाखवावा भल्यापरी १६७

शांति-भक्त महात्माजी यांकडे शब्द दोन तें
लिहावे हें दिसे न्याय्य न्याय्य हें माझिया मतें १६८

ही न्याय्य घडली गोष्ट तरी तुष्ट मदीश्वर
नातरी मज आपत्ति दिसे मन्मरणोत्तर" १६९

असें हें पत्र लिहिलें लिहवी हरि हें असें
हंसें येतें! हंसा तुम्ही, हंसें मीं, हरिही हंसे १७०

पुढचे एक तो जाणे तो जाणे देव जागता
गुरु, रक्षक, वाटाड्या मज जो शरणागता १७१

# तुरुंगांतील पत्रें

(पत्रांतील पद्यात्मक भाग "रत्नागिरी तुरुंगांतील स्फुट कविता"
या भागांत पहा.)

पत्र १ लें

चि. कमल पांडुरंग बापट
३४१ सदाशिव पेठ
पुणें २.

श्री. रत्नागिरी डिस्ट्रिक्ट प्रिझन
बुधवार ता. २ फेब्रुवारी १९३२

चि. वामन, कमल, माई यांस आशीर्वाद. वामन कमल तुमचीं पत्रें मामांच्या पत्रांसह ता. २६ डिसेंबर रोजीं मला मिळालीं. माझी फार मोठी काळजी दूर झाली. अंगाचा साबण, कपड्याचा साबण, दंतमंजन तुम्हीं आतांना ऑफिसांत दिलेलें व अण्णासाहेब आपटे यांचे हातीं पाठविलेलें दंतमंजन आणि ब्रश सर्व जिन्नस पोंचले. माझी प्रकृति ठीक आहे. आतां प्रथम तुमच्याकरितां रचलेलीं पद्यें लिहून नंतर दुसऱ्या गोष्टी बोलूं.

१ 'सर्व ठीक' (अनुष्टुप्)*
२ 'दुःखाचें स्वागत' (ओवी)
३ 'प्रेमाचा अंकित' (अभंग)
४ 'हरिस्मरणी' (पृथ्वी)

आतां प्रथम तुम्हांला हें सांगावयाचें कीं तुम्हांला लांब पत्रें हवींशीं वाटतात. मला लांब पत्रें लिहावींशीं वाटतात. परंतु ही गोष्ट येथें फारशी शक्य दिसत नाहीं. या पुढील पत्रासाठीं आजच्या इतकेही कागद मिळतील किंवा नाहीं याजबद्दल शंका आहे. म्हणून तुम्हांस अत्यंत आग्रहाची विनंति कीं तुम्ही आपल्या मनाची लहानशा पत्रानें संतुष्ट होण्याची तयारी करावी. 'दुःखाचें स्वागत' हें पद्य अशा एका दुःखाचे प्रसंगीं रचलेलें

---

* विस्तारभयास्तव देतां आलें नाहीं.

आहे. हैद्राबादच्या (सिंध) तुरुंगांत रचलेल्या इंग्रजी पद्यापैकीं तें एक आहे. माझीं हैद्राबादची पत्रें सध्यां तुमच्याजवळ नाहींत. म्हणून मूळ पद्य Welcome O Pain येथें तुमच्या करमणुकीसाठीं लिहितो.

'सर्व ठीक' आणि 'प्रेमाचा अंकित' हीं पद्यें हैद्राबादच्या All is well आणि Love rules His reign या पद्यांचीं परवां केलेलीं मराठी रूपांतरें आहेत. 'हरिस्मरणी' फक्त येथली आहे. असो. तुमच्यापैकीं दुःख जास्त कोण करतो ! मला वाटतें कमल जास्ती दुःख करते. म्हणून तिला मी 'कोमलमानस' असें विशेषण लाविलें आहे. परंतु कवितेंतल्या विशेषणांवरून कोणी कोणाशीं भांडूं नये. बरें कां ! मतिविकासपरायण, कोमलमानस, मधुरशील तुम्ही तिघेंही आहांत. केवळ कवितेच्या सोईसाठीं व गमतीसाठीं एकेकाला एकेक विशेषण दिलेलें आहे. व श्रीहरीला बजावलें आहे कीं तुंम्ही माझी फार आवडतीं, तुमचा माझ्या मनाला फार मोह म्हणून त्यानें तुम्हांला आपल्या अगदीं जवळ ठेवून तुमचा सांभाळ करावा.

तुम्हांला माझी अशी सूचना आहे कीं, तुम्ही चैतन्यगाथा एकदां अथपासून इतिपर्यंत सावकाशपणें वाचून काढावी; गाथेमधील पद्यांत किंवा येथूनच्या पद्यांत कांहीं न समजण्यासारखें किंवा न पटण्यासारखें असेल त्या संबंधानें मला पत्रीं खुलासा विचारावा; अर्थात् हें तुमचें मुख्य काम नाहीं; तुमचें मुख्य काम तुमच्या अभ्यासाचें व खेळाचें. वामन, सध्यांच्या गडबडींत आपण काय करावें याचा तूं विचार करीत असल्यास – चांगला व शांत मनानें विचार कर. कमलला तूं आणि तुला कमल. कमल एकटी पडावी हें मला बरें वाटत नाहीं; कमलच्या संमतीशिवाय तूं तिच्यापासून दूर होऊं नयेस– मी काय म्हणेन या संबंधानें तुम्हीं कोणींही काळजी करूं नये. वामन करील तें चांगलें, कमल करील तें चांगलें; माई करील तें चांगलें.

कविता टाइप करण्याचें काम कोठपर्यंत आलें आहे ! टाइप झाल्यानंतर माईनें त्या वाचावयाच्या; त्यांतून ज्यांवर छापणें नाहीं असा माईचा शेरा पडेल त्या बाजूला काढावयाच्या; नंतर राहिलेलें बाड जोशीबुवांकडे जावयाचें; त्यानेंही आपल्या इच्छेनुसार छापणें नाहीं असा शेरा कोठें मारावासा वाटल्यास मारावा व बाकी जें बाड उरेल त्याला प्रास्ताविक दोन

शब्द लिहावे– हरकत न वाटेल तर. एवढें काम होईल तितक्या लवकर उरकावें. चि. सौ. सावित्रीमामीचें ठीक चाललें आहे ना ? घरची हकीकत काय असेल ती असो. चि. साळुताईसारखी बहीण आम्हांला नसती तर माझ्या कार्यक्रमांत मला बदल करावा लागला असता असें मला वाटतें. माझा वेडा कार्यक्रम आतांपावेतों माझ्या मनाप्रमाणें चालण्यास कितीतरी लोकांची मला प्रत्यक्षाप्रत्यक्ष मदत झाली आहे ! तुमची आत्याबाई, तुमची काकू, तुमचे मामा व येसूताई— कोठवर यादी करावी. किती घरचीं किती बाहेरची मंडळी मला नाना कारणांनीं पूज्य झालेली आहेत ! पण मी त्यांची व्यक्तिशः काय पूजा करणार ! श्रीहरीच्या ठिकाणीं तीं सर्व सामावलीं आहेत. म्हणून त्याची पूजा करून मी संतोष मानतो. माझा श्रीहरी म्हणजे केवळ एक अवतार नव्हे. एक अद्वैत चैतन्य ज्याची लीला हा पसारा आहे त्याला हरी हें नांव माझ्या लहरीनें मी दिलें आहे. 'हरिः ॐ' असें म्हणून कांहीं मंत्र म्हणण्याची कोणाची वहिवाट आहे. 'हरिः ॐ' हा छोटा मंत्रच आहे. हा मंत्र ज्यानें रचला त्यालाही विश्वकारण चैतन्याला हरी हें नांव द्यावेंसें वाटलें. ॐ याचा अर्थ विश्वकारण, विश्वरूप, विश्वातीत वस्तु असा आहे. हीच 'वस्तु' विश्वाधीश आहे. विश्वाधीश या नात्यानें श्रीहरीची मी पूजा करितों. व त्यानें आपल्या ईश्वरपणाचा, आपल्या सर्वव्यापी स्वामित्वाचा, फायदा माझ्या आवडत्या मुलांना देऊन, त्यांचा त्यानें सांभाळ करावा, माझ्या अनेक घरच्यांना व सर्वांना यथावकाश ज्ञान व प्रेम शिकवून आनंदमय करावें वगैरे वगैरे मागण्या करितों. या मागण्या एका दृष्टीनें अगदीं अस्थानीं आहेत. परंतु एकच दृष्टि धरून माझें काम भागत नाहीं. माझा जीव स्वथ होत नाहीं. म्हणून आपलें नेमलेलें काम करून वेळीं अवेळीं हरीला हरतऱ्हेनें मी त्रास देत असतो. असा त्रास त्याला कितीतरी लोक देत असतील. हा त्रास थोडा कमी व्हावा म्हणून त्यानें कांहीं लोक नास्तिक स्थितींत कांहीं काळ ठेवण्याची योजना केलेली आहे. मलासुद्धां अर्धवट नास्तिक स्थितींत पूर्वी कांहीं काळ ठेवलेलें होतें, पण तो काळ संपला. मला त्याची लबाडी कळून आली. असो. आतां बोलणें थांबविणें जरूर म्हणून पुनः पुनः मनोमय नमस्कार करून

व आशीर्वाद देऊन रजा घेतो. ती. दादांस व आईस व सर्व वडील मंडळीस साष्टांग नमस्कार. धाकट्या मंडळीस नमस्कारपूर्वक आशीर्वाद

तात्या
पां. म. बापट
कैदी नं. १७८३

---

पत्र २ रें

रत्नागिरी डिस्ट्रिक्ट प्रिझन
ता. ३१ मे १९३२, मंगळवार

चि. वामन, कमल, माई यांस आशीर्वाद. आपल्या नेहमींच्या क्रमाप्रमाणें प्रथम पद्यात्मक भाग

१ हरीची योजना

कमल, यापुढें तुझें पत्र यावयाचें तें तूं आगस्टच्या पहिल्या दुसऱ्या तारखेस लिहावें व तात्बडतोब रवाना करावें. दत्तूमामाची कल्पना आहे कीं माझ्या इंग्रजी कवितांचें टाइप झालेलें बाड माझ्या नजरेखालून जाऊन नंतर त्याचे पुढचे विधि व्हावे. कल्पना चांगली. परंतु अंमलांत आणण्यासारखी नाहीं. म्हणून ती टाकून द्यावी. वामनची इच्छा दिसते कीं मीं त्याजकडे पत्र पाठवावें. तूं त्याला भेटून किंवा पत्रानें त्याला कळव कीं त्यानें व मीं दोघांनींहि पत्रें तुजकडे पाठवावीं हें बरें असें मीं ठरविलें आहे. माझें पत्र त्याला गेलेलें फक्त त्याच्या उपयोगीं पडेल, त्याचें पत्र मला आलेलें फक्त माझ्या उपयोगीं पडेल. घरच्या इतक्या माणसांना त्याची माझी खुशाली कळण्यांत असल्या पत्रव्यवहारानें फार व्यत्यय येणार. तूं माझी खुशाली त्याला व सर्वांना, त्याचप्रमाणें त्याची खुशाली, मला व सर्वांना कळवूं शकतेस म्हणून वर लिहिल्याप्रमाणें वामनला सर्व नीट समजून द्यावें. चि. सौ. सावित्री मामीचें ठीक चाललें आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे. तिचा थोडा वेळ रोज चांगल्या पुस्तकांच्या वाचनांत जाईल अशी योजना

तूं व दत्तूमामानें करणें योग्य आहे. कामांत तिला तुझी मदत होत असावी चैतन्यगाथेंतील न समजणारा भाग माईकडून समजून घेण्याची तुझी कल्पना उत्तम आहे. वामनामध्यें वामनासारखे गुण आहेत, तुझ्यामध्यें तुझ्यासारखे गुण आहेत. तुझ्यांत कांहीं कमी आहे, त्याच्यांत कांहीं अधिक आहे असा फरक माझ्या मनाला वाटेल असली कल्पना वेडेपणाची आहे. तूं रडलीस तर त्यांत कांहीं उणेपणा नाहीं. तुझ्या आजीला विचार, मी किती रडत होतों लहानपणीं—आणि किती मूर्खपणानें रडत होतों तें. तुझें रडणें मूर्खपणाचें नाहीं. व त्यांतूनही तूं इतकें थोडें रडतेस कीं मला आश्चर्य वाटतें तुझ्या मनोनिग्रहाचें. तूं कसें वागावेंस वगैरे शास्त्र मी तुला कसें सांगणार ! मामा, मावशी व तुझें मन आणि काय पाहत, ऐकत, वाचीत असशील वागणुकीसंबंधीं त्यावर तुला करतां येईल तेवढें मनन —इतके गुरु तुझ्याजवळ आहेत. तुझ्या हातून वागणुकीची मोठीशी चूक होणें असल्या गुरूंच्या सांनिध्यांत शक्य नाहीं. उगीच फार काळजी करूं नये. चुकी समजून उमजून करूं नये. हें सामान्य शास्त्र आहे. हें मला पटतें तरीहि मी केव्हां केव्हां काळजी करतों व चुकीही करतों. म्हणून तूं चुकी केलीस, काळजी केलीस, रडलीस, तरी मी तुला दोष देणार नाहीं. या संसाराच्या चक्रांत प्रत्येक जीव दोष करीत करीतच निर्दोष होत असतो. प्रयत्न निर्दोष होण्याचा असावा इतकेंच. आत्मारामपंत कोठें आहेत ! गोरे, बाभळे, देव कोठें आहेत ! सर्वांची प्रकृति ठीक आहे ना ! शांति, प्रमिला, मंदाकिनी, सुशीला, कुसुम आतां कोणत्या वर्गांत गेल्या आहेत ! विष्णु लागला का कोठें नोकरीला ! सुंदरी काय शिकत आहे ! नारायण काकाचीं मुलें खुशाल आहेत ना ! त्या सर्वांचीं नांवेंहि मला येत नाहींत. विसरतों पुनः पुन्हा. सगळीं माझ्या तुरुंगवासाच्या दिवसांतलीं तीं. दादांना आईला संभाळणारा ईश्वर आहे. चि. साळूताई त्यांच्या सेवेंत असल्यानें मला मनमुराद वागतां आलें. असो. ती. दादांस व आईस आणि सर्व वडील मंडळींस शिरसा. नमस्कार. धाकट्या मंडळींस नमस्कारपूर्वक आशीर्वाद.

तात्या.

ता. क.—पूर्वीच्या पत्रांत ता. २ मार्चच्या ऐवजीं ता. २ फेब्रुवारी असें चुकून पडलें होतें.

पांडुरंग महादेव बापट.
कैदी नं. १७८३.

---

पत्र ३ रें

रत्नागिरी डिस्ट्रिक्ट प्रिझन
सोमवार, ता. २९ आगस्ट १९३२

चि. वामन, कमल, माई यांस आशीर्वाद. नेहमींप्रमाणें अगोदर पद्य मग दुसऱ्या गोष्टी.

१ कमल का हुक्म

कमल, वामन, तुम्ही दोघें तुमच्या मित्रांसह आलां व मला भेटून गेलां. आतांच तुमची भेट झाली. वामन शाळेंत जाण्यासंबंधानें तूं माझें मत विचारलेंस. मी तुला माझें मत दिलें. माझें मत तूं बंधनकारक समजूं नयेस हेंही तुला मीं सांगितलें. हें पहा. माझें डोकें—माझी बुद्धि—माझी लेखनशक्ति जी काय थोडीशी आहे ती फुकट जात आहे म्हणून मीं लेखनसाहित्य सरकारकडून मिळविण्याचा प्रयत्न करावा असें तूं फिरून फिरून आग्रहानें सांगितलेंस. हें सांगण्यांत तुझा जो हेतु तोच हेतु माझें मत मीं तुझ्या शिक्षणासंबंधानें सांगितलें त्या मताच्या पोटीं आहे. मुलानें वडलांच्या बुद्धीविषयीं काळजी करावी आणि वडलांनीं मुलाच्या बुद्धीविषयीं निष्काळजी असावें हें शक्य आहे का? तुझी बुद्धि फुकट जाऊं नये, ती शक्य तितकी सुसंकृत व्हावी, तशीच कमलचीहि व्हावी ही माझी इच्छा. तुझ्या मामानें तुझ्या तुमच्या शिक्षणाबद्दलची जबाबदारी पतकरली आहे असा मी त्याच्या १९३१ डिसेंबर १८ च्या पत्राचा अर्थ करतों. त्याला व दत्तुमामाला वगैरे जोंपर्यंत तुमच्या शिक्षणाचें वगैरे ओझें वाटत नाहीं तोंपर्यंत तुम्ही दोघांनींही शिकावें. त्यांना ओझें वाटूं लागेल तेव्हां वाटेल तें काम करून उदरनिर्वाह करावा व साधल्यास दोन परोपकाराचीं कामें करावीं.

नाहीं तर देवा ! सर्वांचें कल्याण कर एवढी प्रार्थना करून संतुष्ट असावें. माझी अंदमानला रवानगी होईल असा रंग दिसतो. मी अंदमानला असलों काय, किंवा येथें असलो काय, तुम्हांला माझा उपयोग तिळमात्र नाहीं. असला नसला मी सारखा आहे. आणि मला असें वाटूं लागलें आहे कीं येत्या ४।५ वर्षांत माझ्या आयुष्याची समाप्ति होईल. माझ्या असण्यानें तुम्हाला कांहीं लाभ झाला नाहीं तेव्हां माझ्या नसण्यानें तुमचें नुकसान होणार नाहीं. ज्या श्रीहरींनें माझी तुमची ताटातूट करून तुमचा हस्तें परहस्तें त्याला साधला तसा सांभाळ आजवर केला, तोच श्रीहरि माझ्या मरणानंतरही तुमचा त्याला साधेल तसा सांभाळ करील यांत संशय नाहीं. माझा त्याजवर पूर्ण विश्वास आहे. त्याच्यावर सर्व विश्वाचें नाटक चालविण्याची जबाबदारी आहे. तो परमेश्वराला जबाबदार आहे. परमेश्वर आपल्या हौससाठीं हा खेळ आपल्या दोन मानस अपत्यांकरवीं चालवीत आहे. या अपत्यांचीं नांवें ईश्वर व प्रकृति. ईश्वराला सध्या मी श्रीहरि म्हणतों. प्रकृति ही मृत्तिका व श्रीहरि हा पुतळे बनविणारा मूर्तिकार. नाना प्रकारचे देह बनवून त्यांत श्रीहरि आपल्या ज्ञानशक्तीचा अंश कमी अधिक भरून या विश्वनाटकाला आरंभ करतो. आपण सर्व जीव या नाटकांतील पात्रें आहोंत. आपल्याला स्थूल देहानें या स्थूल रंगभूमीवर काम करावयाचें असतें. दुसऱ्या सूक्ष्म अदृश्य रंगभूमीवर काम करण्याची आपली पाळी आली म्हणजे हें स्थूल शरीर टाकून आपल्याला सूक्ष्म शरीरानें (हें स्थूल शरीराबरोबर असतेंच) तिकडे वावरावयाचें असतें. आपण जीं पात्रें आहों त्यांना थोडीबहुत स्वतंत्रता ईश्वरानें ठेवलेली आहे. सामान्य संविधानक आरंभापासून अखेरपर्यंत आंखलेलें आहे. परंतु पात्रानें आपली मर्जी थोडी फार चालवावी अशी येथें मोकळीक आहे. पात्रानें आपल्या स्वतंत्रतेचा दुरुपयोग केल्यास नाटक बिघडूं नये म्हणून श्रीहरींला कांहीं तजविजी कराव्या लागतात. आणि हें आमचें चुक्या करण्याचें व त्याचें चुक्या दुरुस्तीचें काम अव्याहत चालू असतें. त्याला प्रत्येक पात्राला हुशार करीत करीत कांहीं एका श्रेष्ठ पदवीपर्यंत न्यावयाचें आहे. यासाठींच तो प्रत्येकाला निरनिराळ्या प्रसंगांतून जन्मभर व अनेक जन्मभर नेत असतो. त्याची जबाबदारी त्याला नीटपणें पार पाडतां यावी म्हणून माझी

जबाबदारी मीं नीटपणें पार पाडली पाहिजे. सगळ्यांनींच त्याच्याशीं असह-कारिता केली तर त्याचें काम त्याला जड जाईल. तो तें उरकील, कसें तरी उरकील. परंतु त्याच्यावर माझें प्रेम असल्यानें मला असें वाटतें कीं त्याला शक्य तेवढी मदत मीं करावी. मला त्यानें जी मोकळीक ठेवली आहे ती या प्रेमासाठीं मीं नाकारली आहे. माझ्या मूर्तींतील मृत्तिका माझी नव्हे. ज्ञानशक्ति माझी नव्हे. मला जी मोकळीक दिलीस, त्या मोक-ळिकीचा बराच असा तसा उपयोग करून शेवटीं ती तुझी तुला परत करण्याची मोकळीक मी घेत आहें असें म्हणून श्रीहरीला त्यानें दिलेली स्वतंत्रता मीं परत केली आहे. त्यानें ती बरीचशी परत घेतलीही आहे, व यांत मला आनंद आहे. श्रीहरीचें यंत्र बनण्याचा आनंद स्वतंत्रतेच्या आनंदापेक्षां फार मोठा आहे असा माझा अनुभव आहे. व म्हणून तुम्हींही श्रीहरीचें यंत्र होण्याचा प्रयत्न करावा अशी तुम्हांला विनयपूर्वक प्रेमाची विनवणी आहे. श्री. पेंडसे यांनीं माझी जी गोष्ट लिहिली आहे तींत चुकीची माहिती बरीच आहे. परंतु १९०२ सालीं माझ्या आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाचा प्रसंग घडून आला असें त्या गोष्टींत दिग्दर्शित केलें आहे तें अगदीं खरें आहे. श्रीहरीनें आपल्या मुरलीचा मोहक आवाज प्रथम त्या वर्षीं एका सायंकाळीं माझ्या हृदयांत भरला, तो तेथें कमी अधिक प्रमाणांत निरनिराळ्या रागदारींत आजवर सारखा घुमत आहे. तो तुम्हांलाहि तो मधुर आवाज ऐकवील. असो. इंग्रजी बाडासंबंधानें:— श्री. नारायणराव गोगटे यांनीं संपादकाचें सर्व काम करावें. डॉ. सोहनी त्याला मदत कर-तील. बाड एकदम छापणें असल्यास A Rhymed Talk हें नांव. A Holy Song या नांवानें तें पद्य स्वतंत्र छापतां येण्यासारखें आहे. बाकीचीं A Fly's Nest and other pieces या नांवानें छापल्यास चालेल. या केवळ सूचना. नारायणराव यांना जें पसंत वाटेल तें नांव. जो पसंत पडेल तो पद्यांचा क्रम. श्री. वामन मल्हार जोशी यांजकडे अद्यापि बाड नेलें नसल्यास त्यास त्रास न देणें चांगलें असें मीं ठरविलें आहे. नारायण-रावाला जोशीबुआपेक्षां अधिक सवड आहे. किंवा तो काढील. त्यानें काढली पाहिजे. जोशीबुआकडे फक्त एकदां थोडेंसें वाचण्याकरितां व दोन शब्दांच्या प्रस्तावनेकरितां जावयाचें होतें, परंतु इतकाहि त्रास त्याला देणें

बरें नव्हे असें मला आतां वाटत आहे. म्हणून त्याचेकडे अद्यापि बाड गेलें नसल्यास तें तिकडे न नेणें. नारायणराव संपादकाचे किचकट काम करावयास तयार नसेल तर बाड पडूं देणें. दुसऱ्या कोणावरहि बाडाच्या संपादकपणाची जबाबदारी टाकण्यास माझें मन मला सांगत नाहीं. चि.सौ. माईनें हें काम करावें असें तिला सुचविण्याचा माझा बेत होता, परंतु तिच्या संसाराचा व्याप एवढा आहे कीं तिला त्रास देण्याचा विचार मीं टाकून दिला. असो. गीताईसंबंधानें तुम्हांला सांगितलेंच आहे. गीताईच्या मदतीनें भगवद्गीता वाचण्याचा प्रयत्न करून पाहावा. गीताई स्वतंत्रपणें वाचावी. पुस्तक वाचलें कीं तें सगळें समजलें पाहिजे असा आग्रह नसावा. जेवढें समजेल तेवढें आपलें; न समजेल तें पुढें केव्हां तरी समजेल. अभ्यास यथाशक्ति करावा. फार काळजी करीत जाऊं नये.

ती. दादांस व आईस शिरसाष्टांग नमस्कार. सर्व मंडळीस सा. न. धाकट्या मंडळीस नमस्कारपूर्वक आशीर्वाद.

तात्या.

ता.२९।८।१९३२

पांडुरंग महादेव बापट
कैदी नंबर १७८३
रत्नागिरी डिस्ट्रिक्ट प्रिझन

ता. क.– वामन, तूं जें आपल्या मनाशीं पूर्ण विचार करून तुझ्या हृदयांतील देवाला पसंत असें काम करशील त्याला माझी पूर्ण संमति आहे हें केव्हांही विसरूं नकोस. माझें मत म्हणून मीं कांहींही सांगितलें तरी त्याची किंमत तुझ्या हृदयांतील देवाच्या सांगण्याइतकी केव्हांही समजावयाची नाहीं. कमललाही माझें हेंच सांगणें. आपली मुख्य जबाबदारी आपल्या हृदयांतील देवाचें सांगणें करण्याची आहे. इतरांचें ऐकलें आणि त्याला नाराज केलें तर तें जाचक होतें. हा आंतला जाच तुम्हांला केव्हांही न होवो. न होईल अशी शक्य ती खबरदारी तुम्हीं घ्यावी.

तात्या.

पत्र ४ थें

श्री

रत्नागिरी डिस्ट्रिक्ट प्रिझन
सोमवार, ता. २८ नोव्हेंबर १९३२

चि. वामन, कमल, माई यांस आशीर्वाद. कमल, या पत्रावर वामनचें नांव लिहिलें आहे. माझें शिक्षेचें एक वर्ष २३ नोव्हेंबरला संपलें. एक वर्ष तुझे नांवावर पत्रें पाठविलीं. आतां एक वर्ष वामनचे नांवावर पाठवावीं हें बरें नव्हे का ! हैदराबादेहून थोडींच पत्रें माझे नांवावर आलीं असें वामन ता. २३ नोव्हेंबर १९३१ रोजीं येथील सेशन्स जज्ज यांचे कोर्टांतील बाकावर आपण बसलों असतांना म्हणाला होता. हें तुला आठवतें ना ! त्याचें म्हणणें खरें होतें. त्याच्या नांवावर शेवटलीं पांच पत्रें हैदराबाद तुरुंगांतून मीं धाडलीं होतीं. तुझ्या नांवावर तितकीं पत्रें येथून आलेलीं आहेत. म्हणून मी त्याचें नांव आजच्या पत्रावर लिहीत आहें. त्यांत माझी कांहीं चूक होत नाहीं हें तुला कबूल आहे ना ! हें वर्ष वामनला द्यावें अशी तुझी संमति आहे ना ! असो. आतां बाकी गोष्टी पद्यें लिहून झाल्यावर

१ हरिकृतिसप्तक (श्लोक)
२ हरिनीतिसप्तक ( " )
३ हरिदयाष्टक ( " )
४ हरिवेडदशक ( " )
५ पंतभक्ति (अभंग)
६ सुखसप्तक ( " )

कमल, वामन अजाणसप्तक (अभंग), देवसप्तक (अभंग), हरिदास्यपंचक (अभंग) प्रेमएकादशी (ओवी) इतका माल शिलकेंत पडला आहे. शिलकेंत माल पडला असा हा पहिलाच प्रसंग. हैदराबादेस माझी अशी रीत होती कीं तुम्हांस पत्र लिहावयाचे तारखेपूर्वीं एक महिना पद्यरचनेला आरंभ करावयाचा व याप्रमाणें तयार झालेला माल सर्व तुमच्याकडे पाठवून द्यावयाचा. कारण कागदासंबंधानें मला अडचण कधींच

आली नाहीं प्लंकेटसाहेबांच्या कारकार्दीत. येथेंही हैदराबादेसारखीच रीत ठेविली आहे. या महिन्यांत पुष्कळ माल होण्याचें कारण वही ! वामननें आग्रह धरला नसता तर माझ्या मनांत कागद मागण्याचें कधींही आलें नसतें. वही जवळ असल्यानें या महिन्यांत माझ्या स्मरणशक्तीला ताण पडला नाहीं ही सगळी वामनची कृपा. कमलच्या हुकमानें मी गेल्या पत्राकरितां कांहीं संस्कृत श्लोक केले. वामनच्या हुकमानें कागदासाठीं अर्ज केला तेव्हां मुलांचें हुकूम मानणें आईबापांच्या -निदान बापाच्या- किती फायद्याचें असतें हें तुमच्या लक्षांत तुम्हीं काळजीनें ठेवून द्यावें व प्रसंगीं मुलाचा हट्ट न मानणाऱ्या बापाला गोष्ट सांगावी. असो. असो म्हटलें परंतु तें खोडून टाकलें पाहिजे. हा हट्टाचा विषय चार दोन ओळी आणखी चालविला पाहिजे. मुलांचा प्रत्येक हट्ट आईबापांनीं पुरविणें मुलांच्या किंवा आईबापांच्या हिताचें होणार नाहीं हें तुम्हांला समजतें ना ! हें कारण आहे कांहीं गोष्टी मी तुमचा इच्छेच्या विरुद्ध करितों याचें. सार हें आहे कीं, मुलांची सूचना, विशेषतः हट्टानें केलेली सूचना, वडील माणसांनीं 'मुलांना काय कळतें' असा आढ्यतेचा विचार मनांत आणून दूर ढकलूं नये. कमल, वामननें पत्रांत लिहिलें होतें कीं मी पुरांत उडी घेणार आहें. मला वाटतें पुराचें पाणी तोडावयाला पुष्कळ ताकद लागते. नुसत्या कुशलतेनें पुरांतून निभावणें मला शक्य वाटत नाहीं. तुला नाहीं का वाटत ? तुम्ही दोघेंही माझ्यापेक्षां चांगलें पोहायाला शिकला आहां. परंतु तुम्हां दोघांमध्येंही अंगकाठी बारीक व ठेंगू असल्यानें पुराला पुरण्याइतकी ताकद नाहीं असा समज आहे. पहा. काळजीनें वागा. कमरेला काचा आवळून काचांतून लांब रस्सी भक्कम ओवून ती जर नदीच्या कांठावर एखाद्या चांगल्या पोहणाऱ्या सोबत्याच्या हातांत असेल तर पुरांत आपली ताकद कोठपर्यंत चालते हें आजमावयाला हरकत नाहीं. चारदोन हात टाकून पुन्हां परत यावें. अशा तऱ्हेनें हळूहळू पाण्याची व आपली परीक्षा पाहावी. पुरांत झाडें झुडपें वाहून येत असतात त्यांत पोहणारा अडकण्याचा संभव असतो. भोवरे तयार होतात त्यांत गरुछंती होण्याचा संभव असतो, इत्यादि गोष्टी ध्यानांत घेऊन काळजीनें काम करावें. वामन, तूं मला विचारणार आहेस ("हट्ट घेणार आहेस") "मीं पुढें काय करावें. काय शिकावें ?" तें सांगा म्हणून. हा तुझा मे

महिन्यांतला प्रोग्राम आहे. हें पहा. तूं वरील दोन प्रश्नांसंबंधींच्या तुझ्या योजना व्यवस्थित लिहून आण म्हणजे त्या योजनांत कोणत्या योजनेला मी कमी मार्क देतों, कोणतीला अधिक देतों हें मी सांगूं शकेन. तूं किंवा कमलनें अमुक शिकावें, अमुक करावें अशी इच्छा विशिष्ट प्रकारची माझ्या मनांत बिलकुल वागलेली नाहीं. शिकण्याची सोय असेपर्यंत तुम्हांला आवडेल तें तुम्हीं शिकावें व पुढें तुम्हांल पटेल तें काम तुम्हीं करावें यांत मला पूर्ण आनंद आहे. व्हिन्सेंटसाहेबाकरितां मीं सांगितलेला निरोप पडूं दे तुझ्या चोपडींत तुझ्या मताप्रमाणें. त्याची आतां आवश्यकता नाहीं. ती. दादांस व आईस शिरसाष्टांग नमस्कार. वडील मंडळीस साष्टांग नमस्कार. धाकट्या मंडळीस नमस्कारपूर्वक आशीर्वाद.

तात्या
पां. म. बापट
कैदी नं. १७८३.

---

पत्र ५ वें

रत्नागिरी डिस्ट्रिक्ट प्रिझन
ता. २७ फेब्रुवारी १९३३ सोमवार

चि. वामन, कमल, माई यांस आशीर्वाद—

वामन, कमल, तुमचें पत्र २।२।३३ चें मिळालें. डॉ. खेवनींचा हिशेब समजला. सर्व ठीक आहे. आतां अगोदर पद्यात्मक मजकूर:—

१ हरीपाशीं मागणी ( श्लोक )
२ हरीची सुई ( श्लोक )

वामन, कमल, तुम्हीं दोघांनींही कट केला आहे कीं शिकावें काय व पुढें करावें काय या प्रश्नांनीं माझी परीक्षा घ्यावयाची. पण या परीक्षेंत मला बरे मार्क मिळावे अशी तुमची प्रेमाची इच्छा असली तरी ती फुकट आहे. मी या परीक्षेंत अगदीं नापास होणार. नापास आहें. मला त्याबद्दल वाईट वाटतें का? वाटतें आणि नाहीं वाटत. परीक्षक खूष व्हावा

ही परीक्षा देणाराची इच्छा असते. तशांत परीक्षक वामन, कमल. तेव्हां ही इच्छा बलवत्तर आहे माझ्यामध्यें. परंतु परीक्षा देणारानें ज्या प्रश्नांचा अभ्यास कधीं केला नाहीं, ज्या प्रश्नांचा अभ्यास करण्यास त्याला सवडही कधीं मिळाली नाहीं असे प्रश्न त्याच्यापुढें आले म्हणजे त्यानें काय करावें ! तुम्ही म्हणाल सवड पुष्कळ आहे.--वामन, ही असली एकान्तीं सवड उपयोगी पडत नाहीं. तुमचें कोणत्या विषयांत डोकें किती चालतें, तुमच्या आवडीनिवडी काय आहेत वगैरे गोष्टींची माहिती तुमच्या प्रश्नाचीं उत्तरें देण्यासाठीं जरूर आहे. तुम्ही मजपासून नेहमींच दूर. अशा स्थितींत मीं काय सांगावें ! मागील पत्रांत मीं लिहिलें आहे कीं, तुझ्या योजना तूं आण, त्याप्रमाणेंच कमलनें तिच्या योजना आणाव्या. त्या योजनांत अमुक मला पहिल्या प्रतीची, अमुक मला दुसऱ्या प्रतीची...वाटते एवढें मी सांगूं शकेन. काळजी टाकून द्या. पुष्कळ गोष्टी परिस्थितीवर अवलंबून असतात....परीक्षेचा निकाल कसाही होवो--तुम्हीं दोघांनींही परीक्षा म्हणजे सर्वस्व ही कल्पना केव्हांही उराशी धरूं नये. एप्रिल अखेरपर्यंत याल असें धरून चालतों. ती. दादांस व आईस शिरसाष्टांग नमस्कार. सर्व वडील मंडळीस साष्टांग नमस्कार. चि. साळूताईस व सर्व धाकऱ्या मंडळीस नमस्कारपूर्वक अशीर्वाद.

तात्या.
पांडुरंग महादेव बापट.
कैदी नं. १७८२

---

पत्र ६ वें


रत्नागिरी डिस्ट्रिक्ट प्रिझन
ता. १ सपटंबर १९२३

चि. वामन, कमल, माई यांस आशीर्वाद.

वामन, कमल, तुमचें २ व ३ जुलैचें पत्र काल माझ्या हातीं दिलें गेलें. पत्रांत घरची पुष्कळच माहिती होती. बहुत आनंद झाला. आज ता. १ सपटंबर आहे. पुढचें पत्र ता. १ डिसेंबरचे सुमारास लिहावें. तीन महि-



सौ. माई सप्तर्षी



चि. वामन



कु. कमल

त्यांनीं एक पत्र हा नियम तुम्हांस माहीत आहेच. तुमचें पत्र माझे हातीं आल्यावर मी उत्तर लिहीन. आपण कोणाला पत्र लिहिलें कीं तें त्याला मिळेलच असें धरून चालूं नये. केव्हां मिळतें, केव्हां मिळत नाहीं; केव्हां वक्तशीर मिळतें, केव्हां बहुत दिवसांनीं मिळतें; या सर्व गोष्टी लक्षांत ठेवून पत्राच्या उत्तराची वाट पहाण्याचें सोडून द्यावें. काळजी करण्याचें कमी करावें. आतां तुमचें लहानपण संपलें आहे. तुम्हांला पुष्कळ समजतें आहे. म्हणून आतां मी रजिस्टर पत्र पाठविण्याचेंही बंद करीत आहें. भेटीला मे महिन्यांत याल असें धरून चालतों. मध्यें केव्हां आलांत तर माझी हरकत अर्थातच नाहीं. याल त्याच्यापूर्वीं सुपरिंटेंडंटसो अथवा जेलरसो यांचेकडे पत्र पाठवून भेट होऊं शकेल कीं नाहीं वगैरे माहिती घेण्यास विसरूं नये. कमल, तुझ्या पत्राला येथें येऊन पडल्याला दोन महिने झाले. इतक्या अवधींत तुझी प्रकृति चांगली झाली असेलच. कमलला नेमानें व्यायाम करण्याची सूचना तुम्ही द्या अशें वामनचे पत्रांत होतें. हा द्राविडी प्राणायाम काय म्हणून ? तरी पण वामनचा हुकूम मानला पाहिजे म्हणून मी एक सूचना करितों. वामन, अंतू, कमल व येसूताई या कमिटीनें कमल-करितां व्यायाम कोणता, व्यायामाची वेळ कोणती वगैरे ठरवावें. कमिटी-च्या ठरावाप्रमाणें कमलनें वागण्याचा प्रयत्न करावा. मीं पहांटे ४-४॥ च्या दरम्यान उठून सफाई करून नियमित व्यायाम रोज थोडासा करितों व नंतर अंथरुणावर बसून "देवा, सर्वांना चांगली बुद्धि दे, देवा मला चांगली बुद्धि दे." अशी प्रार्थना करतों. असो. पोहण्याचा मजकूर वाचून आनंद झाला. पोहणें व 'सायकलणें' दोघानांही आलें हें उत्तम. नव्या युगांतलीं मुलें तुम्ही. नव्या युगांतली स्तुत्य राहणी या सदरांत ज्या गोष्टी समाविष्ट होत असतील त्या सोयीप्रमाणें तुम्हीं शिकून घ्याव्या हें योग्य आहे. मला वाटतें 'फर्स्ट एड' व टाइपिंग केव्हां तरी शिकून घेणें उपयुक्त होईल. लक्ष्मण यथाशक्य धंदेशिक्षण घेत आहे ही चांगली गोष्ट आहे. हें नवें युग सेवाधर्माचें युग आहे. स्वतंत्रतेनें भाकरी मिळविण्याची योग्यता ज्याची अधिक तो अधिक सेवा करूं शकतो. म्हणून अनेक धंदे हाताशीं असलेले चांगलें. मन वाटेल त्या धंद्याला तयार व हात कांहीं धंद्यांत तरबेज अशा मनुष्याला स्वतंत्रतेनें भाकरी मिळविणें सोपें जातें व अशांच्या हातून सेवा-

धर्म बराच घडतो. सकाळीं भंगीकाम, नंतर अध्ययन-अध्यापन, नंतर भाकरीचा कोणता तरी धंदा,–चांभार, मांग, सुतार, लोहार, प्रोफेसर, एडिटर इत्यादि. नव्या युगांतील सेवाधर्माची ही एक कल्पना आहे. समाजोपयोगी सर्व धंद्यांची किंमत अध्यात्मदृष्ट्या एकसारखी, बाह्यदृष्ट्या कमीअधिक; म्हणजे प्रोफेसराला मजूरी मानमरातब एखाद्या सुतारापेक्षां कदाचित् अधिक मिळेल; परंतु प्रोफेसराचा आत्मा व सुताराचा आत्मा समाजसेवक या दृष्टीनें सारख्याच उन्नतीला प्राप्त होईल. असो. कमल, तूं जीं चार नांवें लिहिलीं आहेस त्यांतील भय्या म्हणजे माईचा भय्या व बाळशा म्हणजे मोठ्या मामीचा बाळू असें समजावयाचें का ! मला दुसरा कोणी भय्या व बाळशा आठवत नाहीं. वामननें मॅट्रिकला मराठी घेतलें होतें व आतां पुन्हां संस्कृत घेतलें आहे. तुझा काय बेत आहे ! तुझा संस्कृतप्रवेश हें फार चांगलें पुस्तक आहे. हें एक पुस्तक चांगल्या रीतीनें शिकल्यास संस्कृतांत खरोखरीच चांगली गति होईल असा मला भरवसा वाटतो. तुम्हीं दोघां-नींहीं या पुस्तकाचें नीट अध्ययन करावें असें मला वाटतें. परंतु तुला मंदाकिनीप्रमाणें जर्मन वगैरे घ्यावेंसें वाटलें तर घे तुझ्या आवडीप्रमाणें. गोरे नगरला गेल्याचें तुम्हांला कळलें असेल. होईल कांहीं तरी निकाल. काळजी करूं नये. गोरे शुश्रूषेच्या कामाला अतिशय लायक आहेत. ती. दादांची शुश्रूषा त्यांनीं केली. माझी तर कल्पनेपलीकडे केली. आईसाठीं, ताईसाठीं, अप्पासाठीं निरोप द्या, वामनकमलसाठीं निरोप द्या असें माझ्यामार्गे टुमणें लावून चारदोन ओळी तयार करून घेतल्या.

१ आईसाठीं निरोप

२ कमलवामनसाठीं निरोप

तुमच्याकडे वह्या आल्याच असतील. मजकूर समजण्यास अवघड जाईल तो सोहनी, नारायणराव यांजकडून समजून घ्यावा. पहिल्या वहींत सर्वत्र दामयमक आहे. वही नं.२ मध्यें "हरीची सुई" व "हरीच्या चरणीं" या प्रकरणांत आहे. इतरत्र नाहीं. ती. दादांस व आईस व सर्व वडील

मंडळीस शिर सा. नमस्कार. चि. ताईस व सर्व धाकट्या मंडळीस नमस्कारपूर्वक आशीर्वाद

तात्या
पांडुरंग महादेव बापट
कैदी नं. १७८३

पत्र ७ वें

चि. वामन पांडुरंग बापट

२८० सदाशिव पेठ, पुणें २

(१) मनास शिकवण (द्रुतविलंबित)
(२) भावभेट (वसंततिलका)
(३) हरिभजन (अभंग)
(४) देवकथा (अनुष्टुप्)

पद्यात्मक मजकूर पुरे झाला. तूं मला म्हणालास कीं मी सरळ गद्यांत माझें म्हणणें मांडावें असें कोणी इच्छितात. त्यास, माझें पद्य हें गद्यच असतें—फक्त त्याला यमकी वृत्ताची जोड दिलेली असते. ही जोड माझ्या व मजसारख्यांच्या करमणुकीसाठीं मी देत असतों. माझें पद्य दुर्बोध असा शेरा माझ्या कांहीं पद्यलिखाणावर मारतां येईल. परंतु त्याला उपाय नाहीं. मला कांहीं अलौकिक गोष्टी कोणाला सांगावयाच्या नाहींत. मी कविता लिहूं शकत नाहीं तसा मी लेखही लिहूं शकत नाहीं. मी अगदीं सामान्यांतला सामान्य 'शूद्रधर्मी' सेवक आहें. थोडीशी क्षात्रवृत्ति मजमध्यें आहे, थोडीशी ब्राह्मणकी आहे, वैश्यगिरी शून्य किंवा शून्यप्राय अशी माझी अंतरींची हकिकत. मजपासून नांव घेण्यासारख्या ब्राह्मणी कार्याची—प्रसादपूर्ण लेखांची वगैरे—अपेक्षा करणारे माझी अंतरींची हकिकत जाणत नाहींत. १९०६ सालीं लेखक होण्याची इच्छा माझ्या मनांत वागली होती. त्या इच्छेप्रमाणें मीं कांहीं अभ्यास केला, कांहीं लेख लिहिले—१९०७ साली ईश्वरी योजनेनुसार माझी इच्छा मी आपल्या मनांतून बुद्धिपुरःसर काढून टाकली. 'ब्राह्मणी

कार्य करणारे पुष्कळ आहेत, ब्राह्मणेतरांची आवश्यकता आहे' अशी हांक मला आली. मी "ब्राह्मणेतर" झालों. १९१३ सालीं, त्यापूर्वी, त्यानंतर मीं जें कांहीं लिहिलें तें कांहीं प्रेमासाठीं, कांहीं भाकरीसाठीं. चैतन्यगाथा, A Holy Song, गीतासेवक, मुळशीविषयक लिखाण.... हें प्रेमप्रेरित लिखाण आहे. येथील माझा चालू पद्यप्रयत्न हाही प्रेमप्रेरित प्रयत्न आहे. परंतु या सर्व प्रयत्नांना जरूर त्या अभ्यासाचें साहाय्य नसल्यानें त्यांत आकर्षकता, तोषकारिता, उत्थापकता इत्यादि गुण फारच क्वचित् व फारच अल्पप्रमाणांत असणार हें उघड आहे. प्रसाद, माधुर्य, ओज हे गुण माझ्या पद्यांत जसे दुर्मिळ, तसे माझ्या गद्यांतही दुर्मिळ; म्हणून मला गद्यलेखनाचा आग्रह करणें व्यर्थ आहे. जें मी प्रेमासाठीं लिहीत आहें तें प्रेमाच्या अंतःप्रेरणेनुसार—एका परिस्थितींत गद्य, दुसरींत पद्य, तिसरींत गद्यपद्य असेल. तें जसें असेल तसें तूं, कमलनें, माईनें व इतरांनीं प्रेमानें गोड करून घ्यावें. समजेल तेवढें समजेल. न समजेल तें सोडून द्यावें. मला गद्यलेखनाची सूचना ज्यांनीं केली असेल त्यांचा मी आभारी आहें असें त्यांस कळवावें. माझ्या परिस्थितींत मला जें शक्य आहे व युक्त आहे तें मी करीत आहें एवढें त्यांस सांगावें. सूचनेचा उपयोग यथाकाल करीन अशी सूचना त्यांस द्यावी. असो. वामन, कमल, तुमची प्रकृति सध्यां सुंदर दिसते तशी कायम ठेवा.

गोरे यांस नमस्कार कळवावा. शांतीचा मंत्र नेहमींचा मित्र करा असें सांगावें. देव कोठें आहेत ? इतरांबद्दल तूं बोललास. देवांबद्दल तूं बोलला नाहींस. पुढील तिमाहीचें पत्र फेब्रुवारी २० ला लिहून टाकावें. या पत्राचें उत्तर तावडतोब द्यावें. हें पत्र पोचण्याचे अगोदरच तुमचें पत्र पोस्टांत पडलें असलें तर बरेंच झालें. नसलें तर तावडतोब लिहावें. ती. दादांस व आईस व सर्व वडील मंडळीस शिरसाष्टांग नमस्कार. चि. साळूताईस व सर्व धाकट्या मंडळीस नमस्कारपूर्वक आशीर्वाद.

तात्या
पां. म. बापट
कैदी नं. १७८३

## पत्र ८ वें

चि. वामन, कमल, माई यांस आशीर्वाद.

आधीं थोडा पद्यभाग.

### १ समाजस्वास्थ्य ( अनुष्टुभ् )

वामन, कमल, समाजस्वास्थ्यकारांची सध्यां फार प्रसिद्धि झाली आहे. तो माझा सहाध्यायी. न्यू स्कूलमध्यें सातव्या इयत्तेंत आम्ही एका डिव्हिजनमध्यें होतों. गणितांत फार हुशार. त्याचा बाप संत कर्वे गणिती, तो गणिती. संत कर्वे यांनीं स्त्रियांकरितां संस्मरणीय काम केलें--करीत आहेत. माझ्या सोबत्याचाही एक हेतु स्त्रियांना पुरुषांबरोबरीचा हक्क मिळवून देण्याचा दिसतो. तो स्तुत्य हेतु आहे. परंतु विषय जो त्यांनीं हातीं घेतला आहे तो महाविकट व विकट आहे. ब्रह्मचर्याची थट्टा, कामवासनेच्या संयमाची थट्टा. जगाला कर्ता धर्ता कोणी नाहीं, माणूस मेला कीं संपलें; आत्मा टिकतो, पुनः देह घेतो वगैरे सब झूट इत्यादि मतें आतां त्याला मानवलीं आहेत. मला या सर्व गोष्टी पाहून परमेश्वराच्या अजब लीलेचें विशेषच कौतुक वाटतें. नास्तिकाचा पार्ट, संशयवाद्यांचा पार्ट, सर्व पार्ट, सर्व सोंगें एक परमेश्वर घेतो. प्रत्येक जीवाला अनेक अनुभवांतून, अनेक मतमतांतरांतून फिरवून शेवटीं अनेक जन्मांतीं आपल्या विश्वनाटकाचें गूज दाखवावयाचें ही परमेश्वराची योजना आहे इत्यादि गोष्टी मी मानतों. कर्वे स्वतःचीं मतें तर्कशुद्ध समजतो. मी माझीं मतें तर्कशुद्ध समजतों. वाद करीत असावें, संवाद करीत असावें, विचार करीत असावें व खोल विचारांतीं जें ज्या वेळीं योग्य दिसेल तें मानावें, वानावें व व्यवहारांत आणावें. चैतन्यगाथा पद्य २३ "विद्या" पहा. कर्मं देह करी। त्याकरवी। सुंदर कर्मं व्हावीं॥ यास्तव मनामधें। वृत्ति हवी। सर्व परी ती बरवी॥ बरवी वृत्ति मनीं। व्हायासी। बुद्धि पाहिजे खाशी॥ खासी ती व्हाया। ज्ञानासी। लावणेंचि सेवेसी॥६॥ ज्ञानाचा मार्ग। देखावें। ऐकावें वाचावें॥ त्यावर मनन पुरें। तें व्हावें। नंतर अभ्यासावें॥७॥ अभ्यासावें जें, मननानें। गोड दिसे आचरणें॥ विचार वृत्तींना। मार्गानें। अभ्यासानें नेणें॥८॥ तुमच्या हातांत कर्वेचें लिखाण कोणतें कोणतें

पडलें आहे किंवा पडणार आहे तें मला ठाऊक नाहीं. कोणाचेंही लिखाण वाचा, अभ्यासा. मात्र शंकायुक्त मनानें त्याचें परीक्षण करीत चला. उदाहरणार्थ ब्रह्मचर्य शक्य आहे, संयम चांगला वगैरे मतें देणारे डॉक्टर कमी किंमतीचे ठरविणें व उलट्या मताचे डॉक्टर "अधिक श्रद्धेय" ठरविणें इत्यादि गोष्टी कोणी करूं लागला म्हणजे त्याचा पुरावा बारकाईनें तपासला पाहिजे. कर्वे याच्या कामशास्त्रांतही कांहीं गोष्टी स्वच्छतेच्या वगैरे उपदेशाच्या चांगल्या आहेत. परंतु त्याचा एकंदर परिणाम तरुण अविचारी मनावर चांगला होण्यासारखा नाहीं. रोमन लोक विलासी झाले त्यायोगें त्यांची जगद्व्यापी बादशाही धुळीस मिळाली. आम्ही धुळींत पडलों आहों. त्यांत आणखी स्वैरविलासाचा "हक्क" बजावूं लागलों तर मग उन्नतीची आशा कशाला ! कर्वेचें पुस्तक वाचनांत आलें असेल तर महात्मा गांधींचें "संयम कीं स्वैराचार " हें पुस्तकही वाचा. प्रत्येक गोष्टीचा तुमच्या डोक्याला करतां येईल तितका खोल विचार करा व तो विचार करतांना हृदय, अंतःकरण, परहिताच्या भावना लक्षांत घेण्यास विसरूं नका. आनंदाची चढती श्रेणी आहे. आनंद हें सामान्य नांव अनेक दर्जाच्या सुखांना लावलें जातें. तुम्ही सध्या विद्यानंदाचे नानाप्रकार थोडे थोडे अनुभवीत आहां. प्रेमानंद— निःस्वार्थ लोकहितसाधनार्थ प्रयत्नाचा आनंदही तुम्हीं थोडाबहुत अनुभविला आहे. हे शुद्ध अवीट आनंद आहेत. चैतन्यगाथा पद्य ६२ "ब्रह्मचर्य आणि विवाह" वाचा. केशवाला सांगावें कीं भाऊ ४–५ मे पर्यंत पुण्याला येईल. चित्रावशास्त्री यांचें उपनयनसंस्काराविषयींचें पुस्तक ताबडतोब पाठवावें. ती. दादांस व आईस शिरसाष्टांग नमस्कार. चि. साळूताईस व सर्व धाकट्या मंडळीस नमस्कारपूर्वक आशीर्वाद. वडील मंडळीस सा. नमस्कार.

तात्या

२७।३।३४.

पां. म. बापट

कैदी नं. १७८३

रत्नागिरी डिस्ट्रिक्ट प्रिझन.

## पत्र ९ वें

रत्नागिरी डिस्ट्रिक्ट प्रिझन
ता. ५ जून १९३४

चि. वामन, कमल, माई यांस आशीर्वाद. कमल, तुझ्या लग्नाचा विचार तुझ्या मनांत अद्यापि आला नसेल परंतु तुला मागणी आल्याचें तुला कळलें असेलच. लग्नाचा प्रश्न तुझा तूं व वामनचा वामननें सोडविण्याचा आहे. लग्न करावें असें तुला वाटेल तेव्हां तूं लग्न करावेंस. ज्या कोणाशीं लग्न करणें तुला योग्य वाटेल त्याशीं तूं लग्न करावेंस. तूं ठरविशील ती लग्नवेळा, तूं ठरविशील तो माणूस मला पसंत आहे असें तूं समजावेंस. लग्नवेळा ठरविण्याचे बाबतींत मला वाटतें कीं मुलीनें सामान्यतः १९ ते २५ व मुलानें सामान्यतः २४ ते ३० या वयांत लग्न करावें. परंतु १९ व २४ च्या अगोदर लग्न करूंच नये असा माझा आग्रह नाहीं. व प्रत्येक मुलानें व प्रत्येक मुलीनें केव्हां तरी लग्न करावेंच असाही माझा आग्रह नाहीं. जन्मभर ब्रह्मचर्यानें राहणें व आत्मोन्नति व लोकसेवा करणें कांहीं पूर्वसुकृताच्या स्त्रियांना व पुरुषांना शक्य असतें. हें आपल्याला शक्य आहे किंवा नाहीं हें ज्याचें त्यानें आपल्या मानसिक स्थितीवरून ठरवावयाचें असतें. ही मानसिक स्थिति जोंपावेतों ब्रह्मचर्याला अनुकूल आहे तोंपावेतों ब्रह्मचर्यानें राहावें व पुढें लग्न करावें असा सामान्य नियम असावा. लग्नाचे कर्तव्यतेसंबंधानें व लग्नवेळेसंबंधानें ही गोष्ट झाली. लग्न करावें कोणाशीं यासंबंधानें इतकेंच सांगावयाचें कीं, लग्न करणाराचें आत्मोन्नतीचें व लोकसेवेचें जें ध्येय असेल त्या ध्येयाला अनुकूल अशा अनुरूप व आपल्या पसंतीच्या माणसाशीं त्यानें लग्न करावें. डॉ. केतकर व मिस् कोहन यांचें लग्न लावणाऱ्या पुरोहितांपैकीं मी एक होतों हें तुला ठाऊक आहेच. मला एक असें मात्र वाटतें कीं तुझा पति तुझ्या व वामनच्या पसंतीचा व वामनची पत्नी त्याच्या व तुझ्या पसंतीची असेल तर चांगलें. आम्हां इतरांच्या पसंतीनापसंतीविषयीं मी कांहीं म्हणत नाहीं. परंतु तुम्हीं दोघांनीं लग्नाला योग्य माणूस ठरविण्याच्या बाबतींत एकमेकांचा सल्ला व मदत घ्यावी असें मला वाटतें; पण आग्रह नाहीं. श्री.

भालचंद्रपंत आपटे यास मीं पाहिलेलें नाहीं. प्राप्ति ५० रुपये दरमहाची आहे. बेझवाडा—(आंध्र प्रांत) येथें हिंदी महाविद्यालयाचे मुख्य अध्यापक आहेत. काशी विद्यापीठ (राष्ट्रीय) येथील बी. ए. आहेत. वय २७ आहे. पाहा. तुझें तूं ठरव. शान्तीचें शांति ठरवील. पत्रोत्तरीं निकाल कळविणें. पत्र या महिन्याचे २० तारखेला पोस्टांत पडावें. आतां शिरस्त्याप्रमाणें कांहीं पद्यभाग:—

तारक—नीति (द्रुतविलंबित)

वसंत आतां चांगला बोलूं लागला आहे असें कमल तूं मला सांगितलेंस. तुला कविता करावयाची होती ना! "वसंताचे बोल" बसवीनास कुठल्या तरी साध्या वृत्तांत. अभ्यास सध्यां फारसा नाहीं. परीक्षा पास झाली असली तरी नाहीं, नसली पास झाली तरी नाहीं. परीक्षा पास झाली नसली तर उदास होऊं नकोस. "नका व्यर्थ करूं चिंता संसारीं हरि बागडे" हें घोकीत जा माझें सांगणें, उदास वाटेल तेव्हां. येईल कांहीं गुण आला तर. असो. आतां पुरे झाली माझी वेडी बडबड.

ती. दादांस व आईस शिरसाष्टांग नमस्कार. सर्व वडील मंडळींस साष्टांग नमस्कार. चि. ताईस व सर्व धाकट्या मंडळींस नमस्कारपूर्वक आशीर्वाद.

तात्या
पांडुरंग महादेव बापट
कैदी नं. १७८३

पत्र १० वें

गुरुवार, ता.२९ नोव्हेंबर १९३४

चि. कमल, वामन, माई यांस आशीर्वाद

भविष्यपुराण (अनुष्टुप्)

वामन, कमल, तुमचीं ता. १७ व १८ चीं पत्रें काल मिळालीं. ... ...या गरीबड्या पुराणाचें अतिसंक्षिप्त सार सर्वसामान्य धर्मविद्येबरोबर. एकादी दुसरी "अर्थविद्या" माझ्यासारख्या वेड्या बापाच्या (मुलांची

योग्य काळजी न घेणाऱ्या बापाच्या) मुलांनीं मुलींनीं हस्तगत करून ठेवणें बरें हें आहे. धर्मविद्या म्हणजे सामान्य शाळाकॉलेजांत मिळणारी विद्या. सामान्य शाळाकॉलेजांतील विद्या शिकणें हा मुलांमुलींचा नवयुगांतील सर्वसामान्य "धर्म" समजला जातो. म्हणून त्या विद्येला मीं धर्मविद्या म्हटलें आहे. "कामविद्या" शिकविण्याचें कर्वेपुत्रांनीं अंगावर घेतलें आहे. त्यांच्या शिकवणींतला महामूर्खपणा वगळून शेषभाग शिकावा. "मोक्षविद्या" चैतन्यगाथा, श्रीगीतासेवक, A Holy Song व अप्रकाशित बाड यांत भरपूर भरली आहे. याप्रमाणें धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे जे चार पुरुषार्थ (आपण "स्त्रीपुरुषार्थ" वा "जीवनार्थ" म्हणूं) तद्विषयक विद्यांचा विचार झाला. धर्मविषयक विद्येचा विचार नाहीं झाला असें तुम्ही म्हणाल कदाचित्, त्यास उत्तर "धर्मविद्या" हा जरी गमतीच्या दृष्टीनें वापरलेला शब्द आहे तरी ती विद्या शिकत असतां गुरुशिष्यधर्म, मित्रमित्रधर्म, मित्रामित्रधर्म, व्यक्तिसमाजधर्म इत्यादि नानाधर्मांची विद्या कळत नकळत बरीवाईट आपल्या अंगांत मुरत असते. म्हणून धर्मविषयक विद्या विचारांत घेतली गेली असें समजणें. असो. वर पुरुषार्थ शब्द आहे त्यांतील "पुरुष" याचा अर्थ "जीव" असा आहे. परंतु हें नवयुग व पुरुष हा अनेकार्थी शब्द "जागृत" स्त्रियांना राग आणण्यासारखा आहे. म्हणून "पुरुषार्थ"च्या ऐवजीं जीवार्थ, जीवनार्थ किंवा स्त्रीपुरुषार्थ असें म्हटलेलें बरें. पुरे झालें हें प्रकरण आतां. वामन, तुमच्या पत्राबरोबर श्री. गजाननराव नाईक, ग्रामसेवक, फत्तेपूर, तालुका जामनेर, जिल्हा पूर्वखानदेश यांचें ३१।१०।३४ चें कार्ड मिळालें. त्यांना ही गोष्ट कार्डानें कळव व त्यांनीं प्रकृतीविषयीं विचारलें आहे त्यांस प्रकृति नेहमींप्रमाणें उत्तम आहे असें लिही. भुस्कुटे यांस कळव कीं डिक्शनरी न पाठवणें, मला कांहीं घाई नाहीं. गोरे यांस नमस्कार कळव व जांबेचा विचार उत्तम आहे, शांत असावें, खेळ श्रीहरीचा आहे, तो सांगेल तें काम करणें व तो ठेवील तसें रहाणें यांतच टिकाऊ सुख आहे, असें लिहावें. भागवती दंतमंजनाची भली थोरली बाटली पोंचली. पेळू दोन पौंड पोंचले. मोरया किल्लेदार झाला आहे; उत्तम आहे. मोडक, देव, बाभळे, भागवत वगैरे वगैरे सर्वांस नमस्कार. ती. दादांस व आईस आणि सर्व

वडील मंडळीस शिरसाष्टांग नमस्कार. चि. साळूताईस व सर्व धाकट्या मंडळीस नमस्कारपूर्वक आशीर्वाद.

तात्या
पां. म. बापट
कैदी नं. १७८३

पत्र ११ वें

ता. २८ फेब्रुवारी १९३५ गुरुवार

चि. कमल, वामन, माई यांस आशीर्वाद. वामन, तूं नांवाच्या क्रमासंबंधांत मत दिलें नाहींस म्हणून चिठ्या टाकून क्रम ठरविला. तीनदां चिठ्या टाकल्या. दोनदां कमलचें नांव आलें.

१ भावनापुराण ( अनुष्टुभ् ) कविता
२ देवाशी वाद ( स्वागता ) ,,
३ नवश्लोकी ( अनुष्टुभ् ) ,,

वामन, डिक्शनऱ्या मिळाल्या. रशियन इंग्लिश डिक्शनरींत "प" अक्षरापैकीं आठ पानें नाहींत. "प्रझवेस्टी" नंतर एकदम "पुंक्टीर" शब्द आहे. एक अष्टपत्री फॉर्म ( नं. ३१ ) बांधणींत गळला आहे. तरी कांहीं दिवसांपुरती कोणाची डिक्शनरी मिळाल्यास वहीवर शब्द उतरून घेऊन ती परत करतां येईल पहा. घाई नाहीं. तुझी परीक्षा झाल्यावर थोडी खटपट कर. मिळाली उत्तम, न मिळाली चिंता नाहीं. कमल, वामनच्या अभ्यासाचा तूं रिपोर्ट दिला आहेस. त्याचा व्यायामही नियमानें चालू आहे असा त्याचा रिपोर्ट आहे. तुझा व्यायाम व अभ्यास त्याच्यासारखाच नियमानें चालला आहे असें मी मानतों. तूं कर्वे यांचें लिखाण वाचलें नाहींस ही चांगली गोष्ट आहे. नको वाचूंस तें निदान आणखी कांहीं दिवस. "कान्ता बिन्ताची जरूर नाहीं" ही जी विद्यार्जनाला अत्यंत अनुकूल अशी तुझ्या मनाची अवस्था, ती कर्वे लिखाणानें बिघडण्याचा संभव आहे. "धर्मविद्या" ही "अर्थविद्या" होऊं शकते हें तुझें म्हणणें

बरोबर आहे. परंतु तिच्याखेरीज आणखी एकादी दुसरी अर्थविद्या हाताशीं असणें बरें. म्हणून माझें सांगणें होतें. "वाईट गोष्ट करण्याची इच्छा झाल्यास ती न करणें " हा मोक्षविद्येचा भाग आहे. "कामविद्या" यांत "काम" शब्दाचा अर्थ कोणतीहि इच्छा असा नसून एक विशिष्ट इच्छा, ज्या इच्छेमुळें " कान्ताबिन्ताची ( किंवा कान्तेबिन्तेची ) जरूर नाहीं " ही मनाची अवस्था जाऊन अगदीं उलट अवस्था उत्पन्न होते ती इच्छा असा आहे. त्या इच्छेला "वाईट इच्छा" असें म्हणतां येत नाहीं. देवाच्या या संसारनाटकांत त्या इच्छेकडेही नेमलेलें काम आहे. आणि तें महत्त्वाचें काम आहे. देवाचा हा संसार जीवांच्या विकासाचा संसार आहे. जीव हे देवासारखेच डोळ्यांना न दिसणारे देवाच्या दुनियेंतील रहिवाशी आहेत. देवाच्या दुनियेचेही न दिसणारी व दिसणारी असे दोन भाग आहेत. आपली पृथ्वी हा दृश्य भागाचा एक अति चिमुकला विभाग आहे. या विभागांत जीवाचा विकास ज्या देहांच्या द्वारा होतो ते देह " काम " नांवाच्या आपल्या इच्छेच्या कारागिरीनें तयार होतात. जीवाला देहाबरोबर पहाण्याचें ऐकण्याचें वगैरे इंद्रियें मिळतात तसें त्यास "कामाचें" इंद्रिय मिळतें. नेत्रविद्येंत नेत्रेंद्रियाचा विचार केलेला असतो. तसा काम विद्येंत कामेंद्रियाचा विचार केलेला असतो. डॉक्टरी विद्येंत सर्वच इंद्रियांची विद्या सामान्यतः येते त्यांत कामविद्याही येते व कर्वे यांच्या लिखाणांतील डॉक्टरी विद्यात्मक भाग ठीक आहे. परंतु त्याबरोबर दुसरा कांहीं भाग आहे तो मला बरा वाटत नाहीं म्हणून कर्वे लिखाण नको वाचूंस आणखी कांहीं दिवस निदान, असें मीं म्हटलें आहे. असो. तूं लिहिलें आहेस कीं फोटोग्राफी कांहीं दिवस बंद ठेवली आहे व मे महिन्यांत माईकडे जाणें झाल्यास खूप प्रॅक्टिस करावयाचें, सध्यां परीक्षा जवळ असल्यानें अभ्यास परीक्षेचा करणें हें नडीचें काम तें टाकून फोटोग्राफींत वेळ घालविणें हें वाईट व मे महिन्यांत परिस्थिति वेगळी होईल तेव्हां फोटोग्राफीचें प्रॅक्टिस करणें चांगलें असें तुझ्या सद्विवेकानें तूं ठरविलें आहेस आणि तें बरोबर आहे. जी गोष्ट फोटोग्राफीच्या इच्छेला लागू आहे तीच आपल्या सर्व इच्छांना लागू आहे. फोटोग्राफीची इच्छा एका परिस्थितींत वाईट दुसरींत चांगली. त्याप्रमाणें कामेच्छा एका परिस्थितींत वाईट,

दुसरींत चांगली अशी गोष्ट आहे. कामेच्छा तीव्र नाहीं, कान्ता बिन्ताची ( कान्ते बिन्तेची ) जरूर नाहीं अशी मनाची स्थिति आहे तोंपावेतों लग्न करूं नये व कामेच्छा तीव्र होऊं लागली, त्या इच्छेस तिचें खाद्य न देतां थापटून शान्त करण्यासारखी देशभक्ति, ज्ञानभक्ति, सेवाभक्ति शक्तिमान झालेली नाहीं अशी स्थिति असेल तर आपल्या ध्येयाला अनुकूल अशा अनुरूप माणसाशीं लग्न करावें हा उत्तम पक्ष आहे. प्रत्येक प्रसंगीं आपला सद्विवेक उपयोगांत आणून आपल्या मनांत आलेली कोण-तीही इच्छा, कोणत्याही इंद्रियाची वा मनाची इच्छा चांगली किंवा वाईट हें ठरवावें व चांगली गोष्ट करण्याची इच्छा असल्यास ती करणें व वाईट गोष्ट करण्याची इच्छा असल्यास ती न करणें हा नियम ठेवावा. काम हा शत्रु आहे तसा मित्रही आहे. क्रोध हा शत्रु आहे तसा मित्रही आहे. लोभ, मद, मत्सर हे केवळ शत्रू आहेत. मोह हा शत्रु आहे तसा मित्रही आहे असें माझें मत आहे. मोहाचा माझा अनुभव " मुलांची मागणी " या प्रकरणांत आरंभींच मीं सांगितला आहे. "मोह माझ्या मोहनांचा हरिच्या मोहनीसम । करी दृढा दृढतरा कर्तव्यदृढता मम ॥ " हरीची मजवर मोहनी आहे. हरिप्रेम माझ्या मनांत तीव्र व गाढ आहे व हरीच्या मर्जीतून मी उतरूं नये अशी माझी तीव्र भावना आहे. ही हरीची मोहनी. तुमचा मला असलेला मोह, तुमची मजवरील मोहनी हरीच्या मोहनीप्रमाणें आहे. माझी कर्तव्यदृढता हरीच्या मोहनीमुळें जशी दृढतर होते तशी तुमच्या मोहनीनेंही दृढतर होते. म्हणून या मोहनीला, या मोहाला मी मित्र म्हणतों. जीवाच्या विकासाला मदत करणारा तो मित्र. जीवाचा विकास म्हणजे त्याच्या इंद्रियांवरची व मनावरची त्याची हुकमत वाढत जाऊन त्याचें ज्ञान व प्रेम अधिकाधिक व्यापक व कर्तृत्वशाली होणें व त्याचा अहंकार कमी होत जाऊन देवसाक्षात्कार वाढत जाणें. जीवाच्या कर्तव्याचा म्हणजे त्याच्या धर्माचा व त्याच्या विकासाचा निकट संबंध आहे. विकासानुसार धर्मांत फेर होतो. धर्मपालनानें विकासाचें पाऊल पुढें पडतें. धर्म म्हणजे जीवाचें विकासानुसारी कर्तव्य. हा "धर्म" शब्दाचा अर्थ व हिंदुधर्म मुसलमानी धर्म ख्रिस्तीधर्म इत्यादि यांतील धर्म शब्दाचा अर्थ यांत फार अंतर आहे हें लक्षांत असावें. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या

प्रत्येक शब्दाचे अनेक अर्थ आहेत. पुष्कळ शब्दांना अनेक अर्थ असतात हें तुला कोशांवरून व अनुभवांवरून कळलें असलें पाहिजे. कोणतेंही लिखाण वाचतांना अनेकार्थी शब्दांचा त्या त्या स्थळीं कोणता अर्थ घ्यावयाचा हें मागचा पुढचा संदर्भ पाहून ठरवावयाचें असतें, लेखकानें आपला अर्थ अमुक असें स्पष्ट सांगितलें नसेल तेव्हां......असो. ती. दादांस व आईस आणि सर्व वडील मंडळीस शिरसाष्टांग नमस्कार व चि. ताईस आणि सर्व धाकट्या मंडळीस नमस्कारपूर्वक आशीर्वाद

तात्या

पां. म. बापट

कैदी नं. १७८३

रत्नागिरी डिस्ट्रिक्ट प्रिझन

शुक्रवार १।३।३५

पत्र १२ वें

रत्नागिरी, बुधवार ता. १२।५।१९३५

चि. वामन, कमल माई यांस आशीर्वाद. वामन, कमल तुमचीं पत्रें आज मिळालीं. तुमच्या पत्राबरोबर आप्पांचें चराठें मुक्कामाहून आलेलें पत्र मिळालें. वामन, तुला पहिलें काम—गजाननराव नाईक ग्रामसेवक लोणी पो. फत्तेपूर ता. जामनेर जि. पूर्व खानदेश यांस कळविणें कीं "तात्यांचें तकलीचें काम नियमित चालू आहे. पेळू आप्पासाहेब पाठवीत आहेत. प्रकृति उत्तम आहे. तुमची प्रकृति "गरीब" असल्याकारणानें कोणतीही मेहनत बेतानें करण्याचें धोरण ठेवावें. म्हणजे आजारी पडणें बरेंचसें टळेल, असें तात्यांचें आग्रहाचें सांगणें आहे." दुसरें काम चराठें पो. माजगांव सं. सावंतवाडी या पत्त्यावर अप्पासाहेबांकडे लिहिणें कीं "ता. १२।५ चें तुमचें पत्र आज ता. २२ ला वामनचे पत्राबरोबर मिळालें. पेळू तुमच्याकडून पोष्टानें आले. नंतर तुमच्या बंधूंकडून आले. जुनेच तुम्हीं दिलेले पेळू येत्या सोमवारीं २७।५ पर्यंत पुरतील. एक महिन्यानें पेळू पुनः पाठविणार म्हणतां. माझें काम रोजचें किती थोडें असतें हें

तुम्हांला माहीत आहे. मला वाटतें, आहेत ते पेळू दोन महिने—आधिक जातील. वास्तविक हें पेळूचें काम तुम्ही आवश्यकता नसतां अंगावर घेतलें आहे...परंतु हें सर्व मी बोलून कांहीं उपयोग नाहीं असें वाटतें...येऊं द्या पेळू...मुलांस—चि. पुरुषोत्तम, पांडुरंग, चिंतामणि यांस आशीर्वाद. आप्पांच्या पत्रासोबत असलेलें तुमचें पत्र मिळालें. रंगनाथ घरीं गेला त्याची आई त्याची काळजी करणारी आहे. तेव्हां तो घरीं गेला हें ठीक झालें आणि तुम्ही आश्रमांत उत्तम शिक्षण मिळवून लोकसेवा चांगल्या रीतीनें करण्याची पात्रता अंगीं आणावी, या योजनेला तुमच्या वडलांनीं आपल्या कडक वागणुकीनें अप्रत्यक्ष संमति दिली आहे हेंही ठीक झालें आहे. आतां जबाबदारी तुमच्यावर व आश्रम गुरूंवर आहे. आप्पासाहेब, महाजनसाहेब, डॉ. साहेब यांसारखे गुरू पूर्वपुण्याई खेरीज मिळत नाहींत. तेव्हां तुम्ही पूर्वजन्मीं पुण्य केलेलीं मुलें आहांत यांत मला संशय नाहीं. परंतु तो जन्म संपला. आतां नवा जन्म चालू आहे. या जन्मांत कांहीं पुण्य करावयाचेंच असा निश्चय करा. "निश्चयाचें बळ, तुका म्हणे तेंचि फळ" पुण्य करण्याच्या निश्चयावांचून पुण्य होत नाहीं. पुण्य करण्याचा बळकट निश्चय असेल तर त्याला पुण्य हें फळ येईल. पुण्य म्हणजे काय? पाप म्हणजे काय? दुसऱ्याचें बरें करणें हें पुण्य, दुसऱ्याचें वाईट करणें हें पाप. अर्थात् दुसऱ्याचें बरें करण्याचें पुष्कळ सामर्थ्य ज्या शिक्षणानें येतें तें शिक्षण उत्तम. असें उत्तम शिक्षण उत्तमांच्या संगतींत सहज मिळतें. मात्र तें पदरीं पाडून घेण्याचा निश्चय पाहिजे. आप्पासाहेब वगैरे सांगतील तसें वागण्याची काळजी घ्या. आपल्या सर्व अडचणी मोकळ्या मनानें त्यांना कळवीत जा. त्यांच्यापासून लपवून ठेवावें लागेल असें काम करण्याचें टाकून द्या. तुम्हांला केव्हांही कांहीं ते विचारतील तेव्हां त्यांना खरेंखुरें काय तें सांगत चला. डॉक्टरला आपण आपल्या प्रकृतीसंबंधानें खरेंखरें सांगितलें नाहीं तर त्याला आपली प्रकृति योग्य औषध देऊन सुधारतां येणार नाहीं. जी शरीरप्रकृतीची गोष्ट तीच मनाच्या प्रकृतीची गोष्ट आहे. मनाची प्रकृति बिघडल्यानें आपल्या हातून पाप घडतें. आप्पासाहेब वगैरे मनाचे डॉक्टर आहेत. त्यांच्या डॉक्टरीचा फायदा घ्या व मनानें उत्तम व्हा—पुरें झालें. सर्व आश्रमवासी यांस नमस्कार."

वसंत, तुझें चित्र मीं पाहिलें. चित्रांत चित्रासारखा दिसतोस. तुझें काम तूं करीत आहेस ना? तुझें काम आईला त्रास देण्याचें आहे. केवळ आईलाच एकटीला नव्हे, तर घरांतील सर्व मोठ्या माणसांना भंडावून सोडणें हें तुझें काम आहे. हें मुख्य काम. दुसरें काम तुझ्या लहानग्या बहिणीला खेळविणें हें आहे. ती थोडी मोठी झाली—माती खाण्यासारखी, म्हणजे मग तिच्यावर पहारा करण्याचें काम तुझ्याकडे येईल. वामन कमलवर असा पहारा करीत होता, व कमलनें तोंडांत कोंबलेली माती काढून घेऊन तिला रडवीत होता! वामन स्वतः माती खात होता कीं नाहीं मला ठाऊक नाहीं. तूं खाल्लीस का कधीं माती? ती. दादांस व आईस आणि सर्व वडील मंडळीस शिरसाष्टांग नमस्कार. चि. साळूताईस व सर्व धाकट्या मंडळीस नमस्कारपूर्वक आशीर्वाद. वसंतास व वसंतवर्गीयांस स्पेशल नमस्कार व स्पेशल आशीर्वाद.

तात्या
पां. म. बापट
कैदी नं. १७८३

## पत्र १३ वें

रत्नागिरी डिस्ट्रिक्ट प्रिझन
ता. २२।११।३५

चि. वामन, कमल, माई यांस आशीर्वाद. वामन, कमल Glimpses of World History हें पंडित जवाहरलाल यांचें पुस्तक सोईप्रमाणें तुम्ही केव्हांही वाचालच. त्यांचीं इतर पुस्तकेंही सोईप्रमाणें केव्हांतरी वाचा. 'मुलीला पत्रें' या स्वरूपांत वरील Glimpses आहेत. 'मुलांना पत्रें' या स्वरूपांत Holy Song व इतर मजकूर जो मीं लिहिला आहे त्यांतही Glimpses आहेत पण तीं Mind History विषयक आहेत. आमच्या ऋर्षीच्या मनाचे व्यापार कसे चालत होते व माझ्या मनाचे व्यापार कसे चालत आले तें Holy Song व इतर लिखाणावरून तुम्हांस कळेल. "या अनंत विश्वाच्या पसाऱ्यांत माझें स्थान काय?" याचा प्रत्येक व्यक्तीनें—

मग ती व्यक्ति पंडितांप्रमाणें थोर असो किंवा माझ्याप्रमाणें क्षुद्र असो— विचार करणें आवश्यक आहे. पंडितांनीं याप्रमाणें विचार करून आजपर्यंत जीं अनेक थोर सत्कार्यें केलीं, त्यांत त्यांना अपत्यप्रेमासाठीं Glimpses लिहिणें या कार्याची भर टाकणें अवश्य वाटलें. त्याचप्रमाणें माझ्या क्षुद्र प्रमाणानें माझ्या क्षुद्र कार्यांत अपत्यप्रेमासाठीं Holy Song वगैरेंची भर मला टाकावी लागली. Holy Song च्या प्रास्ताविक श्लोकांत माझी Fancy माझ्या Soul, Will वगैरेंना उद्देशून म्हणत आहे कीं

My Holy song our children sweet
May love or may not love
I'll do my best, I'll leave the rest
To Heaven High above.

अशाच प्रकारचे विचार ईश्वर गाळून पंडितांच्या Glimpses मध्यें मला जागजागीं वाचावयास मिळाले.

पंडितांच्या विचारांशीं माझे विचार पुष्कळसे जुळतात— कोणाचेच विचार दुसऱ्याच्या विचारांशीं सर्वथा जुळत नसतात. हें नाटक—माझ्या दृष्टीनें—आहे. या विश्वाच्या नाटकांत विचारभेद, आचारभेद...अनंत भेद आवश्यक आहेत. नाटकाला रंग पात्रभेदाशिवाय कसा येणार ? पात्र या नात्यानें आपलें काम यथाशक्य चांगलें करावें व प्रेक्षक या नात्यानें आपलें काम यथाशक्य चांगलें करावें व प्रेक्षक या नात्यानें नाटकांतील देखावे पाहून आपल्या वृत्तींना व विचारांना योग्य वळण लावावें हा आनंदाचा व शांतीचा मार्ग आहे. मला आनंदासाठीं व शांतीसाठीं ईश्वर अति आवश्यक झाला आहे. नवे निरीश्वरवादी सृष्टि हा energy चा—शक्तीचा—कांहीं नियमाप्रमाणें होणारा संकीर्ण परिणाम आहे असें मानतात. सृष्टि स्रष्ट्याशिवाय शक्य नाहीं, शक्ति त्या स्रष्ट्याची शक्ति, नियम त्या स्रष्ट्यानें केलेले नियम, संकीर्ण परिणाम त्या स्रष्ट्यानें योजिलेला, आपल्या शक्तीनें आपण ठरविलेल्या नियमानुसार घडवून आणलेला परिणाम— अशा प्रकारें कार्याला कर्ता आहे असें मानल्याशिवाय माझ्या बुद्धीला राहवत नाहीं. घडतें इत्यादि प्रकारें आपण बोलतों परंतु जें होतें तें कोणी तरी करतो—करवितो, जें घडते तें कोणी तरी घडतो—घडवितो या

प्रकारें माझी बुद्धि चालते. 'चालते' हीच भाषा घ्या. ही अर्धवट भाषा आहे. खरी गोष्ट माझी बुद्धि अशी चालविली जाते ही आहे. कोणाकडून चालविली जाते? मजकडून? छे. ईश्वर नाहीं म्हण असें माझ्या बुद्धीला मीं म्हटल्यास ती माझें ऐकत नाहीं. तेव्हां मी तिचा चालक आहें हें मला पटत नाहीं. निरीश्वरवादी 'परिस्थितिभक्त' म्हणतात. अनेकांच्या विचारांचा माझ्या बुद्धीवर जो आघात झाला त्याचा हा परिणाम. एकदां मी निरीश्वरवादी होतों. आज ईश्वरवादी आहें--सर्व 'परिस्थितीचा परिणाम' कबूल. परिस्थिति स्थापणारा, तिच्यांत फेरफार करणारा कोण? असें हें प्रश्नचक्र लांबवर जाऊन शेवटीं माझ्या बुद्धीचा पूर्ण स्वतंत्र असा चालक स्वयंभू सृष्टिकर्ता होय असा निकाल माझी बुद्धिच मला देते. हा निकाल 'भ्रमरूप आहे.' कबूल. भ्रम घडवून आणणारा अगदीं शेवटला दुवा माझ्या बुद्धीनें देवदेवच ठरतो. नाटकांत भ्रमही पाहिजेत. श्रीतुकोबांनीं श्रीशिवरायाला पाठविलेल्या एका अभंगांत म्हटलें आहे कीं "आपुलाल्या भ्रमें राहूं आतां"... असो. वामन, मोटार उलटली हें वाचून मला तुझ्या बाळपणच्या दोन गोष्टी आठवल्या. एक तुझा डांग्या खोकला. काय भयंकर खोकला तो! आम्हांला कांहीं तुझा भरंवसा नव्हता......दुसरें, तूं नुकताच बसूं लागला होतास तेव्हां पावसकरांच्या वाड्यांत माडीवर आम्ही राहात होतों. तूं एक दिवशीं जिन्यावरून थेट वरच्या पायरीवरून खालीं गडगडत येऊन पडलास. गडगडण्याचा आवाज ऐकून आम्ही धावलों...ईश्वराला वांचविणें असेल तर तो वांचवितो इतकेंच.... माईच्या विद्येचा नगरचे लोक उपयोग करून घेत आहेत हें वाचून आनंद झाला.

ती. दादांस व आईस व वडील मंडळीस शि. सा. न. चि. साळुताईस व धाकट्या मंडळीस न. पूर्वक आशीर्वाद. वसंतास व वसंतवर्गीयांस स्पेशल नमस्कार व आशीर्वाद.

तात्या
पां. म. बापट
कैदी नं. १७८३

पत्र १४ वें

बेळगांव सेंट्रल प्रिझन

शुक्रवार, ता. २८ फेब्रुवारी १९३६

कमल, तुझें ता.१५।२ चें पत्र वामनच्या व अंतूच्या पत्रांसहित पोंचलें. सुपरिटेंडेंटसाहेब म्हणाले कीं, या वेळेला हीं तीन पत्रें मी तुम्हांला देतों. यापुढें एकच मिळेल. चोहोंकडला मजकूर एका पत्रांत घालावा. तेव्हां यापुढें असें करावयाचें. चोहोंकडला मजकूर एका पत्रांत घालावयाचें काम वामनकडे द्यावयाचें. तूं आपलें पत्र वामनकडे पाठविणें. अंतूनेंही आपलें पत्र वामनकडे पाठविणें. व वामननें स्वतःचा मजकूर संपल्यावर 'कमल-कडील मजकूर' असा आरंभ करून तुजकडील मजकूर लिहिणें व त्याप्रमाणें 'अन्तूकडील मजकूर' असा आरंभ करून त्याजकडील मजकूर लिहिणें व शेवटीं यथाशास्त्र सही करणें व तें पत्र ता. २० मे, आगस्ट इत्यादि उर-लेल्या तारखांस रवाना करणें. माझीं पत्रें मी तुजकडेच पाठवीन. तुला चोहोंकडला मजकूर उतरण्याचा त्रास न व्हावा म्हणून ही योजना सुच-विली आहे. मुख्य गोष्ट एकहातीं एक पत्र. दत्तूमामा बालोद्यानमधील काम सोडून नागपुरास गेला हें मला तुमच्या पत्रांवरून कळलें. पूर्वी कळलें नव्हतें. त्याचें नागपुरास चांगलें जमलें आहे हें वाचून आनंद झाला. तुझे Preliminary चे पेपर्स बरे गेले व केशवचे चांगले गेले म्हणजे जवळजवळ सारखेच गेले असें मी समजतों. केशवचें अक्षर परीक्ष-कांना सुलभतेनें वाचतां यावें—वाचतां येवो अशी मी माझ्या (केशवच्या नव्हे) देवापाशीं प्रार्थना करतों. माझ्या परीक्षांच्या वेळीं मला माझ्या चिडबिड अक्षरासंबंधानें मोठी काळजी असे. लहानपणींच वळणदार अक्षर सुवाच्य अक्षर लिहिण्याची संवय ज्यांनीं केली आहे त्यांनीं एक मोठा सद्गुण आपलासा केला असें आतां मला वाटतें. संस्कृत घेणारानें मातृभाषा म्हणून मराठीही घेतली पाहिजे हा पुढील वर्षापासून मॅट्रिकच्या अभ्यासक्रमांत योजिलेला बदल मला पसंत आहे. ही खरी प्रगति आहे. मोरू पुढील वर्षी डॉक्टर होणार, तुला त्याच्यासारखें डॉक्टर आयुर्वेदाचार्य होणें पसंत असेल तर मला तो अभ्यासक्रम पसंत आहे. तूं मला विचारलें होतेंस—

नव्हे विचार करावयास सांगितलें होतेंस. मॅट्रिकनंतर तूं कोणता मार्ग पसंत करावा याविषयीं खरोखर यांत कांहीं समजत नाहीं. मी मागासलेला, संसारापासून वर्षानुवर्षें दूर पडलेला माणूस. स्त्रियांचा समाजसंसाराच्या कोणकोणत्या विभागांत कसा कसा प्रवेश झालेला आहे इत्यादि गोष्टी मला मुळींच अवगत नाहींत. अशा स्थितींत वामनला मी अमुकच शीक असें सांगूं शकलों नाहीं. त्याप्रमाणें तुलाही तूं अमुक शीक असें मी सांगूं शकत नाहीं. वामन, अन्तू, तुझे मामा वगैरे यांना विचारून शेवटीं तुला सोईचें वाटेल तें मामांच्या सल्ल्यानें कर. वामनासाठीं मजकूर : वामन, तुला सुपरिंटेंडंटसाहेबांनीं माझ्या दांतासंबंधानें कळविलें आहेच. आतां माझ्या दांतासंबंधाची काळजी बिलकूल करूं नकोस. सर्व ठीक चाललें आहे. तुझ्या पत्रांतील 'ठळक गोष्टीं'चें वर्णन वाचून फार समाधान वाटलें. तुझ्यामध्यें सूक्ष्म निरीक्षणशक्ति आहे. वर्णनशैलीही साधली आहे. योग्य तयारी केल्यास तुला समाजोपयोगी लेखक होतां येईल. तुझ्या पत्राच्या शेवटीं तूं म्हणतोस कीं तुझें पूर्वीचें 'इतर वाचन' व नवीन यांत अंतर आहे. नुसत्या मनोरंजनाकडे पूर्वी अधिक प्रवृत्ति होती. आतां सुरू केलेल्या वाचनाचा विवक्षित हेतु आहे. डोळ्यापुढें विशेष दृष्टि ठेवून वाचतो त्यास, पूर्वीची प्रवृत्ति होती ती त्या वेळीं अगदीं योग्य होती. व आतांची वृत्ति या वेळीं योग्य आहे. मनाचें रंजन ही एक फार महत्त्वाची गोष्ट आहे. सासारिक खटपटींनीं कटकटींनीं रंजीस आलेल्या बालमनाचे, तरुण मनाचे वा वृद्ध मनाचे सुनीति-सुंदर गोष्टींनीं घटकाभर रंजन करून त्याला संसारांतील अपरिहार्य कटकटींशीं टक्कर देण्याचा उत्साह पुनरपि आणून देणें हें समाजोपयोगी लेखनाचें एक ध्येय आहे व असावें. तूं डंगी बोटिंगमध्यें तीन प्रकारचें प्रावीण्य मिळविलेंस हें वाचून मला माझ्या डेक्कन कॉलेजांतील दिवसांची आठवण झाली. मी बोटिंगमध्यें प्रवीण बिवीण नव्हतों परंतु मला बोटिंगचा नाद बहुत होता. एकदां आमच्या जिमखान्याचे बोटिंगविषयक कांहीं नियम मीं बाजूस ठेवले म्हणून मला जिमखान्यांतून दोन दिवस rusticate केलें होतें. पुढें गंमत अशी झाली कीं, जे नियम पुढें करून मला rusticate केलें होतें ते नियम जिमखान्याची Special meeting बोलावून रद्द करून घेण्यांत मला यश आलें. याच्याही पुढची गंमत ही कीं मी बी. ए. झाल्यावर

सहज कॉलेजमध्यें एकदां गेलों होतों. त्या दिवशीं जिमखान्याची सभा होती. मी सभेंत जाऊन बसलों आणि पाहिलें काय–रद्द केलेले नियम पास करावे असा प्रस्ताव पुढें होता, व तो पास झाला ! तुझ्या Fancy dress competition च्या वर्णनांतील एक शब्द मला लागला नाहीं, किंवा कळला नाहीं. जातां जातां हेंही सांगणें योग्य आहे कीं competition शब्दाचें स्पेलिंग चुकलेलें दिसतें. स्पेलिंगकडे लक्ष पुरवणें योग्य आहे U. T. C. कँपिंगच्या वर्णनांत battalion, sergeant, vegetarian, parade, bayonet हे शब्द चुकलेले आहेत. U. T. C. मध्यें C म्हणजे course कीं corps ? Corps असावें असें मला वाटतें. देवाविषयीं लिहितांना Mechanics हा शब्द चुकीचा लिहिला आहे. साधेल तितकें लेखन निर्दोष असावें. स्पेलिंग माझेंही केव्हां केव्हां चुकतें. उदाहरणार्थ autonomy हा शब्द मी पुष्कळ दिवस–माझें पहिलें Pamphlet ( १९०६ ) लिहीपर्यंत चुकीचा लिहीत होतों. Draughtsman दासचें म्हणून "I wish that your superdinner game everything must be machine drawing" हें जें वाक्य तूं लिहिलें आहेस त्यांत must माझ्या इंग्रजीप्रमाणें बरोबर नाहीं. I wish that तरी काढून टाकावें किंवा ते तीन शब्द ठेवले तर must च्या जागीं would, could असा कांहीं शब्द असावा. तुला machine drawing चें दासांइतकें महत्त्व न वाटलें तर न वाटो. परंतु engineer ला तें फार महत्त्वाचें आहे, हें तूं लक्षांत ठेवशील तर बरें. कोणत्याही विषयाच्या कोणत्याही भागाकडे आतां दुर्लक्ष करूं नकोस. जी गोष्ट मला माझ्या वेडामुळें साधली नाहीं ती तुला यथाशक्य परिपूर्णतेनें सिद्ध करावयाची आहे. तुला निष्णात engineer व्हावयाचें आहे. या नव्या जगांत मनुष्यस्वभावाच्या अत्यंत महत्त्वाच्या घटकांत निष्णात engineer माणसांची गणना आहे. तूं engineer होणार म्हणून कमलनेंही आयुर्वेदाचार्य म्हणजे engineer of the human body व्हावें व तूं Diseases of the machineचा वस्ताद चिकित्सक होशील त्याप्रमाणें तिनेंही Diseases of the human machine चें निष्णात चिकित्सक व्हावें अशी मला कल्पना आली. परंतु ही सर्व माझ्या कल्पनेची गंमत. कमलला सोईचें वाटेल तें तिनें करावें.

अंतूसाठीं मजकूर : अंतू, तुझें कँपिंगचें वर्णन वाचून मला आमच्या १९०६ मधील कँपिंगची आठवण झाली. इतर लष्करी क्रियांबरोबर आम्हांला एक आठ दिवसांचा मार्च होता. मीं मार्च संपवून घरीं आल्यावर स्नान करून जो सायंकाळीं ६ ला निजलों तो दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं ४ कीं ५ ला उठलों. निशाणबाजीचें शिक्षण तुमच्या ट्रेनिंगमध्यें फारसें नसतें याचें कारण रायफलची निशाणबाजी फारशी अवघड नसते हें असेल. तुझी शारीरिक खेळांतील निपुणता प्रशंसनीय आहे. शारीरशास्त्र तूं शिकत आहेस त्यांतही तुला वरच्या दर्जाचें नैपुण्य प्राप्त होवो. तूं walking sleeper लिहिलें आहेस. तूं walking sleeper हवें. कमल, तुजकडे रत्नागिरीहून वही नं. ६ रजिस्टरनें पाठविली ती तुला पोंचलीच असेल. आतां वही नं. ७ मधील कांहीं पद्यभाग नेहमींच्या रिवाजाप्रमाणें येथें उतरतों.

A Noble Pair

Life

ती. दादांस, आईस, सर्व वडील मंडळीस शिरसाष्टांग नमस्कार. चि. साळूताईस, सर्व धाकट्या मंडळीस नमस्कारपूर्वक आशीर्वाद. वसंतास, मालतीस, सर्व लहान मुलांस, तुला व माईला, वामनला व अंतूला आणखी वेगवेगळे नमस्कारपूर्वक आशीर्वाद.

तात्या

पांडुरंग महादेव बापट

कैदी नं. १४२३९

पत्र १५ वें

बेळगांव सेंट्रल जेल

Thursday, २।६।३६

*Duty*

कमल, तूं सिक्युरिटी प्रेस पाहावयास गेली होतीस तेव्हां तेथील शिपाई तुम्हांस कांहीं माहिती सांगत होता. त्यांतलें तुला-तुम्हांला कांहींच समजलें नाहीं असें तूं म्हणतेस. तुला त्या शिपायाचा रागही आला. त्या शिपायाला

हें समजलें तर त्याला किती वाईट वाटेल ! तो विचारा आपल्या प्रेसच्या परंपरागत परिभाषेंत तुम्हा पाहुण्यांचें मनोरंजन व्हावें व तुम्हांला महत्त्वाचें नवीन ज्ञान व्हावें म्हणून भारदस्त भाषण त्याच्या कल्पनेप्रमाणें करीत होता. आणि त्या भाषणाचा त्याच्या श्रोतृवृंदावर परिणाम काय तर—तूं वर्णिलेला ! यांत दोषी कोण ? तुम्हांला कांहीं समजूं नये, तुला राग यावा अशी त्याची इच्छा असावी का ? नसावी असेंच मला वाटतें. श्रोतृवृंदाला समजेल असेंच वक्त्यानें बोलावें हा नियम दिसतो सरळ, आणि हा नियम शिपायानें पाळला नाहीं म्हणून त्याचा राग येणें हेंही सरळ दिसतें.—पण हें दिसणें प्रथमदर्शनींचें. थोडा खोल विचार केला कीं वरील नियम पाळावयास सोपा नाहीं. ही गोष्ट लक्षांत येईल. पट्टीचे वक्ते देखील येथें घसरतात. मग प्रेसचा पट्टेवाला घसरला तर त्यांत काय नवल ? तेव्हां सदरहु शिपायाला दोष देऊं नये असें मला वाटतें. परंतु त्याला दोष द्यावयाचा नाहीं, अर्थात् तो तुमचा तुम्हांला —तुला द्यावयाचा असा मात्र अर्थ नाहीं. ज्ञानाची तीव्र आकांक्षा ही प्रशंसनीय आहे, आणि या तीव्र आकांक्षेचा हिरमोड होणें हें राग येण्यास योग्य कारण आहे. एवढेंच कीं हा राग वरीलप्रमाणें विचार करून दूर केला पाहिजे. आणि तूं याप्रमाणें तो दूर केला आहेस असें मी धरून चालतों. प्रेसचा कांहीं भाग दाखवितात, कांहीं दाखवीत नाहींत, असें तूं लिहिलेंस. हें न दाखविणें योग्य कीं अयोग्य ? हरिजनांना हरिमंदिरांत प्रवेश करूं न देणें योग्य कीं अयोग्य ? अयोग्य असें दोन्ही प्रश्नांना माझें उत्तर आहे. पण योग्य असें उत्तर देणारे थोडे का आहेत ?

स्वार्थी अत्यंत अनासक्ति
सर्वभूतहितीं अत्यंत आसक्ति
ईश्वरचरणीं अत्यंत प्रीति
ही जीवात्मस्थिति परम शांतीची ॥

गीताहृदयांतील या ओवींत जी अनासक्तियुक्त आसक्ति सांगितली आहे त्या आसक्तीच्या दृष्टीनें वरील दोन्ही प्रश्नांना अयोग्य असें माझें उत्तर आहे. असो. "पास झालें तर आयुर्विद्याविशारद होण्यासाठीं मोरूच्या शाळेंत जाण्याचें म्हणतें आहे" असें तूं लिहिलें आहेस. हें पाहा, परवां तुम्ही भेटून

गेलांत तेव्हांपासून तुमच्या दोघांच्या पुढच्या शिक्षणासंबंधीं मीं पुनः विचार केला.

देहशक्ति मनशक्ति धनशक्ति जशी असे
शिकणें करणें तैसें मी तुम्हां सांगुं तें कसे!

'मुलांची मागणी' या प्रकरणांतील वरील ओळी घोळीतच शक्य तेवढा बारकाईनें विचार केला. व त्याचा फलितार्थ तुझ्या संबंधांत, शक्य असल्यास तूं आ. वि. वि.च व्हावेंस असा आला. वामनसाठीं मजकूर– वामन, B. Sc. कीं Engineering पुढें चालूं हें कोडें तुला पडलें आहे. 'मला कांहीं ठरवतां येत नाहीं' असें तूं लिहितोस. यासंबंधानें मीं जो बारकाईनें विचार केला त्यांतून असें निघालें कीं, Engineering पुढें चालू ठेवणेंच तुला श्रेयस्कर होईल. फर्स्टक्लास B.Sc. होण्यापेक्षां अगदीं सामान्य Mechanical-Electrical Engineer होऊन हिंदु युनिव्हर्सिटींतून बाहेर पडणें तुझ्या ध्येयाच्या दृष्टीनें तुला अधिक फायद्याचें होईल असें मला वाटतें. तूं अजून लहान आहेस. ज्या वादांचा अभ्यास तुला आवडूं लागला आहे ते वाद अभ्यासाई आहेत. आर्थिक प्रश्न तूं अत्यंत महत्त्वाचा समजतोस तेंही ठीक आहे. परंतु या सर्व आवडत्या गोष्टींचा गाढ अभ्यास करण्याची तुझी योजना ३/४ वर्षे अंशतः तूं बाजूला ठेवलीस व सुरू केलेला Engineering course पुरा केलास तर तें सर्वथा हितकर होईल असें माझें मत आहे. Machine Drawing, Practical Geometry, Heat Engines या पेपर्सखेरीज बाकीचे चांगले गेले आहेत व पास होण्याची तुला आशा आहे. माझें म्हणणें तूं या वर्षी नापास झालास तरी 'इतर वाचन' बाजूला ठेवून सर्व लक्ष अंगीकृत अभ्यासक्रमांत लावून पुढें शेवटपर्यंत आपलें नापास होणें टळेल अशी तुला उमेद असली तर तूं आपला कोर्स सोडूं नयेस. हें श्रमयुग आहे हें तूं विसरूं नकोस. Engineer या नात्यानें श्रमजीवी संकटग्रस्तांशीं तुझा जिव्हाळ्याचा संबंध येईल व आर्थिक प्रश्नांचें ह्द्गत तुला चांगलें उमजेल. Engineer + इष्टवादविशारद असा तूं हो. या योगानें तुझ्या शब्दांना व कृतींना समाजांत विशेष वजन येईल. मी Engineering course दोन वर्षे त्यांत खर्चून सोडून दिला तो केवळ अगतिकत्वामुळें. माझ्यासारखा तूं अगतिक झाला आहेस

असें मला वाटत नाहीं. Bombay University च्या सेनेटनें माझ्या १९०५ डिसेंबरमधील एडिंबरोंतील व्याख्यानासंबंधानें मला जाब विचारला तेव्हां मीं पडतें घेतलें असतें तर course मला पुरा करतां आला असता. परंतु असें पडतें घेणें मला माझ्या व्रताप्रमाणें शक्य नव्हतें. व्याख्यान देणेंच कां टाळलें नाहीं ? टाळणें अशक्य झालें म्हणून. असो. माझा कोर्स मीं पुरा केला नाहीं तो अगतिकत्वामुळें हें तुला पटत नसेल तर मला दोषी समज. परंतु माझ्या दोषाचें अनुकरण करूं नकोस. 'इतर वाचन' बाजूला ठेवूनही Engineering course यशस्वितेनें पुरा करणें मला शक्य नाहीं, Drawing वगैरे गोष्टी मला नापास करतील, अशी तुला सप्रमाण भीति वाटत असेल तर मात्र कोर्स सोडून दे.

सार संसाराचे पर-उपकार
त्यावीण असार सर्व कांहीं.

या सारासारविषयक विचाराला धरून तूं आपला कोर्स पुढें चालू ठेवावास, व कमलनें आ. वि. वि.चा कोर्स घ्यावा असें मला वाटलें व त्याप्रमाणें मीं लिहिलें आहे. आयुर्विद्याविशारद कमल व इंजिनिअर वामन यांना संसार-सार परोपकार, लोकसेवा–जितकी साधेल तितकी B.Sc. वामन व कमल यांना साधणार नाहीं असें मला वाटतें. असो. मला वाटतें तें मीं संक्षेपतः कळविलें आहे. आतां मुख्य गोष्ट सांगावयाची ती ही कीं या माझ्या विचारांचें तुम्हीं आपल्या मनावर दडपण पडूं देऊं नये. तुम्ही आपल्या मानसिक स्थितीचा विचार करा, मामांचें मत घ्या आणखी कोणाचें मत घेणें असेल तें घ्या आणि ठरवा योग्य वाटेल तें. तें जें तुम्ही ठरवाल त्याला माझी पूर्ण संमति आहे.

ती. दादांस व आई व सर्व वडील मंडळी यांस शि. सा. नमस्कार. चि. साळूताई व सर्व धाकटी मंडळी यांस नमस्कारपूर्वक आशीर्वाद. तूं व माई, वामन व अंतू, वसंत व माली यांस आणखी वेगळे नमस्कारपूर्वक आशीर्वाद.

तात्या
पां. म. बापट
कैदी नं. १४२३९

पत्र १६ वें

बेळगांव सें. प्रिझन

ता. २३।११।३८

वामन,

माझें ५ वें वर्ष आज संपतें ... गेल्या भेटीच्या वेळीं प्रि. भीमबाबूंच्या परीक्षांविषयक योजनेचा विषय निघाला होता. मासिक परीक्षा निरुपयोगी, मुलें कॉपी करून उत्तरें लिहितात, पेपर तपासून मिळत नाहींत–म्हणून, असा तुझा पक्ष. आतां असें पाहा. वरील दोन्ही गोष्टी बऱ्या नाहींत. परंतु या वाईट गोष्टी घडाव्या अशी भीमबाबूंची इच्छा नसावी, असें मला वाटतें. शिवाय या घडत असल्या तरीही ज्या मुलांना वरील योजनेचा फायदा घेऊन आपली तयारी महिन्याच्या महिन्यास तपासून पाहावयाची असेल, त्यांना तसें करतां येणार आहे. अशीं मुलें थोडीं असलीं तरी तींच सामान्यतः मदतीला विशेष लायक समजलीं जावीं हें कांहीं मला वावगें दिसत नाहीं. कॉपी करणाऱ्या मुलांनाही थोडाबहुत फायदा आहे. परीक्षेंत शेवटीं कोणत्या प्रकारचे प्रश्न येणार, त्यांचीं उत्तरें सामान्यतः कशीं लिहावयाचीं हें तरी त्यांना कळतेंच कळतें मासिक परीक्षांमुळें. असो. ... भेटीच्या वेळीं मी तुम्हांला सांगितलें कीं कितीही मोठा माणूस असला तरी त्याला निर्दोष समजूं नये व त्याबरोबर हेंही सांगितलें कीं, कितीही दोषपूर्ण दिसला तरी त्यांत कांहीं गुण असतो. विद्यार्थी या नात्यानें या दुसऱ्या सांगणीकडे विशेष लक्ष देऊन तूं आपल्या कॉलेजांतील अध्यापकांचा जेवढा फायदा घेतां येईल तेवढा घे. सावंतवाडी मुलांसाठीं ... 'चैतन्यगाथा' या पुस्तकाची एक एक प्रत तुम्हा तिघांस नित्यभेट म्हणून देण्यास अप्पासाहेब यांस विनविलें होतें. त्या पुस्तकांत 'मुलांस बोध' या छोट्या प्रकरणांत मी तुमच्याशीं गोष्टी करीत आहें असें समजा. त्या पुस्तकांत तुम्हांस कोणाच्या मदतीवांचून कळेल असा बराच भाग आहे. तीच माझी तुमच्यासमोर नित्याची वडबड समजा. या बडबडींतून तुम्हांला बरें वाटेल

तें तुमचेंसें करा. बरें न वाटेल तो माझा मूर्खपणा म्हणून बाजूला टाका. सर्वांस नमस्कार. पत्रसमाप्ति. ...

तात्या
पां. म. बापट
बे. सें. प्रिझन. कैदी नं. १४२३९, बेळगांव.

पत्र १७ वें

बेळगांव सेंट्रल प्रिझन
शनिवार, ता. २७ फेब्रुवारी १९३७

वामन, अजिंठा ट्रिपसंबंधानें तुझें म्हणणें अगदीं योग्य आहे. कवि किंवा इतिहाससंशोधक यास लेण्यांसारखीं स्थळें पाहून जें भरतें येणें साहजिक आहे तें माझ्यातुझ्यासारख्या सामान्य माणसास येणें केवळ अशक्य आहे व आपणासारख्यांची यासंबंधाची मौज म्हणजे पायपिटींत वगैरे.

कमलसाठीं मजकूर. तूं Arts course घ्यावास असें मी तुला सांगूं शकत नाहीं. असें पाहा. तूं Bennet चें पुस्तक घेऊन त्यांत Factory life, Child labour याविषयीं वाचलें आहेस. तूं श्रमयुगांत जन्मली आहेस आणि युगानुसार व योगानुसार (बुद्धियोगानुसार) शिक्षण घेतल्यास तें सार्वत्रिक हिताच्या दृष्टीनें विशेष लाभदायक होतें असें आहे. तुझा बुद्धियोग म्हणजे तुझें अंतःकरण स्वभावतःच कोमल व कष्टीदुःखी माणसांसाठीं कळवळणारें आहे. असें असल्यानें व हें श्रमयुग असल्यानें किसान—मजूर—मंडळींच्या बायकामुलांचे दुःखकष्ट थोड्या अंशांनीं कां होईना कमी करण्याची लायकी तुजमध्यें आणून देईल अशी आयुर्वेदविद्या तूं शिकावीस असें मीं तुजला सुचविलें व आजही सुचवीत आहें. अन्तूची डॉक्टरी व मोरूची वैद्यकी यांत अंतर आहे. व मी तुला मोरूप्रमाणें आयुर्वेदविद्याविशारद होण्यास सांगत आहें. तुझ्या स्वतःच्या स्वतंत्र चरितार्थाच्या दृष्टीनें तुला मॅट्रिक टाइपराइटिंग झालेलें शिक्षण पुरेसें आहे. २५।३० रु. तूं मिळवूं शिकशील. अधिक शिक्षणाचा विचार लोकार्थदृष्टीनें करणें योग्य आहे. आणि त्या दृष्टीनें तुझ्या बाबतींत मला आयुर्वेदविद्या 'Arts' विद्येपेक्षां बरी वाटते. पण माझा आग्रह नाहीं. केवळ Hard-work, Light-work

च्या दृष्टीनें बोलावयाचें झाल्यास तूं Hard-work करावेंस असें मी म्हणेन. तरुण वयांत Hard-work ला भ्यावयाचें तर पुढें काय करावयाचें? आणि अन्तूची डॉक्टरी, मोरूची वैद्यकी तुला Hard-work ला लायक करूं शकेल. त्यांच्या मनांत आलें तर मोरू तुला सर्व तऱ्हेची मदत करूं शकेल. मला वाटतें, माईच्या शांताबाईसारख्या डॉक्टरणी बऱ्याच आहेत परंतु वैद्यकी करणाऱ्या स्त्रिया असल्याचें मीं ऐकलें नाहीं. मोरूच्या शाळेंत वैद्यकाचें व नव्या डॉक्टरीचें चांगलें मिश्रण आहे असें समजतें. म्हणून मीं तुला वरील सूचना केली आहे.........."तुम्ही सुटून आल्यावर आपण पुण्याला राहूं" वगैरे तुझे गोड विचार वाचून माझें हृदय भरून आलें. डोळे डबडबले.

आतांही तीच स्थिति झाली आहे. कमल, आपलें म्हणजे बापटभावें कुटुंब केवढें मोठें आहे. या एवढ्या मोठ्या कुटुंबांतून एक वेडा पीर म्हणजे फार नाहीं. देवकार्याच्या दृष्टीनें देवकार्य म्हणजे हें अद्‌भुत विश्वनाटक—या नाटकाच्या दृष्टीनें, तें उठावदार होण्याच्या दृष्टीनें, नानाविध पात्रांची आवश्यकता आहे. आपण सर्व या नाटकांतील पात्रें आहों. पात्रांत कांहीं मजसारख्या वेड्यांचीही जरूर आहे. ही जरूर मला भासते. फार तीव्रतेनें भासते म्हणून मी आपलें वेडेपण टाकूं शकत नाहीं. मी तुझ्याएवढा होतों तेव्हां मला देवकार्य समजत देखील नव्हतें. माझ्या डोळ्यांपुढें कसलेंही ध्येय नव्हतें. मॅट्रिकला बसलों. पास होईन अशी खात्री वाटेना. मोठे मामा (वासुदेव गोरे याचे वडील) तेव्हां पारनेरास मामलेदाराचे अवल कारकून होते. ते म्हणाले, कसें काय पांडू, आतां काय करणार? मीं म्हटलें, काय करणार? तुम्ही सांगाल तसें करीन—त्यांनीं सांगितल्याप्रमाणें मामलेदार कचेरींत एका ठिकाणीं जाऊन बसलों—व मामलेदारांच्या एका खटल्यांतील निवाड्याची नक्कल केली. १८४ मिळाले. पुढें कारकुनीसाठीं अर्ज करणार होतों—तों रिझल्ट आला. संस्कृतची दुसरी स्कॉलरशिप. सर्वच योजना बदलली. गेलों कॉलेजांत. तेथेंही दोन वर्षें ध्येय नव्हतें. टेनिस, बोटिंग, गप्पा, थोडासा अभ्यास—असे दिवस घालविले. पुढें एक दिवस उगवला. त्याचें वर्णन 'माझी प्यारी' या चैतन्यगाथेंतील पद्यांत आहे. त्या दिवशीं आज हृदय भरून आलें आहे तसें भरून आलें होतें. डोळे

डबडबून राहिले नाहींत. मोकळेपणानें रुदन केलें. तो ध्येयप्राप्तीचा मंगल दिवस. ... आतां पाहा, तुमच्यामाझ्यांत किती अंतर आहे. तुम्ही किती पुण्यवान् आहां—तुम्हांला दोघांनाही लहानपणींच 'ध्येय' 'देवकार्य' समजूं लागलें. एवढेंच नव्हे तर त्या ध्येयानुसार तुमच्याकडून शक्य तेवढें आचरणही घडत आलें आहे व तें तसेंच पुढेंही घडत राहील असा मला भरवसा आहे. ज्या परीनें कोणालाही देवकार्य समजेल त्या परीनें तें कार्य करावें हें योग्य व हेंच योग्य. माझ्या परीनें मी देवकार्य करीत आहें. ही माझी 'पर' वेडेपणाची आहे हें मला कबूल आहे. परंतु असला वेडेपणा नाटकाच्या सूत्रधाराला असंमत आहे अशी माझी कोणी समजूत घालूं शकत नाहीं तोंपावेतों मला तो कसा टाकतां येईल ! कमल, तुझ्या मनांत आहे त्याप्रमाणें माझ्याही मनांत मी सुटल्यावर पुण्यास रहावें—इकडे तिकडे कोठें भटकूं नये—असें आहे. पण भटकणें बंद ठेवतां आलें तरी... यद् धात्रा निजभालपट्टलिखितं तन्मार्जितुं कः क्षमः ? विधात्यानें जें माझ्या पट्ट्यावर लिहिलें आहे तें पुसावयाचें कोणीं ? मला तें सामर्थ्य नाहीं. माझ्या कल्पनेप्रमाणें माझ्या अगण्य गुरूंपैकीं विशेष आवडीचे गुरु ज्ञानेश्वर, तुकाराम, रामतीर्थ यांच्या अवतारसमाप्तीप्रमाणें माझी समाप्ति व्हावी असें 'भालपट्टलिखित' आहे. माझ्या कल्पनेप्रमाणें असें आहे. विधात्याचा विधाता श्रीहरि यांची योजना निराळी असेल. कमल, वामन, 'मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः' 'मन एव मनुष्याणां कारणं सुखदुःखयोः'. सर्व मनाचा खेळ आहे. कल्पनेचा खेळ आहे. सध्या असें धरून चालूं या कीं माझ्या सुटकेपासून एक वर्षाच्या आंत माझा हा जन्म संपणार आहे. व तो स्वखुषीनें, शांतीनें, धट्टेकट्टेपणीं संपणार आहे. आणि तो देवकार्यार्थ संपणार आहे. आणि तो जलसमाधीनें संपणार आहे. असें धरून चालूं. जलसमाधि बरी कीं जेलसमाधि बरी ? मला वाटतें तुम्हीं याचा विचार केला तर माझी देवकार्यार्थ जलसमाधि देवकार्यार्थ जेलसमाधीपेक्षां बरी ठरवाल. जेलसमाधींत मी असून नसल्यासारखा असणार. जलसमाधीनें या देहाची वाट लागून देवकार्यार्थ दुसरा देह मिळेल. किंवा कांहीं सज्जनांच्या मताप्रमाणें दुसरा जन्म वगैरे कांहीं नसलें तर माझें नाटकांतील कार्य कायमचें आटोपेल. दुनियेच्या बऱ्यासाठीं दुनियेला कायमचा राम-

राम स्वखुषीनें ठोकण्याची बऱ्याच जणांची तयारी असेल तरच दुनियेचें बरें होत जातें असा दुनियेचा अनुभव व दुनियेचा इतिहास सांगतो. माझ्या जेलसमाधीपेक्षां माझ्या जलसमाधीनें दुनियेचें अधिक बरें होण्याचा संभव आहे असें तुम्हांला विचाराअंतीं दिसून येईल. व तुमच्या मनाला खोल व व्यापक विचारानें ही गोष्ट पटली म्हणजे तुमचें दुःख कमी होईल. असें पाहा. बुआ १९१९ सालीं मे महिन्यांत कॉलऱ्यानें एकाएकीं वारला—अगदीं एकटा. वहिनी व सर्व मुलें (सुशी एक महिन्याची) संगमनेरास, तो जामखेडास ! वहिनीवर व मुलांवर केवढा वज्रपात ! असे नाना तऱ्हेचे मरणप्रसंग डोळ्यांसमोर आणा व त्यांच्याशीं माझ्या योजनेची तुलना करा म्हणजे तुमच्या मनाला पुष्कळ समाधान वाटेल. माझी योजना देव पास करीलच असें नाहीं. तो अद्‌भुत सूत्रधार आहे. तो पात्राला आज हें, उद्यां तें कर म्हणून सांगतो. आजचें हें करूं देतो, उद्यांचें तें करूं देत नाहीं. मी त्या सूत्रधारावर अत्यंत प्रेम करणारांपैकीं एक आहें. त्यानें कांहींही केलें तरी मला बरोबर वाटतें. क्षणभर घटकाभर 'हें बरोबर देव नाहीं करीत' अशी ऊर्मि उठते. परंतु थोडया विचारानें ही ऊर्मि नाहींशी होऊन 'हें बरोबर आहे, हें बरोबर असलें पाहिजे' असा विश्वास दृढ होतो. 'भावभेट' प्रकरणांत

ही सृष्टि सुंदर विहारि-हरी-विहार
सच्चित्सुखीं सुखमयी चितिचा चितार
आद्याद्वितीय कविकाव्यकलाविलास
रासैकसक्त-रसभक्त-रसात्मरास

हा जो माझा भाव 'मुरलिधरपायिं' मीं भेट म्हणून वाहिलेला आहे, तो माझा स्थायीभाव आहे. खोल व व्यापक विचारानें आकाराला आलेला भाव आहे. माझ्या कित्येक योजना या विहारी हरीनें आपणच मला सूचवून आपणच नापास केल्या तरी मला त्याचा राग येत नाहीं. कारण खेळ त्याचा. त्याला वाटेल त्या रीतीनें स्वतःचा खेळ खेळण्याचा पूर्ण हक्क आहे. आपण आपलें काम नीट करण्याचा यत्न करावा व बाकी त्याजवर सोंपवावें हाच मार्ग खरा. हाच 'कर्मण्येवाधिकारस्ते' यांत प्रतिपादिलेला आहे. हाच 'नानुशोचितुमर्हति' मृत वा मरणोन्मुख प्रियजनां-

बद्दल शोक करणें गैर. शोक करणें गैर असें सांगणाऱ्या श्लोकांत प्रतिपादिलेला आहे. हा मार्ग मला पटलेला आहे. आणि यशोधनरागरंग प्रकरणाचा शेवट

देवा खेळे खेळ तुझिये आवडी
न जाईन रडी कांहीं केल्या

या शब्दांनीं जो मीं केला आहे तो औपचारिक नव्हे तर विवेकनिश्चयात्मक आहे. कमल, 'देवबिव कांहीं नाहीं' या वर्गात तूं पडली नसलीस तर या वरील ओळी तूं आपल्याशा कर. वामन, तुलाही माझें हेंच सांगणें आहे. आणि देवबिव कांहीं नाहीं असें तुम्हांला वाटूं लागलें असलें, सृष्टि ही एक Self-acting machine आहे, 'स्वतःप्रवृत्त यंत्र' आहे असें कांहीं सज्जनांप्रमाणें तुमचें मन तुम्हांला सांगूं लागलें असलें तर 'स्वतःप्रवृत्त यंत्र' या कल्पनेचा खूप विचार करा. मीं जो विचार केला त्यांत मला या कल्पनेंत तर्कबुद्धीला समाधानकारक असा अर्थ दिसून आला नाहीं. 'कोणतेंही यंत्र स्वतःप्रवृत्त' नसतें. यंत्र स्वतःप्रवृत्त ही केवळ 'कविता' आहे. यंत्राला यंत्रीशिवाय प्रवृत्ति तर राहोच परंतु अस्तित्व देखील असूं शकत नाहीं. असो. देवाच्या अद्भुत खेळांत 'देवबिव कांहीं नाहीं' असें खेळाडू असणें हा एक भाग आहे. मला त्याचें कांहीं इतर भागापेक्षां विशेष कौतुक वाटत नाहीं. सर्वच भाग अद्भुत, सर्वच सारखे कौतुकास्पद वाटतात. आतां थोडा पद्यभाग.

*Reading*

ती. दादांस व आईस शिरसाष्टांग नमस्कार.

तात्या

**पां. मा. बापट**

कैदी नं. १४२३९ ये. सें. प्रिझन, २८।२।३७.

— —

# रत्नागिरी तुरुंगांतील स्फुट कविता

## १ सर्व ठीक (अनुष्टुप्)

सर्व सर्व हरी एक
म्हणुनी भवजीवन
सर्व ठीक म्हणों येतें
सर्वांचें सर्वदा सदा
साधुत्विं तेंवि दुष्टत्वीं
स्वर्गीत नरकीं तसा
क्रमुनी मार्ग सर्वांसी
सर्वाभीष्ट मिळे पद

× ×

मिळे अनंत आनंद
श्रेष्ठ श्रेष्ठ रसोत्तम
अगाध शांतीनें पूर्ण
पूर्ण जो भरला असे

× ×

अगाध शांतिशीलात्मा
पराकाष्ठा परार्थचि
श्रमूनिया शेष सर्व
सर्वेशावरि सोंपवीं
जाणे तो प्रेम हरिचें
अतिव्यापक सर्वथा
श्रमुनी सर्वजीवार्थ
सर्वां सद्गति देतसे

## २ दुःखाचें स्वागत (ओवी)

दुःखा ! सत्सुखाच्या दैवता। मी करीं तुझिया स्वागता ।
आम्हां जीवांसी रोगार्ता । ये नीरोगता तुजयोगें १
तूं उत्साही आणि कुशल । रोग हटवीसी प्रबल ।
येतां नीरोगतेचें बल । मुद्रा मंगल हरी करी २
मुद्रा होता आम्हांवरी । आनंदें डोलों अंतरीं ।
आनंद घरीं आनंद दारीं । करूं सौदागिरी आनंदाची ३

× × ×

'या जीवाचा रोग गेला । हा स्वकार्यक्षम जाहला ।
'म्हणोनी यासी मुक्त केला' । ऐसी मंगला हरि-मुद्रा ४
जीवाचा रोग असे भूक । शारीरिक मानसिक ।

निजरूप त्याचें प्रेम एक । भुकेनें शोक होत तया ५
तनुमन क्षुधाहीन प्रेम । तें आमुचें आरोग्य आराम ।
आम्हां लाभतें उत्तमोत्तम । तव निष्काम व्यवहारें ६
बद्ध जीवांसी संसारीं । तुझी शृंखला मुक्त करी ।
ऐसी अलौकिक चातुरी । देखोनि करी स्वागत ७

## ३ प्रेमांचा अंकित (अभंग)

करावया आम्हां जीवां संत ज्ञानी
श्रमतसे धनी विश्वाचा तो । १
श्रमुनी श्रमुनी कृतार्थ तो अंतीं
होय जगत्पती प्रेममय । २
होऊं आम्ही ज्ञानी मुक्त 'मी' पासोनि
'मी मी' तों रडूनी कंठूं काळ । ३
होऊं आम्ही संत पूर्ण निष्कलंक
प्रेममयी एक-रूप प्रेमें । ४
जनन मरण यात्रा भुवनींची
हे थोर आमुची हक्कदारी । ५
हक्कदारीनें या आमुचें अभीष्ट
नित्यसुख मिष्ट मिळे आम्हां । ६
दुःख आम्हां होय जगीं परोपरी
ते हरि-कुसरी प्रेममय । ७
हरिचें मंदिर नित्यसुखमय
तेथें आम्ही पाय केव्हां ठेवूं । ८
हुरहुर हीच हरि चित्तामाजी
म्हणुनी तो योजी दुःखकला । ९
दुःखकलाबळें वळवूनि आम्हां
नेतसे स्वधामा आनंदाच्या । १०
एक तो एकला विश्वरूप जाला
तेथें कैचा आला दुजाभाव । ११

विश्वरूप मी हें ओळखूनि नित्य
करीतसें कृत्य स्वभावेंचि । १२
स्वभावेंचि होय प्रेमाचा अंकित
प्रेम चालवीत त्याचें राज्य । १३

## ४ हरिस्मरणी (पृथ्वी)

हरी ! सकल तूंच तूं सकल तूं सदासर्वदा
मुळीं न दुसरें असे जगतिं कोणि कांहीं कदा
खरी स्थिति अशी; असे मनिं जया बरें ठाकलें
न तें तुजसि सेवितां भवभयें कधीं धाकलें १
हरी ! सकल एकला नटसि तूं स्वमायाबळें
कला अतुल ही तुझी तुजविणें दुज्या नाकळे
जडाजड अनंत हीं जगतिं या स्वरूपें तव
तुझ्या नियमनीं सदा नियमबद्ध मायोद्भव २
हरी ! कृति जडा तुझी नियमनासि सोपी तुला
तशी न दुसरी असे तिजसि मीपणा आपुला
अचेतन भवांगणीं भ्रमति मीपणें चेतन
असे जगतिं मीपणें प्रथम मानवाचें मन ३
हरी ! स्वमतितंत्रता जगतिं चेतना त्वां दिली
अनंत विषयीं तुवां विविध मोहनी घातिली
अचेतन भवांगणीं विकट खेळ येणेंपरी
तुवां असति मांडिला धरुनि सर्व सूत्रें करीं ४
हरी ! मनुज मीपणें मनिं जनीं कृती ज्या करी
तुझ्या नियमनीं सदा असति त्या स्वतंत्रा जरी
कधीं रमवि इंद्रियें मन कधीं तुला नादरी
तरी तव नियंत्रणा चुकवि ही घडेना परी ५
हरी ! स्फुरसि अंतरीं शिकविसी बरें, ना बरें
बरें करुं तरी मिळे सुख न जें कधींही सरे
अनादर तुझा जरी सुख विशेष लोभें घडे

अधर्म्य सुख तें जिरे विकलता जिवाला जडे ६
हरी ! शिकवणी तुझी प्रियजनां दुखावीतसे
असें न सुख हें परी असुख हें सुखा वीतसें
तुला प्रिय सदैव कीं सकल जीवरूपें तव
तयां असुख देसि तूं सुख मिळो बरें यास्तव ७
हरी ! सुखनिधान तूं सुखनिदान जें वास्तव
तुवां कथियलें सख्या तव सुखार्थि जीवांस्तव
बरें हृदयिं तें धरूं तदनुसार कर्में करूं
तरी असुख सागरू तव बळें सुखानें तरूं ८
हरी ! मनुज-मीपणा उकलितां कळे कोण 'मी'
न देह नचि इंद्रियें न मन मी मला जें नमी
समाधिसमयीं शमीं बुडत भी सुषुती तमीं
सदा स्फुरसि एक तूं जगतिं तूंच मी तूंच मी ९
हरी ! प्रिय चिदब्धि तूं तव तरंग मी धाकुला
तुझ्यांत लय पावुनी नय तुझा करीं आपुला
तुला प्रिय तशी मला सकल जीवरूपें तव
क्रिया करितसे तयां सुख मिळो बरें यास्तव १०
हरी ! तनुमनादिकीं करित ही तुझी चाकरी
जशी शिकविशी तशी तुज कळे बरी ना बरी
सुखासुख न मी बघें तव सुखी सुखीं मी असें
सुखार्थ तव मी उडी असुखसागरीं घेतसें ११
हरी ! मम हरी मना जनिं वनीं तुझी लालना
करीं गमन मी वना तरि तिथें तुझी पालना
निजात्मपद बोधना विमलभाक्ति संचालना
सदा करिसि शोधना मम मनोमलक्षालना १२

हरि ! मुलें प्रिय मन्मनमोहन
मतिविकासपरायण वामन
कमल कोमलमानस मालती
मधुरशील पदीं तव पाल तीं १३

हरि ! तुवां जननीस पित्यासही
हरुनि दृष्टि तमोमय ही मही
करुनि वृद्धपणीं करुणाकरें
हृदयिं काय असे धरिलें बरें ! १४
हरि ! तुला विनवीं दिनरात मी
त्वरित लावि नवी दिन हा तमीं
दिन मनीं विलसो पितरीं मम
श्रमित ते, 'हरि' तूं हरि रे श्रम १५
हरी ! प्रिय मला मुलें प्रिय सुपूज्य मातापिता
दुजेहि सगळे तयां स्मरुनि होय मी याचिता—
कळे मज तुला कळे सकळही परी जीव हा
न राहत उगा, तुला विनविं "काळजी तूं वहा" १६

## ५ हरीची योजना

कमले विमले प्रिये मुली । जइं होतिस सान बाहुली ।
दिन सा न पुरे तुझ्या वया । तइं मीं तुज पाजिलें पया १
तनु बाल पटीं लपेटली । तनु तूं मजलागिं भेटली ।
सुइणीकरिंहूनि मी परी । नुचली; मम कंप ये करीं २
मम अंकिं तईं तुला दिली । मग मी तव तीं चिमूकलीं ।
अति कोमल अंगकें बघे । बघुनी मम चित्त भीति घे ३
अति कोमल अस्थिपंजरीं । हरि हा तुज धाडि भूवरी ।
तव मायहि रुग्ण घाबरी । तइं हो मम वृत्ति बावरी ४
स्मरतें न मला मुळीं गडे । रडलीस न वा तदा रडें ।
स्मरते परि वात मी पयीं । भिजवी तुज चोखवीं तईं ५
चिमणे तव ओठ वात ती । चिमणी पयपूर्ण चुंफिती ।
अजुनी स्मरतांच दृश्य तें । मम मानस खिन्न हर्षते ६
हरिखे मन खिन्न कातर । हरिचा स्मरुनी कृपा-कर ।
हरि गे तव माय तेधवां । उठवी; उठवी न ते हवा ७
चिमणा तव अस्थिपंजर । प्रिय लागुनि आइचा कर ।

दृढ ते धरि प्रेम-पांखर । चिमण्या तव जीवितावर ८
वरुषें परि सार्ध दोनची । तुज लाभलि प्रीति आइची !
हरिची गहना कृपा-गति । हरि दे हरि ने प्रियाप्रती ९
सकलांसि पिताहि मायही । हरि एक; तया करी मही ।
भ्रमते रमते तया मतें । सुपथा सकलांसि लाविते १०
सुपथा शिकवी प्रिये मुली । हरि आणि मही सु-माउली
हरि अंतरि बाहिरी मही । गुरु दोन; कथा पुराण ही ११
जड जीव-मही-मनीं परी । भ्रमणा करि एकला हरी
म्हणुनी गुरु तोचि बाहिरी । गुरुता करि जो जनांतरीं १२
सुपथा शिकवा नको म्हणूं । गुरु तो हरि एकला गणूं
हरिच्या जगिं एक मी अणू । मम जाणिव एक चित्कणू १३
हरिनें गुरुनें जनीं जनीं । उपदेश-सुधा महामनीं
भरिली करुणा युगीं युगीं । भरि आजहि तो नसे उगी १४
उपदेशसुधा त्वदंतरीं । उपदेशसुधा मदंतरीं
उपदेशसुधा जनांतरीं । भरि गे गुरु एकला हरि १५
कमले तुज आणि वामना । मज कारण थोर यातना
जवळी तुमच्या न राहिलों । हरिच्या उपदेशिं वाहिलों १६
तव मातुल आणि मावशी । तुमच्यास्तव प्रीतिच्या वशीं
बहुकष्ट करूनि राहती । मजकारण दुःख साहती १७
मजकारण माउली पिता । असुखी सगळीच बंधुता
मजकारण दुःखि मित्रता । परि हा न वळे जगत्पिता १८
न वळे वळवी न मन्मना । न ढळे ढळवी न मन्मना
रडुनी रडवी मला परी । हसुनी हसवीत हा हरि १९
कमले हरि हा लबाड गे । गवळ्या घरिं मूल बाडगें
करि गोंधळ फार गोकुळीं । हरि तो निवळे न तो मुळीं २०
निवळे न वळे न तो हरि । अपुलें धरिलें खरें करी
धरि काय तरी हरी मनीं । करि जें बहु दुःख देउनी २१
सुखदुःख समान निर्बल । हृदिं अक्षय शांति निर्मल
जनिं मानव हो असावशी । हरि-अंतरिं योजना अशी २२

वश इंद्रियवृत्ति ही जया । वश मानसवृत्ति ही जया
समता ममता जनीं जया । पदवी मनुजा 'वशी' तया २३
हरिची जनता जनीं हरी । बघुनी करि विश्व-चाकरी
निजदेह मना वशीं घरी । वशिता हरि-सेविका खरी २४
हरिची तनु ती हरीसि दे । हरिचें मन तें हरीसि दे
वशिता हरिला पुरी वश । हरि-भक्ति वशित्व सद्यश २५
हरिभक्ति जयास मानते । सुखदुःख तया समान तें
हृदिं अक्षय शांतता तिथें । सफला हरि-योजना तिथें २६
न तनूसि मनासि आत्मता । जगदात्मकताचि आत्मता
उमजे हृदयीं वशी जन । वरितो अनुरूप जीवन २७
स्वतनूसि मनासि पोषण । सकलांसि तसेंचि पोषण
मिळुनी जगदात्म-जागृति । जनिं हो अशि तो करी कृति २८
हरिनें गुरुनें स्वधर्म हा । विमलात्मवरां दिला महा
विमलात्मकता मिळो जना । हरि-अंतरिं हाच योजना २९
विमलात्मकता उदारधी । अतिप्रेममयी कृपानिधी
करिते मलिनात्मता क्षय । वरुनी मृदु तीव्र वा नय ३०
विमलात्मकता मदात्मता । जगदात्मकता जनात्मता
पदिं या बहु अर्थ-एकता । 'हरिशीं परमार्थ-एकता ३१
हरि एकचि एक एकला । भुवनांत भरोनि राहिला
नभ चिन्मय शांत शून्य तें । पहिलें हरिरूप मान्य तें ३२
पहिला हरि तोचि तो अतां । अज अव्यय सृष्टिचा पिता
हरि एक बहुत्व पावला । प्रति अंशिं सदा समावला ३३
प्रति अंशिं सदा समावला । सुवशित्व-युतासि पावला
अवशित्व-वशित्व खेळ हा । भुवनीं हरि खेळतो पहा ३४
कमले ! मन देह वासना । जन यांचि करी उपासना
अवशीं सुख-दुःखबद्ध तो । हरिच्या करिं होय सिद्ध तो ३५
हरिच्या करिं देहमानस । जरि देइ कुणी निखालस
हरि हें धरि हें तुझें करी । अशि भाविक भावना वरी ३६
तरि हा हरि हात दे तया । अवशित्व-मलासि ने लया

निजयत्न जसा तसा हरि । द्रुत अद्भुत वा समुद्धरी ३७
हरिनें गुरुनें मुखें निजें । प्रिय पांडव पार्थ यासि जें
सुवशित्व सुशास्त्र बोधिलें । तिकडे मन पाहिजे दिलें ३८
करि तें हरि जें तिथें कथीं । जगतीं हरि-भक्ति सत्य ती
हरिभक्ति सु यत्नवादिनीं । वशिता मिळवी दिनीं दिनीं ३९
परि हें तुज काय कोमले । फुलणें खुलणें फुलें ग़ुलें
कमले न तुवां न वामनें । त्यजिणें फुलणें खुल्या मनें ४०
मृदु सान फुलें तुम्ही मुलें । मृदु-अंतर आणि निर्मलें
म्हणुनी न तुवां न वामनें । त्यजिणें फुलणें खुल्या मनें ४१
हरिच्या करिं मीं तुम्हां दिलें । हरिच्या करिं आपणा दिलें
हरि देइल शांति अक्षय । सुखि दुःखि करूनि निर्भय ४२

× × ×

वामना निजमनीं मननानें । कामना—दमन जो करूं जाणे
सामना करि तयासि दमानें । सामना करुनि आवरुं जाणें ४३
ज्ञान हें मननमूलक सारें । ज्ञानमूल शुभ कर्म पसारे
ज्ञान दुर्बल भवीं भय पावें । ज्ञान—अर्थ मननासि जपावें ४४
कार्य दुर्घट घडे मननानें । व्यर्थ संशय झडे मननानें
ठायिं निश्चय घडे मननानें । चित्त चिन्मयिं जडे मननानें ४५
तें तुवां मनन सांग करूनी । मार्ग सन्मनन सिद्ध धरूनि
आत्मसंस्करण संधिहि काळीं । साधिली श्रुतिनि सन्मति घाली ४६
आत्मसंस्करण मुख्य व्यापृति । या भवीं विविध शोभनाकृति
ज्ञान भक्ति शम कर्मयोगिता । आत्मसंस्करण हेतु सर्वथा ४७
आत्मसंस्करण आपुलें तसें । मानवीं सकलसिद्ध हो कसें
काळजी मनिं सुसंस्कृतात्मया । हीच एक करि हीच तत्क्रिया ४८
मानवांतरिं चतुर्विधा मति । तामसी मति विचारहीन ती
राजसी विषयसौख्यलीन ती । सात्त्विकी करि निजात्मसंस्कृति ४९
यावरी गुण-अतीत सन्मति । पूर्ण संस्कृत परात्मसंस्कृति
श्रेय कार्य करि ते हरीसवें । आत्मतुष्ट अविलुब्ध या भवें ५०
हा भव त्रिगुण लोभवी तया । जो न आवरि मनासि इंद्रियां

आत्मसंस्कृत तयासि आवरी । त्यासि तोषवि निजात्मता खरी ५१
अज्ञतेसि निजदेह मानसीं । आत्मता म्हणुनि ती तयाविशीं
काळजी करितसे अहर्निश । त्यांसि दुःख तिज तें गमे विष ५२
अज्ञता गहन तामसी मति । अज्ञता बहुल राजसी गति
प्रज्ञता सुभग सात्त्विकी रति । पूर्ण प्रज्ञ निजतर्वि तोषती ५३
तत्त्व तें निज निजात्मता खरी । जेथ पूर्ण दिसला जनीं हरी
जेथ सर्वजनसंस्कृति प्रिया । जेथ रम्य जनसंस्कृतिक्रिया ५४
आत्म-संस्करण पूर्ण असावें । देह आणि मन पूर्ण कसावें
श्रीहरीसह जनांत वसावें । शांति तैं अचल चित्तिं विसावें ५५
माई तुला दुखविलें कुणिही कदाही । दाही मला; क्षमुनि तें शमयुक्त राहीं
तूं वामनासि कमलेसि सुबोध कांहीं। कांहीं करूनि मधुनी कधिं देत जाईं ५६

## ६ कमलका हुक्म

कमल तेरा हुक्म प्यारा मुझको जिस वक्त है मिला
अमल मेरा हृदय सारा हरा होकर है खिला
एक संस्कृत श्लोक सुनकर प्यार जो आया तुझे
नेक उसकी जिक्र पढकर हुइ खुशी भारी मुझे १
हुक्म तेरा शिरपे धरकर श्लोक संस्कृत जो किये
भेजता हूं होवे तेरा दिल खुशी इसके लिये
मैं न कवि हूं न हूं पंडित बात यह सच तूं न भूल
प्यारका कुछ काम करना एक यही मेरा उसूल २
प्यार मेरे प्यारेओंका यार मेरे जानका
प्यारही करवा रहा है यत्न मुझसे गानका
मुझको मेरे प्यारेओंसे रहना पडता है जुदा
उसमें राजी मैं सदा हूं जिसमें राजी है सदा ३
मैं खुदाके हुक्मसे कुछ काम उसका जानसे
कर रहा हूं दूर होकर मानसे अभिमानसे
काम वो है सबसे लेता सबके हितके ख्यालसे
कुछ न कुछ अच्छा है करजा सब्र किसीके हालसे ४

प्यार उसका सब जिवोंपर है सरीखाही सदा
क्यों न हो सब जीव है सच उसकी जीवन-संपदा
प्यारका इस ख्याल करके फिक्र तूं सब छोड दे
काम उसका ठीक कर कुछ शांति चितकी जोडले ५

संस्कृत— बालं पयःपिपासा मातरमनुधावयति सविश्वासम्
कमलां काव्यपिपासा तातमनु तथैव धावयति ६

संस्कृताचें मराठी बाळा भूक दुधाची आइकडे धांववीत विश्वासें
ताताकडे तयापरि धांववि कमलेसि भूक कवितेची ६

संस्कृत— तातः सुतां सुकविता रसपानलुब्धाम्
ज्ञात्वाऽकविः कविमगात् शरणं पुराणम्
ध्यात्वा च लोकरचनां रुचिरां तदीयाम्
जातः क्षमः सुकवि गौरवर्णनाय ७

संस्कृताचें मराठी बाला पिण्यासि कवितारस लोभलेली
पाहे हरीपद धरी कवितार्थ तात
चिंतूनि लोकरचना रुचिरा तदीय
जाला समर्थ कवि गौरव गावयाला ७

संस्कृत— विद्वत्तं च कवित्वं च नैव तुल्यं कदाचन
विद्वान सृष्टिं विजानीते सृष्टिं रचयते कविः ८

संस्कृताचें मराठी विद्वत्वाची कवित्वाची तुल्यता न कदापिहि
विद्यावान् सृष्टिचा ज्ञाता सृष्टिकर्ता असे कवि ८

संस्कृत— दिनं ददाति दिनकृत् चंद्रिकां चंद्रमास्तथा
जलं ददाति जलदः त्रयं तत् संगतं कवौ ९

संस्कृताचें मराठी दिन देतो दिनकर चंद्रिका देत चंद्रमा
जल देत असे मेघ त्या तिघां कवि संगम ९

संस्कृत— दिव्यसत्यस्य दिनकृत् दिव्यसौंदर्य चंद्रमाः
दिव्य साधुत्व जलदः दिव्यसृष्टिः कवीश्वरः १०

संस्कृताचें मराठी दिव्यसत्य दिनकर दिव्यसौंदर्य चंद्रमा
दिव्य साधुत्व जलद दिव्यसृष्टि कवीश्वर १०

## ७ हरिकृतिसप्तक (श्लोक)

वामना विमल तोष मनाला । पत्र पाहुनि तुझें बहु झाला
लाडकीं सुतपदें शुभ वाटे । पाहुनि पितृमनीं सुख दाटे १
दाटे सर्वेचि हरिची प्रिय भक्ति गाढ
केली जयें तव मनीं सुविचारवाढ ।
ढाळीत भक्ति सुख–अश्रु कृतज्ञतेनें
कीं नंदनंदन मुलें मम सुज्ञते नें । २
[1]कमले प्रिय गोड चिंतित । "करण्या निज कांहिं वांछित
तगवी मजला इथें हरी" । तव चिंतित गोष्ट ही खरी ३
खरी तयाचीच अखेर सत्ता । असे असा आठव नित्य चित्ता
तदीय इच्छा मज जी वदे तों । तदर्थ मी यास्तव सर्व देतों ४

\+ + +

[2]माई तुला "लाभ न कांहिं झाला" । सत्सृष्टिसौंदर्य पहावयाला
लाडें तुला गे लडिवाळ देव । आणी; तया तूं प्रिय भक्त-ठेव ५
ठेव तूं प्रिय तदीय सु-शीला । एतदर्थ गणुनी न खुषीला
लाडक्या तुजसि हिंडवि सृष्टि । पाहतां जिस अतृप्त सु-दृष्टि ६
दृष्टिभेटीस्तव कोण कोण आलां । ऐकिलें तें परि हरीच्या मनाला
लागतें जें जइं गोड तें करी तो । फार "लहरी" मज आवडे
हरी तो ! ७

## ८ हरिनीतिसप्तक (श्लोक)

लहरी दिसतो कुणा हरी । लव तो न असे तसा परी
करणें जगतीं बहू तया । करि तें वरूनी दया–नया १

---

१. १९३२सप्टेंबरमध्यें महात्मा गांधींबरोबर केलेल्या उपवासांतून पार पडल्यावर कमलचें पत्र आलें त्यांत "देवानें आपलें कांहीं कार्य करून घेण्यासाठीं तुम्हांला उपवासांतून पार पाडलें आहे" असें तिनें म्हटलें होतें.

२. माई व घरची पुष्कळ मंडळी उपवासांत भेटण्यासाठीं आली होती. तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनीं भेट दिली नाहीं. तेव्हां 'येऊन लाभ झाला नाहीं' असें माईनें लिहिलें होतें.

न या अदयता कधीं शिवतसे शिवे ती कशी ।
न कोणिहि असे जगीं जनु जया न याचे कुशी ।
असे निपजला सर्वे अशिव कर्म हा घेउनी ।
असें न म्हणुं हा शके प्रथम चालना देउनी २
देउनी जगतिं देहधरा या । देह बुद्धि निज कार्य कराया
बुद्धि ती निज निजार्थसाधनीं । बुद्ध ना म्हणुनि दूषि का धनी ? ३
धनी नोकरा भाकरीसाठीं हाटीं । धना देउनी धाडि जें तें स्वगांठीं
तयाच्या बळें नोकरें मद्य प्यावें । तरी तें धन्या तें कसें कां रुचावें ? ४
रुचावें ना त्या तें परि न विसरे सुज्ञ जगतीं ।
रुचे दासा हीना कृति तिज असे बीज कुमति ।
म्हणूनी स्वामी जो सुमति न कधीं तो बिघडुनी ।
म्हणे कांहीं दासा अनुचित वचें चित्तिं घडुनी ५
घडुनी मनिं तेचि तो करी । घटना जनिं जे तदंतरीं ।
करवील हितार्थ चालना । करी यापरी दास पालना ६

× × ×

पालना जगतिं ही अ-पित्याची । पाहुनी, सदय विश्वपित्याची ।
वागणी सदय सर्व जिवांशीं । वागवी मनिं असें वनवासी ७

## ९ हरिदयाष्टक (श्लोक)

अदयता न शिवे हरिला जरी
कुठुनि मद्य-पित्या कुफलें तरी !
कुमतिसी मति त्या हरिनें दिली
हरिच त्या रडवी कडव्या फलीं ॥१॥
लीला हरीची भव, यांत जीव
नसे पराधीन जसा अजीव
स्वराज्य जीवा निजदेहदेशीं
अर्पीत कांहीं हरि तद्धितैषी ॥२॥
शील बुद्धि विविधा विविधां तो
चेतनां प्रथम अर्पित जातो

अर्पि त्यांसि निजदेहिं विकारीं
स्वामिता नियत तेंवि विचारीं ॥३॥
रीति ही भवविलास-विधाता
आदरी जड जिवांसि नियन्ता
यन्त्रणा शरिर जडीं अविभक्त
जीवदेशिं करि तीच विभक्त ॥४॥
तयानें दिलें राज्य जें स्वीय देहीं
स्वदेहापिपुष्टयर्थ तुष्टयर्थ देही
परा विस्मरूनी उणें लेखुनी वा
तया चालवीता कुबुद्धी गणावा ॥५॥
बाण चित्तिं नसतां सुमतीची
वाणि आयकत जो कुमतीची
तो कुबुद्धि अदयादिक भाव
भावि दुष्ट; न तसे भव-राव ॥६॥
वदान्यें स्वातंत्र्या सुमतिं कुमतिं यांसह दिलें
हरीनें जीवातें; तिथ कुमतिनें कान भरिले
जसे तैसें जीवें निजतनुमनाच्या पुरविले
विकारा कोत्या तैं कुफलिं सुख त्याचें नुरविलें ॥७
लेश यांत अदया न हरीची;
ही दया; असुखता जबरीची
जीविं त्या कुमतिमंत्र-विराग
जागवी सुमतिचा अनुराग ॥८॥

## १० हरिवेडदशक (श्लोक)

हरीला सदा लागतें एक गोड
हरीला सदा लागलें एक वेड
जिवांहीं मनुष्यत्व येतां शिवत्वा
मिळावें दुरी टाकुनीयां असत्त्वा ॥१॥
बाण मानवेतरां विकासशक्तिची असे

ते तमोरजोगुणी; न त्यांत सत्व फारसें
तेथ मानवी शरीर सत्ववृद्धि व्हावया
निर्मि सत्ववृद्धिनें जिवा शिवत्व यावया ॥२॥
याच बुद्धिनें हरी निसर्ग-वाटणी करी
भिन्न मानवी गणासि भिन्न सृष्टिभीतरीं
स्थान दे रहावया पहावया सहावया
ज्ञान शील वाढवूनियां शिवत्विं जावया ॥३॥
याच बुद्धिनें गणा गणा करीत आश्रित
मित्रता अभिन्नता गणागणांत मिश्रित
स्थान पालटी तसाचि मान पालटी हरी
मानवा शिवत्व यावयासि कष्ट हे करी ॥४॥
रीति संसृतीतली स्मरूनि ही हरिप्रिय
ज्ञान शील वासवीत राहि सुज्ञ सक्रिय
व्यष्टिचा समष्टिचा विकास सत्त्वि व्हावया
यत्न तो करीत सर्वही शिवत्विं न्यावया ॥५॥
याच रीतीनें सुज्ञमान्य गोड
वरावें आम्हीं; खरें जीव कोड
शिवत्वस्थानीं सुखारूढ व्हावें
सत्त्ववृत्तीनें स्वकार्या करावें ॥६॥
वेड हरिचें जें गोड हरीला जें
तेंच करणें हें आम्हांलागिं साजे
दृष्टिभेटी हो न हो वा विकास
करुनि सत्त्वाचा जाऊं शिवत्वास ॥७॥
सकलमंगलमय सकल-एक-भाव
अमय शिवपदिं त्या तया रजा वाव
तसे म्हणुनी त्या हटविण्या उपाव
सदा करणें हा हरीचा स्वभाव ॥८॥
वशीं भेटीची रजोमिश्र हाव
करा; कष्टें ही वरा सत्वभाव

वशित्वाचा हा सत्वगुणी पाठ
पठवि आम्हां हरि न देउनी भेट ॥९॥
टळेना जें मनिं हरी आदरीतो
जीव शिव व्हावा हेंचि मनिं धरी तो
लहर एकाचि ही सदा तो वरीतो
फार "लहरी" मन आवडे हरी तो ॥१०॥

## ११ पंतभक्ति (अभंग)

पंतभक्तिभावव्रत । करि चित्त दुभंग
गति एक घनश्याम । मुक्तिकाम भजो त्या
त्यासी द्यावें गुरुपद । पितृपद त्यासीच
चळे तेथूनि जें मन । त्या निर्वाण लाभेना
नाहीं भक्ति योग्य नर । मी पामर अज्ञान
नमी हरीचे चरण । माझें मन संसारीं
रीति हीच एक बरी । एक हरी वरावा
वासुदेव एक सर्व । सुख पर्व हें ज्ञान
नसे मुक्तजन मान्य । मंत्र अन्य मुक्तीचा
चाल प्रेमाची असावी । श्रद्धा व्हावी अचल
लक्ष हरीचें सर्वत्र । गात्र गात्र सेवो त्या
त्याची सेवा विश्वसेवा । अहंभावा सोडूनि
नित्यसुखाचा हा पंथा । रंग पंता विनवी.

## १२ सुखसप्तक (अभंग)

१

हरी तुझे पायीं धरिलें धरणें । भरीं हें भरणें माझें आतां
आतां मागतसें प्रेमाची मागणी । जोडूनियां पाणि देवराया
राया प्रेमी माझे कोणी सान थोर । मागतीं विचार मजपाशीं
पाशीं तुझिया मी बांधिला सदाचा । मज विचाराचा साठा तूंचि

तूंचि विचाराचें भरणें भरिशी । वाहक करिशी मज दासा
दासानें वहावें ओझें धन्यासाठीं । आहे ही रहाटी सनातन
तनमन तुझ्या पायीं ठेवियेलें । जीवें सेवियेलें त्यागसुख
सुख शोधीतसें जीव या संसारीं । सुखासाठीं सारी धांव त्याची
त्याची सुखवांछा तेव्हांचि पुरते । जेव्हां ती उरते शून्यरूप
रूपनाम संग सुखवांछा त्यागी । तोचि सुख भोगी रंग म्हणे

२

रूप म्हणिजे ते रूप गंध रस । शब्द आणि स्पर्श विषयांचा
यांचा नेत्रादिकां साहजिक लोभ । लोभें होय क्षोभ दुःखमूल
मूल रूपासम नामहि दुःखाचें । नाम तें मनाचें मनोराज्य
राज्य इंद्रियांचें मनाचें दे दुःख । हरिराज्य सुख देई जीवा
जीवा जया जाला जीवमात्र सेव्य । हरिराज्य दिव्य तया जीवीं
जीवींचें सांगणें हरि सांगे पार्था । सर्वभूतहिता साधी बापा
बापा लडिवाळा मूल, तैसें देवा । विश्व असे, विश्वाबाप देव
देव एक तोचि बाप तोचि मुलें । देह-घरकुलें तोचि होय
होय सर्व कांहीं आणि सर्वातीत । आपुल्या तंत्रांत ठेवी सर्व
सर्वतंत्राचे त्या जीवींचें सांगणें । तेंचि सुख-गाणें रंग म्हणे

३

सर्व तें पाखंड जें कां देवमत । कल्पनेची मात भ्रमयुक्त
युक्त नसे युक्तिवंता बुद्धिमंता । देहीं देवसत्तादास होणें
होणें आणि जाणें मातीचें मातींत । जीव देहातीत नसे कांहीं
कांहीं जी चेतना देहीं कांहीं काळ । देहाचें तें बळ देहभोगा
भोगा भोग देहा इंद्रियां जे गोड । मननाची ओढ तेथें लावा
लावा ही लावणी सुखाची जननी । देवाच्या भजनीं लागो मूर्ख
मूर्ख आम्ही देव देव करणारे । ऐसे म्हणणारे देहवादी
वादी हे आजही कितीक असती । आम्ही देवमती त्यांचे दास
दास जे देवाचे त्यांसी देहवादी । निकट संबंधी सेवा-योग्य
योग्य सेवा सर्वभूतांची निष्काम । तेंचि सुखधाम रंग म्हणे

४

योग्य भोग देहा कार्यक्षम करी । येथें देहावरी कार्यभार
भार तैसा भाग योग्य विषयाचा । प्रेमें सेवायाचा हक्क त्याचा
त्याचा हक्क आम्ही मानूं हा संसारीं । वानूं त्याची थोरी देवकार्यीं
कार्यीं या प्रसंगीं देह देणें पडे । तैं आम्हां आवडे देहत्याग
त्याग स्वदेहाचा देहवादी स्वयें । करी हें न होये कदाकाळीं
काळीं आपत्तीच्या मुलें माता तात । स्वयें नागवीत देहवादी
वादीं पडों नये देहवाद्यासंगें । करावी प्रसंगें त्याची सेवा
सेवा ही आणिक पीडा भोगजन्य । शिकवील अन्य मत त्यासी
त्यासी दाखवील देहीं देहधर । आणिक ईश्वर सेवाप्रिय
प्रिय त्या होईल संग विश्वसेवा । नित्य सुखठेवा रंग म्हणे

५

प्रिय कांहीं जिवा कांहीं तें अप्रिय । प्रियाप्रियमय जीवभोग्य
भोग्यविचाराचि विचारी जिवाचा । प्रेरक कर्माचा सुप्रसिद्ध
सिद्ध स्थितप्रज्ञ ज्ञानी साधुसंत । यांचा कर्मपंथ धर्मसेवा
सेवा प्रियतम हीच असे तयां । धर्म त्यांचा दया सर्वांभूतीं
भूतीं निजपर भाव नाहीं त्यांसी । अखिल विश्वासी पोटीं थारा
थारा विश्वा परी अल्प अंश त्याचा । त्यांच्या सत्कर्मांचा लाभ घेई
घेई शिव्याशाप बहुतांचे ज्ञानी । उद्धारातें हानि मानी जन
जन शापो कापो तनु कोपें परी । ज्ञानी तदुद्धारी करी नेट
नेट त्या करवी तत्प्रिय प्रेरक । जनसेवाभूक दयामूल
मूल दया प्रिय तेणें सेवा प्रिय । तेणें सुखसोय रंग म्हणे

६

मूल ब्रह्मांडाचें नित्यसुखरूप । सद्रूप चिद्रूप देव एक
एक देव आला जड आणि जीव । जीवांत मानव सर्वश्रेष्ठ
श्रेष्ठ या सृष्टींत स्थूल दृश्य स्पृश्य । मानव अ-वश्य अन्य जीवां
जीवां अन्य नाहीं चिद्रूप वृद्धीचें । साधन बुद्धीचें वृद्धिशील
शील वा सद्रूपवर्धक भावना । तीहि नसे त्यांना वर्धमान
मान सूक्ष्म सृष्टीमध्यें योगबळें । मानवासी मिळे योगसिद्धा

सिद्धाचिया सिद्धिबुद्धीचा प्रभाव । भावना वैभव साधुसंतीं
संतीं सद्रूपाची चिद्रूपाची सिद्धी । दिसते समृद्धि सुखरूप
रूप निरखीतां आंतूनि दोघांचें । सुख तें संतांचें दिसे थोर
थोर आणि स्थिर प्रेमभावसुख । तेंचि खरें सुख रंग म्हणे

७

थोर प्रेमभाव आत्मौपम्य दृष्टि । विश्वीं सुखवृष्टि करीतसे
तसें प्रेमशून्य बुद्धीनें न होय । बुद्धि प्रेममय करा यत्नें
यत्नें साध्य वृद्धि प्रेमाची बुद्धीची । दोहींच्या सिद्धीची करा जोड
जोड सच्चिद्रूपीं ईश्वरीं सुखाची । तीच मानवाची ध्येयभूत
भूतदया प्रेम आत्मौपम्य भाव । बुद्धीचें वैभव यत्नसिद्ध
सिद्ध हें जालिया सुखध्येय भूत । दिव्य अंतरांत उभें ठाके
ठाके सुख दिव्य चित्तीं तो न वांके । थोर बाह्य दुःखें कालप्राप्त
प्राप्त ज्यासी श्रद्धा ईश्वरीं असीम । बुद्धि आणि प्रेम उच्चतर
तरला तो भवीं भय त्यासी नाहीं । आपात्ति तो साही आनंदानें
दातें सत्प्रेमाच्या त्यासी कैची वाण । सुखाची तो खाण रंग म्हणे

## १३ अजाणसप्तक (अभंग)

१

हरी तुझें भाटपण । करीतसें मी अजाण
जाणतों मी तूं आहेसी । मज प्रेमें सांभाळीसी
सांभाळीसी संकटांत । घटनेनें अकल्पित
अकल्पित वांछा कांहीं । पूर्ण करिसी तूं पाहीं
पाही तुला माझी बुद्धि । एकपणें सर्वांआधीं
आधीं एक सदा एक । मायावळें तूं अनेक
अनेकत्व तुझी माया । नसे मिथ्या नसे वायां
वायां एकही घटना । तुझ्या मायेची असेना
नाटकाची तुझी शक्ति । तिचें नांव मायाशक्ति
शक्तीचीं या गूढें नाना । रंग अजाण जाणेना

२

नानात्वाचें नाटक हें । बद्ध नियमांनीं आहे
आहे येथें वर्गवारी । गुणधर्मांचे प्रकारीं
रितें पोकळें दिसतें । गुणमय आकाश तें
तेथें नाहीं आदि अंत । एक अखंड दिसत
तत्त्वें सर्व तेंचि होतें । सर्व तेथें लया जातें
तेणें त्वन्नाम आकाश । सदाकाश चिदाकाश
शमदमादि संपत्ति । ज्ञानियाची ज्ञानशक्ति
शक्ति सर्वही आकाशीं । गूढरूपें तुझ्यापाशीं
शीकवणी भिन्न भिन्न । जीवां आकाशीं अभिन्न
भिन्नतेचीं रूपें नाना । रंग अजाण जाणेना

३

नाटकीं या पात्रें सारीं । तुझें कार्य करणारीं
रीति कळे ती धरून । जीव क्रमिती जीवन
नवें ज्ञान जैसें मिळे । नवा मार्ग तैसा कळे
कळे आधीं माझें तुझें । बाळजीवा मी मी साजे
"जें जें दिसे गोड तें तें । हवें मला मला" होतें
तेंचि गोड बाळपणीं । तेणें पुष्टि ये जीवनीं
युक्त प्रौढ जीवा सर्व । जीवीं पूर्ण आत्मभाव
भाव योग्य तो तो 'तुला' । प्रौढ म्हणे, न 'मजला'
लाजवी त्या भोग-गाणें । रंग अजाण हें जाणें

४

नेणत्यासी देह आत्मा । जाणत्यासी देव आत्मा
आत्मा वस्तु 'मी' नांवाची। जिवाचिया जिव्हाळ्याची
याची चिंता मुख्य सदा । काय माझा योग्य धंदा
दान दया दम करा । ऐसा कोणाचा हांकारा
राशि जोडा कांचनाची । निंद्य कल्पना दानाची
चिरा मारा तोडा झोडा । खुळा दयेचा पवाडा

१. बृहदारण्यक उपनिषद्–अध्याय ५, ब्राह्मण २.

डाव खेळा विलासाचा । खोटा मार्ग दमनाचा
नाचा; आत्मा होय नासे । देहचि हा आत्मा असे
असें गाणें गाती कोणी । जडाद्वैत-अभिमानी[1]
नीट नसे असें गाणें । रंग अजाण हें जाणें

५

जाणे त्या जें नीट नसे । नेणत्या तें नीट असे
असे नेणता जाणता । हरी नाटकाचा कर्ता
कर्ता नेणवी जाणवी । निजरूपां विकासवी
विनाज्ञान अल्पज्ञान । बहुज्ञान पूर्णज्ञान
ज्ञानश्रेणीचें नाटक । शीलश्रेणीचें नाटक
कल्पुनीयां कल्पवरी । चालवीत माझा हरी
रीति मज जी वाईट । तीचि कोणा दिसे नीट
नीट मज जें वाटतें । कोणा वाटे वाईट तें
तेथें हरीचा नियम । आपुलालें करा कर्म
कर्म ज्याचें त्याही बरें । रंग अजाण हें स्मरे

६

स्मरे दान दया दम । यांचे हरीचे नियम
महागीताग्रंथीं दान । केलें त्रिविध वर्णन
नको दया क्षमा कोठें । तेंहि कथीलें गोमटें
टेंका दिधला विलासा । जेथें धर्माचा वारसा
साह्य विवेकाचें घेणें । मंत्र हरीचे स्मरणें
रणें शब्दांचीं टाकावीं । विवेकाची रीति घ्यावी
विवेकासी दान दया । किंवा अ-दान अ-दया
यांतूनी जें गोड जेथें । तेंचि आदरावें तेथें
तेथें निंद्य खुळें खोटें । सर्व दयादि वोखटें
वोखटें हें गाणें भारी । रंग अजाण हांकारी

७

रीतसर हांक त्याची । बजावणी कर्तव्याची

---

१. आसुरी संपत्तीचे जडाद्वैती; गीता अ. १६.

चित्तीं हरीचा नियम । आपुलालें करा कर्म
कर्म देहात्मवाद्याचें । कर्म देवात्मवाद्याचें
चेतनेंत दोन्ही सम । परी चैतन्यीं विषम
मति-चैतन्य-विकास । सोडी देहात्मवादास
दास देहाचा तोंवरी । मति बालिश जोंवरी
वरी वरी देवाकडे । मति हळूहळू ओढे
ओढे सृष्टीच्या विचारें । ओढ व्यष्टीच्या विचारें
रेंगाळत वा धांवत । अंतीं देवासी पावत
वतन तें एक सर्वां । रंगा अजाणाचा ठेवा

## १४ देवसप्तक (अभंग)

१

"देव नसे कोणी चीज । जड बीज जगाचें
चेतना ही कशी तरी । आली खरी जडांत
तसें चैतन्यहि आलें । जड जालें बोलकें
केली बोलक्या मानवीं । उठाठेवी शास्त्रांची
चीजा देवता नांवाच्या । कल्पनेच्या घडीती
तिया देवतांचा राव । एक देव कल्पीती
तिथें शक्ति सर्वस्वाची । कल्पनेची मिरास
रास ऐशी कल्पुनीयां । आस वांया धरीती
रीति सारी ही सोडावी । ही मोडावी कल्पना
नाहीं देव भोगा भोग । भजो रंग देवातें"

२

वातें भोगाच्या बोलती । त्यांची मति ऐशी ही
हींत जगद्बीज जड । ही रोकड कल्पना
कल्पनाच जगद्बीज । शक्तिराज देव ही
हीन कल्पना देवाची । अ-देवाची सन्मान्य
मान्य कल्पना देवाची । अ-देवाची हीन ती
नति यापरी अ-देवा । कोणी देवा करीती
रीति भोगाची, भक्तीची । कल्पनेची मूळांत

तप करा, करा मौज । कर्मबीज कल्पना
कल्पना जी एका वंद्य । दुज्या निंद्य ती वाटे
वाटे तैसा भोगा भोग । भजे रंग देवातें

३

देवा तेज कल्पनेचें । जगताचें तो बीज
बीज कल्पक मानवा । कोणी व्हावा कल्पक
कर्ता करविता ज्ञाता । त्याचा पिता तैसाचि
चिन्मयाचें मूळ जड । ही बोजड कल्पना
नाना व्यवस्था जगतीं । कल्पवीती कल्पक
कशी जगाची मांडणी । संहारणी रक्षण
क्षण याचा शोध घेतां । बुद्धिमत्ता घाबरे
वरें पाहतां स्वांतरीं । बुद्धि पुरी पडेना
नाथ ऐशा जगताचा । व्हावा साचा चिद्रूप
चिद्रूप तो कल्पी जड । रंगा गोड तो देव

४

देव आकाश चिद्रूप । जडा बाप होय तो
तोय द्रव वायु घन । रूपें तीन तोयाचीं
याचिपरी चिदाकाश । जीव ईश जड हो
होय नट अज्ञ ज्ञानी । ओझें क्षणीं पेटींत
तशी पेटी जड आहे । आंत राहे देव तो
तो हें जगाचें नाटक । अलौकिक रंगवी
वीतराग होय प्रज्ञ । होय अज्ञ आसक्त
आसक्त होय वीतराग । त्यक्तभोग कालानें
नेता ईशरूपें सर्वां । जडा जीवा तो एक
एक अद्वितीय नट । रंग भाट तयाचा

५

चाड तर्काची जयाला । देव त्याला सहज
जरी नसेल आडांत । पोहऱ्यांत कैसें ये
येतां जातां ऐशी म्हण । लोकीं जन बोलती

तींत सत्याचें भांडार । तत्त्वसार गहन
न तें ब्रह्म अन्न प्राण । न तें मन विज्ञान
विज्ञान अकामहत । जो भोगीत आनंद
आनंद तो कल्पवीत । जगन्नाथ तद्रूप
रूप देवाचें हें ऐसें । तपें दिसे भृगूतें[1]
तेंचि सच्चित्सुख शब्दें । ज्ञानिवृंदें पूजीत
तया हरिनामें गोडें । रंग कोडें सादावी

६

दावी तपोयुक्त तर्क । सच्चित्सुख अंतरीं
अंतरीं जें योगियाचें । भोगियाचें ही तेंच
तेंच मीचें वा आत्म्याचें । रूप साचें देहांत
देहांत जो मी मी त्याचें । देह साचें स्वरूप
रूप साचें हें मानिती । देहमती त्यां नाम
मति तपोबलें शोधी । देह बाधी तया न
नवा तपोहीन जीव । देह देव तयाचा
चाड तयाची धरावी । हरी दावी जी रंगा

७

रंगादिक कांहीं गुण । तद्दर्शन इंद्रियां
इंद्रिया जे न दीसते । वस्तु ते ते कल्पना
कल्पना यास्तव हरि । कीं अंतरीं तो राहे
राहे परी मूढ मना । तपोहीना दिसेना
नाहीं रितें हरीवीण । स्थान मन विश्रांत
तप दुर्वासना-दम । भूत प्रेम निःस्वार्थ
स्वार्थहीन उपकार । सदाचार तें तप
तप सद्ग्रंथ मनन । सृष्टि ध्यान सत्स्नेह
हरि नित्यसुख ठेवा । तो लाभावा अंतरीं
तरी चाड तपीं व्हावी । हरी दावी जी रंगा

---

१. तैत्तिरीय उपनिषद्–भृगुवल्ली.

## १५ हरिदास्यपंचक (अभंग)

ग्रंथ गीतादिक थोर । प्राज्ञ थोर वंदावे
वेगळालीं ग्रंथमतें । प्राज्ञमतें पहावीं
विनागुरु विनाग्रंथ । श्रेष्ठ पंथ कळेना
नाहीं सर्वज्ञता कोणा । नारायणावांचून
नको स्वबुद्धीचा लाड । नको भीड मनाची
चीज बुद्धी मनापार । अहंकारविहीन
नम्र जिज्ञासु तत्त्वाची । अ-तत्त्वाची विद्वेषी
शील तिचें तत्वप्रेम । भूतप्रेम निष्काम
महाप्राज्ञ महाग्रंथ । यांचा अंत पाहे ती
तीच आपुलें 'स्व' सत्य । 'अहं' सत्य ती चीज
जनीं तिला आत्मा नांव । तीच देव देहांत
तत्त्वा-अतत्त्वानें चाळी । तत्वा पाळी प्रेमें ती
तिला निजबुद्धिमन । अन्य जन समान
न ती दास हो ग्रंथाची । न प्राज्ञाची कोणाही
हीन मत निज पर । तें तें दूर ती सारी
रीति देवदेव हीच । तिला साच शिकवी
विना गुरु विना ग्रंथ । श्रेष्ठ पंथ कळेना
नाहीं परी ग्रंथदास्य । गुरुदास्य बरें तें
तेणें जीवा अधोगति । रंगाला ती पटेना ॥१॥

\+ + +

नारायणाचे व्हा दास । अन्यदास व्हावें ना
नाना प्राज्ञ गुरुग्रंथ । याचा पंथ तेथुनि
नित्य एक नारायण । त्याचें स्थान आत्म्यांत
तत्व आत्म्याचें तो देव । देव देव अद्वैत
तयाचाचि अंश जीव । आत्मा नांव जयाचें
चेतनांत अचेतनीं । सर्वस्थानीं एक तो
तो हो जड तनु मन । बुद्धिधन अंशानें

नेता स्वामी या सर्वांचा । आत्मा त्याचा श्रेष्ठांश
श्रम रज आणि तम । रूप नाम त्यांचेंचि
चिदाकार सर्वाधार । तो भांडार प्रेमाचें
चेतनाचें हें नाटक । तत्कौतुक अगम्य
यथान्याय तनुमना । बुद्धिघना वागवा
वाड आत्मा प्रेम प्रेमी । हितकामी सर्वांचा
चाल निष्काम प्रेमाची । ती ती त्याची दर्शक
करा एक गोष्ट करा । 'अहं' खरा तो माना
नाना बुद्धि मन देह । तो विदेह धरीत
तप करी नाना जन्मीं । ज्ञानी प्रेमी व्हावया
याचें साध्य सर्वज्ञता । सर्वैक्यता प्रेमाची
चित्तादिक या साध्यातें । साधायातें साधन
नवपुराण ग्रंथादि । साध्यसिद्धीसाठींच
चतुर जो व्यवहारीं । साध्य धरी दृढ तो
तो हो साध्याचा ध्येयाचा । दास साचा सर्वदा
दास कधीं साधनाचा । ग्रंथादींचा न हो तो
तो हो दास नारायणा । प्रेमी ज्ञाना तो पूजी
जितेंद्रिय मनबुद्धि । तोचि साधी साध्य तें
तेथें आनंद अपार । तो आधार रंगाचा ॥२॥

× × ×

चातुर्वर्ण्य कर्ममूल । गुणमूल गीतेंत
तसें कर्म जैसा गुण । कर्में वर्ण–निश्चय
यथा स्वभाव-संस्कार । गुणभार-निपज
जन्मजात गुण कांहीं । संस्कारांहीं कांहीं ते
तेजस्विता तपस्विता । उद्योगिता अभ्यासें
सेनापति विद्यापति । कलापति कष्टें हो
होती संस्कारें कष्टांहीं । सर्व कांहीं सर्वही
'हीनवर्ण' शूद्रजन । 'उच्चवर्ण' वैश्यादि
दिसेना ही न्याय्य रीति । सद्यःस्थिति पाहतां

ताजी जेव्हां जुन्या काळीं । तेव्हां झाली सन्मान्य
यथाकाल सन्मान्यता । भिन्नमता हा न्याय
यथामति पूर्वजांहीं । केले कांहीं नियम
मति भिन्न स्थिती भिन्न । होतां भिन्न ते व्हावे
वेद स्मृति गीतादिक । पुण्यश्लोक-रचित
तत्त्वप्रेमी भूतप्रेमी । अग्रगामी विज्ञानी
नीति-धर्म-परायण । तत्कीर्तन वेदादि
दिले यांत जे नियम । धर्मकाम प्राज्ञांहीं
हिताचे ते सर्वकाळीं । सर्वस्थळीं सर्व न
नसे जें आज हिताचें । आहिताचें स्पष्ट जें
जें कां श्रेष्ठ सृष्टिज्ञान । त्या अज्ञान आज जें
जें कां श्रेष्ठ भूतप्रेम । त्या अधम आज जें
जें कां ऐसें वेदादिक । गीतादिक ग्रंथांत
तया करावें अमान्य । हेंचि मान्य हरीस
सर्व गीता सांगोनियां । पार्थराया सांगे तो
तोषवी[1] स्वविवेकातें । मान्य त्यातें तें करी
रीति हीच हरिमान्य । आम्हीं मान्य करावी
विनागुरु विनाग्रंथ । श्रेष्ठ पंथ कळेना
नाहीं परी ग्रंथदास्य । गुरुदास्य बरें तें
तें न मान्य देव देवा । रंगठेवा जगीं जो ॥३॥

× × ×

जो का प्रेमळ बुद्धीचा । सत्तत्वाचा विवेक
कर्म-अकर्मविषयीं । तया ठायीं ईश्वर
रण कार्य-अकार्याचें । हृदयाचें गुहेंत
तया रणीं जीवें भावें । ईशा जावें शरण
नसे दूर तो ईश्वर । त्याचें घर हृद्देश
शरण जो तया जाई । शांति पाही शाश्वत
तत्त्व ऐसें जगत्पति । पार्थाप्रति कथीतें[2]

१. गीता अध्याय १८ श्लोक ६३. २. गीता अध्याय १८ श्लोक ६१,६२.

तया तत्त्वाचें हें तत्त्व । प्रेमतत्त्व ईश्वरें
रक्षी भूतप्रेममय । बुद्धिकार्य संसारी[2]
रीति गुरूंची ग्रंथांची । संसाराची चाळावी
विचारणा ही प्रेमानें । शुद्धमनें करावी
विवेकाची ऐशा वाणी । ईशवाणी असे ती
तीच एका एक सांगे । दुजें सांगे दुज्यातें
तें हें नाटक हरीचें । विकासाचें जीवांच्या
यांत क्रमानें विकास । शिवत्वास ने जीवा
वाणी आज मद्‌हृदयीं । ती त्या ठायीं नवीन
न‍ऽहती ती बाळपणीं । क्रमे जनीं विकास
सच्चित् बोलती ईश्वर । प्रेमाकार ज्ञान तें
तें अखंड स्वयंपूर्ण । हो अपूर्ण खंडित
तया खंडितासी नांव । आत्मा, जीव लोकांत
तत्त्व त्याचें प्रेमी ज्ञान । आवरण देहादि
दिलें जें हें आवरण । तें साधन विकासा
सार विकास-नाटक । हरी एक खेळत
तया नाटकीं जीवांनीं । प्रेमवाणी ऐकावी
विकासाचा हा सत्पंथ । रंगा त्यांत आनंद ॥४॥

× × ×

दया न्याय प्रेमापोटीं । शूद्रासाठीं कष्टत
तया जन्में हीन मानी । 'उच्च'वर्णी जनांत
तया दूर दूर करी । त्याचा घरी विटाळ
लक्षण हें पावित्र्याचें । सद्धर्माचें मानीत
तया मूल गुरुदास्य । ग्रंथदास्य बहुतीं
तिया दास्या त्याज्य हीन । नारायण कथीत
तयें सांगीतला पार्था । श्रेष्ठ पंथा संसारीं
[3]"रिघे मजचि शरण । दास्य आन झुगारी"

१. गीता अ. ५ श्लोक २९,१९. २. गीता अ. ५ श्लोक २५,१९.
३. गीता अ. १८ श्लो. ६६

रीति हीच तो आजहि । मजलाही शिकवी
विना गुरु विना ग्रंथ । श्रेष्ठ पंथ कळेना
नाहीं परी गुरुदास्य । ग्रंथदास्य बरें तें
तेणें होय अधोगति । मोक्षस्थिति दुरावे
वेगळालीं ग्रंथमतें । गुरुमतें पहावीं
विवेक जो तत्त्वप्रेमी । भूतप्रेमी निष्काम
मनाचिया मनीं वागे । त्यानें जागें करावें
वेगळालीं मतें सारीं । त्यापुढारीं ठेवावीं
विवेचना प्रेममयी । तत्त्वग्राही करूनि
निर्णय जो होय त्याचा । श्रीहरीचा होय तो
तोचि आचरावा प्रेमें । मोक्ष कामें सर्वदा
दास्य हरीचें अव्यंग । दुजें रंग मानीना

## १६ प्रेमएकादशी (ओवी)

अद्वैतीं लीलाप्रेम उदेलें । तेणें ईश प्रकृति द्वैत केलें ।
तयाचे प्रेमें जग हें निर्मिलें । तें प्रेमें चालिलें प्रेमें टिके १
केवलाद्वैत स्वप्रेममय । स्वप्रेमानंदें स्वानंदमय ।
तेथें 'स्वपर'लीला स्फूर्ति होय । संसार स्वपरमय फल तियेचें २
चेतनीं प्रेमाचें आकर्षण । अचेतनीं तत्सम आकर्षण ।
आकर्षणींच उपजे विकर्षण । प्रेमप्रदर्शन संबंध सर्व ३
वर अवर प्रेमाचा रंग । वरिष्ठ प्रेम सर्वभूतहितसंग ।
तेचि उपदेशीत असे श्रीरंग । गीतेंत सुरंग स्ववचांहीं[1] ४
हीन प्रेमासी नाम काम । इंद्रियें[2] तन बुद्धि त्याचें स्वधाम
तो वरिष्ठ प्रेमाचा आराम । दूरवी देहग्राम व्यापूनियां ५
यासी उपाय दुःखपरंपरा । तेणें जागृति ये कामकामी नरा ।
जागृतासी आत्मज्ञानाचा झरा । होय सामोटा सद्विवेकरूपे ६
रूपें अनंत हीं एकस्थ । यांत कोणी स्वस्थ कोणी अस्वस्थ ।
स्वस्थ जीं आत्मया सर्वभूतस्थ । जाणूनि प्रेमसंस्थ स्वयें झाली[3] ७

---

१. गीता अ. ५ श्लो. २५,१९. २. गीता ३ श्लो. ४०.
३. गीता अ. ६ श्लो. २९,३२.

लीला ही सद्विवेका आकळे । सद्ग्रंथ मननें बुद्धि निवळे ।
सज्जनसमागमें मन वळे । हें कार्य बळें हरीच्या होय ८
यदृच्छा आकस्मिकता जगीं नाहीं । येथें इच्छा-कार्य असे सर्व कांहीं ।
इच्छा जीवांची वा हरीची होई । कारण कोणाही कार्यातें ९
तेजोंश हरीचा प्रति जीवांत । स्वतंत्रतेनें असे विहरत ।
परी ही स्वतंत्रता असे नियत । स्वातंत्र्य अनियत एका हरीचें १०
चेतनां सर्वांक्रमें विकासवी । केव्हां त्या रडवी केव्हां हांसवी ।
अंतीं सर्व-प्रेम सर्वां प्रकाशवी । त्या एका सेवी रंग प्रेमें ११

## १७ हरीपाशीं मागणी (श्लोक)

हरी तुझें हृद्गत गात सारे । तुझ्या मनींचेचि जनीं पसारे ।
कवी नवी दृष्टि तुझ्या प्रसादें । पावोनि सृष्टि भरि काव्यनादें १
कवी कुणी नूतन दोन तीन । मराठीचे सृष्टित ज्यांसि मान ।
अभ्यासिली मीं कविता तयांची । गतार्धमासीं तव लाडक्यांची २
मराठिचें वैभव वाढवीते । त्वत्प्रीतिचे पुष्कळसे कवी ते ।
स्वसत्कृतींनीं जन सेवताती । नव्या मनूचें नवनीत गाती ३
त्या गायकांतील कुणी प्रधान । त्यांचीं सुगीतें सुरसें श्रवून ।
माझी जुनी बुद्धि नवीन वृद्धि । पावे हरी देइ तियेसि सिद्धि ४
तुझ्या पदाचा अनुराग चित्तीं । विद्वेषिणें दुष्ट दुरात्मवृत्ति ।
जनीं असे चित्तविकासकार्य । करील जें सुंदर काव्य आर्य ५
तें निर्मिण्याची मज व्हावि शक्ति । तें निर्मिण्याची मज व्हावि युक्ति ।
ही ती जुनी बुद्धि नवीन वृद्धि । पावे हरी देई तियेसि सिद्धि ६
न जन्मि या सिद्धि हवी मला ते । न मागतों मी भलतेंचि तूतें ।
कळे मला सिद्धि न ती सुसाध्य । कळे परी ती न असे असाध्य ७
माझ्या प्रयत्नें तव इच्छितानें । मला पुढें जन्मि कुण्या क्रमानें
सत्काव्यनिर्माण कला बरीशी । साधेल आशा अशि मन्मतीशीं ८
असो तुला आज न फार मागे । मुलांसि माझ्या रमणूक लागे ।
ती व्हावया पद्य विचार कांहीं । देई करी साजरि ही तिमाही ९
विचार साधे यमकेंहि साधीं । मागें तुला मी इतुकेंचि आधीं

काव्यांग हें बाह्य मला पुरें हें । या अंगिं कांहीं रमणूक राहे १०
रमे तिणें मानस ज्या जनाचें । तयाचसाठीं श्रम मन्मनाचे ।
जयां रसालंकृत पद्य व्हावें । त्यांहीं न हें लेखन हातिं घ्यावें ११
तयांसही गोड गमेल ऐसें । सत्काव्य माझेकडुनी अपैसे
व्हावें जनोद्धार करावयातें । आशी अशी देउत तेहि मातें १२
आशीर्वचें तीं अणि यत्न माझा । येईल निःसंशय सर्व काजा ।
अपार्थ कांहींहि न हो विचार । आचार वा हें हरिसृष्टिसार १३
हरी तुझ्या सृष्टिनियंत्रणाचें । रहस्य हें देखुनि मन्मनाचें
मनीं तुला प्रार्थित सप्रयत्न । चढो कवित्वा मम पद्य-यत्न १४
पुढें कुण्या जन्मि मिळो कवित्व । दे आज कांहीं रमणूक-तत्त्व ।
विचार साधे यमकांहि युक्त । दे आज कांहीं अणि होइं मुक्त १५

## १८ हरीची सुई (श्लोक)

सुई शिवी वा उसवी शिवीलें । चाले जसें कां तिज चालवीलें ।
सुईपरी मी उसवीं शिवीतों । चाले जसा चालक चालवी तो १
तो चालवी जीव जडांसमान । जिवा मुळींही निजतंत्रता न
हें मी न मानीं, हरि कीं न मानी । हरि स्वयें जीव निजाभिमानी २
निजत्व-मीत्व प्रकटे जिवांत । बहुत्वलीला भरली भवांत
स्वेच्छासुईनें वसनें गुणांचीं । शिवी हरी तो बहुता खुणांचीं ३
चिजा इथें सर्व गुणप्रभाव । गुणाविणें एकहि नाहिं भाव
हरी हरें हा गुण वस्त्रभार । लेऊनि जाला भव हा अपार ४
रसाळ साराच इथें पसारा । रसाविणें येथ कुणा न थारा
हरि स्वयें तो रस[1] रास त्याचा । रसाळतेचाच सदा भवाचा ५
चाली जडाची परतंत्रतेची । चाली जिवाची निजतंत्रतेची
तो एक बहुतंत्रधारी । जिवा-जडाच्या बसुनी जिव्हारीं ६
रिझे[2] रुसे[3] तो जगदीश भावें । जरी मुळीं एक शिव स्वभावें
शिवत्विं जीवेश जगत्प्रकार । खेळे शिवूनि गुण वस्त्रभार ७

---

१. रसो वै सः तैत्तिरीय उपनिषद्. २. गीता अ. १२. ३. गीता अ. १६.

रमे स्वयें होऊनि एक चार । शिवत्व राखूनि दुजे प्रकार
होई कसा तीन पुर्सों न वांया । लीला तयाची अतिगूढ माया ८
या संसृतीवीण नडे तयाचें । म्हणूनि निर्मूनि बहुत्व नाचे
एकत्व एकाकिपणा न भावे । धरी बहुत्वा म्हणूनी स्वभावें ९
वेळेस खायें बहु गोड गोड । कुठें न लागे करुं ऊर-फोड
रिकामडा जीव असा रमेना । खेळाविणें त्यासि मुळीं गमेना १०
नाचे म्हणूनी उभवूनि खेळ । प्रगल्भही श्रीयुत जेंवि बाळ
धरूनि आणी कुणि दोन चार । रची गमे तो रमण-प्रकार ११
रची तसा श्रीयुत हा हरीही । रमावया सृष्टि; कथा खरी ही
उद्देश लीला; रचनाप्रकार । आत्मीय-माया-गुणवस्त्रभार १२
रमा-उमा-नामक आत्ममाया । हरी नियोजी भव हा रचाया
कवित्व हें मंगल त्या हरीचें । इथें अलंकार परोपरीचे १३
चेष्टा कवीला प्रिय काव्य-रास । जादूगिरी ती प्रिय गारुड्यास
सुई सुतानें शिवणें पटास । उशीवणें वा प्रिय शिंपियास १४
सखा हरी हें त्रय जाहलासें । संसार जादू पट, काव्य खासें
पात्रें कवीचीं पटधारि सोंगें । आम्ही असों जादूविलास अंगें १५
गेला हरी सृष्टी रचोनि झोंपीं । ऐसे कुणी मानिति गोप-गोपी
मी हें न मानीं हरि कीं न मानी । जागा सदा जागृतताभिमानी १६
नीलांबरातें परिधान केलें । नीलत्व ज्यातें नसतेंच आलें
अनंत आकाशचि वस्त्र त्याचें । अनंत आकाशचि रूप ज्याचें १७
चेष्टा तया आठवली विचित्र । स्वरूप जें कां अपुलें अचित्र
सचित्र तें इंद्रियधारि गोप[1] । गोपीविलासीं करि तो अलोप १८
पसंत त्यातें उदयास्त युक्त । मी-मी विवाद-प्रिय कालभुक्त
रूपें स्वतांचीं बहुता प्रतीचीं । बाळें विलासी त्रिगुणी सतीचीं १९
चितारलें हें नभवस्त्र देखा । चितारल्याचा करि तोचि लेखा
अन्या कुणा चित्रगता जिवाला । लेखा कसा होय जसा शिवाला २०
लागे जरी अंत न लेखनाचा । प्रयत्न चाले तरिही जनाचा
बघूनि तल्लेखन वर्गवारी । करूनि होण्यासि गुणी चितारी २१

---

१. गोप = इंद्रियधारी (गो = इंद्रिय) = मनुष्य व इतर जीव.

रीति प्रसिद्धा गृहिं बालकाची । जसा पिता वा जननी तयाची
आलेखनीं लेखनिं वा रमावी । तशी क्रिया आपणही करावी २२
विलास हा जो निजबालकाचा । आनंद तो त्या जननी-पित्याचा
आनंद तेंवीं हरिचा स्वभावें । कीं जीव कांहीं हरिसें रमावें २३
वेद्यार्थ येथें भरला अनंत । बोधार्थ कष्टे जन बुद्धिमंत
भोगार्थ येथें भरला असीम । भोगार्थ कष्टे जन भोगकाम २४
महात्मयांतें प्रिय भोग नाहीं । महात्मयांतें प्रिय बोध नाहीं
प्रिया तया आत्मसमत्वबुद्धि । ती या भवीं आर्तजनासि शोधी २५
धीशून्य धीरत्वविहीन दीन । संख्या अशांचीहि इथें कमी न
वैषम्य नैर्घृण्य इथें असीम । साम्यार्थ कष्टे जन साम्यकाम २६
महाविशाला प्रतिभा जयाची । सौंदर्य माधुर्य चितारण्याची
कला जयाची सहजा मिरासी । तदर्थ तेथें मधुरत्व-राशि २७
शिकावया वा शिकवावया वा । प्रभूत येथें अनुकूल ठेवा
रमावया वा रमवावया वा । प्रभूत येथें अनुकूल मेवा २८
वाणिज्य येथें कृषिकर्म येथें । सुरम्यसें यांत्रिक कर्म येथें
विज्ञानशालाहि इथें विशाला । संसार हा स्वर्गसमान झाला २९
लाचावतो जीव शिकावयासी । लाचावतो जीव शिकवावयासी
परी इथें बंधन त्या प्रभूत । संसार हा फोल असारभूत ३०
तत्त्वें विरोधी रमतात येथे । रागी विरागी जमतात येथें
"अहा ! बहू गोड !" 'कडू महा ! हा !'। विरोधी उद्गार इथें 'अहा !' 'हा'!
हा नाद संमिश्र इथें सदाचि । संसार हा मोहवी आणी जाची
हा सार एकासि असार अन्या । जादू हरींची विहरे सु-धन्या ३२
न्यायी इथें न्यायरिपूहि येथें । दानी इथें दानरिपूहि येथें
द्वंद्वें इथें वावरती अशीं हीं । लीला हरीला पटते कशी ही ? ३३
ही पृच्छकाची न नवीन पृच्छा । हिचें समाधान जुनें "हरीच्छा"
न हो समाधान अशा वचानें । तरी हरीच्छा हटते न त्यानें ३४
नेसे स्वयें तो पट भिन्न भिन्न । वेषें रमे भिन्न सदा अभिन्न
न्यायी बने न्यायरिपूहि होई । दानी बने दानरिपूहि होई ३५
ईशत्व राखूनि अनीश होई । सर्वज्ञ राहूनि अजाण होई

खेळे असा एकचि अद्वितीय। त्या 'कां असा खेळ'! पुसोनि काय! ३६
यथारुचि प्राकृत खेळ मांडी । यथार्थ बोधासि बळेंचि सांडी
पुसेंहि तो उत्तर तोचि देतो । संवाद ही साक्षिपणें बघे तो ३७
तो एक तूं, मी, सगळे दिसे जें । तो एक अदृश्य भवीं असे जें
त्याची कला एक-अनेक-कारी । तो जाणे भवसूत्रधारी ३८
रिघे न तेथें अतिसूक्ष्म बुद्धि । रिघे तिथे तन्मयता-समाधि
असे कुणी एक अनेक झाला। "कसा ! कशाला !" न पुसा तयाला ३९
लागेल तें त्याविषयीं वदावें । लागे न तें त्या अलगा स्वभावें
"नसे," "असे दुर्बल", "दोषमूर्ति" । रुसे न तो ऐकुनि ही स्वकीर्ति
तिला असे कारण तोचि जाला । स्वयें करी तो रुसतो कशाला !
रुसे न, हर्षे श्रवुनी स्वनिंदा । हंसावयाचाचि तयासि धंदा ४१
दावी स्वविज्ञान स्वयें स्वतांला । "आम्ही, तुम्ही, ते" रमणार्थ झाला
पूर्णी बने शून्य तयांत पूर्ण । विकास लीलार्थ बने अपूर्ण ४२
नटत्व त्याचें अतुल प्रभाव । असोनि नित्यत्वहि नास्तिभाव
भावीत त्याचा कुणी तर्कवादी । तर्कें तया देत जडीं समाधि ४३
धिटाइनें तर्किति कीं जडांत । भले भले तार्किक जन्मतात
जडाणुसंघात ने स्वयेंचि । संघातिं चैतन्य उठे; विवेची ४४
चिदात्मता संहतिचा विशेष । ती नष्ट होतां न उरेचि शेष
कसेंहि वागा; न पुढें न मागें । असा तुम्हीं; एक जडत्व जागे ४५
गेला अणूंचा चय जैं फुटोनि । चैतन्य तज्जन्य तदा कुठोनी
कसेंहि वागा; न पुढें न मागें । असा तुम्ही; एक जडत्व जागे ४६
गेला जनीं होउनि एक कोणी । चार्वाक नास्तिक्य असें वदोनी
चार्वाकमार्गें जगतीं विचार । करोनि कोणी करितो विहार ४७
रमोत ते विश्वविकासशाला । समर्थ त्यांना शिकवावयाला ।
त्यांच्याहि खालीं जड बुद्धिशून्य । अजीवसे जीव अनेक अन्य ४८
यत्ना विहारार्थंही जो करीतो । सुमार्ग तो एक तरी धरीतो
अयत्नभोगी अतिमंद बुद्धि । तयाचिही विश्व करीत शुद्धि ४९
धिमेपणानें हरि यत्नवादी । विश्वांत नाना करूनी उपाधी
मंदांसि लावी उठुनी झटाया । विहार-कांक्षा हरिचीच माया ५०

या भोग्य वस्तूंतुनि चित्र काढी । त्या दूसरीचा अतिमोह पाडी
असें करूनी उठवीत मंदा । तया करी राजस यत्न-बंदा ५१
दावी न त्यानें निजरूप थोर । 'नसे इथें देव, करूं विहार'
असेंच तच्चित्ति भरीत वेड । असे विहारी हरि हा लबाड ५२
डह्याळिया कोण कदंबवृक्षीं । भरूनि गोपी बसतांहिं, लक्षी
विहार-वेडया जल-मग्न-नारी । लबाड हा फार हरी विहारी ५३
रीती तुझी ही न बरी मुळीं ही । दिसे अती हीन तुझ्या कुळीं ही
नसे इथें कोणि, करूं विहार । म्हणूनि केला आम्हि हा विचार ५४
रमावया स्वैर नदीतटाकीं । ठेवूनि वस्त्रें जलिं पातलों कीं
तिथें कसा कोठुनि बा मुकुंदा । आलासि ऐसा करण्यासि धंदा ५५
दासी अतां पायिं विनम्र आम्ही । भुलो न केव्हांहि विहार कामीं
तुझी हरी संनियता सदैव । तुला भुले त्या न भुलें "कुदैव" ५६
वचांहिं ऐशा रिझला हरी तो । सवस्त्र एक्या क्षणिं त्यां करी तो
'असे इथें देव, करूं विहार' । असा तयां तो शिकवी विचार ५७
रमे 'इथें देव असे' स्मरूनी । रमे 'इथें देव नसे' स्मरूनी
रमावयाचे पथ दोन ऐसे । 'नसे' तुनी येत 'असें' विकासें ५८
सेवा स्वतांची विषयार्त भावें । 'नसे इथें देव' तयासि फावे
'असे इथें देव' असें पहातां । सेवा तयाची सुचते भवार्ता ५९
तारील तो देव दयार्द्र आम्हां । जरी करूं तुष्ट तया स-कामा
कामी आम्ही तोहि तसा तयाला । व्हावी सुरा, मांस, विलासबाला ६०
लाभे कुणा देव-विचार ऐसा ! । सुरादिकीं तो बुडतो अपैसा
असे बुडाले बुडतात आज । बुडोनि जागा करिती समाज ६१
जगीं किती देव-विचार भिन्न । त्यांसी मिति ना, मन होय खिन्न
पाहुनि आस्तिक्य-मनें सदोष । परी कुठें तें मत जें अ-दोष ? ६२
षड्दर्शनें घ्या अपुलीं पुराण । घ्या दर्शनें वा दुसरीं नवीन
दोषाविणें दर्शन एक नाहीं । दोषी विकासात्मक जीवनाही ६३
हीतें पटे अद्वय एकजीवीं । दुज्यांत ती त्या बहुदोष ठेवी
श्रीशंकरा अद्वय दोषहीन । कितीजणां तेंचि सदोष, हीन ६४
नको म्हणूनी भलताच खेद । पूजो कुणीहि कसलाहि वेद

जो ज्या खरा वेद तया तयानें । दुज्यासि देणें बहु आदरानें ६५
नेटें खऱ्याचा करणें प्रचार । खोटें दिसे त्या करणें प्रहार
सदा विचारें करणें स्वकार्य । हा एक पन्था जगतांत आर्य ६६
येथें युवा तो नचिकेतनामा । प्रशंसितां, भोगपरां सकामां
जडैकवाद्यां लघुनाम 'बाल' । दिलें तयांची निरखूनी चाल ६७
लहान हे अज्ञ सुजाण थोर । स्वतांसि मानूनि अनर्थ घोर
भोगूनि अन्यांसिहि भोगवीती । तयांसि देऊनि निजा कुरीति ६८
तिच्या निरोधार्थ खरे सुजाण । सयत्न होतात खरे महान
अशी असे विश्वविकासनीति । येथें नको खेद विषाद खंती ६९
तीक्ष्णोज्ज्वला बुद्धि वितर्कधुंद । समत्वभावीं अतिहीन मंद
तिला प्रिया स्वार्थ निमग्ननीति । परार्थता मानित ती अनीति ७०
तिच्या मनीं देहघरें स्वदेह । तदंतरीं जें गमतें विदेह
सुखार्थ त्याच्या परसौख्यनाश । सुखें करावा नय हाचि खास ७१
स-देव देवास गणी सकाम । सुरादि ज्याचें निजसौख्यधाम
तो त्या सखा जो जडतैकवादी । जया नसे देव न साम्यबुद्धि ७२
धिमेपणें या असुरद्वयासी । समत्वपंथा शिकवावयासी
झटे समत्वप्रकृतीप्रधान । स-देव तो वा जडताप्रमाण ७३
नसे जया देव असाहि साधु । असे जया देव असा असाधु
घटे कसें हें ! विपरीत भासे । जीवत्व कोण्यापरि हें विकासें ? ७४
सेना गुणांची अपुली असीम । अनेकधा जोडि विकास-काम
हरी, परी त्या जुळवावयाच्या । करीति भेदासि जिवाजिवाच्या ७५
या जीविं आधिक्य सुभावनेचें[1] । त्या जीविं आधिक्य विभावनेचें[2]
समत्व यांचें इतरत्र कोठें । हीनत्व दीनत्व दुज्यांत कोठें ७६
ठेवा असा वांटुनि जीवकांला । आरंभितो श्रीहरि नाटकाला
स्वतंत्रता कांहिं तयांसि ठेवी । करावयातें गुण-देव घेवी ७७
विभावनेनें न दिसे भवेश । सुभावनेनें सुखवी परास
नसे जया देव असाहि साधु । हो या परी ही हरिनाट्यजादु ७८

---

१. सुभावना = प्रेमशक्ति.   २. विभावना = तर्कशक्ति.

दुजा कुणी हीन विभावनेनें । देवा घडी हीन सुभावनेनें
असे जया देव असाहि साधु । हो यापरी; ही हरि नाट्यजादु ७९
दुजा कुणी श्रेष्ठ विभावनेनें । जसा तसा श्रेष्ठ सुभावनेनें
देवत्व सर्वोत्तम भावुनीया । सेवाव्रतीं कष्टवि बुद्धि, काया ८०
या कल्पना सर्व नसे, असे वा । तो देव अद्वैत रिझे रुसे वा
या कल्पना सर्वचि सर्व मिथ्या । कीं कांहिं येथें वदतात सत्या ८१
त्या सर्व सत्यांत हरींत एका । दुर्ज्ञेय रीती उठती अनेका
कल्पी हरी कल्पक मानवास । तोही तया कल्पित अद्वयास ८२
सत्यार्थ अद्वैत विकास लीला । खेळूं निघाला हरि विश्व झाला
चिद्रूपिं हो जाड्य तयांत जीव । जीवीं नरत्वा धरि देवदेव ८३
वरिष्ठ हें सत्य गमे मला, मी । रमे इया सत्यि विहार-कामीं
कर्तव्य माझें करूनी हरीला । मी हात देतों करण्या स्वलीला ८४
लाधे मला मीपण जें स्वतंत्र । त्यापासुनी, त्यावरि हीन तंत्र
माझें न मी संप्रति चालवीतों । मीत्वासि त्या चालक चालवी तो ८५
तो चालवी विश्व सदा अ-सुप्त । मी हात दे त्या मग होय सुप्त
सुईपरी मी उसवी शिवीतों । चाले जसा चालक चालवी तो ८६
तो सुप्तिमार्गी मज गुप्त गोष्टी । दावीत ज्या त्या बघुनी स्वदृष्टी
जो मद्विकासीं श्रम त्यासि झाला । तो स्पष्ट माझ्या दिसतो मनाला ८७
लाजे कधीं मी बघुनी स्वदेह । दिसे मला तो बहुदोषगेह
आश्चर्य केव्हां मज फार होई । पाहूनि भूषा मम सुप्तिदेहीं ८८
हीनत्व उच्चत्व न कल्पियेलें । कधींहि ते सुप्तित भोगियेलें
कधीं न जागेपणिं पाहियेलें । तें दृश्य स्वप्नें मज दावियेलें ८९
लेखा स्मृतीचा क्रमशून्य कांहीं । स्वप्नस्थ संमिश्रितरूप पाही
ही क्लृप्ति सर्वत्र पुरी न आहे । हिच्यांत सुप्तार्थ पुरा न राहे ९०
हें जें बघे सुप्तित मी स्वदृष्टी । ती पूर्वजन्मीं अनुभूत सृष्टि
स्मृतींत राहे अनुभूत कांहीं । ती होय सुप्तींत चल, प्रवाही ९१
ही क्लृप्ति–जन्मान्तर दृष्ट माझें । स्वप्नीं स्मृति स्पष्ट करीत ताजें
ही क्लृप्ति मातें रुचते स्वभावें । हिच्यांत सुप्त्यर्थ पुरा समावे ९२
वेडासि भोगूनि विवेकि झालों । हीनत्व भोगूनि अहीन झालों

या जीवका एक विकासवाया । कसें हरीसी पडलें श्रमाया ९३
याचा मला स्वप्न करीत बोध । या जन्मि झाल्या स्थितीचाहि शोध
घेतां हरीच्या अतुल श्रमाची । जाणीव माझ्या हृदयासि जाची ९४
चिदेक रूपी हरि तो जिवासी । करी अचित्तुल्य सुषुप्तिवासी
सुर्तींत जागेपणिं जीव मी मी । करी, सुपुर्तींत वसे अकामी ९५
मी, मी, सुपुर्तींत विलीन होई । देहक्रिया कोण करीत राही
१तो देव कीं जीव-नियुक्त२ कोणी । कीं जीव तो मीत्व असे त्यजूनी ९६
निजे अहंकार निजे तयाचें । जनीं मनीं कार्य परोपरीचें
देहीं घडे यंत्रसमान कर्म । तो जीवकाचा तरुवत् स्वधर्म ९७
मठी तनूची बनवी रसाची । नरांत नारींत मिळे तयाची
तिथें सुपुर्तींत दुज्या स्थितींत । क्रिया करी जीवनहेतुभूत ९८
तया जनीं कार्य करावयास । पाया असे चेतनदेहवास
देहीं सदा तोचि जपे म्हणूनी । नसे सुपुर्तींत तदन्य कोणी ९९
निजे तदा स्वप्निं शरीर-भिन्न । मिळे तिथें होय प्रसन्न खिन्न
परी इया देहिंच तें शरीर । स्वप्नीय सृष्टि स्मृति कारभार १००
रमे सुपुर्तींत धरूनि मौन । स्वप्नांत जागेपणिं मी-प्रधान
समाधि ठायीं हरपे अहं-ता । सुषुप्तिवत् तेथहि मौन सत्ता १०१
ताता जिवाच्या भविं मीत्व-युक्त । जीवा समाधिस्थ पुरा स्वभक्त
करावया जो श्रम होय त्याची । जाणीव माझ्या हृदयासि जाची १०२
चिदेकरूपी हरि तो जिवासी । जागेपणीं स्वप्निं सुषुप्तिवासी
देहीं अनेकीं बहु जन्मि हात । देऊनि अंतीं मिळवी स्वतांत १०३
तया अशी जीवविकासलीला । रुचे, रुचे त्यापरि मन्मतीला
परी इथें त्या श्रम होय त्याची । जाणीव माझ्या हृदयासि जाची १०४

चित्तासि माझिया स्वैर यासाठीं मी निरोधितों
नये तूं श्रमवूं देवा असें मी त्यासि बोधितों १०५
तोडुनी गोड बोधानें तद्वृत्ति स्वैरतामयी
जाहलों जगतीं मी या हरिची सानशी सुई १०६

---

१. तो देव प्राण हें कौषीतकी उपनिषदाचें मत.
२. तो जीवनियुक्त वा देवनियुक्त हें छांदोग्य उपनिषदाचें मत, छा. अ.८ खं.१२.

## १९ आईसाठीं निरोप

श्री विघ्नहर्ता गणराज देव । मोठ्यांत मोठी कुलपूज्य ठेव
रक्षी कृपाळू हरि विघ्नराशी । या कारणें तो हरि मन्मनासि १
पायीं मियां वाहियलें तदीय । लहानगें जीवित हें मदीय
न हानि कांहीं मजसी घडेल । कर्तव्य कोणा न कधीं नडेल २
रीतीप्रमाणें निजकार्यशील । तद्धामिं गेले अमुचे वडील
आम्हांहिं जाणें करितां स्वकार्य । हेतु स्वकार्यैकपरत्व आर्य ३
चिंतूनि त्याच्या चरणासि राहूं । तापत्रया धीर धरूनि साहूं
नमूं न विघ्ना करितां स्वकार्य । कोणीहि विघ्ना नमतो न आर्य ४

## २० वामन-कमलसाठीं निरोप

वास करीं हृदयीं जो विश्वव्यापक विवेकदाता जो
मद्बालां श्रीहरि तो सत्प्रेमाची सुधा सदा पाजो १
नर करणी करितां हो नारायण ही सदुक्ति विसरा न
करणी आत्मोद्धारक करितां मोहें कधींहि घसरा न २
मज अल्पमतिसि हरि जो करिं धरुनी चालवीत आजवरी
लक्ष असो तच्चरणीं मत्सम तुम्हांहि तो धरी स्वकरीं ३
मागा हें एक तया "देवा सकला जनां सुमति द्यावी"
ईशा त्या स्मरुनि सदा जनहितकारी करीं सुकृति व्हावी ४

## २१ मनास शिकवण (द्रुतविलंबित)

श्लोक

हरिच एक वरी सुजना मना
पुरवि कोण दुजें तव कामना
तुज हवें सुख तें सुख जें सदा
हरिविणें न अशी सुखसंपदा १
दळण कांडण तो जनिचें करी
खलनिकंदन तो जनिंचें करी

परम आवडि त्यासि भलाइची
परम नावडि त्यासि खलाइची २
चतुर चौकस पंडित मंडळी
तिज न रम्य गमें हरि गोवळी
दुध दहीं पळवी भुलवी स्त्रिया
म्हणति ओंगळ ही हरिची क्रिया ३
यति जया भुलती भुलल्या तया
गवळिया जरि गोकुळिंच्या स्त्रिया
दुध दहीं प्रिय तो पळवी जरी
मधुर मंगल मंगल ही परी ४
रमण एक हरी गवळीजनां
रमण एक हरी गवळीणिंना
पति रमे जिथ तेथ रमे सती
मधुर भक्ति सुमंगल ही अती ५
तनु पतीसि समर्पि सुवासिनी
मन हरीसि तयापरि अर्पुनी
रमति सात्त्विक गोकुल कामिनी
स्मरुनियां हरिसी दिन यामिनी ६
नरहि नारिसवें हरिशीं रत
हरिसि ते क्षणही न विसंबत
गवळि ते व्यभिचारि असे मनीं
गवळणीहि अशा व्यभिचारणी ७
न पति देव न देव खरा सती
हरिच देव खरा कमलापति
गवळि गौळणि यापरि वागती
पथिं इयाच असे परमा गति ८
तरण या भविं एक असे हरी
दुध दहीं पळवी प्रिय तो जरी
मधुर मंगल मंगल ही परी

सुखवि गौळणि अंतरिं अंतरीं ९
रसिक भक्तिरसीं रमले कवी
विधिसि याचिति संतत या भवीं
"अरसिकांसि कवित्वनिवेदन
करि असें शिरिं ना करि लेखन" १०
नर कुणी बहु-पंडितताकर
हरिचरित्र गुणागुणसागर
ठरवुनी बरवें करण्या तया
कृति रची बहु-पंडितताभया ११
यजन तें शुभ वाङ्मय पावन
यजकिं मंगल भावन–भावन
मम मना ! कृति ती तुझिही मति
करिल प्रौढतरा निजसंगतीं १२
तरिहि एक तुला गुज सांगतों
मति तुझी हरि-गोप-पदीं रतो
गवळणीसम ती व्यभिचारिणी
हरिसवें रमु दे दिनयामिनी १३
नच तुलाहि दुजें पद मंगल
उभयतां म्हणुनी सुख-दंगल
हरिसवें करणें दिनयामिनी
हरिविणें सुख तें सुख ना जनीं १४
नर महात्मपदस्थ रणाग्रणी
हरिवचास्तव दे रण सोडुनी
विशद तन्मति कीं हरिसांगणी
"हरिविणें सुख तें सुख ना जनीं" १५
नय सुवीरविनिंदित सर्वथा
नय सुधीरविनिंदित सर्वथा
हरिवचास्तव आदरि तो रणीं
हरिविणें सुख कीं सुख ना जनीं १६

नगसमान सुनिश्चल-सत्यता
त्यजियली वरिली चलसत्यता
हरिवचास्तव कातर हो रणीं
हरिविणें सुख कीं सुख ना जनीं १७
नयन विश्वजनें जिथ लाविलें
नमन विश्वमतें जिथ भाविलें
हरिवचास्तव कातर तो रणीं
हरिविणें सुख कीं सुख ना जनीं १८
नरक सत्य रणांत पलायन
नर वरील न सत्यपरायण
हरिवचास्तव तोहि पळे रणीं
हरिविणें सुख कीं सुख ना जनीं १९
"नरमला; नरता-गुण ना पुरा !
"अखिल भारतिचा म्हणवी तुरा–"
हरिवचास्तव दूषण ना गणी
हरिविणें सुख कीं सुख ना जनीं २०
नय तुझाहि असाच असो मना
न गणिं तूंहि जनस्तुतिदूषणा
हरिवचा करिं तूं दिनयामिनी
हरिविणें सुख कीं सुख ना जनीं २१
नर महात्मपदस्थ जया पदीं
रमतसे हृदयीं सुविरक्तधी
पदिं तया हरिच्या रम तूं मना
हरिविणें सुख तें गणि यातना २२
नव पुरातन थोर महात्मया
लढवि वा पळवी वदुनी नया
नयविशारद तो हरि एकला
करि सखा परमप्रिय आपुला २३
लय तुझा हरिपायिं सदा असो

लव वियोग तुला हरिचा नसो
अवगणीं न कधीं हरिसांगणी
हरिविणें सुख तें सुख ना जनीं २४
नय महात्मदस्थहि नादरीं
जइं तुला शिकवील तसें हरी
वच कठोरहि बोल महात्मया
जइं हरी शिकवील तशा नया २५
यजन वाङ्मय बोल तुझा असो
सुवचिं दुर्वचिंही सुमती वसो
परहितार्थ हरिप्रिय जें वच
यजन तें गणिं सद्वच दुर्वच २६
चतुरता हरिची भव-नाटकीं
बसुनियां हृदयीं प्रतिपात्रकीं
शिकवि जें शिकणें पडतें जया
सुखद मंगल नाटक व्हावया २७
यश हवें नटनीं तुजला मना
तरि शिके शिकवी हरि ज्या खुणा
अळस वा हठ तूं करिशी जरी
अयश-भोग तरी बहुता परी २८
रसमयी हरिची कृति बा मना
रसमयी नट हृत्परिवर्तना
नट कुणी गुणगायन शांतिचें
करित, पूर्विल जे नट क्रांतिचे २९
चतुर मायिक हें शम-गायन
मलिन वा अति स्वार्थपरायण
सरल वा स्वमतीं परिवर्तन
नव नटप्रभु संमत नर्तन ३०
नर न बंदि असे हरि बंधनीं
स्वमतिचा कृतिचाहि असे धनी

हृदयिं बैसुनियां शिकवी हरी
परि न सक्ति करीत कुणावरी ३१
रति हिती हरिची सकलांचिया
हृदयिं बैसुनि यास्तव त्यांचिया
शिकवि जें हितकारि जधीं जया
परि न सक्ति करीत शिकावया ३२
यम[1] नसे सकलांसि सदा हित
शम नसे सकलांसि सदा हित
चतुर मायिकतायुत वीरता
म्हणुनि तो शिकवी खलमारिता ३३
तनु हरी धरितो जन तारण्या
तनु हरी धरितो खल मारण्या
खलविनाशक खंजिर गोलक
करि पसंत हरी जनपालक ३४
करि नवा शमगायक मूर्खता
करि महात्म पदस्थहि मूर्खता
शिकवितो हरि त्यांसि पळावया
शिकवितो तुज मूर्ख म्हणे तयां ३५
यदुकुलीं तनु घेउनियां हरी
निजमना उघडीत परोपरी
हरिचरित्र म्हणूनि मना पुरें
निजहितार्थ तुवां बघणें बरें ३६
रण जईं कुरुभूमिवरी पडे
स्वजन देखुनि पार्थ जईं रडे
स्वमन तैं हरिनें बहु ऊघडें
करुनि घालविले रुधिरी सडे ३७
डर नको मरणीं खलमारणीं

१. यम = सत्य व अहिंसा.

खलवधार्थक मायिककारणीं
मल अहंकृति स्वार्थपरा मती
त्यजुनि सर्वहितार्थ करी कृती ३८
तमविनाशक बोध असा हरी
बहुपरी कुरुभूमिवरी करी
करवि पार्थकरीं रणकंदन
मरवि मारवि थोरहि सज्जन ३९
न खल भीष्म पितामह वृद्ध तो
न खल द्रोण गुरूत्तम सिद्ध तो
खलसहायक दंड्य खलापरी
समरनीति अशी शिकवी हरी ४०
रघुकुलीं हरि राम रघूत्तम
जनहितार्थ वधीत खलाधम
खलवधीं ऋजुता तशि वक्रता
वरि विवेकयुता समयोचिता ४१
तनु मृगेंद्रमुखी धरुनी हरी
कशिपुच्या उदरा स्वनखीं चिरी
वर खरा करण्या वरि वक्रता
विहित ती समरीं समयोचिता ४२
तनु तनू धरुनी बलिनिग्रह
करि हरीं, न वरी ऋजुताग्रह
जनहितार्थ करी बलिदंडन
समयिं मायिकसाधनमंडन ४३
न धरुं शस्त्र अशस्त्र वसूं रथीं
बनुनि सारथि पार्थसख्याप्रति
पण असा करुनी हरि शस्त्र घे
समरिं संकटिं जैं सखया बघे ४४
घडिभरी रण भीष्म पितामह
करि अलौकिक घोर भयावह

मग हरी पणभंग करूनियां
चढवि पार्थबला मिळवी जया ४५
यम अहिंसन सत्यवचाग्रह
जनहितासि न जेथ हितावह
हरि न आग्रह तेथ कधीं धरी
वारे मना पथ तो हरि जो वरी ४६
रगडिले रणिं भीष्म जयद्रथ
इतरही बहु; त्या समयीं पथ
सरल ना वरिला, वरिला दुजा
विहित संकटिं उद्धरण्या प्रजा ४७
जप 'अहिंसन सत्य अमायिता'
जप 'खुला व्यवहार अगुप्तता'
जप खुळा 'खलसंघसहाय' हा
जप खरा 'समता जनराज्य' हा ४८
हरि अहिंसन सत्य अमायिता
ऋजु खुला व्यवहार अगुप्तता
शिकवितो जनताहित साधक
शिकवि ना जनताहितबाधक ४९
करित हिंसन भूतदयान्वित
स्ववचभंगहि भूतदयान्वित
वरित मायिकता मतिगुप्तता
हरि जनार्थचि भूतदयान्विता ५०
तप वरिष्ठ दयाच असे भवीं
तप मना तुज तें हरि शीकवी
करविते वचभंग महात्मया
करवि तत्करिं हिंसन ही दया ५१
यम अहिंसन सत्यकथाव्रत
जन महात्मपदस्थ न पाळित
व्रत वरिष्ठ तयासि दया असे

अतिदयाच तया चुकवीतसे ५२
सकल भूतहितार्थ झटे हरी
अतिदया हितकारि न हो खरी
अतिदया अदया जनिं होतसे
म्हणुनि ती हरिमान्य दया नसे ५३
सदयता अतिरेकि महात्मया
सुचवि सत्य रणच्युत व्हावया
हरिपदीं धरवी च्युति-आग्रह
हरिहि संमति देत निराग्रह ५४
हरि म्हणे अतिरेकि दयाफल
करिल भक्तविवेक महाबल
सदयता अतिरेकि महात्मया
क्षम न होईल तैं चुकवावया ५५
यदुवरें विवरूनि असें मनीं
म्हणितलें 'चल दे रण सोडुनी'
अतिदया वचभंग रणच्युति
करवि यापरि मोहवुनी मति ५६
तप वरिष्ठ दयाच असें भवीं
परि दया सुविवेकयुता हवी
अशि दया शिकवील महात्मया
अतिदयाफल-भोगिं हरी-दया ५७
यश सदा हरिच्या करिं खेळतें
प्रकृति संतत तत्पदिं लोळते
अयश बालजिवा बहु भाळतें
मतिविकासबळें यश वोळतें ५८
तनुसि रोग असाध्य सुदुःखद
बघुनि भूतदया-सुविशारद
करुनि हिंसन वांसरुं सोडवी
स्वकृतिनें सु-दयायश वाढवी ५९

वचनभंगदया न दया भली
दुजि अहिंसन-भंग दया भली
दुजि दया कुणि दावि सुधी खला
कुमति कीं अति रोग न चांगला ६०
लघु तनू हरिसी मन तें गुरु
मनचि कीं तरवी भवसागरु
परि कुरोग खलत्व मनीं जया
रडवि तें बुडवीत भवीं इया ६१
यदुवरें म्हणुनीच खला वध
अगद नेमियलें शुभ स्वास्थ्यद
तनु वधें मन कीं मनना करी
मनन रोग खलत्व करी दुरी ६२
रडत वांसरुं रोगि पछाडिलें
वधुनि व्याधितुनी वरि काढिलें
अशि दया असुनीहि महात्मया
खलवधीं दिसते न कशी दया ६३
यम अहिंसन धर्म सदा कदा
जपुनि वाढवि कां खल-आपदा
गुरु गणी तनु कां लघु कां मन
अदय कां गणि तो खलहिंसन ६४
न मज हें उमजे मजला हरी
खलवधीं दिसवी सुदया पुरी
खलवधीं जनताहित हो न हो
हित खला सुमतिप्रति भान हो ६५
हननदुःख अमर्त्य खलात्मया
हलवि लावि विचार करावया
मनन खोल विचार पुनःपुन्हा
हित सहाय खलात्मविकासना ६६
न मरणें मरणें मुळि या जनीं

दत्तो वामन पोतदार

मरण दुर्जनतायुत जीवनीं
हनन तारण होय दुरात्मया
मननकारण होऊनियां तया ६७
"यतमना गतकामन मारक
"हनन तत्कृत हो खलतारक
"यतमना गतकाम न मारक
"हनन तत्कृत ना खलतारक ६८
करूं न ये असलेंहि वितर्कन
वरु विकार कसेंहि भिषज्जन
ज्वरविनाशक घेववि तत्कर
हरवि काय न तें ज्वरित-ज्वर ६९
रगडिला खलिं एक दुजा खल
तरिहि तैं खल जो हत होइल
मनन तन्मनिंचें मरणोत्तर
उपकृतीच करील तयावर ७०
रगडणार दुजा विजयी खल
त्यजिल केविं कधीं खलतामल !
वधक त्याहि मिळेल कधीं कधीं
वधुनि गुंतविण्या मननामधीं ७१
धवल सात्त्विकता भविं जीवका
सहज प्राप्त न होय विना धका
बहुत जन्म तमीं रजिं रंगत
असुख ती हळु सोडवि संगत ७२
तनु न एकचि दृश्य जिवा असे
तनुचतुष्टय त्यासि न जें दिसे
जइं पडे जड दृश्य तनू क्रमें
अमर जीव अदृश्य भवीं भ्रमे ७३
मलिन-निर्मल-कर्म-विचारणा
करवि त्या भविं त्या सुखवासना

मनन हें घडवूनि सुधारणा
हळुहळू करि बुद्धिविकासना ७४
न खलता वधयोग्य सदा कदा
अगद तीव्र न योग्य सदा गदा
वधचिकित्स्य परी खलतारुजा
जइं तईं न उपाय पुरे दुजा ७५
जगतिं या जनराज्य-समत्व हो
हृदयिं ज्या दृढ हें नवतत्त्व हो
सहज त्या जनराज्य-विरोधक
गमति विश्वजनोन्नतिबाधक ७६
करुनि बोध तयां श्रमले किती
करुनि रोध अहिंसकही किती
वध चिकित्स्य असे खलता-रुजा
जइं तईं न उपाय पुरे दुजा ७७
जप 'अहिंसन सत्य अमायिता'
जप 'खुला व्यवहार अगुप्तता'
जप 'खुळा खलसंघ सहाय' हा
जप खरा 'समता जनराज्य' हा ७८
हनन, बोध, निरोध अहिंसक
त्रितय हें जनरोष-प्रकाशक
हळुहळूं जनराज्य-विरोधक
निवळवी वळवी मतिशोधक ७९
करुणवीररसीं भरले जन
करुं न जे शकती खलमारण
वरुनि सांघिक आत्मवधप्रथा
वरुनि तारक होउत भारता ८०
तप समष्टिक आत्मवधप्रथा
तप चतुष्टयिं उत्तम सर्वथा
करुणवीर रसीं भरले जन

करुत या तपिं भारतसेवन ८१
न मरणें मरणें मुळिं या जनीं
मरण दुर्जनतायुत जीवनीं
हनन तारण होय दुरात्मया
मनन-कारण होउनियां तया ८२
यजन तें न घडे भजका जया
यजन आत्मवधी न घडे जया
यजन बोध निरोध अहिंसक
सुकर त्यासि सुभाक्ति प्रकाशक ८३
करुनि शक्य तसें जनसेवन
वरि मना न मुळीं परिदेवन
हरिकरी कर दे, वर ना दुजा
गुरु तुला; गुरु तोच असो तुझा ८४
झडवि तोचि तमा झडवी रजा
चढवि सत्त्वगुणासि जिवा अजा
उडवि सूक्ष्म अहंकृति सत्त्वजा
बुडवि ब्रह्मरसीं लुटण्या मजा ८५
जप मना जनतारक तो हरी
तप तुझें असु दे जनचाकरी
खपवि तेथ बला हरिच्या मतें
हरिमतेंच सदासुख लाभतें ८६

## २२ भावभेट (वसंततिलका)

मी पद्यकार, कवि मी न, कवित्व सार्थ
लाभो मला जनुशतीं जनसेवनार्थ
भावूनियां मनिं असें शुभभाव कांहीं
बांधूनि छंदिं मुरलीधर पायिं वाही १
ही सृष्टि सुंदर विहारि-हरी विहार
सच्चित्सुखीं सुखमयी चितिचा चितार

आद्याद्वितीय कविकाव्य कलाविलास
राहैक सक्त-रसभक्त-रसात्म-रास २
सत्यत्व साधुमति-सुंदरता-प्रकार
येथें अपार मिरवी हरिचा विहार
जें सत्य ना सुमति ना सुभगत्व ना जें
एकासि तेंचि दुसऱ्यासि तसें विराजे ३
जेत्यासि सुंदर दिसे, न जिता तसें तें
जेत्यासि सुंदर दिसे, न जिता तसें तें
साम्राज्य सुंदर जयासि, जिता स्वराज्य
हा सर्व भेद हरि-मोद-विहार-राज्य ४
यत्नें महा मिळविलें रुधिरी रणांहीं
साम्राज्य जें स्वजन-सेवक-पूर्वजांहीं
जे संपतां स्वजन-गौरव संपताहे
ते राखणें स्वजन-सेवक-धर्म आहे ५
हेयांत हेय अतिगर्ह्य अनार्य-जुष्ट
दास्यांत आर्यवरवीरजनास कष्ट
साम्राज्यभंग करण्या रणसंगनिष्ठ
होणें तया स्वजन-सेवक धर्म इष्ट ६
टंकार संगर-सुयंत्रज-धर्मभक्तां
साम्राज्य-रक्षण-विनाशन-कार्य-सक्तां
वीरांसि सुंदर गमे प्रतिपक्षभक्षी
कीं तो जनीं स्वजन-सेवन-धर्म रक्षी ७
क्षीणार्यवृत्ति जडदेहविमोहसंगी
त्यासी न सुंदर गमे रण रक्तरंगी
तो वेधवाद कुणि शासनभंग कोणी
भावूनि सुंदर समर्थ म्हणूनि वाणी ८
नीतिप्रकार जगतीं बहुता परीचे
ते सर्वही विहरणें लहरी हरीचें
एकासि साधु नय तोचि दुज्या असाधु

एकांतही फिरत राहि असाधु साधु ९
धुर्याग्रणींतहि नसे ध्रुव नीतिबंध
साधुत्व सत्यहि फिरे फिरतांचि छंद
छंदानुसारि शुभता नय-सत्यता जी
व्यामोह ती पसरिते जनबुद्धिमाजी १०
जी नीति हेय गमते विबुधासि एका
ती श्रेय सुंदर गमे दुसऱ्यासि देखा
येणेंपरी सकल सुंदर साधु आहे
सत्यत्व सर्व नयिं यापरि राहताहे ११
हें सृष्ट सर्व शुभ सत्य सुरूप जाणा
कोणा विरूप न खरें न बरें न माना
मानील कोणि तरि तेंचि बरें तयाला
हे सृष्टि जीव-मन-बुद्धि-विकास-शाला १२
लाडें हरी सृजि भवा निज आत्मयाच्या
कीं आत्मचित्तिं उठली लहरी तयाच्या
एकाकि-सौख्य बहु भोगियलें, अतां जी
सोपाधि-सौख्य-रुचि-भोग हवा समाजीं १३
जी जी करूनि सुखवूनि विमोहियेलें
आत्मार्थ-सृष्टि-रचनोद्यमिं लावियेलें
जेणें तया सुखमया निज आत्मयाच्या
लाडें करीत हरि सद्रचना भवाच्या १४
या आत्मलालननिमित्त-भवांत देवें
जीवात्ममूर्ति रचिल्या स्वकलाप्रभावें
सोपाधिसौख्यरुचिभोग तदात्मयासी
जीवात्मसंगिं मिळतो भवि भोगण्यासी १५
सीमाप्रकार रचिले बहुता रितीचे
शारीर मानस तसेच परिस्थितीचे
सीमासुखें भविं अशा विविध प्रकार
जीवांसवे अनुभवी हरि सृष्टिकार १६

रस्ता जिवा सुखविकासक चिद्विकास
तो चिद्विकास घडवी भवि दुःखपाश
दुःखें म्हणूनि शुभरूप भवांत सारीं
साधुत्व सत्य शिकवूनि सुखा विणारीं १७
रीति प्रभुत्विं लहरी-मति-छंद-पूर्ति
याकारणें हरि रची भव-जीव-मूर्ति
याकारणें निज असीम सुखींहि दोष
काढूनि तो वरितसे भव-जीव-कोश १८
शक्ति स्वकीय विविधा विवरूनि जीवीं
त्यांचा प्रयोग करण्या हरि त्यांसि लावी
अन्योन्ययोग भवभोग अनेक जन्म
देऊनि वाढवुनि देइ तयां स्वधाम १९
मंथूनियां निजमना पसरी पसारा
मंथूनि जीवमन तो अवरीत सारा
हा सर्व खेळ हरिचा मन-मंथनाचा
साधुत्व-सत्य-सुभगत्व-गुणी सुखाचा २०
चाले इथें उलट खेळ असाधुताहि
तो सर्व थोर करण्या गुण साधुताहि
सच्चित्सुखी शुभमयी चितिचा चितार
ही सृष्टि सुंदर विहारि-हरी-विहार २१

## २३ हरिभजन (अभंग)

१ प्रेममय हरि प्रेममय हरि, कालियाचे शिरीं नाचताहे ॥ नाचताहे नाच जाच तो खराच । परी प्रेम-आंच नाचवी त्या ॥ नाचवी त्या प्रेम गाईगोवळयांचें । प्रेम जिव्हाळयाचें प्रेममया ॥ प्रेममया तया वहावें जीवन । प्रेममय मन करूनियां ॥ करूनियां प्रेम-कार्य तयापरी । मुक्ति लाभे खरी रंग म्हणे ॥

२ प्रेममय हरि । कंस स्वजन संहारी ॥ संहारी स्वजन । जेणें जाचियेले जन ॥ जन-जाचकासी । जाची सोडवी जनांसी ॥ जनांसी त्यापरी

प्रेमें साह्यय जो करी ॥ करी त्यासि मुक्त । रंग म्हणे रमाकांत ॥

३ प्रेममय देव हरि । नाना प्रलय कां करी ॥ करी जलप्रलय कां । करी प्लेग-प्रलय कां ॥ का तें सोपें समजाया । हरी म्हणे तोडा माया ॥ माया तोडावी देहाची । माया जोडावी देवाची ॥ देवाची ही प्रेमसांगी । रंग ऐके अंतरंगी ॥

४ प्रेममय हरिभक्ति । या जगतीं तारक ॥ तारक ही भक्ति बरी । शांति वरी सुनीति ॥ नीति वरी ही कल्पना । प्रेमपूर्ण वीणा ही ॥ हीन देह-मायाबेडी । कोण तोडी तयांची ॥ त्यांची भक्ति तारी त्यांस । रंग दास तियेचा ॥

५ प्रेममय हरि प्रेममय हरि । भवीं या संहारी जीव प्रेमें ॥ प्रेमें आरंभीला जीव-शिव खेळ । प्रेमाचेंचि बळ चालवी तो । चालवी तो जीवा स्थूल सूक्ष्म भवीं । शिवत्व-पदवी प्राप्त व्हाया ॥ व्हाया शिव जीवा नाना देहयोग जन्ममृत्युभोग त्याचें नांव ॥ नांव मृत्यु जीव अमर ओळखा । रंग म्हणे सखा भजा हरि ॥

६ प्रेममय हरि-भजनाची रीति । स्वयें प्रेममूर्ति व्हावें जनीं ॥ जनीं आपुलालें कर्तव्य करावें । जन उद्धरावे आत्मोद्धारीं ॥ आत्मोद्धारीं दृष्टी अंतर्मुख व्हावी । विषयांचे गांवीं गुंतों नये ॥ गुंतों नये तमीं गुंतों नये रजीं । सत्त्वाचि समाजीं उद्धारक ॥ उद्धारक ज्ञानयुक्त ऐक्यभाव । हा सत्त्वस्वभाव सुप्रसिद्ध ॥ सिद्ध हा करावा येणें आत्मोद्धार । येणें जनोद्धार रंग म्हणे ॥

७ प्रेममय हरी । करी जीवांची चाकरी ॥ रीति चाकरीची । भिन्न स्थळीं भिन्न साची ॥ साची प्रेमकला । घास भरवीत बाला ॥ बाला घास, थोरा । फांस देई दुराचारा ॥ दुराचारा फांस । प्रेमें जैसा बाला घास ॥ सर्वां आत्मसुख । द्यावया हें सुखदुःख ॥ खऱ्या प्रेमें दावी । रंगनायक या भवीं ॥

८ प्रेमाच्या सेवका प्रेमें नमस्कार । असो दावेदार आस्तिक्याचा ॥ आस्तिक्याचा दृढ परी प्रेमशून्य । ऐसा जन मान्य मूढ जीवा । जीवा शिवपद जनप्रेमावीण । आस्तिक्य-भजन पाववीना ॥ विना आस्तिकता जनोन्नतीसाठीं । करी आटाआटी प्रेममय ॥ प्रेममय ऐसा जन हरिमान्य । विश्व हरिशून्य दिसो त्यासी ॥ त्यासी प्रेमें पुनः पुन्हा नमस्कार । रंगाचा सादर सर्वकाल ॥

९ प्रेमशून्य स्वार्थी विषयीं आसक्त । कालें होय भक्त प्रेममय ॥ प्रेममय हरि विश्व हें उभारी । लपे विश्वांतरी लीलेसाठीं ॥ लीलेसाठीं केला कैवल्यीं पसारा । अद्वैतीं डोलारा द्वैतमय ॥ द्वैतमय विश्वीं प्रेमाचें अद्वैत । कालें होय प्राप्त जीवा जीवा ॥ जीवा तम-रज-सत्त्व-गुण-भोग । पुढें शिवयोग ऐसा क्रम ॥ ऐसा क्रम जीव विकासाचा येथें । कामाचें भरतें प्रेमाआधीं ॥ आधीं जीव जीव विषयीं आसक्त । कालें होय भक्त रंग म्हणे ॥

१० प्रेममय जन नास्तिक्य-आसक्त । कालें होय भक्त हरिमय ॥ हरिमय विश्व विश्वरूप हरि । विश्वाचे अंतरीं बाहेरी तो ॥ तो न दिसे असे लपूनी सर्वत्र । अत्र परत्र सर्वकाल ॥ कालक्रमें बहिर्मुखता वोसरे । अंतरीं मोहरे बोधशक्ति ॥ बोधशक्ति होतां अंतर्मुख वरी । अंतरीं श्रीहरी तिज दिसे ॥ दिसे निजांतरीं दिसे विश्वांतरीं । दिसे विश्वाकारीं विश्वातीत ॥ तन्मय त्या कालीं नास्तिक प्रवर । होय भक्तवर रंग म्हणे ॥

११ प्रेम सर्वाभूतीं सर्वहितरति । सात्त्विकाची स्थिती श्रेष्ठतम ॥ तम तें न जाणें हित पर निज । मध्यें राहे रज भोगकाम ॥ काम जिंकी तम प्रेम जिंकी काम । तम-काम-प्रेम-खेळ विश्व ॥ विश्व गुण खेळ गुण-मूळ हरि । गुणांचा व्यापारी गुणातीत ॥ गुणातीत गुणमूळ हरि ब्रह्म । तोचि गुण कर्म-कर्ता ईश ॥ ईशाचें निजांग जीव साहंकार । अंगींचा आधार अंगा सदा ॥ सदा सुख लाभे वागतां या बोधें । असुख विरोधें रंग म्हणे ॥

१२ प्रेम बोधें वाढे प्रेमें बोध वाढे । देई सुख गाढें वाढ त्यांची ॥ त्यांची उभारणी कामीं अंधतमीं । करी विश्वस्वामी लीलाप्रिय ॥ प्रिय त्या दर्शन निजसामर्थ्याचें । म्हणूनी तो नाचे विश्वनाच ॥ नाच हा जाचक अबल जीवासी । परी नाच-हौसी मानीना तें ॥ मानीना तें जीव निजांग तयाचें । बलवंत नाचें करूं म्हणे ॥ म्हणे तैसें करी जीव जीव बली । होत असे कालीं हरि-नाचें ॥ हरि-नाचें कालीं प्रकाश हो तमीं । कामी होय प्रेमी रंग म्हणे ॥

## २४ देव-कथा (अनुष्टुप्)

देवा मानवता तापें तापली विविधा परी
करी प्रयत्न विविध ताप घालविण्या दुरी १

रुष्ट कोणी म्हणे स्पष्ट नसे देव कुणी कुठें
कष्ट हे देव असतां आम्हां हें न मुळीं पटे २
टाकी न मानव भला कष्टीं स्वजन यापरी
देवाचे जन सारे हे देव कष्टी कसा करी ३
रमे स्वजन-कष्टीं जो देव तो देव कायसा
नसेच तो जगामध्यें तयाचा न दिसे ठसा ४
सुजाण जाणती विश्व नियमीं बांधिलें दिसे
नियमीं बद्ध विश्वाचा कर्ता कोणीतरी असे ५
साधुत्व परि त्या ठायीं दिसेना म्हणुनी तया
देव नांव नये देऊं देवता साधुता-मया ६
यथामति यथाशक्य मानव्यसुखवर्धन
करावें करुनी यत्नें दुःखकारक मर्दन ७
नाहीं पुनर्जन्म नाहीं मरणोत्तर जीवन
नाहीं व्यक्तित्व हें नित्य नाहीं कर्मज बंधन ८
नाचे कुणी एक सत्त्व रची विश्व विलक्षण
विश्वांत नाचवी जीव अल्पजीवित लक्षण ९
नाहीं तें प्रार्थना-योग्य कुणी प्रार्थू नये तया
व्यर्थ हो प्रार्थना तेथें तया नाहीं मुळीं दया १०
युक्तिनें शक्तिनें जें जें स्वयें होईल तें करा
विश्वकर्त्या नका मागूं कष्टी कैशाहि आसरा ११
रुष्ट कोणी असें स्पष्ट उपदेशी जनामना
अरुष्टही विज्ञ कोणी आधिभौतिक शाहणा १२
नसे कर्ता नियन्ता वा विश्व होय स्वभावतां
जड-जीव-समाहार आद्यन्त जड तत्त्वतां १३
तुष्ट याही मतीं कोणी कल्पना मानवी बली
कल्पिते विविधा रीती व्यवस्था या भवांतली १४
लुटा कोणाहि कैसेंही सुख भोगा हवें तसें
मरणोत्तर शून्यत्व देवभीति वृथा असे १५
सुखाचे लंपट कुणी तत्त्वज्ञान असें जगीं

जागवीती गाजवीती    यथामति युगीं सुगीं    १६
गाई कोणी करा पाप    पश्चात्तापासि कारण
पश्चात्तापेंच कीं लाभे    देवाचें दिव्य तारण    १७
नृशंस रासपूतीन    रूसीं यापरि गाउनी
महंत जाला मूर्खांचा    महदाश्रय पावुनी    १८
नको धर्म नको देव    नको ही रासपूतिनी
असें रूसीं तत्त्व जन्मे    धर्माच्या जुलुमांतुनी    १९
नास्तिक्य देव-धर्माचें    कष्टधर्मविकासन
रूसीय विश्व वरिती    कष्टनिष्ठ-प्रशासन    २०
नाहीं विज्ञान शास्त्रीय    अंधविश्वास मातला
धर्मसेवकमन्यांनीं    हुतुतू बहु घातला    २१
लुच्चे लुटारू विषयी    खुनी सत्ता-सहाय्यक
धर्मसेवक होती हें    पाहुनी लोकनायक    २२
रूसीं प्रचार करिती    नसे देव कुणी कुठें
देव-धर्म अशास्त्रीय    शास्त्रा तो न मुळीं पटे    २३
टाकावा तो कष्टनिष्ठ    मानव्य-सुख-वर्धन
करावें करुनी यत्नें    दुःखकारणमर्दन    २४
नीतियुक्त बलानें जें    स्वयें होईल तें करा
नसे देव नका मागूं    तयाचा दुःखि आसरा    २५
रूसीय कष्ट निष्ठांच्या    नायकां देव ना दिसे
त्यांच्या मतीं देवधर्म    मौर्ख्य कौटिल्य वा असे    २६
सज्जना त्यापरी येथें    दलितोद्धारका कुणा
माया-कर्म-पुनर्जन्म    वाटे कुटिल-चालना    २७
"नित्य कष्टांत ठेवाया    कष्टमज्जित बांधवा
"माया माया कर्म कर्म    अशी उडविती हवा"    २८
वदती यापरी कोणी    सभाध्यक्ष सभांतुनी
वाद हा भारतीं जन्मे    धर्माच्या जुलुमांतुनी    २९
नाना धर्ममतें येथें    सर्वधर्मसभागृह
जाहलें भारत परी    येथें धर्म-दुराग्रह    ३०

हाय हा आग्रह असे भारता अशुभ ग्रह
शुभ तोही दिसे कोणा शुभ ज्या ग्रहविग्रह ३१
हितशत्रुत्व सर्वांचें गृहविग्रह हा करी
हितार्थ धर्म सकळ त्यांची झुंज नसे बरी ३२
राहील झुंज धर्मांची अविचारी दुराग्रही
भारतीं तोंवरी कैंचें तया स्वातंत्र्य ये गृहीं ३३
हाल भोगील बहुत गृह-विग्रह-शीलता
धर्म-दुर्ग्रह जातील तेव्हा सुदिन भारता ३४
तत्त्वशोधक दृष्टीनें नाना-धर्मीय पुस्तकीं
अभ्यासिली धर्म-कथा कथिली धर्म-हस्तकीं ३५
कुराणाची कराराची जुन्या आणिक नूतन
साद्यंत सांगणी सर्व पाहिली लावुनी मन ३६
नुकतीच अव्हेस्ताची थोडी ओळख जाहली
थिऑसफी जुनी मित्र बुद्धसंगति लाभली ३७
लीनतेनें जुने कांहीं धर्मज्ञ नवही तसे
अभ्यासिले निजपर जालें शक्य जई जसें ३८
सार या सर्वसंगाचें सर्वधर्मज्ञसांगणी
"सर्वात्मभाव दे मोक्ष" ही सांग मुरली मनीं ३९
नवनीताचि धर्मांचें सकलीं स्वात्मभावता
साधुता श्रेष्ट ती हीच दया-प्रेम प्रकृष्टता ४०
तत्त्व जें सत्त्व जें मूळ विश्वाचें जीवसंमित
तें दया-साधुता-हीन मति ही मोहचेष्टित ४१
तें एक मूळ सर्वांचें सर्व जें व्यक्त होतसे
तें तयाचेंचि कर्तृत्व कांहींही त्याविणें नसे ४२
सारापसारा विश्वाचा विकास क्रीडनोद्यम
देव तो एक मांडीत विश्वातीत सदासम ४३
माया जैशी मांत्रिकाची वस्तु कांहीं करीतसे
सामान्य जन जाणेना कैशी ती व्यक्त होतसे ४४
सुबुद्धिमंतही तैसा जाणेना विश्वनिर्मिति

मायाकार्य तया विश्व मायी त्यासि जगत्पति ४५
तो देव एक सोडूनी माया तत्कार्य सर्वही
खरा सदा स्वयंभूतो खोटें तदितर क्षयी ४६
या खोट्यांत खरें खोटें क्षयी-अक्षयवाद हा
सापेक्षबुद्धीनें चाले देव-माया-प्रसाद हा ४७
हा खेळ देव-मायेचा खोटा देवा खरा अम्हा
देवाहि तो खरा मानूं माया कीं तत्प्रियोत्तमा ४८
मायारहित देवाचें कैवल्यसुख उत्तम
किंवा त्याचें समायाचें सत्प्रेमसुख उत्तम ४९
महाज्ञानी-महायोगी- महाभक्त-विवाद हा
चाले सतत सर्वत्र देव-माया-प्रसाद हा ५०
हा वाद गीता-गीतांत मिटवी प्रभु या मतें
सद्भावे[1] साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते[2] ५१
त्याचे कैवल्य सत्प्रेम[3] सत्पदें मुनि वर्णिती
या रीती मूळ देवाचें स्तोत्र गाई रमापती ५२
तुल्य कैवल्य-सत्प्रेम- सुखें देवा हरी वदे
ज्ञानिया योगिया भक्ता तो यथारुचि भोग दे ५३
दे प्रेमसुख भक्ताला भक्ता कीं प्रेम आवडे
प्रेम ओझें जया वाटे कैवल्यसुखि तो दडे ५४
डोले प्रेमसुखें भक्त कैवल्यें डोलती दुजे
दोनी सुखें भोगिताती भक्तिमान् ज्ञानियोगि जे ५५
जे आजला कष्ट-रुष्ट तुष्ट ते सर्वभावतः
बोधें प्रेमें संयमानें व्हावयाचे स्वभावतः ५६
तापुनी भवतापानें म्हणोत भवि देव न
म्हणोत साधुता-शून्या देवा तें नांव देउं न ५७
न हो भव अभावांत तो देवांताचि संभवे

---

१. सदेव सोम्य इदमग्र आसीदेकमेवादितीयम् (छांदोग्य. ६.२).

२. गीता १७.२६.

३. सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांति मृच्छति (गीता ५.२९).

साधुतां भवि साधूची : तीहि देवाविणें नव्हे : ५८
हो न जें मूळ देवांत : संभवे जीवि तें कसें :
साधुता-मय तो देव : जीवीं यास्तव ती दिसे : ५९
साधुता-मय तो देव : कष्ट देतो जिवा कसे :
साधु मानवही ज्यांतें : पाहुनी रुष्ट होतसे : ६०
साधु मानव सामान्य : एक पात्र भवीं इया :
साधुता-मय तो देव : भव-नाटक-खेळिया : ६१
या खेळीं या नाटकांत : रंगभू असती बहू :
दृश्यादृश्य तशीं पात्रा : देह-देहान्तरें बहू : ६२
हा खेळ सद्विकासाचा : पूर्ण सद्रूप खेळत :
हा खेळ चिद्विकासाचा : पूर्ण चिद्रूप खेळत : ६३
त्यानें पात्रविकासार्थ : कष्ट तुष्टि-प्रकारही :
योजिले बहु हें जाणे : त्या न रुष्टवि ही मही : ६४
हा नसे एक जन्माचा : तमाशा अप्रयोजक :
येथें हिशोब कर्माचा : अवघा ठेवि योजक : ६५
कर्में पात्र करी जीं जीं : कायेनें वाणिनें मनें
तद्विकासार्थ तीं होतीं : भवनाटकिं साधनें ३६
नास्तिका प्रार्थना हीना : आस्तिक्य प्रार्थनापर
विकासक्रमिं हो प्राप्त : पुढें सद्भक्तिचा भर ६७
रमे तो दिव्य साधुत्वीं : ज्ञानि हो योगि हो कर्मे
क्रमें तो कैवल्यीं प्रेमीं : देवासह सदा रमे ६८
मायेंत व्यक्तिनित्यत्व : कैवल्यीं व्यक्तिचा लय
लय तो बुद्धिचा बोधीं : बुद्धि तैं एकता-मय ६९
या एकत्व-सुखा थोर : जीव अन्यहि सत्वर
यावे या हेतुनें योगी : ज्ञानी ये जागृतीवर ७०
रमे तो या जागृतींत : प्रेमकार्यीं यथाबल
श्रमतां सेवि कैवल्य– : समाधि सुख मंगल ७१
लीला सर्वत्र देवाची : एकाची जीव तो जड
जड जीव विकासाच्या : लीलेची त्यासि आवड ७२

डोळे भरुनि त्या पाहे समाधिस्थ निजान्तरीं
पाहती विसरे सारें विरे त्या सुखसागरीं ७३
राहे सुखें देवरूप देव जोंवरि त्याजला
न जागवी स्वकार्यार्थ योजुनी स्मृतिची कला ७४
लीलाकार्यार्थ तो देव जागवीत कुणा कुणा
त्याचा धनी तो, या कामीं करी तें येइ जें मना ७५
ना म्हणे कोण त्या देवा जीव अन्यहि सत्वर
देवरूप करायासी मुक्त ये जागृतीवर ७६
रमे तो या जागृतींत प्रेमकार्यीं यथाबल
श्रमतां सेवि कैवल्य- समाधिसुख मंगल ७७
लागतो काल बहुत जीवा व्यक्तित्व यावया
लागतो काल बहुत व्यक्ति देवीं विरावया ७८
या नाटकीं मानवाचें मन घे व्यक्तिरूप जें
अहंतेच्या प्रकर्षानें तें न अन्यत्र ऊपजे ७९
जागे अहंता चित्तांत देहाशीं एकरूपता
पावे व्यक्तित्व तें पूर्ण व्यक्तिं देह-स्वरूपता ८०
ताप होय सुखासंगें या व्यक्तीसि भवान्तरीं
तापें त्या चित्त हो भग्न तेव्हां मनन तें करी ८१
रमावाया देहरूप मननें जीव घेतसे
मननेंच रमायाच देवीं तो लीन होतसे ८२
सार हें सार तें ऐशीं वृत्ति चित्तीं फिरे विरे
मनोविकास या रीती होउनी भव वोसरे ८३
रमे समष्टिसेवेंत कालें जीव यथाबल
बोधें प्रेमें संयमानें पावे तो मुक्तिमंगल ८४
लीला आनंद-विज्ञान- मन-प्राणान्न भूमधीं
खेळे जीव-प्रवृत्तीची निवृत्तीसिहि देवधी ८५
घाला सद्रूप चिद्रूप कैवल्यें स्वनिरीक्षणें
आनंदभूत आनंदें जीव निर्मीत [1]ईक्षणें ८६

१. तदैक्षत बहुस्यां प्रजा येयेति (छांदोग्य. ६.२).

नाहीं भेद तिथें भारी    जीवा देव शिवे तिथें
विज्ञानभूंत जीवाचें    जीवमित्रत्व वाढतें    ८७
त्यासि दूर पडे देव    जीव हो जवळी गडी
जीवता-व्यापि तत्प्रेम    देवा देखे घडी घडी    ८८
डोळे हळू हळू त्याचे    मनोभूंत स्वतःकडे
लागती; देव दूरावे    व्यापकप्रेमही उडे    ८९
डोले तो प्राण भ्रूमध्यें    सूक्ष्मेंद्रिय विलोभनें
अन्नभूतं स्थूलभोगें    रंगे देहासि मी म्हणें    ९०
नाटकीं देवमायेच्या    रंगभू पांच यापरी
अन्नादि तीन बद्धाच्या    मुक्ताच्या दोन त्यावरी    ९१
रंगभू मानसी सेतु    मन मोक्षद बंधक
विज्ञानोन्मुख दे मोक्ष    बांधी तें इंद्रियोन्मुख    ९२
खालीं स्थूलांत आलेला    जीव मानवयोनिज
अनेक जन्म श्रमुनी    बंध तोडीतसे निज    ९३
जन्मे मरे स्थूल देह    सूक्ष्मदेहचतुष्टय
प्राणादि न मरे राहे    माया नाटकिं अक्षय    ९४
या चार देहीं घटक    वाढवी अगुणी गुणी
स्वकर्मांहीं स्वयें जीव    कर्ता कर्मफला धनी    ९५
नष्ट होतां स्थूल देह    सूक्ष्मदेहस्थ जीवन
प्राणादिभूंत लाभे त्या    यथाकर्म यथागुण    ९६
नारकीय दुःखभोग    स्वर्गीय सुखभोगही
यथाकर्म तिथें भोगी    पुढें त्यासि पुन्हा [1]मही    ९७
हें गतागत जिवाचें    चाले तोंवरि जोंवरी
बोधें प्रेमें संयमानें    मुक्त तो न महीवरी    ९८
रंगभू ज्या स्थूल दृश्य    त्या महासम सर्वही
सूर्यादि तारेही सारे    स्थूल तेजोमयी मही    ९९
ह्या मही आंत बाहेर    व्यापिते प्राणरंगभू

---

१. प्राप्यन्तं कर्मणस्तस्य यत्किंचेह करोत्ययम् । तस्माल्लोकात्पुनरैत्यस्मै लोकाय कर्मणे ॥ —बृहदारण्यक ४.४.६.

प्राणा मन मना बोध बोधा आनंद रंगभू १००
भवभू पांच या यांसी सच्चिदानंद व्यापक
व्याप हा सच्चिदानंद कां करी जीवतापक १०१
कां करी करितो कैसा एकटा एक सर्वथा
कळेना म्हणुनी माया कल्पिती ही खरी कथा १०२
थांबतो तापक व्याप समाधींत नुरे भव
भवव्यापा कुणी ज्ञानी माया वदति वास्तव १०३
व्याप हा तापक जरी बद्ध जीवा कधीं कधीं
मुक्ता सुखद आहे हा बद्धाहि सुख यामधीं १०४
धर्म तो जो बद्ध जीवा दावी सोपान मुक्तिचें
सोपान हें संयमाचें बोधाचें प्रेमभक्तिचें १०५

चालेल देवा भव-खेळ तूझा
जसा तसा तो प्रिय होउ माझा
प्रार्थी तुला मी, सकलां मलाही
सद्बुद्धि दे सत्कृतिची कला ही १०६
हालांत कोठेंहि कुणीहि लोक
त्यांचा कृपाला करिं दूर शोक
प्रभुत्व दे अक्षय कष्टनिष्ठां
भवीं भवान्तींहि विमुक्ति इष्टा १०७

## २५ समाजस्वास्थ्य (अनुष्टुप्)

समाजस्वास्थ्यकारांची समाजहितचिंतना
ऐकिली वाचिली कांहीं ती न ये माझिया मना १
समाजा ध्येय योगाचें असावें वाटतें मला
समाजा ध्येय भोगाचें नसावें वाटतें मला २
योगीं आनंद, भोगींही आनंद परि योगज
आनंद श्रेष्ठ मजला वाटे आत्मप्रसादज ३
भोगिता अंगसंगाची भूक स्त्रीपुरुषांस दे
योगिता आत्मसंगाची भूक स्त्रीपुरुषांस दे ४

भोगिता-योगिता-योग मानवीं योजुनी हरी
अत्याश्चर्य-मयी लीला संसारीं या उभी करी ५
भोगिता टाकितां येना समाजास्तित्व तीवरी
आधारलें असे नित्य योगित्वा तीच पायरी ६
पायरी पहिली तीच परी ती पायरी असे
चढुनी ती असे जाणें ध्येय ती पायरी नसे ७
ध्येय योगित्व, विज्ञान– निष्कामप्रेम-संगिता
देहभोगित्व यासाठीं यासाठीं कामसंगिता ८
समाजीं सृष्टिविज्ञान– आत्मविज्ञानकामिता
स्वास्थ्य-सौख्य-समाधान– समुन्नति करी हिता ९
समाजीं प्रेम निष्काम समाजस्वास्थ्यकारक
दुज्या समाजा स्वबळें प्रसंगीं होय तारक १०
या ज्ञान-प्रेम-योगार्थ भोग कांहीं अवश्य हो
योगानुकूल तो भोग संसारीं या अदूष्य हो ११
दूष्य भोग दुजा सर्व समाजस्वास्थ्य घातक
समुन्नतिविरोधी तो घडवी बहु पातक १२
"धर्माऽविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि" हरि बोलिला
योगानुकूल तो भोग श्रीहरीनें प्रशंसिला १३
न म्हणें मी ग्रंथवाक्य प्रमाण धरणें तुम्हीं
प्रमाण एक तुमचा सद्विवेक धरा तुम्हीं १४
तोचि प्रमाण मजला त्यासि मी हरि नांव दे
योगानुकूल तो भोग भोगा ईं हरि तो वदे १५
समाजस्वास्थ्यकारांचें स्वास्थ्यशास्त्र निरीश्वर
समाजस्वास्थ्यकारांचें साम्यशास्त्र निरीश्वर १६
या निरीश्वरशास्त्रांत देहान्तीं शून्य सर्वथा
न आत्मा ना देव यांसी जड हो चित्कला-पिता ! १७
स्वास्थ्यशास्त्र साम्यशास्त्र माझें सात्मक सेश्वर
ईश्वरांची एक लीला नव शास्त्रें निरीश्वर १८
मला निरात्म-निर्देव शास्त्रीं संतोष एकदां

जाला परी तो ठरला विचारान्तीं महापदा १९
महामतित्व मूर्खत्व एकत्र वसती जिवीं
निरात्म-देव शास्त्रांचा जन्म तेणें घडे भवीं २०
लीला ही देवदेवाची अनंत गुणसंकर
अनंत रीतींनीं येथें करी तो परमाक्षर २१
नटे तो एकला सर्व सर्व हे नट एकला
मूर्ख तो बुद्धिमान् तोच त्याची अद्‌भुत चित्कला २२
कला जी अंतरीं त्याची सद्विवेक म्हणीतली
तिला नांव हरी दे मी व्यवहारांत ती भली २३
ती देई मंत्र मजला मी वाढें ऐकुनी तिचें
माझीं यत्रें देह मन; खचे यंत्र न मी खचें २४
पडे देह तदा ती मी मनही न पडे मुळीं
'पडे देह तदा शून्य' कल्पना ही असे खुळी २५
नसे योजक कोणीही निसर्गचि कसा तरी
रसायनी-क्रियायोगें मार्क्स कर्वे उभेकरी २६
ही खुळी कल्पना मातें दावी देव-कला बळी
नमें मी भावनोद्रेकें नट प्रभुपदातळीं २७
असो तें; स्वास्थ्यशास्त्राचें सूत्र घेऊं पुन्हा करीं
योगानुकूल तो भोग भोगा हें वदतो हरी २८
योगानुकूल भोगाची व्याप्ति व्यक्ति-परिस्थिति
ठरवी बहुता अंशीं जशी स्थिति तशी रति २९
नको भोग जया जीवा तृतीय-प्रकृति-स्थिता
नको थट्टा मुळीं त्याची जीव-ध्येय न कामिता ३०
हवा भोग बहू ज्यांसी ते भोगोत यथास्थिति
कामिता अति ही त्यांची नसे अंतिम उन्नति ३१
उन्नत्यर्थ तयां योग्य कामिता-संयम-क्रम
सद्‌वृत्ति-वृत्त-अभ्यासें होईल सफल श्रम ३२
सुसंयमी ते होतील या जन्मीं वा कधीं तरी
कामिता-संयमाभ्यास आत्म्याची उन्नती करी ३३

ब्रह्मचर्य-प्रयत्नाची कामशास्त्रीं अयुक्तता
वानुनी युक्त म्हणती समाजीं भोगमुक्तता ३४
हक्काचें युग हें ! हक्क मुक्तभोग अनर्गळ !
स्वास्थ्यकारांसि सोसेना मुक्त भोगेच्छुचा छळ ! ३५
ऊढां अनूढां स्वास्थ्यार्थ मुक्तभोग प्रशंसिती
गर्भ-रोग-निरोधार्थ यंत्रें तंत्रेंहि शंसिती ३६
महामंत्र जनां त्यांचा "कामपूर्ति करा करा
कामानंद महानंद यंत्रें तंत्रेंहि वापरा" ३७
"कामानंद महानंद भोगिती धन्य ते जन
अभागी अन्य सकळ" जप हा करि तन्मन ३८
जप हा त्यांजला वाटे समाजहितचिंतना
वाटो पटो त्यांजला ही ती न ये माझिया मना ३९
कामानंद महानंद जाणतों मी; परी मला
विद्यानंदादि आनंद महत्तर गमे भला ४०
स्वास्थ्यकारांपरी मातें स्त्रियांसि पुरुषांसम
हक्क कामोपभोगाचा असावा हा पटे क्रम ४१
ब्रह्मचर्य प्रयत्नाची निंदा परी न आवडे
हेटाळणी संयमाची यंत्रश्रद्धाहि नावडे ४२
डॉक्टरी मत सर्वस्वीं श्रद्धेय नसतें जनीं
देहापलीकडे कांहीं पूज्य आहे कुणा मनीं ४३
देवपूजा टाकुनीयां देहपूजा वरीयली
देहीं कामानंद मोक्ष श्रद्धा ही आदरीयली ४४
महामूर्खत्व हें मातें गमे; यासि कुणी कुणी
महामतित्व मानी ती मी महामूर्ख त्यां जनीं ४५

## २६ तारक-नीति ( द्रुतविलंबित )

हरि तुझी करणी न कळे कुणा । कमल वामन माइ तुझ्या गुणां
स्मरुनि आत्मसमुन्नतिच्या पथीं । करुत शक्य तशी सुभगा कृति १
तुजमनासि गोड तुझीं सगळीं मुलें । मजहि गोड तुझीं सगळीं मुलें

कमल वामन माइ तशींच तीं । करुत शक्य तशी सुभगा कृति २
तव-हरी सकलां पितृ-मातृता । मधुर अद्भुत ही तव कर्तृता
वर वधू-पण येथ परोपरी । घडुनियां घडिसी तनु तूं हरी ३
रमसि तूं भविं जीव तुझे गडी । मरति ते रमतां श्रमतां घडी
वर-वधूत्व म्हणूनि परोपरी । घडुनियां घडिसी तनु तूं हरी ४
रमविसी तनु देउनियां मृता । फिरफिरूनि जिवासि तनूभृता
रसुनि जीव इथें विविधा परी । करि निजोन्नति आत्मबलें पुरी ५
रुचिर जी करणी गमते अजी । रुचिर ती न उद्यां, करणी दुजी
रुचिरशी गमते; गति यापरी । प्रगतिच्या पथिं जीव भवीं करी ६
रुचिर देहसुखें नवजीवका । असुख देहसुखा बसतां धक्का
रुचिर बोधसुखें गमती क्रमें । प्रगत जीव प्रबोधसुखीं रमे ७
मनचि साधन या प्रगतिक्रमा । मन करीत जईं मनन-श्रमा
तनुसुखासि तईं विटतें क्रमें । प्रगत जीव प्रबोधसुखीं रमे ८
मज तशीं दुसऱ्यासि सुखें हवीं । मति अशी मननें प्रगता जिवीं
उदित हो नित तो मग आपणा । असुख घेउनिही सुख दे जनां ९
न जनसेवक हा तुज मानित । कुणि कुणी; नसशीच वदे नित
नित वदे मतिशून्य निसर्ग हा । सृजितसे मतिमंत जिवा महा १०
हरि तुझी करणी न कळे कुणा । लपसि तूं प्रगताहि कुणा कुणा
प्रगतिची गति नास्तिकतेंतुनी । मतिसी काढितसे परि ओढुनी ११
न गति आस्तिकतेविण शेवटीं । न मति राहत नास्तिक शेवटीं
मनन जें करितें अजि नास्तिक । मनन शेवटिं तें करि आस्तिक १२
कृति निसर्ग असे मतिची तव । तदुदरीं लपुनी अवघा भव
भरिसि जीवगणी; प्रतिजीवकीं । मतिसि जागविसी असुखीं सुखीं १३
खळ नसे कधिंही तुझिया श्रमा । श्रमिंच भोगिसि तूं नित विश्रमा
श्रमसि जीव-विकासन-उद्यमीं । रमसि संतत शांत इया श्रमीं १४
मनुज जीव जिवांमधिं अंतिम । मुनि महान् मनुजांमधि अंतिम
हरिच-मी-मननीं मुनि हा रमे । हरि घडी हरि यापरि स्वश्रमें १५
मनुजता तमलीन तमांतुनी । मनुजता रजलीन रजांतुनी
मनुज सात्त्विक सत्त्वगुणांतुनी । निघुनि हो हरि-मी-मननीं मुनि १६

नितमनीं हरि-मी-जप जो करी। जनहितश्रम हें तप आचरीं
वर-वधूपण जीव न तो वरी। वर तया हरि त्यासि वधू हरी १७
रमुनि जीव इथें विविधा परी। करि निजोन्नति यापरिची पुरी
रमवि त्या तनु देउनियां मृता। फिरफिरूनि हरीच तनुभृता १८
तनु घडीत तयास्तव आपण। घडि तदर्थ वरत्व वधूपण
लपुनि तो सकलीं सकलां मति। सकल देउनि साधि तदुन्नति १९
तमहि तो रज तो गुण सत्त्व तो। प्रकृति, ईश परात्पर तत्त्व तो
जड तदीय तमावृत रूपडीं। अजड अन्यगुणावृत रूपडीं २०
डुलति जीव तयां हरि डोलवी। स्ववश जीव हरीवश या भवीं
निजसुखार्थ रमोत वधूवर। रमवि त्यां हरि विश्वसुहृद्वर २१
रमत एक हरी जडिं वा जिवीं। गमत हें मत सत्य मला भवीं
श्रमत मी श्रमवी हरि त्यापरी। स्वमत सांगत; सांगविता हरी २२
रुचि जशी तुमची निजहृद्गत। कमल वामन माइ तसें मत
मत तुम्हीं करणें अपुलें सदा। परमतानुग अंध न व्हा कदा २३
दिसत दृष्टिस जें तुमच्या खरें। विवरितां हृदयीं परमादरें
मत खरें मत तें समजा तुम्ही। परमतानुग अंध न व्हा तुम्ही २४
हरि हरी करि मी म्हणुनी हरी,। वरुं नका; विवरा निजअंतरीं
विवरुनी ठरवा अपुलें मत। सुपथ हाचि सदा बुध-संमत २५
तरुणदृष्टि तुम्हा नव-शिक्षण। नवल सृष्टिंत रोज विलक्षण
नव-विचार हवा नव मेंदुची। बनवि रोज नवी मतिची रुचि २६
चरित जें मत जें तरुणां तुम्हां। विवरितां हृदयीं स्वरुचि-क्रमा
सुभग सत्य गमेल तिथें रमा। तदनुसार करा सु-परिश्रमा २७
मला ही आत्मश्रद्धेची। नीति तारक जाहली
तुम्हांला तीच म्हणुनी। प्रेमें मीं उपदेशिली २८

## २७ भविष्यपुराण

महापुराण शर्मण्यें तत्त्वज्ञें स्पेंग्लराभिधें
महायुद्ध-वेध-कालीं रचिलें काल-कोविदें १
दिलें नांव तया तेणें "पश्चिमेचा अपक्षय"

झालें पुढें महायुद्ध झाला जय पराजय २
यावरी ग्रंथ शोधूनी द्वितीयावृत्ति काढिली
मीमांसा करुनी पूर्ण होती जी न्यून राहिली ३
लाभला ग्रंथ तो मातें "सहधर्मी"-कृपा-गुणें
श्रीहरीची कृपा भक्ता कांहीं न पडुं दे उणें ४
नको वाद अस्ति-नास्ति नास्तिका नमनें सदा
माझा हरी हरीचा मी हें नातें न मिटे कदा ५
दुःखीं आनंद तो देई "दुःखानंद" म्हणे कुणी
गुणी मित्र मला प्रेमें माझा आनंद पाहुनी ६
नको मित्रकथा येथें मित्रांचा सदनुग्रह
भरवी मन्मनीं प्रेम करवी लोकसंग्रह ७
होते न मित्र मजला होतें तरि न शिक्षण
कशाला पुढचें बोलूं मच्चरित्र विलक्षण ८
नको आतां अधिक हें मित्रादि-विषयान्तर
पश्चिमापक्षय-कथा- तात्पर्या पाहुं सादर ९
यूरोप रूस सोडूनी धरुनीयां अमेरिका
ही पश्चिम; हिची थोर जी संस्कृति विमोहिका १०
तिचें बालत्व तारुण्य झालें; पूर्व जरास्थिति
चालू असे; तिला आहे पुढें प्रौढ-जरा-स्थिति ११
शेषायु शतकें चार तिचें आहे सरासरी
पुढें मृत्यु तिचा नेमें कालाच्या गहनोदरीं १२
ईजिप्ती, बाबिलोनीय, ग्रीक-रोमीय, भारती
चिनी, मगी, मेक्सिकीय सात या थोर संस्कृति १३
जन्मल्या वाढल्या मेल्या पाश्चिमेचीहि ती गति
निश्चयें इतिहासाची सांगणी ही जनांप्रति १४
मगी-विभाग याहूदी पार्शी आणि महंमदी
प्रेतस्थितींत या सर्व आजच्या जगतामधीं १५
प्रेतस्थितींतचि असे भारतीय तशी चिनी
प्रेतावशेषहि दुज्या चारींचे आज ना जनीं ! १६

आठवी पाश्चिम कशी
जगेल जगतीं फार
हजार पंधाशें वर्षें
इतिहास असें सांगे;
निराशावाद हा ऐसें
सत्य तें सत्य; सत्याची
राहिलें आयु वेंचावें
प्रश्न हाचि महत्त्वाचा
ही चिंता हा प्रश्न चित्तीं
काल्वाकालव करी;
चालुनीयां काल कांहीं
महाग्रंथ-लेखनाचा;
या ग्रंथीं हा तत्त्ववेत्ता
स्वस्कृतीयां देई तें
सांगे कीं, उमजा आतां
वयोऽवस्था जशी तैशी
स्वसंस्कृति वयोऽवस्था
करी निश्चित कीं आतां
यौवना पारखी झाली
झाली वयासी, थकली;
मूर्ति, चित्र, वाद्य, गीत
इत्यादि दिव्य स्फूर्तीच्या
अभ्यासाव्या वाटतील
तदुन्नति परी झाली
अभ्यासा म्हणुनी विद्युत्,
नौकाशास्त्र, अर्थशास्त्र
राष्ट्र-राष्ट्र-यादवीचा
वर्षे शताधिक अतां
लढवील महायुद्धें

सातांची गति सोडुनी
आयुर्नियम मोडुनी १७
आयु संस्कृतिचें असे
वृथा दीर्घायुचें पिसें १८
रडोत रडणें कुणी
ही अशी स्पष्ट सांगणी १९
पाश्चात्त्यीं कोणत्या परी
चिंता हीच बरी खरी २०
तत्त्वज्ञ स्पेंग्लराचिया
अशी ही अंतरक्रिया २१
अंतीं निश्चय जाहला
ग्रंथ यापरि जन्मला २२
कर्तव्य-प्रश्न-उत्तर
आहे स्पष्टोक्ति-निर्भर २३
संस्कृतीची पहा गति
सुज्ञांहीं करणें कृति २४
इतिहासविचारणा
ती आहे गतयौवना २५
वर्षे दशशतांवरी
थकली स्फूर्ति अंतरीं २६
काव्य, तत्त्वविचारणा
कला विद्या तुम्हा कुणा २७
करायासि तदुन्नति;
होणें ती, ही खरी स्थिति २८
यंत्रविद्या, रसायन
युद्ध वा राजकारण २९
कालखंड सुरु असे
संहारी यादवी-पिसें ३०
अतिसंहारकारक

अभ्यासा म्हणुनी तें जें युद्धीं हो उपकारक ३१
शांतीचा घोष चालेल चालला आजही बहु
नका मानूं बरळ ती नका होऊं कुणी मऊ ३२
'शांति' ओरडती भोंदु जगासि लुटण्या धनी
'शांति' ओरडती साधु करुणाविष्ट होउनी ३३
ओरडीनें अशा युद्धें थांबतील मुळींहि न
थांबतील कशीं ! आहे देवी नियति दारुण ३४
प्रत्येक संस्कृतीमध्यें यादवी अंतिं जाहली
यादवी होउनी अंतीं राष्ट्र जें उरलें बली ३५
तेणें सर्व दुजीं राष्ट्रें स्वसाम्राज्यांत घातलीं
मऊ राष्ट्रास दास्याची स्थिति यापरि पातली ३६
प्रजाराष्ट्रांतले लोक थकले नियतीगुणें
गेलें तेज लया; त्यांस दास्यांत न दिसे उणें ३७
प्रभु राष्ट्रीयही कालें विलासीं जाहले रत
विलासीं विरलें वीर्य हो संस्कृति दिवंगत ३८
दिवंगता संस्कृतीचें प्रेत निर्वीर्य ते जन
त्या दुजी संस्कृति करी निज-उन्नति-साधन ३९
दिवंगता सात ज्या कां ऐतिहासिक संस्कृति
त्यांची कहाणी ऐशी ही आठवीचीहि ती गति ४०
होणार हें विस्मरा न प्राप्त कर्तव्य आचरा
महाबली व्हा, मृदु न; वीरांचें करणें करा ४१
पुढें मरण येणार म्हणूनी कोणि शाहणा
न मरे स्वकरें वांया हें नको सांगणें कुणा ४२
पुढें संततिची स्वीय दूरची भावि संतति
पडणार गुलामींत म्हणुनी आज ती गति ४३
यावी स्वतांस ऐशी न शाहणा करितो कृति
झटे तो तिज टाळाया खर्चुनी सर्वही मति ४४
करिती रण टाळाया प्रयत्न कुणि सज्जन
जाणूनीही अंतरीं कीं कठीण टळणें रण ४५

प्राप्त कर्तव्य सर्वांचें टाळावें रण जें टळे
प्राप्त कर्तव्य सर्वांचें टाळावें दास्य जें टळे ४६
करा प्रयत्न शांतीचा जरि शांति तुम्हा हवी
परी करा तयारी ही घ्यावया उडि आहवीं ४७
नियतीची कथा राहो भविष्य विसरा क्षण
वर्तमान पश्चिमेचें पहावें लक्ष देउन ४८
राजकारण सर्वत्र झालें धनिक-कारण
स्वार्थ त्यांचा ठरवितो रण वा शांति-रक्षण ४९
लोकसत्ता लोकसत्ता नाममात्रचि गाजते
सर्वत्र धनिकांचीच सत्ता एक विराजते ५०
मतदार न सर्वज्ञ त्यांना सर्व कळावया
वृत्तपत्रें व्हावि तैशीं व्याख्यानें व्हावि द्यावया ५१
हा सर्व खेळ पैशाचा पैसाच निवडी करी
कुबेर पेरुनी पैसा भोगी सत्ता खरी खरी ५२
महायुद्धापूर्वि त्याची तयारी 'योग्य' व्हावया
अमेरिका महायुद्धीं आंग्लपक्षीय व्हावया ५३
प्रसिद्ध पत्र-सम्राटें नार्थक्लिर्फे धन पेरुनी
राजकारण केलें तें जाणती राजकारणी ५४
सर्वत्र कुदशा पेरी कुबेरी राजकारण
कुबेरांच्या गुलामींत सर्वही पश्चिमी जन ५५
राजकारण राष्ट्रासी तेंचि हो उपकारक
जें असेल कुबेरांसी योग्य-बंधनकारक ५६
राजकारण-मुख्यांग परचक्रनिवारण
समरक्षम जें नाहीं तें नव्हे राजकारण ५७
बाह्य व्यवस्था राष्ट्राची समरक्षमता बली
राजकारण-मुख्यांग हेंचि या वसुधातलीं ५८
हें मुख्यांग दृढतम करुनी टिकवील जी
अंतर्व्यवस्था राष्ट्राची व्हावी तीच नको दुजी ५९
राष्ट्रभू परक्या हातीं न पडेल असें बल

सदा तयार ठेवी तें राजकारण सोज्ज्वल ६०
राष्ट्रभू-भाल-तिलक एक स्वातंत्र्य मंगल
तिलका त्या पुसायासी धांवा करिल जें बल ६१
त्या खला निवटोनीयां स्वभू-तिलक-रक्षण
करणें हेंच पहिलें राजकरण-लक्षण ६२
कुबेर कांचनैकार्थी कांचनार्थ स्वराष्ट्रभू
बलहीन करी जेणें पर होय स्वभू-प्रभू ६३
कुबेर कांचनैकार्थी कांचनार्थ पर-स्वभू
हराया उठवी, पैसा पेरुनीयां, स्वभू-प्रभू ६४
नसे जो पर-भू-कांक्षी स्वभू-सेवक जो असे
कुबेर ऐसा विरळा अतिलोभीच फारसे ६५
म्हणूनी जें कुबेरांसी योग्यबंधककारक
राजकारण तें एक राष्ट्रां हो उपकारक ६६
बाह्य व्यवस्था जें राखी परचक्रनिवारक
राजकारण तें एक राष्ट्रां हो उपकारक ६७
घराणेदार मुत्सद्दी घराणेदार क्षत्रिय
सत्तादक्ष स्वभावें हे यांसी धन नसे प्रिय ६८
राष्ट्रप्रभू हेंचि योग्य राष्ट्राचें राजकारण
यांचेच हातीं असतां होय राष्ट्रसुरक्षण ६९
कुबेर अति-लोभानें कंगाल गरजूपणें
अयोग्य नीट खेळाया राष्ट्राचीं राजकारणें ७०
'राष्ट्राचा मान' ही चीज मुत्सद्यां क्षत्रियां जशी
गमे अति महत्त्वाची गमते न दुज्यां तशी ७१
राष्ट्रस्वार्थ जया स्वार्थ राष्ट्रमानेंचि मानि जे
कुलीन मुत्सद्दी, वीर; राष्ट्रें त्यांसीच मानिजे ७२
यांचे हातीं राष्ट्रसत्ता तोंवरी राष्ट्र-उन्नति
अ-कुलीन-प्रभुत्वानें राष्ट्र जाय अधोगति ७३
अकुलीनापरी त्याज्य कल्पनालीन ब्राह्मणे
कल्पनालीनांच्या हातीं नासतीं राजकारणें ७४

न्याय, प्रामाणिकपणा ध्येय वा शास्त्रशुद्धता
यांचे जे आग्रही त्यांना न द्यावी राष्ट्र-नेतृता ७५
लिहोत ग्रंथ ते थोर राज्यतत्त्वविधायक
नसोत परि ते राष्ट्रीं राज्यकार्यात नायक ७६
राज्य हा राजसी खेळ आग्रही साधुता इथें
परकीयांसि लाभाची स्वकीयां करिते रितें ७७
"ये यथा मां प्रपद्यन्ते तां स्तथैव भजामि" हा
जैशास तैशाचा न्याय नको तरि दुरी रहा ७८
"सर्व बंधु; नको युद्ध; आदरा मृदुता, क्षमा
लाओत्से-बुद्ध-आदींच्या स्वर्गीय वचनीं रमा" ७९
स्वर्गीय हा पाठ नाहीं स्वर्ग हा नचि देइल
स्वभू परी या पाठानें परदास्यांत जाइल ८०
चीन, भारत ईजिप्त बाबिलोन स्मरा मनीं
आज एक उद्यां एक परवां तिसरा धनी ! ८१
शांतिपाठ क्षमापाठ विश्वबंधुत्व पाठ हा
न दे स्वर्ग, स्वभू नेतो अनर्थ करितो महा ८२
स्वर्गभोग जयां व्हावे त्यागावें त्यांहिं ऐहिक
जाणुनी ख्रिस्तसम तें मालिन्यमय मायिक ८३
"माझें राज्य न हा लोक" वदला ख्रिस्त यापरी
घ्या ख्रिस्तपाठ; हा लोक ख्रिस्तवत् न त्यागे जरी ८४
पाश्चात्य नांवाचे ख्रिस्ती पाश्चात्यासम पौर्वही
सामान्य जन हा लोक भोगूं इच्छिति सर्वही ८५
असामान्य किती येथें ! शांतिपाठक जे जनीं
असामान्य किती त्यांत ! पहावें नीट शोधुनी ८६
असतील कुठें कांहीं नसतील म्हणूं नये
परी त्यांहीं बुद्धिभेद सामान्यांचा करूं नये ८७
स्वभू-भक्ति पराभक्ति सामान्यां साधु पाठ हा
विश्वभक्ति न साधे त्यां भक्ति दुःसाध्य ती महा ८८
स्वभू-भक्ति करी वीर मरे वीर स्वभूस्तव

आत्मोन्नति न ही थोडी लोकीं युक्त हिचा स्तव ८९
विश्वाचे भक्त शांत्यर्थी शांत्यर्थ मरती किती !
राष्ट्राचे भक्त राष्ट्रार्थी राष्ट्रार्थ मरती किती ! ९०
राष्ट्रं हा लोक भोगावा स्वतंत्र जनिं राहुनी
राष्ट्रभक्त मनीं इच्छा हीच तीव्र दुज्यांहुनी ९१
या तीव्र इच्छेसाठीं तो वीरांचे मरणें मरे
मरणें हें दिव्य भोग; भोग त्या हीन दूसरे ९२
"विश्वशांत्यर्थ मरणें भोग दिव्य, न दूसरे"
विश्वभक्तमनीं भक्ति अशी तीव्र न जों भरे ९३
न जों समूहें मरती भक्त हे शांति घोषुनी
शांतिवीर न जों होती राष्ट्रवीरांपरी जनीं ९४
न तों सुज्ञांहि मानावी शाब्दिकी शांतिघोषणा
करोत कितिही कोणी निर्वीर्या कंठशोषणा ९५
व्यावहारिक हा पाठ व्यवहारीं सदा स्मरा
जैशास तैशाचा न्याय आदरा; वीरता वरा ९६
कल्पनालीन जे त्यांच्या हातीं सूत्रें न द्या कधीं
जैसा कुबेर कंगाल तैसे ते त्याज्य तत्त्वधी ९७
कुबेरी कांचनी शक्ति कुदशा पेरिते जनीं
ती शक्ति तत्त्व-मान्यानें न मरे हें धरा मनीं ९८
मारील तिजला एक कृपाणी बल केवल
न टळे रण जाणूनी राष्ट्रीं तें वाढवा बल ९९
फलहीन विवाहाची विलासाची प्रथा नवी
बलहीन करी राष्ट्रा हेंहि एक धरा जिवीं १००
गृह तें न, मुलां जेथें जन्माया न मुभा पुरी
अ-गृहीं रति ही सत्य राष्ट्रभूच्या उरीं सुरी १०१
उरीं सुरी ही धरणें सुचतें नियतीमुळें
संस्कृतीची जरावस्था जनां करितसे खुळे १०२
असे नियति दुर्लंघ्य, तिच्या पोटीं परी असे
आत्मस्वातंत्र्य कांहीं; तें कामीं लावा सुवीरसें १०३

वरा गृहा न अगृहा; करा राष्ट्र महाबली
इतिकर्तव्यता हीच यादवीच्या युगांतली १०४

× × ×

मतें शब्दित जीं ग्रंथीं तशीं ध्वनित जीं मतें
भविष्यविषयीं, त्यांचें सार हें ग्रथिलें इथें १०५
अतिसंक्षिप्त हें सार; ग्रंथ विद्वन्मनोहर
इतिहास–विकासादि– वादीं नवमताकर १०६

## २८ भावनापुराण (अनुष्टुप्)

"न्याय प्रामाणिकपणा ध्येय वा शास्त्रशुद्धता
"यांचे जे आग्रही त्यांना न द्यावी राष्ट्रनेतृता" १
स्पेंग्लरी सूत्र हें भासे आसुरी असुरोचित
श्रीमद्भागवतीं आहे मानिलें तें सुरोचित २
"यूयं तदनुमोदध्वम् यदिच्छन्त्यसुराः सुराः
न संरमेण सिध्यन्ति सर्वेऽर्थाः सान्त्वया यथा ३
"अरयोऽपि हि सन्धेयाः सति कार्यार्थगौरवे
अहिमूषकवद्देवा- ह्यर्थस्य पदवीं गतैः" ४
'अहिमूषक' हा न्याय अरीशीं वरणें बरें
ऐसें बोधियलें देवां देवदेवें रमेश्वरें ५
न्याय प्रामाणिकपणा आग्रही-साधु-संमत
या न्यायांत मुळीं नाहीं परि हा हरिसंमत ६
अप्रामाणिक अन्यायी ध्येय-शास्त्रोपहासक
स्वराष्ट्रस्वार्थपर जो बलैकसमुपासक ७
त्या आसुरी अरीसंगें स्वराष्ट्रोद्धरणीं रत
जैशास तैसा या न्यायें वागो हें हरिचें मत ८
हरि ही कल्पनामूर्ति पुराणें कल्पनाकृति
माना तरी सुखें माना चालवा आपुली मति ९
पार्थासि हरि सांगे कीं चालवीं आपुली मति
मन्मतां विवरोनीयां स्वसंमत करी कृति १०

कल्पनाकृति गीता हो; ही गीताकविकल्पना
मान्य होईल सर्वांशीं विवेकप्रिय सज्जनां ११
पुराण स्पेंग्लरी होवो होवो भागवतादिक
विवरूनी मतें त्याचीं ध्यावीं जीं योग्य तात्त्विक १२
मतिस्वातंत्र्य, कृतिचें स्वातंत्र्य सकला हवें
आत्मोन्नति न त्यावीण यथाऽभीप्सित संभवे १३
न्यायादि-आग्रही नेता नको, हें आग्रही मत
न ग्राह्य मज सर्वांशीं मद्विवेक-असंमत १४
न्याय प्रामाणिकपणा असे नाना प्रकारचा
ध्येयवाद शास्त्रवाद तोहि नाना प्रकारचा १५
ध्येयवाद असे मुख्य अशी मन्मति भावना
परध्येय जें त्यांत स्वभावें आग्रहीपणा १६
स्पेंग्लरी परमध्येय स्वराष्ट्रबलवर्धन
जगत्साम्राज्य सिद्ध्यर्थ स्वराष्ट्ररिपुमर्दन १७
या ध्येयाच्या भावनेनें भारली स्पेंग्लरी मति
उत्साहें रचिती झाली "पश्चिमेची जरास्थिति" १८
स्वभावें या पुराणांत ध्येयानुगुण वक्तृता
"न्यायादि-आग्रही जे त्यां न द्यावी राष्ट्रनेतृता" १९
परमध्येय मजला विश्वाचें हितवर्धन
एतदर्थ स्वराष्ट्रीय स्वातंत्र्य-रिपु-मर्दन २०
या ध्येयाच्या भावनेनें भारली अल्प मन्मति
उत्साहें रचिती झाली गाथादी अल्पशा कृति २१
स्वभावें या पुराणांत ध्येयानुगुण वक्तृता
"सत्यसत्याग्रही व्हावी स्वराष्ट्रीं राष्ट्रनेतृता २२
"हरिचें मत" सर्वांशीं सत्यसत्याग्रही असे
म्हणूनी तें मला मान्य दुराग्रह परी नसे २३
अप्रामाणिक अन्यायी ध्येय-शास्त्रोपहासक
स्वराष्ट्रस्वार्थपर जो बलैक-समुपासक २४
त्या आसुरी अरीसंगें आग्रही साधुता वरी

नेता तोहि मला पूज्य  पूज्य कीं साधुता खरी  २५
अविवेकी साधुता ती  आग्रही; ऊन ती गुणीं
अनाग्रही विवेकी ती;  गुणीं अधिक ती जनीं  २६
साधुता मंगल परी  आग्रही वा अनाग्रही
परमध्येय हें माझें  "साधुता हो गृहीं गृहीं"  २७
विश्वाचें हित साधुत्वीं  मुक्ति साधुत्व देतसे
विवेकी तें बहुजनां  कामीं ये; न दुजें तसें  २८
साधुत्व रामदासीय  विवेकी तें बृहत्फल
तुकयासहि तें मान्य  बृहत्फल सुमंगल  २९
तुकोक्ति सुप्रसिद्धा कीं  "दया कंटक निर्दळी
आणीक भूतांसी पाळी"  विवेकी ही दया बळी  ३०
"दया क्षमा शांति तेथें  वसे देव" वदे असें
जो तुका तो दया काय  याची व्याख्याहि देतसे  ३१
दया विवेकी त्या मान्य  न मान्य दुसरी तशी
क्षमा विवेकी त्या मान्य  न मान्य दुसरी तशी  ३२
स्वतां साधूसि जो गांजी  त्या क्षमा त्यावरी दया
जनता गांजितो त्यासी  न क्षमा न दया तया  ३३
विवेकी साधुता ती ही;  अहिंसा-आग्रही न ही
खलहिंसा हिला मान्य;  हिंसार्थ कपटादिही  ३४
साधुता मंगल परी  आग्रही वा अनाग्रही
परमध्येय हें माझें  "साधुता हो गृहीं गृहीं  ३५
साधुता त्याग भोगाचा  भोगाआधीं न तो घडे
भोगत्याग विवेकानें  ज्ञानाआधीं न तो घडे.  ३६
साधुता जनता-सेवा  त्यागयुक्त जिथें तिथें
अशी ही साधुता कोठें  कितीशी आज लाभते !  ३७
भोगाआधीं त्याग नाहीं  बाल त्यागी खरा तरी
भोग त्या घडला पूर्वी  पूर्वजन्मीं भवान्तरीं  ३८
व्हावे सुलभ भोगाचे  पदार्थ सकलां जनां
व्हावें सुलभ तैसेंचि  ज्ञानही सकलां जनां  ३९

रावणें यास्तव बरें    या नांव जन-चाकरी
ही चाकरी त्यागयुक्त    साधुता हो खरी खरी    ४०
"ज्ञान-भोग-सुलभता    दासदेशीं बहूजनां
"अशक्य म्हणुनी दास्य    नको" ही साधुभावना    ४१
श्रमजीवि करीं सत्ता    खरी पूर्ण नसे जिथें
दासदेश तया नांव    नव श्रमयुगी मतें    ४२
नव श्रमयुगी साधु    साधुश्रेष्ठ दिवंगत
लेनीन लाभला ज्याला    रूस तो आज सुस्थित    ४३
ज्ञान-भोग-सुलभता    रूसदेशीं बहूजनां
शक्य केली जयानें तो    धन्य धन्य महामना    ४४
नव श्रमयुगी ध्येय    साम्राज्यगत भारतीं
असाध्य म्हणुनी आधीं    साम्राज्या द्यावया गति    ४५
यत्न व्हावा महाथोर    यत्नीं या वीर-आहुति
लागतील किती ! येथें    कुंठिता होय मन्मति    ४६
जगत्साम्राज्य भोगावें    यासाठीं घोर यादवी
पाश्चात्त्यांत बहू काल    चालणार अशी नवी    ४७
स्पेंग्लरीय महाग्रंथीं    घोषणा सप्रमाणशी
वाचूनि भावना तीव्र    उठल्या मम मानसीं    ४८
पूर्व पश्चिम हा भेद    पाश्चिमीं राजकारणी
राष्ट्रनेत्यांचिया चित्तीं    राहिला दृढ होउनी    ४९
"भांडूं आम्ही आपसांत    परी संस्कृति-बांधव
"पाश्चात्य सर्व आम्ही हें    सत्य बा विसरूं लव    ५०
"पूर्व खालीं पश्चिमेच्या    रहावी सर्व सर्वथा
"पाश्चात्य-ध्येय हें सत्य    मिथ्या सर्व दुजी कथा    ५१
"रूसियादि जपानांत    पूर्वभू वावरावया
"व्हावी आम्हा पाश्चिमात्यां    ती हस्तगत व्हावया    ५२
"आमुच्या थोर राष्ट्रांची    चालली राजकारणें
"स्पर्धा तयांत जोरावे    माजवी ती महारणें    ५३
"महारणें हीं वरुषें    शत एक पुनः पुन्हा

"चालतील महाघोर त्रेबें" इत्यादि घोषणा ५४
स्पेंग्लरीय महाग्रंथीं स्पष्टशी सप्रमाणशी
वाचूनि भावना तीव्र उठल्या मम मानसीं ५५
कां न पौर्वात्य राष्ट्रांचा संघ व्हावा सुसंहत
रूस इस्लाम जापान चीन आणीक भारत ५६
कां न या पौर्वराष्ट्रांचा संघ व्हावा सुसंहत
पाश्चात्य-ध्येय-धिंगाणा मर्यादाया दृढव्रत ५७
कां न भारतराष्ट्रांत पूर्व-पश्चिम-भावना
व्हावी मुस्लीम-हिंदूंचा मर्यादाया दुजेपणा ५८
आम्हा चालेल मुस्लीम शास्त्रा परि न पश्चिमी
कां हिंदूंत व्हावी ही भावना आत्मसंयमी ५९
हीच पाया दृढैक्याचा; हिंदू-मुस्लीम-संहति
दृढ या भावनेनेंच होणें संभाव्य भारतीं ६०
येथील पाश्चिमात्यांच्या साम्राज्या द्यावया गति
अवश्य दृढभावाची हिंदू मुस्लीम-संहति ६१
विदेशी पश्चिमी आणि देशी मुस्लीम शासन
या दोहोंत दुजें ग्राह्य सर्वथा पहिल्याहुन ६२
देशदेशीय शास्त्यांच्या हातीं येईल सर्वथा
ती गोष्ट करणें आधीं दुज्या खटपटी वृथा ६३
पौर्वात्य राष्ट्रांचा संघ हिंदु-मुस्लीम-संहति
अवश्यावश्य गोष्टी या तीव्र मद्भावनांप्रति ६४

## २९ देवाशीं वाद (स्वागता वृत्त)

भावना उसळती मनिं भारी । या जनां बघुनि दीन मुरारि
हा पुन्हा उठुनि हीन दशा ही । टाकण्या करिल कां बल कांहीं १
हिंदु मुस्लिम पुरे सहकारी । होउनी जनहितार्थ मुरारि
पाश्चिमात्य इथुनी हटवाया । होमितील रणिं कां निजकाया २
बंधु-मुस्लिम-हृदंतरिं केव्हां । स्नेह हिंदुविषयीं दृढ व्हावा
मुस्लिमांविषयिंच्या परभावा । हिंदु सोडितिल हे कधिं देवा ३

नाहिं वर्षशत पूर्ण जहालें । दीन दीन—हरहरमय भाले
पाश्चिमात्य इथुनी हटवाया । खेळले रण न कां नटराया ४
भेदनीतिपटु गौरजमाव । हिंदु मुस्लिम मनीं परभाव
आणती उठवीतो शठतेनें । गोष्ट ही स्वजन कां हरि नेणें ५
जाणतेहि जन मुस्लिम हिंदु । बंधुभाव विसरूनि अ-बंधु
अज्ञसे झगडती अपसांत । कां न हे उमजती भवनाथ ६
कां न हिंदुजननायक देवा । त्यागबुद्धि निजपूर्वज ठेवा
काळवेळ बघुनी जनतार्थ । योजुनी करित देश कृतार्थ ७
पाश्चिमात्य इथुनी हटवाया । सर्वदानहि हरे नच वांया
हिंदु मुस्लिम जनां कधि तुष्ट । हक्क देउन करील तदिष्ट ८
ध्यान एक 'जव गौर हटावे' । लागतां कलह सर्व मिटावे
ध्यान हिंदुजनमानस केव्हां । एक हें धरिल संतत देवा ९
गोड मुस्लिम जनाहुनि गौर । वेड हें कुठकुठें अतिघोर
वेड-मूळ अविचार अनंता । आत्मघाति कधि जाइल अंता १०
सर्वदान करुनी हरि हिंदु । तोषवील जरि मुस्लिमबंधु
राहणार तरि ते अनुदार । हा विचार न कसा अविचार ११
राहिलेहि जरि ते अनुदार । ते स्वतां तरि सुखीं असणार
सात कोटि निजबंधु सुखांत । पाहणें सुख न का जननाथ १२
आज छीथु करिती जगतांत । आपसी कलह पाहुनि येथ
पाश्चिमात्य इथुनी हटवीतां । छीथु कोण करणार अनंता १३
हिंदि जाइल जिथें तिथ लात । आज ही स्थिति असे जगतांत
पाश्चिमात्य इथुनी हटवीतां । लात कोण हणणार अनंता १४
देशिं देशिय असो जनराज्य । पाश्चिमात्य न मला मग त्याज्य
आंग्ल मित्रहि असोत विशेष । यांत काय न हरी तव तोष १५
विश्वराज्य तव हें जनराज्य । तत्त्वता जरि तुझें अधिराज्य
जीव जीव मतदार तयांत । काय ही हरि यथार्थ न मात १६
जीव जीव मत देत तयाचा । तूं विचार करुनी नित साचा
तें करीशि अमुचें हित ज्यांत । काय ही हरि यथार्थ न मात १७
मात ही हरि खरी मज ठावी । मी म्हणूनी मज जें मम भावी

तें तुला कळविं नित्य मनांत । कां न हें कळवुं आज जनांत १८

× × ×

जीं मतें मनिं मनिं स्वजनांत । जीं मतें मनिं मनीं विजनांत
तीं बघूनि करिं तूं करणें तें । मी मुरारि वरलों वरणें तें १९

## ३० नवश्लोकी (अनुष्टुप्)

वासुदेव-हरी-गीत मज उत्तम वाटतें
नरां नारींस दुःखाच्या कहरीं सुख-वाट तें १
मनीं जनीं जडीं जीवीं लपला ईश अव्यय
ही हरी-सांगणी मातें भासते सत्य अक्षय २
उमा मनीं सद्विवेक बीज ती साधुता-खनी
वदे हरी मी तिजला ही गोष्ट धरणें मनीं ३
भाव या भविं तो सर्व उभा जो देव अंतरीं
बल-नाटक हें त्याचें रोज तो आठवा हरी ४
बरा-विवेक-रूपी तो रस्ता दावील जो जई
वापरा तो तईं; कीं ही चाल दे सुख अ-क्षयी ५
"वाया हरी-हरी-ध्यान चाललें; हरि ना भवीं
"लय मातींत मरणीं तनु तों आत्मता जिवीं ६
"रमा मरा" हें नास्तिक्य फार दुःखद शेवटीं
यत्नें रहा हरी-पायीं दावूनि कुमती हठी ७
होमूनि सुख देहाचें इष्ट बुद्धिविकासन
लक्ष निष्काम सेवेंत असावें; तें खरें धन ८
सेवकोत्तम व्हायासी वाणीनें कृतिनें जनीं
टका संयम हा व्हावा तेणें युक्त असा मनीं ९

## ३१ पुण्यस्मरण (उपजाति)

श्रीमोरया-मंगलमूर्तिपायीं । दादा तुम्ही आइ तुवां सदा ही
निष्ठा मनापासुनि ठेवुनीयां । लावीयली कारणिं पुण्य काया १
योगामधीं उत्तम भक्तियोग । येणें दुरावे भव-भीति-रोग
तो योग तुम्हीं वरिला स्वभावें । तो सर्वदा चालविला सु-भावें २

वाणी सदा मंगल नाम गाई । मनीं सदा मंगलमूर्ति राही
जनीं सदा मंगल हालचाल । या योगिं तुम्ही रत सर्व काल ३
लोभा तुम्हीं जिंकुनि, मोरयासी । धरूनियां राहियलां जिवाशीं
ती गोष्ट दादा पटली जिवातें । निर्लोभता ती शिकवीत मातें ४
तुम्हीं वनीं मंदिरिं वास केला । गांवासि सोडूनि कधींच गेलां
दादा तुम्ही तीन तपें वनांत । श्रीमोरया पूजुनि राहिलांत ५
त्याच्याच पायीं तनु ठेवियेली । अशी तयाची दृढभक्ति केली
ती भक्ति माझ्या पटली जिवातें । ती भक्तिपाठा पढवीत मातें ६
तुम्हांस आईस स्वधर्मनिष्ठ । बघूनि मी होय स्वधर्मनिष्ठ
जो भेद कांहीं अपुल्या कृतींत । तन्मूल आहे अपुल्या मतींत ७
तो मोरया दे मति जी तियेनें । स्वधर्म जो निश्चित होय तेणें
संसार मी चालवितों मदीय । जसा तुम्हीं चालविला स्वकीय ८
या लोकिं जीवा निजधर्मनिष्ठा । प्रसंगिं देते बहु थोर कष्टां
ते कष्ट साही निजधर्मि राही । तो शेवटीं दिव्यसुखासि पाही ९
हें सत्य माझ्या मनिं जागताहे । प्रसाद हाही तुमचाच आहे
तुम्हीं चिकाटी निजधर्मि केली । बघूनि ती मी दृढ आपणीली १०
लोकांत वागे बहु लोकभीति । तुम्हीं न ही मानिली लोक-रीति
निर्भीड निर्भीक स्वबुद्धितंत्र । वागा तुम्ही; तो मज मान्य मंत्र ११
रीतीप्रमाणें गृहि-धर्म-निष्ठ । तुम्हीं सदा साहुनि दैन्यकष्ट
केव्हांहि कोणी अतिथी गृहासी । येतां तुम्ही तोषविलें तयासी १२
सदा तुम्ही कष्ट करा झटूनी । मोठ्या पहांटे नियमें उठूनी
हें घाण तें घाण असें न बोला । मोठ्या-सफाईसहि हात घालां १३
लागो कुणा गोड कडू कुणासी । खरें असें जें पटलें मनासी
तें बोलणें होय तुम्हां पसंत । स्वभाव हा वानिति थोर संत १४
तुम्हीं मला आपुलिया कृतीनें । धडे दिले ते आपुल्या मतीनें
मी पाठ केले मनिं सांठवीले । कृती करीतां जनिं आठवीले १५
लेखा तयांचा कितिसा करावा । पाया तुम्ही मुख्य मम स्वभावा
तुम्ही गुरु मुख्य, दुजे अगण्य । गुरू मला ऊन अधीक मान्य १६
यात्रा भवाची गुरुवीण घोर । गुरू असे मंगलमूर्ति थोर

तो सर्वसामान्य गुरु जगातें । तो सोडितां मुख्य तुम्हीच मातें १७
तुम्ही तनु मंगलमूर्ति-पायीं । ठेवूनि गेलां विरहांत आई
आई त्वरेनें विरहांत मागें । मागें रहाणें तिज घोर लागे १८
गेली पतीपूर्वि पतिव्रता जी । सभाग्य ती संसृतिमाजि गाजी
आईमधें ही दृढबुद्धि वागे । मागें रहाणें तिज घोर लागे १९
गाणीं तुझी मंगल गोड आई । माझ्या मनीं तीं घुमती सदाही
नवीन गीतें रसहीन मातें । जुनीं तुझीं फार रसाळ माते ! २०
तो वाघ ती गाय सदा स्मरें मी । सावित्रिचें गीत सदा स्मरें मी
गाणीं तुझीं गोड रसाळ ओव्या । तल्लीनतेनें किति आयकाव्या २१
या संसृतीचा तुज वीट आला । आत्मा तुझा शोकनिमग्न झाला
हसे तुझा मंगलमूर्ति शोक । तूं जाणशी भंगुर भूमिलोक २२
कुणी पुढें मागुनि कोणि जावें । हें देवदेवासिच एक ठावें
पत्नी पुढें मागुनि तद्भ्रतार । हें ना करी संतत सृष्टिकार २३
राजी असावें करि तो तयांत । 'मागें पुढें' घोकुनि काय होत
ताईस ठेवी वहिनीस ठेवी । जो मोरया तोचि तुलाहि ठेवी २४
वाणी तुझी मंगल नाम गाई । मनीं तुझ्या मंगलमूर्ति राही
करी विवेका; तुज सर्व ठावें । विवेकशीला असाशी स्वभावें २५
वहात दादा जइं फार शोकीं । बोधूनि त्यां तूं करिशी विवेकी
असे किती ते घडले प्रसंग । विवेक तूं जाणसि सर्व सांग २६
गेले जई जांवइ 'दत्त दत्त' । करीत एका घडिमाजि दत्त
ताईवरी तो कसला प्रसंग । स्मृतीहि त्याची करि शांतिभंग २७
गेला बुवा तो वहिनीवरीचा । घाला यमाचा कसल्या परीचा
तो एकटा एक, कुटुंब दूर । केला तयाचा दिनिं एक चूर २८
राहोनि मागें वहिनी मुलांसी । ताई अम्हांसी तुजला पित्यासी
किती परींनीं उपयुक्त झाली । मी मानितों त्यां बहु पुण्यशाली २९
लीलापटू मंगलमूर्ति लोकीं । कोणा सुखीं आणि कुणासि शोकीं
टाकूनि दे पाठ बहू तयांसी । तसे तयांच्या बहु बांधवांसी ३०
स्वतां मला जो वहिनी वडील । ताई तशी धाकटि सत्त्वशील
स्वसत्कृतींनीं पढवीत पाठ । तेणें चढें मी शुभशांति-घाट ३१

टळे विवेकें जनिं शोक कांहीं । गळे विवेकें जनिं शोक कांहीं
मिळे विवेकें जनिं शांति जीवा । विवेक यत्नें जनिं आपणावा ३२
विवेकवान् उत्तम भक्तियोग । तेणें दुरावे भव-शोक-रोग
शोकप्रसंगींहि विवेकि भक्त । प्रशान्त राहे निजधर्मरक्त ३३
तातें जगाच्या उपदेश केला । जो आमुचा शोक हरावयाला
गीतेंत जो सुंदर सांठवीला । तो हाचि; तूं आठविं जीविं याला ३४
लोकीं इया तूं बहु धर्म केला । श्रीमोरया संतत पूजियेला
विवेक आम्हां बहु शीकवीला । संसार वर्षें बहु चालवीला ३५
लावी अतां मंगल मूर्ति-पायीं । स्वचित्त सारें अणि शांत राही
अंधत्व पंगुत्व जरासमेत । आंहे जिवा यास्तव राहि शांत ३६
ताईस सेवा घडुं दे घडे जी । ताई असे ती करण्यास राजी
अंधत्व पंगुत्व तुला पित्यासी । ताईस पुण्यांश मिळावयासी ३७
सेवागुरू ताइ; तुला पित्यासी । सेवावया ताइ असे गृहासी
सांगूनि चित्तासि असें, जनांसी । सेवीत आलों जनकार्यहौसी ३८
सेवागुरू ताइ; गृहीं न होती । ताई तरी शांति मदीय चित्तीं
होती न सेवा करितां जनांची । मत्कार्यिं ताई सहकारि साची ३९
चरित्रिं माझ्या कृति जी बरीशी । तें पुण्प माझ्या बहु सद्गुरूंशीं
गुरूंत ताई वहिनी गुरूंत । गुरूंत तूं आणि गुरूंत तात ३०
तो मोरया जो गुरु सर्व जीवां । तो दे मला मंगल शिष्यभावा
मी शिष्य माझे गुरु जेथ तेथ । ज्ञानार्जनाचा पुरवीत हेत ४१
तूं अंध पंगू; तुज ताइ सेवी । तसाच मी या जनतेस सेवीं
ही अंध पंगू जनता सनेत्र । समर्थ व्हाया मम मंत्र तंत्र ४२
राबूनि गेले रघुवीर-दास । त्यांचा सनेत्रां हित-ऊपदेश
कीं नेत्र द्यावे जनतेस त्यांहीं । समर्थता नेत्रविना न येई ४३
आई, तयांचा अतिहीन दास । मी लीनभावें नमुनी तयांस
ठावें मला तें शिकवीं जनाला । समर्थता त्यांत भरावयाला ४४
लहान मी कार्य अती महान । परी लहानापरि अल्पसान
कार्यांश जो शक्य मला कराया । त्या कारणीं मी झिजवीत काया ४५
या माझिया हूडपणास आई । तुझा अशीर्वाद असो सदाही

असो कसें बालक हूड मूढ । आईस तें प्रेमळ होय गोड ४६
डोकें असे मुख्य; अधीन त्याच्या । संसारिं साऱ्या कृति या जिवाच्या
डोकीं बहू आमुचिया समाजीं । झोंकीं खुळ्या झूलति आइ आजी ४७
जी प्रेरणा मंगलमूर्ति देई । ती मानुनी मी जनतेसि कांहीं
दे पाठ बोलांहिं कृतींहिं आई । तुझा अशीर्वाद असो सदाही ४८

+ + +

हे नाथ श्रीमंगलमूर्ति ! आई । झुरे तिला तूं शुभशांति देई
ताई सदा कष्ट करीत राही । तिच्या शुभेच्छा पुरवीत जाई ४९

## ३२ पुण्यस्मरण (पुरवणी) [उपजाति]

हे नाथ श्रीमंगलमूर्ति आई । झुरे तिला तूं शुभशांति देई
ताई सदा कष्ट करीत राही । तिच्या शुभेच्छा पुरवीत जाई १
आई मनीं मंगलमूर्ति-पायीं । करीतसें मी विनती सदा ही
दाही दिशा तो भरला त्रिकाल । अतीव तो सूक्ष्म अती विशाल २
लहान मूर्तींत जसा असे तो । तसाचि सर्वत्र सदा वसे तो
तो एक झाला बहु देव देवी । बहुप्रकारीं जन त्यासि सेवी ३
वदे कुणी देव नसे परी तो । सेवा तयाचीच सदा करी तो
देहा मना चाळवि सर्व जीवीं । तया न जाणूनिहि जीव सेवी ४
विवेक कालें भवि सर्व जीवां । आस्तिक्यभावें करवीत सेवा
निष्काम सेवासुख आस्तिकाचें । सर्वां सुखाचें नववीत साचें ५
चैतन्य जें मंगल विश्वमूल । जीवासि तें या भवि दीर्घकाल
नाना तनू देउनि हिंडवीतें । अंतीं तया निर्मल भक्ति देतें ६
ती भक्ति सेवासुख भोगिते जें । तें पाहुनी मुक्ति थिजोनि लाजे
तें भक्तिचें निर्मल सौख्य आई । तुला अजूनीहि अलभ्य नाहीं ७
हेतू तुझा मंगलमूर्ति-पायीं । सेवा तया गोड घडो सदा ही
दादांस लाभो सुख अन्यलोकीं । हेतू तुझा हा तुज टाकि शोकीं ८
करी विवेका मन आणि वाचा । यांहीं करीं तूं जप मंगलाचा
घेई मुखें मंगलमूर्तिनाम । मनें तया नित्य करीं प्रणाम ९
मनेंचि दादांसि परत्र सौख्य । चिंती तसें मंगलमूर्ति-सख्य
मनें अशीर्वाद अम्हां मुलांसी । देई तसा सर्व दुज्या जिवांसी १०

सेवा तुला निर्मलभक्ति युक्त । ही शक्य आई तुज हीच उक्त
तूं अंध पंगू तव हीच सेवा । रुचेल सेवाप्रिय देवदेवा ११
विवेकशीला असशी स्वभावें । परी मला मंगलमूर्तिदेवें
आज्ञा दिली यास्तव शब्द कांहीं । जोडूनियां मी लिहिं पत्रिका ही १२

## ३३ आमचा लक्ष्मण (उपजाति)

या लक्ष्मणा तेज तुझें अमर्त्य । तूं तेज; तूं सोडुनि देह मर्त्य
सुवीरसा संकटकालिं बाला । झालासि आदर्श भला अम्हांला १
कुठारधारी कुणि तीन चोर । तूं एकटा यष्टिसहाय पोर
तरीहि तूं यष्टिसि चालविलें । न भीतिनें त्वन्मन चाळवीलें २
आजी नि आत्या, वहिनी, बहीण । बाळेंहि त्या मंदिरिं निर्जनीन
तूं एकटा पूरुष; घातकाळ । तूं पौरुषें शोभविलासि बाळ ३
तुझ्यावरी चालविली कुऱ्हाड ! । दिनीं तिज्या तूं तनूचें बिऱ्हाड
सोडीयलें; पौरुष धन्य तूझें । स्मरेल तें चित्त सदैव माझें ४
आत्या तुझी-ताई सुशील माझी- । घायाळ वांचेल तरी तुवां जी
तेजस्विता दाखविली उदार । कळेल तीचा सगळा प्रकार ५
कळो न वा तो; कळलें असे जें । अद्यावधी अल्पचरित्र तूझें
मित्राकडूनी घरच्याकडूनी । वाडींतल्या वाडकरांकडूनी ६
तें सर्व सेवापरता उदार । सत्याग्रही निर्भय कारभार
तुझा मला दाखवि उत्कटत्वें । तुझ्या मनीं जागति थोर तत्त्वें ७
सत्याग्रही कार्य करावयासी । कारागृहीं वास मिळावयासी
तुवां कसा काय प्रयत्न केला । वृत्तान्त त्याचा मजला मिळाला ८
राष्ट्रार्थ सेवा सकल प्रकारीं । करूनियां जी अपुल्या अहारीं
तेजस्वितेनें मरणें तदर्थ । करावया बंधुजनां समर्थ ९
हा हेतु तुझा मजलागिं मित्रें । सांगीतला; तो तुझिया चरित्रें
आकर्षिला फार; तुझी कहाणी । प्रेमें कथी नित्य तदीय वाणी १०
कारागृहीं वास तुला मिळाला । सत्याग्रही यत्न यशस्वि झाला
राष्ट्रार्थ जावी तनु ही त्वदिच्छा । ती राहिली; मंगलमूर्ति-इच्छा ११
कुटुंबसंरक्षण संकटांत । कर्तव्य हें प्राप्त; तुवां तदर्थ
समर्पिला देह सुवीरपंथें । हें ठीक केलें दृढभाववंतें १२

नमूनियां तूं जगतास तेव्हां । तरी कुचेष्टा कुणि लोक एव्हां
करूनि संताप तुझ्या जिवाला । देते वदूनि 'लखबा भियाला' १३
नमूनियां तूं पशुवृत्ति चोरां । कुऱ्हाडिच्या चूकवितासि मारा
हेंही मला शक्य दिसे न फार । म्हणूनि केला तइं जो प्रकार १४
तुवां स्वकर्तव्यनिमित्त बाला । पसंत तो मद्हृदयासि झाला
तेजस्वितेनें मरणें स्वकार्यीं । आर्योक्त नित्यस्तवनार्ह आर्यीं १५

× × ×

अप्पा तुम्हां आइ तुला प्रसंग । हा घोर येणें भवदंतरंग
झुरेल शोकें परि मोरयास । स्मरूनियां शांतविणें जिवास १६
सुपुत्र सत्कार्य करीत गेला । सदैव; सत्कार्यिंच कार्मि आला
हें भाग्य थोड्यांसचि; तें तुम्हांस । स्मरूनि हें शांतविणें जिवास १७

## ३४ तूं तूं (मदालसा)

देवा तुझ्या लीलेचिया । कांहीं तऱ्हा पाहोनियां
नसशीच तूं म्हणती कुणी । म्हणती कुणी तुज ना दया १
या यातना नानापरी । मनुजीं तशा मनुजे तरीं
बघुनी दया तुजला नसे । अशि वृत्तिये मनुजान्तरीं २
रमतो सुखीं कुणि दुर्जन । असुखीं भ्रमे कुणि सज्जन
बघुनी असा भविं गोंधळ । म्हणती भवीं कुणि देव न ३
नटलासि तूं भविं एकला । भवतत्त्व हें दिसतें मला
दिसतें मला जें जें दुज्यां । तें सर्व तूं तूं एकला ४
लीलेंत होशी नास्तिक । लीलेंत होशी आस्तिक
करिशी तुला तूं यातना । म्हणशी न व्हावें याचक ५
करणी तुझी तूं जाणसी । करिशी तुझ्या जें मानसीं
करि जें तुला वाटे बरें । करणार मी जें सांगसी ६
समता जनीं मजला हवी । प्रभुता जनीं मजला हवी
ती व्हावयासी मी खपें । खपवी जनां तुज वीनवीं ७
वात्सल्य तूं माझ्या जिवीं । तूं ऐकसी माझें भवीं

१. देवकथा ५७-६८ पाहा.

किति संकटीं तूं ऐकिलें । तीं संकटें मन आठवी ८
'वात्सल्य तें भ्रम केवल' । गर्जो कुणी विद्वद्दल
त्याचे मनीं भ्रम तें गमो । अनुभूति ती मज निर्मल ९
लावी मला अनुभूति ती । विनवावया जनता-हितीं
देवा जनां या जागवी । समतारणीं या दे रति
देवा जनां या जागवी । प्रभुतारणीं या दे रति १०
तूं तूं खपाया लाविसी । विनवावया तूं लाविसी
करि जें तुला वाटे बरें । करणार मी जें सांगसी ११

## ३५ तीन मार्ग (राजसा)

काम असो वा प्रेम असो वा यत्न आणि याचना
मार्ग दोन हे उघडे असती इष्टसिद्धिचे जनां
यत्न मनोवाक्कायें करवी अभीष्टसंपादना
करवी कालीं प्रेम, कामही यत्नासह याचना १
नास्तिक कामी कामयाचना करी कामिनीपदीं
प्रेमी नास्तिक जनसेवार्थी प्रार्थी जनतापदीं
आस्तिक कामी प्रेमी प्रार्थी नास्तिकसम, त्यासवें
प्रार्थी देवाहि तो; तया कीं दाता तो संभवे २
विश्वरंगिं[1] या पांच रंग—भु अन्नप्राणादिक
आम्हां दिसते एक अन्नभू अदृश्य त्या आणिक
रंगभूंत त्या प्रेमी कोणी प्रार्थनोक्ति आमुची
मानसींहि ऐकुनी धांवती धांवण्यांत ज्यां रुचि ३
चरणीं देवाच्याच एकट्या करूं प्रार्थना जरी
अदृश्य कोणी सेवाप्रेमी पुरवी ती यापरी
यास्तव यत्नासवें जनांसी देवासी प्रार्थना
मार्ग तीन हे जनता-समता-प्रभुता-संपादना[2] ४

---

१. देवकथा ८५-१०१ पाहा.

२. तूं तूं ७-१० पाहा.

## ३६ यमपंचक (वियोगिनी)

भवनाटकिं या भल्या मना हरि दे सद्गति सेवितां जना
अणु तूं प्रभुच्या विभूमनीं अणुसामर्थ्य तुला दिलें जनीं १
नट तूं पटु हो हरिप्रिय पटुता प्रेममयत्व सक्रिय
सुविवेक युता क्रिया करीं अविवेकी करणी न आदरीं २
रज फार जयांत तामसी रणवादी जनवाति साहसी
रण त्या हित रक्तरंजित कपटें तद्वधही तया हित ३
त्यजिला नय राष्ट्र-वर्धनीं रत झाला परराष्ट्र-मर्दनीं
खलसंघसमाज तो गणी दलितां धर्म तिथें उडी रणीं ४
नय राष्ट्रिय दास्यमज्जिता हतराष्ट्रा खलराष्ट्रमर्दिता
प्रतिकार सशस्त्र राष्ट्रिय स्वजनप्रेममयत्व सक्रिय ५
यतिधर्म अहिंसन-व्रत खलहिंसाहि तया नसे हित
गृहिधर्म समाज धर्महीं खलहिंसासमयीं सदाग्रही ६
हित ना यतिसी परिग्रह हित आहे गृहिसी परी गृह
यतिधर्म खरी कथा सदा गृहिचा धर्म असा न सर्वदा ७
दम पूर्ण यतीसि हें व्रत गृहिसी काम गृहीं नियंत्रित
यमपंचकिं[1] चौर्य वर्जन सम दोघांसहि धर्मबंधन ८
नय जो यतिसी, गृहीस तो कुणि मानी; अविवेकि-धी च तो
नय-संकर हा महात्मया चुकवी, साह्य करी दुरात्मया ९
यतिमार्गहि मोक्षदायक वदला श्रीहरि लोकनायक
परि त्या गृहिमार्ग आवडे वदला हे रणिं तोच ऊघडें[2] १०
डर पार्थ-मनीं गृहि-व्रतीं भर त्याचा बघुनी यति-व्रतीं
व्रत-संकर[3] हा नसे भला गृहि-धर्मा करि देव बोलला ११
लढणें गृहिधर्म नाचरी यति-धर्मा वरि वीर संगरीं
व्रत-संकर[3] हा भयंकर वदला श्रीहरि भक्त-किंकर १२
रण सोडि जरी रण-व्रती जन-उत्सादक होय ती कृती
व्रत-संकर[3] लोक-घातक हरि यासी गणि घोर पातक १३

---

१. अहिंसासत्यास्तेय ब्रह्मचर्यापरिग्रहा यमाः —पातंजल योगसूत्रें.
२. गीता अध्याय ५ श्लोक २.
३. गीता अ. ३ श्लो. २४.

कृति जी यतिसी स्वधर्म ती गृहिसी घोर अधर्म ही मति
हरिची वरि तूं भल्या मना निजधर्मे भविं सेविं तूं जनां १४

## ३७ सेवकोत्तम (माल्यभार!)

यतिधर्म न सेवकोत्तमाचा
गृहिचा धर्महि नाहिं धर्म त्याचा
गृहिसा[1] प्रथमीं[2] यमत्रयीं तो
यतिसा कामदमीं परिग्रहीं तो १
त्यजि तो यतिची स्व-मुक्ति-वांछा
गृहिचीहि त्यजितो स्व भुक्ति-वांछा
वरि तो जन-भुक्ति-मुक्ति-हेतु
भवभीतां भवसागरांत सेतु २
तनु त्या परकीय वा स्वकीय
जनसेवार्थ प्रसंगिं वध्य होय
समयीं जनताहितार्थ त्यासी
त्यजिणें सत्यहि धर्म सेवकासी ३

## ३८ श्रीहरीचें शांतिशास्त्र

विवरी हरि पांडवां म्हणे 'मरणें स्थिति काय हें मनें
प्रतिदेहिं जिवा स्थितित्रय स्थिति त्या तशि देह-पर्यय १
सुखदुःख जिवा स्थितित्रयीं सुखदुःख शरीर-पर्ययीं
सुखदुःख अनित्य हें असे विषयासह येत जातसे २
विवरूनि असें सुवीरता सुखिं दुःखिं समत्वधीरता
धरुनी करि कार्य आपुलें अमृतत्व तयासि हो खुलें ३
असतें नसतें भवान्तरीं वसतें सदसद् द्वयांतरीं
विनशे न कधींहि वस्तु सद् विलसे विनशे क्रमें असत् ४
विनशे न कधींहि जीव सत् विलसे विनशे तनू असत्

---

१. यमपंचक ६-८ पाहा.

२. प्रथम यमत्रय = अहिंसा, सत्य, अस्तेय.

विनशे न तयासि जन्म न अज अव्यय जीव-जीवन ५
न जिवा कधिं शस्त्र कापित न जिवा कधिं अग्नि जाळित
न तया कधिं आप भीजवी न तया कधिं वात सूकवी ६
न दिसे नयना अदृश्य हा न कळे नयना अचिंत्य हा
अज हा अविकार्य निश्चल वसतो भरुनी चलाचल ७
मरणें न जिवा कधीं घडे मरणें तनुसीचि या घडे
तनु जीर्ण सुजीर्ण वस्त्रवत् त्यजि हा नव घेइ जीव सत् ८
विवरूनि असें सुवीरता सुखिदुःखि समत्वधीरता
धरुनी करि धर्म आपुला भव मोक्ष तयासि हो खुला ९
करि सांख्य विवेक यापरी कृतियोग विवेकही करी
कृतियोग कथी करी कृति फलभोगिं परी नसो मति १०
मननें मनिं घेउनी उडी मति आत्मरसांत दे बुडी
मति आत्मसमाधि निश्चल इह वा पर वांछिना फल ११
मति आत्मसमाधिनिश्चया निजधर्मपरैकधीमया
करि कर्म सदा स्वधर्मज मनिं चिंति न भोग कर्मज १२
मति ही कृति योगसाधकी भविं यास्तव तो धकाधकी
सहुनी निजधर्म आचरी कृति ही भवयुक्त त्या करी १३
श्रुतिकाम्यगुणत्रयास्थिता शिकवीत फलार्थि कर्मिता
त्यज तूं त्रिगुणार्थ भोगिता भज सात्त्विक कर्मयोगिता १४
निज आत्मरसांत दे बुडी सुखिं दुःखि सुखें पडो कुडी
त्यजुनी भवभोगचिंतन निजधर्मि रमो तुझें मन १५
भवभोगरतीं सुचंचल मति वांछि निजक्रियाफल
स्वसमाधिवरी न ती स्थिर भ्रमवी म्हणुनी भवीं चिर १६
श्रुति दिव्य विलासदायक विविधावर कर्म गायक
भविं या अबुधासि हो प्रिया न बुधा स्थिर कर्मयोगिया १७
श्रुति कामुक कूपिंचें पय निजबोध निसर्ग अब्मय
बुध तो निज-बोधि या रमे श्रुति काम्य अपार्थ त्या गमे १८
तव भाग स्वकर्मि ठाकणें न रुचो तुज कर्म टाकणें
फलहेतु मनीं न तूं धरी तुज हक्क न कीं फलावरी १९

सम योग असिद्धिसिद्धिचा गणि योग समत्व-बुद्धिचा
करि कर्म करूनि योग हा फलसंगिं न तूं कधीं रहा २०
फलसंगिस पुण्य पाप तें भ्रमवी भवि देह ताप तें
फल जो त्यजि बंध त्या त्यजी पद शाश्वत तत्पदा पुजी २१
स्थिरधी कृतियोगि कामना त्यजि सर्वहि झाडि जो मना
परितुष्टि तयासि अंतरीं निज आत्मरसांत ये पुरी २२
असुखी न तयासि खेद हो न सुखीं अभिलाषिं मोद हो
मनिं त्या सलगी न भीति न मनि त्या कटुकोप रीति न २३
शुभ वा विपरीत गोष्ट हो न परी परितुष्ट रुष्ट हो
सलगी न तया कुठेंहि तो सकलीं समदृष्टि ठेवि तो २४
भय कूर्ममनीं जई रिघे तइं तो तनु आवरूनि घे
स्थिरधी करितें निजेंद्रियां विषयीं बघुनी विषाक्रिया २५
विविधें उदकें सदाभर परि सागर निश्चलान्तर
न चळे शिरतांहि कामना उदधीसम शांति त्या मना २६

## ३९ विहारी हरि

मना कोण मी कोण तूं, देहगेहीं । मना कोण हे जीव या सृष्टि-गेहीं
मना सृष्टिदेहान्तरीं कोण जीव । असे सृष्टि हा जीव किंवा अजीव १
मना सृष्टिचा आदि वा अंत कोठें । किती सूर्य येथें प्रभायुक्त मोठे
किती सूर्यबीजें किती सूर्य-माला । कुणाचा पसारा कशासाठिं झाला २
मना दृश्य हें सर्व अदृश्य होई । घनद्रव्य तेंही नभोरूप होई
नभोरूपि सारे असे सृष्टिबीज । नभोरूप मूळांत ही सृष्टि चीज ३
नभोरूप मी तूं नभोरूप सारा । मुळीं आजचा सृष्टिचा हा पसारा
तयारूपिं नानात्व कीं एकभाव । असें रूप तें जीव किंवा अजीव ४
मुळींचें नभोरूप तो दिव्य जीव । अनादी अनंत-प्रभाव-स्वभाव
स्वयंभू स्वयंतंत्र नेणे अभाव । नभीं चिन्मयीं त्या असे एक भाव ५
नभीं चिन्मयी त्या तुझें जन्म झालें । तुझ्यापासुनी मूळ नानात्व आलें
तया दिव्य जीवीं तुझी शक्ति दिव्य । स्फुरोनी स्वयें योजना योजि भव्य ६
मुळीं एक तो एक राहूनि जीव । तुला देउनी विश्वकर्तृत्व दिव्य

स्वयें स्वीं-करी साक्षि-अध्यक्षभाव । नियंत्रावयासी तुझी कार्यहांव ७
मुळीं एक तो एक राहूनि जीव । तया पोटिं आले अनंताणु जीव
अनंता जिवांचे अनंत स्वभाव । तुझें कार्य हें थोर तूझा प्रभाव ८
नभोरूप झाले अनंताणु जीव । जिवासाठिं त्या योग्य नाना अजीव
नभोरूप भोगार्थ योगार्थ भाव । तुवां निर्मिलें थोर तूझा प्रभाव ९
पुढें जीवसंघात संघातजीव । पुढें भावसंघात संघात भाव
पुढें ये तुझ्या दिव्य कार्यानुरूप । नभोरूपभावांसि वाय्वादिरूप १०
नभोरूप तो एकला दिव्य जीव । नभोरूप तूं आणि त्वज्जन्य जीव
नभोरूप यांचें नभोरूप राही । अजीवापरी तें न वाय्वादि होई ११
अनंताणु जीवा नभोरूप राही । परी भोग्य-भेदें तनू भेद होई
नभोलोकिं त्यांसी नभस्तत्वदेह । तसा अन्य लोकीं मिळे अन्य देह १२
जसा देह तैसी मिळे भोगशक्ति । जसा देह तैसी मिळे योगशक्ति
जिथें योगशक्ती पुनर्जन्म तेथें । स्वयत्नें पुन्हा मीळण्यासी मुळातें १३
पुनर्जन्म येणेंपरी मानवातें । तुवां योजिला मीळण्यासी मुळातें
मुळीं दिव्य जीवीं तुझी शक्ति दिव्य । स्फुरोनी अशी योजना योजि भव्य १४
मुळींचा असे एक जो दिव्य जीव । अनादी-अनंत-प्रभाव-स्वभाव
तया ब्रह्म हें लोकिं सामान्य नांव । तया मी म्हणें श्रीहरी वासुदेव १५
तया श्रीहरीसी सदा युक्त व्हावें । असा यत्न माझा असे भक्तिभावें
तुझ्या योजनेनें मना जीव योगी । तुझ्या योजनेनें मना जीव भोगी १६
मना त्या अनंतें तुला कार्यकारी । असे नेमिलें सृष्टिच्या कारभारीं
परी साक्षि अध्यक्ष सर्वाधिकारी । असे तो; नको वीसरू हे विकारी १७
अणू जीव त्वज्जन्य तेही हरीचे । नको वीसरूं गूज हे अंतरींचें
तया योग्य ते भोग दे कायद्यानें । तया श्रीहरीयोग दे कायद्यानें १८
मुलें गोड माझीं जशीं मत्पित्याला । मिळूं वांछिती तोही वांछी तयांला
तसे जीव त्वज्जन्य तूझ्या पित्याला । मिळूं वांछिती तोहि वांछी तयाला १९
तुझा दोष तूं एक ध्यानांत घेईं । जयाकारणें तूज वैराग्य येई
नको भोग ऐसे तुला जीव सांगे । तरी पांगसी तूं मना भोगरंगें २०
जिवा योग भक्ता तुझी भोग हाव । वशीं आणण्या योग कांहीं उपाव
हरीभेटिच्यासाठिं लागे करावा । असा भोगहव्यास तूं कां धरावा २१

तुझी दिव्यता वीसरूनी आदिव्य । सुखें सेविसी सेवका जी असेव्य
सु-सेवा जिवांची तुझें कार्य येथें । मना भोग लोभीं नको वीसरूं तें २२
जिवाशी हरी गूजगोष्टी करीतो । तुझी लुब्धता क्षुब्धता नादरीतो
स्वकार्यच्युता तूजला बंद द्यावा । असें शीकवी श्रीहरी सर्व जीवा २३
मना बा तुझी योजना दिव्य भव्य । नको वीसरूं सेवुनी तूं असेव्य
करी मानवां योगकामा सुसाह्य । नको मोहवूं भोगिं त्या योग बाह्य २४
नभोलोकिं जीवा नभस्तत्व देहीं । जसा दाखवीसी हरी देहि देहीं
तसा दाखवी येथही यत्नशीला । दिसो सर्वि सर्वां हरिप्रेमलीला २५
हरी सर्व जीवीं अजीवीं रहातो । तुझी कार्यवाही कशीती पहातो
असे साक्षि अध्यक्ष सर्वाधिकारी । हरी हें नको वीसरूं तूं विकारीं २६
मना जाणसी कायदा त्या हरीचा । तसा वायदा मूळचा चाकरीचा
पुरा वायदा तो करी कायद्यानें । तुझा आमुचा फायदा कायद्यानें २७
कशासाठिं मांडी हरी हा पसारा । कुणी आकळावें हरीच्या विचारा
परी वाटतें तो स्वभावें विहारी । विहारार्थ त्याची घडामोड सारी २८
विहारार्थ त्याची घडामोड सारी । तुला नेमिलें येथ कार्याधिकारी
करीं कार्य तूं आपुलें कायद्यानें । तुझा आमुचा फायदा कायद्यानें २९
विहारी हरीशी मना वीहरूं ये । दुजी कामा नये सांडीमांडी
सांडीमांडी त्यासी हवी ती करूं ये । अन्य ती धरूं ये दूर दूर ३०

दूर दूर राहूं दुरितापासूनी । भवीं या असूनी भवातीत
भवातीत भावें भजूं विश्वजन । करूं ये भंजन अभावाचें
अभावाचें मूळ नेणती जाणीव । जाणती नेणीव-भावशील
भावशील करूं विश्वजन नेटें । भावें हरी भेटे श्रीविहारी १

## ४० हरीची भूल (पत्राच्या काळजींत असतां)

हरी तूं घरीं माझिया काय केलें । मला काळजीनें असें घेरियेलें
नसे पत्र अद्यापि माझ्या मुलीचें । करूं गोड कैसें तुझ्या या भुलीचें १
पिता आणि माता तुझ्या मंदिरांत । कशी कंठिती तीं दिवा आणि रात
सुता आज कैसी कसा पुत्र आज । कसा आज माझ्या गृहींचा समाज २
पिता आणि माता सुता आणि पुत्र । तुझ्या पायिं सारेच सारें स्वगोत्र

असें सोडिलें जाणशी देवराया । तुझ्या कार्यि देहासि या रावबाया ३
खुशाली गृहाची कळो योग्य कालीं । असें कामना ही मनीं तीव्र झाली
नसे पत्र अद्यापि माझ्या मुलीचें । करूं कोड कैसें तुझ्या या भुलीचें ४
खुशाली कळावी गृहींच्या जनांची । असे हीन का कामना ही मनाची
असो हीन ती ही न ती देवराया । पुरो कामनाती त्वरें देवराया ५
वरा दे न दे याचनेतें सहावें । भुकेल्या मनें मूक कैसें रहावें
असो भूक ही चूक ती टाकवेना । मला कामना गृह्य ही हांकवेना ६
तुवां कामना भूक ही योग्य कालीं । भुकेल्या मना ऐकवूनी खुशाली
दयासागरा पूर्वि संशांत केली । तुला आठवे आज ही काय केलि ७
नसे पत्र अद्यापि माझ्या मुलीचें । असें कार्य हें केलिचें कीं भुलीचें
नसे केलिही वाटतें भूलि आहे । तुझें कार्यबाहुल तन्मूल्य आहे ८
तुला चाकरी आज वार्ताहराची । बहूतां नव्या सेवकांच्या घराची
उणें ना पडावें नव्याचें कुणाचें । म्हणूनी तुझा जीव सर्वत्र नाचे ९
जुन्या विस्मरायासि हा नाच मूल । तुझी विस्मृती क्षम्य ही रम्य भूल
नव्या सेवकां सेवितां भूलचूक । न व्हावी तुझी वा मला यांत सूख १०
नसे पत्र अद्यापि माझ्या मुलीचें । करूं कोड कैसें तुझ्या या भुलीचें
असा रोष माझ्या मनीं जो उदेला । असे दोष तो मीं महाथोर केला ११
क्षमा याचितों पत्र येवो न येवो । न हो रुष्ट माझ्यावरी देवदेवो
गृहीं माझिया लक्ष घाली दयाला । यथाकाल विश्वंभरा विश्वपाला १२

## ४१ हरीच्या चरणीं (अभंग)

हरीच्या चरणीं वाहियेला जीव । शांतीचें वैभव भोगावया ॥
गावया लागलों या देवाचे गुण । हेत हा धरून विसाव्याचा ॥
चाल ही जुनाट संतांची म्हणूनी । आशा केली मनीं शांतीविशीं ॥
शीतलता परी नाहीं जीवा आली । जिवाची कहाली राहीनाची ॥
चिडूनियां मग निंदा मियां केली । तई ती हासली देवमूर्ति ॥
मूर्ति माझी देश देशसेवा करी । ऐसें बोले हरी हंसूनीया ॥
यातना देशाच्या दूर करावया । जीव होमावया सांगे हरी ॥
हरीचें सांगणें आदरीलें रंगें । तेणें जाला अंगें शांतिमय ॥

शांतीमय व्हावें ऐसें वाटे जीवा । तरी भावें सेवा देश-देव ॥
विश्व माझें विश्व माझें । मनीं चोजें भावीती ॥
तिये भावनेचे पोटीं । देशासाठीं राबावें ॥
वेठी धरियेला देश । निजदेश परांहीं ॥
हीन पराधीन जेणें । देश तेणें दुःखार्त ॥
तया करावा स्वतंत्र । योग्य मंत्र योजावे ॥
वेळीं शत्रूचा संहार । विश्वाधार आदेशी ॥
देशी स्वराज्य व्हावया । देहमाया टाकावी ॥
विश्वप्रेमें देश-देवा । रंगसेवा अर्पित ॥

× × × ×

जनीं दुर्जनसंहार । देवा युक्त तो आचार ॥
रण परी हिंसामय । नरा अधर्म अन्याय ॥
न्यायशील कोणी कोणी । ऐशा मता बहू मानी ॥
नीति त्यांतील दुबळी । येणें खळ होती बळी ॥
लीला देव करी सारी । प्रजा करी मजा मारी ॥
मारी मारी तो एकला । नरा अधर्म तो कला ॥
कला प्रजा निर्माणाची । नरा नाहीं अधर्माची ॥
चित्त जेथें ऐसें खुळें । तेथें धर्माचें वाटोळें ॥
लेश, अधर्म संसारीं । नाहीं खलाचे संहारीं ॥
रिघो अंतरीं हें सत्य । देश-देव सेवा सत्य ॥
नित्य रंगा सुख ठेवा । देशदेवा चरणीं ॥

× × × ×

देशीयांसी व्हावा देश । हा उद्देश उचित ॥
तया विरोध जो करी । देशवैरी खल तो ॥
खल तो तो वध्य जरी । वध तरी दुष्कर ॥
रणीं संहारावा खल । हे मंगल करणी ॥
नीति संहाराची परी । नसे बरी सर्वदा ॥
दानबळें ज्ञानबळें । जो जो वळे वळवा ॥
वाट सामाची संपतां । रणपंथा स्वीकारा ॥

राहाटी ही चित्तीं ठेवा । देश-देवा सेवितां ॥
ताप हरी तो देशाचा । रंग त्याचा पूजक ॥

× × × ×

खल तोहि बहु भला । बहुपरी स्वजनाला ॥
लाड स्वदेशाचे करी । जित देशा लाथा मारी ॥
रीति स्वदेशभक्तीची । ऐशी हीन दुर्मतीची ॥
तिची छाप जयावर । तो तो खल दुराचार ॥
रणीं वधावें त्या खला । असो कितीहि तो भला ॥
भला खला दे संमति । त्याशी खलाची द्या गति ॥
गति तीच कल्याणाची । सर्व पक्षा होय साची ॥
चित्तीं ठेवूनि हें सेवा । जीवेंभावें देशसेवा ॥
देशदेवाच्या चरणीं । सुखखाणी रंगाची ॥

× × × ×

आत्मा विकासार्थ देहधारी केला । परमात्मलीला आठवा ही ॥
आठवा ही लीला विकासार्थ सुख । विकासार्थ दुःख आत्मयासी ॥
आत्मयासी दारा पुत्र कुल गोत्र । अरत्र परत्न मोह भारी ॥
मोह भारी जावा प्रेमें थोर व्हावा । यासाठींच सेवा आदेशिली ॥
आदेशिली देवें देशसेवा कोणा । विश्वसेवा कोणा आदेशिली ॥
आदेशिली सेवा ती ती आदरावी । देहाची करावी माया दूर ॥
माया दूर करा मरा आणि मारा । जरी देशोद्धारा अवश्य तें ॥
अवश्य तें दुःख भोगा वा भोगवा । विकासार्थ उद्धारा साह्य करा ॥
साह्य करा बोधें साह्य करा वधें । प्रेमाच्या संबंधें वधा बोधा ॥
बोधार्हांसि बोधा वधार्हांसि वधा । आत्मयाचें साधा सदा हित ॥
सदा हित साधी आत्म्याचें जगतीं । तयासी सद्गती निश्चयानें ॥
निश्चयानें सेवा प्रेमें देश-देवा । रंगा सुखठेवा ज्याचे संगें ॥

देश परतंत्र । तया कराया स्वतंत्र ॥
तंत्र करी युक्त । तोचि खरा विश्वभक्त ॥
भक्त न देशाचा । भक्त नाहीं तो विश्वाचा ॥

विश्वाचा वेव्हार । काय करील गव्हार ॥
रडे देश दीन । तंव विश्व गोष्टी हीन ॥
हीन गोष्टी टाका । सेवा देशसेवा एका ॥
एका देशासाठीं । रंग करी आटाआटी ॥७॥
दुःख द्यावें खला । परी वधावें ना त्याला ॥
लागे तैसा वध । करो खल तो दुर्मद ॥
दया तत्त्व म्हणे । नको तयासी मारणें ॥
नेते कोणी कोणी । ऐसे अहिंसाभिमानी ॥
नीति अर्धवट । व्यवहारीं ही फुकट ॥
कटकट करा । तरी खलवध बरा ॥
बरा दुःखदानीं । दुःखें खला नाहीं हानि ॥
हानि खलदेहा । लाभ खलात्म्या विदेहा ॥
केलें तें पावेल । तेणें खलत्व निवेल ॥
लक्ष एका पायीं । ठेवा देश-देवापायीं ॥
पायीं तया रंग । भोगी आनंद अभंग ॥८॥

\+ + + +

स्वातंत्र्याची पूजा सर्वदा मंगल । असो खलबल कितीहि तें ॥
कितीहि तें करो देशीं पक्षभेद । वीरें त्याचा खेद न करावा ॥
न करावा त्याग निजकर्तव्याचा । करावा खलाचा प्रतिकार ॥
प्रतिकार शस्त्रयुक्त शस्त्रहीन । तत्वासि धरून आपुल्याला ॥
आपुल्याला स्थानीं दृढत्वें असावें । कर्तव्य पुसावें हृदयेशा ॥
हृदयेशा देशवीरत्व आवडे । तयासी नावडे दुर्बलत्व ॥
दुर्बलत्व नाश वीरत्वविकास । न होतां देशास मुक्ति कैंची ॥
मुक्ति कैंची पक्षभेदपूर्ण देशा । पक्षभेदनाशा यत्न व्हावा ॥
यत्न व्हावा तो तो उत्साहानें करा । पक्षभेद मारा यथाशक्य ॥
यथाशक्य त्यागबुद्धि आदरूनी । भेदांते भेदूनी ऐक्य करा ॥
ऐक्य करायासी झटा अहर्निश । परी वीरत्वास सोडूं नका ॥
सोडूं नका खलसत्ताप्रतिकार । करा जयजयकार स्वातंत्र्याचा ॥
स्वातंत्र्याचा वीर पूजी देशदेवा । त्या वीरांची सेवा प्रिय रंगा ॥९॥

शासि त्यानें धर्म आपुला टाकिला । सांगे शासिताला धर्म त्याचा ॥
धर्म त्याचा पाळणें हुकुम । करोत जुलुम कितीही ते ॥
कितीही ते न्यायशून्य नीतिहीन । असोत त्यां मान वांकवावी ॥
वांकवावी मान होऊनीयां लीन । शासित्याचें मन रिझवावें ॥
रिझवावें मन 'सनदी' शब्दांनीं । करावी मागणी न्यायासाठीं ॥
न्यायासाठीं केली मागणी न मिळे । तरी तयामुळें कोपूं नये ॥
कोपूं नये शासित्यासि शापूं नये । कदा लोपूं नये 'नागरत्व' ॥
नागरत्व नम्र दास्य कायद्याचें । हेंचि फायद्याचें शासितासि ॥
शासितासि शासित्यानें धर्म ऐसा । सांगूनीयां खासा बोध केला ॥
बोध केला त्याचें करा कांहीं चीज । शासित्यांचा माज उतरावा ॥
उतरावा खालीं आसनावरूनी । शिकस्त करूनी वीरत्वाची ॥
वीरत्वाची कास बळकट धरा । मरा आणि मारा देशासाठीं ॥
देशासाठीं रंग करीत बरळ । देश-देवबळ देई त्यातें ॥१०॥

\+ + + +

जेते आणि जित नातें हें नसावें । मित्रत्व असावें देशीं देशीं ॥
देशीं देशीं देश्य सत्ताधारी व्हावे । लोकतंत्र व्हावें सत्तायंत्र ॥
सत्तायंत्र व्हावें लोकाऽदेशकारी । लोकहितकारी स्वभावें जें ॥
स्वभावें जें सर्व सुबुद्धां आवडे । तयाचें वावडें जालें येथें ॥
जालें येथें नांव द्वाड स्वातंत्र्याचें । नांव समतेचें द्वाड जालें ॥
द्वाड जाले नेते नीती सांगणारे । प्रीति मागणारे द्वाड झाले ॥
द्वाड झाले कर्ते लोकसंग्रहाचे । लोकविग्रहाचे कर्ते गोड ॥
कर्ते गोड देश दास्यीं राखणारे । जे त्यां वांकणारे दासभावें ॥
दासभावें दीन बहु बुद्धिमंत । तोंवरी न अंत देशदास्या ॥
देशदास्य अंत व्हावा वाटे जयां । त्यांहीं मोहमाया निरसावी ॥
निरसावी भोगबुद्धि सर्वपरी । हृदयेश हरी आपणावा ॥
आपणावा हरी दुरात्मसंहारी । सत्ता प्रतिकारीं व्हावें धीट ॥
व्हावें धीट देशदेवसेवा नीट । करावी अवीट आनंदाची ॥
आनंदाची ठेव देशदेवापायीं । रंगें तियें ठाईं ठाणें दिलें ॥११॥

न मिळेल देश । बहुबली सत्ताधीश ॥

शत्रुपक्ष प्रिय । ऐसे बहुत देशीय
यश नाहीं येणें । व्यर्थ मरणें मारणें
रणें हिंसात्मक । व्यर्थ व्यर्थ अहिंसक
करा नम्र मन । रहा जेत्यासी नमून
नमून मागावें । जेता देईल तें घ्यावें
वेडी देशभक्ति । व्यर्थ वेंचीतसे शक्ति
शक्ति वेंचा सारी । शांतिमय कारभारीं
भारी उपदेश । ऐसा करीती आम्हांस
सदय ते जन । प्रेमें बोलती वचन
"न मिळेल देश । व्यर्थ रणें, व्यर्थ त्रास"
सत्य हें बोलणें । होवो आम्हां काय तेणें
नेता हृदयेश । रणें करवी आम्हांस
सकलां चाळवी । सर्व सूत्रें तो हालवी
वीरत्व देउनी । आम्हां उतरवी रणीं
रणीं मरूं मारूं । जें तो करवील करूं
रूपें सर्व त्याचीं । यावयाचीं जावयाचीं
चिद्रूप तो एक । नित्य, अनित्य मायिक
करूं कांहीं तरी । जी तो करवील परी
रीति नम्रतेची । आम्हां न माने तुमची
चित्तीं देश-देव । भरलासे सुखठेव
ठेव ती आदरूं । रंग म्हणे मरूं मारूं ॥१२॥

\+ + +

नको देशी परराज्य । व्हावें स्वतंत्र स्वराज्य
राज्यकाम ऐसा थोर । देशी करीत संचार
रणें सामसत्याग्रही । रणें शुद्ध सत्याग्रही
हीन उच्च साव थोर । देशीं लढले सुवीर
वीरत्व हें वर्षे तीन । दाखवीलें साभिमान
नरनारी त्या देशीय । सज्जनासी माननीय
यश स्वराज्यार्थ कांहीं । केला न्यूनाधिक कांहीं

यांहीं केल्या यज्ञां फल । यावयाचेंचि मंगल
लढा परी स्वराज्याचा । नाहीं थोडक्या वर्षांचा
चाड देशाच्या मानाची । चिंता भुकेल्या जनांची
चिंता ज्ञानाच्या वृद्धीची । चिंता चित्ताच्या शुद्धीची
चिंता जया देशाविशीं । येणेंपरी तया देशीं
शिष्ट संमत ध्येयार्थ । आहे लढणें निःस्वार्थ
स्वार्थ स्वताचा विलास । स्वार्थ कुटुंबविलास
सर्व सोडूनी हा स्वार्थ । तया लढणें देशार्थ
देशार्थ हें ध्येय श्रेष्ठ । त्यासी ज्याच्या देशा कष्ट
कष्ट दूरवूं विश्वाचे । ध्येय हेंच सज्जनाचें
चेष्टवीत त्या देशार्थ । स्वराज्यार्थ स्वातंत्र्यार्थ
थके तो न देह श्रमें । चके तो न मनोभ्रमें
मेंदु ठेवुनीयां थंड । करी करवी तो बंड
बंड सामसत्याग्रही । बंड शुद्ध-सत्याग्रही
हींच बंडें देशोद्धार । करीतील विश्वोद्धार
रणें सत्याग्रही लढा । उद्धाराचा पंथ चढा
चढावया देश-देवीं । निष्ठा दृढ असो द्यावी
द्यावी एवढी मागणी । रंग पाणि जोडीत ॥१३॥

\+ \+ \+

देव एक जो अद्वैत । तेणें मांडिलें हें द्वैत
द्वैतमय विश्वरूप । देव धरी तो अरूप
रूप येथें पूजनीय । भिन्न जनां भिन्न होय
यथा बुद्धि यथा भाव । भिन्न जनां भिन्न देव
देव कुणाचा सदेह । देव कुणाचा स्वगेह
देव निजदेश कोणा । भिन्न देव भिन्न जनां
जनां विश्वाचिया देव । कुणी मानी साधुभाव
वसे हृदयीं विश्वेश । सर्वजनीं सर्वाधीश
शब्द त्याचा आयकोनी । लागा देवाच्या पूजनीं
पूजनीं ज्या शांति लाभे । तेंचि सुबुद्धासि शोभे

भेदभाव सर्व गेले । विश्वजन पूज्य झाले
जाहले देव सर्व देश । झाले सर्व ते 'स्वदेश'
शत्रुमित्रभाव गेला । देश देश देव झाला
झाला दुःखार्त स्वदेश । दुःख देतसे विदेश
विदेशाचि नाहीं ज्याला । तया विश्वपूजकाला
लागे दुःखार्ता पाहणें । लागे तया हात देणें
देणें दास्य दुःखार्तास । दास्य मुक्त्यर्थ प्रकाश
"कास धरावी रणाची । मरणाची मारणाची
चिरडीतो जो विदेश । तया शांत करायास
संगराचि आवश्यक । हिंसात्मक अहिंसक"
करी पूजक विश्वाचा । उपदेश हा हिताचा
हिताचा हा उपदेश । दास्यदुःखार्थ देशास
सत्तामत्त विदेशास । करीत तो उपदेश
"देश दुजा तुडवीतां । येणें तुमची जनता
ताप पावेल शेवटीं । पाहतसे जगजेठी
ठीक सर्वांचें असावें । विश्वपूजका हें व्हावें
वेड विश्वाच्या पूजेचें । असे रंगमनीं साचें
साचें तेंच त्याचे भावा । देश-देवा सेववी ॥१४॥

\+ + +

जन पूजी देवमूर्ति । देवा आर्ति कथीत
तप्तताप देव हरी । ऐसी धरी भावना
नाहीं देश-देव तसा । देव कसा म्हणा तो
तो न आर्ति दूरवीत । स्वयें आर्त तो देव
देव आर्त पूजनीय । दोषमय भाषा ही
हीन कल्पना ही सर्व । देशा देव मानूं ना
नारायण सर्वगत । सर्वातीत देशीं तो
देशीं तो जो सर्वगत । तो न आर्त मुळीं ही
हिताहित त्याचे हातीं । तो जनार्ति दूरवी
विकलता स्पष्ट जया । देव तया म्हणा न

नम्रपणें ऐशा मता । सत्य कथा सांगो ही
हिताहित ज्याचे हातीं । जडमूर्ति तो नाहीं
हिताहित ज्याचे हातीं । जीवमूर्ति तो नाहीं
नाहीं जड नाहीं जीव । खरा देव चिद्रूप
परी जडीं पूजूं तया । जीवीं दया पूजी तो
तोचि देशबंधु जनीं । पूज्य मानी पूजक
करूं पूज्य जड जीव । भावें देव म्हणों त्या
त्याचि परी देशा देव । म्हणे भाव कोणाचा
चाल सर्वत्र समान । देवपण भावाचें
चेतन वा अचेतन । देवस्थान विकल
विकलता आणि आर्ति । सर्व मूर्ति व्यापक
व्यापक तो पूर्ण देव । व्यापी भाव अपूर्ण
पूर्ण अपूर्ण संगति । देवमूर्ति सर्वही
हीन उच्च मूर्ति तेथें । विवेकातें विचारा
राउळींची हीन मूर्ति । उच्च मूर्ति देशही
हीच मति हाच भाव । देश-देव पूजीत
तया देशमूर्ति गत । विश्वनाथ पावतो
तोचि रंगा पूजनीय । सर्वमय सर्वस्थ ॥१५॥

× × ×

देश-देव विश्वदेव । विश्वातीत देव देव
देव तीन हें महान । दुजे देव ते लहान
नष्ट करी भवासक्ति । देवदेवाची आसक्ति
तिचा करावा आश्रय । व्हाया निष्काम निर्भय
भय सर्वत्र द्वैतांत । भयविमुक्त अद्वैत
अद्वैत तो देव देव । तयाठायीं ऐक्यभाव
भावबळें संपादावा । विवेकें तो दृढवावा
वास देवांचा सर्वही । सदा सर्वांचे हृदयीं
हृदयींचा देवदेव । त्यासि होतां ऐक्यभाव
भाव भवीं जे मोहन । त्यांचें न होय बंधन

धन-मान-काम-राग । सुटे होय महाभाग
भाग त्याचा मग भवीं । विश्वासाठीं उठाठेवी
ठेवी देह तो विश्वार्थ । ठेवी देह तो देशार्थ
थकले जे भवान्तरीं । तया हात दे सांवरी
वरी विश्वदेवपूजा । वरी देशदेवपूजा
जातिकुलादिकीं बद्ध । तयां कराया संसिद्ध
धर्मदेश-देवसेवा । धर्म विश्व-देवसेवा
वाट धर्मांची या चाले । चाले तैसा धर्म बोले
लेकरांच्या बळा ऐसें । पिता चालवी त्या तैसें
सेवाधर्मी हळूहळू । जनां चालवी कृपाळू
तुटी लुटवी अनंद । रंग ब्रंदा तयाचा ॥१६॥

\+ \+ \+

मातृदेवो भव पितृदेवो भव । गुरुदेवो भव ऐसा बोध
ऐसा बोध तैत्तिरीय श्रुति करी । मज बोधी हरि देशदेव
देशदेव देशमाता देशपिता ।[1]पोटीं देशहिता विश्वहित
विश्वहित साधावया देश देश । व्हावे आत्मवश मित्र मित्र
मित्र मित्र देश होतील स्वतंत्र । देश परतंत्र परशत्रु
परशत्रुत्वानें सत्ता परकीय । नष्टवावी न्याय ऐसा आहे
ऐसा आहे न्याय यांत देशहित । यांत विश्वहित निःसंशय
निःसंशय दास राखणें अधर्म । राहणें अधर्म दास देशीं
दास देशीं निज रहावें न कोणी । तेणें विश्वा हानि बहुपरी
बहुपरी सत्तामद सत्ताधीशा । लावितसे आशा विलासाची
विलासाची आशा वाट सर्वनाशा । धन्या आणि दासा दोघांसीहि
दोघांसीहि लोटी विविध पातकीं । सर्वथा घातकी देशदास्य
देशदास्य दूरवाया व्हावी माया । आणि रणीं कायाहोम व्हावा
होम व्हावा बहु दिस बहुपरी । वीरतेची खरी खाण व्हावी
खाण व्हावी नाना युक्तिप्रयुक्तींची । विविधशक्तींची एकी व्हावी

---

१. ''पोटीं देशहिता विश्वहित'' किंवा ''साध्य देशभक्ता विश्वहित''.

एकी व्हावी परा पोंचवाया पार । देशीं त्याचा थार मोडावया
मोडावया घडी सत्तेची सुयंत्र । नाना मंत्र तंत्र आवश्यक
आवश्यक रंग म्हणे सोसूं हानि । काढूं बंदींतूनी देशदेव ॥१७॥

\+ + + +

उपकार देशें परदेशावरी । करावा ही खरी धर्मरीति
रीति ही देशासी सांगे हो स्वतंत्र । नको परतंत्र राहूं बापा
बापा दासपति होतसे पतित । करूनि अमित दुरात्मता
मता सज्जनांच्या मान देत नाहीं । जनांची कमाई लुटी बळें
बळें दुबळ्यांचा करीतसे छळ । तेणें अमंगळ फळ त्यासी
त्यासी फळ ऐसें न मिळावें फार । यास्तव उद्धार करी निज
निजगृहांतूनी विदेशीय सत्ता । काढी मदमत्ता आत्मयशें
यशें देशवीर देश सोडवीती । रीति ही जगतीं सनातन
तन मन धन रंग म्हणे द्यावें । मोकळें करावें देशदेवा ॥१८॥

\+ + + +

सेवा-पूजा-उपकार । यांत विविध प्रकार
रमे धार्मिक सज्जन । सेवाधर्मी रात्रं दिन
नसे परी एकाकार । सेवा त्याची निरंतर
रण कधीं अहिंसक । रण कधीं हिंसात्मक
करावया लागे त्यासी । परा उद्धरावयासी
सीता हरिली रावणें । त्यासी उद्धरी हननें
नेता राम तो धार्मिका । सेवा धर्माच्या सेवकां
कालमुखीं दुराचार । अर्पिणें हा उपकार
रत्नपूजा योग्य साधु । रणपूजार्ह असाधु
धुणें मलिनाचा मल । पूजा हीच सुमंगल
सुमंगल आत्मोद्धार । सुमंगल परोद्धार
परोद्धाररत कोणी । आत्मोद्धाररत कोणी
नीतिमंत पुरें व्हावें । मग परा उद्धरावें
वेंचू नये परोद्धारीं । शक्ति नीतीची अपुरी
रीति ऐशी कोणा मान्य । परी जनता सामान्य

मान्य करी अपूर्णांचें । कार्य पर-उद्धाराचें
चेष्टवींत सर्वा हरि । आत्मोद्धारीं परोद्धारीं
रीति धरा उद्धाराची । रंग इतुकेंच याची
याची आग्रहानें सर्वा । देशदेवा स्मरोनी ॥१९॥

\+ + +

नीति जी व्यष्टीतें तीच समष्टीतें । सन्मान्य दृष्टीतें हें न माने
माने मान-अपमानाचा विसर । तया ज्या संसार-त्याग इष्ट
इष्ट परी नाहीं विसर हा संघा । कायद्याचें भंगा प्रवर्ते जो
तेजोवध मान्य सुखानें करावा । बोल आदरावा शासित्याचा
त्याचा पक्ष बळी पूजी जो दुर्बल । त्याची कळकळ ऐसें सांगे
सांगे ऐसे संघा परी संघपति । मति दुर्बल ती अवमानी
मानी मानयोग्य राष्ट्रसभासंघ । तया मानभंग कैसा माने
माने परस्पर संवादें शांतीची । व्यवस्था न्यायाची देशीं करूं
करूं येणेंपरी जरी सत्कार । शिष्टव्यवहार करी मान्य
मान्य संघपति निरोप हा धाडी । सरकार अढी मनीं धरी
धरी हट्ट भेट न देऊंचि आतां । शांतीची व्यवस्था आधीं करा
करारी शासिता बोले येणेंपरी । शासित उभारी रणझेंडा
झेंडा सत्याग्रही कायदेभंगाचा । नव्या प्रसंगाचा जयी होवो.
होवो राष्ट्रमान राष्ट्रीयांचें ध्येय । मानभंग होय सर्वपरी
परी हीच देशीं वाढवील तेज । मिळेल स्वराज्य तेजोबळें
बळें व्हा आगळे सेवा देशदेवा । रंगा सुखठेवा सेवा ज्याची ॥२०॥

\+ + +

केव्हां तेज केव्हां माया । दासें पाहिजे योजाया
जाया परकीय सत्ता । व्हावी वक्र सरलता ।
सरलता केव्हां बरी । केव्हां वक्रता चातुरी
रीति तेजाची सरल । केव्हां केव्हां मायाबल
बलद्वय हें योजिती । तेव्हां देश मुक्त होती
होती माया बळें बली । होती हिंसा बळें बली
बली ऐसे सत्ताधीश । त्यांच्या सत्तेचा विनाश

शब्दसत्याचे पूजक । हिंसात्यागाचे पूजक
करावयासी समर्थ । होतील ही आशा व्यर्थ
व्यर्थ शब्दसत्याग्रह । व्यर्थ हिंसात्यागाग्रह
हरि मोक्ष शास्त्राचार्य । त्यातें पुसा कार्याकार्य
यथाकाल हिंसाश्रय । यथाकाल मायाश्रय
यदुरायें स्वतां केला । गीताशास्त्रीं आदेशिला
"लागे दाक्ष्य आणि तेज । तया रक्षी जो समाज१
जयाजय लेखी सम । करी न्याय्य निजकर्म"
मत ऐसें हृषीकेश । समाजाच्या रक्षकास
सत्त्वपूर्ण मोक्षहेतु । सांगे नको व्यर्थ किंतु
किंतु रंग टाकी सर्व । देशदेव पूजनीं ॥२१॥
+ + +
रूसदेशीं मायादळें । गूढ पसरीलें जाळें
जाळें उत्साही वीरांचें । देशभक्त सुधीरांचें
चेष्टा राजनिष्ठ बाह्य । होय गूढकार्या साह्य
साह्य तियेचें घेऊनी । सरकारी खात्यांतूनी
नीतिविशारद वीर । भरियलें धुरंधर
धरपकड साहिली । शिरें हजारों वाहिलीं
लीला साठ वर्षांवर । श्रद्धाबळें देशभर
रणप्रियांहीं करूनी । मायादल पसरूनी
निकालांत झारशाही । अंतीं काढियली त्यांहीं
हीच मायादलरीति । स्वीकारिली दुज्या भक्तीं
भक्तिमूर्ति माझिनीचे । तीव्र शब्द जिव्हाळ्याचे
चेतवूनी देशभक्ति । मायादलाची सुनीति
नीतिमंत बांधवांत । पसरीत इतालींत
तया नीतीचा आश्रय । दासदेशा असे न्याय्य
न्यायधर्म्य मायाश्रय । न्याय्य धर्म्य हिंसाश्रय
यथाप्रसंग करूनी । देशदेवा बंदींतूनी

---

१. गीता अ. १८ श्लो. ४३.

नीतिमंतांनीं काढावें । रंग भावें मागत ॥२२॥
हिंसा हा अधर्म सदा तैसी माया । अहिंसा अमाया सदा धर्म
धर्ममत ऐसें असे ज्याचें आज । सत्याग्रही तेज वसे ज्यांत
तया देशवीरां माझा नमस्कार । तयां विश्वंभर यश देवो
देवो मज त्यांच्या धर्माची सुदीक्षा । जरी धर्मशिक्षा दोषी माझी
माझी मति सांगे नित्यधर्म एक । आत्मोन्नतिसुख घेणें देणें
देणें एक थोर घेणें एक सार । उन्नत विचार उच्च शील
शील ज्यांचें घोर दीन हिंसापर । उन्नत विचार अवमानी
नीति तेथें हिंसा धर्म तेथें हिंसा । अधर्म अहिंसा तेथें दीन
दीनवाणी वाणी वर्जुनीयां हाणी । दुष्ट! तो न हानि करी तया
तया मायाबळें गांठोनियां मारी । मारक तो तारी संसारीं त्या
त्यासी देहदुःख देहत्याग दुःख । शिकवी विवेक थोडा फार
रस्ता उन्नतीचा आहे दुःखांतूनी । आहे सुखांतूनी केव्हां केव्हां
केव्हां हिंसाधर्म धर्म केव्हां दया । असे संसारीं या म्हणूनीच
नीच अति झाले सत्ता मदोन्मत्त । माया हिंसा तेथ खरा धर्म
धर्मशिक्षा ऐशी मज दे ईश्वर । मज तीच सार वाटे आज
आज देशवीरा तया नमस्कार । शिक्षा ही असार वाटे जया
जया धर्म ईश सांगेल जो जेव्हां । तयास तो तेव्हां उद्धारक
करूं सुखें तरी धर्म आपुलाला । देशदेवतेला सेवूं प्रेमें
प्रेमें रंग करी नमन सकलां । देशदेव झाला पूज्य जया ॥२३॥

× × × × × ×

देशदेवाचे पूजक । देश कराया एक
एक तत्त्व आदरीती । निजदेशबंधुप्रीति
प्रीति सामान्य विश्वाची । विशेष ती देशीयाची
चित्तीं ऐसा प्रीतिभेद । दास्य-दात्यावरी क्रोध
क्रोधप्रीति येणेंपरी । नियमूनी निजान्तरीं
रीति निजबंधुजनां । शिकवीती ही अजाणा
नाना धर्म जे देशांत । लढा त्यांचा व्हाया शान्त
तडजोड विवेकाची । करूं कष्टती सदाची

चिरंतन देशहित । असे देशस्वातंत्र्यांत
तत्त्व दृढ हें स्मरूनी । पसरीती बंधुजनीं
जनीं हिंदु आदि हिंदु । तैसे मुसल्मान बंधु
बंधुपण विसरूनी । सर्वां पोंचवीती हानि
हानि असे जी देशाची । हानि असे ती सर्वांची
सर्वांचीच अवदशा । दास्य जोंवरी स्वदेशा
देशावरी परसत्ता । राहणार मदमत्ता
तारतम्य विवेकाचें । असे जंव जनीं कांचें
चेष्टा हिंदुपूजकांनीं । देशदेवसेवकांनीं
नित्य एकीची करावी । लाज बेकीची धरावी
विवेकी ते पुरातन । त्यांहीं सर्व बंधुजन
नमूनीयां सानपणें । आपणावे आत्मयज्ञें
यज्ञें होईल एकता । तेणें देशाची मुक्तता
मुक्तता ही व्हायासाठीं । आटाआटी रंगाची ॥२४॥

\+ + + + +

आदि हिंदु हरिजन । आणि बंधु मुसल्मान
मानवते यांसी सत्ता । परकीया मदोन्मत्ता
ताप तोंवरी दास्याचा । हिंदुस्थाना घडायाचा
याचा विचार करूनी । हिंदु देशपूजकांनीं
नीति तीचि आदरावी । जिणें या बंधूंच्या जीवीं
वीट देशाचे दास्याचा । लोभ देशस्वातंत्र्याचा
चालवील क्षोभ थोर । दास्य वाटवील घोर
रणें मंदिरावरूनी । रणें मशीदीवरूनी
नीतिशून्य जीं चालती । तेथें हिंदूंनीं सुनीति
तीव्र स्वदेशाभिमानी । त्यागपूर्ण आदरूनी
निःस्वार्थता शिकवावी । बंधुप्रीति मिळवावी
विनाकारण भांडण । भांडे मदोन्मत्त जन
नम्रता न तेथें बरी । तेथें लागते खंबीरी
रीति तेजस्वी खंबीर । रीति कोमळ उदार

रणीं जया जी उचित । आदरावी ती तयांत
तत्त्व देशस्वातंत्र्याचें । राहो हृदयीं नित्याचें
त्याचे प्रकाशें चालावें । त्याचे प्रकाशें बोलावें
बोलावे ते प्रेमबोल । ज्यांहीं बंधुमनीं ओल
लवकरी सत्प्रेमाची । परस्परविश्वासाची
साची उदित होईल । वीट दास्याचा येईल
लढा स्वातंत्र्याचा घोर । ऐक्यें लढतील थोर
थोरपण स्वातंत्र्याचें । फलदेशीय ऐक्याचें
याचें ठेवूनी स्मरण । हरिजन मुसलमान
मान देऊनी देशाचे । भक्त करावे प्रेमाचे
प्रेमाचेंचि आचरण । आपणील बंधुजन
बंधुजन हे हिंदूंनीं । प्रेमरज्जूंनीं बांधूनी
नीतिबळें तेजबळें । देशा करावें मोकळें
कळे तैशी देशसेवा । रंगसेवा अर्पीत ॥२५॥

\+ + + +

(अनुष्टुप्)

कळे तसें तुम्ही सेवा । देशदेवा अहर्निश
श्रीहरीसी समर्पूनी । सेवाफल यशायश

\+ + + +

## ४२ दहावा योग (वसंत)

नको टाळूं नको टाळूं दहावा योग हा देवा
कृपाळू तूं कृपाळू तूं घडूं दे एवढी सेवा
नऊ वेळां मियां देवा तुझ्या कामीं तनुत्याग
कराया घेतला हट्ट तुवां ते टाळिले योग[1]
नको टाळूं नको टाळूं दहावा योग हा देवा ५

१ योगकाल : १–१९०७, २–१९०८, ३–१९२४, ४–१९२५, ५ व ६–१९३०, ७ व ८–१९३२, ९–१९३३.

नऊ वेळांहुनी देवा    असे ही वेगळी सेवा
पहा हे आपसी तंटे    पहा हे नीतिचे वाद
स्वसत्तेचा कसा लाभे    अशा देशास आस्वाद
शमाया घातकी घोर    विलासी नीतिचा नाद
शमाया हिंदु-मुस्लीम    तसा हा स्पृश्यतावाद
शमाया मायदेशाचे    दुजे ही मानसी रोग
दवा व्हावी म्हणूनी हा    दहावा योजिला योग
कृपाळू तूं कृपाळू तूं    घडूं दे एवढी सेवा
नको टाळूं नको टाळूं    दहावा योग हा देवा
पहील्या दोन योगांच्या    प्रसंगीं मी परायत्त
मला मन्नायकें केलें    निजाज्ञेनें परावृत्त
पुढें जे योग  योजीले    स्वतंत्रें मी तुझ्या कामीं
तयां योगीं यशस्वी तूं    मला केलेंसि मत्स्वामी
नऊ वेळां अशा रीती    तुझ्या कामीं तनुत्याग
कराया हट्ट मीं घेतां    तुवां ते टाळिले योग
तुझें जें काम मी आतां    करूं इच्छीं तिथें कांहीं
यशाची अ पही आशा    तनुत्यागाविणें नाहीं
हजारोंचा तनुत्याग    जुटाया देश हा व्हावा
हजारोंचा तनुत्याग    सुटाया देश हा व्हावा
जुटे कैसा सुटे कैसा    विलासी नीति जों वाढे
जुटेना हा सुटेना हा    न होतत्प्रेम जों गाढें
विचारीं या अशा आतां    करूं इच्छी तनुत्याग
करूं दे तो तनू-नाथा    घडूं दे तो यथासांग
घडूं दे तो यथासांग    न हो कारागृहीं अंत
गृहींही तो न हो देवा    विकारानें अकस्मात
विचारानें मियां वर्षं    असे नेमीयलें एक
कराया अल्पशी सेवा    भराया भक्तिनें लोक
सुटी बंदींतुनी होतां    जुटीसाठीं क्रियायोग
वरूनी अल्प सेवान्तीं    करूं इच्छीं तनुत्याग

नको तें वर्षही एक	तयाचा सानसा भाग
पुरे मातें पुढें देवा	घडूं देई तनुत्याग
जुटीच्या थोर कार्यांत	तनुत्यागाविणें नाहीं
यशाची अल्पही आशा	म्हणूनी मागणी पायीं
नको टाळूं नको टाळूं	दहावा योग हा देवा
कृपाळू तूं कृपाळू तूं	घडूं दे एवढी सेवा
घडूं देई तनुत्याग	घडूं दे तो यथासांग
जडूं दे या तनुत्यागें	कुठें कांहीं स्वदेशांग
तुझ्या या नाटकीं देवा	मला जी भूमिका सान
दिली तूं या तनू-वेषीं	बघूनी बुद्धिचें मान
तिचें झालें पुरें कार्य	बहू अंशीं गमे मातें
म्हणूनी मागणी माझी	अखेरीची असे तूंतें
घडूं दे देश-ऐक्यार्थ	तनूचा मंगल त्याग
असो हा एक अंतींचा	प्रभो मद्‌भूमिका-भाग
मुलां दे माझिया देवा	तुझी सेवा तुझी भक्ति
पहाया मत्तनुत्याग	तयां दे भावना-शक्ति
वहायासी पशू तूंतें	पुढें हो भक्त होमाचा
वहाया तेविं मद्देह	मुलां दे भाव जोमाचा
जळीं घ्यावी बुडी, द्यावी	कुडी चिंतूनि त्वत्पाद
शमाया हिंदु-मुस्लीम	तसा हा स्पृश्यतावाद
मनाचा निश्चयो झाला	असा देवा विचारान्तीं
मुलां दे भाव-सामर्थ्य	न दे त्यां दुबळी खंती
मुलांनो मोहनांनो मी	तुम्हांसी मागणी मागे
वहा देवासि मद्देह	कराया सन्मना जागें
कुठेंसा जाहला यज्ञ	बळी दीले अजापुत्र
श्रवूनी हें मनीं वागे	बळी व्हायासि मी पात्र
तुम्ही द्या हा बळी देवा	जळीं सोत्साह भक्तीनें
तया प्रार्थूनि कीं देशा	भरी गा ऐक्य-शक्तीनें
जहाला निश्चयो माझा	पडो ऐक्यार्थ हा देह

म्हणूनी व्हा पुढें यज्ञा    त्यजूनी मत्तनू मोह
बहू संतीं जळीं देह    स्वयें अर्पूनि संसार
जनांसी भक्ति बोधूनी    त्यजीला साधण्या सार
तयांसी सार कांहीं हो    मला हें सार देशैक्य
स्वसत्ता पूर्ण साधाया    स्वकीयांचें पुरें सख्य
पुरें हें सख्य साधाया    कराया सन्मना जागें
वहा देवासि मद्देह    तुम्हांसी मागणी मागें
हजारोंचा तनुत्याग    जुटाया देश हा व्हावा
जुटेना तों सुटेना हा    धरूनी या मनीं भावा
जुटीसाठीं तनुत्याग    कराया जाहलों सिद्ध
शमाया हिंदुमुस्लीम    तसा हा स्पृश्यतावाद
शमेना वाद वादानें    शमे तो आत्मबोधानें
शमे तो प्रेमछंदानें    शमे सद्भावबंधानें
शमाया वाद हिंदूंत    पुरी राष्ट्रीयता व्हावी
पुरी राष्ट्रीयता केव्हां    कशी हिंदूंत जागावी
विचारीं या बहू काळ    बहू एकाग्र होऊनी
करीतां खर्च हा राही    पुढें सद्भाव येऊनी—
"करावा खर्च हा देह    जळीं द्यावा बळी देवा
"अभीष्टप्राप्ति अल्पांशें    जनीं साधील ही सेवा
स्फुरे एकाग्रचित्तीं हा    असा सद्भाव यासाठीं
वहा देवासि मद्देह    तुम्ही घ्या पुण्य हें गांठीं
तुम्ही घ्या पुण्य हें गांठीं    स्वदेशाच्या जुटीसाठीं
वहा देवासि मद्देह    नका शंका धरूं पोटीं
जहाला निश्चयो माझा    पडो ऐक्यार्थ हा देह
नको आतां तनू-मोह    नको कर्तव्य-संदेह
मनींची संपदा माझी    असे चैतन्य-गाथादि
तुम्हांसाठीं जनांसाठीं    उपार्जीली यथाबुद्धि
मला ती लाभदा झाली    मला लाभे तिणें शांति
गमे कीं लाभदा व्हावी    दुज्यांही ती विचारान्तीं

जनाची प्रेमला सेवा निजात्मा वाहणें देवा
तनूचा मोह टाकूनी विवेकें मार्ग चालावा
शिकावें शीकवायासी बरें तें सर्व सर्वत्र
असें चैतन्यगाथादी लिखाणाचें असें सूत्र
मुलांनो मोहनांनो या लिखाणीं मी तुम्हांपाशीं
सदा राहीन यासाठीं नका गुंतूं तनूपाशीं
वहा देवासि मद्देह नका शंका धरूं पोटीं
तुम्ही घ्या पुण्य हें गांठीं स्वदेशाच्या जुटीसाठीं

---

# यशोधन रागरंग

## ४३ नमन (अनुष्टुप्)

"यशोधन"-धनिश्रेष्ठ यशवंत कवीप्रति
श्रीहरीसेवकाची या शिष्यभावयुता नति
पात्रें 'यशोधन-कणां' तुम्हीं जी उपयोजिलीं
तीं मीं मित्राग्रहासाठीं[1] घेउनी येथ योजिलीं
कणाभिधानें तुमचीं पहिलीं घेतिलीं सहा
कणांच्या कणिकां[2] कांही घेतिल्या येथ संग्रहा
भाट मी हरिचा एक पद्यकार; न मी कवि
तुम्हा कवींचा सर्वांचा शिष्य नम्र सदा भवीं

---

१. पद्य ५० पाहा. २. पहिल्या सहा पद्यांत कित्येक ओळी व शब्द मूळांतून घेतले आहेत. नंतरच्या पद्यांत मूळ कणारंभक एक वा दोन शब्द घेऊन प्रारंभ केला आहे. मूळ कणाचें नांव वृत्तापुढें कंसांत दिलें आहे.

इष्ट मी हरिच्या पायीं धरीं कीं जन्म शंभर
श्रमवी परि दे अन्तीं पद्य-सत्काव्यनिर्भर
श्रमें मी जुळवीं आज गणमात्रा कशातरी
भरीं वृत्तांत वृत्तान्त वदे जो अंतरीं हरी
आशीर्वाद असों द्यावा तुमचा, बळ तें मम
सदाशीर्वाद सफळ करीलाचि मम श्रम

## ४४ पांखरास (विमोचन)

नको करूं संकोच । पांखरा ! नको करूं संकोच ॥धृ०
तनू पांखरा ! त्यागुनि जाई । असती वळकट तोंच ॥ १
त्यागुनि जाईं खला बोधुनि । 'ठेवा कांहीं पोंच' ॥ २
त्यागुनि जाई स्वजनां बोधुनि । 'ठेवा कांहीं पोंच'॥ ३
आत्महोम जरि माने तुजला । चोंच तुझी तुज टोंच ॥ ४
आत्महोम जरि तुला न माने । चोंच खलासी टोंच ॥ ५
करोत तव बंधू कोलाहल । फाडुनी अपुली चोंच ॥ ६
शुभफलपावन तनुत्यागपथ । संशय मुळीं नकोच ॥ ७
शक्य याच पथिं बंधु-विमोचन । हा ठेवीं तूं पोंच ॥ ८

## ४५ पाणपोई (वारुणी)

येइ भाई येथ पाही घातली ही पाणपोई ।
धर्मजाती कोणती ती भेद ऐसा येथ नाहीं ।
चेतनेच्या उष्णतेची ताहिनची माझ्या जनीं या ।
न्यूनता पाहूनियां मीं बांधियेली ही सराई ॥ १
राहिलों ही बांधण्यासी, श्रीहरीची योजना ती ।
येथ जें चैतन्य पाणी, श्रीहरीची ती दवाई ।
तीस वर्षे जाहलीं, मीं वाहिलों होमार्थ त्यातें ।
तो न होमी कां अजूनी ठाउकें तें त्यास भाई ॥ २
मी अघाशी, सान होमीं तृप्ति ना माझ्या जिवासी ।
थोर होमा आहुतींची पूर्तता ती होत नाहीं ।
धन्य ते जे अल्पवांछी, होमिलें त्यां श्रीहरीनें ।

मी अधाशी याचसाठीं वाटतें तो वाट पाहीं ॥ ३
वाटतें ऐसें मला याकारणें आतां तया मी ।
वीनवीं, होमीं मला तूं सत्वरी; ना वाट पाहीं– ।
तें असो; ही पाणपोई, येथ हें चैतन्यपाणी; ।
प्या नि व्हा उष्णोष्ण, तत्वीं होऊं द्या दुस्तापदाही ॥ ४

## ४६ श्रीशारदावन्दन (मन्दारमाला)

श्रीशारदे ! वन्दितों पाय बन्दी; असे एक याची तुला मागणी
वीणा तुझी मंजु यातें न मंजू, तिणें कीं विरे वीरवृत्ती जनीं
माते उदारे ! स्फुरे वीरता ती तुतारी बरी आज; ती घे करीं
मागें तुला मागणी आग्रहें ही; ग्रहीं भारतीं कीं दशा ना बरी १
वीणा सतारी मृदू नाद सारा नको आज; माते ! तया आंवरीं
भेरी तुतारी महानाद व्हावा करी देवि तो; या जना सावरीं
टाकी–तरुच्छत्र, टाकी क्षणीं या शिलेचें तसें भव्य सिंहासन,
टाकी घरिद्वान त्या इंसलीला करीं पालथे दुष्ट दुःशासन २
माते ! तुझी हेमकान्ती झळाळो जनीं या; वना ती नसो भूषण !
तेजें तुझ्या तेज देऊनि यांना त्वरें घालवी दासता-दूषण
लक्ष्मीच हो शारदे ! आजला तूं; करीं आजु घे शस्त्र लक्ष्मीपरी
झांशी कशी गाजवीली तियेनें, तशी गाजवी आर्यभू भूवरी ३
लक्ष्मीपति–श्रीहरी–सांगणी ही; मियां सेवकें त्याचिया तूजला
सांगीतली; रोष होवो न माते ! जरी ती न माने तुला आजला
दोघें तुम्ही थोर; दोघांहि माझी असे वन्दना नम्र भावें सदा
वागा कसेंही; मला काय त्याचें; मला आपदा सर्वही संपदा ४

## ४७ निष्फळ प्रतीक्षा (वसन्त)

प्रतीक्षा मी किती आतां करूं कंटाळला जीव
कुणा थोरांकरीं आतां दवा तूं यांसि पाजीव
जरी इच्छा तुझी देवा दवा मी द्यावि या काळा
तरी जिंकीन आलेला जिवाला थोर कंटाळा १

न टाळूं इच्छी मी काम मला कामींच आराम
परी जें सत्य तें सत्य तुला तें सांगणें काम
नको वेळां मियां देवा ! तुझ्या कामीं तनुत्याग
कराया घेतला हट्ट तुवां ते टाळिले योग २
तुझ्या पायीं महात्मा मीं विवेकें वाहिला जेव्हां
'असे होमार्थ, होमी हा' असें मी बोलिलों तेव्हां
मला तें वाटलें होम नसे माझा बहू दूर
परी वर्षें हरी ! तीस जहालीं कीं पुरापूर ! ३
दवा चैतन्य-पाणी हें दिलें जें तूं जनां द्याया
दिलें तें िड हिंडोनी दिसे तें जाहलें वायां
कुणा थोराकरीं आतां दवा तूं यांसि पाजीव
प्रतीक्षा मी किती आतां करूं कंटाळला जीव ४

## ४८ आळवणी (तूणक व चंचलामिश्र)

अदय काय भारतीय आपुल्या जनांवरी ॥धृ०॥
आळवून आळवून कंठ चालला सुकून
श्रीहरी म्हणेल काय पाहुनी अशी परी १
क्षात्रकर्म दुष्टघात • न्याय-सत्य-पक्षपात
धर्म कीं अधर्म, वाद हाच भारतांतरीं २
देव-गीत अर्जुनास तन्मिषें तुम्हां-आम्हांस
क्षात्रकर्म धर्म हेंच शीकवी परोपरी ३
देति दुष्ट दुष्ट ताप त्या नसेचि मोजमाप
तल्लिख दुष्टदाहकारि दूषिती कुणी तरी ४
दुष्टतापदाह धर्म दुष्टदाह तो अधर्म
आजकाल थोर वाद हाच भारतांतरीं ५
दुष्टदाह तो अधर्म आत्मदाह पापकर्म
दुष्टताप दाहि काय "हाय ! हाय !" भूवरी ! ६
दुष्टतापनाशनार्थ देशिं देशि-शासनार्थ
बोध आणि बंदिवास हीं न साधनें पुरीं ७

दुष्टदाह क्षात्रधर्म आत्मदाह पुण्यकर्म
या व्रतांविणें न होय देशमुक्तता खरी ८
आळवून आळवून जीव जाइ व्याकळून
आळवीन मी तरीहि जीव राहि तोंवरी ९

## ४९ गिरिविहार (बालानन्द)

ऊठ शारदे घे भेरी तुतारि ही माझिया करीं
चल तूं माझ्या सांगाती जाऊं विंध्यगिरीवरती
निनाद करुं ये तिथें खुला जमेल जेणें जन अपुला
धम् धम् धम् ध्वनि भेरीचे पुम् पुम् फुंक तुतारीचे
बागडण्याचे । स्वतंत्रतेचे । दिवस मजेचे
आणितील परतुनी घरीं ऊठ शारदे घे भेरी १
अरुंद कोंदट भारत हें झालें वाद-सभा-रत हें
रुंद खुलें निर्भीकपण हाय ! विसरले वीरजन
बंदीखाना तुला मला झाला हा सुजनां सकलां
उच्छृंखल मम मन झालें उच्छृंखल हरिनें केलें
दिन न आजचा । स्वच्छंदाचा । परवशतेचा
सुरा तिखट बोंचतो उरीं ऊठ शारदे घे भेरी २
एक सुराची नित्याची क्षुद्रपणाची स्वार्थाची
गाणीं ओंगळ भवंतालीं चहूंकडे वरती खालीं
श्रवुनी कान माझे किटले मन अगदीं विटुनी गेलें
बघुनी घाण ही जिथें तिथें जिवा शिसारी बहु येते
सौन्दर्याची । सात्त्विकतेची । सन्मानाची
सृष्टि यावया परत घरीं ऊठ शारदे घे भेरी ३
विंध्यगिरीमध्यावरती चल तेथें करूं नाद-तति
भारत जें विंध्यापरतें भारत जें विंध्याअरतें
तें सगळें व्हावें जागें तें यावें श्रीहरिमार्गें
यासाठीं तुजला देवी ! सेवक हा साग्रह विनवी
यावें तूं तरि । जाऊं सत्वरीं । विंध्यगिरीवरि

विहराया सात्त्विक समरीं ऊठ शारदे घे भेरी ४
हरिजन, हिंदू सनातनी वृथा भांडती कडकडुनी
हिंदू बंधु मुसल्मानी वृथा भांडती कडकडुनी
नव हिंदु हरिचे दास आत्महोम त्याचा खास
वृथा भांडणें मिटवील क्षुद्र स्वार्थी हटवील
नव हिंदू ते । अपणाभंवतें । विंद्यावरते
जमवूं रमवूं प्रेमभरीं ऊठ शारदे घे भेरी ५
प्रेम-धर्म त्यांना पढवूं आत्महोम सात्त्विक घडवूं
आत्महोम-बंधें बांधूं मुसल्मान-हिंदु-बंधू
आत्महोम-बंधें बांधूं सनातनी हरिजनबंधू
जखडुनि नवहिंदूहोमें बांधूं नवभारत प्रेमें
नवभारत तें । धृतराष्ट्रातें । हटविल परतें
स्वातंत्र्या आणील घरीं ऊठ शारदे घे भेरी ६

## ५० यशवंती (शार्दूलविक्रीडित इंदुकला)

देवा ! तूं मजलागिं जी पुरविली 'चैतन्य-पाणी' दवा ।
ती मीं आजवरी कशीतरी दिली प्रेमें बहू बांधवा ।
नानारंगि कुप्यांत आज भरिं मी ती कांहीं भाईस्तव ।
कोणी कीं मज बोलला "रुचतसे आम्हां कुपी-वैभव" १
आलें एक दिनीं 'यशोघन' हरी ! या निर्धनाचे करीं ।
घालें चित्त निरीक्षितां 'धनकणां' कांहीं तया भीतरीं ।
'घालों मी, मज काव्य हें बहु रुचे' ऐसें वदें मी यदा ।
"चाली-चालि पहा" वदे नवयुगा मन्मित्र कोणी तदा २
"भाई, चाल न काव्य, काव्य मजला चालींतला माल तो ।
चाली काय, कुणीहि यत्न करितां चाली अशा चालतो ।
चाली याहि मला असाध्य न, परी हा माल चालींतला-।
हा नाहीं मज साध्य-हा जनुशतीं लाभेल कांहीं मला ३
ऐसें मी म्हणतां "चला करुनि द्या चाली अम्हा या तरी ।
घाला माल तयांत तो पुरवि जो तुम्हांसि तुम्चा हरी" ।

ऐसें हांसुनि आग्रहें म्हणत तो; 'अच्छा' तया मी म्हणें ।
नी घेऊनि नवी 'यशोधन' कुपी पाणी भरीं मी जुनें ४
देवा ती 'यशवंति' जी यश शिवा देती बहू जाहली–।
तन्नाम्नी यशवंति ही यश मला देवो बहु चाहलो ।
भारी या कुपिची चहा कुपिरुची लोकांत कीं ऐकुनी ।
घे मी ती भरण्या दवा हरि तुझी–'चैतन्य–पाणी' जुनी ५

## ५१ बंधु मुसल्मान (चंद्रकला इन्दुकला)

ऊठ ऊठ बाळा मुनिसुता बघे नीट काळा ।
नको करूं चाळा कलीची वाढविण्या ज्वाळा ॥१॥
ऊठ कंठिं कंठा घालुनी बंधु मुसल्मान ।
अपुले समजावी तयांचें करी समाधान ॥२॥
हवी इथें सत्ता स्वदेशी न हवी परदेशी ।
हीच एक कांक्षा धरीं तूं न होई अति कांक्षी ॥३॥
होउं मुसल्मानी सर्वथा मुसल्मानि सत्ता ।
परी नको येथें विदेशी गौर-राज्य-मत्ता ॥४॥
धरीं ध्येय बाळा ! निश्चयें हें निर्वाणीचें ।
करीं न नवकाळा प्रदर्शन अपुल्या घाणीचें ॥५॥
घाण घाण चाळा मुनिसुता ! अंतःकलहाचा ।
हा न मार्ग बाळा ! भारता मुक्त करायाचा ॥६॥
न भी मुसल्माना न भी तूं देशि जना कोणा ।
बांधीं प्रेमें त्यां देउनी देश-राज्य त्यांना ॥७॥

## ५२ बंधु हरिजन (भूपतिवैभव सुधेस)

बघ ऊठ मुनिसुता कहाणि इतिहासाची
हाणितां सुदीनां हानि लाभते साची १
किति घाण भारतीं हरिजन–वागवणूक
बघ हिनेंच झाली भारत-नागवणूक २
हाणितां सुदीनां हानि लाभते साची
ही घोकी शोकीं कहाणि इतिहासाची ३

हरिजन न जेवरी तुष्ट तोंवरी कष्ट
दास्याचे देशा विवेकियां हें स्पष्ट ४
हें उमज मुनिसुता मुनित्व दावीं कांहीं
मनिं मनन करीं तूं मुनित्व मननीं राही ५
मननेंच घाणिचें कळुनि घाणपण येतें
मननेंच घाण ती काढाया बल येतें ६
हो बली मुनिसुता घरिं घरच्यासम घेई
हरिजन तव बंधू बंधु जवळचे भाई ! ७

## ५३ नवहिन्दो ! (चंद्रकांत)

### (पंतोजीची छडी)

बाल बालिका हिंदुस्थानी नवहिंदो ! विमला
राष्ट्रप्रेमी दास्यद्वेषी निघावया प्रबला १
बली प्रेम तव बली द्वेष तव आचरणीं व्हावा
आत्महोमिं तूं यास्तव अपुला देह समर्पावा २
हिंदु बंधु जे दुराग्रही त्यां प्रेमें विनवावें
"मुस्लिम बंधू, हरिजन बंधू तुम्हीं तोषवावे" ३
हिंदु-अहिंदू सर्व बंधुंना प्रेमें विनवावें
"परकी सत्ता नको सर्वथा इतुकें मानावें" ४
विनवूनी हरिपदीं यापरी देहा ठेवावें
सांघिक ऐसें निज देहार्पण सद्भावें व्हावें ५
ऐशा सांघिक होमें देशी बालबालिकांचा
होइल पक्का घडा प्रभावी प्रेमाद्वेषाचा ६
राष्ट्रप्रेमी दास्यद्वेषी प्रबल पिढी मग ती
होइल ऐक्यें क्षम साधाया मुक्तियुता प्रगति ७

## ५४ महाराष्ट्रीय नवहिंदूंनो ! (फुलवेल)

### (मालुं नको ग !)

मारुं नका हो । निज तेजा मारुं नका हो ॥ध्रु०॥

नव हिंदूंनो ! तुम्हां विनति
गुलामांत गौरांच्या गणती
राष्ट्राची ही घोर अवनति
उन्नती-बीज । येथें तुमचेंचि सुतेज ॥१॥

जातिस्वार्थ भडकला भारी
मुस्लिम हिंदू मारामारी
सनातनी हरिजनही समरीं
येथ उद्धार । तुमचेंचि तेज करणार ॥२॥

मारामारी झगडा सारा
अदूर दृष्टीचाचि पसारा
लाभाचा तो केवळ गौरा
उमज हा ज्यांना । त्या तुम्हां विनति ही सुजनां ॥३॥

बोधवाद चालला बुद्धिचा
यत्न परी बुद्धिच्या शुद्धिचा
मार्ग मुख्य राष्ट्रैक्य-सिद्धिचा
तयाच्यासाठीं । माझी ही आटाआटी ॥४॥

क्षत्रिय-तेज सहज कोणांत
विवेक-संस्कारज कोणांत
असेल तुम्हां कांहिं जणांत
राष्ट्र ताराया । लावा तें आज चला या ॥५॥

तेज बुद्धि-शुद्धीचें साधन
शुद्ध-आत्मसंहार परायण
तेज तें हवें अतीव पावन
राष्ट्र ताराया । राष्ट्रांतः कलि माराया ॥६॥

चला चला शत एक तरी या
नका मारुं निजतेजा वांया
आत्महोम साजरा करूं या
प्रथम राष्ट्रीं या । विनति ही महाराष्ट्रीयां ॥७॥

## ५५ भारतीय नवहिंदूंनो ! (भिल्लीण)

### (ध्यासांतून भास)

ज्या भारतिया मोक्ष इवा राष्ट्रजनाचा ।
तो, तो न असे लोभि मुळीं राज्यधनाचा ॥१॥
जे त्यागि महा भारतिं या पूर्वज आर्य ।
त्यागीच असो वंशजहि आज तयांचा ॥२॥
"राष्ट्रार्थ महा-राष्ट्रिय व्हा सिद्ध मराया"
ही ऐकुनियां हांक न हो रोष कुणाचा ॥३॥
मुळशीय रणीं हांक दिली, ऐकुनियां ती ।
जे रुष्ट कुणी, आठव हो आज तयांचा ॥४॥
"अंगांग बली भारति हो; भारत सेवो" ।
हा हाच खरा हांक-वर्ची भाव तयांचा ॥५॥
हा नाकळला ज्या सुजनां भारतियां ते– ।
ते रुष्ट मनीं हा मजला खेद सदाचा ॥६॥
तो रोष जुना टाकुनि द्या; आज हंका ही ।
प्रत्येक नव्या हिंदुस जो क्षत्रिय साचा ॥७॥
"ती क्षत्रियता तारक, ती मारुं नका हो ।
"ती खर्चुनियां मारुं कली काळ ग्रहाचा" ॥८॥

## ५६ नवें हरिगीत (वियोगिनी)

### (संक्रमण)

हृदयीं हरि हट्टि हट्ट घे म्हणुनि हें मज बोलणें पडे
मज काय, मला न आपदा, हरिनें कीं मज घेतिलें कडे १
मज कां नुमजे युवा-मन ! बहु त्या लोभन या भवांतलें
परि ज्या हृदयीं सुवीरता बहु तें लोभन वारि त्यांतलें २
किति वंगीय अंगना युवें जन सेवारत वीरता-मय
किति लोभन त्यांहि वारिलें जनसेवा करण्या निरामय ३
वय षोडश तें 'खुदी' मरे तिथुनी आजवरी कितीतरी

भरले परलोकिं गर्जुनी
"जय माते, तव कष्ट हो दुरी" ४
कृति वंगिय भारतीं क्रमें
पसरे; ती पसरी न, ती सरो
म्हणुनी कधिं कायदा वदे
"खल वैरी त्वरया मरो मरो" ५
खलता खल टाकिना जंव
खल वैरी तंव नष्ट हो कसा !
न इथें जयिं कायदा कदा
न अहिंसा-उपदेशही तसा ६
खलता-मल-नाशना हवें
सुजनांचें मरणें समूहशः
वरणें मरणें, नको जरी
खलहिंसा स्वजनांत नित्यशः ७
प्रिय भारत मुक्त व्हावया
मरणारे स्वकरें बहू हवे
बहु हिंसन टाळण्या हरी
अजि गाई रणगीत हें नवें ८

## ५७ येणार कोण बोला (वसन्त)

### (आई)

आईवरी विपत्ति
आम्ही मुलें कशाला !
बंदींत मायभू ही
आम्ही खुले कशाला !
जखडूनि बांधियेली
बघवे तिच्या न हालां
तिज फांस नित्य फट्के
हृदयांत होय काला
रक्ताळलें शरीर
भडका जिवांत झाला
आईस सोडवाया
येणार कोण बोला ! १
आईस सोडवूंच
निर्धार हा कुणाचा !
आहे कुणा पसंत
व्यवहार हा खुनाचा !
आईस सोडवाया
खून स्वयें स्वतःचा
व्हावा, सुखें कराया
व्यवहार हा खुनाचा
बेभान कोण कोण
पाहुनि माय-जाचा
या तेच सोडवाया
व्यवहार हा खुनाचा २
पाहूं स्वराज्य देशीं
या देहिं याचि डोळां
ऐसें म्हणे कुणी जो
काढा तया निराळा
जो कोणि असहकारी
विधिभंग भक्त भोळा
मरणें नको म्हणे जो
काढा तया निराळा
मरणें स्वयें पटे ज्या
मारूनि हांक काळा

आईस सोडवील तो मातृभक्त भोळा ३
भाई महंमदीचे तैसे हरीजनांचे
हिंदूशिं ऐक्य पुरतें व्हाया खरें मनाचें
हिंदूंसि त्यागबुद्धि व्हावी; तदर्थ ज्याचें
मन आत्महोम वांछी होमार्थ नित्य नाचे
तो ऐक्य भक्त भोळा मरणें विशुद्ध त्याचें
आईस सोडवील दास्यांतुनी सदाचें ४
गाऊनि आइ, आई नाचोत नाचणार
लीहूनि लेख लाख वाचोत वाचणार
घेऊनि बंदिवास कांचोत कांचणार
भीऊनि यांस आई सोडी न जाचणार
रक्ताळलें शरीर भडका जिवांत झाला
आईस सोडवाया येणार कोण बोला ! ५

## ५८ पाशयन्त्रावर (आनन्दकन्द)

### (संक्रमण)

संक्रांतिची जिवाच्या ही जाहली तयारी
परलोकिं आज जाणें मारूनियां भरारी ॥ ध्रु० ॥
आई ! तुझ्या कृपेनें ही साधली अखेरी
हा येथ फांस-पाट ही येथ फांस-दोरी १
हे आर्य-माय ! आई ! जातों फिरूनि याया
येतों त्वरें फिरूनी होऊनि देहधारी २
या देहिं कांहिं काल गेला विवादिं फोल
हा क्रांति-शांति-वाद पुढती नको भिकारी ३
तुज राज-पाट नाहीं तंव फांस-पाट मातें
माते ! सदा मिळावा मज हीच हांव भारी ४
सामूहिक स्वहोमीं खल होमयंत्रिं किंवा
यम-पाश-फांस व्हावा मज हीच आस सारी ५
आसक्ति हीच आतां उरली; दुजी निमाली

तव भक्तिची कहाली भरली जिवीं जिव्हारीं ६
सामूहिक स्वहोमीं ऐसेंच यन्त्र ठीक
हा उंच फांस-पाट ही लांब फांस-दोरी ७
हें यन्त्र, गोळि-यन्त्र असि वा जलीं समाधि
सामूहिक स्वहोमीं हे ठीक कार्यकारी ८
मरणा भिती म्हणूनी खल "मारुं, मारुं" गर्जे
मरणासि मित्र केल्या खलही पडे विचारीं ९
खलता खलीं खळाया खलहोम आत्महोम
यांवीण मार्ग अन्य फलअल्प दे विकारी १०
जैशी जयासि भक्ति जैशी जयासि शक्ति
सेवा तशी करो तो मज मृत्युभेट प्यारी ११
तुजसाठिं फांस-पाट तुजसाठिं मृत्यु-भेट
आनंद हा अलोट मज नित्य हाच चारी १२

## ५९ जन्मठेपी (अगोट)

### (संक्रमण)

अनेक जन्महि माते ! वरीन दासगति
तुला विमुक्त कराया झटूनियां जगतीं ॥ ध्रु० ॥
विपत्ति सर्वहि देई विवेकियासि घडे
स्वमाय-सेवनिं ये जी तिनें जना सुगति १
शिकावया बहु आहे जिवासि भूवरि या
श्रमूनि तें शिकतांना विरे विपत्ति-तति २
मला न आस कशाची उदास मी विषयां
पहात राहिं मजेनें कशी घुमे प्रकृति ३
हरी करीं धरि मातें स्वयें हंसे, हंसवी
पहा पहा प्रकृतीच्या पहा म्हणे गमती ४
कुठें कुठें गमतीचें नको म्हणे बघणें
करीं करीं कृति कांहीं अशी सुझावि मति ५
करी कृतीहि तदा मी पसंत जी हरिशीं

उसंत देइ पुन्हां तो अशीं चरित्र-गति ६
कधीं पहात तमाशा कृती करीत कधीं
सदा शिके मति कांहीं अशी घडे प्रगति ७
तुला विमुक्त कराया झटोत थोर जन
हरीपदीं करितों मी अशी सदा विनति ८

## ६० पुढची गत (केशवकरणी)

(शेतकींतील सुख)

पूर्वविभव तें नव्या युगीं या मिळविल का भारत !
हरी ती जाणे पुढची गत
भार जोंवरी अंतःकलिचा याच्या माथ्यावरी
दास हा राहणार तोंवरी
सिद्धान्त असा मद्विवेक मज ऐकवी
दास्यान्त इच्छि मत्प्रेम भारता भवीं
कलि-अन्त हो असें इच्छि म्हणुनि मी जीवीं
मुस्लिम-हरिजन-हिंदु-संहती व्हाया दृढ भारतीं
श्रमवि मी म्हणुनी मम भारती १
महावाद माजला अहिंसा-हिंसा हा आजला
हरी हें पाहुनीयां लाजला
मला प्रेरणा करी उठें तूं सांग गड्या हृद्गत
खरें जें माझें गीता-गत
मी उठलों हरिच्या प्रेम-आग्रहास्तव
आणि नटलों गीता-वृत्ति-कार अभिनव
नी झटलों वदण्या गीता-मत वास्तव
गीता-गत श्रीहरिचें हृद्गत, धर्म खला मारणें
दलित जनदास्यान्ताकारणें २
दास्यान्तास्तव राष्ट्रजनांचें प्रेमसंघटन हवें
रण जसें खल धृतराष्ट्रासवें
मुस्लिम खिरस्ती कुणीहि राष्ट्र-ज येती राष्ट्रिय जनीं
तत्त्व हें जागृत हिंदूमनीं

परि झगडा मुस्लिमबंधूंसह वाढता
परि झगडा हरिजन बंधूसह वाढता
अरि-पगडा अंतःकलिनें या वाढता
अंतःकलि माराया म्हणुनि नवहिंदूंसी नव
वानि मी आत्महोम-आहव ३
गीतागत जें हरिचें हृद्गत त्यात नसे होम हा
असे तरि हरिसंमत होम हा[1]
खलहोमाहुनि असे अधिक हा खल-खलता-मारक
अधिक हा खलदलितोद्धारक
हे बोल मला बोलवी विश्वनायक
हे खोल, भारता पूर्वविभवदायक
हे फोल गणा तोंवरी दास्य-सायक
खोल राष्ट्र-हृदयीं घुसलेला चरेल अप्रतिहत
हरी तो जाणे पुढची गत ! ४

## ६१ नवा नकाशा (सुमन्दारमाला)

### (माझा महाराष्ट्र)

"नकाशा नवा रंगवूं भारताचा, नवा रंगवूं," भावना-कंप हा
भरो भारतीं थोर भूकंपसा कांपवो तो जनांची मनोभू महा
"हजारों कुटुंबें निमालीं, निराधार झालीं मनोभूमिकंपामुळें"
सुवार्ता अशी ऐकवो तो जगासी लढे गाडुनी श्रेयघाती खुळे १
समाधी तयाची असो एक ठाईं नसे सिद्धि कांहीं समाधीविना
"स्वदेशीय-सत्ता स्वदेशीं करूं" एकनिष्ठा समाधी असो ही जनां
असो हिंदु ऐसा समाधिस्थ आधीं; असे त्यावरी भारताचा भर
करो तुष्ट तो रुष्ट जे जे तयांना भरो भारतीं भव्य ऐक्य-स्वर २
नसो कोणि अस्पृश्य या भारतीं एक अस्पृश्य सत्ता विदेशी असो
नसो हिंदु-मुस्लीम तंटा मुळीं होउ मुस्लीम राजा परी ना रुसो
नसो आज तंटा धनी-दीन हा एक तंटा असो शासित्यांशीं सदा

---

१. 'गीताहृदय' पाहा; प्रेमकथा ३१९, २८ श्लोक पाहा.

वरूं ही जरी एकनिष्ठा समाधी तरी दूर होईल दास्यापदा ३
"हजारों कुटुंबें निमालीं, निराधार झालीं जशीं स्थूलभूकंपनें
हजारों मनोभूमिकंपें तशीं व्हावि" ही घोकणी घेतली मन्मनें
न दास्यांतुनी मुक्ति देशासि जों मृत्यु नाहीं अम्हां मित्रसा भासत
न दास्यांतुनी मुक्ति जों होमकुंडीं हजारों न घेती उडी हांसत ४
उडी कुंडिं घ्या आत्महोमाचिया हे लढे गाडण्या दुष्ट-साहाय्यक
उडी कुंडिं घ्या ऐक्य व्हाया त्वरेनें असे तुष्ट जेणें रमानायक
हवी श्री स्वसत्ता स्वराष्ट्रा तरी द्या तिच्या मालका मोल श्रीचें तया
न मोलाविणें माल ही न्याय्य रीती वृथा बोल श्रीनायका कासया ५

## ६२ गुरूंनो ! (कोकिळा)
## (समर्थांच्या पायांशीं)

स्वातंत्र्याच्या भक्तवरांनो ! तक्तधरांनो ! स्मरा
स्वतंत्रता-संगरा स्मरा हो स्वतंत्रता-संगरा ॥ ध्रु०॥
राजा मागे करभारातें । प्रजासभाप्रिय नेते त्यातें ।
विरुद्ध होतां, तोहि तयांतें
धरूं इच्छि; तें तुम्हीं धरुनि त्या पोंचविलें यमपुरा । स्मरा हो० १
राजा दुसरा नालायकसा । प्रजाजना तापद सायकसा
होतां करुनी असहाय कसा
हांकलिला तो तुम्हीं; तुम्ही ते गुरु अम्हां पाभरा । स्मरा हो० २
तुम्हां भेदगुरु तुमचे राजे । तुमची फितुरी इथें विराजे ।
राजे तुम्हीं; तुम्हांसि साजे
भेद-नीतिनें हातिं राखणें भारतसत्ताधुरा । स्मरा हो० ३
तुम्हीं गुरू आम्हां बहु लायक । परी शिष्य आम्ही नालायक ।
म्हणुनी होतो तुम्हां सहायक
भांडुनि अपणांमधें; गुरूंनो । क्षमा अम्हांला करा । स्मरा हो० ४
वंगिय कांहीं, दुसरे कांहीं । शिकले तुमची कट-चतुराई ।
परी भारतीं ऐसे भाई
बहु थोडे हे बघुनी तुमच्या खेद होय अंतरा । स्मरा हो० ५

खेद तुम्हां तो खेद अम्हांही । भेद अपणामध्यें नाहीं ।
स्वतंत्रता-संगर-प्रवाहीं
उडी बहू घेतील गुरूंनो । धरा सबूरी जरा । स्मरा हो० ६
करा जुलुम, फांसा आम्हांतें । भरा अंदमानीं आम्हांतें ।
न द्या मुळींही आरामातें ।
राम सुप्त आम्हांत; तुम्ही तो छळुनी जागा करा । स्मरा हो० ७
तुमच्या नालायक राजांहीं । तुम्हां छळिलें जैसें भाई ।
छळा तसें अम्हांस तुम्हीही ।
छळुनी लावा ध्यास अम्हांसी स्वातंत्र्याचा पुरा । स्मरा हो० ८
ध्यास लागतां हा अम्हांसी । तुम्हां धाडण्या निजभवनासी ।
असहाय तुम्हां हांकलण्यासी ।
समर्थ होईल भारत तुमचा शिष्य गुरूंनो ! खरा । स्मरा हो० ९

## ६३ इतिहास (उद्धव)

### (देहाचा पूल)

पूर्वीच्या इतिहासाचें सांगणें आयका कांहीं
भांडतां आपणामध्यें गति बरी आपुली नाहीं
गृहकलहें गुलाम झालों ही इतिहासाची ग्वाही
हा मुस्लिम-हिंदू झगडा हा हरिजन-हिंदू झगडा ।
हा झगडा भारत-गाडा
गाडील गुलामित नित्य हें इतिहासाचें सत्य १
हिंदूंनीं हें उमजावें त्यांचाचि पसारा थोर
भारतीं गुलामी टिकतां त्यांनाचि यातना घोर
नुमजतां हिंदु, परक्यांचा होणार वाढता जोर
हा मुस्लिम-हिंदू झगडा । हा हरिजन-हिंदू झगडा ।
हा झगडा परकी-पगडा
पोशील भारतीं नित्य हें इतिहासाचें सत्य २
संतांहीं त्यांच्या काळीं अस्पृश्यां जवळी केलें
जी अस्पृश्यांची भूक ती पुरवुनि समजावीलें

त्या कालिं तयां जें दिसलें तें द्वैत त्यांहि मिटवीलें
म्हणुनीच महाराष्ट्राला । सांपडलें मिरवायाला ।
निजतंत्र राष्ट्र व्हायाला
लागतें ऐक्य-साहित्य हें इतिहासाचें सत्य ३

राष्ट्रीय संत आतांही व्हावेत कराया ऐक्य
"भारती भारती एक" भारतिं हें तारक वाक्य
राष्ट्रीय-संत-मेळ्याचें घडवील बहू-जन-सख्य
तेव्हांच भारता सुदिन । तोंवरी भोग त्या कठिण
भोगणें दास राहून;
घातकी ऐक्य-राहित्य हें इतिहासाचें सत्य ४

हिंदूंनो ! मुस्लिम अपुले घरचे, हें उमजा आतां
हिंदूंनो ! हरिजन हिंदु घरचें, हें उमजा आतां
घरिं हुतुतू बाहिरच्यांचा घरच्या सकलांसचि लाता
बाहिरचे मारिति गोरे । "भारतांत भरलीं ढोरें" ।
हा पाठ पश्चिमीं पोरें
पढतात पाठशाळांत इतिहासपाठ-काळांत ५

"भारतीं किती किति कोटी ! शासिते मूठभर लोक !"
पाठ हा किळस पोरांसी आणूनी थुंकवी थुंक
थुंकती पश्चिमीं पोरें थोरांसि कुणा हो शोक
म्हणतात कुणी ते थोर । काय ही अवनती घोर
एकीविण कुठला जोर
एकीचें जोर अपत्य हें इतिहासाचें सत्य ६

हिंदूंनों ! मुस्लिम भाई त्या भिऊं नका, आलिंगा
पूर्वीच्या इतिहासाचा विसरा तो धांगडधिंगा
तेव्हां तो ठीकचि होता ठीक तो नव्हे अजि पिंगा
अजि मुस्लिम हरिजन हिंदी प्रेमाच्या बांधुनि बंधीं ।
व्हा दास्यमुक्त आनंदी
मुक्तिचें ऐक्य हें द्वार हें इतिहासाचें सार ७

## ६४ फार दूर (अवनी)

### (अजुन)

अजुन फार दूर असे आमुची विभुक्ति
उत्कट हिंदूंत न कीं अजुन राष्ट्रभक्ति ॥ध्रु०॥
जातिभक्त, विश्वभक्त । शांतिभक्त कोणि सक्त ।
नेताजन भारतांत । हा असा सभोंतीं १
राष्ट्रधर्म गौण गणी । जातिधर्म-अभिमानी ।
नेतागण हा बघुनी । खेद होत चित्तीं २
विश्वपूजनांत रमे । राष्ट्राचा अशुभ गमे ।
राष्ट्रिय म्हणतां शरमे । हीहि येथ वृत्ति ३
शांति पूजनीय कुणा । भारतीय नेतृगणा
राष्ट्राचा शांतिविना । गर्ह्य हे गणीती ४

## ६५ चढ तूं (चिमणी)

### (बंदिवान गरुड)

पडसी गिरि चढतांना । चढ तूं, शरमुं नको पडतांना ॥धृ०॥
शरमेचें कायसें प्रयोजन । सद्गति नाहीं गिरि चढल्याविण
चढेल कोण जगीं पडल्याविण । करुनी कुसरी नाना, चढ तूं १
बाल उभें राहि तें किति पडे । चालाया तें कसें घे धडे
परि अंतीं कैसें तें दवडे । स्मरुनी मनिं बालांना, चढ तूं २
पडत पडत पूर्वज तंव चढले । चढुनी पडले पडुनी चढले
गृहकलहांनीं फिरुनी पडले । पुरुनी या कलहांना, चढ तूं ३
गाडुनि गृहकलहां प्रेमानें । झगडे परक्यांशीं जोमानें
गांठाया गिरिवरचें ठाणें । धरुनी मनिं अवसाना, चढ तूं ४
कुस्ती धरितां कितिदां पडती । तरिहि झगडती मल्ल न दडती
त्यांची कधितरी होई चढती । स्मरुनी त्या मल्लांना; चढ तूं ५
पेंच येति पेंचांनीं पडतां । वाढे दमही दमें झगडतां
बली होति जन लढतां लढतां । स्मरुनी त्या बलवानां, चढ तूं ६

इहपरवैभवगिरी-पायथा । तेथें तूं ; ही हीन अवस्था
शरमेची ही तुला सर्वथा । नवभारतसंताना, चढ तूं ७

## ६६ भारती गाडा (श्यामला)
### (गुलामाचें गाऱ्हाणें)

जूं आमुचें आम्हां बरें जुंपूं न कोणी दूसरे
हा भारती गाडा करें आम्हीच ओढूं आदरें १
"हा ओढणारे भारती हा हांकणारे भारती
याचे धनीही भारती होवोत" इच्छूं अंतरें २
आम्ही धनी ना आजला हा भारतात्मा भाजला
दास्यें, म्हणूनी त्याजला हा हात देतों आदरें ३
मुस्लीम-हिंदू-एकता 'अस्पृश्य'–हिंदू-एकता
या भारतीं सर्वैकता व्हाया श्रमूं प्रेमी खरे ४
ऐक्याविणें या भारता कोणीहि नाहीं तारता
अंतःकली या मारता हें ओळखीलें अंतरें ५
हिंसा-अहिंसा-भांडणीं ऐकूं हरीची मांडणी
"दुष्टा-खलाच्या कांडणीं दुष्टां अदुष्टां हो बरें" ६
कर्तव्य आम्ही आचरूं देवा सदा भावें स्मरूं
या भारतासाठीं करूं जें जें बरें चित्तीं भरे ७

## ६७ इष्टमालिका (मोहिनी)
### (प्रवासी जीवास)

पोंचशील इष्ट स्थलिं तूं पोंच परी ठेवी
विनापोंच नुकले गुंता उमज उमज जीवीं ॥ध्रु०॥
हिंदु जना ! स्वातंत्र्याचें विभव तुझें इष्ट
भारतांत जनसत्तेचें विभव तुझें इष्ट
तिजें, येथ जनसमतेचें विभव तुझें इष्ट
इष्टमालिकेसाठीं या होई ऐक्य-सेवी १
राष्ट्रभूमि परक्या हातीं असे आजला ही
तिला आपुली करण्यासी हवी प्रथम भाई

मुसल्मान, हरिजन यांसी हिंदु-एकताही
प्रेममयी व्हावी सुटण्या राष्ट्रभूमि देवी २
हिंदुजना ! तूं हो प्रेमी ! त्यागि होइ थोर
अन्यथा न होई राष्ट्रीं खरा ऐक्य-जोर
ऐक्य-जोर नाहीं, तंव ही गुलामी अघोर
राष्ट्रभूमिमातेची या नष्ट व्हावि केंवि ३
मुसल्मान, हरिजन यांसी राष्ट्रकारभारीं
हवा भाग तो तो देईं समाधान-कारी
समाधान करुनी त्यांचें गृहकली निवारीं
ऐक्य करुनि येणें रीती राष्ट्रमाय सेवीं ४
हिंदुजना ! सात्त्विक वृत्ती तुझी अशी त्यागी
करो राष्ट्रभू ही आधीं स्वतंत्रतायोगी
पूर्ण लोकसत्ता राष्ट्रीं साम्य विभवभोगीं
पुढें शक्य; सोडवि आधी राष्ट्रभूमि देवी ५

## ६८ वागवा चित्तीं सदा (पाण्डवदिडकी)

### (तुरुंगाच्या दारांत)

वाढुं देतां भारतीं हा घातकी अंतःकलीं
वाढतो शत्रू बली
भारतीया भूमि यावी भारतीयांच्या करीं
मुख्य कांक्षा ही धरीं
एक हें हिंदूजना ! मी आग्रहें मागें तुला
हट्ट सोडीं आपुला
भाइ हे मुस्लीम, यांची मागणी दे यांजला
वाढवीं हिंदी बला
भाइ हे 'अस्पृश्य' यांची मागणी दे यांजला
वाढवीं हिंदी बला
भारती हे, भारताची देइं तूं यांच्या करीं
राष्ट्रसेवा ही खरी

अन्य देशी-राज्य येथें, अंत त्याचा हो कसा
भाइ भाई जों रुसा
अंत त्याचा चाहणारे एक व्हा सारे जण
सिद्धि ना ऐक्याविण
मांडलीं पूर्वी तयाचा ही गुलामी फायदा
वागवा चित्तीं सदा

## ६९ करीं तपास (गोविंद)

### (दैवास आव्हान)

डिंवचुनि करीं तपास, भाई! डिंवचुनि करीं तपास! भाई० ॥धृ०॥
ब्राह्मण क्षत्रिय वैश्य बांधवा! सोडीं वेडा ध्यास
शूद्र बंधु अतिशुद्र बंधु हे असती तुजसम खास; भाई० १
विकार जो जो अस्पृश्यामधिं तुलाहि तो दे त्रास
विचार जो जो तुझ्यामधीं तो येतो अस्पृश्यास; भाई० २
डिंवच आपणा, अस्पृश्याही; डिंवचुनि करीं तपास
संस्कारें दोघांत सारिखा शरीरमनोविकास; भाई० ३
संस्काराचि हो स्वभाव कालें; शिकवीं अस्पृश्यास
सत्संस्कारें सद्गुण सारे तव तो शिकेल खास; भाई० ४
विटाळ कसला घेउनि बसला बरी न ही मिरास
या वेडानें घडली तापद पापमलाची रास; भाई० ५
जुने भेद वर्णजातीचे तीव्र जुन्या काळास
शुभकर होते; मानूं; परि ते तसे न या काळास; भाई० ६
अडनांवाचे ब्राह्मण क्षत्रिय वैश्य आजला; त्यांस
जुन्या शास्त्रगत गुणकर्मांची ओळख ना बहुतांस; भाई० ७
अस्पृश्यामधिं मंगल गुणगण निपजवितो अभ्यास
अभ्यासाविण ब्राह्मणादिकीं घाणीचाचि विलास; भाई० ८

## ७० आंधळा भाव (गोविन्द)

### (इशारा)

नको आंधळा भाव भाविका नको आंधळा भाव

अपुला विवेक कामीं लाव ॥ धृ०॥
विवेक दिघला देवें तुजला आत्मोन्नतिसाठीं
विवेकिता अभ्यासें म्हणुनी अपुला करीं स्वभाव । अपुला० १
साधु म्हणवूनी विषयी कोणी भोंदूही जगतीं
तुझा भाव आंधळा पाहुनी साधी अपुला डाव । अपुला० २
तुझ्या आंधळ्या भावें त्याचा डाव विलासाचा
साधे, परि हो नरकीं तेणें दोघांचा शिरकाव । अपुला० ३
देवदत्त तूं विवेक कामीं लाविसि ना म्हणुनी
पतन तुझें हो; पतन तया दे मनःसंयमाभाव । अपुला० ४
तूं कारण त्याच्या पतनासी अविवेकें होसी
विवेक म्हणुनी करीं निवडण्या जनीं चोर आणि साव । अपुला० ५
भोंदू किती साधू बैरागी महाराज बाबा
सांई संन्यासी म्हणवीती पांघरूनि पेहेराव । अपुला० ६
पांघरूनि पेहेराव ठकवि ठक तुला आंधळ्याला
तुला आंधळा करिते भलती तुझ्या मनींची हाव । अपुला० ७
हांव हांवळी, भाव बावळा, हांव भाव जोडी
अशी पाहुनी तुझ्यामधीं ठक तुझ्यावरी करि घाव । अपुला० ८
साधु श्रेष्ठ हृदयांत नांदतो तुझिया, सर्वांच्या
विवेक तो सत्प्रेमी; ठेवीं त्यावरि पुरता भाव । अपुला० ९

## ७१ म्हसोबादि देव-देवता (वुनींत)

दत्तो वामन पोतदार
१८० शनवार पेठ पुणें

### (श्रीलक्ष्मी देवीस)

ज्याची विश्व अनंत हें कृति तया देवा अनंता स्मरा
त्याचें रूप वरिष्ठ चिन्मय असे आम्हां जिवा अंतरीं
जीवीं प्रेमि-विवेक जो विलसतो ती मूर्ति त्याची खरी
त्या मूर्तिसि भजा पुजा निशिदिनीं लोटांगणें घ्या तिथें
संसारीं सकल प्रसंगि तिजला मानूनि व्हा वागते
ती सांगेल तुम्हां "करा अमुक हें, तें ना करा दुसरें"
ती सांगेल तसेंच वागत चला; तेणें सदा हो बरें

त्या मूर्तीविण अन्य मूर्ति भजतां आनंद नाहीं खरा
अज्ञानी पुजतो कुणी शनि कुणी पूजी म्हसोबा जनीं
नाना देव तयास देवि असती, अज्ञान त्या कारण
ज्ञानी त्यासि जशी मिळे गति तसे ते देव त्या देवता
भक्ता त्या मुकती; क्रमें घडतसे ही देव-देवी-कथा
ज्ञानावीण असें तया शनि-म्हसोबादी दिसे तारण
हें जाणूनि करा प्रयत्न करण्या अज्ञासि विज्ञा-घनी

## ७२ विधींचा जाच (दिण्डी)

(लिलाव)

कैक रूढीचे विधी करिति जाच । कैक शास्त्राचे विधी करिती जाच
विवेकाची त्यां देउनियां आंच । सौम्य करणें कर्तव्य आज साच
विधी जन्माच्या पूर्वीपासुनीयां । हिंदु जीवासी दिले लावुनीयां
गर्भ-आधानीं विधी सुरू होतो । विधी पाठीं विधि पुढें येत जातो
विधींची ही मालिका असों द्यावी । परी कांहीं ती ऐच्छिकी असावी
खर्च भारीसा विधींचा नसावा । जाच खर्चाचा कुणासी न व्हावा
समाजांचें वैशिष्ट्य विधींमाजी । विधी असती जगीं सकलही समाजीं
कालभेदें परि विधी-भेद कांहीं । होय आवश्यक समाजां सदाही
विधी वैवाहिक प्रौढ वयीं व्हावा । प्रेम पाया या विधीचा असावा
कुंडलीआदि भाग रद्द व्हावा । गर्भ-आधानीं विधि मुळीं नसावा
विधी स्त्रीसाठीं गरोदरपणींचे । असावे ते आधीन दंपतीचे
मौन्जबंधनविधि जाहला अपार्थ । करावा तो बदलूनि कांहीं सार्थ
विधी बहु असती मला कांहीं ठावे । जया जें रुचती तयें ते करावे
परी खर्चाचें मान कमी व्हावें । दान राष्ट्राच्या कारणीच जावें
मी न अभ्यासी समाजी विधीचा । सुधाऱ्यांचा सयत्न तो सुधींचा
सुयश दे त्या ही विनंति हरीपायीं । असे माझी सर्वदा सर्व ठायीं

## ७३ तनु-विक्रय (गीतिका)

(शीलवती सुन्दरीस)

पथिं आत्म-उन्नतिच्या असें नर-नारि-जीव-समूह हा

पशुतेंतुनी उठूनी क्रमें चढतो समाधिपदीं महा
पशुता परी नर-नारिंसी सुखवी अजाणपणीं अति
विकिती तनू म्हणुनी कुणी कुणि ती खरीदिति दुर्मति १
व्यवसाय हा तनु-विक्रिचा अति हीन हा अति ओंगळ
जगिं चालला तनुभूक कीं प्रबळा जनीं मन दुर्बळ
करिते तनु-क्रम कामिया म्हणुनी घडे तनुविक्रय
यमिता जिवा पटते न तों व्यवसाय हा जनिं दुर्जन २
अति कामि जीव तनुक्रया करि दोनसा तनुविक्रया
अतिरोगिता-अनुभूतिनें यमिता पटे अधमा तया
परि जीव उन्नत कांहिं जे व्यवसायिं या पडती कुणी
कुलटा तिथें कुपरिस्थिती स्थिति ही निरीक्षिलि सज्जनीं ३
कुपरिस्थिती अबलांसि जी अविवाहिता स्थिति सक्तिनें
भवि भोगवी, अथवा करी जनिं देवदासि कु-भक्तिनें
करवी विवाह असह्य वा अति जाचणूक करूनियां
कुपरिस्थिती अशि दूरवूं तरी उद्धरू बहु सु-स्त्रिया ४
यमिता मिता वसते जिवीं परि कामिता अति वानुनी
कवि कोणि कामुक त्या करी अशिही घडे घटना जनीं
पशुता करि तनु-विक्रया पशुता-सुखा कवनीं कवि
अनि वामि तो विकवी तनू तनु तो कुणासि खरीदवी ५

## ७४ मजूर आणि भांडवलदार (उद्धव, अंतरा व मेळ)

### नृपममतेंतील (घर)

बहु मानस वेदान्ताचा साम्यनिष्ठ हो संसार
वेदान्ती भौतिकवादी कार्ल मार्क्स नामा थोर
साम्यनिष्ठ संसाराचा स्मृतिकार गाजतो श्रेष्ठ
या साम्य स्मृतिकाराच्या आत्म्यासि जाहले कष्ट
कष्टि तो । बघुनि जन-कष्ट । धनिकता भ्रष्ट ।
बघुनियां मजुर । आणीक भांडवलदार १
त्या कष्टी महात्मयानें माल आणि त्यांचें मोल

या दुकलीचा बहुदिवस अभ्यास करीतां खोल
त्याजला लागला शोध कीं मोल-मूल मजूरी
मजुरांचा श्रम मालासी करि मोलाचा संसारीं
शोध तो । वेद नव खास । मजुरवर्गास ।
लढवि तो मजुर । आणीक भांडवलदार २
शोध तो साम्यवादाचा आधार जाहला थोर
रूसांत साम्यभक्तांनीं स्थापिलें साम्य-सरकार
मजुरांचे शेतकऱ्यांचे संघ तेथ सत्ताधारी
मजुरांचे शेतकऱ्यांचे करिं तेथ व्यवस्था सारी
तेथिंचे । भांडवलदार । साम्य सरकार ।
तेथिंची जनता । अनुभवी पुष्टिकर समता ३

## ७५ साम्यवाद (न्याहारी)
### (न्याहारीचें गाणें)

न्याहारी करितां करितां नव साम्यमताची वार्ता
चालते शहरिं मजुरांत गिरणिच्या कामगारांत
इतरत्रहि कोठें कांहीं कृषकांहीं कामकऱ्यांहीं
शहरिंची साम्य-चळवळ । शहरिंची मजुर-खळबळ ।
शहरिंचें कामकरि-दळ
पाहुनी घेतिला पाठ जाहले चळवळये ताठ १
मालाला मोल कशानें ! कृषकांच्या परिश्रमानें
मालाला मोल कशानें ! मजुरांच्या परिश्रमानें
श्रमकरी-परिश्रम जगतीं निपजवी सर्व संपत्ति
श्रमकरी परिश्रम करी । श्रमवेतन त्याचे करीं ।
पुरतें नचि पडतें परी
श्रम निर्वेतन जो त्याचा जनिता तो भांडवलाचा २
श्रमनिर्वेतन जो माल निपजवी तयाचें मोल
तो नफा भांडवलदारा भांडवला वाढविणारा
हा नफा सर्व संपत्ति सर्वत्र निपजवी जगतीं

मार्क्सचा खास शोध हा । श्रमकऱ्यांस नववेद हा ।
हा खळबळकारी महा
हा लढवी या नव काला श्रमकरी आणि धनवाला ३
हा शोध साम्यवादाचा आधार महत्तम साचा
साम्यवाद शिकवी साम्य त्याज्य त्यां वर्गवैषम्य
त्या इष्ट समाजीसत्ता सर्वत्र समाजी मत्ता
विषमता धनी दीन ही । रडवीत असे हो मही ।
ती नष्ट करुनि सर्वहि
जनकष्ट करावे दूर हें साम्य-मताचें सार ४

## ७६ श्रमयुग (रसरंग)

### (घात)

चला चक्र फिरलें । श्रमवाल्यांचें युग आलें ॥धृ०॥
बाजू ब्रह्मज्ञान । बाजू शरसंधान ।
बाजू व्हा तराजुवाले । श्रम० १
श्रमले तीन युगीं । सेवा करुनि जगीं ।
त्या श्रमें ब्रह्मन घालें । श्रम० २
नास्तिक मार्क्सादि । बुद्धि-सत्य-वादि ।
ब्रह्मवादि होतिल कालें । श्रम० ३
आस्तिक निर्बुद्ध । हा नास्तिक-शोध ।
शोधकीं ब्रह्म तें झालें । श्रम० ४
'गतियुक्त प्रकृति' । ब्रह्मनोमूर्ति ।
ब्रह्मचि हें हालेचाले । श्रम० ५
ब्रह्माचि ब्रह्मज्ञान । ब्रह्माचि शरसंधान ।
बनिये तें, तें श्रमवाले । श्रम० ६

## ७७ नवीन यादवी (पंचचामर)

### (बालगंधर्वास)

विलोल विश्वरंगिं । जीव-जीविका-परिस्थिति
विकासहेतु ती असे विकासिता जगत्पति ॥धृ०॥

जिवांत जीव मानवी । जडा जिवा दुज्या भवी ।
स्वशक्ति युक्तिनें करूनि दास हो महीपति १
करूनि दास त्यापरि । दुज्या नरास भूवरी ।
प्रभुत्वसौख्यवैभवासि भोगि मानवी मति २
जगांत राष्ट्रयादवी । प्रभुत्वहेतु आघवी ।
प्रभुत्वसौख्यलालसा नरासि लोभवी अति ३
करूनि वर्णयोजना । करावि राष्ट्रधारणा ।
पुराणकालिं युक्ति हीच आणि शक्ति भारतीं ४
जगांत सर्वही जनां समाजि वर्गयोजना ।
पसंत पूर्वकालिं जालि आज नापसंत ती ५
नवीन यादवी अतां । जगीं जगद्विकासिता
करी सुरू; जगासि तोचि देइ सर्वही गति ६

## ७८ पहिला ध्यास (कवि)
### (कवीस)

तूं "भारतीय मी, भारतीय मी" हा पहिला घेइं ध्यास
कृषका ! हो साम्यवादी । मजुरा ! हो साम्यवादी
परि भारतीय तूं, स्मरे नित्य तूं "भारत हा आज दास"
दास–देशीं देश–दासीं । सोडवाया देशवासी
परकीय मिठींतुनि झटणें आहे पहिलें कर्तव्य खास
साम्यवादा देश नाहीं । मुर्खबुद्धी सर्वथा ही
जा पुसे रूसिया साम्यपूजका "होवो कां रूस दास ?"
साम्यवादी देशभूमि । समाजाची सरंजामी
हा समाज निज परि गुलाम जोंवरि तोंवरि ती फोल आस
साम्यवादी कारखाने । समाजाचा माल होणें
हा समाज निज परि गुलाम जोंवरि तोंवरि ती फोल आस
कारखान्याच्या धन्या तूं । जमीनीच्या मालका तूं
तूं "भारतीय मी, भारतीय मी" हा पहिला घेइं ध्यास
साम्यवादी भारतांत । तुझा कांहीं सौख्यघात

परि सौख्यलाभ होईल तूझिया
यंत्रयुग हें महायंत्री।
बहुजनां समाजीं महाफलद हा
साम्यवादीं दोष असती।
परि महावाद हा महायंत्रयुगिं
रूसियांहीं साम्यसत्ता।
जनसमाजधन बहुधा करुनीयां
रूसवार्ता आजवरिची।
सुजन जे धनिक त्यां बहूजनांसम
आस परिही श्रमयुगाची।
परकीय मिठींतुनि सुटणें आम्हां
कोंव्यवधी बांधवांस
महायंत्रें साम्यतंत्रीं
सुमतीचा मंत्र खास
सकल वादीं दोष असती
अंधारीं दे प्रकाश
स्थापुनीयां व्यक्ति-सत्ता
सुरू केलें श्रमयुगास
श्रमयुगाच्या प्रयोगाची
बहु सुखवी लावि आस
दासदेशा फोल साची
पहिलें कर्तव्य खास

## ७९ विरोधविकासवाद इत्यादि (पाण्डव)

### (संगीत-संजीवनी)

चालूं द्या तंटे न वेडे
सृष्टि मार्क्सादींस सांगो
सृष्टि मातें सांगते कीं—
चिन्मयें माझीं फळें त्या
वाढ येथें क्रांति येथें
बेकि, एकी, जूट, तंटा
बाह्य देतें प्रेरणा जें
चिद्विकास चिन्मयाचें
स्थूलदेहीं स्थूल मेंदू
मेंदुनाशीं स्थूलिं त्याचें
स्थूल तैशी सूक्ष्म सृष्टी
आत्मया मारीत नाहीं
स्थूल देहा मारितां ही
चित्कला तो चिन्मयाची
तें असो; जी बुद्धि बोधी
ते विनाशा कारण
"मूळ माझें हो रण"
"मूळ माझें चिन्मय
चिन्मया मूळांतुन
त्या फळांच्या धोरणें
सर्वही तत्साधन
पोटिं त्याच्या चिन्मय
यापरी प्रोत्साहन
आत्मयाचें यन्त्र तें
मीत्वलीला वारण
देह ही सृष्टीपरी
स्थूलमेंदूमारण
देहि आत्मा ना मरे
सृष्टि तत्क्रीडांगण—"
"वाढ हो तंटा-गुणें"

अर्ध-तत्त्वग्राहिणी ती मानिते माझें मन
भारतीं तंटेच तंटे ते विनाशा कारण
ऊमजा हें; गाडुनी ते चालवा मोठें रण

## ८० आत्मघात (नवती)

### (प्रतीक्षा)

'दार ऊघडा' । म्हणुनि ओरडा । चालवीतसां सर्वेंचि आपसी लढा
लढत आपसी । मदत शत्रुशीं । एवढीहि उमज तुम्हां येत ना कशी
गुरुगृहीं कलि । एकदा बली । चढुनि शत्रु येतां परि एकि जाहली
गुरुगुणा शिका । ओरडा फुका । करुनि आपणांसि वृथा शणवूं नका
शासनी गड । चढण अवघड । शक्तिवंत युक्तिवंत शासकी फड
तेथ ओरडा । 'दार ऊघडा' । आणि त्यासर्वेचि आपसी लढा लढा
थंड मेंदुनें । आपुलें उणें । ओळखूनि दूर करुनि नीट वागणें
नीट वागतां । फूट त्यागितां । गड चढुनी दार फोडण्यासि लागतां
दार ऊघडें । ध्यान एवढें । ठेवुनियां थंड करा आपसी लढे
संहतीवळ । राष्ट्र मोकळें । करुनि पुढें लढवा मग गृहरणीं दळें
गृह परांकरीं । पर-सुरा उरीं । आणि त्यांत वर्गलढत ! काय ही परी !
'हिंदु मुस्लिम' । 'हिंदु-पंचम' । 'मजुर-धनी' लढती, हा घातकी क्रम !
राष्ट्रघात हा । आत्मघात हा । उमजा वा लढत रडत कढत नित रहा.

## ८१ एकतानता (बालमुकुंद)

### (मातृपदाविण)

मज खेद होतसे उणे शब्द बोलतां
परि उणें दिसे तें गुणी कसें म्हणूं नजर चालतां ॥ध्रु०॥
या लढती झगडे तंटे निष्कारण
ऐसें न म्हणें मी त्यांसि असे कारण
परि दास देश तोंवरी दास्य-वारण
रण लढूं, म्हणें मी, करुनि एकतानता १
या लढती झगडे तंटे सर्वहि करा
परि त्यांत उग्रता नको; लीनता भरा

रण मुख्य दास्यमुक्तिचें हें न विस्मरा
झणिं मिटवा तंटे करा एकतानता २
हिंदूंस अहिंदूंसही माझि विनवणी
सर्वही मजूर-कृषकांस माझि विनवनी
सर्वही धनिक लोकांस माझि विनवणी
रणिं आपसांतल्या भरूं नका उग्रता ३
स्मरुनियां कोट्यवधि बंधूजनदीनता
स्मरुनियां दास-देशाचि मानहीनता
स्मरुनियां ईश्वरा धरुनी मनिं लीनता
करुं निश्चय आधीं करूं देशमुक्तता ४
करुं निश्चय मिटवूं तंटे अपसांतले
करुं निश्चय भोगूं दास्यहि अपसांतलें
परि ठेवुं न येथें राज्य विदेशांतलें
करुं निश्चय हा तरि लागुं यशाच्या पथा ५

## ८२ दोत नट (शूर्पणखा)
### (नौकाविहार)

सख्या ! या तुझ्या नाटकीं हरी !
किति किती नटांच्या परी ! ॥ध्रु०॥
भवनाटक नाटक नसे । नाटक्या हरी कुणि नसे
नट कोणी जप हा करी १
गतियुक्त प्रकृती जड । तद्विकास हा भव-गड
गतिंतूनि मति ये वरी २
मति देहमूल चालना । देहान्तीं मति हो पुन्हां
आत्मसत्ता मृषा वैखरी ३
नट कोणी करि हा जप । मज माझें चिंतनतप
अनुभूति देइ दूसरी ४
तूं स्वयंभु तव मति चल । ती प्रकृति होइ चंचल
तूं घुमविसि तिज निज करीं ५

प्रकृतीच्या विकृती तनू । तव अंश तेथ जे अणू
ती आत्म-सभा मज खरी ६
ही आत्मसभा नटगण । बहु देह धरून सोडुन
थोर हो भवा अंतरीं ७
थोरावुन अनुभवबळें । अंतीं तुज अंतरिं मिळे
हें कळे मला भीतरीं ८
नट दोन असे; नट दुजे । बानाया मति ना सजे
ना सजे हीच परि बरी ९
नट अनंत मति अल्पशी । ती अल्पतुष्ट मी खुशी
पाहूनिच नट-कुसरी १०

## ८३ नास्तिक्याचें गूज (मुद्रिका)

### (कोण्डमारा)

मी नास्तिक्याचें गूज जाणतों हरी !
नास्तिक्य करुण तेजाची स्वारी जन-देवावरी
जन "दैव दैव; देवाचें करणें" म्हणे
कृतिहीन होउनी साही जें साहूं नये तें उणें
मन तेजस्वी तें म्हणे नको देव हा
हा वाद देव-दैवाचा हा अनर्थकारी महा
जन-अधोगती हटवावी वाटे तया
"दे हात उद्धरीं लोकां" अंतरीं पुकारी दया
"जगदुद्धारक तो देव अम्हांवरि रुसे
हें दैव आमुचें, आम्हां सुदिनाची आशा नसे"
ही देवमताची करणी जनतांतरीं
करविते करुण तेजाची स्वारी जन-देवावरी १
जन देवमती कृति ठेवी देवावरी
जन दैवमती जो त्याचा कर पूर्वकर्मफल धरी
जन देव-दैव-मानिता "पूर्व कर्मज
फल दिलें आम्हां हें देवें" म्हणुनि घे अक्रिया-ध्वज

हीं देवमताचीं दैवमताचीं फळें
परिहार्य दुःखभारानें रडवीती मानवकुलें
हीं रडारडी मूर्खतामूल ऐकुनी
तेजस्वि दयायुत वीरा जातसे आग लागुनी
तो निसर्ग धुंडी आग लागल्या मनें
तो दिसे स्वयंभू त्याला परमात्म्या-आत्म्याविणें
मग नास्तिक्याचा पुकार जनिं तो करी
नास्तिक्य करुण तेजाची स्वारी जनदेवावरी २

## ८४ सर्व तूंच तूं (अनन्यभाव)

### (अनन्यभाव)

मी निसर्गिंचा झुंजार । तूं देवा! निसर्गकार ॥ध्रु०॥
मूळ निसर्गा चंचल प्रकृति । ती देवा तव चल मतिमूर्ति
जीव निसर्गी तव आत्मतति । तूं मीहि निसर्गापार १
नास्तिक आस्तिक संशयवादी । सकल वर्गिं या रडवी बुद्धि—
क्रियाहीनता-अविवेकादि । गुण कुठें कुठें मिळणार २
आग लागल्या मना निसर्गी । स्वयंभुत्व दिसतें सर्वांगीं
थंड मन्मना जागीं जागीं । दिससी तूं सकलाधार ३
तूं परमात्मा एक स्वयंभू । अनंत चिन्मय, तूंचि सर्वभू
निसर्ग तूं, तूं जीव, तूं प्रभू । तूं एक अनेकाकार ४
थंड मनेंही बंड करीती । बहुरूपी पाखंड वरीती
मजहि एकदां नास्तिक रीति । तर्कशुद्ध गमली फार ५
तर्कशुद्ध आतां अद्वैत । अद्वैतीं प्रकृतीशद्वैत
ईश जीव प्रकृति-विकृतींत । तो जीवा शिव करणार ६
शिवा जीवता, जीवा शिवता । लीला ही प्रिय तुज अद्वैता
म्हणुनि निसर्ग होउनि रचिता । तूं होसि तेथ झुंजार ७
मी तूं; तूं, तूं; सर्व तूंच तूं । मजसि राहिला मुळीं न किंतु
तेजस्वी तूं, रडवाही तूं । हंसरा तूं तूं गुलजार ८

## ८५ मी त्वत्पदिं लीन (भिल्लीण दिडकी)
### (मृत्यूस)

जीवास हरी । आस वरी । एक तुझीच । कीं तूं हृदयींच
मी अल्पमती । कालगती । फार कठीण । मी त्वत्पदीं लीन १
ती काव्यकला । नाहिं मला । चित्त हराया । चैतन्य भराया
चैतन्य जनीं । नाहिं मनीं । यास्तव शीण । मी त्वत्पदीं लीन २
दे यांस कुणी । काव्यगुणीं । तेजविहारी । चैतन्य चितारी
तो काव्य करो । यांत भरो । तेज नवीन । मी त्वत्पदिं लीन ३
हे आर्य ! हरी । काय बरी । यांस दशा ही । ही मन्मन दाही
हे होत मुनी । आठवुनी । त्यागि धुरीण । मी त्वत्पदिं लीन ४
त्यागी न जरी । आर्य तरी । कार्य न होई । हें दास्य न जाई
हें दास्य टिके । लोक भुके । तोंवरि दीन । मी त्वत्पदिं लीन ५
अस्पृश्य गृहीं । मुस्लिमही । तुष्ट न होती । हे रुष्ट रहाती
तों दास्य टिके । लोक भुके । तोंवरि दीन । मी त्वत्पदिं लीन ६
हे साम्यरणीं । दीन धनी । झुंजू पहाती । सत्ता परहातीं !
हा वर्गलढा । होय खडा । येथ नवीन । मी त्वत्पदिं लीन ७
हे बंधुलढे । तों नुघडे । द्वार यशाचें । आश्चर्य कशाचें
हें पाहुनियां । मद्हृदया । हो बहु शीण । मी त्वत्पदिं लीन ८
आत्माहुतिनें । बंधुरणें । गाडुनियां हीं । सद्भारतियांहीं
द्यावें स्वजना । ऐक्यधना । हें त्वदधीन । मी त्वत्पदिं लीन ९
राष्ट्रैक्य नसे । तों न असे । आस यशाची । मी यास्तव याचीं
ऐक्यार्थ हरी । साह्य करी । जें त्वदधीन । मी त्वत्पदिं लीन १०

## ८६ धिंड (माधवकरणी)
### (उपासक)

धिंड निघाली भारतियांची धिक् धिक् ध्वनि भरला
जगांतिल सकलहि देशांत
गोलमेज परिषदीं बडयांचा बडेपणा सरला
बड्यांची लढत आपसांत

खडी खडी जाहली तिथें ती अजुनि चाललीसे
गोम जी जुनी भारतांत
रोमरोमिं गृहयुद्धाची ती क्षोभ पावलीसे
हरी ! ती करी राष्ट्रघात १

अनार्य लढले आपसांत आर्यांसी जय द्याया
दलित ते अजि अस्पृश्यांत
हिंदु हिंदु लढले मुस्लीमा देश समर्पाया
पुढेंही तीच घडे मात
मुस्लिम हिंदू लढले; देशीं धनी आंग्ल झाले
देउनि दोघांसी लात
गोलमेज परिषदीं वडयांसी तें वारें आलें
हरी ! तें करी राष्ट्रघात २

जें झालें तें होउनि गेलें; आतां तरी उमजो
देशिय होउ सर्व एक
हिंदु उमजो; हरिजन मुस्लिम निकट बंधु समजो
त्यांची मागणि प्रत्येक
देवो; राहो निश्चय करुनि "करोत हे सत्ता
नको परि परसत्ता येथें"
निश्चय हा हिंदूंचा होइल जगन्मान्य कित्ता
वानितिल जन जेथें तेथें ३

समाजसत्ता–समत्व सत्ता–वाद नवा आला
बरा तो; परी मुख्य वाद
देश–स्वातंत्र्याचा; त्यावरि करो न कुणि घाला
पराचा होउनि पडसाद
पर हे सत्ताधारी कारस्थानी वस्ताद—
हरी ! तूं जाणतोसि सारें
मुख्य वाद तो मुख्य जाणवी; तूं घेई दाद
घालवी गृहकलिचें वारें ४

## ८७ माझा धंदा (अभंग)

(दुबळेपणा)

देवा ! खेळ तुझा आम्ही तूझे गडी
गड्यांच्या तूं नडी पूरवीता
माझिया नडी सांगितल्या तुज
दुज्यांचेंही गुज तुजपाशीं
तुला सारिखेच सारे तुझे गडी
प्रत्येकासी नडी क्षणोक्षणीं
तुला क्षणाचाही नाहीं गा उसंत
श्रमजीवी संत पहिला तूं
आयके नायके माझें सांगितलें
माझें काम झालें सांगण्याचें
आयकोत माझें नायकोत गडी
माझ्या मनीं अढी मुळीं नाहीं
सांगणें सांगावें करणें करावें
प्रेम पसरावें सुविवेकी
धंदा हाचि माझा नित्य आनंदाचा
तुझीया छंदाचा छंदी मीहि
देवा ! खेळें खेळ तुझिये आवडी
न जाईन रडी कांहीं केल्यां.

समाप्त

## ८८ प्रेमकथा (अनुष्टुप्)

श्रीहरी जीव-आत्म्याचा आत्मा प्रेम-प्रकाश-धि
प्रेम-प्रकाश-प्रवण जीव घे जन्म त्यामधीं १
धरी तनू मानवाची विकास-पथिं चालतां
या तनूमधिं तो होय बहु-धी बहु-बोलता २
तें बोलणें त्या बुद्धी तो काम-कामुक सस्पृह
कालें सोडूनि दे, होई प्रेम-कामुक निःस्पृह ३

हितार्थ मानव्याच्या तो    होमी देह हरीपदीं
हुतात्मा होय हव्यासें    जनप्रेम-प्रबद्ध-धी ४

धुवूनि टाकाया मोह    जनाचा देहकारण
वाहवी रक्त अपुलें    मरुनी तो विना-रण ५

नम्र बोधें दुरात्म्यांसी    बोधूनी सत्पथाविशीं
हरीचे चरणीं देहा    ठेवी तो प्रेम तापसी ६

सुदीनबंधुसेवार्थ    खल-बंधुविनाशन
करूनि कोणी सद्भक्त    करी प्रेमप्रकाशन ७

नारायणें तो कथिला    पंथ प्रेमप्रकाशक
परी कठिण तो कोणा    खलबांधव-नाशक ८

करुणेचा अतिशय    निजपात्रत्व-संक्षय
करी कठिण कोणासी    खल-बांधव-संक्षय ९

योग्य त्या मरणें वाटे    प्रेमी भक्ता विना-रण
धुवूनि टाकाया मोह    जनाचा देह-कारण १०

नाहीं मानव्य-उद्धार    जोंवरी दास भारत
नाहीं अ-दासता त्यासी    जोंवरी तो सभा-रत ११

तूर्तातूर्त बरें कांहीं    सभा-रति करूं शके
परी प्रभा स्वसत्तेची    मागें कांहीं दुजें निकें १२

करी अरुण आकाश    रक्त-सुस्नात सादर
रविप्रभा तदा त्यासी    आलिंगी प्रेम निर्भर १३

रक्त-स्नात यदा आम्ही    भारता करूं आदरें
स्वसत्तेची प्रभा त्यासी    आलिंगील तदा भरें १४

राहील मोह देहाचा    जोंवरी सेवकीं जनीं
भरला आजसा थोर    तोंवरी दास्य जाचणी १५

नाहीं जनांत सामान्य    सात्त्विकी मोह-शून्यता
ती सेवकीं जनीं व्हावी    स्व-सत्ता नाहिं अन्यथा १६

थंड शांत मनें आम्हीं    सत्ताधारी-जनान्तर
तपासूनि उपासावें    पावण्या इच्छिला वर १७

रणहौसी कुणी स्वामी;    किती ! थोडे न हे जन

घनलोभी कुणी स्वामी   घनार्थ प्रिय ज्यां रण   १८
न लोभ ज्यां, जयां नाहीं   रणहौस, असे कुणी
स्वामी असति ज्यां आम्ही   सुटावें हें पटे मनीं   १९
नाथवर्ग असे तीन   यांची सम्यगुपासना
देईल वर जो व्हावा   आपणां दलितां जनां   २०
नाथ अंतिम वर्गाचे   वाढतील असा पथ
आत्मसंहार सत्त्वस्थ   सामुदायिक संतत   २१
तत्त्व सत्तापात्रतेचें   देहहोम-समर्थता
आम्हांत दिसतां शुद्ध   तुष्ट होतील देवता   २२
तिसरा वर्ग वाढेल   पडतील उणे दुजे
चढेल स्वजनीं वीर्य   स्वहोमा फल हें तिजें   २३
जाणूनी हीं स्वहोमाचीं   फलें उद्धार-कारण
वाहवी रक्त अपुलें   प्रेमी कोणी विना-रण   २४
नीति स्वहोमनिरता   मानव्योद्धारहेतुकी
विनम्र प्रेमाची सीमा   अद्‌भुता अतिसात्त्विकी   २५
केला स्व-होम एकानें   हरिच्या चरणीं असा
करील स्वजनीं कांहीं   परिणाम इवा तसा   २६
स्वामिवर्गविचारांची   व्हाया सु-परिवर्तना
स्व-होम सुमहान् व्हावे   सामूहिक पुनः पुन्हा   २७
हें शुद्ध मरणें व्हावें   व्हावें दुर्जन मारणें
यथावीर्य सुवीरांनीं   करणें देश-कारणें   २८
नाहींच मरणावीण   मारणावीण तारण
नाहींच अन्योपायांनीं   पूर्ण दास्य-निवारण   २९
नीति दुर्जन-होमाची   स्व-होमाची हरिप्रिय
देश-उद्धारक प्रेम   सर्व त्या प्रिय सक्रिय   ३०
योग प्रेम प्रकाशाचा   ऊनाधिक जसा जिथें
तसें तें प्रेम निर्दोष   ऊनाधिक असे तिथें   ३१
थोरही प्रेमल कुणी   प्रकाश-न्यूनतागुणें
गुणाधिक प्रकारांत   पाहे अगुण वा उणें   ३२

"नसे असिलता चिन्ह शूराचें, भीतिचिन्ह तें"
असें जें बोलतें प्रेम प्रकाश न्यूनता तिथें ३३
थोडा विचार सांगेल असि शूर अ-शूर ही
उपयोजी; भीतिचिन्ह म्हणे त्या तो दुराग्रही ३४
"हिंसा कुणाचिही त्याज्य केव्हांहि सत्य-सेवका
हिंसा भीतीच करिते अहिंसा प्रेम हें शिका" ३५
कोणी पाठ असा देई प्रेमें प्रेमें शिकें कुणी
येथें प्रकाश-न्यूनत्व पाठका पठका मनीं ३६
नारायणा नांव सत्य जो नारायण-सेवक
नारायणार्थ होणें त्या प्रसंगीं खल-हिंसक ३७
करी तो खलहिंसा ती सत्यप्रेमें, न भीतिनें
असि तेथें प्रेमचिन्ह विलसे शूरता-गुणें ३८
"न साक्षात्कार ईशाचा अहिंसा सोडितां कुणा"
या पाठांत बहु प्रेम प्रकाश परि तो उणा ३९
न ईश देखे हिंसा वा अहिंसा, प्रेम त्या हवें
प्रेमें हिंसा निज, पर, हिंसात्यागहि संभवे ४०
वस्तु प्रेम असे वृत्ति अन्य जीव हितोत्सुक
विश्वप्रेम असे प्रेम सर्वजीवहितोत्सुक ४१
'कल्याण देवा सर्वांचें करीं, करविं मत्करीं
कल्याण बहु जीवांचें' प्रेमी प्रार्थील यापरी ४२
रमे सर्वहितीं प्रेमी; बल त्याचें जसें तसें
अधिकांत अधीकांचें स्वयें हित करीतसे ४३
सेवा स्वदेशीयांची हें महाव्रत तया असे
दास स्वदेश असतां तया तें पहिलें दिसे ४४
स्वतंत्र देशीं विश्वाचा प्रेमी स्वातंत्र्यवंचित
दासदेशार्थ झगडे तयासी तें महाव्रत ४५
तापला देश अपुला दास्यें तो दासतेंतुनी
काढणें मुख्य कर्तव्य विश्वप्रेमासही जनीं ४६
न सोडी गोड बोलानें सत्ता जेता रणव्रती

न सोडी तीव्र बोलानें सत्ता जेता रणव्रती ४७
तापतो परतापानें जेत्या देशांत तो जन
विश्वप्रेमी अल्पसंख्य पावे तो कैंवि वर्धन ४८
नर जे रणहौसी वा धनासाठीं रणप्रिय
त्यां कैंवि रणरासाची रीति होईल अप्रिय ४९
याचा विचार करितां स्व-होम-पथ नूतन
विश्वप्रेमा दिसे तैसा खल-होम सनातन ५०
न हिंसापथ माने ज्या अहिंसात्मक संगर
चालवी विश्वप्रेमी तो दास्योच्चाटनतत्पर ५१
रस्ता कांहीं चालुनीयां अहिंसादल जाइल
परी न पुरती सत्ता स्वदेशीं स्वीय पाहिल ५२
लयासि पुरतें जाया स्वदेशीं पर-शासन
स्व-होम कामा येईल तैसेंचि खल-नाशन ५३
नारायणें हा प्रकाश विश्वप्रेमा दिला जया
हिंसा विहित ज्या केली हिंसा विहित हो तया ५४
योग याचा जया प्रेमा नाहीं त्यासि अहिंसन
महाव्रत असो; प्रेमा दुज्या विहित हिंसन ५५
न होय मरणें शुद्ध तेणें दुर्जन मारणें
यथा वीर्य प्रेमळांनीं करणें देश-कारणें ५६
"न साक्षात्कार ईशाचा अहिंसा सोडितां कुणा"
या पाठांत बहु प्रेम प्रकाश परि तो उणा ५७
न ईश देखे हिंसा वा अहिंसा; प्रेम त्या हवें
प्रेमें हिंसा निज पर हिंसात्यागहि संभवे ५८
वस्तु प्रेम असे वृत्ति अन्यजीवहितोत्सुक
विश्वप्रेम असे प्रेम सर्वजीवहितोत्सुक ५९
"कर्तव्य देशाची होळी जगत्कल्याण व्हावया
जशी होळी कुटुंबाची देशकल्याण व्हावया" ६०
या पाठांत बहु प्रेम प्रकाश परि तो उणा
जगत्कल्याण साधेना देशा जाळुनियां कुणा ६१

नाहीं देशासि जाळूनी दास्याग्नींत जगद्धित
कुटुंब-होळी नियत देशा होत असे हित ६२
"तत्त्वज्ञ भारताऐसा महादेश जळे जळो
परी अहिंसात्यागाचें कर्म तें सर्वथा टळो" ६३
लागलें वेड हें कोणा अहिंसा-शब्द-घोंकणी
न बुद्ध खिस्त गांधीजी अहिंसक असे कुणी ६४
नम्रभावें सूक्ष्मदृष्टया पाहिलीं चरितें तिन्ही
शब्दांचें बंड सर्वत्र अहिंसक नसे कुणी ६५
न सत्य वाचा सर्वत्र अहिंसा न सदा तथा
मान्य या थोर पुरुषा तच्चरित्रांत ही कथा ६६
थोर ते थोर; थांबावें अस्थानीं जीव-हिंसन
असत्य अस्थानीं तैसें या अर्थीं थोर-शासन ६७
न संशय मुळींहीं कीं अहिंसा सत्य सर्वदा
सामान्य व्यवहारांत पाळणें नीति मोक्षदा ६८
दुष्ट जे कपटी क्रूर अहिंसा-सत्य-पालकां
सज्जनां छळिताती ते दंड्य सज्जनसेवकां ६९
कर्तव्य सेवकांचें त्या यथान्याय दुरात्मया
कपटेंहि वधूनीयां दाखवावी खरी दया ७०
यापरि वधिला दुष्ट वधोत्तर मनीं बरें
स्वचरित्र विवंचूनी बरें कांहीं शिके खरें ७१
रीति ही खलदंडाची श्रीहरी साधुसेवक
स्वयें वरी बुधा बोधी सामान्य-विधि-बाधक ७२
कर्तव्य-विधि सामान्य अहिंसा, सत्य भाषण
अपवाद असत्येंही छली-क्रूर-विनाशन ७३
नर स्वयें जो सद्वृत्त दुष्टा साह्य करी भवीं
भीष्मासमान तो दंड्य हेंहि श्रीहरि शीकवी ७४
विशेष हरिबोधाचा बोधान्तीं बोध साधका
देई तो आग्रहें हा कीं विवेका करणें सखा ७५
"खरें गुह्यतम ज्ञान तें मीं कथियलें तुज

आतां हें सर्व निःशेष    विवेकें विवरीं विज    ७६
जें विवेकें तुला माने    करणें तेंचि तूं करीं
माझा बोध श्रेष्ठ एक    देवाची कांस तूं धरीं    ७७
राहे तुझ्या तो हृदयीं    सर्वांच्या हृदयीं सदा
भ्रमवि तोचि सर्वांसी    संपदा दावि आपदा    ७८
दृढ कांस धरीं त्याची    सर्व भावें तुवां तया
प्रसन्न करितां पार्था    शांति लाभेल अक्षया    ७९
या बोधा सर्व मद्बोधा    विवेकें निज वीवरीं
जें विवेकें तुला माने    करणें तेचि तूं करीं"    ८०
राहो विवेक-स्वातंत्र्य-    बोध हा साधका मनीं
गुरु बाह्य न मानावा    हरि-आदिक सज्जनीं    ८१
न विवेका पटे जें जें    बोधिलें हरिनें स्वयें
बाह्यरूपें, त्यजा तें तें    कथिलें हें स्वयें तयें    ८२
या भवीं अवतारांहीं    महात्म्यांहीं जुन्या नव्या
बोधिल्या नीतिरीती ज्या    त्या विवेचावया हव्या    ८३
यथामति विवेचाव्या    विवेकें प्रेमनिर्भरें
तया पसंत त्या घ्याव्या    टाकाव्या अन्य सद्वरें    ८४
राहो विवेक-स्वातंत्र्य    बोध हा साधका मनीं
गुरु बाह्य न मानावा    हृदयेश गुरू धनी    ८५
निर्मल-प्रेम-भरित-    विवेक-मति तन्मति
प्रेमी-विवेक-रूपानें    जीवीं सच्चित् जगत्पति    ८६
त्याचें नाटक हें विश्व,    नट जीव, तदंतरीं
विवेक-प्रेम-भेदें तो    भिन्नता नटनीं भरी    ८७
रमे एकचि सर्वत्र    जीवांतरिं जगत्पति
निर्मल-प्रेम-भरित-    विवेक मति तन्मति    ८८
ती एक सर्वथा वंद्य    ज्याची त्यास, दुज्यास न;
जीवें जीवें स्वचित्तांत    शोधावें ईश-शासन    ८९
न सत्य माझें निःशेष    सत्य आज दुज्या कुणा
प्रकाश-अनुबन्धी तें    क्रमें हो तद्विकासना    ९०

नको म्हणूनियां वाद; प्रकाश-ज्ञान-वर्धना
करावी सत्प्रयत्नानें व्हाया सत्य-विकासना ९१
नारायण स्वयं-सत्य नित्य अग्रिम अन्तिम
तदाधारें दुजें सत्य विश्वनाटक उत्तम ९२
मला दिसे तिजें सत्य नाट्य-प्रेम नटीं नटीं
चौथें नट-नट-प्रेम विकासी विश्वसंपुटीं ९३
टांकी चाले अहोरात्र नटमूर्तिवरी भवी
मूर्ति ती मोहिनी व्हाया ती नारायण चालवी ९४
विश्वप्रेममयी मूर्ति विश्वकाममयींतुनी
नारायणाच्या टांकीनें निपजे नाटकांगणीं ९५
नीति सत्य-अहिंसा वा हिंसा-सत्य-अपह्नुति
विश्वप्रेमी वरी जैशी ह्न्नारायण-संमति ९६
'त्राण तसां तापकांसी कापुनी द्या' म्हणे कुणा
'कुणा न हाणा त्राणार्थ' कोणा आदेश हा उणा ९७
नारायणाची मर्जी ती दर्दी तो सर्वचालक
यथाप्रसंग पात्रांसी मंत्र दे सर्वपालक ९८
कर्तृत्व त्याचें गंभीर अति आश्चर्यकारक
रूसीं विलसतें आज तप्ततापनिवारक ९९
करुणामूर्ति तो ख्रिस्त देवाचा पुत्र गाजला
तद्देव-पुत्र-धर्मीय शासकीं रूस भाजला १००
लीन जो कोंकरूं ख्रिस्त तद्धर्म गुरु बाडगे
रूसीय-भक्त-कळप खाती खादाड लांडगे १०१
गांजणूक अशी रूसीं दीर्घकाल दयामय
नारायण बघे अंतीं रिघे सन्मनिं चिन्मय १०२
"येशू न माना, येशूचा पिता देव नसे म्हणा
नास्तिक्य देव-धर्माचें वरुनी उद्धरा जनां" १०३
नारायणें मंत्र-फुंक फुंकुनी अशि सन्मनीं
'नास्ति' रूसीय संतां तो जाहला मंत्रिकाग्रणी १०४
नीति रूसीय संतांची लोपली यापरी जुनी

नवी नीति नवा धर्म ढाकला त्यांचिया मनीं १०५
निसर्गज्ञान तें शास्त्र धर्म तें शास्त्र पाहुनी
मानव्यसेवा शास्त्रीय असें ते मानिती मुनि १०६
नसो अ-समता घोर वर्णवर्गोच्चनीचता
जन्मजा धनजा जावो यासाठीं कष्टती अतां १०७
तापली सृष्टि वैषम्यें तें यंत्रयुगि वाढलें
बेकारी बहु सर्वत्र कष्टाळू अति नाडले १०८
लक्षितां स्थिति ही घोर मार्क्सनामा महामति
महाग्रंथ रची वानी धनोत्पादनपद्धति १०९
त्या महामतिनें पंथ कष्टी कष्टकरी जना
कथिला समतेचा तो माने रूसीय-सन्मना ११०
नको जुनी राजसत्ता लोकसत्ता नको जुनी
साम्य-निष्ठ समाजाची सत्ता व्हावी नवी जनीं १११
निसर्गशक्ति व्यक्तीची खासगी संपदा नसो
महोद्यम समाजाच्या मालकीचा सदा असो ११२
सत्ता कामकरी आणि कृषीवल गणां करीं
पायाभूत असो सारी जेणें वैषम्य हो दुरी ११३
राष्ट्र राष्ट्र असें होवो विश्वांत समता भरो
वर्गवर्गोच्चनीचत्व सर्वथा सर्व वोसरो ११४
रणावीण न हें शक्य रण तें संहति-क्रिया
होवो कष्टकरी सारा संघीभूत म्हणूनियां ११५
यापरी मार्क्स आदेशी देशीं देशीं सुसंस्कृत
होती कष्टकरी-संघ वरूनी समता-मत ११६
त्वरें हे कार्य करिती लेनिनादिक सज्जन
खेळुनी रण रूसांत स्थापिती साम्य-शासन ११७
नीतिप्रचार साम्याचा साठ वर्षंवरी तरी
रूसांत संतांहीं केला शिरें घेऊनियां करीं ११८
रगडीले शासित्यांहीं संत साम्य-प्रचारक
दोन लाखांवरी, होम झाला तो गुण-कारक ११९

कितीक प्रमदा रूसी उच्चवर्गीय वैभव
सोडूनी खेळल्या मोदें रुधिरी साम्य-आहव १२०
वीरा त्या वीर ते धन्य गेले जे खेळुनी रण
त्यांच्या वीर-प्रतापें हो तद्देशीं साम्य-शासन १२१
"नरो य आत्मौपम्येन समं सर्वत्र पश्यति
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः" १२२
तत्त्व हें साम्य-योगाचें जुनें श्रीहरि-संमत
व्यवहारीं नव्या रूसीं जाहलें सुप्रतिष्ठित १२३
तत्त्व हें व्यवहारांत आणाया हरि सन्मणि
'नास्ति' रूसीय संतांसि जाहला मंत्रिकाग्रणी १२४
नारायणाची मर्जी ती दर्दी तो सर्व-चालक
यथाप्रसंग पात्रांसी मंत्र दे सर्व-पालक १२५
कर्तृत्व त्याचें गंभीर अति आश्चर्यकारक
रूसीं विलसतें आज तप्ततापनिवारक १२६
कोपले रूसदेशीय- समता-स्थापकांवरी
असाम्यवादी परके स्वार्थपूजेचिया भरीं १२७
राक्षसी आसुरी कृत्यें कुटिल क्रूरतामय
केलीं या परराष्ट्रांहीं लाभला न परी जय १२८
यशस्वी जाहले वीर समता-भक्त रूसिय
प्रेमी विवेकि वीरांचें विवेकी प्रेम दुर्जय १२९
"यत्र योगेश्वरःकृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः
तत्र श्रीर्विजयो भूतिर् ध्रुवा नीतिर्मतिर्मम" १३०
मति ही मंत्र हा योग्य सुयोग्य जनतारक
विवेकीप्रेम-वीरत्व- योग कीं जयकारक १३१
कृपा पार्थां करी दीन कृपा ती प्रेम तें तदा
अविवेकी ज्ञानहीन तद्वीर्या होय आपदा १३२
दुष्ट-दंडें प्रेमसाध्य विश्वकल्याणवर्धना
सुसाध्य जाणुनी कृष्ण ज्ञान दे वीर अर्जुना १३३
न वीर्य ज्ञान वा प्रेम एकाकी जनतारक

जनीं ज्ञान-प्रेम-वीर्य— योग हो जयकारक १३४
कशी रूसीं जयी सत्ता जनोद्धार करीतसे
तें समीक्षा-द्वादशी[१] हा नवग्रंथ कथीतसे १३५
समीक्षकांहीं रूसांत जाउनी राहुनी स्वतां
पाहुनी सूक्ष्म दृष्टीनें लिहिली तेथिंची कथा १३६
थोर रूसी प्रयोगाचें थोर प्रेम मनीं मम
सचिंत करितें मातें पाहतां दुर्जनक्रम १३७
मारितील कुणी दुष्ट साम्यसत्ता-सुबालिका
चिंता चित्ता अशी माझ्या लावि दुर्जन-मालिका १३८
करुणा भाकितों नित्य करुण श्रीहरीस मी
सांभाळीं नव रूसाला यश दे त्या नव्या कर्मीं १३९
महाप्रयोग रूसीय धर्मशास्त्र-सुसंमत
अर्थशास्त्र-कामशास्त्र— मोक्षशास्त्र-सुसंमत १४०
तो धर्म जो साम्यनिष्ठ आचार प्रेम-बोधक
शास्त्रीय अर्थ-कामाप्ति ती जी धर्माविरोधक १४१
कर्म धार्मिक निःस्वार्थ लोकसंग्रहकारक
तें मोक्षद मुमुक्षूतें चित्त-कश्मल-त्रारक १४२
कार्य रूसीय संतांचें पुरुषार्थ-चतुष्टय
सुसाध्य करितें लोकां विवेकीसमतामय १४३
या कार्याची नवकथा समीक्षाद्वादशीगत
वाचितां वाटलें होवो रूससन्मित्र भारत १४४
तयाचा, साम्य-ध्येयाच्या कार्याचा तदनुष्ठित
सक्रियादर सप्रेम करो कांहीं यथोचित १४५
तें कार्य काय जें योग्य सप्रेमादरबोधक
याचा विचार मीं केला सद्भावें सूक्ष्म शोधक १४६
कार्य आर्य मला तेणें सुचलें, सुचवी हरी
प्रेमी विवेक निष्काम हरीचि हृदयान्तरीं १४७

---

१. Twelve Studies in Soviet Russia (1933) by Margaret I. Cole.

रूसीं एक सहस्राचा मेळा जावा रहावया
सत्याग्रही सज्जनांचा त्यांचीं दुःखें सहावया १४८
यासी घेतील कां रूसी धाडील सरकार कां
ही उठाठेव आरंभीं नको सद्भाव-धारकां १४९
करावी मंडळी आधीं सहस्रं गमनोत्सुक
स्त्रिया पुरुष उत्साही विश्वसेवासमुत्सुक १५०
कार्य स्वजनसेवेचें प्रत्यक्ष करुनी दुरी
रूसी-प्रयोग-सेवेचें कार्य घेणें असे करीं १५१
रुसतील भले कोणी रुसोत परि अंतरीं
प्रेमी विवेक न रुसो ज्याचा त्याचा खरा हरी १५२
रुसवूनि हरीसी या रूसीं जाणें बरें नसे
जावें तयाच्या संतोषें हित यांत खरें असे १५३
सेवा रूसी प्रयोगाची विश्वप्रेमप्रकाशक
भारता कामीं येईल तमोभार-प्रणाशक १५४
किती आजहि अंधार स्वजनीं शासित्या जनीं
कमी होईल तो कांहीं साम्य-यात्रिक पाहुनी १५५
ना म्हणो शासिता येथें साम्य-यात्रिक-मंडला
ना म्हणो रूस अथवा योजूं सत्याग्रही बला १५६
लय लावूनि हरिच्या चरणीं धरणें धरूं
एकापाठीं एक किंवा गटांनीं मरणें वरूं १५७
राहूं बंदींत मरणें वरणें न घडे जयां
वाहूं परी रूस-कार्या काया त्या यश यावया १५८
या सत्याग्रह-बाण्याचें फल सत्याग्रहीपणा
वाढेल स्वजनीं कांहीं मार्ग जो इष्टसाधना १५९
नीति शासकवर्गाची कांहीं इष्टसहायक
रूप घेईल बघुनी देखावा तुष्टिदायक १६०
कोणाही ध्येय-वीराला ध्येय-वीरत्व तोष दे
शासकीं वीर असती जरी ते नासले मदें १६१
देखावा आत्महोमाचा दम तो अल्पसा तरी

त्यागवील जागवील    शासकीं वीरता खरी    १६२
रीति शासक-वर्गाची    तेणें इष्ट-सहायक
रूप घेईल काहींसें    स्वजनां तुष्टिदायक    १६३
कार्य स्वजन-सेवेचें    अप्रत्यक्ष असें करूं
जरी रूसी प्रयोगाची    सेवा प्रत्यक्ष आचरूं    १६४
रावणें स्वजनांसाठीं    कार्य सामान्य लौकिक
रावणें सुजनांसाठीं    विदेशीय अलौकिक    १६५
कराया सुजनत्राण    माराया दुर्जनां हरी
युगीं युगीं योग्य धर्म    स्थापाया येत भूवरी    १६६
रावणें सुजनांसाठीं    विदेशीय यथाबल
अलौकिक असामान्य    हरि-कार्य सुमंगल    १६७
लय लावूनि हरिच्या    चरणीं कार्यमंगल
रूसीप्रयोग-सेवेचें    करो सत्याग्रहीदल    १६८
लक्ष लागेल विश्वाचें    आस्थेनें भारताकडे
विश्वप्रेम असामान्य    दिसतां येथ रोकडें    १६९
डांगोरा पिटला विश्वीं    गोल-मेज-सभा-मिषें
“जातिस्वार्थी भारतीय    राष्ट्रप्रेमहि त्यां नसे”    १७०
साम्य-यात्रिक-मेळ्याचें    विश्वप्रेम अलौकिक
गाजतां कांहिं होईल    विश्वीं भारत-लौकिक    १७१
कार्य रूसीय यात्रेचें    कर्तव्य सुमहत्फल
बोले मद्हृदयाधीश    विवेकी प्रेम मंगल    १७२
लाभावी स्वजनां सत्ता    स्वदेशीं पूर्ण सर्वथा
ही नसे आज, नव्हती    केव्हांही जल्पना-कथा    १७३
थोर जल्पक आहेत    अल्प कार्य तयां करीं
घडतें परि त्यायोगें    स्व-सत्ता येइना घरीं    १७४
रण सामान्य तुमुल    असामान्य स्वहोम वा
लागेल; नचि भागेल    खाण्यानें बंधनीं हवा    १७५
विश्वप्रेमी खल-प्रेमी    खलत्व खल-शासकीं
हटवील हटें बंदी    होउनी ही कथा फुकी    १७६

कार्य कांहीं जल्पनेनें
कांहीं बंधाग्रहें तसें
जल्पनेहूनि अधिक
होतें सुस्पष्ट हें असे १७७

सत्ता पूर्ण परी नाहीं
प्राप्य कोणा रणाविण
सनातन अशी नीति
रण ना मरणाविण १७८

"नसे हिंसेंत वीरत्व"
नसो, "तें मरणीं असे"
मरूं तरी समूहानें
रणाविण सुवीरसे १७९

सनातन रणा टाकूं
एकेरी रण नूतन
सामूहिक स्व-होमाचें
खेळूं स्मरुनि चिद्घन १८०

नारायणाचा आदेश
"मामनुस्मर युध्य च"
म्हणुनी स्मरुनी त्यातें
मरूं मानुनि तद्दच १८१

चालना सद्विचाराची
खल-शासक-अंतरीं
बोधे बंधाग्रहें जी ती
न सत्ताप्राप्तिसी पुरी १८२

रण नूतन एकेरी
स्ववधाग्रह सांघिक
करील कांहीं अधिक
खल-अंतर सात्त्विक १८३

कार्य स्वसत्ताप्राप्तीचें
पूर्ण या स्ववधाग्रहें
होईल सर्वथा ऐसें
न म्हणें मीं दुराग्रहें १८४

हित यांत असे फार
बोध-बंधाग्रहाहुनी
हिंसा-त्यागी प्रेमलासी
थोर मार्ग न याहुनी १८५

नको हिंसा नको हिंसा
हिंसामय जगीं असा
बोध संतप्त वीराला
न पचे, पचतो कसा १८६

स्वहिंसा राष्ट्र-मुक्त्यर्थ
वरियेली अहिंसकें
तरी बोध अहिंसेचा
संतप्तासि पचूं शके १८७

कांहीं वीर त्यागितील
हिंसामार्ग सनातन
स्वहिंसामार्ग राष्ट्रार्थ
आदरीतील नूतन १८८

नको स्वहिंसा स्वकरें
परहिंसा मुळीं नको
कायदेभंग विनयी
वर्जूनि पुढचें नको १८९

कांहीं अशा आग्रहाचे
कांहीं बोधाग्रही जसे
राष्ट्रप्रेमी असायाचे
भेद कीं अंतरीं वसे १९०

सत्य-भेदें मार्गभेद
सत्या ज्ञान प्रकाशवी

यथा ज्ञान तथा सत्य ज्ञानभेद वसे भवीं १९१
विशिष्ट ज्ञान जें माझें तें माझें सत्य अंतरीं
दाखवी निश्चयें मातें सत्य तें मार्ग त्यापरी १९२
राष्ट्रोद्धार नसे शक्य विना मार्गसमुच्चय
सामूहिक स्वहोमाच्या मार्गें हो वीर्यसंचय १९३
या पुण्यमार्गा वरितां दुजे मार्ग महाफल
वर्जितां परि हा मार्ग दुजे मार्ग सुदुर्बल १९४
लावि मद् हृदयाधीश बोलाया प्रेमबोल हे
फोल हे समजो कोणी मजला अतिखोल हे १९५
होम-स्वहोम हा मार्ग रूस-यात्रिक-मंडळें
आदरावा जरी शास्ता ना म्हणेल तया बळें १९६
लक्ष सादर लागेल विश्वाचें भारताकडे
विश्वप्रेम असामान्य दिसतां येथ रोकडें १९७
डाग देशासि दास्याचा तो धुण्या मरणें पडे
मरणारे असे कांहीं जावे रूसीय भूकडे १९८
डर आहे स्व-होमाचा रूस-यात्री नको असा
खलहोमी हो न हो वा त्याचा प्रश्न न फारसा १९९
'सत्याग्रहें स्वहस्तानें स्वमोह करणें सुखें'
भारती तेज-वैशिष्ट्य वदवा हें जगन्मुखें २००
खरे निजपरोद्धार– मार्ग हे चार तात्त्विक
बोध स्वबंध स्ववध खलात्मवध सात्त्विक २०१
कांहीं माया छली मायी खलाशीं वागतां बरी
राष्ट्रोद्धारकरी दैवी सत्सेव्या ती भवान्तरीं २०२
राष्ट्रोद्धारक सन्माया– युक्त मार्ग-चतुष्टय
प्रथाप्रसंग सत्सेव्य मुक्ति तेणें निरामय २०३
योगेश हृदयाधीश बोलवी प्रेमबोल हे
फोल हे समजो कोणी मज खोल अमोल हे २०४
हे बुद्ध खिस्त गांधीजी सर्वही मानिती मनीं
शब्दांचें बंड सर्वत्र अहिंसक नसे कुणी २०५

न सत्यवाचा ऋजुता अहिंसा सर्वदा तथा
मान्य या थोर पुरुषां तच्चरित्रांत ही कथा २०६
थोर ते थोर; थांबावें अस्थानीं जीवहिंसन
माया असत्यही तैसें— या अर्थीं थोर शासन २०७
नसे मतैक्य अस्थानीं स्थानीं काय अशाविषीं
विवाद म्हणुनी चाले; विवादति ऋषी ऋषी २०८
शांतिवेड जयां त्यांची अहिंसा-सत्य-घोकणी
क्रांतिवेड जयां त्यांची हिंसा-मायादि-घोकणी २०९
नसे वेड असें प्रज्ञा त्या विश्व-प्रगति प्रिय
तदर्थ या वा त्या मार्गीं तो यथाकाल सक्रिय २१०
या दास्यदग्ध देशांत वेड जें बाह्य शांतिचें
तें बरें न; तयापेक्षां बरें वेड अ-शांतिचें २११
चैतन्य खेळो सर्वत्र दास्यद्वेषें जळो जन
सुखहांव पळो दूर दुःखांहीं न चळो मन २१२
न जाय दास्य देशाचें शांतीचें वेड जोंवरी;
अ-शांति वावरो येथें वावरे दास्य तोंवरी २१३
राहोत बोधवादी ते बोध देत अहर्निश
राहोत बंधवादी ते बंध घेत अहर्निश २१४
शिरें घेवोत तद्वादी यथाकाल यथाबल
शिरे देवोत तद्वादी यथाकाल यथाबल २१५
लाभ देशा न सत्तेचा विना मार्ग-समुच्चय
सामूहिक स्व-होमाच्या मार्गें हो वीर्य-संचय २१६
या पुण्य मार्गा वरितां दुजे मार्ग महाफल
वर्जितां हा पुण्यमार्ग दुजे मार्ग सुदुर्बल २१७
लागो म्हणोनियां लक्ष या नूतन पथाकडे
पथ हा वरितां आम्हीं हरि वारील सांकडें २१८
डंका ही आत्महोमाची पडे वाजविणें मला
कीं सामान्य रणीं होम असामान्यचि आजला २१९
लाभ देशा स्वसत्तेचा व्हावा; परि सनातन

रण फार न गाजावें    मारी अमित जें जन    २२०
नसे द्वेष विदेशाचा;    दास्याचा द्वेष मन्मनीं
मला देशी विदेशीय    प्रिय त्या त्या परी जनीं    २२१
नीति ती प्रिय मच्चित्ता    मरती बहू ना जिणें
परी देश नको दास्यीं    दास्याचें नावडे जिणें    २२२
नाहींसें हो देशदास्य    यासाठीं दास्य बंधनीं
मान्य मातें जन्म जन्म;    सुखी मी देशमोचनीं    २२३
नावडे दासता देशा    दास्य देशार्थ आवडे
व्हावया मान देशाचा    अपमानीं सुखें पडे    २२४
डोळां मरण देशाचें    पाहणें नावडे मनीं
आवडे जीवन तया    द्यावया मरणें रणीं    २२५
नावडे मरणें लोक    सुखें न मरतील जे
सामान्य-रण चिंतेनें    मच्चित्त थरके थिजे    २२६
जेणें मरण-भीतांचें    मरणें कांहिंसें टळे
मार्ग काढावया ऐसा    मच्चित्त थिजलें वळें    २२७
लय लावूनि बसतां    लाधला मार्ग नूतन
भागीरथी-तटाकीं हें    घडलें वृत्त पावन    २२८
नारायणें भ्रमविलें    अज्ञातीं मजला यदा
आपदा संपदा कांहीं    बाह्यांतर दिली तदा    २२९
दिली त्या संपदेमध्यें    एकेरी रण-कल्पना
कल्पना-संपदेनें या    दिला उल्लास मन्मना    २३०
नवीन रण एकेरी    समूहें मरणें स्वयें
बोधूनि प्रतिपक्षासी    न्याय्य जें करणें तयें    २३१
या कल्पनेसी तो काळ    अनुकूल न दीसला
उल्लास गेला मनिंचा    जीव कांहीं उदासला    २३२
लोक जागृति जी आज    ती पाहूनि मनीं मम
उठली लहरी "आज    करावा कांहिंसा श्रम"    २३३
मोदें बहु उडी घेती    साम-सत्याग्रही रणीं
मारिल्या प्रतिपक्षानें    मरतीही सुखें कुणी    २३४

न पटे साम ते वीर शुद्ध-सत्याग्रही रणीं
उडी घेऊनि मरती पडती जन्मबंधनीं २३५
'नको हिंसा' 'नको साम' अन्योन्यासी निषेधिती
तीव्र शब्दीं सान थोर मर्म अन्योन्य भेदिती २३६
तत्त्वदृष्ट्या साम-शुद्ध– सत्याग्रह-समुच्चय
बोधाद्यन्यक्रियायुक्त अवश्य मिळण्या जय २३७
या तत्त्वदृष्टीचा बोध स्वहोम-रण-बोधही
आरंभिला पाहुनीयां लोकजागृति विग्रही २३८
हा बोध मीं चालविला यथामति परी मम
मनीं प्रश्न उठे "आज फळा येईल कां श्रम !" २३९
मरणा रणिं एकेरी स्वहोमा शुद्ध सात्त्विक
सज्ज होतील कां कोणी वरुनी दृष्टि तात्त्विक ! २४०
'कर्मण्येवाधिकारस्ते' हृदयीं हरि हांक दे
'वचनं ते करिष्यामि' प्रेमें मी हरिसी वदें २४१
दिलें भाग्य मला तेणें भंगीकामासि लाविलें
कांहीं ब्राह्मणवर्गीय जसें मीं मनिं भाविलें २४२
लय तत्पदिं लावूनी हातीं मीं झाडु घेतला
झाडितां झाडितां अंतीं भाग्याचा दिन पातला २४३
लागले कांहिं झाडाया उच्चवर्गीय आजला
दृश्य हें दाखवूनीयां तेणें तोषविलें मला २४४
लोटलीं वरुषांपाठीं वरुषें झाडु-पूजनीं
अंतीं मीं पाहिलें दृश्य दृढ जें भाविलें मनीं २४५
नारायणें मम मनीं झाडूची भक्ति घातली
तैशी दुज्यांतही तेणें ती यथाकाल ओतली २४६
लीला त्याची तोचि जाणें जाणीव-प्रेम-रूपडें
हृदयीं हृदयीं भिन्न लेऊनी भविं वागडे २४७
डोळां त्या हरिच्या पायीं कान तद्वचनाकडे
लावूनि भावें तत्कार्य करणें मज आवडे २४८
डोलतों आज तत्कार्यीं डोललों न असा सदा

फोल कार्यांत मच्चित्त होतें फुलत एकदां २४९
देखूनि सरणी माझ्या विकासाची मदंतरीं
फोल तो करि मोलाचें श्रद्धा ही दृढ मी वरीं २५०
राजसी तामसी जीवा कालें सात्विक तो करी
भोक्तृत्व फिरवूनीयां कर्तृत्व फिरवी हरी २५१
रास सारा तयाचा हा रास-सार जिवीं जिवीं
विकासभेदें हो भिन्न वस्तुस्थिति अशी भवी २५२
वेळा येईल, आणील हरि ती जी मला हवी
स्वहोम-रण खेळेल उत्साहानें प्रजा नवी २५३
विश्वास आहे मजला असा म्हणुनि हा श्रम
आज मीं चालवीलासे स्मरुनी पुरुषोत्तम २५४
महाधर्म-महाभूमि महींमाझारि भारत
आत्महोम महाधर्म महाप्रेम-महाव्रत २५५
तनुत्याग तनु त्याग महात्यागी जना मम
हिंसा-उच्चाटना ध्येय त्यागियां ध्येय उत्तम २५६
महामुनि-महाशिक्षा आम्हांसी भव्य भारतीं
"स्वपरोद्धारकार्यार्थ अज जीवा तनू-तति २५७
तनुत्याग तनु त्याग तनुसंतान-जाणत्या
हिंसा-उच्चाटना ध्येय दुःसाध्य ध्येय हो न त्या २५८
या भवीं सर्व हिंसेचें उच्चाटन असंभव
परी स्वहोम-संतानें तियेचा तनु संभव २५९
वीरता खलहिंसेंत खरी परि भवान्तरीं
दीनहिंसाहि वीरत्व वदती जन आसुरी २६०
रणीं सामान्य दीनांची हिंसा होय बहूपरी
सामान्य-रण-खेळ्याही गाजे वीर भवान्तरीं २६१
'राम' या रण-खेळ्यांत 'सुवीर-वरवीरता'
वसे कोणांत, कोणांत वसते खर-वीरता २६२
तनुत्याग वर-ध्येय— सेवार्थ वर-वीरता
तनुत्याग खल-ध्येय— सेवार्थ खर-वीरता २६३

तत्त्व हें वीर-कर्माचें एकेरी रणिं सात्त्विक
सुस्पष्ट होतां लाजेल खर-वीर्य असात्त्विक २६४
कर्म जें खल-नाशाचें खरें वीर्य हरिप्रिय
तें न लाजेल; गाजेल सदा तें प्रेम सक्रिय २६५
या भवीं सर्व हिंसेचें उच्चाटन असंभव
परी स्वहोम-संतानें तियेचा तनु संभव २६६
विवकी प्रेम जें जाणें स्वहोमीं 'स्व' टिके सदा
हिंसा-हिंसार्थ त्या प्रेमा स्वहोमीं काय आपदा ! २६७
दीन-हिंसा दीन व्हाया अहिंसा व्हावया बली
स्वहोम भारतीं कालीं तळपेल स्थलीं स्थलीं २६८
लक्ष त्या तीव्र तेजाच्या दिव्य दृश्यावरी मम
त्या दृश्यें तुष्ट होतील आमचे मुनिसत्तम २६९
मुनिसत्तम-सच्छिक्षा आम्हांसी भव्य भारतीं
"स्वपरोद्धारकार्यार्थ अज जीवा तनू-तति" २७०
"तनूभृतस्तनावस्यां कौमारं यौवनं जरा
तथा तन्वन्तर-प्राप्ति— र्धीरस्तत्र न मुह्यति" २७१
ती धीरता तनूमोह— त्यागिनी नव-भारतीं
भरेल, तैं स्वसत्तेच्या उठतील इमारती २७२
तनुत्याग स्वहोमांत खलहोमांत तो असे
शासन-प्रतिकारांत शांतीच्याहि कधीं दिसे २७३
स्वहोमीं दल तें श्रेष्ठ अतिसात्त्विक नूतन
खलहोमी वर-ध्येय तें सात्त्विक सनातन २७४
नाहीं स्व-सत्ता देशासी जोंवरी हें दल-द्वय
नाहीं सज्ज यथासांग करावा खलता-क्षय २७५
या भवीं खलता-नाशा खलहोम स्वहोम वा
होमद्वयाचा वा योग अवश्यचि सदा हवा २७६
विनयी विधिभंगाच्या दलें अतिबलीं खल
हले, परि हले किंचित् बहु तेणें न हो फल २७७
लक्ष या विधिभंगाच्या दलाहूनि पुढें, वरी

लावूं न आम्ही जोमानें स्वसत्ता तों न ये घरीं २७८
राष्ट्र-मुक्त्यर्थ, विश्वाचे उद्धारार्थ तिन्ही दलें
चवथें बोधदलही अवश्य कसलें भलें २७९
लागती कसलेलीं हीं दलें दास्यविनाशना
चतुरंग दलाची या व्हावी येथें उपासना २८०
नको डोळयांवरी व्यर्थ कातडी ओढणें बळें
नकोत पक्षापक्षाचे अंतःकलह बावळे २८१
लागतें रक्त सांडाया संतोषें वा बळें जिथें
तेथें रक्तघृणा मूढ; पापी ती हरिच्या मतें २८२
त्वरा करावी रक्ताची गंगा वाहविण्या अम्हीं
"वाहवुं रक्ताची गंगा"[1] थट्टा होवो न ही हमी २८३
महाधर्म-महाभूमि महीमाझारिं भारत
आत्महोम महाधर्म महाप्रेम महाव्रत २८४
तनुत्यागी आत्महोमें अहिंसाधर्मवर्धना
स्वसत्तावातिफलदा भारती-ऐक्य-साधना २८५
निंदा थट्टा हंसें हेंचि गोलमेजसभाफल
लाभलें आम्हां येथें कीं अंतःकलह गोंधळ २८६
लाजो या वृद्ध-कलहा विवेकी नवभारती
तयाचें श्रेष्ठ कर्तव्य करणें राष्ट्र-संहति २८७
त्यागवृत्तिविहीनत्व अंतःकलहकारण
कलहान्तक हो त्यागी आत्महोम-उपासन २८८
नको आम्हां विदेशीय शास्ता कोणीहि भारतीं
विवेकी, नवहिंदूची असो दृढ अशी मति २८९
तत्त्व हें एक अत्याज्य नको आग्रह दूसरा
मुसल्मान स्वदेशीय त्यासवें कलि ना बरा २९०
रस्ता हिंदु-मुसल्मान- ऐक्याचा, हिंदु भारती
यांहीं स्वहोमें करणें दृढ अन्योन्य-संहति २९१

---

१. महात्मा गांधीनीं १९३१ या वर्षी इंग्लंडमध्यें केलेल्या एका भाषणांतील एक वाक्य.

तापलेले हरिजन आदि हिंदु तयांसवें
स्वहोमें ऐक्य करणें हेंचि हिंदूजनां हवें २९२
विवेकी नवहिंदूंनीं भारती-ऐक्य व्हावया
स्वहोम करणें प्रेमें आळवूनि दयामया २९३
"या भारता देवदेवा दे दृढैक्य सु-संहति"
आळवूनि असें ठेवो स्वदेहा हिंदु भारती २९४
तळपेल असा प्रेमी आत्महोम स्थलीं स्थलीं
भारती नव हिंदूंचा वाराया वाढला कलि २९५
लक्ष त्या तीव्र तेजाच्या दिव्य दृश्यावरी मम
लक्ष तें लाविते मातें कराया आजचा श्रम २९६
मुसल्मानां हरिजनां व्हावा सत्तांश थोरला
द्यावा सुखें तो हिंदूंनीं त्यागाची शिकुनी कला २९७
लया सत्ता विदेशीय न जाय जंव भारतीं
तंव कोट्यवधी लोकां अन्नान्न करिता गति ! २९८
तांडा विदेशी चरतो चारितो स्वजनां किती !
मिति तया नसे कांहीं देशीयां हाल दुर्गति २९९
ताप हिंदू-अहिंदूंस आदि हिंदूंस हा सम
आत्मोन्नति कशी व्हावी जंव हा दुर्गति-क्रम ? ३००
मुसल्मानां हरिजनां हिंदूंसहि 'सनातनी'
देशीय सत्ता काढील आजच्या दुर्गतींतुनी ३०१
नसो सनातनीयांसी सत्ता मुळिंहि भारतीं
देशीय सत्ता कैशीही सर्वां होईल तारती ३०२
ताटांत सांडो वाटींत– ताट वाटीहि भारती
देशीय सत्ता कैशीही सर्वां होईल तारती– ३०३
"ताटांत सांडा, वाटींत; सांडा सत्ता पुरी पुरी"
मांडावी शासित्यांशीं ही निर्वाणीचीच वैखरी ३०४
राज्याची फार कालाची पथारी अंवरावया
द्यावीं वर्षें दश वीस करुनी मिति-निश्चया ३०५
या मुख्य न्याय-तत्त्वांचा उच्चार करुनी मुखें

| | | |
|---|---|---|
| नव-हिंदू-जनीं ध्यावी | आत्महोमीं उडी सुखें | ३०६ |
| खरें प्रेम विवेकी जें | तनु त्यागील आदरें | |
| तें प्रेम नव हिंदूंचें | दृश्य दिव्य खरें खरें | ३०७ |
| रमतें चित्त तें दृश्य | दिव्य अंतरिं देखुनी | |
| श्रमतें नव-चैतन्य | भराया आपुल्या जनीं | ३०८ |
| नीतिबोध न्यायबोध | करुनी देह ठेविणें | |
| स्वबंधु हिंदु वा अन्य | त्यासी ये रीति सेविणें | ३०९ |
| नीतिबोध न्यायबोध | विनयी विधिभंजन | |
| बोधासवें आत्महोम | हें शास्त्यां श्रेय अंजन | ३१० |
| नीतिबोध न्यायबोध | आत्महोम तयां सवें | |
| हिंसाप्रवण विश्वार्थ | प्रेमांजन असें हवें | ३११ |
| विवेकी नव हिंदूंची | स्वहोमयुत मागणी | |
| स्वजनीं, शासकीं, विश्वीं | करील प्रेम-लागणी | ३१२ |
| नम्र-बोध-प्रतीकार- | आत्महोम त्रिमार्ग हा | |
| रूढ व्हावा विवादांत | गोड व्हाया निसर्ग हा | ३१३ |
| हत्या रूढ विपक्षाची | राष्ट्र-राष्ट्र लढ्यांमधीं | |
| आत्महत्या रूढ तेथें | व्हावी प्रेमी गड्यांमधीं | ३१४ |
| धरा मारा जिथें चाले | हीन दीन न पाहतां | |
| लढा तो रूढ गाडाया | बोध क्षम न सर्वथा | ३१५ |
| थोडें बोधें, प्रतीकारें | नम्रें थोडें, हले मन | |
| बोधयुक्त स्वहोमें हो | तयाचें फार शोधन | ३१६ |
| नाहीं शोधन हें झालें | बली-राष्ट्र-मनीं जंव | |
| दीन-हिंसा न थांबेल | अन्योपायीं जनीं तंव | ३१७ |
| विवेकी प्रेम जें देखें | आत्महोमांत दूषण | |
| दीनहिंसकहिंसा तें | तंव मानील भूषण | ३१८ |
| नाहीं दूषण वा पाप | परार्थात्मवधक्रमीं | |
| 'परोपकारः पुण्याय' | गाइलें मुनि सत्तमीं | ३१९ |
| "मूढग्राहेणात्मनो यत् | पीडया क्रियते तपः | |
| परस्योत्सादनार्थं वा | तत्तामसमुदाहृतम्" | ३२० |

मान्य नाहीं आत्मपीडा    हरिसी मूढ साहसी
परोच्छेदाभिलाषी वा    त्याज्य ती तप तामसी ३२१
सूक्ष्म प्रेमी विवेका जें    आत्मपीडन भाविक
परोद्धारी शुभफल    दिसे तें तप सात्त्विक ३२२
करुणा-प्रेम-रूपानें    देव सर्वांतरीं वसे
पूजा त्या प्रेम-देवाची    आत्महोमीं करीतसे ३२३
सुश्रद्धायुक्तदेवाची    पूजा तें तप सात्त्विक
गीता-सप्तदशाध्यायीं    हें तपो-गान तात्त्विक ३२४
कराया ऐक्य देशांत    वाराया पर-शासन
दीनहिंसा निवाराया    आत्महोम-उपासन ३२५
नाहीं विकास जीवाच्या    शक्तींचा प्रेरणांविणें
प्रेरणा प्रेमशक्तीच्या    विकासा देह होमिणें ३२६
नसे विवेक वा प्रेम    शून्यत्वें एकही जिवीं
विवेक-प्रेम जीवाचें    द्विमुखी रूप या भवीं ३२७
विलासी पर-नाशी    जो, विवेक-प्रेम त्यांतही
वसे कांहीं; तद्विकासा    प्रेरणा आत्मघात ही ३२८
इत्यादि या हिंसकाची    तद्विकासासि साधक
होई लावूनियां त्यासी    मनना चित्तशोधक ३२९
कर्तव्य केव्हां कोणाला    हिंसा हिंसक-घातिनी
कर्तव्य केव्हां कोणाला    हिंसा आत्म-विघातिनी ३३०
नाहीं विवेक वा प्रेम    स्वहोमी सेवकांतलें
खलहोमी सेवकांत    गूढ हें नाटकांतलें ३३१
लीला सारी हरीची ही    लीला सार जिवीं जिवीं
विकासभेदें हो भिन्न    वस्तुस्थिति अशी भवीं ३३२
विनष्ट खलता जेथें    त्रिमार्गेही न होतसे
खलहोमावीण तेथें    दुजा मार्ग भवीं नसे ३३३
संसार-नाटकीं जीव-    पात्रीं नटन-पात्रता
भिन्न मूळांत योजी तो    ज्याची ही सर्व कर्तृता ३३४
तो एक नटला सर्व    नाट्यभू, नट, नर्तन;

कल्पना-खेळ हा त्याचा यासी नांव 'विवर्तनें'[१] ३३५
न सत्य विश्व वा जीव सत्य ब्रह्मचि एकलें
विविधा वर्तना त्याची तें 'विवर्तनें' बोलिलें ३३६
लीला मायिक ही ब्रह्मीं मायिकां सत्य सर्वथा
शक्तिभेद इथें पात्रीं; लीला शक्य न अन्यथा ३३७
थोरांत थोर सानांत सान पात्रीं समानता
सर्वंग ब्रह्मतत्त्वाची लीला शक्य न अन्यथा ३३८
थाटलें ब्रह्म सर्वत्र जीवा ब्रह्म परिस्थिति
ब्रह्मज प्रेरणा सर्व क्रमें त्यांहीं तदुन्नति ३३९
त्या प्रेरणांत हिंसा ही प्रेरणा विविध स्थलीं
योजी तें नाटकी ब्रह्म खळाया खलता खलीं ३४०
लावी कोणास तें ब्रह्म निंदाया खल-हिंसका
कोणा करी प्रेरणा तें आत्महोम तुम्ही शिका ३४१
कांहीं स्वातंत्र्य जीवातें प्रेरणातंत्रतेमधीं
विकास तेणें जोमानें दमानें वा कुठें कधीं ३४२
धारणा नाटकाची या ब्रह्माची नियमावली
करी, तियेच्या ज्ञानानें पात्र दुर्बल हो बली ३४३
लक्ष भौतिक विज्ञानीं ज्यांचें त्यां बल त्यापरी
लक्ष आंतर विज्ञानीं ज्यांचें त्यां बल त्यापरी ३४४
राष्ट्र दुर्गति थांबाया व्हाया राष्ट्र-समुन्नति
अवश्य दोन्ही विज्ञानें असो ही सर्वदा स्मृति ३४५
ताप द्या ताप घ्या येथें सुख द्या सुख घ्या तसें
उद्धार उद्धारें साधा कर्मसिद्धान्त हा असे ३४६
सर्वथा पर-उद्धारीं चित्त ज्याचें रते सदा
साधी तो स्वात्म-उद्धार असा कीं कर्म-कायदा ३४७
दासराष्ट्र-समुद्धार कराया वरि आपदा
साधी तो आत्म-उद्धार असा कीं कर्म-कायदा ३४८

---

१. विवर्तवाद, परिणामवाद, आरंभवाद या जगदुत्पत्तिविषयक तीन उपपत्ति आहेत.

देई साह्य तया साह्य मिळे हा कर्मकायदा
जाऊं रूसा तरी देशा तेणें होईल फायदा ३४९
दीन कष्ट करी विश्वीं तदुद्धारक योजना
दीन-कष्टकरी-सत्ता वर्ग-वैषम्य-भंजना ३५०
नीति ही रूस-नेत्यांची समता-समुपासक
रूसीं स्थित्यंतर करी दीन-शक्ति-विकासक ३५१
कार्य सर्व नव्या रूसीं तेथींचे नव शासक
योजनापूर्व करिती विवेक-समुपासक ३५२
किती घाण जुनी त्यांहीं काढिली कष्टदायक
किती प्राण नवा रूसीं वाढला तुष्टिदायक ३५३
कसें नवा रूस-शास्ता जन-कार्य करीतसे
तें समीक्षा-द्वादशी हा नव-ग्रंथ कथीतसे ३५४
सहस्र भारतीयांहीं जावें रूसीं रहावया
पहावया सुखें त्याचीं त्याचीं दुःखें सहावया ३५५
या यात्रिक-सहस्रांत स्वहोमक्षमता असो
क्षमता स्वलहोमाची असो कोणांत वा नसो ३५६
समीक्षा-द्वादशी ग्रंथ वाचितां लक्ष लावुनी
कल्पना ही मनीं वागे वागवी कल्पकाग्रणी ३५७
नारायणें सुचविली कल्पना ती जना मम
कथिली मीं; मला कीं ती गमली हृदयंगम ३५८
माझें व्यसन मुख्यत्वें हरीच्या हृदयंगम
कल्पना व्यवहारांत आणण्या करणें श्रम ३५९
मला एक दिसे दोष रूसी विज्ञ-वितर्कनीं
म्हणती ते नसे देव देव-धर्म नको जनीं ३६०
नीच-धर्मगुरू-नाच या मता मूल जाहला
कांहीं भौतिक शास्त्रांचा अविवेकहि भोंवला ३६१
लोकायत तसे सांख्य येथें होते निरीश्वर
सर्व कालीं विज्ञ कांहीं रुसती ईश्वरावर ३६२
रमे तो एक सर्वत्र 'मी असें' 'मी नसें' म्हणे

आस्तिकीं तो नास्तिकीं तो जाणणें तोचि नेणणें ३६३
नाटक्या तो; तया मौज नास्तिकी-नाट्य-गोंधळीं
नाट्य तें एकदां तेणें माझ्याही बांधिले गळीं ३६४
लपला तो लपंडावी; विनादेव भवीं मला
भ्रमवीलें तया देवें कांहीं काल निरर्गला ३६५
लागला तो पुढें पाठी सोडी ना मज एकला
गेला तसा स्वयें आला झाड्ढ माझे करीं दिला ३६६
लपला तरि त्या देवें राष्ट्र-मानव्य-पूजनीं
लावूनि रक्षिलें मातें नाना संकटिं या जनीं ३६७
नारायणा त्या नाहींसा करणार कसा कुणी
नास्ति अस्ति अस्ति-नास्ति वृत्ती या तद्विवर्तनीं ३६८
नसो नास्तिक्य रूसीय दीनोद्धारक शासकीं
कांक्षा ही मजला तीव्र; संशयी स्नेह खास कीं ३६९
कसाई बसले भोंतीं ईसाई नामधारक
"धोका रूसीय नास्तिक्य" हांका देतील मारक ३७०
करितील कसाई ते रूसीं ही भेद-योजना
"धोका नास्तिक्य शास्त्र्यांचें" पढवूनी असें जनां ३७१
नारायणासी प्रार्थी मी सांभाळीं रूस नूतन
प्रकटे तूं साम्य-भक्तीं आंवरीं 'नास्ति' नर्तन ३७२
'नास्ति'चें 'अस्ति' व्हावेंच शीघ्र रूसीय सज्जनीं
आकांक्षा तीव्र ही माझी मांडी तांडव मन्मनीं ३७३
नवीन शास्त्रें जितुकें नवीन ज्ञान सांगती
तितुकी देव-धर्माच्या शास्त्रीं व्हावी नवी गति ३७४
तत्त्वांचें तत्त्व अज्ञेय तें ज्ञाना मूल एकटें
शास्त्रें शोधूनि कथिती कैसें तें एकटें नटे ३७५
टाका जुने धर्म सारे जुन्या ज्ञानें दिले जना
नव्या ज्ञाना मंथुनीयां नवी काढा उपासना ३७६
नाहींच देव म्हणणें मी म्हणें अविवेकज
"जीव-मूल जगन्मूल नाहीं" हें नुमजे मज ३७७

जीव-मूल चिदाकार अचिदाकार दूसरें
मूळ या दोन मूळांचें देव-तत्त्व खरें खरें ३७८
रयि-प्राण अशी जोडी प्रश्नोपनिषदीं असे
जगत्-जीव-मुळें तीं; तीं प्रजापति सृजीतसे ३७९
सांख्यांची मूलप्रकृति रयि ती; प्राण ईश्वर
प्रकृतीश द्वया मूळ ब्रह्म तें परमाक्षर ३८०
राहे तें ब्रह्म साक्षित्वें त्याचें कर्तृत्व ईश्वरीं
क्रिया-साहित्य प्रकृति ईश-कर्तृत्व तीवरी ३८१
रमे ब्रह्म तमाशांत जीवेशाच्या जगद्गत
आंवरी पसरी त्यातें जैसें जेव्हां मनोगत ३८२
तमाशा चालतो सारा कायद्यानें; जडा जिवा
विकास आहे नियमें जीव ईशांश आघवा ३८३
विज्ञान भौतिक नवें नीट अभ्यासिलें तरी
मन्मना हीं जुनीं तत्त्वें दिसती नीट अंतरीं ३८४
रमे ईशांश जगतीं यथामति यथास्थिति
तन्मतिप्रगतीसाठीं तत्स्थितीस हवी गति ३८५
तद्बीज ज्ञानसामर्थ्य प्रेमसामर्थ्य शोभन
भोक्तृता-कर्तृता-द्वारें पावें तें बीजवर्धन ३८६
नवीन भूत-विज्ञान नीट अभ्यासिलें तरी
मन्मना हीं जुनीं तत्त्वें दिसती नीट अंतरीं ३८७
रूसीं श्रीअरविंदांनीं अथवा कृष्णमूर्तिनीं
विज्ञमान्य नवा धर्म सांगावा वाटतें मनीं ३८८
न मानो विज्ञ रूसीय येशू वा येशुचा पिता
मानो परी विज्ञ-अज्ञ- मूल-सत्ता स्वयंस्थिता ३८९
ती सत्ता ज्ञानयम्या न ज्ञानयम्या तिची कृति
निसर्ग सारा तत्सर्ग मानो रूसीय ही मति ३९०
तिचे प्रेम-प्रकाशांश जीव-प्रवर मानव
विकास-भेदें भजती देव धर्म जुना नव ३९१
वंद्यांत वंद्य जगतीं देव-धर्म 'समानता'

देवाच्या देव धर्मांच्या    माना रूसीय या मता    ३९२
तत्त्वज्ञ भारती थोर    योगी विश्वहितोत्सुक
रूसीय साम्य-धर्माचें    करितीलाचि कौतुक    ३९३
कां न त्यांनीं नव्या रूसा    नास्तिक्य-मत-मज्जिता
आस्तिकत्वांत आणूनी    आचरावें जगद्धिता    ३९४
तंटा हा हरिशीं माझा    प्रेमाचा; प्रेमला तया
ठाऊकें कां न ते थोर    प्रेम दाविति रूसियां    ३९५
या स्थूल भविं ते स्थूल    शब्दांहीं साम्यसेवकां
रूसीयां धर्म देवाचा    शिकवोत नवा निका    ३९६
कार्य हें इष्ट मजला    परि त्यां इष्ट ना दिसे
तरी ते सूक्ष्म-भविं त्यां    शिकवोत 'हरी असे'    ३९७
सूक्ष्म प्राणादि भविं जे    संचार करिती तयां
योगियां विनती माझी    स्मरवा हरि रूसियां    ३९८
यत्नवाद असे थोर    यत्नवादीच रूसिय
परी यत्ना हरि-श्रद्धा    हरि-भक्ति असो प्रिय    ३९९
यत्न सारा सर्व शक्ति    खर्चुनीयां यथामति
करितांना, करूनीयां    ध्यावा नित्य जगत्पति    ४००
तयाच्या कायद्यामध्यें    मानसी–सृष्टि–कायदा
असे कीं तत्पदध्यानीं    मानवा शांति–संपदा    ४०१
दोन ही तत्पदध्यानीं    अयत्नी भार त्यावरी
श्रद्धेनें टाकुनी सारा    मिळवी शांति अंतरीं    ४०२
रूक्ष ही तामसी शांति;    सुरसा शांति सात्त्विकी
शोभते हरिच्या भक्तीं    साम्य-धर्म-प्रसारकीं    ४०३
कां न माझें प्रिय धन    मिळावें प्रिय रूसिया
साम्य-धर्म-प्रसारार्थ    करि जो शासन-क्रिया    ४०४
यापरी प्रेम खवळे    विवेकें प्रबळे अति
वाटे जावें हरि-श्रद्धा    जागवाया यथामति    ४०५
तो हरी जाणतो सारें    जो माझा प्राण सर्वथा
सांगतो मी जयापाशीं    प्रेमाची सर्वही कथा    ४०६

थोर रूसी प्रयोगाचें थोर प्रेम मनीं मम
सचिंत करितें मातें पाहतां नास्तिक-क्रम ४०७
महाप्रयत्न करित्यां महाशांति मिळो तयां
यासाठीं वाटतें जावें रूसीयां 'हरि द्यावया' ४०८
येता जन्म तरी रूसीं घ्यावा त्या द्यावया हरि
उठे वृत्ति अशी माझ्या अंतरीं प्रेमनिर्भरीं ४०९
राहील टिकुनी रूसीं जरी साम्य-प्रशासन
तरी विश्वांत वाढेल जोमानें प्रेम-शासन ४१०
नारायणासी म्हणुनी याचितों मी पुनः पुन्हा
सांभाळी नव रूसाच्या नव्या साम्य-प्रशासना ४११
नारायणा कळे सर्व आकळे सत्य हें मला
परी त्याच्या नाटकाचा कायदाहि कळे मला ४१२
लीला त्याची कायद्यानें सुबद्धा सर्वतोपरी
बाह्यांत कायदा चाले, चाले तो तैंवि अंतरिं ४१३
राज्य त्याचें एकतंत्री दिसे, परि तसें नसे
लोकतंत्री सर्वथा तें लोक कीं तोचि होतसे ४१४
सप्रेम आळवीलें त्या जातसे न वृथा कधीं
फेरफार यथाशक्य करी तो नाटकामधीं ४१५
धाता पाता समाहर्ता नाटकाचा पुनः पुन्हा
नाटकीं नट सारे तो दुज्या नटवितो कुणा ? ४१६
नाहींच कोणी त्यावीण एक तो एकटा वसे
एकटा नट सारे तो वस्तुस्थिति अशी असे ४१७
स्वीय आणि स्वकीयांचें श्रेय कोणीहि जाणता
साधितो; साधि तो तैसा नट-श्रेय स्वभावतां ४१८
तत्त्व हें धरुनी ध्यानीं आम्ही नट-नटी-गणें
स्वांतरीं सत्य साधुत्व शोधूनि जनिं वागणें ४१९
नको मग मुळीं चिंता श्रेयाची निज वा पर
शक्तीबाहेर भक्तीतें न मागे तो नटेश्वर ४२०
राखूनि सुविवेकानें, प्रेमानें योग्य मागणी

करावी त्यासि; देईल ती तो योग्य जरी गणी ४२१
नाहीं आम्हांसि दिसत सारें जें ईश्वरा दिसे
म्हणूनि योग्य आम्हां जें तें सदा योग्य त्या नसे ४२२
साधी तो सकल-श्रेय यथाकाल अशी मनीं
श्रद्धा दृढ असों द्यावी शक्य तें करुनी जनीं ४२३
न शांति नित्य निश्चित जो नटी-नट-जीवनीं
यापरी सत्य-साधुत्व- श्रद्धा-पूर्ण नसे जनीं ४२४
नटी-नट नवे रूसीं अश्रद्ध असती असें
वाचुनी माझिया चित्ता चिंतेचें लागलें पिसें ४२५
सदा मी म्हणुनी देवा सांगतों जें दिसे बरें
"करी सश्रद्ध रूसीयां करीं सश्रद्ध त्या त्वरें" ४२६
रिघे शांति त्वरें चित्तीं बरें देवासि सांगतां
शांतिमूल मनो-वाचा- काय-कर्तव्य-सांगता ४२७
तें बरें सांगतों मी जें देवासि न दिसो बरें
माझें बरें खरें मातें त्याचें त्याला जसें खरें ४२८
राज्य त्याचें लोकतंत्र सांगणें हक्क आपुला
हक्क आणीक कर्तव्य लौकिकीं ज्या नसे तुला ४२९
लोक सांगो न सांगो वा मज त्या सांगणें पडे
कीं न सांगे तरी माझें गाडें बिघडुनी अडे ४३०
डोळा त्याचा मीहि एक डोकें हृदय एक मी
माझ्या असहकारानें त्याची जाणीव हो कमी ४३१
महापाठ महर्षींचा जाहला मज आत्मसात्
"सहस्रशीर्षा पुरुष सहस्त्राक्षः सहस्त्रपात् ४३२
त्या अगण्य सहस्रांत एक शीर्षाक्षिपादक
करी न जरि कर्तव्य तरी तें विश्वबाधक ४३३
कला कुशल यंत्राचा खिळा खिळखिळा जरी
एक झाला तरी त्याची बिघडे बहु कूसरी ४३४
राहवें न मला स्वस्थ विश्वयंत्रीं म्हणूनियां
खिळा खिळखिळा कोठें दिसतां मी वदें तया ४३५

या देहचक्रीं माझ्याही नसे सर्व बरें पुरे
वदें मी इंहि त्या देवा वदणेंच मला बरें ४३६
रोगीं भोगीं रोषिं तोषीं रमतां श्रमतां जनीं
मी करीं वाद संवाद हरीशीं आपुल्या मनीं ४३७
नातीं तयाशीं बहुत शिष्य मी तो गुरु मम
अगण्य गुरु माझे जे त्यांत तोचि गुरूत्तम ४३८
माझा रक्षक तो नित्य वाटाड्या सर्व-जाणता
संशयातीत मजला एक त्याची प्रमाणता ४३९
त्यानें कृष्णावतारांत गाइलें गीत जें शुभ
तें सर्व धर्मगीतांत मजला अतुल-प्रभ ४४०
"भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम्
सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति ४४१
तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर
असक्तो ह्याचरन् कर्म परमाप्नोति पूरुषः" ४४२
शांति जीवासि व्हावी ती मिळे तो मार्ग पावन
या श्लोकद्वयिं संक्षेपें सांगतो भव्यभावन ४४३
नाटकीं या नटनटी श्रद्धा ठेवोत कीं हरी
श्रेय-साधक सर्वांचा सुहृत्-श्रेष्ठ भवान्तरीं ४४४
राबणें निजकर्तव्यीं स्वांतरीं पुसुनी तया
तपाचीं या फळें सर्व अर्पुनी त्या दयामया ४४५
या अनासक्त कर्माची श्रद्धेची शांतिदायक
जोड रूसी साम्य-भक्तां देवो तो शांतिनायक ४४६
कर्तृत्व त्याचें गंभीर अति आश्चर्यकारक
रूसीं विलसतें आज तप्ततापनिवारक ४४७
कापवूनी तापकांसी त्राण तप्तां दिलें तिथें
मर्दें धनाच्या भरले तेणें करविले रिते ४४८
तप्त तो तापकहि तो तापकां कापिताहि तो
एकटा नट सारे तो साहवी दुःख साहि तो ४४९
त्या श्रेय सर्वांचें इष्ट इष्ट तें तो क्रमें श्रमें

साधितो सुखदुःखांच्या नानाविध पराक्रमें ४५०
महानाटक हें विश्व येथें तेणें नटान्तरीं
"मी, माझें, देव, देवाचें" अशी केली बहू परी ४५१
रमतां भ्रमतां कायें वाचेनें मानसें नट
विचार भाषा कर्मे तो करी चोखट चोखट ४५२
टाकाऊ वोखटा वाटे अंतरीं मी-विचार तो
टिकाऊ चोखटा वाटे देव-दत्त विचार तो ४५३
तद्युक्त भाषा वा कर्म स्वधर्म श्रेय-साधक
तद्विरोधक वाक्, कर्म अधर्म श्रेय-बाधक ४५४
करी सत्यग्रहण जो प्रेमाचें दान जो करी
विचार तो देव-दत्त तो भूत-हृदयीं हरी ४५५
राजसी स्वार्थपरता तामसी अविचारिता
'मी'चा प्रपंच तो देहीं न तेथें श्रेय; तो रिता ४५६
तो प्रेय-कांक्षी संसार अवश्य परि या भवीं
प्रेय कीं चाखिल्यावीण श्रेयाची न कळे चवी ४५७
विचार राजसी 'देव' तया जो तामसी नर
जसा सात्त्विक तो 'देव' तया तो राजसी नर ४५८
रजा सत्त्व जसा 'देव' निस्त्रैगुण्य तसा वरी
'देव' सत्त्वा; असा खेळ देव प्रकृतिचा करी ४५९
राबता देव तो देव प्रकृतीचा, तदीश्वर;
पाहता देव तो ब्रह्म अद्वैत परमाक्षर ४६०
रमे माझें मन बहू देवाचा ठाव काढितां
रमे माझें मन बहू सकलां देव वाढितां ४६१
तो गोड मजला गोड आंत गोड; वदूं किती
तो तुम्हां सकलां लाभो तोचि कीं परमागति ४६२

# मुळशी संग्राम चालू असतां येरवडा तुरुंगांतून पाठविलेले सेनापति बापट यांचे निरोप

## निरोप पहिला

(सत्याग्रही व सत्याग्रहमंडळांचे अधिकारी यांस)

श्रद्धामधिष्ठाय विमृश्य शास्त्रं सत्याग्रहस्य क्रियतां स्वकार्यम् ॥

गीताधर्म व सत्याग्रह—सत्याग्रहतिथि आणि तिथिवीर—स्वावलंबन-शालेस निमंत्रण—शाखामंडलस्थापना.

स्वस्ति प्रणम्य प्रणिधाय कायं अभ्यर्थये हन्त सहस्रकृत्वः ।
श्रद्धामधिष्ठाय विमृश्य शास्त्रं सत्याग्रहस्य क्रियतां स्वकार्यम् ॥१॥
विमृश्य शास्त्रं श्रद्धां च पुरस्कृत्य मुमुक्षुभिः ।
सात्त्विकं कर्म कर्तव्यमिति गीता प्रगायति ॥२॥
शास्त्रेषु गीताशास्त्रं वै कार्याकार्यव्यवस्थितौ ।
प्रमाणमाग्रिमं तत्र सर्वधर्मविचारणा ॥३॥
सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥४॥
इदं मुमुक्षूनुद्दिश्य गीताधर्मस्य गर्जितम् ।
श्रुत्वा सम्यगधीतोऽयं मया धर्मो मुमुक्षुणा ॥५॥
गीताशास्त्रस्य धर्मेऽत्र सर्वभूतहिते रतिः ।
रहस्यं प्रथमं दृष्टं द्वितीयं लोकसंग्रहः ॥६॥
रहस्यभूतमेतद्वै गीताशास्त्रविधिद्वयम् ।
प्रमाणमाग्रिमं कृत्वा वर्तितव्यं मुमुक्षुभिः ॥७॥
यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।
न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥८॥
कामोपभोगपरमा आसुरं भावमाश्रिताः ।
प्रभवन्त्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः ॥९॥

परित्राणं च साधूनां विनाशश्चोग्रकर्मणाम् ।
धर्मसंस्थापनं चेति कर्म वै भगवत्प्रियम् ॥१०॥
मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तःसंगवर्जितः ।
निर्वैरः सर्वभूतेषु यःस मामेति पांडव ॥११॥
इत्यत्र भगवत्कर्मत्रितयं क्रियतामिति ।
गीताशास्त्रविधिः स्पष्टो मुमुक्षूणां विमुक्तये ॥१२॥
यदत्र लोके विख्यातमत्र सत्याग्रहव्रतम् ।
तस्यापि परमोद्दिष्टं भगवत्कर्मणां त्रयम् ॥१३॥
विमृश्य शास्त्रं श्रद्धां च पुरस्कृत्य मुमुक्षुभिः ।
सत्याग्रहे वर्तितव्यं भवद्भिः कार्यकारिभिः ॥१४॥
उत्पत्स्यतेऽस्ति लोके वै शास्त्रं सत्याग्रहं प्रति ।
तद्विद्यमानं विज्ञाय कार्यं कर्म समाचरेत् ॥१५॥
श्रद्धया परया कार्यं कृतं सत्याग्रहस्य यत् ।
तदेव धर्मसंमूढान्धर्मे स्थापयितुं क्षमम् ॥१६॥
अथात्र याच्यते किंचित् सुविमृश्य पुनः पुनः ।
तत्रावधानं दातव्यं भवद्भिः कार्यकारिभिः ॥१७॥
नवमासमितं वर्षं सत्याग्रहरणस्य वै ।
मेमासान्तं प्रपूर्येत रणकृत्यैःसुसंहतैः ॥१८॥
सत्याग्रहस्य तिथयः चतस्रः प्रतिमासि वै ।
प्रथमाष्टमी पंचदशी द्वाविंशीति विबुध्यताम् ॥१९॥
प्रतिसत्याग्रहतिथौ कार्यःसत्याग्रहः खलु ।
दृष्टकारागृहैर्वीरैर्द्वित्रैः पूर्वविघोषितैः ॥२०॥
प्रतिसत्याग्रहतिथौ घोषणामनुवर्त्यताम् ।
अगणय्य नवीनानामभावमागमं तथा ॥२१॥
तिथीनां तिथिवीराणां कारानुभवशालिनाम् ।
या पूर्वघोषणा यच्च घोषणामनुवर्तनम् ॥२२॥
तज्जनं धर्मसंमूढं श्रद्धाहीनं सुदुर्बलम् ।
उद्धरेदंशतः श्रद्धामुद्दीप्येति मतिर्मम ॥२३॥
इत्येकं याचितम् अत्र द्वितीयमपि कथ्यते ।

सप्रश्रयं साग्रहं च कार्यमाहात्म्यहेतुना ॥२४॥
पञ्चदश्यामेव तिथौ अस्मिन्मासे दिसम्बरे ।
कार्यः सत्याग्रहस्तूर्णं स्वावलंबनशालया ॥२५॥
अश्रद्धानं स्वजनं मोहपंकात्सुदुस्तरात् ।
उद्धर्तुं सुमहान्यत्नः कार्यः श्रद्धाधनैरिह ॥२६॥
शिष्यैश्च सकलैस्तेषां शिक्षकैश्च समुत्सुकैः ।
पञ्चदश्यामेवतिथौ कार्यं सत्याग्रहे पदम् ॥२७॥
तृतीयं याचितं शाखामंडलस्थापनक्रियां ।
मासि फेब्रुवरौ पूर्णां कर्तुं यत्नो विधीयताम् ॥२८॥
मयात्र विषये दीर्घं सुदीर्घं सुविचारितम् ।
इत्येव कथयन् याचे याचितं सुविमृश्यताम् ॥२९॥
सुविमृश्य विधातव्या सत्यसेवा यथारुचि ।
सा भूयात्सर्वलोकस्य सुखाय च शिवाय च ॥३०॥
ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

[ सर्वांचें कल्याण चिंतून व अनंत वेळां साष्टांग प्रणिपात करून माझी सर्वांस अशी प्रार्थना आहे कीं, आपण शास्त्रचिंतन करून श्रद्धायुक्त अंतःकरणानें आपल्या सत्याग्रहरूपी कर्तव्यकर्मांचें आचरण करा. कारण शास्त्राचें चिंतन करून श्रद्धायुक्त अंतःकरणानें प्रत्येक मुमुक्षु माणसानें सात्त्विक कर्म करावें असे गीता आग्रहपूर्वक सांगते. चांगल्या व वाईट कर्मासंबंधीं निर्णय देणाऱ्या सर्व शास्त्रांत गीता ही प्रामुख्यानें प्रमाणभूत शास्त्र आहे. त्यांत सर्व धर्मांचा विचार केला आहे. "सर्व धर्म बाजूला सारून मला शरण ये, मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन, शोक करूं नकोस", असें गीताधर्म सर्व मुमुक्षूंस गर्जना करून सांगत आहे, आणि मुमुक्षु असा जो मी त्यानें गीताधर्माची ही गर्जना श्रवण करून त्याचें उत्तम तऱ्हेनें अध्ययन केलें आहे.

गीताशास्त्रामध्यें सर्व भूतांच्या कल्याणाचा विचार प्रथम आहे हें गीतेचें पहिलें रहस्य असून दुसरें रहस्य लोकसंग्रह हें आहे. हीं दोन गीताधर्माचीं प्रमुख रहस्यें होत व हींच प्रमाण मानून सर्व मुमुक्षु लोकांनीं आपलें वर्तन

ठेविलें पाहिजे. जो शास्त्राला सोडून वर्तन करतो व स्वार्थबुद्धीनें कार्याला प्रवृत्त होतो त्याचा इष्ट हेतु साध्य होत नाहीं. त्याला मोक्ष तर नाहींच पण सुखसुद्धां मिळत नाहीं. जे सुखाच्या इच्छेनें व स्वार्थानें आसुरी इच्छेला बळी पडतात ते दुरात्मे जगाच्या अहिताला व स्वतःच्या नाशाला कारणीभूत होतात. साधूंचें रक्षण व आततायी पुरुषांचा नाश करून धर्माची संस्थापना करणें हेंच कर्म भगवंताला प्रिय आहे. 'जो माझा भक्त माझें (आवडतें असें) कर्म आशा सोडून व सर्व भूतांचे ठायीं निर्वैर भाव ठेवून एकनिष्ठेनें करतो तो मला येऊन मिळतो' असें भगवंतांचें वचन आहे. याप्रमाणें भगवंताला प्रिय असलेलें व वर वर्णिलेलें जें तीन प्रकारचें कार्य त्याचें प्रत्येक मुमुक्षूनें मुक्तीसाठीं आचरण करावें असा गीतेचा स्पष्ट आदेश आहे.

हल्लीं जगांत विख्यात झालेलें जें सत्याग्रहव्रत त्याचें परम उद्दिष्ट भगवत्प्रणीत जें कर्मत्रय तेंच होय. म्हणून कार्यकारी असे जे आपण मुमुक्षु त्यांनीं शास्त्राचें चिंतन करून व श्रद्धेची नेहमीं कांस धरून या सत्याग्रहाचें आचरण करावें. सत्याग्रहासंबंधींचें शास्त्र कांहीं निर्माण व्हावयाचें आहे व कांहीं आजला प्रचलित आहे. तरी आज जें जगतांत विद्यमान आहे, त्याचें पूर्ण ज्ञान करून घेऊन कर्तव्य कार्य करावें, परमश्रद्धेनें सत्याग्रहव्रताचें आचरण केलें असतां तें धर्मापासून च्युत झालेल्या लोकांस धर्ममार्गावर आणण्यास समर्थ होतें. असो. आतां आपणापाशीं मी फार फार विचार करून कांहीं याचना करीत आहें तिजकडे आपण कार्यकर्त्या माणसांनीं नीट लक्ष द्यावें.

आपणापाशीं माझी पहिली याचना अशी आहे कीं सत्याग्रहाच्या मोहिमेचें वर्ष नऊ महिन्यांचें असून तें भे १९३३ च्या अखेरीस संपतें, तरी हें वर्ष सुसंघटित अशा रणकृत्यांनीं भरलें जावें. प्रत्येक महिन्यांत सत्याग्रह करण्याच्या पाहिली, आठवी, पंधरावी व बाविसावी अशा चार तारखा असाव्यात व त्या सर्वत्र जाहीर करण्यांत याव्यात. प्रत्येक तिथीला न चुकतां सत्याग्रह करण्यांत यावा. तो एकदां तुरुंगांत जाऊन आलेल्या व पूर्वींच नांवें प्रसिद्ध झालेल्या दोन तीन सत्याग्रहवीरांनीं करावा.

नवीन लोक येवोत वा न येवोत, तिकडे न पाहतां प्रत्येक सत्याग्रहतिथीला पूर्वघोषणेनुसार सत्याग्रह व्हावा. सत्याग्रहतिथि व तुरुंगानुभवी तिथिवीरांचीं नांवें आगाऊ जाहीर करून त्याप्रमाणें वागल्यानें धर्मासंबंधानें

संशयांत पडलेल्या श्रद्धाहीन व कमकुवत मनाच्या लोकांची श्रद्धाबुद्धि अंशतः तरी जागृत होऊन त्यांचा उद्धार होईल अशी माझी समजूत आहे.

हें माझें एक मागणें झालें; माझें दुसरें सविनय व आग्रहपूर्वक मागणें हें आहे कीं, लवकर ह्याच डिसेंबर महिन्याच्या १५ व्या तारखेस स्वावलंबन शाळेनें सत्याग्रह करावा. श्रद्धाहीन अशा स्वजनांचा मोहपंकांतून उद्धार करण्यासाठीं श्रद्धायुक्त लोकांनीं मोठा प्रयत्न केला पाहिजे. सर्व उत्सुक विद्यार्थी व शिक्षक यांनीं एकदम १५ तारखेस सत्याग्रहांत आपलें पाऊल टाकावें.

माझी तिसरी याचना अशी आहे कीं, सत्याग्रहाच्या शाखा स्थापण्याचें कार्य फेब्रुवारी महिन्यांत पूर्णतेस नेण्याचा प्रयत्न करण्यांत यावा.

शेवटीं, मीं या विषयासंबंधानें फार दीर्घ काळपर्यंत बारकाईनें विचार केला आहे इतकेंच कळवून असें मागत आहें कीं, माझ्या याचनांचा नीट विचार करा. नीट विचार करून यथारुचि सत्यसेवा कराल ती सर्वांच्या कल्याणाला व सुखाला कारण होईल.

## निरोप दुसरा

### (विद्यार्थ्यांस)

चला श्रीहरी हा कसोटी पहात

चला या चला श्रीहरी हांक देई । चला मूळशी-क्षेत्र युद्धांत भाई
चला या चला आज कारागृहांत । चला श्रीहरी हा कसोटी पहात १
उडी घेउनी सामसत्याग्रहांत । चला या चला आज कारागृहांत
श्रमाचे सजेचे इथें भोग भोगा । पुरे सज्ज होऊनियां कर्मयोगा २
श्रमाचे कुणी कर्मयोगी चहाते । सजेचे कुणी कर्मयोगी चहाते
कुणी भोगिती भोग दोहींपरींचे । सुखी सर्वही कर्मयोगा हरीचे ३
चला व्हा चला मूळशीकर्मयोगी । चला व्हा चला बंधनानंद भोगी
चला बंधनीं तीन व्हावे हजार । नसे मागणी ही मराठ्यांसि फार ४
तुम्ही ते मराठे, तुम्ही ते मराठे । जिहीं चारिले कैक शत्रूंसि कांटे
उठा हो उठा तोडुनी मोहपाश । पहा शत्रुनीं मांडिलासे विनाश ५
चला आज या सामसत्याग्रहांत । चला या चला आज कारागृहांत

कै. म. म. द. वा. पोतदार
ग्रंथ संग्रह

चला बंधनीं तीन या हो हजार । जसा आपुला जाहलासे विचार ६
चला सोडुनी सर्वही पाठशाला । चला शत्रुची बुद्धि लावूं कसाला
उणी सिद्ध होतां पुढें श्रीहरीचा । जुना मार्ग अद्वैत सत्याग्रहाचा ७
पुढें रक्त माझें रणीं या पडेल । पुढें युद्ध शुद्ध स्वरूपें घडेल
पुढें तें पुढें; आज सत्याग्रहांत । चला श्रीहरी हा कसोटी पहात ८
रुचो गुरुजनां गृहीं, गुरुंसि पाठाशालागृहीं
रुचो मुळिं न वा रुचो; अचल व्हाच सत्याग्रही
स्मरा ध्रुव-कथा, हरी अचल सत्यमार्गी जनां
वनींहि जवळी करी पुरवुनी मनःकामना ९

## निरोप तिसरा

### (थोर लोकांस)

तुम्ही शिव-नृपप्रतापभजनीं असा अग्रणी ।
प्रताप समयोचित प्रकटवा चला या रणीं ॥
तुम्हांसि हरिनें महत्पद दिलें स्वराग्र्यान्तरीं
तुम्हांसि विनवीतसें, विनविण्यासि सांगे हरी
तुम्ही शिव-नृप-प्रतापभजनीं असा अग्रणी
प्रताप समयोचित प्रकटवा चला या रणीं ॥ १
हठें मुळशिच्या रणीं उतरला स्वतांच्या बळें
धुरीणजनिं वारिला तरिहि जो मुळीं ना वळे
प्रतापि शिवभक्त तो स्वजन दुर्मदें मातला
गणूनि कुणि चिंतिती अयश मूळशीच्या दला ॥ २
कथा कथियली सुदुःखद अशी स्वयंसेवकीं
महत्पदधरां तुम्हां विनवितों म्हणूनीच कीं,
स्वयेंच उतरा तुम्ही त्वरित मूळशीच्या रणीं
तुम्ही शिव नृप-प्रताप-भजनीं असा अग्रणी ॥ ३
स्वराज्यसमरीं शिवप्रभुसि साह्य जे जाहले
असोत कुणि आज ते दुधखुळे बुळे मावळे
कृतज्ञ जनि पूर्विंची स्मरुनि मावळ्यांची कृति

रणीं उतरणें बरें, कथित हेंचि माझी मति ॥ ४
थोरांपुढें लहानांचें बरें न बहु भाषण
म्हणूनि थांबतों येथें पदीं मस्तक ठेवुन ॥ ५

## निरोप चवथा
### (सर्व महाराष्ट्रीयांस)

हरी हा उभा मूळशी-क्षेत्रि आज । करायासि कांहीं नवें धर्मकाज
झुरे धर्म; सत्ता अधर्मासि आली । नुरे सज्जनां दुर्बलां कोणि वाली
अधर्में जनीं मांडिलें घोर कर्म । हरीला नको जाहला हा अधर्म १
हरी हा स्वयें होतसे मत्स्य, कूर्म । विनाशावया घोरकर्मी अधर्म
कधीं हा नरां वानरां सानथोरां । करूनी पुढें आवरी भूमिभारा २
सवें वानरां घेइ रामावतारीं । सवें गोप जो घेइ कृष्णावतारीं
जयें प्रेरिलें मावळ्यांला, शिवाला । स्वयें हांक दे श्रीहरी तो तुम्हांला ३
हरी हा तुम्हांला स्वयें हांक देई । मनीं कान द्या आयका सर्व भाई
हरी हा उभा मूळशीक्षेत्रि आज । करायासि कांहीं नवें धर्मकाज ४
धनानें कुणी वैश्य उन्मत्त झाला । स्वयें साह्य दे राज्यकर्ता तयाला
इहीं या जनीं मांडिलें घोर कर्म । हरीला नको जाहला हा अधर्म ५
असे वैश्यधर्म असे राजधर्म । असे आजही बुद्धिमंतासि धर्म
विचारा विचारी नव्या पंडिताला । अधर्मी नका बूडवूं हो स्वतांला ६
विचारा नव्या पंडिता गौरकाया । विचारा नव्या पंडिता गौरबाह्या
विचारा कुणाही खऱ्या पंडिताला । अधर्मी नका बूडवूं हो स्वतांला ७
धनें वैश्य, भूपाल सत्तामदानें । जसे जाहले अंध पूर्वी शहाणे
तसे आजही शाहणे अंध झाले । भल्यां दुर्बलांसी छळाया निघाले ८
भल्यां दुर्बलां संकटीं हात द्यावा । बली दुर्जनांचा परामर्श घ्यावा
नरां वानरां ठेवुनी चाकरीला । असे सत्य हें वेड माझ्या हरीला ९
चला या चला श्रीहरी हांक देई । चला मूळशी-क्षेत्र-युद्धांत भाई
चला आज या सामसत्याग्रहांत । चला या चला आज कारागृहांत १०
चला सर्वही सोडुनी कार्यशाला । चला शत्रुची बुद्धि लावूं कसाला
उणी सिद्ध होतां पुढें श्रीहरीचा । जुना मार्ग अद्वैत सत्याग्रहाचा ११

पुढें तें पुढें आज सत्याग्रहांत । चला या चला आज कारागृहांत
करा चाकरी कांहिं माझ्या हरीची । हरी शाश्वती शांति दे अंतरींची १२
तुम्हीं चाकरी चालवीली स्वतांची । तुम्हीं चाकरी चालवीली गृहाची
बरी ती, परी शांति अभ्यंतरींची । खरी एक दे चाकरी श्रीहरीची १३
हरी चाकरी घे भल्या सज्जनांची । न घे चाकरी तो खलां दुर्जनांची
अशा संशयीं जे दुराचारि ठेले । तयांसाठिं देखा हरी काय बोले १४
अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्
साधुरेव स मंतव्यः सम्यक् व्यवसितो हि सः ॥ १५
क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छांतिं निगच्छति
कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥ १६
दुराचारि ही चाकरी जो करील । तया शाश्वती शांति कालें वरील
प्रतिज्ञा खरी ही खरी श्रीहरीची । मला लाभली शांति अभ्यंतरींची १७
म्हणूनी तुम्हां सर्व लोकांसि याची । धरा चाकरी श्रीहरीची सदाची
करा सत्यसेवा, करा न्यायसेवा । हरी सेवकां देतसे शांतिठेवा १८
हरी हा उभा मूळशी-क्षेत्रिं आज । करायासि कांहीं नवें धर्मकाज
तुम्हां बोलवी आज सत्याग्रहांत । चला वा रहा वा सुखानें गृहांत १९
सुखानें रहा राहणारे गृहांत । सुखानें चला कोणि कारागृहांत
सुखानें घडो आजचें धर्मकाज । सुखानें चढो वैभवा हा समाज २०

## निरोप पांचवा
### (सर्व महाराष्ट्रीयांस)

कृतज्ञतेची ध्वजा उभारा या तुमच्या नगरीं ।
चला मूळशीक्षेत्रिं उडी घ्या सत्याग्रहसमरीं ॥
कृतज्ञतेची ध्वजा उभारा या तुमच्या नगरीं ।
चला मूळशीक्षेत्रिं उडी घ्या सत्याग्रह-समरीं ॥ धृ०॥
शिवरायाचे तुम्ही मराठे तुमचा शिवराय ।
प्रतापशाली आहे तुमचा निःसंशय काय ।
वीरपिंड हा तुम्हां लाभला धन्य तुम्ही धन्य !
या पिंडानें तुम्हीं जाहलां वीर वीरमान्य ।

मरहट्टे हे 'हट्टें मर' या ब्रीदा जपणारे ।
हटातटानें झुंज झुंजतां झुंज़ीं खपणारे ।
शक्तियुक्तिचे युक्तिशक्तिचे खेळ खेळणारे ।
हट्टें मरतिल, हट्टी परि हे कधीं न वळणारे !
चाल– हे असे जगीं गाजले । शत्रु माजले । जिहीं भाजले ।
ते तुम्ही वीर पिंडाचे ।
गाजला धनी खंडाचे ।
गाजला भक्त बंडाचे ।
थंड आजला कसे उठा घ्या शत्रूची हजिरी ॥
चला मूळशी० ॥१॥
थंड आजला कारण याचें मन तुमचें मळलें ।
कृतज्ञतेच्या पंथावरूनी पद तुमचें ढळलें ।
कृतज्ञताविलयानें झाला वीरपिंड थंड ।
वीरपिंडि या क्षुद्र मत्सरें माजविलें बंड ।
'थोर मी तुम्ही' करितां करितां घोर अहंकार ।
थोरांकरवीं पोरपणाचे करवी व्यवहार ।
पक्ष पक्ष हे दक्षपणानें अन्योन्यां छळती ।
चढती पाहुनि अन्योन्यांची क्षुद्रपणें जळती ।
चाल– वैरि हा क्षुद्र मत्सर । जाळिलें घर । जोडितों कर ।
आठवा शिवाजी राजा ।
आठवा तयाच्या काजा ।
या कृतघ्नतेतें लाजा ।
शिवबाचे मावळे तयांवरि होत असे जवरी ॥
चला मूळशी० ॥२॥

## निरोप सहावा

### (सत्याग्रही वीरांस)

हें आपलें 'सत्याग्रही शांतिसप्तक'. यांतील शांतवृत्ति आपलीशी करा.

मराठे अम्ही श्रीशिवाजी प्रभूचे । अम्ही पांग फेडूंच ह्या आर्यभूचे ॥

असे पंगु का आमुची राष्ट्र-माता । अम्ही जाणतों वर्म हें पूर्ण आतां ।।१
अम्ही जाणुनी वर्म सत्याग्रहांत । उडी घेतली पाहुनी धर्मघात ।।
अम्ही पांडवांसारिखी शिस्त पाळूं । मनींच्या मनीं आमुचा क्रोध जाळूं ।।२
तिंहीं पांडवीं हाल वर्षांनुवर्षं । कसे काढिले जाळुनीयां अमर्ष ।।
तसे हाल काढूं अम्ही तीन साल । कसाही छळो वैरि सोडूनि ताल ।।३
कसाही छळो वैरि सत्याग्रहांत । कसाही छळो वैरि कारागृहांत ।।
अम्ही पांडवांसारिखी शिस्त पाळूं । मनींच्या मनीं आमुचा क्रोध जाळूं ।।४
महाराष्ट्रियांच्या सभेचा विचार । सुखें बंधनीं तीन जावे हजार ।।
सुखानें तिहीं भोगणें सर्व हाल । कसाही छळो वैरि सोडूनि ताल ।।५
चला बंधनीं तीन या हो हजार । जसा आपुला जाहलासे विचार ।।
सुखें हाल काढूं चला तीन साल । कसाही छळो वैरि सोडूनि ताल ।।६
पुढें तीन वर्षांपुढें वैर चाले । सुखें मूळशीहूनि वैरि न हाले ।।
तरी धर्मयुद्धीं करूं दोन हात । परी तोंवरी राहणें शांत शांत ।।७

## निरोप सातवा

### (मुळशीसाठीं एकदां तुरुंगवास भोगलेल्यांस)

पुन्हां एकदां बंधनीं चला या ।।

तुम्हीं वीर हो तोडिलें मोहजाला । सुखें मूळशी-धर्मकार्यांत आलां ।
तुम्हीं दीधली भेट कारागृहाला । सुखें भोगिलें बंधनांतील हालां ।।१
तुम्हां मुक्तकारागृहां सत्यभक्तां । तुम्हां मूळशीयुद्धरंगानुरक्तां
तुम्हां याचना कीं, पुन्हां एकदां या । पुन्हां एकदां बंधनीं या चला या ! ।।२
महाराष्ट्रतेजस्विता जागवाया । पुन्हां एकदां बंधनीं या चला या ! ।
पुन्हां बंधनाचे तुम्ही हाल भोगा । पुरे सज्ज होऊनियां कर्मयोगा ।। ३
खरे कर्मयोगी वयातीत थोर । खरे कर्मयोगी वयें अल्प पोर
खरे कर्मयोगी कुणीही चला या । महाराष्ट्रतेजस्विता जागवाया ।।४
महाराष्ट्रतेजस्विता नाहिं मेली । महाराष्ट्रतेजस्विता ही निजेली
महाराष्ट्रतेजस्विता जागवाया । पुन्हां एकदां बंधनीं या चला या ।।५
महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेलें । मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले
खरा वीर वैरी पराधीनतेचा । महाराष्ट्र आधार या भारताचा ।।६

पुरे बालमित्रांसवें हा निरोप । चला घालवाया महाराष्ट्र-झोंप
निजेला महाराष्ट्र हा जागवाया । पुन्हां बंधनीं या चला या ॥७

## निरोप आठवा

### (सर्व महाराष्ट्रीयांस)

कृतज्ञेची ध्वजा उभारा या तुमच्या नगरीं ।
चला मूळशीक्षेत्रि उडी घ्या सत्याग्रहसमरीं ॥
कृतक्षतेची ध्वजा उभारा या तुमच्या नगरीं
चला मूळशीक्षेत्रि उडी घ्या सत्याग्रह-समरीं ॥धृ०॥
शिवरावाचे तुम्हीं मराठे तुमचा शिवराय ।
प्रतापशाली आहे तुमचा निःसंशय काय ।
वीरपिंड हा तुम्हां लाभला धन्य तुम्ही धन्य ।
या पिंडानें तुम्ही जाहलां वीर वीरमान्य ।
मरहट्टे हे 'हट्टें मर' या ब्रीदा जपणारे ।
हटातटानें झुंज झुंजता झुंजीं खपणारे ।
शक्तियुक्तिचे युक्तिशक्तिचे खेळ खेळणारे ।
हट्टें मरतिल, हट्टी परि हे कधीं न वळणारे ।
हे असे जगीं गाजले । शत्रु माजले । जिहीं भाजले ।
ते तुम्ही वीरपिंडाचे ।
गाजलां धनी खंडाचे ।
गाजलां भक्त बंडाचे ।
थंड आजला कसे ! उठा घ्या शत्रूची हजिरी ॥
चला मूळशी० ॥१॥
थंड आजला कारण याचें मन तुमचें मळलें ।
कृतज्ञतेच्या पथावरूनी पद तुमचें ढळलें ।
कृथज्ञताविलयानें झाला वीरपिंड थंड ।
वीरपिंडिं या क्षुद्र मत्सरें माजविलें बंड ।
'थोर मी तुम्ही' करितां करितां घोर अहंकार ।
थोरांकरवीं पोरपणाचें करवी व्यवहार ।

पक्ष पक्ष हे दक्षपणानें अन्योन्यां छळती ।
चढती पाहुनि अन्योन्यांची क्षूद्रपणें जळती ।
वैरि हा क्षुद्र मत्सर । जाळिलें घर । जोडितों कर ।
आठवा शिवाजी राजा ।
आठवा तयाच्या काजा ।
या कृतघ्नतेनें लाजा ।
शिवबाचे मावळे तयांवरि होत असे जबरी ॥
चला मुळशी० ॥२॥
फेरवीरसम नाफेरेही वीर तुम्ही थंड ।
गमे मनीं माजलें तुमचिया कृतार्थतावंड ॥
फेरपक्ष हरविला ही तुम्हां कृतार्थता वाटे ।
कृतार्थतेच्या गर्वधगीनें कृतज्ञता आटे ॥
शिवप्रभू हे छत्रपती हे महाराष्ट्रराजे ।
हृदयीं असतां सन्निध तुम्हां गर्व कसा साजे
स्वतंत्रता निजसाध्य आपुलें साधन समशेर ।
शिवप्रभुप्रिय कुणीं हरविलें वरुनि शांतिफेर ॥
शांति ही कौन्सिलीं कुणा । अन्यथा कुणा । गोड सज्जना ।
गोड ही कुणा समशेर ।
लोकांत असे मतिफेर ।
लोकांत असे रुचिफेर ।
फेरवाद हा पुरे राहुं द्या ही हमरीतुमरी ॥
चला मूळशी० ॥३॥
कोणी फेरे वीर मराठे कोणी नाफेरे ।
कोणी आपण निजराष्ट्राचे सेवक समशेरे ॥
तिघेहि आपण कृतघ्नतेचे भक्त नसों खास ।
परी पडुनियां मोहीं झालों मदमत्सरदास ॥
कृतज्ञतेचा विलय दिसे जो कृतघ्नताविजय ।
मोहाचा तो विजय असे मदमत्सरादिविजय ॥
ज्ञान धन्यपूर्वजकरणीचें तच्चरणध्यान ।

मोहादिक रिपु वधावयासी अमोघ हे बाण ॥
बाणवा चिंत्तिं यदुवर । पार्थकिंकर । राम वनचर ।
बाणवा जनक मुनिराय ।
बाणवा भक्त शिवराय ।
बाणवा धन्यजनपाय ।
बाणद्वय योजुनी बधुनियां मोहादिक कहरी ॥ चला मूळशी० ॥४॥
महाराष्ट्र-मूळशी-परिषदीं तिन्ही पक्ष जमले ।
दक्षत्वाच्या वीरत्वाच्या सुविचारीं रमले ॥
विश्वसलें मन जिवंत आहे थोर महाराष्ट्र ।
महाराष्ट्र निजतेजें उठविल अखिल हिंदराष्ट्र ॥
असो थंडपण सोडा आतां काल फार झाला ।
बरा न इतुका काल यावया तीन हजारांला ॥
मरावया धावले मराठे लाखांनीं मेले ।
काल नसे तो दूर नसे तें तेजहि विझलेलें ॥
तेज तें दाखवा चला । बोल बोललां । आंकडा दिला ।
तो पुरा करा सत्वरीं ।
बोल जो चाल ती बरी ।
घ्या उडी चला संगरीं ।
खरी वैखरी अढळ विलसते सद्वीर-प्रवरीं ॥ चला मूळशी० ॥५॥
अखिल-हिंद-राष्ट्रीय-परिषदीं तिन्ही पक्ष जमले ।
दक्षत्वाच्या वीरत्वाच्या सुविचारीं रमले ॥
शतें पंचशत सत्यआग्रही उभे करा ठरलें ।
यांत पाहिजे सातहजारी महाराष्ट्र धरलें ॥
असो कसेंही; श्रीशिवराष्ट्रा एक गोष्ट करणें ।
अतित्वरें सैनिक भरतीचा तुझा भार भरणें ॥
हें दुसरें कीं भाग सर्व हा मुळशीयुद्धांत ।
शीघ्र पाठवीं पाठ घ्यावया सत्यआग्रहांत ॥
पाठ हा घ्यावया चला । आड व्हा चला । कंपनीदला ।
या करा पहारी वायां ।

या भरा खोदला पाया ।
या धरा रेलमार्गा या ।
याच आग्रहें सोसुनि सारें या कारागारीं ॥ चला मूळशी० ॥६॥
कारागारीं कामें करणें सत्यार्पण म्हणुनी ।
कारागारीं हाल भोगणें सत्यार्पण म्हणुनी ।
कारागृहिं अन्याय भोगणें सत्यार्पण म्हणुनी ।
कारागृहिं अपमान भोगणें सत्यार्पण म्हणुनी ॥
कारागृहिं जो तक्रारींचा अर्जाचा हक्क ।
टाळावें तो हक्क भोगणें तुम्हीं यथाशक्य ॥
पाळावे कायदे शिस्तिचे सर्व लीनतेनें ।
त्याज्य सर्वथा स्वैर वागणें शिस्तहीनतेनें ॥
शिस्त ही राष्ट्रकारक । राष्ट्रधारक । राष्ट्रतारक ।
शिस्त ही चीज बिनमोल ।
शिस्तहीन झालों फोल ।
शिस्तही रुजूं द्या खोल ।
खोल अंतरीं शिस्त रुजाया या कारागारीं ॥ चला मूळशी० ॥७॥
आवरतों हें चऱ्हाट माझें मी हरिचा भाट ।
माझ्या नीरस भाटपणाचा आहे बोभाट ॥
उणीव माझी पुरी जाणतों काय करूं सांगा ।
हट्टी हरि हा हटकुनि झटतो कधीं कधीं अंगा ॥
बोल बोल हा तुझ्याच बोलीं बोल अरे भाई ।
नीरस रसना तुझी असो दे त्याचें तुज काई ॥
हट्ट असा हा हरि धरितो मग मी करितों धीर ।
बोल टाकितों बोलुनि हरिचा मी वेडापीर ॥
बोल हा हरीचा असे । सोसुनी हंसें । या चला कसे ।
या चला फेर-नाफेरे ।
या चला वीर समशेरे ।
या चला मुमुक्षू सारे ।
प्यारे जनहो झणीं आवरा गृहमायालहरी ॥ चला मूळशी० ॥८॥

## निरोप नववा

(वंगीयादि हिंदी मित्र और बंधुगणसे प्रार्थना)

"रण मूलशीका सत्य-आग्रह सत्य है हरि-अर्चना
इसकी करो शुभ चिंतना यह एक है अभ्यर्थना"।

प्रिय वंग-अंगज मित्रवरगण भूरि 'वंदे मातरम्'
कुछ याचना है आपसे चित्तं हि मे बहु कातरम्।
यह याचना है अल्पसी बहुदोषभागहमित्यतः
कृपया क्षमा कर दीजिये क्षमया क्षमो भवितास्म्यहम् ॥१
प्रिय मित्रवर मित्रत्व अपना प्रभुकृपावशसे हुवा
कुछ कार्यभी निजराष्ट्रका सहयोगसे मिलकर हुवा।
कुछ कार्यके पश्चात् किया हत दैवने हमको जुदा
यह नीति है संसारकी कुछ संपदा कुछ आपदा ॥२
सहचारिताकी संपदा सहकारिताकी संपदा
कुछ भोग इनका मिलगया फिर आगई विरहापदा।
तनु आपकी अटकी रही यह हततनू भटकी रही
निजराष्ट्रसेवाकी मनीषा मनहि मन लटकी रही ॥३
दिवस बीते मास बीते वर्षभी बीते चले
अति अल्प निजबल देख हमभी अल्प कुछ करते चले।
कुछ अल्पसी निजराष्ट्रसेवा हाथसे बनती रही
कुछ भीति भवदीय रुष्टताकी साथमें बनती रही ॥४
कुछ भीतिका कारण सदिच्छा चित्तमें जैसी पली
निज हाथसे निजराष्ट्रकी सेवा न थी वैसी चली।
अब याचना है आपसे बहुदोषभागहमित्यतः
कृपया क्षमा कर दीजिये क्षमया क्षमो भवितास्म्यहम् ॥५
बल अल्पसो बहु दोष यह है सृष्टिका कानू कडा
इस दोषसे निज देश है परदास्यमें रोता पडा।
यह दोष अब कैसा मिटे ! बलअंशसंग्रहनीतिसे
इस नीतिसे नर छूटते परदास्यसे भवभीतिसे ॥६

बल-अंश-संग्रह होत है प्रिय वंगमें कुछ ढंगसे
बल-अंश-संग्रह होत है इस अंगमें कुछ ढंगसे ।
बल-अंश संग्रह राष्ट्रके प्रत्यंगमें निज ढंगसे
कुछ ठीक होगा मुक्ति तब परदास्यसे भवसंगसे ॥७
बल-अंश-संग्रह मूलशीके शांतिरणमें है चला
प्रिय मित्रवर सो जानते जो मूलशीपर है बला ।
यह मूलशीरण मूल है महाराष्ट्र-निद्रा-भंगका
यह मूलशीरण मूल मानो भावि भारतजंगका ॥८
भावि भारतजंगका है मूल उत्तरहिंदमें
भावि भारतजंगका है मूल दक्षिणहिंदमें ।
मूल भावी जंगका है राष्ट्रके प्रत्यंगमें
प्रति अंगमें रणरंग होगा कालबलके संगमें ॥९
अनुकूल होगा काल निजबल-अंश-संग्रह नीतिसे
अनुकूल होगा काल निजमल-अंश-निग्रह नीतिसे ।
रण सामसत्याग्रह मनोमलनिग्रही बलसंग्रही
अनुकूल करता कालबलको सामसत्याग्रह यही ॥१०
रिपुचित्तकाभी भेद देता सामसत्याग्रह हमें
गुणवित्त इसका देख लाते सामरणको काममें ।
रिपुचित्तनिकषीभूत रण मलनिग्रही बलसंग्रही
यह है चला महाराष्ट्रमें जो श्रीशिवप्रभुकी मही ॥११
अनुकूल होगा कालबल कुछ सामरणके नीतिसे
फिर काम लेंगे शिवमहीमें शुद्ध रणके रीतिसे ।
रण शुद्धसत्याग्रह हरीने पार्थसे करवा लिया
अतिसामका सम्मोह उसका ज्ञानसे हरवा दिया ॥१२
प्रिय वंग-अंगज मित्रवरगण आप श्रीहरिभक्त है
हरिगीत गीतामार्गमें निजहृदयसे अनुरक्त है ।
रण मूलशीका सत्य-आग्रह सत्य है हरि अर्चना
इसकी करो शुभ चिंतना यह एक है अभ्यर्थना ॥१३
प्रिय हिंदअंगज मित्रगणसे बंधुगणसे प्रार्थना

महाराष्ट्रके शुभ कार्यकी कृपया करो शुभ चिंतना ।
रण मूलशीका सत्य-आग्रह सत्य है हरि-अर्चना
इसकी करो शुभ चिंतना यह एक है अभ्यर्थना ॥१४

# सेनापति बापट यांचीं झेंडागीतें व शिस्तगीतें

## झेंडागीत पहिलें

महाराष्ट्रझेंडा । वंदुनी । महाराष्ट्रझेंडा
नव्या युगींचा नवीन वंदू हिंदराष्ट्रझेंडा ॥ आमुचा ॥ धृ०॥
स्वतंत्रतेचा विरक्ततेचा महाराष्ट्रझेंडा । भगवा ।
करील विजयी नव्या युगींचा हिंदराष्ट्रझेंडा । आमुचा ॥१
हिंदराष्ट्रझेंडा या नव युगिं नवीन रंगतसे । जनमतें ।
नवीन राष्ट्रिय झेंड्यानें या रिपुमन भंगतसे । आग्रही ॥२
नवीन झेंडा लोकशाहीच्या नवीन रंगाचा । पाहुनी ।
दाह होतसे दुःसह निशिदिनिं रिपुच्या अंगाचा । आग्रही ॥३
नव्या लोकशाहीचे असती प्रमुख घटक दोन । महत्त्वें ।
जुने रामकृष्णांचे हिंदू नवे मुसल्मान । धर्मरत ॥४
प्रमुख घटक हे शत्रु कालचे आज मित्र झाले । पाहुनी ।
अकब्बराचें शिवरायाचें उदार मन घालें । स्वभावें ॥५
नव्या लोकशाहीचा झेंडा विजयें फडकावा । भारतीं ।
या ध्येयानें ध्येयरूप हा महाराष्ट्र व्हावा । आमुचा ॥६
शिवप्रभू मावळे वीरवर बाजी प्रभुवीर । विदेही ।
हृदयसंपुटीं वसती आमुच्या पूर्वज रणधीर । कितिक ते ॥७
रक्तीं अमुच्या परंपरेची धर्मयुद्धभक्ती । खेळते ।
हीच भक्ति देशोद्धाराची असे थोर शक्ति । पुण्यमय ॥८

---

१. श्लोक ४ मध्यें 'भवदीय' यांतील 'दी' आणि श्लोक ८, ११ व १४ मध्यें 'महाराष्ट्र' यांतील 'हा' एकमात्रक अथवा लघु उच्चाराचा आहे.

याच भक्तिचा याच शक्तिचा महाराष्ट्र झेंडा । भगवा ।
झाला होता दास्य विमोचक या भारतखंडा । आमुच्या ॥९
भगवा हिरवा शत्रु कालचे आज मित्र झाले । पाहुनी ।
अकब्बराचें शिवरायाचें उदार मन घालें । स्वभावें ॥१०
भगवा हिरवा एक जह्याले भोगुनी कलिदंडा । सारख्या ।
ऐक्यबळें या होइल विजयी हिंदराष्ट्रझेंडा ॥ आमुचा ॥११

## झेंडागीत दुसरें

महाराष्ट्रझेंडा । वंदुनी । महाराष्ट्रझेंडा ।
नव्या युगींचा नवीन वंदूं हिंदराष्ट्रझेंडा । आमुचा ॥ ध्रृ०॥
स्वतंत्रतेचा विरक्ततेचा महाराष्ट्रझेंडा । भगवा ।
करील विजयी लोकशाहिचा नवा राष्ट्रझेंडा । आमुचा १
स्वतंत्रतेचे लोकशाहिचे मिळूं सर्व भक्त । चला या ।
नवीन राष्ट्रिय झेंड्यासाठीं आटवुं या रक्त ॥ आपुलें २
स्वतंत्रतेचे लोकशाहिचे मिळूं सर्व भक्त । चला या ।
नवीन राष्ट्रिय झेंड्यासाठीं वाहवुं या रक्त ॥ आपुलें ३
रक्त आटवूं रक्त वाहवूं प्रथम सामयुद्धीं । भक्तिनें ।
पुरती लावूं चला कसाला शत्रूची बुद्धि । आग्रही ४
शत्रुबुद्धिची खरी परीक्षा खरी राष्ट्रशुद्धि । आपुली ।
दोन्ही गोष्टी घडती एक्या सत्याग्रहयुद्धीं । शांतिच्या ५
राष्ट्रशुद्धि जाहली राहिली अचल शत्रु-बुद्धि । आग्रही ।
तरी स्वभावें पडणें आहे शुद्ध धर्मयुद्धीं ॥ घोरतर ६
धर्मयुद्धमंत्रें हटवीलें कृपामोह-बंडा । अर्जुनीं ।
हरिमंत्रें त्या होईल विजयी हिंदराष्ट्रझेंडा ७

## झेंडागीत तिसरें

वंद्यांत वंद्य आम्हां । नवहिंदराष्ट्रझेंडा ॥ध्रृ०॥
रमवीत हा जनाला । जमवीत वीरमाला ।
शमवील शत्रुबंडा ॥ नव०
धवलत्वि हिंदु आर्य । हरिती महंमदीय । १

ऐक्याक्रियेंत गुंडा ॥ नव० २

धरि इंद्रचापवर्ण । ते सर्वराष्ट्रवर्ण ।
मैत्रक्रियेंत गुंडा ॥ नव० ३

धरि सूत्रकर्मचक्र । प्रिय मार्ग तो अवक्र ।
सरल क्रियेंत गुंडा ॥ नव० ४

भगवा विरक्तिरंग । ते हिंद अंतरंग ।
मोक्षाक्रियेंत गुंडा ॥ नव० ५

गुंडा मनोरथीं हा । विजयेच्छु भारतीं हा ।
हृदयांत एक मांडा ॥ नव० ६

भगिनींस बंधुंना ही । विनती न फार कांहीं ।
हृदयांत एक मांडा ॥ नव० ७

प्यारे मुमुक्षु भाई । विनती तुम्हां सदा ही !
हृदयांतुनी न सांडा ॥ नव० ८

दडपूनि हा अहंता । नेईल मोक्ष-पंथा
तुडवील मोहबंडा ॥ नव० ॥ ९

स्वातंत्र्य-मोक्ष-दाता । सायुज्य-मोक्षदाता ।
जगिं हाचि एक गुंडा ॥ नव० ॥ १०

सत्याग्रहप्रकारीं । सेवूनि निर्विकारीं ।
करुं वंद्य सर्व खंडां ॥ नव० ॥ ११

रण शांतियुक्त खेळूं । रण शुद्ध मुक्त खेळूं ।
करुं वंद्य सर्व खंडा ॥ नव० ॥ १२

कारागृहांत राहूं । यमधर्मभेटि घेऊं ।
करुं वंद्य सर्व खंडां ॥ नव० ॥ १३

मिळवूनि भाइ भाई । जुळवून लोकशाही ।
करुं वंद्य सर्व खंडां ॥ नव० ॥ १४

रमवीत हा जनाला । जमवीत वीरमाला
शमवील शत्रुबंडा ॥ नव० ॥ १५

## शिस्तगीत पहिलें

थोरांत थोर सकलां । तो एक शिस्तधर्म ॥ धृ० ॥
आम्हांसि पूर्वकालीं । करुनी महत्त्वशाली ।
जो देइ आर्यनाम ॥ तो एक ॥ १
आर्यत्व शिष्टधर्म । शिष्टत्व शिस्तधर्म
आर्यत्व-हृदयमर्म ॥ तो एक ॥ २
करि तोचि राष्ट्रपाया । धरि तोचि राष्ट्र ठायां ।
करि तारकत्वकर्म ॥ तो एक ॥ ३
जी शिस्त तीच शाही । शिस्तींत राज्य राही ।
राष्ट्रेतिहासवर्म । तो एक ॥ ४
शिस्तींत हिंदुशाही । शिस्तींत म्लेच्छशाही
अजि आंग्लराज्यवर्म ॥ तो एक ५
राष्ट्रीय पाठशाला । त्या राष्ट्रशिस्त-शाला ।
[ राष्ट्रीय कार्यशाला । त्या राष्ट्रशिस्त-शाला ]
येथें करूं स्वधर्म ॥ तो एक ॥ ६
ऋषिवंद्य कृष्ण राम । सुजनांसि सौख्यधाम ।
त्यांचाहि थोर धर्म ॥ तो एक ॥ ७
आम्हांत कृष्ण व्हावा । आम्हांत राम यावा
म्हणुनी करूं स्वधर्म ॥ तो एक ॥ ८
आम्हां स्वराज्य व्हावें । नव लोकराज्य व्हावें
म्हणुनी करूं स्वधर्म ॥ तो एक ॥ ९

## शिस्तगीत दुसरें

शिस्त पूजिली सदा सर्व जगिं सर्व शास्त्रकारीं
पूजूं नित्य ही } शिस्तदेवता शिस्तीच्या हारीं ॥ धृ० ॥
पुजूं भक्तिनें }
प्रपंचशास्त्रीं थोर आजला बंधु गौरकाय
त्यांचा पडतो कसा प्रपंचीं एक एक पाय ॥
शिस्त शिस्त या तालावरती पाय पहा पडतो

शिस्तीनें या गौरकाय हा कुठें कुठें चढतो ॥
परवां परवां मागें असतां किती पुढें चढले
किती तयांच्या मागें अमुचे लोक आज पडले ॥
हें चढणें हें पडणें याला मूळ एक शिस्त
शिस्तयुक्त ते चढले पडलों आम्हीं बेशिस्त ॥
शिस्त ही राष्ट्रकारक । राष्ट्रधारक । राष्ट्रतारक
शिस्त ही चीज बिनमोल
शिस्तहीन झालों फोल
शिस्त ही रुजो मनिं खोल
शिस्त मनीं रुजवूं या राष्ट्रिय सद्विद्यागारीं । राष्ट्रिय
सत्कार्यागारीं ॥ पुजूं० ॥१॥
पहा पहा ही शिस्तदेवता बाजीप्रभुमूर्ति
पहा पहा ही तानाजीची दिव्य शिस्तमूर्ति ॥
प्रिय पुत्राचा लग्नसोहळा उद्यां आज गेली ॥
शिस्तमूर्ति कोंडाण्यावरि ती यमधर्में नेली ॥
रांगण्यास राष्ट्रात्मा शिवबा जावा सुखरूप ॥
शिस्तदेवता यास्तव झाली खिंडित शिवरूप ॥
राष्ट्र मराठा झालें ठरलें तरलें ती शिस्त ॥
राष्ट्र मराठा हरलें सरलें ती सरली शिस्त ॥
शिस्त ही राष्ट्रकारक । राष्ट्रधारक । राष्ट्रतारक
शिस्त ही चीज बिनमोल
शिस्तहीन झालों फोल
शिस्त ही रुजो मनिं खोल
शिस्त मनीं रुजवूं या राष्ट्रिय सद्विद्यागारीं । राष्ट्रिय
सत्कार्यागारीं ॥ पुजूं० ॥२॥
परमार्थाचें शास्त्र आमुचें थोर सर्व काल ।
अज्ञ जनांच्या हातां होती त्याचेही हाल ॥
असो पहा परमार्थशास्त्र हें अमुचें इतरांचें ।
परमार्थी या पहा श्रेष्ठतर शासन कोणाचें ॥

परमार्थी या शिस्त शिस्त हा ताल सदा वाजे ।
शिस्तीचें या शासन येथें श्रेष्ठ श्रेष्ठ गाजे ॥
शिस्त इंद्रियां शिस्त मनाला बुद्धीला शिस्त ।
शिस्तयुक्त ते मोक्षा चढती पडती बेशिस्त ॥
शिस्त ही देहतारक । मनोधारक । मोक्षकारक ।
शिस्त ही चीज बिनमोल ॥३॥
स्वराज्य व्हावें लोकशाहिचें व्हावें स्वाराज्य ।
अधर्म बुडुनी वाढावें या जगीं धर्मराज्य ॥
हिंदराष्ट्र हें सत्वर व्हावें खरें खरें राष्ट्र ।
राष्ट्रीकरणीं पुढें असावा थोर महाराष्ट्र ॥
मनीं वांछितों गोड गोष्टि या सर्व जीवभावें ।
मनोराज्य हें जनीं कशानें मूर्तरूप व्हावें ॥
मूर्तरूप या मनोरथांना देत एक शिस्त ।
शिस्तयुक्त ते कृतार्थ होती झुरती बेशिस्त ॥
शिस्त ही राष्ट्रकारक । धर्मधारक । जीवतारक ।
शिस्त ही चीज बिनमोल ॥४॥
॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

---

# रत्नागिरी तुरुंगांतून सुटल्यावर

## झाडू-अष्टक

स्वदेशास संपूर्ण व्हावें स्वराज्य । असे भावना ही भवीं पूज्य ।
अशा भावनेचे भले जे उदार । तयांसाठिं ही घोषणा हा पुकार ॥१
रहा जेथ तो गांव झाडा चला या । रहा जेथ तो देश झाडा चला या ।
चला या चला घाण काढा चला या । असे मार्ग हा भारता उद्धराया ॥२
कशी वागवी आपुलें बाळ माता । कशी घालिते नित्य घाणींत हाता ।

स्मरा तें तसा वागवा हा स्वदेश । चला घाण काढा नको लाज लेश ॥३
तुम्हां लाज वाटो करायासि घाण । नको लाज व्हायासि मातेसमान ।
करो घाण अज्ञान सज्ञान बंधु । करा दूर ती होउनी प्रेमसिंधु ॥४
असे प्रेम ही भावना तारणारी । असे द्वेष ही भावना मारणारी ।
तरा होउनी सर्वथा प्रेमसिंधु । नको अंतरीं लेशही द्वेषबिंदु ॥५
करो घाण कोणी कुठेंही कितीही । धरा अंतरीं सर्वदा सन्मती ही ।
अम्हां काढणें घाण हा राष्ट्रधर्म । अशानेंच साधेल कीं राष्ट्रशर्म ॥६
तुम्हां पाहुनी प्रेमकार्यीं प्रवीण । तुम्हां मागुनी बंधु कांहीं नवीन ।
स्वयें घाण काढावया लागतील । कुणी शीघ्र कोणी हळू जागतील ॥७
कुणी शीघ्र कोणी हळू जागणारे । परी सर्व बंधू-करीं प्रेमवारें ।
कधीं ना कधीं झाडु हा घेववील । कधीं ना कधीं घाण ही काढवील ॥८

## आरोग्याची ध्वजा

आरोग्याची ध्वजा उभारा या तुमच्या नगरीं
चला चला स्वच्छता कराया झाडू घ्या स्वकरीं ॥ध्रु०॥
हें रोगांचें बीज घाण ही प्राण किती घेई
किती दिव्य जीवांसि अवेळीं मृत्युकरीं देई
जितुक्या सांथी तितुक्या हातीं प्राण घेइ घाण
घाण न जेथें सांथी तेथें होती हैराण
घाण असे सर्वहि सांथींचा प्रिय साथीदार
घाण न जेथें न चले तेथें सांथींचा जोर
घरीं घाण बाहेर घाण तंव कसलें आरोग्य
आरोग्याविण असाध्य जनता-संवर्धन योग्य
बंधुंनो । बंधुनो सत्य हें असे । जाणुनी कसे । रहा स्वस्थसे
टाका ही सुस्ती सारी
घ्या झाडु घरीं बाहेरी
पोंचवा दूर हा वैरी
वैरी हा घाण ही जवळि तंव देश न येइ वरी ॥

ता. २९-९-३७

## राष्ट्रीय जूट

मुसल्मान हिंदू अम्ही भाउभाऊ । जुटीनें स्वदेशास सेवीत जाऊं
जुटीच्या तुटीनें अम्हां ही गुलामी । हिला मारण्या जूट येईल कामीं
वृथा भांडणें भांडती आपसांत । स्वदेशास केलें अशानें अनाथ
गरीबांस हीं भांडणें जाचतात । धनी सर्व काळीं सुखें भोगतात
विदेशीय साम्राज्यशाहींत दास । असे देश हा तोंवरी नाहिं आस
गरीबां मजूरां गरीबां किसांनां । धनी भोगिती सर्वदा भोग नाना
धनी हिंदु भोगी सुखाची मिरास । धनी मुस्लिमांही सुखाची मिरास
धनी दुष्ट ते भांडणें भांडवीती । गरीबां गुलामींत ते राबवीती
गुलामीस मारावया जूट व्हावी । म्हणूनी तिथी मे दहा ही स्मरावी
धनी दुष्ट तेव्हां कसे एक झाले । गरीबांर्थ त्यांही कसे त्याग केले
स्मरा तें स्मरा ते मुसल्मान, हिंदू । जुटीनें रहा सर्वही देशबंधू
जुटीच्या बळें हें विदेशीय राज्य । लया नेउनी स्थापुं आम्ही स्वराज्य

---

सेनापतींनीं निजाम हैदराबाद सत्याग्रह जेव्हां सुरू केला तेव्हां प्रभातफेरीकरितां केलेले श्लोक

## हैदराबाद-सत्याग्रह-प्रभातफेरी

अम्ही हिंदु कोणी कुणी विश्व-बंधु । अम्ही एकमेकां कुणी वंदू निंदू
अम्हांला न साहे कुणाही जुलूम । अम्ही ऊठलों वांकवाया निजाम १
अम्ही ऊठलों वांकवाया निजाम । गुलामींतुनी उद्धराया गुलाम
निजामींत हिंदू गुलामींत सारे । निजामींत हिंदू-छळाचेंचि वारें २
अम्ही सर्वही इंग्रजाचे गुलाम । अम्हांला न साहे कुणाही जुलूम
अम्ही ऊठलों देश हा सोडवाया । गुलामींतुनी देश हा उद्धराया ३
गुलामींतुनी देश हा उद्धराया । असे त्यागणें देशि-संस्थान-माया
नसे एकही देशि संस्थानिकांत । सुखें देई जो लोकराज्यास हात ४

हवी लोकशाही नको एकशाही । हवा ही नवी देशि संस्थानिकांही
हवी आदराया; परी ते न कोणी । सुखें सोडिती राज्यधाटी पुराणी ५
म्हणूनी नको देशि-संस्थान-माया । बरें सांगणें देशि संस्थानिकां या
तुम्ही पालटा शीघ्र संस्थान-काया । जरी पाहिजे आज तुम्हां जगाया ६
उद्यांचें उद्यां; आज टाका जुलूम । तुम्हीही असा इंग्रजाचे गुलाम
जरी पाहिजे आज तुम्हां जगाया । तुम्ही पालटा शीघ्र संस्थान-काया ७
वरा लोकशाही त्यजा एकशाही । पहा इंग्रजी खालसाची प्रजाही
गुलामींत ही हक्क भोगीत कांहीं । तुम्हांसारिखा येथ अंधार नाहीं ८
अम्हां पाहिजे सर्व देशीं प्रकाश । मनुष्यत्व पावे गुलामींत नाश
असे घोर अंधार जेथें गुलामी । मनुष्यत्व तेथें त्वरें हो निकामी ९
मनुष्यत्व देशीं जगाया तगाया । झणीं पालटा सर्व संस्थान-काया
वरा लोकशाही त्यजा एकशाही । जनांची मनाची धरा लाज कांहीं १०
असे सर्व संस्थानिकां हा पुकारा । छळाचा जिथें वाहतो घोर वारा
छळाचा प्रतीकार शांतिप्रधान । जिथें बैसला देउनी आज ठाण ११
छळाचा प्रतीकार शांतिप्रधान । निजामी प्रजाही करी सावधान
तया बांधवां या चला हात द्याया । निजामा चला या चला बांकवाया १२
अम्ही ऊठलों बांकवाया निजाम । गुलामींतुनी उद्धराया गुलाम
निजामींत हिंदू गुलामींत सारे । निजामींत हिंदू-छलाचेंचि वारें १३
करा साह्य जें शक्य तें सर्व सर्व । असें युद्ध सत्याग्रही थोर पर्व
चला एक व्हा बांकवाया निजाम । कुणाचें कसेंही असो पक्ष-नाम १४
न द्या पक्षभेदांकडे फार लक्ष । चला बांकवायासि जुल्मी विपक्ष
असे युद्ध सत्याग्रही थोर पर्व । करा साह्य जें शक्य तें सर्व सर्व १५

ता. २६-१०-३८

## माझें वेड— स्वातंत्र्य, समता, बंधुप्रेमसत्ता

मज एक वेड स्वातंत्र्य, समता । बंधुप्रेमसत्ता व्हावी जगीं १
जगीं व्हावी सत्ता प्रेमाची सर्वत्र । व्हावा जीवमात्र प्रेमपूर्ण २
पूर्ण तोचि जीव प्रेमें जो भरला । सर्वथा विरला द्वेष ज्याचा ३

ज्याचा शब्द, ज्याचा आचार विचार । सर्व कारभार प्रेममय ४
प्रेममय तत्त्व वसे सर्वांतरीं । तोचि माझा हरि जगत्कर्ता ५
कर्ता धर्ता हर्ता तो एक जगाचा । गूढमय त्याचा व्यवहार ६
व्यवहारविज्ञ वैज्ञानिक आज । भौतिकाचें चोज करतात ७
करितात गोष्टी स्वयंभू ही सृष्टी । येथें परमेष्ठी भूतजड ८
जड आणि जड-चेतवीता हरि । तयाची कुसरी तोचि जाणे ९
जाणे मी जाणें मी म्हणों वैज्ञानिक । असो तो नास्तिक जडवादी १०
वादी प्रतिवादी नास्तिक आस्तिक । होउनियां एक हरी खेळे ११
खेळे सृष्टिखेळ अपार अनंत । मज तो पसंत सर्व कांहीं १२
कांहीं घडो कांहीं न घडो घटना । हरिसंगें मना शांति सदा १३
सदा कांहीं कार्य करीत असावें । जनसेवा भावें सानथोर १४
सानथोर जनकार्यीं भाग घेतां । प्रेमाचीच सत्ता वसो मनीं १५
मनीं प्रेम वाणी प्रेमाची वदनीं । प्रेमाची करणी जनीं व्हावी १६
व्हावी ऐशी कृति व्हावी ऐशी वृत्ति । सत्सुखसंपत्ति वांछा ज्यांसी १७
ज्यांसी जनप्रेम त्यांसी विषमता । परकीय सत्ता बोंचतसे १८
बोंचतसे त्यांसी बोंचे जें जनांसी । जनकार्यहौसी जनप्रेम १९
जनप्रेमासाठीं विषमता-द्वेष । स्वातंत्र्याचा घोष अहर्निश २०
अहर्निश चिंता राष्ट्राच्या रोगाची । देहाच्या भोगाची वांछा नाहीं २१
नाहीं जेथ कांहीं इंद्रियसंयम । तेथ जनप्रेमभाषा व्यर्थ २२
व्यर्थ राष्ट्रचिंता संयमावांचोनी । स्वैराचारें हानि सर्वपरी २३
सर्वपरी आधीं सुविवेकबळें । स्वैरतेचे चाळे आवरावे २४
आवरावें मन आणीक शरीर । खरा प्रेमवीर व्हावयासी २५
व्हावयासी वीर राष्ट्र-स्वातंत्र्याचा । वीर समतेचा व्हावयासी २६
व्हावयासी वीर सोडा स्वैराचार । संयम आधार वीरतेचा २७
वीरतेचा पाया भोगासक्तित्याग । विवेकाची जाग सर्व काळ २८
काळ हा आजचा शीघ्र व्हावा नष्ट । देश व्हावा पुष्ट ऐशी चिंता २९
ऐशी चिंता खरी तरी व्हा संयमी । वीर जनप्रेमी अंतर्बाह्य ३०
अंतर्बाह्य शुद्ध स्वातंत्र्याची चिंता । समतेची चिंता जागो नित्य ३१
नित्य जागा करा कार्य सानथोर । जेणें जनोद्धार घडे कांहीं ३२

कांहीं तरी द्यावा दीनासि आधार । जनीं हेंचि सार गोड मज ३३
मज एक वेड स्वातंत्र्य, समता । बंधुप्रेमसत्ता व्हावी जगीं ३४

ता. २३-१२-३७

## सत्य धर्म

खरा धर्म देशार्थ हा जीव द्यावा । खरा धर्म विश्वार्थ हा जीव द्यावा
खरा धर्म दुष्टासि दुर्दंड द्यावा । खरा धर्म नेई जनां मोक्षगांवा १
असे सर्व भूतांत जें आत्मतत्त्व । सदा राहणारें विवर्धिष्णु सत्त्व
तयाच्या हिता जी असे स्वात्महिंसा । असे धर्म्य ती जेंवि दुष्टात्महिंसा २
अहिंसार्थ हिंसा अहिंसार्चना ती । छलोपाय सत्यार्थ सत्यार्चना ती
अशी सत्यपूजा अहिंसार्चनाही । असे सात्त्विकी तात्त्विकी मोक्षदायी ३
छलें वा बलें दुर्बलां घातकारी । तया घातका येउ हिंसाशिसारी
म्हणूनी स्वतांला स्वयें मारिताती । अहिंसार्थ हिंसा अहिंसार्चना ती ४
अहिंसार्थ हिंसा अहिंसार्थ माया । वरी हिंसका हिंसिता उद्धराया
प्रसंगीं असें पापतापान्त-कर्म । करी ती अहिंसा सदा सत्य धर्म ५
दिसे चालला दीनहिंसा-अधर्म । तरी दूष्य तत्तापपापान्त-कर्म
गणी ती अहिंसा सदा सत्य धर्म । असें सांगती ते करीती अधर्म ६
दुरात्मा खुनी, शांतिची वीरता जी । उपायें तिच्या सत्पथा जो न राजी
असे धर्म्य हिंसाच त्या हिंसकाची । असे कीं तया आत्मया ती हिताची ७
छली हिंसकांहीं छला घातपाता । सुखें आचरावें करावें अनर्था
अशी हीन वार्ता न ऐके समर्था । खरी सत्यनिष्ठा अहिंसा परार्था ८
न हिंसा अहिंसा न माया अमाया । असे धर्म सर्व क्षणीं सर्व ठायां
जनीं वाढवी साधुता ज्ञान शर्म । मनीं वा असे कर्म तें मूल धर्म ९



देश न वाटे हरि-घर जोंवरि तुम्हांसि तोंवरीं मजला ।
"कर ! कर !" करणें आहे; हरिकार्या देह हा असे सजला ॥
हरिघरिं–माझ्या देशीं घाण असे सांचली पहात असां ।
झाडु न हातीं तुमच्या तोंवरि आक्रोश, राहणार कसा ? ॥
मी न म्हणे घेउनियां झाडू, रस्ताच झाडणें मजसा ।
घाण अनेकपरीची काढा कांहीं तरी; सुन्नें न बसा ॥

चै. गा. २९ झाडू.

# चैतन्यगाथा

ॐ

## १ संसाराचें सार (अभंग)

सार संसाराचें, पर-उपकार, त्याविण असार सर्व कांहीं ।
देहा कष्ट होतां देह रडे रडो, उपकार घडो, निश्चयो हा ।
[1]मना कष्ट होतां, मन रडे रडो, उपकार घडो, निश्चयो हा ।
देह दिला देवें, उपकारासाठीं, उपकारासाठीं दिलें मन ।
अल्प शक्ति तरी, अल्प उपकार, थोर तरी थोर, करणेंचि ।
उपकारीं वेंचा तन, मन, धन, मोक्षासी साधन, दुजे नाहीं ॥ १

## २ मुलांस बोध[2] (श्लोक वगैरे)

मुलांनो, उद्यांचे तुम्ही थोर लोक, करा आपुलें आजचें काम चोख;
दिलें लक्ष नाहीं बरें आज ज्यानें स्वकार्यीं, तया दुःख हें निश्चयानें १
असे दुःख संसारिं नानापरीचें परी त्यांत जें का स्वतांच्या चुकीचें
खरें तेंच अत्यंत अत्यंत जाची, म्हणूनी स्वकर्तव्य-सेवा सुखाची २

शरीर व्यायामें सुदृढ बनवावें अनुदिन,
करावें अभ्यासें सुपथ-अनुवर्ती निजमन;
कला विद्या कांहीं समयउचिता प्राप्त करुनी,
स्वदेशोद्धाराचें व्रत उचलणें धर्म म्हणुनी ३

---

१. १९१३ च्या जानेवारींत राजविलासी अटकेंत असतां हा अभंग लिहिलेला आहे. या अटकेंत माझ्या मनाला अत्यंत कष्ट झाले. ही अटक घडवून आणणाऱ्या सज्जनानें विश्वासघाताचे आणखी कांहीं चमत्कार केले. ते अनुभवतांना आणि या चमत्कारांनीं माझ्या कांहीं मित्रांवर विनाकारण ओढवलेलें संकट टाळण्यासाठीं जे प्रतिचमत्कार मला करावे लागले ते करतांना माझ्या मनाला अत्यंत कष्ट झाले.

२. हा **बालशिक्षणा**च्या 'लोकमान्य' अंकासाठीं लिहिला (१९१६ जुलै).



कै. म. न. द बा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

नसे सत्ता आम्हांसि या स्वदेशीं, नसे सत्तेविण मान जगिं कुणासी;
म्हणुनी देशातें प्राप्त होय सत्ता असें करणें हा मुख्य धर्म आतां ४
धैर्य, चिकाटी, हट्ट सोडणें स्वार्थावरती पाणी,
देहावरती उदार होणें स्वराज्य व्हावें त्यांनीं; ५
हीच एक पात्रतानिशाणी विश्वा संमत झाली,
म्हणुनि हीच आम्हीं दाखविणें जरूर सांप्रतकालीं ६
असे यापरी गोष्ट ही भारताची म्हणूनी तुम्हां सांगणी काळजीची
शिका सर्व कांहीं, परी धैर्य आदि गुणांची पुरी जोड साधाच आधीं ७

## ३ विद्या[१] (अभंग)

ऐका ऐका माझे चाकराचे बोल, तुम्हांसी देतील गोड फळें ।
धनी माझे सर्व, विश्वांतील लोक, प्रेमळ सेवक तुमचा मी ।
लिहिणें, वाचणें, शिका शिका सारे, आंधळे बहिरे, राहूं नका ।
आंधळेपणानें, घराचा संसार, करितां वेजार, जाहलांत ।
लोभानें जे झाले, वेडे सावकार, आंधळ्यांसी फार, नाडिताती ।
लोभी सावकार, पुष्कळ असती, आंधळी ही स्थिति, नको नको ।
सावकार कोणी, दयाळू असती, न्यायानें चालती व्यवहारीं ।
अडाण्यासी तेही दुष्ट दिसताती, अडाण्याची स्थिति नको नको ।
डोळस व्हा सारे, लिहिणें शिकूनी, नाहीं यांत हानि, काडीचीही ।
मुलींना शिकवा, मुलांना शिकवा, डोळस हा व्हावा, सर्व जन ।

---

१. पोलीस ॲक्टाखालीं 'तुमच्यावर खटला करूं तेव्हां यावयाचें' 'येऊं' येतील' असे करारमदार झाल्यावर जानेवारीअखेर अटकमुक्त होऊन पुढें कांहीं दिवसांनीं घरीं पारनेरीं गेल्यानंतर तेथें लवकरच, सकाळीं ३।४ तास रस्ते व रस्त्यांतील मोऱ्या साफ करणें, सायंकाळीं ५ वाजतां रस्त्यावर ज्ञानेश्वरीचें प्रवचन व तदनंतर थोडेंसें स्वतंत्र प्रवचन, पुढें घरीं कुणबी मुलांस शिकविणें व रात्रीं महारवाड्यांत जाऊन तेथील मुलांस शिकविणें हा कार्यक्रम सुरू करून तो १९१५ मार्चपावेतों चालविला. वरील स्वतंत्र प्रवचनासाठीं मधून मधून कांहीं पद्य लिहावयाचें असा क्रम असे. या क्रमाप्रमाणें जीं पद्यें लिहिलीं त्यांतील हें एक माझ्या कुणबी महार गांवकऱ्यांना उद्देशून लिहिलेलें पद्य आहे.

साहेबाचे घरीं सर्व शिकताती, पहा ते करीती, राज्य थोर ।
साहेबाचें घर, समुद्राच्या पार, जाहले ते थोर राजे येथें ।
तारायंत्र, गाडी आगीची काढिली, किती तरी केलीं, कामें त्यांनीं ।
हा सर्व पसारा झाला शिकण्यानें, त्यांच्या संगतीनें शहाणे व्हा ।
त्यांच्या घरीं बाळे, बायका शिकती, संसार करीती, तूमचाही ।
नका नका राहूं, आंधळे हो कोणी, जाहली ती हानि, पुरे झाली ।
उमजा उमजा, आळस हा झाडा, विद्येचा पवाडा, काय गाऊं ।
बळ लेखणीचें, ठाउकें तुम्हांसी आंधळेपणासी टाका टाका ।
ऐका ऐका माझे, चाकराचे बोल, तुम्हांसी देतील गोड फळें ।

## ४ देशाचा संसार[1] (अभंग)

देशाचा संसार, माझे अंगावरी, ऐसें थोडें तरी, वाटूं द्याहो ।
वाटूं द्याहो थोडेंतरी प्रत्येकासी, माझी कासाविसी, याचसाठीं ।
याचसाठीं तुम्हां, हात जोडीतसें, कोणी म्हणतसे, वेडा झाला
वेडा झाला देश-माउलीचे साठीं, होतें पुण्य गांठीं, हेंचि खरें ।
हेंचि खरें देवा, आवडता झालों, तेणें निवडिलों देशसेवे ।
देशसेवेसाठीं, व्हावेत सगळे, ज्यांना ज्यांना कळे, धर्मतत्त्व ।
धर्मतत्त्व तेंचि, जो का उपकार, त्याचाचि आधार सज्जनासी ।
सज्जनासी चहूंकडूनि टोंचिती, कितीक छळिती, छळक ते ।
छळक ते अंतीं, मनीं पस्तावती, सज्जनाची शांति, देखोनियां ।
देखोनियां शांति, कारण शोधीती तेथ आलोकिती भूतदया ।
भूतदया बीज, उपकार फळ, शांति ते अढळ, उपकारीं ।
उपकारीं ज्यांना, सार्थकता वाटे, सोशिती चपेटे, संकटाचे ।
संकटाचे काळीं, हृदयनिवासी, आपुल्या भक्तासी, धीर देई ।
धीर देई कीं जो, पर-उपकार, तोचि तो साचार, धर्मतत्त्व ।
धर्मतत्त्व ज्यांनीं, आपुलेंसें केलें, त्यासी बोलाविलें, देशसेवे ।
देशसेवेसाठीं, राबावें कांहींसें, हेंचि मज पिसें, सत्य सत्य ।
सत्य सत्य माझी, विद्याशक्ति थोडी, परी देवा गोडी, भक्तीचीच ।

१. पारनेरचें प्रवचन.

भक्तीचीच गोडी, सुदाम्याचे पोहे, गोड करिताहे, हरिमुखीं ।
हरिमुखीं मीही, घालितसें पोहे, मूठभरी तो हे, स्वीकारीत ।
स्वीकारीत भावें, केली देशसेवा, मज शांतिमेवा, वाढीतसे ।
वाढीतसे हरि, मोक्षाचें वाढणें, ज्यासी ज्यासी येणें, त्याणें यावें ।
यावें यावें ऐसी, हांक दे लोकांसी ऐसें मजपासीं, हरि बोले ।
हरि बोले मी तों बोलावणें करी, तुम्हांसी पाचारी, हरीसाठीं ।
हरीसाठीं तुम्हां, बोलावणें केलें, आले वा न आले, मज काय ।
मज काय मी तों, सेवक हरीचा, वेडापिसा त्याचा, त्यासी गोड ।
त्यासी गोड व्हाल, जेणें तें तुम्हांसी, गूढ सज्जनांसी, सांगीतलें ।
सांगीतलें कीं त्या, सेवा-अनुरक्त, आवडतो भक्त, स्वदेशाचा ।
देशाचा संसार, माझे अंगावरी, ऐसें थोडें तरी, वाटू द्या हो ।

## ५ भगिनींस विनंति[1] (दिंड्या)

तुम्ही भगिनींनो ! खऱ्या आर्यवंशी । आर्यधर्माचें मर्म तुम्हापाशीं
शर्म देशाचें व्हावयासि सिद्ध । कर्म शुभ व्हावें असे हें प्रसिद्ध १
सिद्ध व्हा तरि शुभ कर्म आचराया । नका दवडूं हा सुप्रसंग वाया
उद्यां कोणीं पाहिलें काय होतें । करा कांहीं शुभ कर्म आज हातें २
बलप्रेमी हे बली ब्रिटिश-बंधु । अम्ही अति दुर्बल मुसलमान-हिंदू
अशी स्थिति ही आजची खरी आहे । दीन जनतेला कोण बरी पाहे ! ३
दीन जनतेला बली देश व्हावा । मर्म याचें निजधर्म ओळखावा
आत्मननानें धर्मपालनानें । दैन्य जातें, सांगतों अनुभवानें ४
तुम्हां, भगिनींनो ! धर्मपालनाची । आर्यजनरीती आत्मचिंतनाची
असे अद्यापी नित्य-परिचयाची । देश-उद्धारक हीच व्हावयाची ५

---

१. राजकीय कैद भोगीत असलेल्या बंधूंच्या मुक्ततेसाठीं १९१९ अखेर झालेल्या अर्जबाजींत मला भाग घेणें भाग झालें होतें. त्या वेळीं

सिद्धि अर्जाची बंधुबंधनाश, कशी लाभे ही सिद्धि दुर्बलांस ?
दुर्बलांची दुर्बला अर्जबाजी, इला कैसा हो बलप्रेमि राजी ?

अशा मनःस्थितींत भगिनींना 'अर्जदार व्हा' म्हणून मीं जो अर्ज केला होता त्यांतील तात्त्विक भाग आजही भगिनींनीं लक्ष देण्यासारखा आहे तेवढा येथें दिला आहे.

तुम्हांवरि माझा-माझिया गृहाचा । हिंददेशाचा भार असे साचा
पहा ! हे बंधू, पिते, पुत्र, कान्त। तुम्हां दिसती ना कसे हे सचिंत! ६
असे चिंतेनें ग्रासिलें पतीला । पुत्र गेलासे त्याच दुर्गतीला
बंधु रात्रंदिन विचारांत राहे । पिता दुर्मुखला सदाचाच आहे ७
अशी स्थिति पतिची, मुलाची, पित्याची । बंधुचीही पाहतां जाणत्याची
हिला कारण काय तें तुम्ही शोधा ! । प्रेमबोलांहीं तुम्ही यांसि बोधा ८
स्वजनसत्ता लोपली भारतांत । हंसें झालें सर्वत्र परजनांत
इंग्रजांचे हातांत देश गेला । स्वराज्याचा हा जनात्मा भुकेला ९
कसा येई हा देश पुन्हां हातीं । मनीं चिंता ही सर्वदा वहाती
बंधु तुमचे हे पिते, पुत्र, कांत । सर्व चिंतातुर अंतरीं कशांत १०
शांति कैशी लाभेल पतिप्रेमा । दूर होतां लाडकी गुणी रामा
राज्यसत्ता देशिंची देशियांस । दूर होतां मन सहज तें उदास ११
स्वयंनिर्णय हें गोड तत्त्व कालें । महायुद्धाचे मंथनें निघालें
परी भारतराज्यांत पर-जनांचा । उदो पाहुनियां विरस हो मनाचा १२
तत्त्व एकचि हो विजयशालि येथें । तत्त्व सामर्थ्यचि विजयशालि येथें
समर्थाविण अन्यासि आजकाल । असे बहुधा भोगणें बहू हाल १३
मित्रराष्ट्रें हिंदीय आंग्ल व्हावीं । दास-दासप ही हीनता नसावी
दासपति होती पतित अधम कालें । दासही तैसे, अनुभवासि आलें १४
हिंदराष्ट्रातें दासता नको ती । दासपालकता इंग्रजां नको ती
हक्क हिंदीयां, हक्क इंग्रजांना । हक्क व्हावे सम सर्वपरी यांना १५
असें वदण्याची स्थिती आज आली । काल फिरला दुष्कृतें फार झालीं
काल येथें गर्जले पितर थोर । आज आम्ही जाहलों इथें चोर १६
चोर झालों हे कुणाच्या कृतीनें । बहुत अंशीं हे स्वीय दुष्कृतीनें
व्यर्थ दुसऱ्याशीं भांडणें कशाला । व्यर्थ कोपाचें प्रदर्शन कशाला १७
बंध बांधव जे निकट आप्त त्यांचा । प्रेम-अमृत माधुरी-मधुरतेचा
प्रथम तोडावा आत्मचिंतनानें । भक्ति उज्ज्वल तेव्हांच मनीं बाणे १८
भक्ति उज्ज्वल बाणली राष्ट्रभूची । नसे चिंता त्या लाडक्या वधूची
वृद्ध पितरां बालकां लाडकीतें । निरखि हरिकरिं, वरि देशचाकरीतें १९
असो इंग्रज वा असो स्वीय राजा । हवी चैतन्यप्रभा निजसमाजा

देहमायेचा दासभाव सोडा । आत्मचैतन्यप्रभा कांहिं जोडा २०
आत्मचैतन्यप्रभा चित्ति ठाणे । योगयुक्तीचें कर्म करीं बाणे
आत्मशांतीचा लाभ तया होतो । समाजाचें कल्याण साधितो तो २१
आत्ममननें चैतन्य चित्तिं ठाके । दैन्य दीनत्वें दूर पळे धाकें
आत्मचिंतनरति भरा आतचित्तीं । तुम्हां भगिनींनो ! मुख्य ही विनंती २२

## ६ सत्याग्रही यज्ञ[१] (अभंग)

आमुचा हा माल, आम्ही हा घेणार । यासाठीं होणार, तें तें होवो
स्वराज्याचा हक्क, आमुचा हा माल । घेण्यासाठीं हाल, सर्व सोसूं
असे निकराचे, सत्याग्रही पुरे । ऐक्यें वागणारे, पाहिजेत
ऐसे सत्याग्रही, व्हावे बरेचसे । तेव्हां कोठें असे, आशा कांहीं
असा हा बिकट, स्वराज्याचा वाद । कष्टावीण दाद, येथें नाहीं
स्वतां मेल्यावीण, स्वर्ग तो दिसेना । वचन हें जनां, आहे ठावें
लाखों झिजतील, स्वराज्याचे पायीं । तेव्हां इष्ट कांहीं, सांपडेल
सोडीव रे देवा, भाकती करुणा । परी ही याचना, व्यर्थ व्यर्थ
'देवा दे स्वराज्य', मागणें हें फोल । जोंवरी न मोल, पोचवीलें
हत्ती व्हावा तरी, मोल द्या हत्तीचें । येथें मुर्वतीचें, काम नाहीं
काय नाहीं ठावा, देवाचा सिद्धान्त । पहा गीताग्रंथ, उघडोनि
अनुरूप यज्ञें, तोषवावें देवा । तेव्हां इष्ट ठेवा, प्राप्त होय
स्वराज्याचे साठीं, अनुरूप यज्ञ । कोणता तो प्राज्ञ जाणतात
करा करा ऐशा, यज्ञाची तयारी । याचनेच्या भरीं पडूं नका
सत्याग्रही यज्ञ, स्वराज्याचे साठीं । केल्या जगजेठी, धावेल तो
घेतसे परीक्षा, भक्तांचे सत्त्वाची । ही तों श्रीरंगाची वहिवाट
आपुला हा गडी, गोकुळींचा राणा । जगतीं या नाना, ढंग करी
स्वराज्याचा माल, याजपाशीं आहे । आमुचें हा पाहे, सत्त्व देखा
यासी धरोनियां, हिसकावूं माल । हा तो चवचाल, ठावां आम्हां
पांडुरंग म्हणे जाऊं यज्ञकुंडीं । तेव्हांचि हा लंडी, सांपडेल

---

१. स्वराज्यशिष्टाई चालू असतां लिहिलेला (१९१९).

## ७ सर्वांचा संसार[1] (गीत)

संसार देशिंचा हा तुमचा सर्वांचा ।
संसार नव्हे हा एकाचा दोघांचा ॥धृ०॥
हा गांव, तालुका, जिल्हा, प्रांत, इलाखा
हा तुमचा तुमचा देश सर्वही ऐका । १
संसार गांवचा गांवकरी चालविती
तालुका तालुक्याचेच लोक चालविती ।
जिल्ह्याचे जन तो जिल्हा चालवितात
यापरी इलाखाकारभार करितात ।
जे प्रश्न सर्वही देशाच्या संबंधीं
ते देश सोडवी, राज्यरीति ही साधी । २
जी गांवसभा ती गांवकाम करणारी
जी देशसभा ती देशकाम करणारी ।
जे सानथोर असतात भाग देशाचे
ते भाग सभांनीं नीट चालवायाचे ।
ही राज्यरीति नवयुगीं आजच्या आहे
ही राज्यरीति बहु सरळ सबळही आहे ।
ही सिद्ध व्हावया तेथ अडचणी नसती
जरि गांवगांवचे लोक उमजले चित्तीं । ३
जें काम गांवचें, भागाचें, देशाचें
तें करणें तुम्ही हित पाहुनि सर्वांचें ।
हें काम उरकितां स्वार्थकाम टाकावा
मन मोठें करुनी कार्यशकट हांकावा ।
मातिच्याच साऱ्या चुली घरोघर असती
या म्हणींतला सत्यांश धरावा चित्तीं । ४
निर्दोष कुणीही नाहीं जन सामान्य
संभाळुनि घेती परस्परां सन्मान्य ।

१. पारनेरचें प्रवचन.

संभाळुनि घ्यावें परस्परां सर्वांनीं
जें काम देशिंचें त्यासि मान देऊनि । ५

आत्म्यांची मिळणी क्षमाशीलता करिते
जी दोषदृष्टि ती घडली घडि बिघडीते ।
आत्म्याची मिळणी हाच ब्रह्मपदमार्ग
संसार देशिंचा आत्ममिळणिचा मार्ग ।
त्या ब्रह्मसुखाची गीता-परमार्थाची
संसार देशिंचा करुनि प्राप्ति व्हायाची । ६

संसार देशिंचा करण्याचा उपदेश
श्रीहरीच तुम्हां करित असे जगदीश ।
मी सेवक हरिचा हरिस्वरूपीं वसतों
बोल तो बोलवी योग्य तया जो दिसतो ।
श्रीहरिचें माझ्या प्रेम तुम्हांवरि आहे
म्हणुनिया बोल हे मजला बोलविताहे । ७
ही माझि लेखणी वाणी माझी स्थूल
झिजवीत हरी हटवाया दुर्बल खूळ ! ।
हरि हातपाय हे माझे चालविताहे
त्या मार्गें जो त्या उद्धारक दिसताहे ।
जन–उद्धारक मद्देहयंत्र हें व्हावें
ठरविलें हरीनें, मींहि अर्पिलें भावें ।
हें देहयंत्र जन-उद्धाराचे साठीं
अर्पिता हरीसी, हरि देई मज भेटी ।
"तूं मीच मीच तूं" बोले बोल अमोल
स्वस्वरूप केलें मजला नेउनि खोल ।
हा अनुभव अनुभवि लोकां समजायाचा
हा अनुभव सर्वां कधीं तरी यायाचा ।
हरिबोल ऐकुनी लवकरि जे सांवरती
ते लवकरि अनुभव हरिभेटीचा घेती ।

हें असो; बोलणें हरिचें तुम्हां कथिलें
त्यावरी करावें मनन योग्य जरि दिसलें । ८

## ८ कवींस विनवणी[1] (गीत)

कवींनो तुम्हां ही विनवणी ॥ध्रु०॥
माझ्या घरिं-या भारतदेशीं जनसत्ता ती नसे ।
माझा जन हा दीन जाहला यासी कोणि न पुसे ।
घरीं तसें परघरीं गौरजन ! यासि वागविति कसें ।
कशास तें उद्गारुनि दावूं ठावें सकलां असें ।
ही अशी स्थिति मला राहुं देइना उगी,
मज दिसे माझिया जनिं कांहीं धुगधुगी,
हा राहिल कैसा जिवंत या नवयुगीं ।
विचारूनि हे मनिं, जगवाया स्वजनां, घ्या लेखणी ।
कवींनो ! तुम्हां ही विनवणी ॥ १
जगणें जें कां परवश केवळ जगणें तें मुळिं नसे ।
जगणें जें कां दुर्बलतेचें जगणें तें मुळिं नसे ।
देहावरि सत्ता चालावी तें जगणें जनिं खरें ।
देशावरी सत्ता चालावी तें जगणें जनिं खरें ।
ही अशी व्यक्तिची राष्ट्राचीही स्थिति,
हें नको सांगणें सर्वांचि हें जाणती,
परि कां मग तेथें परवशता दुर्गति !
तुम्ही जाणतां रहस्य याचें म्हणुनी घ्या लेखणी ।
कवींनो ! तुम्हां ही विनवणी ॥ २
प्रकाश अपुलें अन्न शिजविना विदित जनां हें असें ।
अग्निताप पाहिजे, तयाविण शिजणें शक्यचि नसे ।
अग्नि राष्ट्रभक्तिचा अंतरीं धगधग उज्वल जळे ।
जनसत्तेचें तेव्हां शिजतें अन्न तुम्हां हें कळे ।

---

१. स्वराज्यशिष्टाईप्रसंगीं लिहिलेली.

जनतेच्या चित्तीं प्रकाश करण्यास्तव,
बहु सज्ज जाहले होतिलही बांधव,
परि अग्नि जळेना तीव्रभक्तिसंभव
जनांतरीं, तों प्रकाश निष्फळ म्हणुनी घ्या लेखणी ।
कवींनो ! तुम्हां ही विनवणी ॥ ३
मी हरिघरिंचा झाडू[1] केवळ हरिच्या कार्यास्तव ।
देहाचा संकल्प सोडिला गोष्ट नसे ही नव ।
सत्तेस्तव सत्याग्रह-होमीं सुखें पडो आहुती ।
बळ माझें ही तीव्र भावना तीव्र न माझी मती ।
मति नाहीं माझी तीव्र तरी लेखन,
हें धरिलें हातीं हरिचें वच ऐकून,
मी उणीव माझी असें सर्व जाणुन,
झाडु-लेख हे उणे गुणा हें जाणुनि घ्या लेखणी ।
कवींनो ! तुम्हां ही विनवणी ॥ ४

## ९ मानवी वर्ग[2] (गीत)

सुंदरता भरली येथें संसारीं मन हें रमतें ॥ धृ०॥
वर्ग हे मानवी बघुनी मन संस्कृत जाय रमूनी ।
हा बाळबुद्धिचा खेळ जातिची गुलामी प्रबळ ।
मी मोठा तूं तर सान मी सान तुम्हीच महान । हा०
मी ब्राह्मण सर्वश्रेष्ठ तूं भंगी सर्वकनिष्ठ । हा बाळ०
तुम्ही ब्राह्मण सर्वश्रेष्ठ मी भंगी सर्वकनिष्ठ । हा बाळ०
विद्येची संस्कृति सर्व करि दूर श्रेष्ठपण-गर्व ।
विद्येची संस्कृति पावे मी नीच त्या न वाटावें ।
विद्येची संस्कृति नाहीं तेथेंचि बाळबुद्धी ही ॥ १

---

१. पुण्यास १९१७ मे–१९२० मार्च या मुदतींत रोज सकाळीं तास दीड तास बिऱ्हाडांतील शौचकूप वरून साफ करणें, आळींतील रस्त्याचा कांहीं भाग व त्यांतील मोऱ्या साफ करणें हें काम मी करीत असें.

२. पारनेरचें प्रवचन.

जन्मतों कुणाच्या पोटीं जातीची हीच कसोटी ।
मत्पिता थोर सरदार मजुराचा तूं रे पोर ।
म्हणुनि 'मी श्रेष्ठचि तुजला तूं नमुनि ऐस रे मजला । हा०
मज चक्रवर्ति रे जनक तुज निष्किंचन रे रंक ।
म्हणुनी मी श्रेष्ठचि तुजला तूं नमुनि ऐस रे मजला । हा०
ब्राह्मणी आणि ब्राह्मण हें माझें जन्मस्थान ।
म्हणुनी मी सर्वश्रेष्ठ मदितर तूं नीच स्पष्ट । हा०
वर्ग हे मानवी बघुनी मन संस्कृत जाय रमूनी ॥ २
जी विद्या-संस्कृत-दृष्टि तिजला ही जातिसृष्टि ।
मावळे निरीक्षण करितां दूसरी उदय घे बघतां ।
देहाचा पडदा त्यातें चकवीना तत्त्वज्ञानें ।
हे पडदे सूक्ष्मावरचे सर्वांचि त्या सुंदर साचें ॥ ३
आकाशीं मेघ-चितारी रंगाच्या करित बहारी ।
आकाशीं मेघ-चितारी रूपाच्या करित बहारी ।
सूर्याचे घेउनि किरण रेखितो चित्रपट छान ।
चित्रें हीं रंगीं, रूपीं रेखीत भिन्न बहुरूपी ।
चित्र एक पूर्व प्रसवे पश्चिमीं उदय कुणि पावे ।
या दिङ्नारींच्या पोटीं जन्मति हीं छोटीं मोठीं ।
रंग, रूप जन्म-स्थान कोणाचें कैसें कोण ।
हें रूप-रंग-मधु-भृंग पाहीना प्राशनिं दंग ॥ ४
सृष्टीचे पडदे स्थूळ ते सुंदर सुंदर सकळ ।
मानवी देह-पडदे हे सौंदर्यें भरले पाहें ।
रंग-रूप, जन्म-स्थान कोणाचें कैसें कोण ? ।
हें सृष्टितत्त्व-मधु-भृंग पाहीना प्राशनिं दंग ॥ ५
देहाच्या पडद्या आंत सूक्ष्माची पाहीं जात ।
सूक्ष्माची दिसली जात वर्णितां कठिण परि बहुत ।
एकांत दिसति बहु जीव त्या काय ठेवणें नांव ।
हें नामकरण सूक्ष्माचें काम एक सर्वज्ञाचें ।
तत्त्वदृष्टि बघुनी घेई नांव एक देऊं पाही ।

परि हा तंव फोल प्रयत्न हें करु जाणे सर्वज्ञ ॥ ६
एकाच देहिं बहु जीव त्या द्यावें कैसें नांव ।
घ्या एक मानवी देह हा पहा कितींचें गेह ।
कुतऱ्याचा येथें अंश बैलाचा येथें अंश
रासभही थोडा येथें थोडासा सरडा येथें ।
सर्पाचा येथें अंश कोल्ह्याचा येथें अंश ।
बोकाही थोडा येथें थोडासा रेडा येथें ।
ऐसी या पडद्या आंत सूक्ष्माची दिसते मात ।
या देहा ब्राह्मण म्हणती या देहा भंगी म्हणती ।
या देहा राजा म्हणती या देहा नांवें देती ॥ ७
रंग, रूप, जन्म-स्थान पाहुनी मान-अपमान ।
वाटिती खेळ हा साचा मानवी बाळबुद्धीचा ।
देहाचे पडद्या आंत सूक्ष्माची कैसी मात ।
हें ज्याचें त्यानें सर्व देखावें फेडुनि गर्व ।
हें गर्ववस्त्र फेडावें स्वांतरा नग्न पाहावें ।
सूक्ष्मासि नग्न पाहोनी वाइटपण अवलोकूनी ।
वाइटपण दूर करावें स्वांतरा भलें बनवावें ।
हें कार्य येथ संसारीं सुंदर हें सुंदर भारी ॥ ८

## १० दैन्य-हांक[1] (अभंग)

नव्हे हा, नव्हे हा, अशा नेति-पंथें । जाले उजळिते मुक्तिमार्ग
मुक्तिमार्ग ऋषिजनीं उजळीला । हेत पुरविला साधकांचा
साधकांचा शुद्ध हेत पुरविणें । ऋषींचें तें जिणें याचसाठीं
याचसाठीं मान ऋषींच्या समान । लोकमान्यां जन देती आज
देती आज नेति-पंथें उपदेश । जेणें हा स्वदेश मुक्त व्हावा
मुक्त व्हावा तरी 'कष्टावें आपण' । दास-शिकवण ठावी सर्वां
ठावी सर्वां परी कष्ट नाहीं गोड । स्वराज्याची जोड सुखें व्हावी
सुखें व्हावी ऐसी माया पसरली । करंटी जाहली जन-बुद्धि

१. स्वराज्यशिष्टाई चालू असतां लिहिलेली (१९१९ उत्तरार्ध).

जन-बुद्धि नष्ट, वोखटी, करंटी । वैभवाची तुटी सहजचि
सहजचि चिंता सज्जनांचे चित्तीं । कैसी पडे माती दैन्यातोंडीं
दैन्यातोंडीं माती पडो हाचि ध्यास । लागला चित्तास टिळकांच्या
टिळकांच्या जीवीं 'दास-शिकवण । शिको सर्व जन' हेचि बुद्धि
हेचि बुद्धि आज करवी शिष्टाई । 'राज्य दे ग आई' बोलवीत
बोलवीत बोल होणार जे फोल । दैन्याचें हें मोल रीतसर
रीतसर हंसें करंटेपणाचें । आणावें जनांचे अनुभवा
अनुभवा येतां स्वयें कष्टतील । कास सोडितील शिष्टाईची
शिष्टाईची नीति फजीत पावावी । नेति-पंथें यावी शुद्धि जनां
शुद्धि जनां यावी, माया दूर व्हावी । टिळकांचे जीवीं हेंचि वसे
हेंचि वसे ऐसें माझी बुद्धि सांगे । तें मी या प्रसंगें बोलियलों
बोलियलों जें तें लोकमान्यां मान्य । असो नसो; दैन्य लाजिरवाणें
लाजिरवाणें दैन्य, दास-शिकवण । तीच सोडवण एक सत्य
एक सत्य मार्ग नसेचि आणीक । मार्ग दैन्य-हांक नव्हे नव्हे

## ११ हिंदु[1] (अभंग)

देव सर्वत्र भरला, देव-भक्तासी दिसला
देव भंगी, देव मांग, देव महार श्रीरंग
भंगी हिंदू, मांग हिंदू, तैसे महारही हिंदू
हिंदूचें जें हिंदुपण, ते श्रीवेदाचें पूजन
वेदाचें जें अंतरंग, तेंचि हिंदुत्व अभंग
वेदीं देवतापूजन, देव-स्तवन, हवन
वेदांमध्यें ब्रह्मज्ञान, ब्रह्म व्हावें हें कथन
सर्वाभूतीं ब्रह्म दिसे, त्यासी उपकार पिसें
करीत तो उपकार, बळाऐसा थोडाफार
उपकार केल्याविणें, नाहीं ब्रह्माकार होणें
ज्ञान मिळविल्याविणें, नाहीं ब्रह्माकार होणें
भंगी, मांग, म्हार सारे, देवभक्ताचे सोइरे

१. पारनेरचें प्रवचन.

असा मूर्तीचे पूजक, किंवा अमूर्त-पूजक
असा कर्मकांड-सक्त, किंवा ज्ञान-मार्गी भक्त
पूज्य जयां वेद-माता, ते ते हिंदूचि तत्त्वता
श्रुति हिंदुधर्म-माता, सर्व हिंदूंचि हिंदुता
हिंदू भंगी, मांग म्हार, श्रुतीचे हे हक्कदार
मातेवरी प्रेम-सत्ता, सर्व बाळांची तत्त्वता
नको हक्काविशीं वाद, जाहला तो पुरे खेद
आतां उमजा उमजा, लागा धर्मोद्धारकाजा
काय विटाळाचें बीज, काय विटाळाचें चीज
याचा कराच विचार, नको आंधळा बाजार
तनशुद्धि, मनःशुद्धि, व्हावी हेचि धर्मबुद्धि
ऐशा बुद्धींचें साधन, तें तें ठेवावें जपून
शिवाशिवीनें विटाळ, विटाळाचाचि सुकाळ
मनावरी रात्रंदिन, विटाळाचें दडपण
वाचा नको ती बोलती, मनीं नको तें चिंतिती
अंगें नको तें करीती, परी विटाळ धरीती
काया-वाचा-मनःशुद्धि, करायाची नाहीं बुद्धि
सदा विटाळ विटाळ, सांगा काय याचें फळ
शूद्र खिस्ती जरी झाला, त्याचा विटाळ संपला
हिंदु-शूद्रासी विटाळ, खिस्ती जाहले जवळ
हिंदू हिंदू, दूर दूर, चाले खिस्त्याचा शेजार
खिस्ती असती शेजारा, त्यांचा सोसतसे वारा
परी भंगी शुद्ध होतां, तोही अशुद्ध मानितां
याचा कराच विचार, नको आंधळा बाजार
धंदा ओंगळ भंग्याचा, सांगा कोणी करायाचा
भंगी-काम घरोघरीं, होत असे परोपरी
भंगी-काम चार घरीं, करी त्यासी ठेवा दूरी
सांगा यांतील विचार, नको आंधळा बाजार
व्हावा स्वतंत्र विचार, नको आंधळा बाजार

शिवाशिवीचा विटाळ, याचा फारचि सुकाळ
यानें किती केलें पाप, त्याचें नाहींच हो माप
अपशब्दाचें कारण, वृथा द्वेषाचें कारण
अधोगतीचें कारण, असें विटाळ हें घन
माझ्या हरीचीं लेंकरें, त्यांचें करावें हो बरें
त्यांना शुद्धता शिकवा, त्यांना स्वच्छता शिकवा
देवपूजन, स्तवन, यज्ञयाग-ब्रह्मज्ञान
सर्वां सुलभ हें करा, ऐसा हरीचा हांकारा
पूर्ण सुविचार करा, हिंदूजातींना उध्दरा
हिंदुस्थानीं हिंदुजातीं, त्यांची झाली असे माती
हिंदूजातींना उध्दरा, हिंदुस्थानसेवा करा
वेदपताकेखालतीं, गोळा करा हिंदूजाती
हिंदूधर्म वेदपूजा, घरोघरीं श्रुतिध्वजा
आतां उमजा, उमजा, लागा धर्मोद्धारकाजा
हिंदूजातीचा उद्धार, तोचि हिंदुधर्मोद्धार
एकधर्मीयांच्या जाती, कर्मसंबंधानें होती
तेथें जन्मतां विटाळ, सांगा कशाचें हें फळ
ज्यांसी विटाळ जन्मतां, त्यांसी विनवितां आतां
माझे सोइरे सर्वही, मज विटाळचि नाहीं
परीं आपुल्या जनासी, आहे विटाळ मानसीं
वैश्य क्षत्रिय ब्राह्मण, हें तों आपुले स्वजन
यांना विटाळ तूमचा, प्रताप हा अज्ञानाचा
यत्नें घालवूं अज्ञान, जाया विटाळबंधन
तुम्ही मुलींना, मुलांना, विद्या शिकवा सर्वांना
विद्या शिकूनियां थोर, करा तुम्ही उपकार
वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण, शूद्र, सर्व हिंदुजन
धर्म आम्हां सगळयांचा, देवें दिलेल्या वेदांचा
वेदपूजक आपण, पुरातन हिंदुजन
हिंदुधर्म वेदपूजा, वेद हिंदुत्वाचा राजा

वेदाचें जें अंतरंग, तेंचि हिंदुत्व अभंग
आम्ही हिंदू एक सारे, वेद आम्हां तारणारे
जैसा ख्रिस्तीयांना ख्रिस्त, मोक्षमार्ग दाखवीत
जैसा मुसल्मानां रस्ता, महम्मद दाखवीता
तैसा वेदऋषिगण, आम्हां हिंदूंचें तारण
आम्ही वेदाचे अंकित, असो कोणतीही जात
वेद हिंदुत्वाचा राजा, आम्ही वेदाचीच प्रजा
आम्ही हिंदू एक सारे, वेद आम्हां तारणारे
यत्नें घालवूं अज्ञान, तोडूं विटाळबंधन
एक धर्मीयांच्या जाति, कर्मसंबंधानें होती
तेथें जन्मतां विटाळ, हें तों अज्ञानाचें फळ
आम्ही आमच्या स्वजनां, वैश्य-क्षत्रिय-ब्राह्मणां
लावूं विचार कराया, अविचार घालवाया
देव पुरवील हेत, देव भावाचा अंकित
हिंदू हिंदू दूर दूर, जाईल हा अविचार
देश येईल वरती, सूज्ञ होतां हिंदुजाती
भावें सद्यत्न करावा, हेंचि विनवणी सर्वां
देवा शेवटीं मागणें, कामीं येवो माझें जिणें
देव सर्वत्र भरला, कुणी हेंही विसरला
देवा, काढी विस्मृति, देई सर्वांसी सद्गति
देव सर्वत्र भरला, देव भक्तासी दीसला

## १२ अध्यात्माचा डंका[1] (अभंग)

थोर संतांचें हें स्थान । महाराष्ट्राचें भुवन
हरि पडावया गांठी । थोर येथें आटापीटी
महाराष्ट्रधर्मपीठ । समर्थांचें हें अवीट
येथें पंढरी नगर । संतजनांचें माहेर
येथें किल्ला शिवनेर । शिवराय-जन्मघर

---

१. १९१९ उत्तरार्ध.

महाराष्ट्रधर्ममठ । थोर मोक्षधर्म-पेठ
येथें दोन्ही अंगीं पूर्ण । आहे माझें हें ठिकाण
डंस डंका अध्यात्माचा । येथ वारा स्वातंत्र्याचा
एका श्रवणीं भरला । देहीं वारा संचरला
आतां पांडुरंग म्हणे । करो हरी जें करणें

* * *

जुना डंका अध्यात्माचा । तोचि तारक विश्वाचा
जुना डंका अध्यात्माचा । तोचि तारक देशाचा
तुम्ही ऐका सर्व जन । नीट लावूनियां मन
ध्वनि श्रवणीं भरेल । देहीं वारें संचरेल
जनसत्तावेडे व्हाल । 'देश देश' ओरडाल
'देह पडो, मन रडो । देशसेवा कांहीं घडो'
ऐसे वेडे वेडे व्हाल । जरी डंका हा ऐकाल
हातीं घेतला हा डंका । माझी चाललीसे हांका
आतां पांडुरंग म्हणे । करो हरी जें करणें

## १३ अध्यात्माचें सार (अभंग)

जुन्या अध्यात्माचें सार । आत्मसत्ता देहावर
भेदाकारी असे देह । आत्मा अभेदी विदेह
देह सूक्ष्म, देह स्थूळ । सर्व भेदांचें हें मूळ
भेदीं अभेद करावा । देहभ्रम दूर व्हावा
देहसत्ता भ्रममूळ । तिचें मिटवावें खूळ
आत्मसत्ता देहावर । चालवावी रीतसर
याचसाठीं अध्यात्माचा । सारा खटाटोप साचा

\+ \+ \+

ऋषिजन, संतजन । अध्यात्म तें यांचें धन
माझ्या महाराष्ट्रीं संत । थोर जाले जातिवंत

१. १९१९ उत्तरार्ध.

त्यांणीं अध्यात्म गाइलें । स्वदेहांत अभ्यासिलें
करूनियां अट्टाहास । केला लोकभ्रमनाश
लोकीं देहसत्ताबंड । होतें थोर जें पाखंड
त्याचा पसारा मोडिला । लोक आत्मतंत्र केला

\+ + +

संतीं अध्यात्मगायनें । अध्यात्माचे आचरणें
देहसत्ता घालविली । आत्मतंत्रता स्थापिली
तेव्हां भेद लीन झाले । अभेदाचें युग आलें
भेद गरीब श्रीमंत । कुलहीन कुलवंत
भेद अज्ञ प्रज्ञावंत । जातिहीन जातिवंत
भेद सारे लीन झाले । अभेदाचे युग आलें
अभेदाचे बळें राष्ट्र । जाहलें हें महाराष्ट्र

\+ + +

देशबाह्य सत्ता बळी । होती देशीं या दुर्बळीं
तिच्या बळाचें कारण । देहतंत्र देशी जन
जाणूनी हें संत जनीं । देहा पाडीलें हाणूनी
देहतंत्रता निमाली । जालें महाराष्ट्र बली

\+ + +

देहतंत्रतेनें भेद । आत्मसत्तेनें अभेद
अभेदाचे गुणें बळ । भेदें बळी हो दुर्बळ

\+ + +

देश-बाह्यसत्ता बळी । देशीं असे ज्या ज्या काळीं
त्या त्या काळीं त्या सत्तेचें; । बळ अंतर्भेद साचें
अंतर्भेद भीतिमूल । भीति देहसत्तामूल
अंतर्भेद लोभमूल । लोभ देहसत्तामूळ
देहसत्ता आत्म्यावरी । भ्रमबळें ही जोंवरी
जन तोंवरी दुर्बळ । देहभ्रमाचा छळ

\+ + +

देहभ्रमनिरसन । करी अध्यात्मचिंतन

ऐसा अनुभव आला । संतमार्ग हा धरीला
कांहीं अध्यात्मचिंतन । अध्यात्माचें आचरण
कांहीं अध्यात्मगायन । चालविलें अनुदिन
आतां पांडुरंग म्हणे । करो हरी जें करणें

## १४ देहाचा क्षोभ[1] (अभंग)

डंका आध्यात्माचा वाजे । देह थरारे आवाजें
म्हणे माझी राजसत्ता । येथें संपणार आतां
मन वासनांची मांदी । बुद्धि विश्वबोधच्छंदी
यांची निष्ठा माझे ठाईं । आतां राहणार नाहीं

\+ \+ \+

तुम्ही आम्ही सर्वजण । एकजात आर्यजन
ऐसें बुद्धीसी, मनासी । शिकविलें दिसमासीं
शिकवणी कामा आली । माझी बैठक बैसली
अधिराज्य माझें जालें । आत्मराज्य लया गेलें
मन, बुद्धि, सर्वजण । जाले माझे प्रजाजन
माझी बैठक बैसतां । अधिराज्य माझें होतां
बुद्धि, मन यांचे छंद । त्यांसी घातिला मीं बंद

× × ×

मन वासनांची मांदी । बुद्धि विश्वबोधच्छंदी
मनोवासनापसारा । माझ्या सोईचा न सारा
बुद्धिच्छंद विश्वबोध । जें जें गूढ त्याचा शोध
ऐशा छंदाचा पसारा । माझ्या सोईचा न सारा
कांहीं वासना मनाच्या । आत्मराजाचे ओढीच्या
कांहीं चालना बुद्धीच्या । आत्मराजाचे ओढीच्या
यांसी घातिला मीं बंद । थोर पावलों आनंद

× × ×

जालों निष्कंटक आतां । जाली कृतार्थ देह-ता

---

१. १९१९ उत्तरार्ध.

ऐसा आनंदीआनंद । भोगियला मीं स्वच्छंद
मन बुद्धि प्रजाजन । राबवूनी रात्रंदिन
घरीं भरीलें सुवर्ण । घरच्यांची केली चैन
राणी रसना, नासिका । दृष्टि, श्रवणा, स्पर्शिका
यांचे भोगा नाहीं मिति । सर्व आनंदीं पोहती
आज पुण्यांश संपला । डंका झडूं हा लागला

× × ×

तुम्ही आम्ही सर्वजण । एकजात आर्यजन
ऐसें मोहून मोहून । फोडियेली बुद्धि, मन
बुद्धि, मन फोडूनीयां । नेली आत्मसत्ता लया
मोह बुद्धीचा, मनाचा । आतां राहतो तो कैंचा
डंका झडूं हा लागला । माझा पुण्यांश संपला

× × ×

माझी कितीशी आर्यता । किती माझी अनार्यता
मन, बुद्धि, प्रजाजन । यांसी होणार हें ज्ञान
डंका झडूं हा लागला । माझा पुण्यांश संपला

× × ×

शुद्ध निर्भेळ आर्यता । आत्मराजाचीच सत्ता
मन बुद्धि प्रजाजन । यांसी होणार हें ज्ञान
डंका झडूं हा लागला । माझा पुण्यांश संपला

\+ + +

आत्मराज आर्यत्वाचें । ज्ञान होतां जनां साचें
आत्मपक्षा हे जाणार । माझी सत्ता संपणार
ऐसा क्षोभ झाला देहीं । डंका वाजतां विदेही
पांडुरंग आनंदला । म्हणे देह उद्धरला

## १५ देहाचा अधिकार (अभंग)

तोचि उद्धार उद्धार । यथाधर्म जो आचार
येथें विशुद्ध आनंद । येथें अक्षय्य आनंद

देह, मन, बुद्धि, आत्मा । सर्व अंश-परमात्मा
परमात्म-अंश नाहीं । ऐसा अणुरेणु नाहीं
भूतजातीं हा भरला । दश अंगुळें उरला
ऐशी श्रुतीची गर्जना । ऐसा अनुभव जनां
पहा गाणें मी गातसें । त्यांत सर्वत्र मी वसें
परी गायनीं भरूनी । नाहीं गेलों मी सरूनी
गाणें माझें मी गायक । गायनाहूनी अधिक
आहे सर्वत्र गायनीं । राहे बाहेरी उरोनी
माझ्या गानीं मी भरलों । दश अंगुळें उरलों
तैसा भूतीं हा भरला । दश अंगुळें उरला

\+ \+ \+

येणेंपरी देह, आत्मा । दोन्ही अंश-परमात्मा
परी देहाचे, आत्म्याचे । अधिकार भिन्न साचे
रस माझिया गीतांत । नाहीं सारखा सर्वांत
कोठें थोडा, कोठें फार । तैसा ब्रह्माचा व्यापार
रसीं परिणामभेद । रसीं तैसा गुणभेद
कोठें शांत, कोठें वीर । तैसा ब्रह्माचा व्यापार
बहुगुणीं ब्रह्म झालें । परिमाणीं विनटलें
आत्मा, बुद्धि, मन, देह । सर्व ब्रह्म-गुण-गेह
परी अधिकार भिन्न । जैसा गुण तैसे स्थान

× × ×

यथास्थान जो आचार । तोचि धर्माचा संसार
तोचि उद्धार उद्धार । निजसुखाचें माहेर
डंका अध्यात्माचा वाजे । देह थरारे आवाजें
निजसत्ता संपणार । म्हणूनीयां क्षोभे फार
परी क्षोभ हें अज्ञान । देहा होईल हें भान
आत्मदेशीं आत्मसत्ता । हाचि शुद्ध सुखपंथा
लोभ सीमा उल्लंघवी । देहा विद्रोही बनवी
लोभें देह आत्मद्रोही । फूट पाडूनि तद्रेहीं

आत्मसत्ता लया नेई । आत्मदेशीं राजा होई
परी लोभमूल सुख । नसे नित्याचें तें सुख
नित्यसुख शुद्धसुख । नित्यसुख धर्मसुख
अधिकारानें रहावें । तेणें नित्यसुखी व्हावें
ऐसा कायदा विश्वाचा । ऐसा कायदा ब्रह्माचा

× × ×

देह रक्षिता नेमिला । पंचनारीयुत केला
नारी रसना, नासिका । दृष्टि, श्रवणा, स्पर्शिका
देहाच्या या पांच नारी । पांच तैसे कर्मचारी
यांचें साहाय्य घेऊन । आत्मदेशाची राखण
जागरूकत्वें करावी । आत्मसत्ता सांभाळावी
ऐशी देहा आज्ञा झाली । परी लोभावूनि काळीं
तेणें सत्ता गुंडाळिली । देशीं माजवूनि कली

× × ×

परि कलि हा मोहाचा । नाहीं सदा रहायाचा
आतां अंत याचा आला । डंका झडूं हा लागला

× × ×

अव्यवस्था आत्मागारीं । देहें केली ती ती सारी
आतां अंतासी जाणार । धर्मव्यवस्था होणार
भवितव्य हें दिसलें । देह बापुडें क्षोभलें
परी क्षोभ हा अज्ञान । देहा होईल हें ज्ञान

× × ×

धर्मव्यवस्था होणार । तेथें देहा अधिकार
जुना परंपरागत । संतसज्जनसंमत
यथापूर्व लाभणार । नाहीं येथें बहिष्कार

× × ×

यथाधिकार वागावें । आत्मरक्षक रहावें
देहा एवढें मानलें । तरी त्याचें बुरें भलें
सर्व घालितों मी पोटीं । ऐसें बोले जगजेठी

श्रीहरीची ही व्यवस्था । देह मानेल सर्वथा
तरी देह उद्धरला । पांडुरंग आनंदला

## १६ देहाचा उद्धार[1] (अभंग)

देहा हरीची व्यवस्था । जरी मानली सर्वथा
पूर्व अधिकार याचा । आहे जो कां रक्षकाचा
त्याचा अंगीकार केला । तरी देह उद्धरला
जालें इतुकें निश्चित । स्पष्ट यांत देहहित
परी मार्ग उद्धाराचा । नाहीं मुळीं हा कामाचा
ऐसें देहानें, मोहानें । ठरविलें आग्रहानें
तरी उद्धार तयाचा । नाहीं नाहीं राहायाचा
डंका झड्डू हा लागला । देह उद्धार ठरला

* * *

यथाधर्म जो आचार । त्याचा नको अंगीकार
ऐसा मोह देहा झाला । तरी आत्मराजयाला
सत्ता त्याचे स्वदेशांत । सर्व घेणेंचि हातांत
येथें तडजोड कांहीं । आत्मराजा मान्य नाहीं

* * *

देहें माया पसरून । बुद्धि, मन प्रजाजन
आत्मराजाचे मोहिले । आत्मराज्य लया नेलें
देहराज्य एकछत्री । आत्मदेशीं या पवित्रीं
दीर्घकाल हें चाललें । देहघर स्वर्ग जालें
देहाघरीं नारी, नर । त्यांचे सुखा नाहीं पार
परी आत्मराजदेशीं । देहें केली जी कसोशी
बुद्धि, मन यांचे छंद । यांसी घातिला जो बंद
तेणें आत्मराज्य जना । आठवलें पुनः पुनः
बुद्धि मन-प्रजाजनीं । बंदी देहाची पाळूनी
आत्मराजा कळवीली । वार्ता दुःखाची आपुली

---

१. १९१९ उत्तरार्ध.

श्री वामन पोतदार, १८० शनवार पेठ पुणे २

आत्मराज राज्यच्युत । प्रजा-संसार-विरक्त
परमात्मसंगतींत । निजानंदांत राहत
तेथें वार्ता गळविली । बुद्धिमनांनीं आपुली
वार्ता बुद्धीची मनाची । ऐकुनीयां ती दुःखाची
आत्मराजा सिद्ध झाला, । राज्यभार घ्यावयाला
आतां तडजोड कांहीं । आत्मराजा मान्य नाहीं
सत्ता आपुले देशांत । सर्व घेणेंचि हातांत
ऐसें ठरवीलें त्यानें । देहा आहे खालीं येणें

* * *

डंका झडूं हा लागला । देहराज्य-अंत आला
देहा रक्षकाधिकार । देउनीयां तदुद्धार
करावयाचा विचार । आहे ठरला साचार
परी रक्षकाधिकार । देह न करी स्वीकार
तरी देहा घालूं बंद । मोडायासी त्याचा छंद
ऐसा आत्मराजयाचा । जाला निश्चय प्रेमाचा
देह-उद्धार ठरला । डंका झडूं हा लागला
एक रक्षकाधिकार । दुजा मार्ग कारागार
देहासाठीं उद्धाराचे । मार्ग असती हे साचे
हरीनें हें ठरवीलें । देहसाम्राज्य संपलें

× × ×

कारागार तो उद्धार । कैसा याचा हा विचार
तेथें शिस्त आणि प्रेम । देहा शिकवील धर्म
धर्मवृत्तीचें वळण । देहा लागतां फिरून
आत्मरक्षणाधिकार । करील तो अंगीकार
अधिकारीं या उद्धार । हें तों स्पष्ट धर्मसार

\+ \+ \+

सारज्ञान जेथें नांदे । डंकानादें तो आनंदे
क्षोभ झाला फार देहीं । डंका वाजतां विदेही
परी रंग आनंदला । देखे देह उद्धरला

## १७ अभंगगीता-गीतेचें स्वरूप[1] (अभंग)

देह-उद्धार कहाणी । गीता उद्धारक जनीं
परंतप पार्थराय । तेणें मांडीयली हाय
पाहुनीया बंधुजन । जाला मायागुणें दीन
पार्थ म्हणे बा गोविंदा । नको युद्धाचा हा धंदा
माझा देह हा गळाला । सारा उत्साह पळाला
हातीं राहीना हें धनु । उभी राहीना ही तनु
राहो युद्ध हें अघोर । माझा सुटलासे धीर

\+ + +

वीरवंशाचा मोहरा । त्याचा ऐसा बोजवारा
करणारी देहमाया । तिचा मोह दूरवाया
भगवंतें बोध केला । तोचि गीताग्रंथ जाला

\+ + +

पार्थ देहमायादास । बोध करूनी तयास
देवें नाशियला मोह । त्याचा सोडिला संदेह
'नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाऽच्युत
स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव'
जाला सिद्ध पार्थराज । करावया आत्मकाज

* * *

पार्थें देव-आत्म-काज । कालप्राप्त थोर झुंज
केलें, आप्तही मारिलें । धर्मराज्य प्रस्थापिलें
पार्थदेहाचा उद्धार । हाचि बोलिला साचार
धर्मराज्योदय झाला । देह कारणीं लागला
"यथाधिकार वागावें । आत्मरक्षक रहावें
"आत्मवचन करावें । रणीं मारावें, मरावें
"धर्मझुंज उभें पुढें । तेथें नको हीन रडे"
पार्थदेहा हरि-गीता । मान्य जाली ही व्यवस्था

---

१. १९१९ उत्तरार्ध.

हीच मान्यता उद्धार । पार्थदेहाचा साचार
यथाधर्म जो आचार । तोचि उद्धार उद्धार
(ओवी) हा अभंगगीतेचा पहिला अभंग । श्रीरमारंगसंगें पांडुरंग
गातसे जनीं देहमायाभंग । सुरंग अव्यंग रंगावया

## १८ अभंगगीता–सत्यसत्याग्रह[1] (अभंग)

पार्थदेहोद्धारकथा । उद्धारक मायावृता
हिचा प्रसंग प्रसिद्ध । महाभारतीय युद्ध
भारतीय युद्धरंग । तेथें नायक श्रीरंग
नीतिनायक श्रीहरी । आधीं सामोपाय करी
सामोपाय यथासांग । स्वयें बोलिला श्रीरंग
परी साम दुर्योधना । दंडवीरासि मानेना
रणक्षेत्र, धर्मक्षेत्र । येथें चालवूं या शस्त्र
मग होईल तें होवो । राज्य जावो अथवा राहो
मारूं, मरूं वा रणांत । नको राज्य हें दोघांत
एक आम्ही किंवा तुम्ही । भोगूं सर्व राज्यलक्ष्मी
नको राज्य हें दोघांत । दुर्योधनाचें हें मत
दुर्योधन दुराग्रही । पार्थसखा सत्याग्रही
सत्य-धर्म-राज्य व्हावें । दुर्योधनानें वांकावें
ऐसा आग्रह सत्याचा । सत्यरूप श्रीरंगाचा
दुराग्रही सत्याग्रही । दोन्ही मिळतां आग्रही
दंडोपाय-आवाहन । प्राप्त निश्चयेंकरून
दंडी किंवा दंडहीन । सत्य सदा संरक्षीन
ऐसा सत्याग्रही पक्ष । सत्यरक्षणीं सुलक्ष
दंड असो नसो हातीं । सत्यपक्ष सदा चित्तीं
सत्यासाठीं झुंजायाचें । सत्याग्रही व्रत साचें
एक सत्याचा आग्रह । नाहीं दुसरा आग्रह
शस्त्र पाहिजेच हातीं । शस्त्र न धरीन हातीं

---

१. १९१९ उत्तरार्ध.

दोनी आग्रह सुटले । एक सत्य विनटलें
शस्त्र असो, नसो हातीं । पद सदा सत्यपंथी
राखावयाचा आग्रह । तोचि सत्य सत्याग्रह

× × ×

शस्त्र न धरीन हातीं । बोलियला रमापति
परी बोल हे प्रसंगीं । दूर ठेवी सत्यसंगी

(आर्या) भीष्म ग्रीष्मतरणिसा, अर्जुन हेमंततरणिसा गमला
देव म्हणे बहु आला वृद्धाहुनि जिष्णुचाच राग मला ॥
हा शूर 'दूर ओसर' म्हणणार महाप्रभाव हा रविला
हार विलासिजनेंसा येणें कैसा प्रभाव हारविला ! ॥

× × ×

आणुनि मनीं असें ज्या धन्य म्हणति सर्व विप्र तो दास
भीष्म वधाया धांवे हरि हस्तें कवळुनि प्रतोदास ॥
पार्थाप्रति प्रयत्नें तो बळकारुण्यसिंधु राखाया
क्रोधें गर्जत धांवे सिंह जसा मत्तसिंधुरा खाया ॥

\+ + +

कृष्ण स्वरथीं चढतां समरचमत्कार मग नवा तातें
दाखविला वाहों दे न शरव्रजपूर्ण गगन वातातें ॥

—पंतभारत

घोर भीष्मार्जुनयुद्धीं । मंद झाली पार्थबुद्धि
भीष्मप्रताप वाढला । पार्थ संकटीं पडला
तेथें शस्त्र मी न धरीं । ऐशी आपुली वैखरी
तिचा तोडूनियां बंद । कृष्णें घेतिला प्रतोद
स्वयें भीष्मावरी धांवे । तोडी वचनाचे गोंवे
एक सत्याचा आग्रह । दुजे गौण सारे ग्रह
सत्य पक्षाचा विजय । हेंचि सत्याग्रहध्येय
हरि याचि ध्येयासाठीं । तोडी वाग्बंधाची मिठी
हरि सप्रतोद धांवे । रणसिंधु तैं हेलावे
पार्थबुद्धिमांद्य पळे । पार्थप्रताप उजळे

जालें हरीचें उद्दिष्ट । गेलें पार्थाचें संकट

× × ×

असो, नसो शस्त्र हातीं । पद सदा सत्यपंथीं
राखावयाचा आग्रह । तोचि सत्य सत्याग्रह

× × ×

सत्यपंथी, शस्त्र परी । नच धरवीं ना धरीं
ऐसा द्वैती सत्याग्रह । दोन ययांत आग्रह
सत्याग्रह तो अद्वैती । एका सत्यीं जेथें प्रीति
द्वैतीं जनां प्रिय द्वैत । अद्वैतीयांसी अद्वैत
दोनी आग्रह सात्त्विक । तेथें दोनी हे भाविक
आपुला तो श्रेष्ठतर । म्हणती हा भाव-जोर
आज द्वैत बहु जालें । शुद्ध अद्वैत निमालें
पाहुनी हें हरि अंगें । द्वैती सत्याग्रह सांगे
रणीं मारावें, मरावें । एक सत्य सांभाळावें
अद्वैताचा हा आदेश । जुना-हरि उपदेश
नवा आदेश मरावें । परी सत्य सांभाळावें
असा आदेश द्वैताचा । हरि बोले आज साचा
नवा आदेश सात्त्विक । जुन्याहुनीहि अधिक
आहे तुम्हां द्वैती जनां । लागा ययाच्या चिंतना
वरा द्वैती सत्याग्रह । येणें जातील दुर्ग्रह
अंतीं अद्वैत पटेल । सत्य सत्तत्त्व भेटेल
मग पटेल ही साची । वाणी शुद्ध अद्वैताची
असो नसो शस्त्र हातीं । पद सदा सत्यपंथीं
राखावयाचा आग्रह । तोचि सत्य सत्याग्रह
असो; सत्याग्रही हरी । आधीं सामोपाय करी
परी साम दुर्योधना । दंडवीरासि मानेना
तेणें युद्ध ठरविलें । तेव्हां झुंजणेंचि आलें
झुंज झुंजाया झुंजार । दोनी सेनांचे सागर
आले समोरासमोर । थोर कुरुक्षेत्रावर

तेथें पार्थ झाला खिन्न । देखूनीयां बंधुजन
मोह देहाचे मायेचा । जाला वरपडा साचा
देहें पार्थावरी मात । केली; घातला मोहांत
देहसत्ता सुरू झाली । आत्मसत्ता लया गेली
देहसत्तेचा हा पाश । तोडूनीयां हृषीकेश
देहा करवी स्वधर्म । जेणें देहाचें या शर्म
यथाधर्म जो आचार । तोचि उद्धार उद्धार
(ओवी) हा अभंगगीतेचा दुसरा अभंग
श्रीरमारंगसंगें पांडुरंग
गातसे जनीं देहमायाभंग
सुरंग अव्यंग रंगावया

## १९ विद्या[1] (गीत)

ऐका ऐका हो । विद्येचें । गाणें या मुरलीचें ॥ ऐकुनि गाणें हें । श्रीहरिचें । हित होवो सर्वांचें ॥ ऐका ऐका हो ॥ ध्रु० ॥

सुंदरता तनुची । सर्वांस । नाहीं नारिनरांस ॥ मनिंची सुंदरता । सुलभ असे ही खास ॥ ऐका ऐका० ॥ १

विद्यासुंदरता । असो मना । तनुतें व्यंगें नाना ॥ नारी ती नर तो । सन्माना । योग्य होय सर्वांना ॥ २

गुण या देहाचा । सुंदरही । लवकरी विलया जाई ॥ मांनिंची सुंदरता । यत्नेंही । वाढे शाश्वत होई ॥ ३

अक्षर-विद्याही । उघडीते । सरस्वतीमंदिर तें । मंदिरिं जाऊनी । सज्जन ते । सेविति या देवीतें ॥ ४

विद्या पोट भरी । धन देई । सत्ता कीर्ति देई । मनासि देहातें । ही समर्थी । दुःखविनाशक होई ॥ ५

गूढें जगताचीं । ही उकली । शक्ति देई थोरली ॥ भक्तांतें अपुल्या । पहा बली । पश्चिम कैशी जाली ॥ ६

सृष्टीच्या शक्ती । समजावी । जेणें कामें घ्यावीं ॥ सुविद्य मनुजांनीं ।

---

१. पारनेरचें प्रवचन.

त्यांकरवीं । जीं जीं त्यांना व्हावीं ॥ ६

निर्भय चित्ताचा । उपकारी । न्याय-मित्र व्यवहारीं ॥ विद्या बनवीते । संसारीं । मनुजातें श्रीहरी ॥ ८

अक्षर-विद्या ही । देवीचे । डोळे सरस्वतीचे ॥ दुसऱ्या ज्या विद्या हात तिचे । म्हणावेत ते साचे ॥ ९

अक्षर-विद्येनें । ज्ञानातें । सांठवितां बहु येतें । शिकुनी सांठविलें । हिच्या गुणें । वाढवितांही येतें ॥ १०

अक्षर-विद्येनें । वाढती । दुसऱ्या विद्या जगती । प्रसार विद्यांचा । करिते ती । यास्तव तिज सेविती ॥ ११

अक्षर-विद्येचा । घरोंघर । होऊं द्या अवतार । नारी नर कोणी । निरक्षर ॥ राहु न जगतावर ॥ १२

## २० हृदय उघडा (गीत)

उघडा जन हो हृदयाला । वाट करा या सूर्याला ॥ धृ०॥
उघडीलें मीं हृदयाला । सूर्य आंत हा प्रकाशला
घाण किती ही सांठवली । मजला ती सारी दिसली
सूर्यानें ती दाखविली । केरसुणी हातीं दिधली
केरसुणी, खापर, खोरें । धन्य धन्य हीं अवजारें
निर्मळतेचें सुख घ्या रे । हृदयाचीं उघडा द्वारें
हृदयकपाटें लावूनी । घाण ठेविली सांठवुनी
घाणीनें हा हृद्रोग । शोकाचा तुम्हां भोग
शोकानें विव्हल होतां । दीन मीनसे तळमळतां
शोकाचें कारण काय । शोधाया उघडा हृदय १
सूर्य वाट हा पहातसे । स्वागत त्याचें करा कसें
नाहीं हा वैरी तुमचा । दूत असे तुमच्या हरिचा
मुरलीचा सख्खा भाऊ । आलासे तुम्हां सुखवूं
विश्वव्रजगोपीगोप । आटोपा तुमची झोंप
दुःस्वप्नांनीं ही भरली । विश्रांती येथें कसली
हाय काय हें ओरडणें । बडबडणें स्वप्नीं रडणें

स्वास्थ्य नसे तुम्हां जीवीं । घाणच ही तुम्हां रडवी
मुरलीधर सूर्यस्वामी । विश्वव्रजवासिप्रेमी
दूत पाठवी उठवाया । प्रेमें सुख तुम्हां द्याया
थोर भाग्य आहे तुमचें । प्रेम तुम्हांवरी या हरिचें
नका रुसवुं हो श्रीहरिला । अव्हेरुनि या दूताला
रुसवा जरि तरि भोगाल । बहूपरी दुःखद हाल २
हालचि वाटति भोगावे । हृदय तरी नच उघडावें
सांठू द्या बहुपरि घाण । हालहौस घ्या फेडून
चालूं द्या विव्हळ होणें । दीनमीनसें तळमळणें
हाय हाय करुनी रडणें । बडबडणें धरणीं पडणें
कामावेशें तडफडणें । क्रोधानें चडफड करणें
लोभानें व्याकुळ होणें । मोहानें छाती पिटणें
मदयोगें धक्के खाणें । मत्सरचिंतेनें झिजणें
हालचि वाटति भोगावे । हृदय तरी नच उघडावें
हालहौस झाली पुरती । त्यांसच माझी ही विनती
उघडा रे उघडा हृदय । वाट पाहतो हा सूर्य ३
निर्मळतेचें सुख घ्यारे । हृदयाचीं उघडा द्वारें
ज्ञानसूर्य आला आला । विश्वव्रज सुखवायाला
दाखवील हा जी घाण । काढा ती हृदयांतून
हा भाऊ त्या मुरलीचा । दूत लाडका श्रीहरिचा
हा हरिच्या हृदयीं राही । मुरलीतें सुस्वर देई
मुरलीचें मोहक गाणें । रचिलें तें होतें यानें
गृह टाकवि टाकवि लाज । मुरलीचा ध्वनि तो सहज
शक्ति अशी त्या मुरलीतें । हाच देइ निज भगिनीतें
गोपींनीं हृदयीं धरिला । श्रीहरि मधु मुरलीवाला
परम सुखाचे सागरिं त्या । आनंदें झाल्या रमत्या
ही करणी ज्या भावाची । तो चिंता करितो तुमची
दाखवील हा जी घाण । काढा ती हृदयांतून
अंतर निर्मळ झालेलें । प्रेमसडा शिंपडलेलें

पाहुनि घेउनि येइल हा । श्रीहरिसी तुमच्या गेहा
भक्तीनें गोपी व्हाल । परमसुखें मग भोगाल ४

## २१ मोक्षमार्ग (गीत)

आनंद जनां वाटावा मज हाचि मोक्षपथ ठावा ।। धृ०।।
मज आनंदाचें वेड आनंदचि सकलां गोड ।
मुक्तिधाम हरिपद मागे मनिं काय तयाच्या वागे ! ।
'आनंद थोर अक्षय्य व्हावा मज' हें तद्धयेय ।
जें अचित् तें न अक्षय्य अनुभवें सिद्ध हें होय ।
अक्षय्य चिन्मयानन्द त्याचाचि सज्जना छंद ।
अक्षय्य चिन्मयानंद त्या नाम सच्चिदानंद ।
त्याचाचि सज्जनां छंद सकलांसि इष्ट आनंद ॥१॥
आनंद इष्ट सकलांचें हें प्राप्त कसें व्हायाचें ? ।
चित्-चैतन्याची सेवा मिळवूनि देइ हा मेवा ।
चित् निजदेहीं परदेहीं वावरतें एक विदेही ।
हें एक सर्व भूतांत नानापरि लीला करित ।
ओळखूनि याची मात वागती सुजन जगतांत ।
'ज्ञानाची धरणें कांस जनसेवेचा हव्यास ।
भूतमात्रिं चैतन्यास सुख देण्याचा अभ्यास ।'
हा मार्ग सुजन धरितात आनंद याच मार्गांत ॥२॥
आनंदमार्ग हा वरिला या मार्गिं दुःख देहाला ।
पाहुनि हें प्रेमळ कोणी दुःखानें घेती धरणी ।
यापरी आप्तइष्टांतें सुजनही देति कष्टातें ।
आप्त इष्ट प्रेमळ मित्र टाकूनि दुःखिं सर्वत्र ।
'देश देश' घेती ध्यास 'विश्व विश्व' घेती ध्यास ।
चैतन्यमूर्ति आप्तादि त्या दुःखद होउनि आधीं ।
चैतन्यमूर्तिमय देश त्यासाठिं भोगिती क्लेश ॥३॥
हा मार्ग असा नवलाचा हा कैसा आनंदाचा ? ।
हें सांगुनि काय कळेल अनुभवेंचि हें उमजेल ।

आप्तादिक दुःखी होती पाहूनि आप्त-आपत्ति ।
मित्रादिक दुःखी होती पाहूनि मित्र-आपत्ति ।
हें दुःख शमे काळानें सुविचारें ज्ञानबळानें ॥४॥
'हा आप्त, मित्र, आपत्ति भोगितो कशासाठीं तीं ।
'हा आप्त, मित्र, आम्हांस देतसे कां न सुख-आस ।'
करितां हा पूर्ण विचार दुःखासि होय उतार ।
'चैतन्यमूर्ति हा एक चैतन्यें सेवि अनेक ।
सुख अधिक अधिक सेवेचें म्हणुनि हा न दुःखें कांचे ।
आप्तादिक वर्ग लहान देशादिक वर्ग महान ।
देशादिक सेवा मोठी आप्तादिक सेवा छोटी ।
हें खरें; दोषि हा नाहीं सुजनोचित मार्गी राही ।
सुजनासि सुजनतानंद तो भोगी हा स्वच्छंद ।
हें कळे आप्त-मित्रांस मग जाई दुःख लयास ॥५॥
यापरी सुखी सुविचारें शेवटिं जन होती सारे ।
म्हणुनीच सुजन सुविचारी चित्सेवा अंगीकारी
'ज्ञानाची धरणें कांस जनसेवेचा हव्यास ।
भूतमात्र चैतन्यास सुख देण्याचा अभ्यास ।'
हा मार्ग सुजन धरितात आनंद याच मार्गांत ।
आनंद जनां वाटावा मज हाचि मोक्षपथ ठावा ॥६॥

## २२ आनंदाचा धंदा (अभंग)

नित्य आनंदाची गांठ बांधा बांधा । आनंदाचा धंदा माझे घरीं
नित्य आनंदाचें मांडिलें दुकान । या या ज्यांचें मन खिन्न झालें
जुना पुराणा हा माल या खेदाचा । विकत घ्यायाचा धंदा येथें
नवा सदा नवा नित्य आनंदाचा । माल विकायाचा धंदा येथें
जुना देऊनीयां नवा घ्यावा माल । नव्याचें या मोल करूं नका
घासाघीस नाहीं येथें घेणारासी । मानेल जी ज्यासी किंमत ती
शिव्यांची लाखोली हृदयाची खोली । जी ज्यासी मानली किंमत ती
गांठ बांधा नित्य आनंद–मालाची । खूप भरगची माल भरा

जाईल तितुका तेवढ्याची गांठ । येथें हीच अट माल न्याया
वाहा खांद्यावरी अथवा वाहक । एक वा अनेक करा करा
ज्याचा त्यानें येथें वाहक आणावा । माल नेववावा जाईल तो
जागजागीं मालविक्रीचीं दुकानें । आमुच्या धन्यानें ठेवियेलीं
मुनीम मी एक ब्रह्मशेटजींचा । नव्या दुकानाचा नगरीं या
मालक अमुचा माल जो जो धाडी । ठेवितों बिऱ्हाडीं काळजीनें
बिऱ्हाड हें माझें रस्ता आणि घर । देहाचा संचार जेथें जेथें
बिऱ्हाडींच आहे दुकान मालाचें । ब्रह्मशेटजींचे नांवावरी
ब्रह्म हीं अक्षरें दुकानाचे वर । लिहिलीं सुंदर दिव्य रसें
कारखानदार ब्रह्मशेट थोर । त्यांचा व्यवहार सर्व काल
सर्व स्थलीं मालविक्रीचीं दुकानें । ज्यासी जेथें जाणें तेथें जावें
दुकानें मोडती मुनीमांचे नांवें । ऐशी झाली सवे गिऱ्हाइका
वेदाचें दुकान बुद्धाचें दुकान । ख्रिस्ताचें दुकान नांव देती
महंमद शेट महावीर शेट । झरदुष्ट्र शेट नांव देती
शेटजी शंकर मध्वरामानुज । मुनीमांचे चोज गिऱ्हाइका
मोझेस् कन्फ्युशिअस दयानंद ताजा । मुनीमांच्या चोजा बंध नाहीं
चैतन्य नानक रामदास तुका । तुलसी-आदिकां ओळखिती
दुकानें मोडती मुनीमांचे नांवें । ऐशा झाली सवे गिऱ्हाइका
ब्रह्म शेटजींचीं सर्व हीं दुकानें । विविध मालानें भरलेलीं
जैसा जो मुनीम लाभला धन्याला । माल तैसा त्याला पुरवीला
मुनीमांनीं मालाची या विक्री केली । जैशी ज्यासी झाली बुद्धि तैशी
नको पारायण घडल्या गोष्टींचें । आहे पुष्कळांचे कानांवरी
पारायणें नाहीं खेद दूर जात । नाहीं घरीं येत नित्यानंद
सर्वकाळ सर्व स्थळींचा व्यापारी । त्याचा या नगरीं माल आहे
मुनीमांचे नांवें न चालो दुकान । येणें नुकसान झालें झालें
ब्रह्मशेटजींचीं दुकानें हीं सारीं । झालेलीं होणारीं सर्व सर्व
नित्यानंदमाल-कारखाना नाहीं । अन्य कोणाच्याही घरीं जाणा
कोठूनीहि माल खरेदी हा करा । दिसे जेथें बरा तेथें घ्यावा
प्रती या मालाच्या गिऱ्हाइकासाठीं । लावोनी या गांठी बांधियेल्या

प्रत्येक गांठींत नानाढंगी माल । प्रत्येकीचें मोल मानेल तें
प्रत्येक गांठींत पटेल तो माल । काढोनी बांधाल नवी गांठ
तरी सर्वोत्तम होईल हा सौदा । गांठ भेदाभेदा वाव नको
मांडिलें दुकान जाहीर कराया । लागे ठायां ठायां बोलणेंही
शेटजींचा माल खपावा यासाठीं । करूं आटापिटी होईल ती
ब्रह्मशेटजींचीं बहुत दुकानें । मानेल तें घेणें कोठें तरी
नाहीं आग्रह कीं याच दुकानांत । करा यातायात खरीदीची
नित्यानंद माल जेथें दिसे गोड । जेथें जीव-कोड पुरवावें
आज दिसे गोड उद्यां तो पटेना । तरी या दुकाना नवा घ्याया
होऊं द्या मालाला कितीही दिवस । परत तो खास घेऊं येथें
नवा रुचेल तो माल उचलावा । पुराणा टाकावा दुकानांत
अथवा पुराणा घरांत असावा । नवाही आणावा ऐसें वाटे
तरी शेटजींना तेंही गोड आहे । नवा मांडिलाहे नेण्यासाठीं
नका आणूं येथें जुना घरांतला । आमच्या धन्याला हांव नाहीं
एकचि धोरण माल विकण्याचें । आमुच्या धन्याचें मन थोर
किंमत मालाची मानेल ती द्यावी । शून्य वा आघवी जीववृत्ति

## २३ विद्या (गीत)

ऐका ऐका हो । विद्येचें । गाणें या मुरलीचें । ऐकुनि गाणें हें । श्री-हरिचें । हित होवो सर्वांचें ॥ ऐका ऐका हो ॥ धृ० ॥

सुंदर संसारीं । दुःखांनीं । रडवीली ही धरणी । पाहुनि श्रीहरिनें । अवतरुनी । योग दिला सांगूनी ॥ १ ॥

कर्मी कौशल तो । योग असे । वदला श्रीहरि ऐसें ॥ पाहूं आपण तें । योगपिसें । कौशल ही कायसें ॥ २ ॥

'कौशल्य' कुशळपणा । कर्माचा । कुशळपणा तो साचा । धोपट मार्ग धरा । सौख्याचा । असे योग नांवाचा ॥ ३ ॥

होई नित्याचा । सुखयोग । होई दुःखवियोग । ऐसा सुंदर हा । उद्योग । नांव जयासी योग ॥ ४ ॥

कर्में देह करी । त्याकरवीं । सुंदर कर्में व्हावीं । यास्तव मनामधें ।

वृत्ति हवी । सर्वपरी ती बरवी ॥ ५ ॥

बरवी वृत्ति मनीं । व्हायासी । बुद्धि पाहिजे खाशी । खाशी ती व्हाया । ज्ञानासी । लाविणेंच सेवेसी ॥ ६ ॥

ज्ञानाचा मार्ग । देखावें । ऐकावें वाचावें । त्यावर मनन पुरें । तें व्हावें । नंतर अभ्यासावें ॥ ७ ॥

अभ्यासावें जें । मननानें । गोड दिसे आचरणें । विचारवृत्तींना । मार्गानें । अभ्यासानें नेणें ॥ ८ ॥

विचारवृत्तींना । मार्ग बरा । सुंदर दाखविणारा । त्रिगुणी वाटाञ्या । हाचि खरा । याविण नाहीं दुसरा ॥ ९ ॥

यासी वेदान्तीं । श्रवण । मनन निदिध्यासन । ऐसें नांव असे । सज्जन । सुखि याचें ऐकुन ॥ १० ॥

कर्मीं कुशळपणा । तो योग । नित्यसुखाचा मार्ग । याया कुशळपणा । उद्योग । व्हावा ऐसा दीर्घ ॥ ११ ॥

हरिच्या संसारीं । सुंदरता । भरलीसे तत्त्वता । येथें दुःखाची । दुर्वार्ता । अज्ञानाचि सर्वथा ॥ १२ ॥

विद्याहीनपणा । दुःखाचें । मूळ असे तें साचें । विद्या पूर्ण खरी । सौख्याचें । स्थान तेंचि नित्याचें ॥ १३ ॥

अग्नी जल वायु । काम करी । वीजहि करी चाकरी । विश्वाचीं तत्त्वें । सुज्ञकरीं । सुखकर होतीं सारीं ॥ १४ ॥

आत्मा, मन, देह । हे तीन । सांगे समजावून । आत्मा–परमात्मा– । बंधन । सांगे समजावून ॥ १५ ॥

विभक्त आत्म्यांचें । एकपण । सांगे समजावून । जड जें विश्व दिसे । त्यांतून । करवी आत्मदर्शन ॥ १६ ॥

विचार आत्म्याचा । करवून । नित्यानित्य ज्ञान । विद्या देत असे । यांतून । जन्म घेति सद्गुण ॥ १७ ॥

## २४ शिकण्याचें सार (अभंग)

शिकूनि शिकणें कामासी लावावें जेणें सुखी व्हावे कांहीं जन ।
हेंचि हेंचि सार असे शिकण्याचें नाहीं तरी त्याचें फल काय ।

सत्य हें बोलणें असे सज्जनांचें जन्म वेंचे ज्यांचे उपकारीं ।
लोकांचें कल्याण सुराज्याचें ब्रीद, नीतीचें विशद सांगणें हें ।
विनवणी माझी राजसेवकांसी न्यायाच्या ब्रीदासी सांभाळा हो ।
सत्तेचा हो अंश तुम्हीं मेळविला काळिमा तयाला लावूं नका ।
मनीं तुमच्या हो नका मळ ठेवूं नका कोणी देऊं मंत्र खोटा ।
आमुची रयत अडाणी ही फार तियेवरी धार धरूं नका ।
अडाणी दुबळे त्यांसी जें गांजणें त्यासी कोण म्हणे पुरुषार्थ ।
असो हेंचि तुम्हां सज्जनां मागणें न्यायानें करणें राज्यकार्य ।
आतां विनवीतों तयां सज्जनांसी म्हणती जे मशीं 'धन जोडा' ।
हिताचा करितां तुम्ही उपदेश तुम्हां परमेश धन देवो ।
काय करूं माझें बुद्धिबळ थोडें लोकांकडे ओढे माझें चित्त ।
माझे घरीं दैन्य तैसें किती घरीं हिंदुस्थानभरी मज ठावें ।
माझा हिंदुस्थान माझीं सर्व घरें हें मज ईश्वरें शिकविलें ।
काय देऊं माझ्या कोटि भावंडांसी काय मी घरासी माझ्या देऊं ।
हिशोब मीं केला माझिया बळाचा लोकगरजांचा तैसाचि तो ।
हिशोब पाहूनी हरि बोले साचें नको रे धनाचेसाठीं राबूं ।
जा जा सांगे माझा लोकांसि निरोप जेणें भवताप लया जाई ।
हरीचा हिशोब हरीनेंच केला संदेह फेडिला माझा सारा ।
आलों सांगावया हरीचा निरोप जेणें भवताप लया जाई ।
हरी माझा पोटीं अपराध घाली असे तो माउली भाविकांची ।
भाविकांचें ब्रीद हरीचें वचन न मोडणें जन कांहीं म्हणो ।
भाविकांशीं हरी बोलतसे गुज स्वानुभवें मज कळों आलें ।
अपराध केले तयासी सांगावे मन लववावें तयापायीं ।
प्रत्यहीं आपुल्या विसाव्याचे वेळीं हृदयाची मळी काढावीच ।
प्रतिदिनीं वावरतां वेवहारीं मळ मनावरी बसतसे ।
झाडलोट व्याप प्रत्यहीं न केला तरी तो माजला उकिरडा ।
नका माजूं देऊं उकिरडा मनीं रोज केरसुणी फिरवा हो ।
'शुद्ध राहुनीयां पर-उपकारीं झिजेन संसारीं मनीं घोका ।
मनीं घोका मनापासूनी हा धडा इंद्रियांचा ओढा तेथ लावा ।

नाक, डोळे, कान, रसनाही त्वचा उपयोग यांचा ज्ञान व्हावें ।
झालें ज्ञान तें तें योजा उपकारीं नाहीं तरी सारी विटंबना ।
माझें माझें म्हणा परी माझेपण अंतरीं पुसोन विस्तारावें ।
देह एक, दोन, तीन, चार, पांच टाकुनि संकोच माझे म्हणा ।
देह आईबाप बहीणभावांचे बायकापोरांचे माझे म्हणा ।
देह ग्रामस्थांचे देशींच्या जनांचे अखिल भूतांचे माझे म्हणा ।
विस्तारा यापरी माझेंमाझेंपण ठेवा आचरण बोलाऐसें ।
साधेल तितुका गिरवा हा धडा श्रीहरीचा ओढा जरी तुम्हां ।
धडा हा गिरवा यानेंचि श्रीहरी भेटेल अंतरीं भाविकहो ।
शिकुनि शिकणें लाभ तुम्हां झाला तसा अडाण्याला होईलची ।
निरक्षर कोणीं रहावें न देशीं अशीच कसोशी करा करा ।
जें जें चांगलें तें निश्चयें करावें तरीच दिसावे त्याचे पाय ।
त्याचे पाय ज्यांना हवेसे वाटती ते ते करिताती त्याची आज्ञा ।
त्याची आज्ञा द्यावें अज्ञान्यासी ज्ञान जें कांहीं झटोन मिळविलें ।
करा करा कांहीं यावरी विचार जोडितों मी कर सज्जनांसी ॥

## २५ देशभक्ति (गीत)

देश देश ऐसा सोस कधीं तुम्ही घ्याल ।
    कधीं मोक्षमार्गावरती वाटसरू व्हाल ॥ धृ०॥
तोचि सुदिन या देशाचा तूमच्या जिवाचा ।
    तुम्हां मोक्षरस्ता नाहीं अन्य मिळायाचा ॥
स्वजन विश्वजन हा सारा, धरा मनीं नीट ।
    जुलुम-शत्रु व्हावें तुम्हीं सदयहृदय धीट ॥
स्वजन देशिंचा तो अपुला आप्त निकट साच ।
    भार देशसुखदुःखाचा आपुल्यावरीच ॥
सभा, संघ, मंडळ, मेळा करुनि एकजूट ।
    देशदुःख निवटित जावें मोडुनियां फूट ॥
सान थोर कटकटि घरच्या तशा जातिच्याही ।
    जशा अम्हां तैशा असती अन्य-देशियांही ॥

परि देशसंकटकाळीं अन्यदेशवाळीं ।
  देशभक्ति उसळे, होई पक्षभेदहोळी ॥
सान थोर कटकटि साऱ्या दूर ठेवुनीयां ।
  देश देश म्हणुनी उठती देश सांवराया ॥
फूट नागवीते देशा, सांवरिते जूट ।
  फुटींचेचि फांटे येथें, जुटीचीच तूट ॥
फूट फोडुनीयां सारी जूट जोडुनीयां ।
  देशदुःख निवटायातें चला हो झणीं या ॥
देशदुःख निवटायातें कष्टती तयांना ।
  हात हरी देउनि नेतो मुक्तिच्या ठिकाणा ॥
स्थान मुक्तिचें तें आहे जवळि अंतरींच ।
  परी पोंहचेना तेथें स्वार्थ-काम नीच ॥
स्वार्थ-काम अज्ञानाचा असे हा पसारा ।
  यथाकाल होइल जगतीं जन प्राज्ञ सारा ॥
बाल–तरुण–वृद्धत्वाची प्रथा सर्वगामी ।
  बाल–जीव–आत्मे ते जे स्वार्थ–काम–कामी ॥
देहबाल्य जातां जैशी नवी दृष्टि येते ।
  आत्मबाल्य जातां तैशी नवी दृष्टि येते ॥
तरुण शरीराला जैशी काम–भोग–वांछा ।
  तरुण आत्मयाला तैशी आत्म–योग–वांछा ॥
वृद्ध देह जाई मिळुनी पंचमहाभूतीं ।
  तसा वृद्ध आत्मा मिळतो एक-सर्व-भूतीं ॥
देह पंचभूतांचा तो पंचिं मिळुनि जाई ।
  जीव एक सत्तत्त्वाचा एकिं मिळुनि जाई ॥
देह सर्व काळें जाती मिळुनि कारणांत ।
  तसे जीव-आत्मे काळें मिळति कारणांत ॥
मार्ग देहलय होण्याचा जसा नियत येथें ।
  मार्ग आत्मलय होण्याचा तसा नियत येथें ॥
देह आणि आत्मा यांचें साम्य एवढेंच ।

लयस्थिती दोघांची या सारखी नसेच ॥
देहलयें देहाचें या मिटे सर्व खातें ।
आत्मलयें आत्मा पावे सदाचे सुखातें ॥
असा आत्म-लय होण्याचा मार्ग जगत्सेवा ।
जगत्सेवकत्व न होई जंव न देशसेवा ॥
म्हणुनि मन्मुखानें हरि हा सांगतो विचार ।
देशभक्तिमार्गें एका मुक्ति लाभणार ॥

## २६ कन्या (अभंग)

जन्मा लेंकरूं जें आलें, त्याचें करावें हो भलें ।
असो कन्या असो पुत्र, परब्रह्म हें सर्वत्र ।
जैसें कौतुक पुत्राचें, तैसें करावें कन्येचें ।
विद्या दोघांसी शिकवा, विद्या मोक्ष देई जीवां ।
होवो लग्न बाळपणीं, परी नको ती गांजणी ।
सासूघरींच्या साजणी, आठवा हो चक्रपाणि ।
छळ तूमचा जो झाला, करा अर्पण देवाला ।
नका घेऊं हो बदला, नका छळूं या सुनेला।
जसा पुत्र तशी सून, दोघां विद्या द्या झटून ।
प्रेम पुत्रासी सुनेसी, प्रेम द्यावें हो दोघांसी ।
सासू-घर, माता-घर, नको प्रेमाचें अंतर ।
प्रेम दोन्ही घरीं मिळो, विद्या दोन्ही घरीं मिळो ।
पुत्रासुनेचें कल्याण, तेंचि करा सर्वजण ।
विद्यादान, प्रेमदान, हेंचि करील कल्याण ।
नाहीं विद्या कांहीं दिली, छळणूक केली केली ।
तरी सूडबुद्धि वाढे, मग दुःखची रोकडें
करी मूर्खताही पाप, करी सूडबुद्धि पाप ।
ऐशी सून पाप करी, पाप वडिलांच्या शिरीं ।
छळण्यानें नव्हे बरें, महापापी छळणारे ।
महापापी होऊं नका, घ्या घ्या प्रेमाची पताका ।

प्रेम राहो घरोघर, प्रेमें होईल उद्धार ।
सुने वैधव्य तें आलें, प्रेमें करा तिचें भलें ।
वय तरुण सुनेचें, पतीविण तें जायाचें ।
असे कठिण कठिण, पहा अंतरीं शोधून ।
जिनें निश्चयाचि केला, पुनः नको पति मला ।
तिनें व्रतस्थ रहावें, देशकल्याणीं झटावें ।
विद्याधन मिळवावें, देशकारणीं लावावें ।
ऐसी सती निश्चयाची, थोर राशि ती पुण्याची
जिचा निश्चय होईना, राहवेना पतीविना ।
अशी दीन कन्या सून, तिचें करणेंच लग्न ।
नको वैधव्य भोगणें, नको पापांत पडणें ।
जिचें लग्न नाहीं केलें, तिनें देहा विटाळीलें ।
गुप्तपणें भोग भोगी, कन्या, सूनही अभागी ।
याचें पाप वडिलांना, पहा विचारून मना ।
गुप्तपणें पोट पाडी, कन्या, सूनही बापुडी ।
याचें पाप वडिलांना, पहा विचारून मना ।
कन्या, सून हो निःसंग, उजेडांत भोगी भोग ।
याचें पाप वडिलांना, पहा विचारून मना ।
ऐशा भोगाची संतति, तिची होतसे माती ।
याचें पाप वडिलांना, पहा विचारून मना ।
नाहीं कन्येचा उपाय, नाहीं सुनेचा उपाय ।
तारुण्यांत भोगावीण, शुद्ध राहणें कठीण ।
वृद्ध जख्खही म्हातारे, पोरी नाडीती बिचारे ।
वृद्ध पुरुष गुलाम, ऐसा प्रबळ हा काम ।
तेथें तरुण नारीचें, बळ कैसें चालायाचें ।
जिचें चालतें ती सती, वंद्य सर्वांसी जगतीं ।
नरनारी साधारण, राहीनात भोगावीण ।
हें तों ठाउकें सर्वांसि, दोष नाहीं विधवेसी ।
विधवेनें पाप केलें, वाडिलांच्या वांट्या आलें ।

करा करा सुविचार, नको आंधळा बाजार ।
काम नारींत, नरांत, सारिखाच या दोघांत ।
तेथें हक्क पुरुषांसी, तेचि असावे स्त्रियांसी ।
राहो सुखें ब्रह्मचारी, नर अथवा ती नारी ।
करो विधुर विवाह, करो विधवा विवाह ।
साठा वर्षांचा विधुर, मांडी नवा संसार ।
पोर तरुण पाहुनी, घेतो विवाह करुनी ।
आठा वर्षांची विधवा, तीतें दुःखाचाच ठेवा ।
जन्मवरी या पोरीनें, हाय हायाचि करणें ।
सांगा यांतील विचार, नको आंधळा बाजार ।
लग्न होय थोरपणीं, तरी इतुकी न हानि ।
विद्या शिकत असावी, देहवाढ पुरी व्हावी ।
देहवाढ पुरी होतां, पति व्हावासें वाटतां ।
कन्येचें या लग्न व्हावें, हेंही दिसतें बरवें ।
बालविधवा न होती, जरी ऐशी लग्नरीति ।
विवाहाचा हेतु काय, मनीं विचारा सदय ।
तारुण्यांत नारीनर, अंगसंगाचे किंकर ।
जरी तारुण्यही जाई, अंगसंग-भूक राही ।
तपोनिष्ठ तेही झाले, अंगसंगाचे भुकेले ।
ऐसा अंगसंगकाम, करी जगीं धूमधाम ।
त्यासी योग्य मिळो अन्न, याचसाठीं आहे लग्न ।
अंगसंगें बाळें होतीं, त्यांची होऊं नये माती ।
त्यांचें व्हावेंच कल्याण, याचसाठीं आहे लग्न ।
आहे पत्नी ज्याला घरीं, तोही भोगी दुजी नारी ।
आहे पति जिला घरीं, तीही परसंग करी ।
ऐसे किती नारीनर, याचा कराच विचार ।
ऐसा अंगसंग काम, करी जगीं धूमधाम ।
त्यासी योग्य मिळो अन्न, याचसाठीं असे लग्न ।
याचसाठीं विधवेचें, लग्न व्हावेंच रीतीचें ।

पतीवीण राहूं म्हणे, नको तिचें लग्न होणें ।
राहवेना पतीविणें, लग्न तियेचें करणें ।
नको वैधव्य भोगणें, नको पापांत पडणें ।
मुनि पराशर म्हणे, विधवेसी पति देणें ।
भूतदया मनीं म्हणे, विधवेसी पति देणें
पापभय मनीं म्हणे, विधवेसी पति देणें ।
पुण्यप्रेम मनीं म्हणे, विधवेसी पति देणें ।
समदृष्टि मनीं म्हणे, विधवेसी पति देणें ।
जनसंसार सुंदर, व्हावा हेंचि स्मृतिसार ।
जेणें सुंदरता नासे, पाप अधिक होतसे ।
ऐसी रीति पापकारी, नको आज ती संसारीं ।
विधवा ती जन्मवरी, राहो संन्यस्त संसारीं ।
ऐशी जुलुमाची रीति, देई समाजा दुर्गति ।
कोण्या एका मुनिकालीं, असो कोणा मान्य झाली ।
परी आज पापकारी; नको यास्तव संसारीं ।
बाळें पुनर्विवाहाचीं, सुखें राहतील साचीं ।
कामीं येतील देशाला, देश पुढें न्यावयाला ।
देह देशाचे करीतां, नका विसरूं हें आतां ।
देहापासूनि जे देह, जन्मवीत हा विवाह ।
तेही देशाचे करीतां, नका विसरूं हें आतां ।
करा विधवाविवाह, व्हावे देशासाठीं देह ।
बाळें देतसे हें लग्न, कामदुःख होय भग्न ।
पाप कमी होत असे, सुख वाढतें कांहींसें ।
पुण्य अधिक होतसे, समदृष्टि मनीं ठसे ।
हाच मार्ग विवेकाचा, थोर शांतीचे सुखाचा
करा यावरी विचार, नको आंधळा बाजार ।

## २७ कवींस विनवणी (गीत)

कवींनो तुम्हां ही विनवणी ॥ धृ० ॥
वाणी तुमची आणी हृदयीं लहरी लहरी क्षणीं ।
अशी शक्ति ही तुम्हां लाधली सांगा मज कोठुनी—
नको वृत्त तें अथवा दाता, धाता कोणी असो ।
मूळ नदीचें, कूळ ऋषीचें वृथा विचारीतसों ।
राहुं द्या नको वृत्त तें मला ।
तुम्हांवरि 'फिदा' असे आजला ।
सुंदरी वाग्देवी चित्कला ।
असे फिदा ही म्हणुनी लावा झणीं राष्ट्रकारणीं ।
कवींनो ! तुम्हां ही विनवणी ॥ १ ॥
अनेक सज्जन रसिक, रसिकमनमोहन मत्कृति नसे ।
परी कसा मी उगी राहुं हो ! परवश झालों असें ।
हरी माझा हा गडी, जाहलें हरि-वश माझें मन ।
हजार गोष्टी सांगुन करवी कृति नीरस हातुन ।
अर्जुना चाप घेववी हरी ।
तुम्हांला विदित असे ती परी ।
अवश मी हरिचा सेवेकरी ।
असें, म्हणुनियां रसिक जनांस्तव घ्या हो घ्या लेखणी ।
कवींनो ! तुम्हां ही विनवणी ॥ २ ॥
जरी कुणाला रसिकासाठीं-हरिसाठीं लेखणी ।
घ्यावी, ऐसें मनीं वाटलें तरी एक सांगणी ।
माझी-हरिची-मनीं वागवा; भारत-उद्धारक ।
स्वयंशासन-प्रेमोत्पादक लिहा काव्य-कौतुक ।
स्वराज्या साधन सत्याग्रह ।
एक हा भारतरोगापह ।
याविणें जो साधनसंग्रह ।
उणा पडे तो गुणा जाणुनी चालविणें लेखणी ।
कवींनो ! तुम्हां ही विनवणी ॥ ३ ॥

## २८ खेळाडू हरि (गीत)

जीवसृष्टिनियमांचें हें असे एक सार ।
विमल परहितार्थी जीवां मोक्ष लाभणार ॥धृ०॥
संत परहितार्थी मुक्त सर्व व्हावयाचे ।
कुणी पुढें कोणी मागें हळू जावयाचे ॥१
कुणी पुढें कोणी मागें हळू चालणार ।
सर्व अंतिं हरिच्याजवळी बाळ पोंचणार ॥२
हरीचाचि माझ्या आहे सर्वही पसारा ।
हरी खेळवीतो येथें आम्हां सान-थोरां ॥३
हरी पहा खेळाडू हा खेळतसे खेळ ।
स्वस्थ राहिना हा, आहे खेळ-भक्त बाळ ॥४
खेळ कायद्यानें खेळे; कायदे बघूनी ।
खेळ खेळती या हरिशीं सुखी ते निदानीं ॥५
सृष्टिनियम हरिखेळाच्या कायद्यांसि नांव ।
सुखी तेचि जे का यांचा लावितात ठाव ॥६
दिली अम्हां बुद्धी हरिनें कायदे शिकाया ।
शिकुनि कायदे खेळाचे सदा सुखी व्हाया ॥७
नीट कायद्यानें जरि हा खेळ खेळलांत ।
तरी दुःख गळुनी सारे सुखी व्हाल मुक्त ॥८
असा शब्द विश्वासाचा दिलासे हरीनें ।
चला खेळ खेळूं या हो नीट कायद्यानें ॥९
शब्द दिला हरिनें माझ्या अनुभवासि आला ।
खेळ खेळतां रीतीनें सुखी जीव झाला ॥१०
कुणी म्हणति विटलों आम्ही नको खेळ आतां ।
दुःख बहुत येथें सुख ये फार अल्प हातां ॥११
खेळ खेळण्याचा वीट श्रीहरीसि नाहीं ।
तेथ वीट तुम्हां आला तरी व्यर्थ, भाई ॥१२
"क्रार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः"

खेळ तुम्हां खेळविणार स्वभाव हा माझा ।
हरि स्पष्ट सांगे ऐसें मनीं विचारा जा ॥१३
वीट तुम्हां येतो केव्हां दुःख होइ तेव्हां ।
वीन न ये खेळाचा या सुखी असा जेव्हां ॥१४
डाव कांहिं पडतो खोटा तुमच्याच हातें ।
दुःख फल तयाचें; सांगा कुणी भोगणें तें ॥१५
नका डाव खोटा खेळूं, खेळलां पुरे तो ।
खरा खेळ खेळा हरिशीं तुम्हां वीनावितों ॥१६
खरें खेळल्यानें जन हो ! सदा सुखी व्हाल ।
खेळण्यासि विटलों, ऐसें कधीं नच म्हणाल ॥१७

## २९ झाडू (आर्या)

### (एका–'कर' सज्जनासाठीं)

–कर "कर! कर!" ही माझी ऐकुनि कंटाळुनी पुढें सरती ।
संग्रह-कारां सुचविति संग्रहिं द्यावी न ही अशी भरती ॥
भरती माझ्या हृदयीं जनसेवावृत्तिची सदा भरली ।
"कर! कर" जनां म्हणेलचि जोंवरि जनदीनता न वोसरली ॥
संग्रह संग्रह न करो; "कर! कर!" माझी सदाच चालेल ।
ही खूणगांठ बांधा करकरिनें या स्वदेश हालेल ॥
कर माझे ऐकुनि ही "कर! कर!" माझी नव्हे नव्हे हरिची ।
घेउनि झाडू रस्ता झाडिति ओटीच ही हरी-घरिंची ॥
देश न वाटे हरि-घर जोंवरि तुम्हांसि तोंवरी मजला ।
"कर! कर!" करणें आहे; हरिकार्या देह हा असे सजला ॥
हरिघरिं–माझ्या देशीं– घाण असे सांचली पहात असां ।
झाडु न हातीं तुमच्या तोंवरि आक्रोश राहणार कसा ! ॥
मी न म्हणे घेउनियां झाडू, रस्ताच झाडणें मजसा ।
घाण अनेकपरीची काढा कांहीं तरी; सुखें न बसा ॥
बसलों होतों मीही, विदित मला मोह तो रमायाचा ।
उठलों परि करकरिनें हरिनें दिन आणिला श्रमायाचा ॥

तो दिन, हरि-करकरिनें कर जेव्हां लागले श्रमायाला ।
तो दिन सहज न आला, बहुपरि जालें मना वमायाला ॥
मन मननें नमवीलें वमवीलें रूढ दुष्ट मत त्याचें ।
रमवीलें त्या कार्मी जें करितां प्रथम त्यासि बहु जाचे ॥
मन नमवीतां सहजाचि कर झाले सिद्ध ते नमायाला ।
मन रमतां कर रमती, मन साधन दुरितजल तरायाला ॥
कर नसति पात्र दोषा, जड अनुसरतात पूर्वसंस्कार ।
नव 'कार' करीं म्हणतां, करकर ती त्या गमे सहज फार ॥
करकर नको नको ही ऐसें माझ्या करांहि बहु केलें ।
परि अंतीं म्यां हरिनें-म्हणणें माझेंच शेवटा नेलें ॥
माझे तैसे तुमचे– जन हो ! कर माझिया हरीचेच ।
मजकरवीं हरि करवी, करविल तुमच्या करांहि तो तेंच ॥
कंटाळा करकरिचा माझ्या-हरिच्या तुम्हां असे आला ? ।
मजहि तसाच ! नसे कीं पंतांच्या वाणिचा प्रसाद मला ॥
जा तरि लवकरि विनवा पंतांना तो प्रसाद मज द्याया ।
जरि करकर माझी ही सुमधुर तुम्हांसि पाहिजे व्हाया ॥
तुमची त्यांचे ठाईं आहे जी भक्ति अंतरीं गाढ ।
ती तो प्रसाद आणिल, भक्ताचा कोण पुरविना लाड ? ॥

## ३० विद्या (दिंडीवृत्त व पृथ्वीवृत्त)

देश भारत हा भार जगा झाला ।
तया विद्या द्या जीव यावयाला ।
नसे औषध मुळिं इच्याविणें कांहीं
जीव आणाया हिंद-राष्ट्र-देहीं ॥१॥

असेल इतिहास जो खचित पूर्विचा तो असो ॥
पुढील दिवसांत ही स्थिती अशी मुळींही नसो
करीत सरकार जें जधिं तया बरेंसें गमे ।
प्रजा घरिंघरीं खुळ्या खळखळीमधें ही रमे ॥२॥
प्रजाच सरकार ही स्थिति असो नवी वा जुनी ।

असे बहुत देशिं ही उचलिली प्रथा या जनीं ।
असे विदित निर्मिते जनमनीं बरें जीवन ।
मला न रुचते दुजी मज रुचे स्वयंशासन ॥३॥
उणें मुळिं न जीमधीं अशि नसेच राज्यप्रथा ।
प्रजाच सरकार हो तरिहि तेथ ये न्यूनता ।
मनुष्यकरणी उणी पडतसे सदासर्वदा ।
असे अधिक जी गुणी तिजमधीं कमी आपदा ॥४॥
रुची अनुभवें तशी स्वपरबुद्धिवादें बने ।
प्रजाच सरकार हें उचित, घेतलें मन्मनें ।
सुजाण जन जालिया सुलभ हो स्वयंशासन ।
सुजाण म्हणुनि करा सुजनहो स्वदेशी जन ॥५॥

## ३१ देशपिसें (गीत)

देश-देश-देश-देश काय हें असे ! ।
जाणत्यासि कैसें हें लागतें पिसें ! ।
विद्यासुख सोडितसे ।
आप्तमित्र टाकितसे ।
देह बळी देत असे ।
काय अशी देशमयी वृत्ति ही असे ! ॥ १ ॥
देह काय मागतसे ठाउकें तुम्हां ।
घर तुमचें देह चार ठाउकें तुम्हां ।
तुमचें हें सान गेह ।
देशबंधुभगिनिदेह ।
जाणत्यासि हें स्वगेह ।
त्या सुख हो—देशमयी वृत्ति ही असे ॥ २ ॥
देह तसें मन आहे नारिनरजनां ।
मन मागे काय तेंहि ठाउकें जनां ।
मतिसंस्कृति सुख देते ।
जाणत्यांसि हें कळतें ।

देशवासि मन तें तें ।
सुख भोगो–देशमयी वृत्ति ही असे ॥ ३ ॥
मतिसंस्कृति ममतेचें क्षेत्र वाढवी ।
मतिसंस्कृति सान थोर स्वार्थ सोडवी ।
अवनीवरि अवतरली ।
गृहकक्षा वाढविली ।
देशहद्द व्यापियली ।
रूढ अशी देशमयी वृत्ति ही असे ॥ ४ ॥
अवनीवरि देश-वृत्ति रूढ जाहली ।
स्व-पर-देश-वृत्ति ही तेथ निपजली ।
परदेशिय ते परके ।
जाउत विलयाहि भुके ।
भोगो हा स्वजन सुखें ।
अल्पदृष्टि देशमयी वृत्ति ही असे ॥ ५ ॥
स्व-पर-देश विश्वघटक सानथोर ते ।
समुचित संस्कृति सर्वां स्वगृह मानिते ।
परदेशिय निजदेशिय ।
जन होवो सत्सुखमय ।
पावो जनदुःख विलय ।
थोरदृष्टि देशमयी वृत्ति ही असे ॥ ६ ॥

## ३२ गतधवेस दीपावलि-भेट (आर्या)

गोड दिवाळी सण हा परि मज विधवेसि गोड हा न गमे ।
पतिसुखवंचित तनुमन जनिं वा विजनीं असो मुळिं न रमे ॥१
गोडाचा गोडपणा कोठें राहे ! पती गमे गोड ।
कां ! कोड पुरवि अपुले समागमाची अनादि ही खोड ॥२
मी प्रतिसी पति मातें गोड, असे एक खोड ही म्हणुनी ।
पतिविरहविचारें हें मस्तक जाई अतीच भणभणुनी ॥३
देहसमागमलंपट देह असे, शाश्वती नसे देहा ।

दुःखचि दे लंपटता पति सोडुनि जाइ जैं स्वतनुगेहा ॥४
घर थोड्या दिवसांचें देह असे सर्व जीव-आत्म्यांना ।
हें सत्य परहितोन्मुख करितें प्रेमळ अशा महात्म्यांना ॥५
पति एकचि विहित असे वाटे वडिलांस सत्य कांहिं असो ।
निजतनुहित लंपटता देवा ! मन्मनिं नसे, कधीं ही नसो ॥६
दुःख मला जें होई मद्भगिनींना गरीब विधवांना ।
दुःख कठिण तें बहुतचि नाहीं हें विदित काय सधवांना ! ॥७
माता भगिनी वहिनी जाणुनिही दुःख कां तटस्थ बरें ! ।
शिक्षण-अभाव यांचा कारण हें येथ मुख्य एक खरें ॥८
शिक्षण तेंच खरें जें विचार करवी समत्व आवडवी ।
परहित घडवी हातुनि मोक्षशिडी शिक्षितास जें चढवी ॥९
माझें दुःख गिळुनियां मद्भगिनींचें स्मरोनि मार्ग बरा ।
तें दुःख कमी करण्या क्रमणें हा सदुपदेश थोर खरा ॥१०
मार्ग बरा सद्विद्या प्रसार जेणें जनां समत्वाची ।
गोडी लागुनि होईल वृद्धि जनमनीं खऱ्या ममत्वाची ॥११
पुनरुद्वाहित भगिनी ती ती संसृतिसुखें बहुत पाहो ।
विधवा-दुःख-विमोचन-कार्यीतें श्रीहरी सुयश वाहो ॥१२
अविवाहित विधवा ज्या मजसम त्यांतें प्रभू सुमति वाहो ।
सासर माहेर तसा समाज त्यांना सदा बरें पाहो ॥ १३
पति असतां जी गृहिणी मान्य बहुपरी, तिचा पती जातां ।
अधिकचि मान्य असो ती, पतिविण जरि तिजसि नित्य राहवितां ॥१४
अविवाहित विधवांचा शाप फळे ताप, नीति जाइ लया ।
उमजा सज्जन हो ! हें, कां नेतां निजसमाज हा निरया ॥१५
पतिविण काल क्रमणें आलें दैवीं अशांस विनयानें ।
मी त्यांची समदुःखी भगिनी विनवीं, लहान न वयानें ॥१६
पतन मनाचें होतां अभद्र येतां मनीं विचार करा ।
शील मलिन हो जेणें मार्ग सुखाचाहि तो मुळीं न बरा ॥१७
पतिसुख-इच्छा प्रबला अबलेसी मज छळीत सा वरुषें ।
पतिसुख अल्प मिळालें सोळाची मी तधींच दैव रुसे ॥१८

छळ माझा बहु झाला, अंतर कामें अतीच कांलविलें ।
परि मन घट्ट करुनी देवाला स्मरुनि दिवस घालविलें ॥१९
सुविचाराभ्यासानें सत्कार्यी तनुसि रोज वळवूनी ।
पतिसुख इच्छा प्रबला आंवरिली प्रभुसि अळवूनी ॥२०
प्राबल्य कमी झालें इच्छेचें कांहिंसें, परी मधुनी ।
येतां दिवस सणाचा अंतर हें जाइ फार खदखदुनीं ॥२१
सुख व्हाया पतन बरें वाटे, जइं वासना मनीं दाटे ।
परि सावध नित्य असां सुख हें थोडें क्षणामधीं आटे ॥२२
मग दुःख दुःख सारें सत्त्व हरपतां पुन्हां न अपुलें हो ।
या कामवासनेचें दुःखचि सोसूनि जीवन भलें हो ॥२३
सुख पतनाचें दुःखीं बुडवी सत्कुलवतीस जन्मवरी ।
हा काम सहन करितां जनहितिं रमतां मनासि शांति वरी ॥२४
या गूढ जीवनाचें अंतिम परमार्थ हें असे रूढ ।
परमार्थ आत्मतेजा वाढविणें आंवरूनि मन मूढ ॥२५
मन मूढ तनुसुखानें भलत्यानेंही सुखावतें वेळीं ।
जीवन कलंकित करी जीवा जाळी अभद्रशा खेळीं ॥२६
तें भद्र आचरण जें तोषवि आत्म्यासि सर्वदा स्मरणें ।
शुद्ध मनें जनसेवा भूतदया भद्र भद्र हेंचि जिणें ॥२७
देहीं धिंगाणा जे विकार घालिति तयांसि नीटपणें ।
पारखुनी त्यांपासुनि दयार्द्रता हाचि एक गुण शिकणें ॥२८
आपण तैसे इतरहि जीव विकारीं कमी अधिक भरले ।
ओळखुनी हें झालें दयार्द्र जे तेच वा जनीं तरले ॥२९
बल आत्मिक वाढवुनी स्वदेहवृत्तींसि सत्त्वशील करी ।
जन तो बहुपरि बहुतां सुख देउनि मुक्ति घेतसे स्वकरीं ॥३०
जें नित्य सुख तयाची गोडी, गोडी नसे अनित्याची ।
खोडी विषयसुखाची पाहुनि गति हो अशी विवेकाची ॥३१
ऐसा विवेक व्हावा देहाचे क्षण-सुखा न लोभावें ।
बहु दुःख होउं देहा भजणें सत्त्वासि सर्वदा भावें ॥३२
दुःखांत अंतरीं सुख सात्त्विक वर्तनिं मिळे सदभ्यासें ।

अभ्यासी सत्त्वाचे व्हावें दुःखित जनांहि हव्यासें ॥३३
जें दुःख तें विचारें शमतें, सुख हो सदा सदाचारें ।
यास्तव विवेक-उपकृति भक्तीनें सेविती सुजन सारे ॥३४
दुःखचि गुरु होउनियां परदुःखाचा विचार करवीतें ।
परदुःखहरणिं झिजवुनि निजशल्यातें स्वयेंच हरवीतें ॥३५
दुःखचि गुरु होउनियां नित्यसुखाचा विचार करवीतें ।
देहीं नित्य असे जें त्याची आम्हांसि कास धरवीतें ॥३६
हें नित्य तत्त्व अपुलें स्वरूप आहे खरें तदज्ञानें ।
नश्वर देहसुखाचें वेड भरे दुःख शेवटीं ज्यानें ॥३७

× × ×

त्याया नित्यसुखातें आपण आहोंत सर्वहि भुकेले ।
तरि सद्विवेकमार्गें सर्वांहीं नित्य पाहिजे गेलें ॥३८
देवा ! मज या मार्गीं चालविं हातीं धरूनि जन्मवरी ।
तूंच सखा प्रिय माझा धर्मपती तूंच मी तुझी नवरी ॥३९

\+ \+ \+

गतधव-सौभाग्येच्छुक शीलवती-सुमति-युवति-मति लहरी ।
दुःखी भगिनी-करिं ही दीपावलि-भेट देववीत हरी ॥४०

## ३३ कवींस विनवणी (गीत)

कवींनो तुम्हां ही विनवणी ॥ धृ० ॥
हें पहा जोंवरी जनसत्तापूजक ।
नाहींत लक्षही सत्याग्रह-सेवक ।
तोंवरी भारता जनसत्ता-कौतुक ।
तें कसें मिळावें पहावयाला ? म्हणुनी घ्या लेखणी ।
कवींनो ! तुम्हां ही विनवणी ॥ १
आजकालहि असती लाखों जन बहुगुणी ।
जे जनसत्तेचे पूजक असती मनीं ।
परि जनसत्तेस्तव सत्याग्रह सेवनीं ।

दृढ आहे श्रद्धा असे कितिकसे ! म्हणुनी घ्या लेखणी ।
कवींनो ! तुम्हां ही विनवणी ॥ २

शस्त्रासि शस्त्र हा पंथ कुणा मानला ।
तो जुनाच जगतीं हरिनें उपदेशिला ।
अजि नवा पंथ सत्याग्रह हरि बोलला ।
या हरिच्या नूतन मार्गी आणा जन कुणि बोलावुनि ।
कवींनो ! तुम्हां ही विनवणी ॥ ३

जन सत्ताधारी, सत्ताकांक्षी जन ।
शस्त्रें यां श्रीहरि निजरूपा देउन ।
खेळवी जुना हा खेळ; खेळ नूतन ।
या हरिचा आहे सत्याग्रह हा—यास्तव घ्या लेखणी ।
कवींनो तुम्हां ही विनवणी ॥ ४

जें जुनें सर्व तें त्याज्य म्हणे मूढ तो ।
तें नको मूढपण; रुचिभेदें लोक तो ।
कुणि जुन्या कुणि नव्या हरिमार्गी चालतो ।
हा नवा मार्ग सत्याग्रह हरिचा, यास्तव घ्या लेखणी ।
कवींनो ! तुम्हां ही विनवणी ॥ ५

× × ×

## ३४ राष्ट्रभक्तीचा उदय (गीत)

उगवतां नभीं बालतपन । रम्य हो स्वयें सर्व भुवन
रक्तिमा सडा पडे गगनीं । केर हा अंधकार हटुनी
रक्तिमासंमार्जित गगनीं । टाकितो पाउल दिवसमणि
चालतो वाट नीट अपुली । तसतशी मही रंग बदली
रम्य तें रूप, रम्य रंग । पाहुनी मन होई दंग

\+ \+ \+

रविची प्रभा नभीं जैशी । मायभूभक्ति मनीं तैशी
उगवतां मनीं राष्ट्रभक्ति । रम्य हो स्वयें क्रियाशक्ति
भक्त जो अधिकारी कोणी । रम्य तो करी भक्तिकरणी
म्हणे तो हृदयींच्या हृदयीं । रयत ही माझी माझी ही
जन्मली देशमायपोटीं । जन्मलों मीहि मायपोटीं
हिचें मी अकल्याण करितां । अधमतापंकीं मी फसतां
रहूं मी कोणाच्या नांवें । हाल ते कैसे सोसावे
मीच हे सर्व बहिणभाऊ ; मला मी दुःख कसें देऊं
रयत ही सुखांत ठेवीन । भक्तिनें हरी तोषवीन
भक्त जो अधिकारी कोणी । रम्य तो करी भक्ति-करणी
जयासी जी मतिसंपत्ति । भक्तिनें शुभकर होते ती
शब्दकवि जनता जागविती । चितरूनी शब्दिं देशभक्ति
रंगकवि जनता जागविती । चितरुनी रंगिं देशभक्ति
गानकवि नाच-ताल-कविही । जनांतें जागवीत राही
भक्तजन-गान नाच ताल । जागवी भक्ति जनीं सकल
धनार्थी, उदमी, व्यापारी । तोहि हो उदार व्यवहारीं
सर्वही धंदा करणारे । वागती इमानइतबारें
पतींचें पतिपण मृदु होय । पत्निचें पत्नीपण सदय
सासुचें सासूपण निवतें । दीरपण नणंदपण निवतें

× × ×

धर्मगुरु गुरुत्व हो सदय । रीति लय पावतात अदय
गतधवा कामार्ता तरुणी । पतिविना होत पापखाणी
असें हें अदयहृदय कर्म । लया ने देशभक्तिधर्म
वाहती देवासी मुलगी । पति तिचा कोणिहि जो भोगी
असें हें अदयहृदय कर्म । लया ने देशभक्तिधर्म
जन्मतां विटाळमय कोणा । मानुनी करिती अपमाना
असें हें अदयहृदय कर्म । लया ने देशभक्तिधर्म
विवाहीं कन्या, सुत विकती । लाज मुळिं वाटेना चित्तीं
असें हें अदयहृदय कर्म । लया ने देशभक्तिधर्म

जखलही म्हातारा पोर । नाडितो बाळा सकुमार
असें हें अदयहृदय कर्म । लया ने देशभक्तिधर्म

\+ + +

माय-भू-भक्ति उदय होतां । लयातें जाय पापसत्ता
पुण्यमय कर्मं जनसुखद । करवि या भक्तीचा नाद
बोलवी बोल बलद बाला । ओलवी सुकल्या हृदयाला
मायभूभक्ति खेळ ऐसा । पुण्यमय हरिलीला जैशा
पहा हा हरि घेउनि मुरली । येतसे वाजवीत टाळी
पहा ही मुरली सांवरिली । पहा ही तान सुरू झाली
मायभू-भक्ति-भक्ति-भक्ति । तान ही या मुरलीवरती
भक्तजन हरि प्रेमखाणी । जाहला दंग हरी-गानीं

## ३५ धर्म (अभंग)

शब्द घोकियेला ईश्वर ईश्वर तयाचा संसार आकळेना ।
धर्म, धर्म ऐसा टाहो फोडियेला नाहीं सोडियेला अहंकार ।
ईश्वराची आज्ञा तोचि धर्म खरा तेथ अहंकारा वाव नाहीं ।
धर्माचे आचार जे कां पूर्वापार धर्माचें तें सार नव्हे नव्हे ।
धर्माचें तें सार जो का उपकार अन्य तो वेव्हार साधनांचा ।
मशीद साधन, देऊळ साधन कुराण, पुराण साधनें हीं ।
गुडघे टेकणें, आसनीं बैसणें देवा आळविणें साधनें हीं ।
धर्मी धर्मी भिन्न साधनें बहुत उपकारीं चित्त लावावया ।
मोक्ष व्हाया जीवा यासाठींच धर्म धर्माचें हें मर्म सनातन ।
मोक्ष त्याचें नांव चित्ताची जे शांति एकांतीं, लोकांतीं अढळ जे ।
वेडावला जीव, लोभला विषया तया सोडवाया धर्माचार ।
चित्तशांति नाहीं विषयलंपटा धर्माचार सांठा तयासाठीं ।
ओढाळ मनासी आचार वेसण नीच स्वार्थातून ओढावया ।
ऐसें हें साधन असे धर्माचार साध्य उपकार बुद्धि थोर ।
उपकारबुद्धि थोरावली जेथें चित्तशांति तेथें निकटचि ।
मोक्ष तोचि जे कां नित्य चित्तशांति एकांतीं लोकांतीं हेलावेना ।

धर्माच्या या खुणा मनांत ठेवूनी ईश्वरभजनीं चित्त लावा ।
नका भांडू बाह्य आडंबरासाठीं अंतरंगा मिठी घाला घाला ।
अंतरंग तेंचि जो का उपकार धर्माचें तें सार सनातन ।
जगदीश हेंचि तुम्हांसी मागत लावा चित्तवित्त उपकारीं ।

## ३६ मुक्तीसाठीं तळमळ (गीत)

मुक्तिसाठिं तळमळ चाले उपाय करिती जे सुचले ।
दुःख नको हा पडसाद जनिं विजनीं उमटे नाद ॥
दुःख नको हें, दुःख नको तळमळ मनिंची नको नको ।
हेच नाद पडसाद जनीं हेच हेच रानीं, रानीं ॥
श्रवणीं तळमळिचे नाद नयनीं दिसे मूर्त खेद ।
स्वीय-देह-मन-बुद्धीचे कष्ट बघुनि संसाराचे ॥
कष्टी होतां जन विटती मुक्तिसाठिं बहु झटपटती ।
'गुरू करा' ऐकिलें असें गुरुचरणीं धन अर्पितसे ॥
गुरुकरणी गुरुमंत्राची ती न शमवि तळमळ मनिंची ।
स्वीय-देह-मन-बुद्धीचे कष्ट छळिती संसाराचे ॥
ते न शमति गुरुमंत्रानें ते न शमति गुरुतंत्रानें ।
'योग करा' ऐकिलें असें योगगुरुकडे धांवतसे ॥
आसन, प्राणायाम करी विजनिं विराजे संसारीं ।
तळमळ खळली नाहिं परि अगणित ऐशा नरनारी ॥
यात्रा, वाऱ्या पंढरिच्या काशीच्या रामेश्वरच्या ।
चार धाम करुनी आले तळमळ मनिं तरिही चाले ॥
मीनसंघ जलविना जसा तळमळतो जन हा तैसा ।
नरनारीमीनांसि जल काय न संसारीं विपुल ! ॥
विपुल जल इथें भरलेंसें नरनारीमीनां न दिसे ।
ज्या धन्यांना तें दिसलें त्यांना तळमळणें कसलें ॥
गुरू, योग, यात्रा, वाऱ्या तळमळिला नचि पुरणाऱ्या ।
नित्यकर्म नैमित्तिक तें तळमळिला नचि तें पुरतें ॥
व्रतें नेम जपतप सारें तळमळिला नचि पुरणारें ।

श्रुतिचर्चा वेदान्तखल तळमळ त्याहुनि ही प्रबल ॥
काव्य, चित्र, नर्तन, गान तळमळ उरे त्यांसि पुरुन ।
चक्रवर्तिपण सुखि गमतें तळमळ त्यासि पुरुन उरते ॥
जननेतेपण सुखि गमतें तळमळ त्यासि पुरुन उरते ।
अशी प्रबळ तळमळ नाशी सुखी करी जनमीनांसि ॥
तें जल पर उपकार रति येथचि तळमळिला मुक्ति ॥

## ३७ हरीचें विश्व (गीत)

सर्वहि विश्व म्हणा अपूलें ।
हरिचें विश्व म्हणा अपुलें ॥ धृ० ॥
धर्मपुस्तकें हरिभेटीचा मार्ग वर्णितात ।
विश्व आपुलें म्हणोनि वागा हेंचि सांगतात ॥१॥
नानाविध आचार जाहले रूढ देशिंदेशीं ।
धर्मबुद्धि ही पुष्कळ कोठें, कोठें थोडीशी ॥२॥
सर्व जीव हे आगेंमागें ईश्वर होणार ।
नसे आज जरि या सर्वांचा एक समाचार ॥३॥
हिशोब हरिघरिं अलग राखिती जीवाजीवाचा ।
जीव पूर्ण जाहला तो सदा पूर्ण रहायाचा ॥४॥
देशा असतें वरी येउनी खालींही जाणें ।
तसें नसे जीवाला होउनि पूर्ण उणें होणें ॥५॥
नानाविध नरनारी कर्में नानाविध करिती ।
संघ तयांचा देश फळें कडु गोड भोगितो तीं ॥६॥
कर्मराशि माझा तो माझा मीच करी सारा ।
कर्मराशि देशाचा माझा तुमचा कर्मपसारा ॥७॥
माझा तुमचा कर्मपसारा मिळूनि देशकर्म ।
यांताचि देशाच्या उन्नतिचें अवनतिचें मर्म ॥८॥
देश यापरी असे सर्वथा संघकर्मतंत्र ।
असे नसे जीवाचें; त्याचें सौख्य आत्मतंत्र ॥९॥
करोत अति दुष्कर्म कुणीही जीव भोंवतालीं ।

तुम्हां न कोणी अपुल्या कर्में ओढितील खालीं ॥१०॥
तुम्ही उमजलां तरी जाहलां स्वतंत्र संसारीं ।
सांठविण्यासी अव्यय निर्मल सुख हृदयागारीं ॥११॥
विश्व आपुलें म्हणोनि हरितां तप्तांचा ताप ।
आनंदाचें अखंड भरतें तोंडवरी माप ॥१२॥
म्हणुनि विनवणी हरिचा अंतरिं विचार घेऊनी ।
विश्व आपुलें म्हणुनि वागणें जगतीं या सुजनीं ॥१३॥

## ३८ संसाराचें सौंदर्य (गीत)

सुंदरता भरली येथें । संसारीं मन हें रमतें ॥ धृ०॥
पाप्यांचे हाल बघूनी । सद्बुद्धी जाइ रमूनी
सद्बुद्धिस निश्चय वाटे । हालांचे कठिण चपेटे
भोगुनि हे पापी अधम । सोडितील वाइट काम
येतिल हे रस्त्यावरती । सुख नित्य यांसि मग जगतीं
सुख भोगिति हें पापाचें । तें नसे फार दिवसांचें
सुख भोगिति हें पापाचें । तें नसे जसें पुण्याचें
पुण्याचें सुख बहु गोड । त्यां सुखांत नाहीं खोड
तें सर्व काळ टिकणारें । सच्छक्ती वाढविणारें
हरि लवकरि भेटविणारें । झणिं परम शांति देणारें
तें सुख हे हालचि कठिण । देतील यांसि मिळवून
पाप्यांचे हाल बघूनी । मन यापरि जाइ रमूनी १
पुण्यात्मे कष्टीं पडती । त्यांचेहि हाल रमवीती
पुण्याचें सुख अक्षय्य । हालांनीं विश्रुत होय
बहु असो दुःख वरिवरिचें । पुण्यात्मा स्वसुखें नाचे
जरि विरह गोड विद्येचा । पुण्यात्मा राशि सुखाचा
जरि विरह गोड आप्तांचा । पुण्यात्मा राशि सुखाचा
जरि विरह मायदेशाचा । पुण्यात्मा राशि सुखाचा
जरि विरह होय देहाचा । पुण्यात्मा राशि सुखाचा
पुण्याचें सुख अक्षय्य । हालांनीं विश्रुत होय

देखुनि हें सुख-ऐश्वर्य । देखुनि हें हृदय-स्थैर्य
सोडितील पापी लोक । पापाचें दुर्बळ सूख
येतिल ते रस्त्यावरती । भोगितील सत्सुख अंतीं
पुण्यात्मे कष्टीं पडती । देखुनि हें सुख हो चित्तीं २

## ३९ देशदेव (अभंग)

नका देवातें विसरूं । नका देशातें विसरूं
देश हिंदुस्थान माझा । देव हिंदुस्थान माझा
कांहीं सज्जनता धरा । हिंदुस्थानसेवा करा
देशीं अंधार अंधार । नाना वेडांचा बाजार
करा विचार विचार । करा अंधार हा दूर
ऐशा सेवेचिया संगें । परब्रह्म व्हाल अंगें
परब्रह्म परा शांति । शांतीसाठीं यातायाती
नसे सुख शांतीवीण । नसे शांति सेवेवीण
नसे सेवा यत्नावीण । यत्न ज्ञानाचे अधीन
ज्ञान मिळवा मिळवा । ज्ञानें यत्न हो बरवा
यत्न बरवा सेवेचा । लाभ देतसे शांतीचा
शांति सुखातें प्रसवे । शांति-सुख जनां व्हावें
शांति सुखाचियेसाठीं । सोडा खिन्नतेची मिठी
नाहीं ज्ञान नाहीं बळ । ऐसे खिन्नतेचे बोल
नाहीं केलें करणें ते । ऐसें खिन्नता बोलते
आली संधि दवडिली । बोले खिन्नता तापली
ऐशा खिन्नतेची मिठी । सोडा शांति-सुखासाठीं
झालें होऊन तें गेलें । आतां पुढें व्हा हो भले
संधि वायां न घालवा । यत्न योग्य तो चालवा
ज्ञानबळ असें ज्यासी । तैशी करा हो कसोशी
टाका संकुचित मन । करा देशाचें चिंतन
देशीं अंधार भरला । अंधार हा नसे भला
कडू अंधाराचें फळ । काढा अंधार समूळ ।

कष्ट सोसा देशासाठीं । कांहीं पुण्य जोडा गांठीं
टाका बेकीचे प्रकार । एकी करील उद्धार
देश एकीनेंच जगे । एकी करा लागवेगें
बेकी करी देशघात । बेकी करी आत्मघात
बेकी अधर्म करवी । बेकी नरक हिंडवी
करा करा हो विचार । काढा बेकीचा अंधार
आहे अंधार अंतरीं । हरि भेटेना तोंवरीं
हरि जरि तुम्हां व्हावा । तरी भजा देश-देवा
देश-देवा विसरलां । म्हणूनी हा काल आला ।
देश-देवा विसराल । तरी नित्याचे हे हाल
नका देशातें विसरूं । नका देवातें विसरूं
पांडुरंग मुखें हरि । सांगे देशाची चाकरी

## ४० कवींस विनवणी (गीत)

कवींनो ! तुम्हां ही विनवणी ॥ धृ०॥
जनतेस सांगण्या हरी । सांगणी तुम्ही निघाल्यावरी ।
जरि कुणी तुम्हांला नको सांगु हें अशी वदे वैखरी ।
तरि नम्रपणें त्या बंधुवरातें विनवावें यापरी ।
"हरिसेवक मी बा बंधूराया करितों हरि-चाकरी ।
"कुणी तीव्र वचांनीं दुखवो माझें मन ।
"कुणि हात टाकूनी करो देहकंदन ।
"कुणि ठार करो मज शस्त्रास्त्रें घेउन ।
"मज करणें" सांगा "हरी चाकरी देहहि हा होमुनी" ।
कवींनो तुम्हां ही विनवणी ॥१॥
"अजि जनसत्ता सत्याग्रह होमीं पडो सुखें आहुति ।
"अजि तुटो सहोदर-कांता-पुत्री पुत्र-मित्र-संगति ।
अजि मातापितरें वृद्ध पंगु तीं पडोत शोकार्णवीं ।
"अजि राहो करणें आत्मतुष्टिकर सुंदर कविता नवी ।
"अजि हरिची इच्छा देह आहुती पडो ।

अजि हरिची इच्छा मद्ग्रह सारें रडो ।
जी हरिची इच्छा तें तें सारें घडो" ।
जरि अशी भावना तरीच घ्यावी सत्याग्रह-लेखणी ।
कवींनो ! तुम्हां ही विनवणी ॥२॥

## ४१ कर्तव्य (गीत)

जें जें झालें तें हरि इच्छेनें झालें । कर्तव्य करूं या अपुलें ॥धृ०॥
मुळिंही गोष्ट नको गेल्या संपत्तीची । हरिला ती अर्पण साची ।
मुळिंही गोष्ट नको गेल्या विद्वत्तेची । विफल ती उमळ दुःखाची ॥
मुळिंही गोष्ट नको घडलेल्या पापांची । कडु फळें चाखुं या त्यांची ॥
हें पहा ज्ञानरवितेज ।
चहुंकडे पसरलें आज
चहूंकडचा पहा समाज ।
बघुनी सभोंवतीं काम पाहिजे केलें । कर्तव्य करूं या अपुलें ॥ १ ॥
गति या विश्वाची विश्वपती तो जाणे । करिल तो तया जें करणें ॥
गति या देशाची विश्वपति तो जाणे । करिल तो तया जें करणें ॥
दिधली आम्हांला बुद्धि आमुच्या हरिनें । ती व्यर्थ न जाऊं देणें ॥
शिकुनियां उजळ ती करणें ।
बळ तिचें शिकुनि वाढविणें ।
खळ विकारांसि आंवरणें ।
ऐकुनि श्रीहरिचें काम पाहिजे केलें । कर्तव्य करूं या अपुलें ॥ २ ॥
नारी-नर जगतीं काळे, पिंवळे, गोरे, । तांबडे, सांवळे सारे ॥
हरिनें पेरियले क्षेत्रीं या कृषिकारें । हरिला ते सर्वहि प्यारे ॥
हरिची शेती ही हट्टें नासविणारे । ते थोर गुन्हा करणारे ॥
त्यां शासन कैचें चुकतें ।
उमजावें आम्हीं पुरतें ।
अपुल्यापरि हरिशेतीतें ।
सेवकभावानें फार पाहिजे जपलें । कर्तव्य करूं या अपुलें ॥ ३ ॥
किती तरी सोपें हें संसाराचें काम । किती तरी येथ आराम ॥

नश्वर देहाचें ज्यांना वेडें प्रेम । ते चुकती अपुला धर्म ॥
स्वार्थी स्वमनाचें ज्यांना वेडें प्रेम । ते चुकती अपुला धर्म ॥
आराम चुकुनि धर्माला ।
घेतसों, वैरि तो अपुला ।
सोडुनि जाइ अपुल्याला ।
जरि हो ! शाश्वतचें सुख व्हावेसें गमलें । कर्तव्य करूं या अपुलें ॥ ४ ॥
कितितरि सोपें हें संसाराचें काम । वागणें ओळखुनि धर्म ॥
हृदयीं श्रीहरिला आवडला सत्काम । तो खरा आपुला धर्म ॥
या निजधर्मातें विसरुनियां आराम । करणें तें घातक काम ॥
उकिरडा मनामधिं झाला ।
पापांचा जाचि अम्हांला ।
झणिं लागूं झाडायाला ।
करि जो विलंब तो अहिताचि करितो अपुलें । कर्तव्य करूं या अपुलें ॥५॥

## ४२ लोकमान्य (स्वागता वृत्त)

स्वागतानति भवच्चरणांसी । लोकमान्य ! जनताशरणांसी
आंग्लदेशिं करुनी श्रम आलां । सांगण्या हित-वच स्वजनाला १
लोकमान्य ! जनत्मात-हरीची । हार्दिकी विविध भक्ति परीची
आचरूनि जन जागविला हा । सत्कलाविषय सत्कविला हा २
सत्कवित्व बहु जन्म झटूनी । मेळवीन हरिपायिं हटूनी
काव्यमंगल भवद्‌गुणगानें । मी रचीन तदनंतर सानें ३
मी प्रयत्न-पुरुषार्थ-भुकेला । यत्नवादि गुरुचा 'लघु' चेला
सत्कवित्व हरिपायिं झटूनी । मेळवीन बहु जन्म झटूनी ४
मेळवीन, तदनंतर सानें । काव्यमंगल भवद्‌गुणानें
मी रचीन; तुमचें यश तेव्हां । लाभणार मज सद्यश-ठेवा ५
लोकमान्य ! हरिची मज सांगी । आज भेट गुरुसी करिं 'वांगी'
जी जयाजवळि चीज जिवाची । तीच भेट गुरुला गुरु साची ६
\+ \+ \+
लोकमान्य ! जन चंचल भारी । स्थैर्य, धैर्य गुणहीन उभारी

सर्व ही विफल, हें शिकवाया । आग्रहें झिजविली निजकाया ७
लोकमान्य ! भगवंत वचाचें । सारतत्त्व, नवनीतचि साचें
कर्मयोग अनुशासक गीता । सांगुनी उठविलें भवभीता ८
घोर हा भव अकर्म-परांना । गोड हा कुशल कर्म-परांना
योगयुक्तियुत कर्म करावें । याच मार्गि जन सर्व तरावे ९
लोकमान्य ! उपदेश जनां हा । लोकमान्य उपदेश मना हा
जें जनां, निजमनासिहि तेंच । सांगणें, वर गुरुपण हेंच १०
लोकमान्य ! तुमच्या करणीनें । स्थैर्य धैर्य सुभगा सरणीनें
लोकमानस विनम्र जहालें । 'लोकमान्य' पद अर्पित कालें ११
'लोकमान्य' पदवी स्थिर झाली । लोकनायक अनागत कालीं
आठवूनि तुमच्या चरितातें । साधितील निजलोकहितातें १२
लोक थोर बहु उत्सुक झाले । अल्पतुष्ट मन हें मम घालें
वंदुनी चरण यास्तव जातों । श्रीहरीसि बघण्यासि बहातों १३

\+ + +

श्रीहरी ! बघुनि घे चरणांतें । भारतीय जनता शरणांतें
लोकमान्य कृतिचा अभिमानीं । लोक हा निरत तद्‌गुण-गानीं १४

\+ + +

तूं मला हरि ! कवित्व कला ही । आज दे करुनि कांहिं भलाई
लोकमान्य गुण हे जन गाती । 'गाइं तूं हि' मजला म्हणताती १५
'गाइं तूं हि' मज आग्रह वाणी । ऐकवी जवळिचा जन कोणी
कोणि हा जवळिचाच दुजा रे । सांगतो, 'बरळ' थांबवि, जा रे १६
श्रीहरी ! बघुनि हें तुज कांहीं । कांहिं का स्वमनिं वाटत नाहीं
मी तुझा म्हणवितों तुज ठावें । मी तुझा स्वमनिं हें तुज ठावें १७

\+ + +

जें जनांसि तुजलाहि हरी ! तें । सांगतों, वर दिसेल करी तें
मी तुझा गरिब झाडु घरींचा । राखिता मधुर आत्म-झरींचा १८
राखिता मधुर आत्मझरीचा । चाखिता सहज तल्लहरीचा
चाखि तो सहज चाखि लबाड । जाणतोसि तुज कांहिं न आड १९

\+ + +

मी लबाड तुजसी हरि ! ठावें । मी लबाड म्हणुनी न रुसावें
तूं गुरू हरि ! तुझा 'लघु' चेला । मी तुझ्यासमचि खाउ-भुकेला २०
गोड घोट घरिं आत्म-झरीचा । तृप्त हा पिउनी झाडु हरीचा
तृप्त हा म्हणुनि गोष्टि हरीतें । सांगतो, वर दिसेल करी तें २१
दे मला कविकला कुसरीची । श्रीहरी ! जरि तुझ्या लहरीची
सावली मजवरी फिरण्यासी । वाव मागत असें तुजपासी २२
आज सत्कवि कला कुसरीची । होउनी तव कृपा लहरीची
लाभली जरि मला हरिराया । लोकमान्य-गुण-गान कराया २३

* * *

राय काय तुमची मग लीला । पाय तीं हरि ! धरील सलीला
ती म्हणेल मज नम्रपणानें । 'लोकमान्य-गुण-कीर्तन माने' २४
ती म्हणेल 'हरिची प्रिय भारी । मी म्हणूनि मम कीर्तन तारी
सांगतेच हरिसी परि आज । "श्रीहरी बघुनि घ्या गुणराज २५
"लोकमान्य गुणराज बघा हो । श्रीहरी ! मजसि हा सुख लाहो
मी तुम्हां प्रिय मला परि प्यारी । लोकमान्य-गुण-गान-खुमारी २६
"मी तुम्हां प्रिय जरी तरि देवा ! । हेत एक मनिंचा पुरवावा
लोकमान्य-गुणसंहति-गानें । लोक हा भव तरोच सुखानें" २७

* * *

लोकमान्य ! हरि हा चरणांतें । भारतीय जनता शरणांतें
वंदुनी वर वदे, "गुणगाणें । यांचिया जन तरेल सुखानें २८

## ४३ लोकमान्यो जयत्विह (अनुष्टुप्)

लोकः स्वीयः स्वदेशोऽयं स्वराज्यं संसदा युतम् ।
कर्मभिः कर्मवीराणामुचितैः कलयेदिति ॥
मानेन महतश्चितः परं, मे राष्ट्रमुत्तमम् ।
न्यस्तभ्रान्तमतैः प्राप्तकालसर्वकलायुतैः ॥
यतस्वार्थोर्मिभिः स्वम्यग्देश्यसेवापरायणैः ।
शत्रुं देशस्य बुध्द्वा तं निग्रहीतुं समुत्सुकैः ॥
स्वीयां संस्कृतिमापन्नां संशोध्य परिशोध्य च ।

होतृबुद्धया विशुद्धां तां सर्वायार्पितुमुद्यतैः ॥
ओजस्विभिर्जनैः पूर्णे भवत्विति सदुश्चरम् ।
तपश्चरति धर्मात्मा लोकमान्यो जयत्विह ॥

## ४४ नित्यसुख (गीत)

सुख सर्वत्र सदा व्हावें । सकलां हें सकलां ठावें ॥ ६६० ॥
नित्य सुखाचा मार्ग कसा । हें रात्रंदिन शोधितसां
जुनाट काळींचे ग्रंथ । त्यांतुनि नाना सुखपंथ

\+ \+ \+

तुम्हीं पंथ बहु चालविले । दुःख न परि तुमचें गेलें १
हाय हाय तुमची चाले । जरी पंथ बहु चालविले
देव धुउनि वस्त्रीं पुशिला । गंधपुष्पिं शृंगारियला
धूप, दीप, नैवेद्य दिला । ओवाळुनि मंत्रीं स्तविला
मंत्र, पुष्प अर्पुनि नमिला । क्षमस्व म्हणुनि निरोपिला
कर्म रोज हें चालतसे । पुराण, वाचन, श्रवण तसें
भजन हरीच्या नामाचें । चालें नेमानें साचें
नेम, धर्म, जप, तप चाले । दुःख न परि तुमचें गेलें २

\+ \+ \+

नमाज नेमानें म्हणती । उपास रोजाचे करिती
नेमानें डोले रचिती । मक्के मदिनेला जाती
तुम्हीं पंथ बहु चालविले । दुःख न परि तुमचें गेलें ३

× × ×

स्वर्गीय प्रभु प्रार्थितसां । डोळे मिटुनी अळवितसां
प्रभुचें गीत मुखें गातां । बैबलवाचन चालवितां
तुम्ही पंथ बहु चालविले । दुःख न परि तुमचें गेलें ४

× × ×

नाना पंथ जगीं असती । देव भजति नानारीतीं
बहु धार्मिक जे म्हणवीती । त्यांतहि बहु दुःखी असती
पहा पहा कोठें चुकतें । दुःख तुम्हां कां हें छळितें

धर्मरीति सोडुनि देती । त्यांतहि बहु दुःखी असती
पहा पहा कोठें चुकतें । दुःख तुम्हां कां हें छळितें ५

* * *

सुख तुम्हां अति अल्प दिसे । दुःख पर्वतापरि भासे
सुख तुम्हां सर्वत्र सदा । कां न मिळे शोधा शोधा
शोधा दुःखाचें मूळ । शोधा सुख कोठें अढळ

* * *

देहदुःख अनुभव आला । त्याचें सुख बनवायाला ६
विचार करणें हाच तुम्हीं । येइल अनुभव हा कामीं
परदेहाला दुःख कसें । होतें मज हा शिकवितसे
येईन मी त्यांच्या कामीं । दुःख तयांचें करिन कमी
मनोदुःख अनुभव आला । त्याचें सुख बनवायाला
विचार करणें हाच तुम्हीं । येइल अनुभव हा कामीं
यापरि देहमनोदुःख । वितळुनि जीवा होय सुख ७

× × ×

परजीवांचें दुःख कमी । करावया यावें कामीं
यथाशक्ति अंगें श्रमुनी । श्रमावया इतरा कथुनी
विचार दृढ हा मनीं करा । असो कोणीही पुसणारा
अल्ला हरि कोणिही असो । इथें तिथें कोठेंहि वसो
काय अम्हां तो पुसणार । शक्ति दिली थोडीफार
खर्चियली ती उपकारीं । स्वार्थांतचि कीं अपकारीं
प्रश्न हेंच तो पुसणार । न्याय योग्य तो मिळणार
विचार दृढ हा मनीं करा । शमविल दुःखाचा वारा
नित्यशांतिसुख सदा घडे । या मार्गें जिकडे तिकडे ८

## ४५ हरीची वाणी (गीत)

उपकारी व्हा सर्वही ॥

तनमनधन जनकारणिं लावा । स्वहित परमगति परहितसाधनिं । हरिची वाणि ही । उपकारी व्हा सर्वही ॥ धृ० ॥

क्रम नित्याचा निजुनी उठणें । संसाराचीं कामें करणें । पुनरपि निजणें, पुनरपि उठणें । घटना नित्य ही ॥ १ ॥

ज्ञानेंद्रिय निज-अनुभव घेतें । कर्मेंद्रिय निजकर्में करितें । वृत्तिविचारीं मन खळबळतें । घटना नित्य ही ॥ २ ॥

रोज नवा रस जुन्याच विषयीं । जुनीच पत्नी जुनाच पतिही । तेंच जुनें सुख भोगित राही । घटना नित्य ही ॥ ३ ॥

चर्वितचर्वण सुखदुःखाचें । नित्यरूप हें संसाराचें । तेथें चर्वण धर्मवृत्तिचें । पाहिजे प्रत्यहीं ॥ ४ ॥

धर्म धारणा एकपणाची । सर्वजीवगत निजरूपाची । जननि हेचि सद्भूतदयेची । देते मुक्ति ही ॥ ५ ॥

निजरूप प्रतिजीवीं भरलें । स्मरुनि पाहिजे नित्य वागलें । ज्ञान नित्य पाहिजे मिळविलें । मोक्षा वाट ही ॥ ६ ॥

स्वार्थ कुणा, अज्ञान कुणासी । रीति लावितें जी भलतीसी । विनंती माझी असे तयांसी । टाका रीति ही ॥ ७ ॥

तुम्ही सेवक निजरूपाचे । सर्वभूतीं विलसे त्याचे । शिकवा देह-मनां हें साचें । शिकवा प्रत्यहीं ॥ ८ ॥

स्वामिकार्य निष्ठेनें करणें । थोर सुख तुम्हां या मार्गानें । शिकवा हेंचि तयां गोडीनें । शिकवा प्रत्यहीं ॥ ९ ॥

स्वामी तुमचा निजान्तरात्मा । बीजरूप चिद्घन परमात्मा । सर्वभूतगत अव्यय आत्मा । शिकवा प्रत्यहीं ॥ १० ॥

प्रतिदिनिं निजणें, उठणें, बसणें । प्रतिदिनिं जुनींच कर्में करणें । प्रतिदिनिं तसेंच हें शिकविणें । हरिची वाणि ही ॥ ११ ॥

स्वार्थबुद्धि वेडी अहिताची । रीति शिकवितां परम हिताची । धरिल वाट ती निजविलयाची । हरिची वाणि ही ॥ १२ ॥

घोकुनि घोकूनि शब्दपाठ ये । वळवुनि वळवूनि अक्षरही ये ।
याच रीतिनें धर्मवृत्ति ये । हरिची वाणि ही ॥ १३ ॥

## ४६ सांचलेली घाण (श्लोक)

अहो कां न द्या स्थान जीवीं निचारा । विचाराविणें वागणें शोक सारा

पहा अंतरीं घाण ती सांचलेली । पहा ती कशी बाह्यरूपांत आली १
कुणी मूर्तिविद्वेषि डोळे मिटूनी । प्रभूसी बहाती बहू ओरडूनी
कुणी अंतरीं ध्यान त्याचें करीती । परी बंधुबंधूंस हे नोळखीती २
कुणी मूर्ति-आसक्त मूर्तिस्थ देव । बहू आदरें पूजिताती सदैव
बहू आदरें नाम घेतात त्याचें । परी नाहिं बंधूंवरी प्रेम यांचें ३
जसें कर्म तैशीं फळें भोगिताती । जसें दुःख देती तसें दुःख घेती
परी दुःख होतां स्वतांच्या जिवाला । झणीं हांक देतात देवा कृपाला ४
अहो देव कैसा तुम्हांसाठीं धांवे । तुम्हीं जाचितां बांधवां जीवभावें
जयां नीच झाले भलेही स्वबंधू । तयांसाठिं धांवेल का विश्वबंधू ५
असे नीचता जोंवरी अंतरांत । कसें दुःख हें तोंवरी होय शान्त
जशी नीचता-घाण होईल नष्ट । तसे नष्ट होतील संसारकष्ट ६
कडू दुःख जें जें तुम्हां आज होतें । तुम्हीं पाप केलें फळे आज तें तें
करा पाप जें जें तुम्हां गोड लागे । कडू ताप संताप भोगाल अंगें ७
सुबुद्धीस सारथ्य देऊं शरीरीं । तरी जाउं आम्ही सुखें पैलतीरीं
सुबुद्धीविना इंद्रियें अश्व आम्हां । मदोन्मत्त नेतील कैसे स्वधामा ८
मना कल्पना कल्पिण्याचाच धंदा । करी साह्य तें इंद्रियांच्याच फंदा
तया शीकवूनी बऱ्या कल्पनांचे । करूं दास, तेव्हां अम्हां सूख साचें ९
जसा मी, जशी मी, तशी सर्व सृष्टि । मनीं बाणवा ही शुभ प्रेमदृष्टि
जनीं शक्य तैशी करा प्रेमवृष्टि । पडो देह सूखें महाथोर कष्टी १०
तुम्ही लागतां ऊपकारीं झिजाया । स्वयें श्रीहरी ये तुम्हां हात द्याया
जया श्रीहरी प्रीतिनें हात देई । तया सज्जना दुःख संताप नाहीं ११
अहंभाव देहावरीचा गळाला । रिघे अंतरीं श्रीहरीसी मिळाला
तयां देहदुःखें मुळीं दुःख नाहीं । तयां अंतरीं सूखाचि सूख पाही १२
यथाशक्ति देहासि या ऊपकारीं । सुखें झीजवी श्रीहरी त्यासि तारी
अहो आयका बोल माझ्या हरीचे । तुम्हां मोक्ष सर्वां, जरी व्हाल त्याचे १३

## ४७ कीटत्व (गीत)

देश देश ऐकुनि वीट । येतसे तयां जें कीट
नीट त्यां रूप मनुजाचें । परि अंतर कृमिकीटाचें

हें कीटरूप अंतरिंचें । अस्थायि लया जायाचें
या निरवधि संसृतिकालीं । कीटता न टिकण्या आली
कीटता भूमिका एक । संसारिं घेइ प्रत्येक
प्रत्येक कीटगुणि होता । धीट जो दिसे बहु आतां
कीटासि धीट बनवीते । कीटत्व वीट आणीतें
ऐशी हे प्रकृती थोर । जीवरी उभा संसार

\+ + +

प्रकृती ही माया हरिची । खेळते फुगडि संसृतिची
हातांत हरीच्या हात । घालोनि पाय जुळवीत
आधार हरी हाताचा । मायेस देइ प्रेमाचा
माया ही हरिमुख बघुनी । हरिकरसुख उपभोगूनी
उन्मादलि घाली फेरे । रेलुनी पूर्ण माघारें

\+ + +

सोडितां हरीनें हात । फुगडी ही होते शांत

× × ×

माया हरिहृदयीं लपते । हरि–एक–एकता उरते

\+ + +

अद्वैत असें अनुभवलें । कीटत्वचि धीट जहालें
एवढी शक्ति मनुजांत । अनुभवें जाहली ज्ञात

× × ×

घ्या अनुभव अनुभव जनहो । येणेंचि मुक्तिचा लाहो
हरि एक-एकता उरते । ही परा मुक्ति मुक्तांतें
हीच ती परात्पर-भेट । येथेंच परमसुख लोट
परसत्ता परमज्ञान । नाहीं या अनुभवावीण
हा अनुभव अद्वैताचा । उपकाराभ्यासें साचा
उपकाराभ्यासें अंतीं । हा अनुभव होइल चित्तीं
नाहीं या अनुभवावीण । परसत्ता परमज्ञान

× × ×

परसत्ताज्ञानानंद । भेटवि जनसेवाछंद

जनसेवा गांवा, देशा । सुखविणें तसें परदेशा
नेणेंच गांव परगांव । उपकारीं धांवाधांव
निजदेश जसा निजदेह । परदेश जसे परदेह
निजदेह सबल ठेवूनी । परदेहा सुख दे झटुनी
हें हेंच इष्ट या जगतीं । हें सत्य उमजला चित्तीं
जनसेवा यापरि चाले । निजसेवानंदें डोले
जनिं हरिमूर्ती अनुभविली । हरि एक एकता उरली
हा अनुभव अद्वैताचा । उपकाराभ्यासें साचा

\+ + +

उपकारीं नीट रिघाले । त्यां देश देशमय झाले
'देश देश' ऐकुनि वीट । नचि त्यां ते उपकृति धीट

÷ ÷ ÷

मनुज जे स्वार्थपर कीट । होतील ते उपकृति धीट ॥
पाहुनी संत उपकारी । भोगुनी दुःख अपकारीं
येतिल हे रस्त्यावरती । उपकारी होतिल जगतीं
'देश देश' ऐकुनि मग हे । नाचतील परमोत्साहें

\+ + +

'देश देश' ऐकुनि वीट । येतसे तयां जें कीट
जे धीट नीट उपकारी । सुख त्यांना अवीट भारी

## ४८ दीन दीन-हर हर (गीत)

पुरे जाहली निद्रा आतां दीन दीन-हर हर बोलो ॥ ध्रु० ॥
सुन लो, प्यारे हिंदी भाई ओ ! बात मायभूकी सुन लो ! १
सत्याग्रहकी धून लगावो देशप्रेम दिलमें भर लो २
देश हिंद हिंदीओंका है विचार यह चितमें भर लो ३
देश हमारा हमें चाहिये भाई सब निश्चय कर लो ४
मुसल्मान हिंदू या औरों हिंदी सब भाई गिन लो ५
चलो दीनकी धून लगावो दीन देशसेवा कर लो ६
एक लाख सत्याग्रहवाला भाइ जमा कर लो कर लो ७

त्यों न मिले यह फौज देसमें नहि छुटकारा त्यों सुन लो ८
दीन बडा प्यारा हरजीको हरजी भी उसको सुन लो ९
मसजिदि या मंदिरवाला हो देस देस चितमें भर लो १०
जिद्दी मसजिदि धीर मंदिरी मेला यह भारी कर लो ११
देस चाहिये ! हिंदीओंका सत्याग्रहमेला कर लो १२
जिद करो धीरता धरो सब दीन दीन-हर हर बोलो १३

## ४९ कवींस विनवणी (गीत)

कवींनो तुम्हां ही विनवणी ॥ धृ०॥
मज एक हवें हें माझ्या हरिची सांगाया सांगणी ।
भक्तिनें उभे रहावें कुणी ॥
हा भावभुकेला माझा हरि घे मजला संभाळुनी ।
जरी मी अल्पबुद्धि या जनीं ॥
हा भावभुकेला सुदामयाचे पाय देह दाबुनी ।
करि तया अकिंचनाचा धनी ॥
हा भावभुकेला कुब्जेला घे जवळी आलिंगुनी ! ।
हा भावभुकेला खेळ खेळला गोपाळा घेउनी ।
काय त्या पेंद्याची मोहनी ! ॥
या माझ्या हरिला भाव पाहिजे भावावरि मोहुनी ।
घेतसे सकलां संभाळुनी ॥
या भावभुकेल्या श्रीहरिसाठीं व्हावे कोणी गुणी ।
भक्तिनें श्रमतिल जे गायनीं ॥
या भारतदेशीं लक्ष लागतिल सत्य-आग्रही गुणी ।
भक्तिनें श्रमूं जरि गायनीं ॥
हें निःसंशय हें भक्ति-भक्त सांगतो ।
म्हणुनी मी भक्तिनें गीत लिहित चालतों ।
म्हणुनि मी हरीस्तव तुम्हांसि पाचारितों ।
या चला लवकरी माझ्या हरिची ।
व्हा हो व्हा लेखणी । कवींनो ! तुम्हां ही विनवणी ॥

## ५० सत्ता व शहाणपण (श्लोक)

दुज्या सूख व्हायासि कष्टें जगावें । दुज्या सूख व्हायासि कष्टीं मरावें
असा कष्ट-सिद्धान्त ज्या सज्जनाचा । शहाणा म्हणों कां न त्यातें त्रिवाचा १
शहाणा खरा आत्मयाचा जयानें । निदिध्यास केला, अशा चिंतनानें
जया स्वार्थ-वैयर्थ्य आलें कळोनी । यदात्मा जनात्म्यांत गेला मिळोनि २
जनांसाठिं सारा जयाचा पसारा । तयाचे मनीं नाहिं दुखासि थारा
'जगीं सर्वसूखी' अशानें अपेसा । असे जाहला, शाहणा तो न कैसा ३
अशा शाहण्यांच्या शहाणेपणानें । जनीं सत्य-साधुत्व-सौभाग्य ठाणें
असे ही द्वयी शर्मदा मानवांतें । शहाण्यांविना ही जगेनाच येथें ४
अशा शहाण्यांच्या शहाणेपणानें । जनीं आत्मविश्वास सद्धैर्य बाणे
अशा धैर्ययोगें विपक्षीय सत्ता । नमे थोर सामर्थ्यशाली प्रमत्ता ५
न सत्तेपुढें चालतें शाहण्याचें । असें जें असें सूत्र सामान्य, त्याचें
विरोधी असें सूत्र हें प्राप्त जालें । शहाण्यापुढें कांहिं सत्ता न चाले ६
शहाणे जनात्मे असे कष्ट-योगी 'जगीं सर्वसूखीं' स्वराज्यार्थ जोगी
स्वदेशामधें आज आहेत थोडे । न याकारणें आज तें भाग्य जोडे ७
म्हणूनी करावी उद्यांची तयारी । नको इंग्रजां-देशिंची व्यर्थ वारी
स्वकष्टार्जिता भाकरी तीच प्यारी । भिकेची तुम्हां येउं द्या हो शिसारी ८

## ५१ रिकामा शीण (अभंग)

### १

असो धिक्कार धिक्कार । नको भ्रान्त हा आचार १
कोठें गेला सुविचार । रुचे कैसा अनाचार २
काय जाहलें मनाला । कां त्या पक्षघात झाला ३
सरकारा उपदेश । करीतसां अहर्निश ४
अनाचार अत्याचार । आहेचि हा अति थोर ५
पांडुरंगा म्हणे ऐका । नका मारूं व्यर्थ हांका ६

### २

सांगावाच समाचार । परस्परांतें साचार १

जो जो करील सरकार । उपकार अपकार २
तो तो जनां कळवावा । जन शहाणा करावा ३
जाणत्यांनीं नेणत्यांस । जागवावें अहर्निश ४
हा तो जाणत्यांचा धर्म । चालूं द्या हें नित्यकर्म ५
परी जाणत्यांचा सरकारा । करा रोज जो हांकारा ६
असे भ्रान्त तो आचार । असे थोर अत्याचार ७
पांडुरंग म्हणे ऐका । नका मारूं व्यर्थ हांका ८

३

काळ्या आफरीका-देशीं । सरकार गोरें हौसी १
करीतसे हिंदीयांचा । छल दुःसह तो साचा २
परी तुम्हीं हाय हाय । करूनियां लाभ काय ३
तुम्हां तुमच्याच देशीं । सरकार गोरें हौसी ४
कसें वागवितें गोड । कसें पुरवीतें कोड ५
हें तों नलगे सांगावें । आहे सकळांना ठावें ६
अशा तुम्हीं हाय हाय । करूनियां लाभ काय ७
धाडा दुःखाचा संदेश । आहे सहदुःखी देश ८
स्वजनांचे दुःखें दुःखी । स्वजनांचे सुखें सुखी ९
हा तो सुजन-स्वभाव । येथें चालेना उपाव १०
धाडा दुःखाचा संदेश । म्हणूनीयां स्वजनांस ११
धरूं सत्याग्रह-कांस । असें म्हणतात त्यांस १२
द्यावा शक्य तसा हात । सर्व कांहीं बरें यांत १३
परी सरकार येथींचें । किंवा इंग्रज देशींचे १४
यांना सांगतां जें कांहीं । बरें यांत कांहीं नाहीं १५
पांडुरंग म्हणे ऐका । नका मारूं व्यर्थ हांका १६

४

शब्द मवाळ नरम । शब्द जहाल गरम १
दोनी व्यर्थ व्यर्थ व्यर्थ । सरकार हें कृतार्थ २
सरकार नव्हे अज्ञ । सरकार अति प्राज्ञ ३

शब्दाग्रह व्यर्थ येथें । हें तों ठाउकें तुम्हांतें ४
पांडुरंग म्हणे ऐका । नका मारूं व्यर्थ हांका ५

५

नको व्यर्थ शब्द नाच । सरकारा व्यर्थ कांच १
परस्परां समाचार । सांगा होय तो साचार २
करा जें जें कांहीं हातीं । बरी हेचि एक रीति ३
नको नम्र विनवणी । नको कान-उघाडणी ४
सरकार झांकी कान । हे तों कल्पना नादान ५
पांडुरंग म्हणे ऐका । नका मारूं व्यर्थ हांका ६

६

नाहीं लोकसत्ता घरीं । तंव घरीं आणि दारीं १
बहू पाहिजे सोशिलें । हें तों कपाळींच आलें २
एका साध्याचें चिंतन । एक साधन चिंतन ३
हेंच आतां बरें आम्हां । नको संताप रिकामा ४
लोकसत्ता हेंचि साध्य । हेंचि आमुचें आराध्य ५
सत्याग्रहाचें साधन । हीचि एक सोडवण ६
सिद्ध व्हावें हें साधन । याचेसाठीं रात्रंदिन ७
करा शक्य तो विचार । करा शक्य तो उच्चार ८
बरें हेंचि हेंचि करा । नका शीणवूं सरकारा ९
पांडुरंग म्हणे ऐका । नका मारूं व्यर्थ हांका ०१

## ५२ अभंगगीत—पार्थमोह

कृष्णा ! सख्या ! हा स्वजन । न घे झुंजायासी मन
रणीं घात यांचा करूं । तेणें श्रेय कांहीं वरूं
हें तों मज समजेना । दिसे विपरीत मना
राज्य, भोग सुखें सारीं । भोगो स्वजन संसारीं
याचेसाठींच आमुचा । व्याप सर्व असे साचा
परी येथें गुरु, पिते, । पुत्र आणीक प्रपिते

येथें मातुल, श्वशुर। श्याल येथें येथें पौत्र
येथें सर्वही स्वजन। आले झुंजावया रण
येथें बरें वा मरणें। नको कुणाला मारणें

× × ×

यांचे घातीं श्रेय नसे। पाप असुख गवसे
यांचे घातीं कुलक्षय। यांचे घातीं मित्रद्रोह
यांचे घातीं कुलधर्म-। नाश, कुलांत अधर्म
यांचे घातीं कुलनारी। पडतील व्यभिचारी
यांचे घातीं व्यभिचार। कुलीं करील संकर
मग कैचे कुलधर्म। मग कैचे जातिधर्म
नष्टधर्म या स्वजनां। मग नरकयातना
यांचे घातीं परंपरा। ऐशी पापाची उदारा
न हो ऐसा पापी घात। माझे हातूनी रणांत
येथें बरें वा मरणें। नको कुणाला मारणें

+ + +

नको नको प्रतीकार। बरा अशस्त्र हा कर
सुखें सशस्त्र स्वजन। माझा घेवोत हे प्राण
तेंच क्षेमतर मातें। नको बंधुघात हातें

+ + +

क्षेमतर हें मरण। क्षेमतर भिक्षाटन
परी नको बंधुघात। होणें हातूनी रणांत
प्राण माझा हे न घेती। मज भिक्षेसी लाविती
तरी तेंही बरें मातें। नको बंधुघात हातें

× × ×

यांचे घातीं श्रेय नसे। पाप असुख गवसे
असुखाचें त्या शोकाचें। चित्र मजपुढें नाचे
बंधुघातशोकचित्र। देखुनी हें गाल गात्र
माझें कांपतें धाकानें। मज घात हा न माने

+ + +

यांचे घातीं प्राप्ति एक । पृथ्वीराज्य निष्कंटक
परी मज हें साम्राज्य । नको नको सुरराज्य
यांचे घातीं स्वराज्यहीं । मज सुखदायी नाहीं
यांचे घातीं शोकें शोष । माझे शक्तीचा निःशेष
यांचे घातीं हीं इंद्रियें । शोकें होतील निष्क्रियें
येथें मरणेंच बरें । नको मारण्याचें वारें

\+ + +

पहा कृष्णा सख्या ! माझें । गात्र गात्र जालें ओझें
बंधुघात झाल्यावरी । शोक होईल जो भारी
त्याची केवळ कल्पना । तीही इंद्रिया मानेना
पहा भरलें कांपरें । कांटा सर्वांगीं थरारे
मुख पडलें कोरडें । धनु हातांतुनी पडे
दाह अंगीं अंगीं झाला । उभें राहवेना मला
नको नको बंधुघात । नको शोकाचा पर्वत
इंद्रियांची ऐशी स्थिति । तीच मनाची ही स्थिति
पटेना ही युद्ध-रीत । म्हणा वृत्ति "विपरीत"
कृपाविष्ट जालें मन । म्हणा 'दुर्बल' 'कृपण'
जसें मन तैशी बुद्धि । ती ही "विपरीत" बोधी
तिचा बोध गमे शुद्ध । म्हणा 'संमूढ' अशुद्ध'

\+ + +

धर्मयुद्ध क्षत्रियासी । श्रेय शिकविलें मसी
परी सर्व तें शिकणें । आतां पडतसे उणें
नसें श्रेय या रणांत । नसे धर्म या रणांत
अपश्रेय, धर्मनाश । तो हा येथें बंधु-नाश
कृष्णा सख्या ! कांहीं म्हणा । मज युद्ध हें मानेना

\+ + +

आलों स्वयें मी झुंझाया । परी आतां गेलों वाया
शंख स्वयें मीं फुंकिला । शस्त्रपात प्रवर्तला
स्वयें रथावरी आलों । स्वयें चाप घेता झालों

स्वयें बोलिलों तुजला । सेना दोनी पाहूं चला
स्वयें भरूनियां भरीं । आलों सेनामध्यावरी
स्वयें बुद्धि मन देह । येथें आले निःसंदेह
परी येथें ह्या स्वजन । कुरुपक्षाचा पाहून
देह सर्वेंच वांकला । मनीं संदेह ठाकला
बुद्धि तीहि देहा मना । रण झुंजाया सांगेना
कृष्णा सख्या ! कांहीं म्हणा । मज युद्ध हें मानेना

\+ + +

चाप टाकिलें, बैसलों । कृष्णा सख्या ! वांया गेलों
असे 'विषम' प्रसंग । तरी ऐसा माझा 'ढंग'
म्हणा 'मोह' म्हणा कांहीं । मला आठवत नाहीं
म्हणा 'अनार्य' 'अस्वर्ग्य' । 'क्षुद्र हृदयदौर्बल्य'
म्हणा 'मूळ अकीर्तीचें' । 'पार्था शोभेना हें साचें'
म्हणा 'क्लैब्य' म्हणा कांहीं । मला उठवत नाहीं

\+ + +

मज वाटे माझें खरें । तोंवरी हें माझें 'वारें'
कसें जाईल श्रीहरी ! । आतां एक गोष्ट करीं
माझा सखा तूं जाणता । तुझा सखा मी नेणता
घालवीं हें माझें 'वारें' । जरी तुझें असे खरें
तुझें तेंचि माझें खरें । होतें आजवरी खरें
परी क्षणीं या श्रीहरि । 'विपरीत' जाली परी
आतां मित्र-कार्य करीं । आतां गुरु-कार्य करीं
घालवीं हें माझें 'वारें' । जरी तुझें असे खरें

० ० ०

देह-माया मोहवारें । पार्था बोलवी उत्तरें
तीं हा ऐकुनियां हरि । पार्थावरी कृपा करी
घालवुनि त्याचा मोह । करी त्यासि निःसंदेह
मग पार्थदेह चाप । घेई उठे आपोआप
पार्थदेह येणें रीति । वरी सुक्षात्रिगनीति

हीच नीति धर्माचार । तेणें पार्थदेहोद्धार
यथाधर्म जो आचार । तोचि उद्धारे उद्धार

० ० ०

हा अभंग गीतेचा तिसरा अभंग । श्रीरमारंगसंगें पांडुरंग ।
गातसे जनीं देहमायाभंग । सुरंग अव्यंग रंगावया ॥

## ५३ धर्मवार्ता (अभंग)

"कृष्णा सख्या माझें खरें । मला वाटे तों हें 'वारें'
युद्धत्याग करायाचें । नाहीं जाणार हें साचें

× × ×

पार्थवच हें ऐकुनी । वदे श्रीहरि हंसुनी
पार्था सख्या ! तुज युद्ध । दिसे अधर्माचें शुद्ध
युद्ध त्यागीच तोंवरी । हीच नीति पार्था ! खरी
तरी युद्ध राहो आतां । करूं कांहीं धर्मवार्ता

\+ + +

माझा सखा तूं प्रेमाचा । बंधु प्रेमीं तूं धर्माचा
तुला युद्ध हें अधर्म । वाटे तोंवरी हा धर्म
बंधु सकल प्रजांचा । तुझा आणीक सत्याचा
सत्ताभ्रष्ट राहणार । प्रजा कष्ट साहणार

\+ + +

राजा नष्ट दुर्योधन । त्याचें जाणतोसी मन
पार्था ! धर्मराजसत्ता । हरावयासी सर्वथा
काय काय कौरवांनीं । केली अधर्मकरणी
द्रौपदीशीं अमानुष । कैसें केलें तें साहस

\+ + +

धर्मा तुम्हां मारावया । काय काय केली माया
जाणतोसी सर्व गोष्टी । जाणूनीही होशि कष्टी

सामोपाय तुम्हीं केला । गेलों साम-शिष्टाईला
परी साम दुर्योधना । दंडवीरासी मानेना

० ० ०

दंडप्रियां देणें दंड । नको अधर्माचें बंड
प्रजाजनांचें कल्याण । धर्मसत्ता-संस्थापन
म्हणूनीयां धर्मसत्ता । आम्ही स्थापणेंच आतां
ऐसा सुदीर्घ विचार । करूनीयां तुम्ही चार
जनीं धर्म-सत्ता व्हाया । सिद्ध जाहला झुंझाया

० ० ०

दीर्घ जाहला विचार । जाला साम-उपचार
दीर्घ विचारें हें युद्ध । तुम्हीं ठरविलें शुद्ध
शुद्ध आज तें अशुद्ध । एका क्षणीं झालें युद्ध !

० ० ०

एका क्षणाचा विचार । दीर्घ कालाचा विचार
दोन्ही तुझे तूंचि पहा । करी धर्मदास देहा

० ० ०

धर्म 'सहज' देहाचा । आत्म-सेवकत्व साचा
आत्मसेवेचा व्यापार । तोचि देहाचा उद्धार
उद्धाराचें हें लक्षण । 'नित्य-शुद्ध-सुखस्थान'
ऐसा उद्धार संसारीं । धर्म-विहित आचारीं
म्हणूनीयां पार्था सख्या । जीविं सांठवी ही व्याख्या
"यथाधर्म जो आचार । तोचि उद्धार उद्धार"

## ५४ अद्वैतविशिष्ट द्वैत (अभंग-गीता)

पार्था ! आत्म-सेवा-धर्म । हाचि सनातन धर्म
हाचि खरा आर्यधर्म । हेंचि नित्य शर्मकर्म

\+ \+ \+

पार्था सख्या ! मानवांचें । तैसें देवादानवांचें

पार्था ! अखिल जीवांचें । धर्मशास्त्र एक साचें

\+ + +

ब्रह्मअंश सर्व जीव । जड तेंही तत्संभव
सर्वां साधारण धर्म । सर्वां सनातन धर्म
आत्म-परमात्म-सेवा । येणें नित्यसुखठेवा
नित्यसुख तो उद्धार । उद्धारार्थ धर्माचार

\+ + +

ब्रह्मलीला हें ब्रह्मांड । सुखहेतु लीलाकांड
"आहें एकलें एकलें । व्हावें बहु आकारलें"
स्फुर्ति ऐशी ही ब्रह्माची । जननी या ब्रह्मांडाची
स्फूर्ति बहू व्हावयाची । सुखभोगासाठीं साची
'एकमेव अद्वितीय' । तेथें विश्व द्वैतमय
सुखासाठीं जन्मा आलें । एक द्वैतसुखीं धालें

\+ + +

एक-अंश सर्व आम्ही । एक ओळखूं हृद्धामीं
तरी विश्व द्वैतमय । होईल हें सुखमय
विश्वीं एक ओळखावें । जीवीं एक तें पहावें
दृष्टि स्थिर ही करावी । येणें नित्यसुख जीवीं

\+ + +

एक ब्रह्मांडीं वावरे । द्वैतीं अद्वैत संचरे
अद्वैतानें विशेषलें । द्वैत विशिष्ट बोलिलें
द्वैतीं वर्ततां जीवासी । तुटी नाहींच ब्रह्मासी
ऐशी क्रिया ती जिवाची । लीला विशिष्टद्वैताची
हीच लीला येथें साची । शुद्ध अक्षय्य सुखाची

\+ + +

येथें द्वैताचा संसार । नाना द्वंद्वांचें आगर
जीव-शिव जीव-विश्व । द्वंद्व येथें जीव-जीव
द्वंद्व आत्मा-देह जीवीं । द्वंद्व आत्मा-बुद्धि जीवीं
द्वंद्व आत्मा-मन यांचें । द्वंद्व आत्मा-अनात्म्याचें

जीवीं अनात्मानिकाय । देह-मन-बुद्धि त्रय
द्वंद्व सत्य आणि भ्रम । द्वंद्व सत्त्व आणि तम
तम-रज सत्त्व-रज । द्वंद्व अमित सहज

× × ×

द्वंद्व-बहुत्व-पसारे । एक ब्रह्माचेच सारे
एक लीलेनें आकारें । मांडी बहुत्व-पसारे
येथ गुण परिमाण । बहुभावाचें साधन
गुण सत्त्व रज तम । लेउनीयां उपक्रम
बहु-भाव धारणाचा । केला निर्गुणानें साचा
परिमाण ऊनाधिक । गुणां लेवूनि एक
बहु-भावें आकारलें । ब्रह्म द्वंद्वमय झालें

\+ + +

द्वंद्व आत्मा-अनात्म्याचें । जीवा हेंच जिव्हाळ्याचें
जीवा सुखाचें दुःखाचें । हेंच कारण नित्याचें

× × ×

आत्मा अनात्मा ही एक । परी आत्मा गुणाधिक
गुणाधिक्यगुणें आत्मा । धनी, सेवक अनात्मा
हीच विशिष्ट द्वैताची । बुद्धि जीवा जिव्हाळ्याची
क्रिया 'लीला' या बुद्धिची । खाणी अक्षय्य सुखाची
देह, बुद्धि, आणि मन । हा जो अनात्म्याचा जन
तेणें ज्याचे त्याचे परी । आत्मा सेवावा संसारीं
आत्म्याची ही चाकरी । सुख अक्षय्य देणारी
हीच विशिष्ट द्वैताची । लीला अक्षय्य सुखाची

* * *

धर्म विशिष्ट द्वैताचा । देहा आत्म-सेवा साचा
पार्था हाचि हाचि धर्म । सनातन आर्यधर्म
देहें आत्म्याचें ऐकावें । रणीं मारावें—मरावें
धर्मझुंज उभें पुढें । तेथें नको हीन रडें
धर्मझुंज हें उद्धार । तव देहाचा साचार

यथाधर्म जो आचार । तोचि उद्धार उद्धार

हा अभंगगीतेचा पांचवा अभंग०

## ५५ अभंगगीता—प्रेय व श्रेय

इंद्रियाणि पराण्याहुरिंद्रियेभ्यः परं मनः ।
मनसस्तु परा बुद्धिर्योबुद्धेः परतस्तु सः ॥
एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना ।
जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ॥

पार्था ! देहीं । कर्मेंद्रियें । स्थूल सूक्ष्म ज्ञानेंद्रियें
इंद्रियें हीं देहाहूनि । श्रेष्ठ गुणीं आणि मानीं
मन इंद्रियांसी श्रेष्ठ । मना बुद्धि आहे श्रेष्ठ
आत्मा बुद्धीहूनी 'पर' । 'संस्तंभक' सर्वांवर

*    *    *

बुद्धि-आदिक अनात्मा । त्यासी कोणी म्हणे 'आत्मा'
भ्रम-भ्रान्तांचा हा आत्मा । याचेवरी सत्य आत्मा
भ्रम-आत्मा-संस्तंभन । सत्य-आत्म-कार्य जाण

*    *    *

पार्था ! विश्वद्वैतमेळा । आधीं इंद्रियांच्या डोळां
पडे मोहक थाटाचा । किंवा त्रासक कष्टाचा
यांत इंद्रियांतें प्रिय । त्याची झणीं लागे सोय

*    *    *

आंत मालकाची स्वारी । द्वारीं उभी प्रतीहारी
गांठ घ्याया मालकाची । गर्दी लहानाथोरांची
यांत प्रतीहारीप्रिय । त्याची झणीं लागे सोय

*    *    *

इंद्रियाची शिफारस । क्षणोक्षणीं अहर्निश
बाह्य अंतरीं पाठवी । आंत सकलां भेटवी

*    *    *

ज्ञानेंद्रिय-प्रतीहारी । फारा दिसांची या घरीं

शिफारस या बाईची । बाह्य लहाना-थोरांची
हेटाळणें अवघड । असो नसो वा सवड

\+ + +

यत्नें बाळपणीं जिणें । केले धन्यासी शाहणें
प्रेमें लेववीलें लेणें । दिलें प्रियसें खेळणें
जुनी बाई ती घरची । 'जड' होते सहजचि
बाईची या शिफारस । धन्या-घरींच्या जनांस
हेटाळणें अवघड । असो नसो वा सवड
असो स्थानीं वा अस्थानीं । येवो भलताही कोणी
त्यासी येऊं देणें पडे । "जड जुन्याचें पारडें"

\+ + +

ज्ञानेंद्रियां येणेंपरी । जी जी आवडती परी
ती ती आंत सर्वां भेटे । संवईनें गोड वाटे

× × ×

दृष्टि, श्रवणा, नासिका, । रस-रसिका, स्पर्शिका
गुणाधिक देहाहुन । देह-स्त्रीजन हा जाण
यासी कोणासी जो प्रिय । त्याची आंत झणीं सोय
स्त्रीजन हा उभा द्वारीं । 'चपरासी' जीव-घरीं
यांची लाभे शिफारस । तरी त्वरित प्रवेश
यांना जाहला अप्रिय । त्याची बाहेरीच सोय

× × ×

कर्मेंद्रियें ज्ञानीं हीन । कर्मीं केवळ प्रवीण
ज्ञान-ग्रहण-प्रवण । सर्व देह-नारीजन
परी आपुलाले परी । करी कर्म पति-घरीं
देह-इंद्रिय-व्यवस्था । ती ही यापरीची पार्था

× × ×

देहा विश्वद्वैत-मेळा । भेटे प्रथम सगळा
तेथें इंद्रियांतें प्रिय । त्याची झणीं आंत सोय
अप्रिय जें इंद्रियांस । त्याचा दुष्कर प्रवेश

ऐशी स्वभावें रहाणी । जीवाचिया बालपणीं

\+ + +

देहीं पांच त्याच्या नारी । तैसे पांच कर्मचारी
वाचावती ही मुखस्थ । हस्त-पाद पायूपस्थ
कर्मचारी हे देहाचे । दास त्याचे स्त्रीजनांचे
देह-नारीजना गोड । तें तें पुरविण्या कोड
उभे अहर्निश द्वारीं । ऐशी देहीं आहे परी

\+ + +

दास-युत देह-नारी । ज्ञान-कर्म-गुणें भारी
देह-पतिराजाहुनी । 'पर' बोलिल्या म्हणूनी

* * *

जीव वाढे अनुदिन । तैसें वाढे त्याचें मन
देहा इंद्रियां अप्रिय । तेंही कांहीं मना प्रिय
मन 'पर' देहेंद्रियां । प्रिय मनाचें कराया
देहेंद्रियां जाले कष्ट । तरी तेंही असे इष्ट
देहेंद्रियांतें आवडे । परी मनातें नावडे
तेथें 'सस्तंभ' मनें । देहेंद्रियांचें कारणें

\+ + +

संस्तंभन 'थांबविणें' । परें अवरासी यत्नें
हेंचि नित्यशर्मकर्म । हाचि सनातनधर्म
देहेंद्रियें आणि मन । बुद्धि 'पर' यांचेहुन
मनदेहेंद्रियां प्रिय । परी बुद्धीतें अप्रिय
तेथें देहेंद्रियें मन । यांचें इष्ट संस्तंभन
बुद्धि मन-देहेंद्रियां । प्रिय, अप्रिय आत्मया
तेथें सर्व अवरांचें । इष्ट संस्तंभन साचें

\+ + +

देहेंद्रियें बुद्धि मन । सर्व अनात्म्याचे जन
जीवीं अवर अनात्मा । पर आत्मा अंतरात्मा

परें सर्व अवरांचें । इष्ट संस्तंभन साचें

० ० ०

परावर दोनी जीव । जीव तोचि ब्रह्म शिव
परी पर वर गुणी । अवर तें ऊन गुणी
वर-गुण ऊन-गुण । वर-मान ऊन-मान
ऐशा विशेषीं अद्वैत । विशेषूनी होय द्वैत
येथें विशिष्टाद्वैतांत । वरें अवराचि मात
नीट पहावी शोधावी । अवीट ती चाखूं द्यावी
दिसे जी का अधमशी । झणीं संस्तंभावें तिसी
सदा असूं द्यावें ध्यानीं । मीच वरावर दोनी
वरावर विश्वीं दिसे । तेंही मीच मीच असे
मीच विश्व मीच शिव । माझे इच्छेनें मी जीव
ध्यान सदा येणेंपरी । मान वराचा संसारीं
वरें अवर-शोधन । अवरांचें संस्तंभन
लीला विशिष्ट द्वैताची । हीच म्हणीतली साची
नित्य सुखाची संसारीं । लीला हीच पार्था ! खरी

० ० ०

जीवीं अवर अनात्मा । पर आत्मा अंतरात्मा
जीवीं संस्तंभक शास्ता । जीवदेशाचा नियंता
पर आत्मा सनातन । अवर ते प्रजाजन
जीवाचिया प्रौढपणीं । हीच सुखाची राहणी

० ० ०

आत्मा जीव-क्षेत्र-ईश । जीवदेश आत्मदेश
देहेंद्रियें बुद्धि मन । आत्मयाचे प्रजाजन
हेंच नातें सनातन । नित्य सुखाचें साधन
येथें क्रांति कांहीं होय । तरी दुःखाची ती सोय
देहेंद्रियें बुद्धि मन । असो कोणीही यांतून
जीव-देशीं सत्ता यांची । जीवा ठेव ती दुःखाची

० ० ०

परावर दोंनी जीव । आत्मा अनात्माही जीव
सत्तासुख अनात्म्यातें । असे सुख तें जीवातें
परी दुःख जें आत्म्यातें । दुःख असे तें जीवातें
सत्ता जीवीं अनात्म्याची । आत्मयाला ती दुःखाची
येणें परी अनात्म्याची । सत्ता सुखाची दुःखाची
सुख अल्प दुःख भारी । म्हणूनीयां ही वैखरी
'जीवदेशीं अनात्म्याची । सत्ता ठेव ती दुःखाची'

× × ×

आत्मयाचा अतिप्रेमी । जीव, जाणती संयमी
अनुभवी हें जाणती । जीवा आत्मा नांव देती
'जीव आत्मा आत्मा जीव । सारा अनात्मा अजीव'
ऐशी भाषा अत्युक्तीची । योजुनीयां ही दोषाची
संत वर्णिती सप्रेम । गाढ जीव-आत्म-प्रेम

× × ×

आत्मा जिव्हाळा जीवाचा । जरी अनात्मा ही त्याचा
अनात्म्याचे दुःखें दुःखी । आत्मयाचे दुःखें दुःखी
जीवा दुःख या दोघांचें । असे स्वतांचेंच साचें
परी प्रेमें आत्मदुःख । तेंचि जीवा भारी दुःख

× × ×

मर्मस्थानींचा आघात । तेणें दुःख भारी होत
सुख-स्पर्श गालीं केला । ठोंसा हृदयीं मारिला
तेणें देहा दुःख सुख । सुख अल्प भारी दुःख
हीच गोष्ट आहे जीवीं । जाणती हें अनुभवी
सुख होतें अनात्म्यातें । तरी जीवा तें पावतें
परी 'कपोल' अनात्मा । जीवीं 'हृदय' हा आत्मा
सुख कपोलातें जाले । ठोंसे हृदयीं बैसले
तरी जीवा दुःख सुख । सुख अल्प भारी दुःख
मर्म हृदय देहाचें । मर्म आत्मा या जीवाचें
जीव-देशीं क्रांति होय । आत्मसत्ता लया जाय

देहेंद्रियें बुद्धि मन । राज्य करीती आपण
हाच हृदयीं प्रहार । गालीं स्पर्श हळुवार
येथें 'सुख जवापाडें । दुःख पर्वताएवढें'
येणें सत्ता अनात्म्याची । 'जीवा ठेव ती दुःखाची'

× × ×

जीव देशीं आत्मा राजा । अनात्मा ही त्याची प्रजा
हेंचि नातें सनातन । नित्य सुखाचें साधन
अनुभवी हें जाणती । जाणुनी हें सुखी होती

\+ +

नातें आत्म्याचें आपुलें । ब्रह्म-इच्छेनें जें झालें
जीवानें तें ओळखून । संपादावें सुखीपण
नित्यसुखीपण-ठेवा । व्हावा सानथोर जीवां
नित्यसुखीपण 'श्रेय' । सर्व जीवांचें हें ध्येय
मार्ग श्रेय हें लाभाया । बुद्धिमनां देहेंद्रियां
सर्वां आत्मराजनिष्ठ । करणें हा असे स्पष्ट
स्पष्ट जाणते जाणती । श्रेय-शत्रूतें म्हणिती

× × ×

श्रेयशत्रु कामक्रोध । लोभ मोह हेवा मद
काम विषयरंगाचा । क्रोध कामनाभंगाचा
लोभ मानाचा धनाचा । मोह आप्त स्वजनांचा
हेवा दुज्याचे भल्याचा । मद आपुले भाग्याचा
श्रेयशत्रु सहाजण । यांत काम अग्रगण्य
साहीजणां या जाणता । हाणी श्रेय-संपादिता

× × ×

पार्था ! श्रेय तुज व्हावें । तुज नित्य-सुख व्हावें
तरी जाणत्यांची वाट । तुवां चालणें चोखट
श्रेय-शत्रु सहाजण । 'प्रेय' पुढती करून
तुझे अनात्म्याचें जन । त्यांसी घेतील मोहून

० ० ०

देह इंद्रियें बाहेर । त्यांसी शत्रूंचे या हेर
आधीं हेरिती घेरिती । नाना रीतीं मोहविती

× × ×

"देहा ! दशेंद्रिय-इंद्रा ! । जीवदेशीं राजमुद्रा"
तुझी तुझीच असावी । दुज्या कोणाची नसावी
अरे ! रसना, नासिका । दृष्टि, श्रवणा, स्पर्शिका
यांची थोरवी संसारीं । तुला अवगत सारी
थोर लाभल्या गृहिणी । यांनीं व्हावें राज-पत्नी ।
ऐसा अधिकार यांचा । तुला अवगत साचा
तुझे कर्मचारी जन । तेही वीर सुयोधन
तुला नाहीं कांहीं कमी । कामादिक तुझे प्रेमी

× × ×

ऐशी बरळ सुढाळ । करूनीयां कांहीं काळ
देहा देहाचे स्त्रीजना । देह-कर्मचारी जना
मोहविती शत्रुहेर । प्रेय करूनी समोर

० ० ०

दृष्टि-आदि नारीजन । राणीपदा लोभावून
कर्मचारी-जना-हातीं । पाहिजे तें करविती
देह बावळा अज्ञान । धूर्त तयाचा स्त्रीजन
भोगावया राणीपद । देहीं भरी हेवा मद
येणें परी भरीं भरे । देह सत्तेसाठीं झुरे

* * *

मन 'पर' बुद्धि 'पर' । देह इंद्रियें अवर
आत्मा पर या सर्वांस । जीवदेशींचा क्षितीश
जाणीवेनें या झुरणीं । देह पडिला पाहोनी
धूर्त तयाचा स्त्रीजन । बाह्य-साहाय्य घेऊन
मोहवीत मन बुद्धि ।

०••• ०••• ०•••

तेणें देहा राज्यसिद्धि

*    *    *

कामादिक बाह्य जन । त्याचें साह्यसंपादन
नसे साध्य मोलाविणें । हें तों नलगे सांगणें
"अनिर्बंध व्यापाराचा । हक्क असावा अमुचा"
कामादिक ही मागणी । करीतातीं नम्रपणीं
यांचें साहाय्यावांचून । नाहीं राज्य हें जाणून
देह मागणी बाह्यांची मान्य करी व्यापाराची

\+    +    +

येणें रीती जीववेश । प्राप्त होतांचि देहास
कामादिक 'अनिर्बंध' । देशीं वागतीं स्वच्छंद

o    o    o

देह राजा नामधारी । खरे राजे हे व्यापारी
ऐशी होते जीवदेशीं । स्थिति राजसी तामसी

\+    +    +

कामादिक सहाजण । 'प्रेय' पुढती करून
जीव देशीं सत्ताधारी । होतीं पार्था ! येणेंपरी
कामादिकांची ही सत्ता । रुचे अनात्म्या प्रमत्ता
कामादिकांचा व्यापार । वाटे सर्वथा सुंदर
ऐसा कांहीं काल जाई । पुढें 'भोग' उभा राही
बुद्धि मन देहेंद्रियें । मग त्रासतीं निश्चयें
तेथें पार्था ! 'पर' बुद्धि । तिला प्रथम ये शुद्धि
पुढें जागें होई मन । शुद्ध बुद्धीचें ऐकून
देह सपत्नीक पुढें । शुद्ध बुद्धीकडे ओढे
मग रुचते सर्वांसी । आत्मसत्ता जीवदेशीं

×    ×    ×

पार्था ! ऐसा हा संसार । येथें प्रेय हें असार
श्रेय नित्य-सुख-प्राप्ति । तुज व्हावी ही निश्चिती
पार्था ! श्रेय तुज व्हावें । तुज नित्य-सुख व्हावें

तरी जाणत्याची वाट । तुवां चालणें चोखट
श्रेय-शत्रु सहाजण । त्यांचें प्रेयाचें वचन
नको ऐकूं सख्या पार्था ! । विघ्नकर परमार्था
श्रेयशत्रु सहाजण । त्यांत काम अग्रगण्य
काम शत्रु 'दुरासद' । अति दुर्जय दुर्मद
याची गूढ कूट-नीति । नीट पारखूनी चित्तीं
याचा निरोधी व्यापार । किंवा मारी यासी ठार

\+ + +

काम-सोदर तुजला । मोह आज हा बाधला
आज मोहाचा व्यामोह । तसा उद्यां काम-मोह
तुला ओढील खालती । तेणें दुर्गतीची प्राप्ति
मोह आप्त स्वजनाचा । वेश मोहक कृपेचा
घेउनीयां तुज बाहे । धर्मच्युत करूं पाहे

\+ + +

मोह सोदर कामाचा । शत्रु तव कल्याणाचा
प्रेय करीत पुढती । अप्रियाची घाली भीति
तव देहा येणें रीती । आवडवी धर्मच्युति
तुझी भीति तैशी प्रीति । 'आवरणा'ची संतति
मोह निज-आवरण । तुजपुढें पसरून
धर्म-अधर्म-संशय । उपजवी मायामय
पार्था ! येथें सत्यज्ञान । हेंचि एक संरक्षण
ज्ञान जीवाचें शिवाचें । ज्ञान आत्मा-अनात्म्याचें
ज्ञान बाह्यांच्या लीलांचें । ज्ञान द्वैत-संसाराचें
ज्ञानशस्त्र हें संशय । छेदील हा मायामय
घे हें ज्ञानशस्त्र पार्था । नको मोहाची दुर्व्यथा

\+ + +

सत्य-ज्ञान-शिकवण । 'पार्था ! घेई चापबाण'
देहें आत्म्याचें ऐकावें । रणीं मारावें-मरावें
हेचि योग-शिकवण । हेचि सांख्य-शिकवण

धर्म-झुंज उभें पुढें । तेथें नको हीन रडें
धर्म-झुंज हें उद्धार । तव देहाचा साचार
यथा-धर्म जो आचार । तोचि उद्धार उद्धार

× × ×

हा अभंगगीतेचा सहावा अभंग । श्रीरमारंगसंगें पांडुरंग ।
गातसे जनीं देहमायाभंग । सुरंग अव्यंग रंगावया ।

## ५६ माझी प्यारी (गीत)

हिंद-भू-भक्ति मला प्यारी । माझि ही खुबसूरत नारी ॥ ध्रु० ॥
प्राप्त ही जाहलि मज बाला । जुना तो काल अतां झाला
बाल्य तें गेलें ही आतां । यौवनें मुसमुसली कांता
अहा तो भाग्याचा दिवस । माझिया सौख्याचा कळस
पाहुनी काय कोण जाणे । वेळ ती आणियली विधिनें
हिंद-भू-भक्ति-सुंदरीची । कहाणी उन्मादक साची
सुंदरी ही श्रीहरिभगिनी । मोहिनी विश्वरूप-खाणी
इयेचें प्रेम जेथ जेथ । अवतरे सती तेथ तेथ
इयेच्या प्रेमीं ज्या नारी । तयांसी हरि होउनि तारी
इयेच्या प्रेमीं जे पुरुष । तयां दे निजरूपें हरुष
अशी ही प्रेममयी मूर्ति । ऐकुनी हिची प्रेमकीर्ति
जाहलों इचा पुरा दास । पुरविली 'शुभमंगल' हौस
अहा तो भाग्याचा दिवस । माझिया सौख्याचा कळस
हिंद-भू-भक्ति मला प्यारी । माझि ही खुबसूरत नारी

## ५७ माझा बाळ (अभंग)

ब्रह्माचा तूं वांटा, ब्रह्मरूप बाळा, आलासी वेल्हाळा माझे घरीं ।
पितापुत्र नातें, पूर्वकर्मफळ, ब्रह्मरूप बाळ, अंकीं माझ्या ।
आठव नाठव, माझा मज होई, नाठवाचें ठाई, दुःख-भार
नाठवाचा ठाव, मोडूनीयां बाळ, आठवाचें बळ, वाढवीत ।
देहबुद्धि थोर, करूनीयां जोर, कामवृत्ति पोर, आवडवी ।
आवड ही वाढे, येई बाळ पुढें, बाळाचें या रडें, जड वाटे ।

जड–देह–दास, होऊनीयां त्रास, पोंचवीला यास, बरें नोहे ।
उमज रे मना, माझा बाळ तान्हा, देहबुद्धिविना, हीन करी ।
गोड बाळ गोड, गोड सर्व घरीं, अवतरे हरि, बहुरूपी ।
ज्याचे त्याचें परी, ज्यासी त्यासी हरि, शिकवीत घरीं येऊनीयां ।
बाळापाठीं बाळ, हेंच हें मंगळ, कुणा हीच कळ, मनीं लावी ।
बाळ एक येई, व्यग्र मन होई, जनकासि नेई, वैराग्यांत ।
माझें बाळ मातें, धडा शीकवीतें, नको देहनातें, म्हणतसे ।
उमज रे मना, नको ती कामना, बाळासी यातना, जिच्यासंगें ।
घरीं घरीं बाळ वाढवीत काळ, तयांचें मंगळ, करावें तूं ।
यातनेंचें घर, संसार बहूतां, तयांच्या तूं हिता, संपादावें ।
ब्रह्म देहीं देहीं, ओळखूनि मना, जनसेवाधना, मेळवावें ।
भूतदया हेंचि, मुक्तीचें साधन, हेंचि संतधन, सत्य सत्य ।
संतधन मना, शांतीचें तें घर, शांति हेचि थोर, जीवन्मुक्ति ।
जीवन्मुक्तिवाट, मज दाखवीण्या, आलासी तूं तान्ह्या, माझे घरीं ।
ब्रह्माचा तूं वांटा, ब्रह्मरूप बाळा, आलासी वेल्हाळा, माझे घरीं ॥

## ५८ तरुजन (शिखरिणी)

गजालिश्रेष्ठाची वसति घनकांतारजठरीं ।
हरीच्या भेटीनें असुखपरिणामी जरि तरी ।
वनीं जोंपावेतों भ्रमण करितो तो मदभरीं ।
तयाच्या सौख्याची तदितर न जाणे कुणि परी ॥१

तयाच्या सौख्यातें बघुनि मनिं हे उक्ति उमटे ।
महाभागा ! सौख्यें बहुदिस वनीं याच विनटे ।
स्वयें दुःखें भोगूं अमित तुजसाठीं अवचटें ।
न आम्हां लीला ही वनिं इतर हो हें मुळिं पटे ॥२

तुझ्या सोंडेनें या कितिक उपडीले हंसडुनी ।
तुझ्या पायांनींही कितिक चिरडीले रगडुनी ।
सभाग्या त्वल्लीला मग तनुसि भोंवेल समयीं ।
सुखें यो ती वेळा परि वन तुजें राहु अमयीं ॥३

गजालिश्रेष्ठा या निबिडवनिं वास्तव्य न करीं ।
मदांधाक्षा आहे जवळिच इथें निद्रित हरि ।
असें ऐकूनीयां तरुजन कुणी याच वनिंचा ।
थरारे, त्याचा हा पदविशद भावार्थ मनिंचा ॥४
असो ती कांहींहि तरु-करि-हरींची गडबड ।
हरी माझा सांगे विफल कृतिहीना बडबड ।
जिये शांतीसाठीं खटपट जगीं चाललि असे ।
तियेच्या प्राप्तीचा सुपथ जनसेवाच विलसे ॥५

## ५९ खरा मार्ग (अभंग)

धनी अंतरीं पाहिला । देह धन्याला वाहिला
आलों आतां विनवाया । सांगितलें तें सांगाया
जे जे झाले नर थोर । धर्मकिंकर उदार
हरीचेचि भक्त सारे । देवाचेचि भक्त सारे
महंमद पैगंबर । येशूख्रिस्त 'देवपुत्र'
श्रुतिस्मृतिऋषिवर । बुद्धमुनि महावीर
तुकावाणी साधुवर । चोखामेळा तो महार
हरीचेचि भक्त सारे । देवाचेचि भक्त सारे
त्यांनीं लोकां विनाविलें । गुणदोष दावियेले
कांहीं सांगूनियां गेले । बरें तेव्हां जें वाटलें
कोणीं त्यांचा छळ केला । कोणीं विटाळ धरिला
कोणीं बरें तें ऐकिलें । त्यांच्या भजनीं लागले
ऐशा झाल्या नाना परी । हेच रीति या संसारीं
कोणी वेळीं सांवरती । लवकरी जागे होती
कोणी हट्टानें झोंपती । भवतापानें तापती
ऐशा येथें नाना परी । हेच रीति या संसारीं
दुःख नको ओरडती । फार येती काकुळती
बहू रंजले गांजले । संसारासी या विटले
त्यांजसाठीं माझा व्याप । त्यांजसाठीं हा निरोप

कोणी सुखी सुखावले । दीन जनां विसरले
विसरले हा विसर । पुढें दुःखचि देणार
पुढें दुःख घरा येतां । दुःखें फोडितील माथा
आज सुखीं जे लोळती । येतील ते काकुळती
त्यांजसाठीं माझा व्याप । त्यांजसाठीं हा निरोप
तुम्ही सर्व पैगंबर । तुम्ही सर्व देवपुत्र
तुम्ही ब्रह्मा-हरि-हर । तुम्ही ईश-अवतार
तुम्हां नसे कांहीं उणें । जरी वागाल रीतीनें
जरी विचार कराल । जरी ज्ञान मिळवाल
जरी जुनें तें चाळाल । नवें चांगलें तें घ्याल
जुनें चाळाया चाळणी । एक भूतदया मनीं
नवें चाळाया चाळणी । एक भूतदया मनीं
भूतदयेची चाळणी । नीट वापरा जपूनी
भोंकें जातील बुजूनी । ऐसें न घडो हातुनी
नवें जुनें चाळा नीट । न यो चाळण्याचा वीट
जुनें सर्व जुन्या काळीं । होतें नीट त्या त्या काळीं
जुनें सारें आज नाहीं । आलें नवें कांहीं कांहीं
चाळा नवें जें जें घेणें । चाळा जुनें जें टाकणें
नीट काळजीनें चाळा । बघुनियां देशकाळा
ऐसें चालितां अंतरीं । गोष्ट सांगेल श्रीहरि
ती ती भक्तिभावें करा । हाचि मार्ग एक खरा ॥ १

## ६० जनसेवा (गीत)

एकही जनसेवा, जनसेवा ।
नेइ मुक्तिच्या गांवा ॥ धृ० ॥
चमत्कार-गोष्टी संतांच्या बहु ऐकियेल्या ।
अनेकपरि भक्तांनीं प्रेमळ मनें वर्णियेल्या ॥
नसे शांति संतासी भुलली चमत्कार बघुनी ।
पहा नीट संत जें सांगती पहा त्यांची करणी ॥

कोणी जे रंजले गांजले त्यांसि म्हणे आपुले ।
तोचि साधु तेथेंचि देव श्रीतुका साधु बोले ॥
चमत्कार ज्या ज्या संताचे तुम्हीं ऐकियेले ।
पहा नीट सांगणें तयाचें पहा कसा चाले ॥
हीच सांगणी हीच वागणी साधु सज्जनांची ।
जनसेवा ही एक वाट या मुक्तीगांवाची ॥
देव असे तेथेंचि रंजले त्यासि खरे अपुले ।
देव नसे इतरांसि प्राप्त हें तुका साधु बोले ॥
देवभेट, निर्वाण शांतिचें, मुक्ति, सर्व एक ।
ज्यासि रंजले खरे आपुले त्यासिच हें सूख ॥
हेंच हेंच सांगती संतजन, सर्व योगिराज ।
संतसांगणी करा; नको हे चमत्कार-चोज ॥
चमत्कार पाहुनी कांहींसा मिळतो आनंद ।
परी न तेणें प्राप्त कुणाला सदानंदकंद ॥
चमत्कारशक्तीमधिं दिसते असामान्य शक्ति ।
परी पाहुनी गंमत नाहीं मिळत शांति-मुक्ति ॥
मनःशक्ति थोरली यापरी ज्या संतां होती ।
ते वदले जनसेवेविण नचि मिळत आत्मशांति ॥
मनःशक्ति अद्भुत जी घडवी थोर चमत्कार ।
जवळि असुनि ती संत असति जनचाकरी करणार ॥
शांतिसाठिं ही धडपड सारी संत-असंतांची ।
शांतिवाट जगिं एक हौस या जनताचाकरिची ॥
चमत्कारशक्तीतें पाहुनि वंदन लीनपणीं ।
करा परी ओळखा मुक्ति नच केवळ या नमनीं ॥
चमत्कारवाल्यांहि मिळेना मुक्ति जिच्यावीण ।
ती जनसेवा अव्हेरुनि कां व्यर्थ नमन-शीण ॥
चमत्कारशक्ति ही मिळावी जनसेवेसाठीं ।
वाटे तरि मिळवाया करणें योग्य अटापीटी ॥
परी न भुलणें मिळवितां ही मिळतां ही शक्ति ।

जनसेवेविण नाहिं मुक्तिपद नाहिं अढळ शांति ॥
चमत्कारशक्ती मुळिं नसतां मन्मनिं शांति वसे ।
कारण याचें एक लीनपणिं जन मी सेवितसें ॥
शक्ति असे माझी साधारण अगदीं थोडीशी ।
जनांसाठिं खर्चितों पाहुनी आज जनस्थितीशीं ॥
शांति मिळे मज या विनियोगीं अक्षय आनंद ।
जनसेवा ही एकचि या जगिं अव्ययसुखकंद ॥

## ६१ उत्तम कल्याण (गीत)

देशवृत्ति विलसो स्वजनांत । अल्पदृष्टि ती नसो कुणांत १

\+ + +

अल्पदृष्टि परदेशिय परके । म्हणते जाउत विलयाहि भुके
स्वदेशीय भोगोत बहु सुखें । दृष्टि अशी दे अंतीं दुःखें
देशवृत्ति जी थोर दृष्टिची । विश्वजना सत्सुख ती इच्छी २

\+ + +

असो हीच स्वजनीं या माझ्या । प्रधान वांछा हीच मनीं ज्या
तें आधीं अंतर्मुख होतें । स्वीय धनाचा झाडा घेतें
सुधन कुधन वेगळें करीतें । सुधन वाढवुनि दुजें नाशितें ३

* * *

दिनरजनीं अंतर्मुख राही । व्यवहारीं अंतर्मुख राही
शिव्याशाप अपशब्दा साही । नको मान वा नाम कांहिंही
'देश देश' गुंजारव मनिंचा । 'विश्व विश्व' गुंजारव मनिंचा
'हरि-आज्ञा' गुंजारव मनिंचा । 'अहं ब्रह्म' गुंजारव मनिंचा ४

\+ + +

ध्येय एक उपकार तयांचें । काम एक देशोद्धाराचें
काम एक विश्वोद्धाराचें । काम एक धर्मोद्धाराचे
मनपण—विकार विचार सारे । देहपणा—जे कर्मपसारे
'विश्वमहं' सर्वत्रहि वारें । विश्व मीच माझें हें सारें
विकार विचार कर्मं सारीं । सदैव भरलीं सोहंकारीं ५

× × ×

ध्वनि सृष्टीचे जड जीवांचे । ऐकुनि सोहं सोहं नाचे
दृश्य देखुनी सोहंभाव । स्पृश्य स्पर्शुनि सोहंभाव
रसवासांतहि सोहंभाव । दुज्या वृत्तिसी नाहीं वाव ६

\+ + +

अंशब्रह्म असे जीवांत । अंशब्रह्म असे जडांत
सच्चित्सुख हें रूप कुणाचें । स्वरूप हें पूर्ण ब्रह्माचें
सत्-सत्ता-ही जडांत दिसते । सत् चित् सर्वहि जीवीं वसते
असो मूर्खता असो दुष्टता । स्पष्ट तिथें द्वय हें चित्सत्ता
सच्चित्सुख ही त्रयी कुणांत । जीविं तया जो शांतिच मूर्त ७

÷ ÷ ÷

शांति मूर्ति ही शांतगुणाची । गुण हे परिणति सुविवेकाची
सुविवेकाचा आश्रय केला । शांत गुणांचा लाभ जाहला
क्षमाशीलता न्यायप्रियता । विषयाविरक्ति विश्वबंधुता
शांत गुणांची मांदी ऐसी । सुविवेकें लाभे आपैसी
पूर्ण ब्रह्म-सुखाची छाया । भेटे शांत विवेकी हृदया ८

\+ + +

जीवा कथिली जीवन्मुक्ति । सच्चित्सुखमय ही शांति
देह तोंवरी हीच पूर्णता । सोहंभाव हीच तन्मयता
सोहंसुख-सच्चित्सुख-शांति । देहधारि जीवा ही मुक्ति
सुविवेकें मुक्ति ही लाभते । सोहंसुख सर्वांसि हवें तें ९

\+ + +

सुविवेकी व्हा यास्तव जनहो । अल्प दृष्टि ही सोडुनि द्या हो
देह-गृहा कांहीं विसरा हो । देश-देश भावना धरा हो
आचरणीं वृत्ति ही भरावी । धनसेवेची कांस धरावी
यांतचि तें उत्तम कल्याण । परा मुक्ति नच यावांचून १०

## ६२ ब्रह्मचर्य आणि विवाह (त्रिविध वृत्तें)

पुरा ब्रह्मचारी पुरा ऊपकारी । जनीं वंद्य तो एक सर्व प्रकारीं
पुरी ब्रह्मचारी पुरी ऊपकारी । जगीं वंद्य ती एक सर्व प्रकारीं

ब्रह्मचर्यांचे स्तुतीपाठ गाती । ब्रह्मचाऱ्यांची चरणधुळी घेती
घरीं लग्नाचा जुलुम चालवीती । अशी नवलाची असे लोकरीतिः
असे कामाचा जुलूम महा थोर । तयासाठीं लग्नादि कारभार
असे जुलुमाचा रामराम लग्न । पथ्यकर त्यां जे असति कामरुग्ण
जोंवरी हा बहुताप देत नाहीं । तोंवरी तरि लग्नाचि नको घाई
लग्न केल्यानें अल्पवयी काम । करित नरनारिंस लवकरी गुलाम
गुलामी या कामाचि तापदायी । कामसेवेमधिं पुण्य कांहिं नाहीं
देह–मीपण वाढतें कामभोगें । दुःख बहुपरी होतसे मोह-योगें
वर्ग मनुजांचे बहुत या जगांत । ब्रह्मचारी उपकारि श्रेष्ठ त्यांत
श्रेष्ठतेची ही खूण देह-वृत्ति । आंवरूनी स्वजनांसि साह्य देती
स्वजन सारें हें विश्व श्रेष्ठ त्याला । विश्वजनसेवा आवडे तयाला
विश्वजनसेवा बहुपरी घडावी । तरी विषयाची वृत्ति आंवरावी
देश व्हावा हा थोर असें वाटे । विश्व व्हावें हें थोर असें वाटे
थोरवीच्या मार्गांत असति कांटे । दूर सारुनि चालणें पडे नेटें
थोरवी या देशास प्राप्त व्हावी । थोरवी या विश्वास प्राप्त व्हावी
अशी इच्छा ज्या त्यांहिं आवरावें । देहवृत्तीतें, शांतितें वरावें
देहवृत्तीमधिं अंग-संग-वृत्ति । नरां-नारींची प्रबळ यौवनीं ती
प्रबळ वृत्ती ही आंवरिली ज्यानें । परम शांतीतें जिंकिलें तयानें
देहिं नाना रस खेळती तयांत । श्रेष्ठ सत्यचि तो जननशक्ति ज्यांत
हाचि रस दे सुख अंग-संग दासा । हाचि रस दे सुख नित्य-पद-निवासा
हाचि रस होतो वीर्य कामसंगें । हाचि रस होतो ओज कामसंगें
कामसंगें दे क्षणिक सुख शरीरीं । आत्मसंगें हा भवार्णवीं तारी
ओज तेजस्वी शांति-मुक्तिदायी । कामदमनें जेतुलें होय देहीं
तेतुलें तें परिणामिं सुखद साच । म्हणुनि आंवरणें खुळा काम-नाच
ब्रह्म सर्व स्थल-सर्व-काल-आत्मा । लीन तेथें जो विरागी महात्मा
जनोन्नतिसाठीं सदा ऊपकारी । तोचि तो या जनिं पुरा ब्रह्मचारी

* * *

दमावेंच कामा यथाशक्य यत्नें । रमावें जनोद्धारकार्यी प्रयत्नें
विचारेंच उद्धार झाला-सदैव । विचाराविणें वागणें हें कुदैव

ज्ञान-प्राप्ति विश्वजनसेवा । रमवी ज्या जीवा हा गोंवा
त्यातें कामदमन हो सुखद । याविण कामदमन तें दुःखद

\+ + +

जनसेवेविण कामदमन जें । तें किंचित्कर केवळ ओझें
अहंकार वाढवी वृथा तें । मुक्ति मिळविण्या कामिं न येतें

\+ + +

देहधारी घ्या जीव कसा कोणी । असो बुद्धीची सिद्धिचीहि खाणी
आज जितुके हे जीव पोळलेले । रडति जणुं हे तज्जन्म व्यर्थ झालें
असो पूर्वीचा थोर कुणि महात्मा । असो अथवा आजचा उदारात्मा
असो येणारा थोर कुणी योगी । देहधारी तो अल्पताच भोगी
सूक्ष्म दृष्टीनें जगाकडे पाहे । त्यासि तों हें सुस्पष्ट दिसत आहे
एक एका ये कार्य दुजें अन्या । देहिं देहीं वांटली शक्ति धन्या
ब्रह्मशक्ती ही देहिं देहिं राहे । सर्व देहांची स्वामिनी सदा हे
सर्व लहरींसी उदधि अधिष्ठान । तेंवि संसारा ब्रह्म आधिष्ठान
ओळखूनी हें देहधारि जीवें । काम आंवरुनी विश्वदास व्हावें
काम आंवरिल्यावीण विश्वदास्य । पूर्ण नच होई सुगम हें रहस्य
नम्रभावाची पूर्ण विश्वसेवा । हीच देते जनिं पूर्ण शांति जीवा
पूर्ण शांतीचे असति जे भुकेले । त्यांहिं पाहीजे विश्वदास्य केलें
असो; जीवामधिं जीव ब्रह्मचारी । विश्वसेवक तो श्रेष्ठ भवागारीं
अशा जीवाचे मागुनियां जावें । तरी त्याचें सुख आपणां मिळावें
नको लग्नाची उतावळी बेडी । नको वेळेच्या पूर्विं पायिं बेडी
मुलां-मुलिंना लागुं द्या ज्ञानगोडी । स्वजनसेवेची होऊं त्यांस जोडी
नाहिं पुण्याई कामसंगतींत । गुलामी ही ओळखा जिवाआंत
गुलामी ही वांट्यास जयां आली । तयां तापांची संगती मिळाली
काम कामी जन तापिं तापलेले । तयां सेवाया ब्रह्मचारी झाले
असे नारीनर धन्य धन्य लोकीं । तयां सांडीलें सदा मोह-शोकीं
लग्न-बंधें जे असति बांधियेले । काम-संगें संतान जयां झालें
तयांनीं हें मनिं नित्य आठवावें । प्राप्त संततितें शहाणें करावें
नियम बांधोनी काम आंवरावा । स्वजनसेवेचा लोभ वाढवावा

ज्ञान, जनसेवा, सदा नम्रभाव । याच अभ्यासें मुक्त होत जीव
मुलांमुलिंना राहुं द्या ब्रह्मचारी । ज्ञान, जनसेवा सार या असारीं
अन्य आहे जो येथ हा पसारा । मोह-कारण तो शोक शोक सारा
ज्ञान मिळवूं द्या योग्य तें मुलींना । शक्य तितुकें वाढुं द्या गृहीं त्यांना
रजोदर्शन होउनी कांहीं वर्षें । ज्ञान-अर्जनिं जावोत घरीं हर्षें

\+ + +

तिचे संमतीनें पुढें चांगल्याशीं । करा लग्न सत्कार्य-हौसी वराशीं
नको थाट मोठा, करा शास्त्रमार्ग । वृथा खर्च कां! येथ नाहींच स्वर्ग

\+ + +

स्वर्ग हा असे ज्ञान-अर्जनीं । स्वर्ग हा असे स्वजन-सेवनीं
अंगसंग हा सुखवि पळभरी । मोहिं बुडवुनी दुखवि कितितरी
मोह-दुख हें जाचितें मना । अनुभवें असे ठाउकें जनां
ज्ञान-अर्जनीं स्वजनसेवनीं । लीन होति ते धन्य या जनीं

\+ + +

स्वहित जनांचें कशांत आहे । ओळखुनी हें सेवित राहे
अशा नरातें अशा नारितें । बहुत निंदिती नवल काय तें

\+ + +

बाळ अज्ञानी स्वहित सर्व नेणे । तेंवि अज्ञानी जनहि सर्व नेणे
त्यांसि हितकरही गोष्ट कडू वाटे । म्हणुनि निंदेचें नवल मुळिं न वाटे

\+ + +

हळुहळू रुजे सत्य जन-मनीं । ज्ञान हात दे सत्य पोषणीं
निंदिलेंचि ते वंद्य होतसे । देव आपुलें कार्य करितसे

\+ + +

असे ही प्रथा संसृतीची टरीव । म्हणूनी नको कीर्तिची व्यर्थ हांव
असे सत्य जें अंतरीं आज ठावें । तयाचे प्रकाशें जनीं वावरावें

## ६३ दुही[1] (विविधवृत्तें)

नसे 'भीति', ना 'किंतु', आतार आर्य ! ।

---

१. हे बोल सवालकारांशीं 'प्रेमाचे बोल' या मथळ्याखालीं प्रसिद्ध झाले होते. 'सवाल' पुढें दिला आहे.

## मुसलमान बंधूंचा सवाल

### राष्ट्रैक्याची तळमळ

(रा. रा. जोगळेकर यांच्या ता. २०।८।१९ च्या लोकसंग्रहांतील कवितेवरून सुचलेले विचार.)

अहो बंधुंनो "बोलतां हिंदी-भाई । नसे भेद इस्लामि-हिंदूंत कांहीं"
असे तत्त्वतां बोल ऐसा खचीत । परी भेद कां दावितां वागण्यांत ? १
कधीं लेख† कादंबरी* लेहुनीयां । बहू तुच्छ आम्हां तुम्ही लेखुनीयां
टवाळी करीतां बरी ऐशी रीत ? । असा भेद कां दावितां वागण्यांत ? २
कधीं काढुनी नाटकें§ पद्य-ग्रंथऽ । बहू निंद्य भाषा करीतां जनांत
अशा रीतिनें वर्म काढोनि त्यांत । तुम्ही भेद कां दावितां वागण्यांत ? ३
नवी काढिली शीव-जन्मोत्सवाची । तशी टूम राज्याभिषेकोत्सवाची¹
तयामाजी निंदा करोनि प्रभूत । असा भेद कां दावितां वागण्यांत ? ४

### विनंति

जरी ऐक्य व्हावें असा शुद्ध हेतू । तरी टाकुनी द्या बवू सर्व किंतू
शरीरें मनें तें वृथा द्रव्य-पक्षें । नका बीज पेरूं दुही-वीष² बक्षें× ५
तुम्ही हिंदु जैसे अहां हिंद-पुत्र । अम्हीही तसेंची अहों किंतू नात्र°
तरी बंधुंनो वालुनी हात हातीं । करूं देशकार्यां; उरे कोठ भीती ? ६

वाळवें, जि. सातारा.
श्रीगणेशचतुर्थी
शके १८५१.

शिकंदुरलाल आतार

---

† ग्रंथमालेंतील अफजुलखानाच्या पोवाड्याचें परीक्षण; रा. ब. वैद्यांचा "शिवाजी-महाराज लुटारू होते काय ?" हा लेख; रा. ब. साने "औरंजेबाच्या कांहीं दंतकथा"; भा. इ. सं. मंडळ इतिवृत्त शके १८३८; आनंदांतील "शिवाजी आणि मुसलमान" हा संपादकीय लेख वगैरे मुसलमानांच्या विरुद्ध आहेत. त्यांचा समाचार आम्ही घेणार आहोंच. * हरिभाऊ आपट्यांची 'उषःकाल' कादंबरी पाहां. § नरवीर मालुसरे, पानपतचा मोबदला वगैरे नाटकें पाहा. ऽ विनायक कविकृत अफजुलखानाचा पोवाडा, सिंहगडचा व बाजी देशपांड्याचा पोवाडा वगैरे चटसारे ऐतिहासिक पोवाडे.

१. शिवरायांच्या जन्मतिथीनिमित्त व राज्यारोहणाप्रीत्यर्थ जे उत्सव होतात त्यांत मुसलमानांना झोंबण्यासारखीं कांहीं भाषणें होतात. २. दुहीरूपी विष. × अंतः-करणपूर्वक. ० यांत संशय नाहीं. —लेखक

धरा 'हात हातीं', 'करूं देश-कार्य' ।
असे बंधु मी तूमचा हिंदपुत्र ।
चला उद्धरूं मायभू ही पवित्र १

+ + +

दुही-कार कोणी तरी राहणार । कितीही करा ऐक्यधर्मप्रचार
दुहीचे विषाचा 'समाचार' घेऊं । चला या स्वराज्यार्थ हा जन्म देऊं २
खरे लोकसत्ताप्रिय प्राज्ञ लोक । तयांतें दुही पाहुनी होय शोक
सुटायासि सद्यःस्थितींतूनि देश । सुटाया हवा हा दुहीचा कुवेश ३
दुही योग्य जैं शत्रु 'इस्लामि-हिंदू' । परी आज आम्ही असों देशबंधू
दुही-वेश हा आज आहे कुवेश । जरी एकदां तोचि होता सु-वेश ४

× × ×

दुही सर्वथा ही असे बाह्य-वेश । बरा वा बुरा बोलवी काल देश
नसे अंतरीं भेद आम्हांत लेश । जिथें भेद तो सर्व माया-प्रदेश ५
असें शर्व हें विश्व माया-पसारा । इथें भेद हा सर्वदा राहणारा
"असें एकलें मी बहुत्वें असावें" । अशा स्फूर्तिनें ब्रह्म विश्वत्व पावे ६
बहूभाव लेऊनियां ब्रह्म जेथें । स्वयें राहतें भेद हा नित्य तेथें
परी भेद हा बाह्य-वेशांत आहे । स्वयें ब्रह्म वेशांतरी राहताहे ७
असे अंतरीं ब्रह्म-एकत्व भाव । म्हणूनीच विश्वांतरीं ऐक्य-हांव
निघे शत्रुभावांतुनी बंधुभाव । लया पावती सर्व अंतीं कु-भाव ८

× × ×

इथें हिंद-देशांत इस्लामि-हिंदू । जुने शत्रु ते आज आहेत बंधू
म्हणूनी दुही-वेश हा त्याज्य आज । दुहीनें बुडे सर्वही देशकाज ९
बहूभाव विश्वस्वभावेंच नित्य । दुही-भाव आहे परी हा अनित्य
असूं दोन ते दोन राहूनि वागूं । परी या दुहीची गुलामी न भोगूं १०
चला या चला 'घालुनी हात हातीं' । तुम्ही मी करूं या दुहीची समाप्ति
दुही-कार कोणी कसेही असोत । तयांहूनि भारी जन-प्रेम-स्रोत ११

+ + +

मराठे मुसल्मान हे शत्रु होते । तदा शत्रुभावें कसे वागले ते
जुने वृत्त हें बाड-वाक्यांत कोणी । कुणी कल्पना खर्चुनीयांहि वाणीं १२

असो बाड वा कल्पना जाड ताजी । दुही व्यर्थ जी वाढविणार आजी
अशी गोष्ट झांकूनि ठेवा खरीही । असे सांगणी श्रीहरीची बरी ही १३
बरी ही हरीसांगणी आदरानें । कुणी मानिती यादवीच्या दरानें
'खरें–प्रेमि' कोणी हरीसांगणीतें । कमी लेखुनी बोलती जें 'खरें' ते १४

* * *

'खऱ्यासाठिं' जे हे 'खरें बोलणारे' । कमी श्रीहरीसांगणी लेखणारे
नमस्कार माझा अशा बांधवांना। 'खरें प्रेमि' हो! श्रीहरीसी न माना ! १५
खरें रात्रि जें प्रेम कांहीं करीतां । तयाची दिनीं गा तुम्ही स्पष्ट गीता
खऱ्यासाठिं तुम्ही खरें बोलणारे । तुम्हां सभ्यतेचें नको 'झूट' वारें! १६
"खरें" व्यर्थ जें यादवी माजवीतें । खरें तें नसे, साफ खोटें असे ते
खरें देशकल्याण जें साधितें तें । दुहीकारि किंवा दुहीवेगळें तें १७
दुही यादवी कांहिं आधीं उठेल । परी शेवटीं देशकोडें सुटेल
असें जें खरें मायभूच्या हिताचें । तुम्हांला गमे, तें वदा सर्व साचे १८
तुम्हाअंतरींची खरी देशभक्ति । नसे जाणण्याची दुज्यां कांहीं शक्ति
म्हणूनी दुजे बाह्य कृत्यें बघूनी । तुम्हां दोष देतील तो घ्या नमूनि १९
नमूनी जनांसी मनांतील हेतु । वदावा यदा कोणि काढील किंतु
समाधान हें बोलणें दे न दे वा । जनां, हें नको पाहणें; मान्य देवा २०
धरा देव चित्तीं सदा सर्वकाल । स्मरा लोक हे सर्व त्याचेच बाल
धरा बाल-बंधु-हिताचीच चाल । करा नित्य यांच्या हिताचा सवाल २१
अशी शिस्त चित्तांत वाणी मुखांत । सदा ठेवुनी वागतो जो जनांत
तयाचें वचांहीं दुही होय कांहीं । असे ती जनांच्या हिताची सदाही २२
खरें सांगण्याची मनीं ये उभारी । विचारा तदा, देशकल्याणकारी
कसें होय तें ! या सवाला जबाब । नसे योग्य, तैं एक मौनांत 'आब' २३
असो गोष्ट 'बाडी' असो गोष्ट ताजी । दुही व्यर्थ जी वाढवीणार आजी
नसे जी बरी देशकल्याणकारी । खरीही नको ती, वदे श्रीमुरारी २४

× × ×

खरे लोकसत्ताप्रिय प्राज्ञ लोक । तयांतें दुही व्यर्थ पाहुनि शोक
असें अंतिं जी देशकल्याणकारी । दुही प्राज्ञ लोकां न ती शोककारी २५
परी शोककारी असो वा नसो ती । दुही टाळणें सर्वथा शक्य ती ती

तशी रूढ जी व्यर्थ वा सार्थ मारी । दुही मोडणें तीहि सुशांसि सारी २६

× × ×

चला, आर्य आतार ! द्या हात हातीं । चला या करूं या दुहीची समाप्ति
दुहीकार कोणी कसेही असोत । तयांहूनि भारी जन-प्रेम-स्रोत २७

× × ×

मराठे जुने ते भले रंगवीती । जुने तद्रिपू ते 'बुरे' रंगवीती
भल्याचें बरें हो, 'बुरें' वाइटाचें । असे रंगवीण्यांत हें सार साचें २८
असो रंग बाडांतला 'सत्य'—रंग, । असो वा कुठें कल्पनेचा तरंग
भल्याचें बरें हो, बुरें वाइटाचें । असे रंगविण्यांत हें सार साचें २९
भले धैर्यशाली जिवाचे उदार । भले धूर्त धूर्तांसि नीतींत थोर
मराठे तुम्ही एकदां नीट होतां । असें सांगु इच्छी कथा-रंगवितां ३०
तसे धूर्त धैर्याढ्य नीतींत थोर । तसे राष्ट्रभक्त स्वराज्यप्रवीर
तसे नीट व्हा घ्या स्वराज्याधिकार । असे रंगवीण्यांत हें हेंच सार ३१
तदा वीर्यशाली महाराष्ट्रियांनीं । स्वराज्यार्थयज्ञांत नारीनरांनीं
कशीं जीवितें होमिलीं तें स्मरा हो !। कथाकार-रंगांत हा हाच टाहो ३२
नको आज हिंसा, नको शस्त्र हातीं !। परी धैर्य तें, नीति ती, धूर्तता ती
हवी आज व्हाया स्व-सत्ता-अवाप्ति । कथा-कार गाणें कुणी हेंच गाती ३३
मुसल्मानसत्तेसि बांधावयातें । जुटीनें मिळाले मराठे तदा ते
तसे नीट बांधावया आंग्लसत्ता । मिळा कोणि सांगे कथा-रंगवीतां ३४
मिळाले तदा ते महाराष्ट्रवासी । मिळा आज सारे तुम्ही राष्ट्र-वासी
मराठ्यां मुसल्मानि, ही आंग्लसत्ता । तुम्हां तैसि,—सांगे कथा रंगवीतां ३५

+ + +

जशी ग्रंथमाला तसे वैद्य साने । कुणालाहि सद्यःस्थिती ही न माने
स्वराज्यार्थ सारेच सारे भुकेले । कुणी बोलती कांहिं, कोणी अबोले ३६
ययांच्या 'कथा' 'लेख' आनंद-लेख । खरा भाव यांतील सर्वत्र एक
जुन्या आपुल्या सद्गुणातें स्मरोनी । गुणी होउनी देश जावो तरोनी ३७
'उषःकाल' 'मालूसरे' 'पानिपत्' ही । दुजीं तैशिं 'कादंबरी' नाटकें हीं
खऱ्या एकभावेंच गेलीं भरोनी । गुणी होउनी देश जावो तरोनी ३८

+ + +

'विनायकानें' रचिले पवाडे । स्वदेश-सत्प्रेम तयांत गाढे
दुजे पवाडे इतिहास-रूढ । तयांत सर्वांत हि 'देश-वेड' ३९

* * *

शिवाभिषेकोत्सव-जन्मउत्सव । खरा-मराठाजन-मानसोद्भव
असेल येथें दुसरी गुणाल्पता । न देशिय-प्रेम मरांत अल्पता ४०
कुणी कुठें 'तुच्छ' असेल 'लेखिलें' । कुठें 'टवाळी' ही असेल बोलिलें
असेल 'निंदा' वच, 'वर्म' काढिलें । सर्वे गुणप्रेम परंतु वाढिलें ४१
जुनी कथा जी इतिहासिं सांपडे । वदूनि ती लोक सुधारणें पडे
तदा कुणी थोरहि फार धोरणी । चुके प्रसंगीं अवधानरक्षणीं ४२
नको दुही सार्थ असार्थ वा जनीं । चुको न कोणी कधिं लेख भाषणीं
असें तुम्हांला मजलाहि वाटतें । दुहीविषा पाहुनि चित्त फाटतें ४३
विषत्व लेखान्तरिं भाषणांतरीं । न यो अशी जागृति राहु अंतरीं
अशी विनंती विनयें स्वबांधवां । करूं चला, सजन आर्य-बांधवा ! ४४

* * *

"जसे हिंदु तैसे असों हिंदपुत्र" । अशी भावना वागवितां पवित्र
तुम्ही मी असों दोन नाना प्रकारीं । परी हिंदभूभक्ति दोघांसि प्यारी ४५
जशी द्रौपदी पांच भावांत एक । तशी हिंदभूभक्ति दोघांत एक
हिची सांगणी प्रेमगाणें तुम्हांला । तसें तें मला तोषदायी मनाला ४६
असे हिंदभूभक्ति ही श्रीहरीची । स्वसा द्रौपदीशीं बहू आवडीची
जिथें ही तिथें श्रीहरी सर्वकाल । उभा ऐकण्या आवडीचा सवाल ४७
स्वकांता प्रिया भक्ति ही बांधवांनीं । करावी सदा-प्रेमि-कांता-प्रियांनीं
इथें मत्सराचें मुळीं नांव नाहीं । इथें वाण सौख्यांत कांहीं न राही ४८

* * *

असो; आर्य आतार ! या भक्तिपाठीं । दुहीचे विषाचे चला लागुं पाठीं
विषाचे विषत्वा विनाशूनि वेळीं । जना मीळवूं या हिच्या प्रेममेळीं ४९

* * *

हिचे प्रेमि सर्वांसि वेडे करावें । हिचे प्रेमिं इस्लामि हिंदू भरावे
हिचा प्रेममेळा इथें रूढ व्हावा । ययासाठिं मीं अर्पिलें जीवभावा ५०

\+ \+ \+

दुही रूढ ती घालवूं 'दोन' राहूं । असों सत्य आम्ही इथें भाऊभाऊ
स्व-भू-भक्ति पार्यी तनू, बुद्धि 'लीन' । चला आपुलाली करूं प्रेम-दान ५१
कुणी हिंदु, इस्लामि किंवा स्वबंधू । स्वबंधूसि मोहें जरी ये निखंदू
तरी वीनवूं आळवूं त्यासि निंदू । नको येथ दोषी 'दुहीवीष' बिंदु ५२
चला, आर्य आतार ! द्या हात हातीं । चला या करूं या दुहीची समाप्ति
दुहीकार कोणी कसेही असोत । तयांहूनि भारी जन-प्रेम-स्रोत ५३

## ६४ खरा धर्म (श्लोक)

खरा धर्म देशार्थ हा जीव द्यावा । खरा धर्म विश्वार्थ हा जीव द्यावा
खरा धर्म दुष्टांसि दुर्दंड द्यावा । खरा धर्म नेई जनां मोक्षगांवा १
अहिंसा सदा सर्वदा सत्य धर्म । असें सांगती ते करीती अधर्म
असे दुष्टहिंसा प्रसंगीं स्वधर्म । नका वीसरूं सूक्ष्म हें धर्म-मर्म २
धरा कां तुम्ही दुष्टहिंसा-विटाळ ! । स्मरा काय सांगे तुम्हां नंदबाळ
'अहिंसा सदा ' हा नसे आर्यधर्म । असे दुष्टहिंसा प्रसंगीं स्वधर्म ३
जसा पार्थ तैसे कुणी थोर थोर । कृपामोहपंकीं बुडाले सुवीर
असें विघ्न हें धर्ममार्गांत आज । विनाशील कालें प्रभू विघ्नराज ४

## ६५ करंटा (अभंग)

भारतीय लोक मान्य या संसारीं । करायासी सारी धाव ज्यांची
धांव ज्यांची ते हे लोकमान्य आज । करितात काज शिष्टाईचें
शिष्टाईचे पेंच सुढाळ बोलाचे । कोणत्या मोलाचे आज दिनीं
आज दिनीं दीन सत्त्वहीन लोक । अशांचें कौतुक कोण करी
कोण करी साह्य स्वार्थी दुर्बलांचें । काय इंग्रजांचें हित यांत
हित यांत नाहीं, देशहितासाठीं । सर्व आटापीटी गौरदेशीं
गौरदेशीं नांदे देशहितधर्म । स्वजनांचें शर्म ध्येय त्यांचें
ध्येय त्यांचें देश-स्वजन-वैभव । वैभवाची चव आहे त्यांसी
आहे त्यांसी निज पर हा विचार । परदेश थोर त्यांचे हातीं
हातीं त्यांचे आले कैसे परदेश । हा तो इतिहास सुप्रसिद्ध
सुप्रसिद्ध परदेशीं गौरकाय । चाली काय काय चालतात

चालतात चाली बोली बोलतात । त्या सर्व विदित लोकमान्यां
लोकमान्यां ठावी सर्व गौरचाल । शिष्टाईचे बोल फोल आज
फोल आज जाणतात लोकमान्य । परी लोक अन्य उमजेना
उमजेना त्यासी पडावा उमज । म्हणुनीच आज पुढें झाले
पुढें झाले याचसाठीं हें निश्चित । मज माझें चित्त सांगतसे
सांगतसे चित्त तें तुम्हां सांगणें । टाका टाका जिणें दीनवाणें
दीनवाणे तुम्हां पाहोनि चित्तांत । उदास होतात लोकमान्य
लोकमान्यभक्ति जरी तुम्हां चित्तीं । तरी स्वार्थप्रीति टाका टाका
टाका झाडोनियां दैन्याचा हा मळ । सत्त्व तें सोज्वल तळपूं द्या
तळपूं द्या सत्त्वशुद्ध सत्याग्रह । येणेंच संग्रह वैभवाचा
वैभवाचा वांटा नाहीं करंट्यासी । सांगा हें चित्तासी पुनः पुन्हां

## ६६ आयुष्याचा नाश (अभंग)

देशाची व्यवस्था देशीजनांहातीं । शासनाची रीति होचि बरी
बरी दुज्या सर्व रीतींहूनी फार । अनुभवें सार कळलें हें
कळलें हें सार सानथोरां येथें । इंग्रजांचें नातें कामा आलें
कामा आलें, आतां पुढें काय मार्ग । स्वराज्जाचा स्वर्ग लाभे कैसा
कैसा देश-पाश शिथिल होईल । केव्हां ती येईल सत्ता हातीं
हातीं सत्ता सर्व देशाची पाहिजे । त्यावीण हें ओझें नर–जन्म
नर-जन्म ओझें स्वराज्यावांचून । ऐसें मनांतून वाटे कोणा ?
कोणा वाटे त्यांसी माझा उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा
आयुष्याचा नाश भिकेची शिष्टाई । नका ठाईं ठाईं दीन होऊं
होऊं नका दीन देवाचेही पुढें । दैन्यानें न जोडे कृपा त्याची
त्याची कृपा होई समर्थाच्यावरी । देवाची ही परी सुप्रसिद्ध
सुप्रसिद्ध गोष्ट धरुनि ही ध्यानीं । वागती या जनीं तेचि थोर
थोरपण नव्हे भिकाऱ्याचें धन । जिवाचें या रान करणें लागे
लागे स्वाहाकार सदेह मनाचा । उद्धार देशाचा जरी व्हावा
जरी व्हावा स्वर्ग स्वराज्याचा तरी ! भिकेची खापरी फोडा फोडा
फोडा ही खापरी, टाका हाय हाय । कोणाचेही पाय धरूं नका

नका नका धरूं दुज्याचा विश्वास । स्वामी रामदास काय सांगे
सांगे कार्यभाग बुडे या विश्वासें । कष्टें मनाऐसें सर्व होय
होय सर्व कांहीं सामर्थ्यांचे पायीं । सामर्थ्य तें येई कष्टबळें
कष्टबळें तेज भरा हो शरीरीं । कष्टांनीं अंतरीं तेज भरा
भरा अंतर्बाह्य तुम्हीं येणेंपरी । स्वराज्याचि जरी व्हावें देशा

## ६७ मित्राचें पत्र (श्लोक)

कुणी थोर मन्मित्र सन्मार्गगामी । तुझें पत्र वाचूनि माझें स्वधामीं
लिही प्रेम-गोष्टी "कवीराय ऐका । तुम्ही शिकवूं इच्छितां काय लोकां १
'स्वदेशी जनाहार्ति देशव्यवस्था । असो' ठीक हें, मान्य आहे समस्तां
परी मार्ग हें प्राप्त होण्यास काय । 'समर्थत्व' याचा असे अर्थ काय २
गलेलठ्ठ जो कां करी दांडगाई । अशा दांड लठ्ठांत जी दंडशाई
असे तें समर्थत्व किंवा कसें हें । करा स्पष्ट, संदिग्धता वाटताहे ३
दुजी गोष्ट कीं शिष्ट-शिष्टाइ आज । असे चालली, थोर विद्वत्समाज
असे जाहला एक नानामतांचा । बरा नाहिं धिक्कार या शिष्टतेचा ४
असे शिष्टतापंथ हा मान्य जाला । बहूतां जनां, आड यावें न याला
अपीलें विनंत्या करूनी जनानें । अशा वेळिं साहाय्य शिष्टांसि देणें ५
बरें हें दिसे, हेंचि सांगा जनातें । धरा वा तुम्ही आज मौनव्रतातें
नको शिष्टतापंथविध्वंसनाची । मनीं बुद्धि तुम्हां, बरी ही न साची ६
असे ध्वंस हें काम सोपें जनांत । नका आणुं तुम्ही मुळीं हें मनांत
तुम्हा भावना-तेज-वाणी-प्रसाद । असे प्राप्त जो, त्या बरा हा न वाद ७
तुम्हासारख्यांचेवरी भारताचा । असे हक्क तो घ्या विचारांत साचा
बरा सर्व अंगीं उद्यांचा स्वदेश । करी तें सदा, हाचि माझा निदेश ८

## ६८ मित्रास उत्तर (श्लोक)

कवी मी नव्हे, जाणतां मित्रराय ! । परी हें तुम्हां बोलुनी लाभ काय !
असे हक्क वाटेल तें बोलण्याचा । जुना फार जो मित्र आहे तयाचा १
असो तें; तुम्हां सांगतों एक गोष्ट । मनीं साहिया फार होतात कष्ट

१. पद्य ६६ वें.

जनीं पाहुनी भ्रान्त आचार फार । म्हणूनी कवित्वार्थ मी रात्रणार २
कवित्वार्थ राबूनि या जन्मि कांहीं । पुढेंही तसें राबुनी एकदां ही
कवित्वप्रभा अंगिं आणीन कांहीं । प्रसादें इच्या हो सुखें कार्यवाही ३
जसा मी सुखी जाहलोंसें जनीं या । अजूनीहि होईन जिंकूनि माया
तसे हे सुखी बंधु कांहीं करावे । अशी मन्मनीं वृत्ति आहे स्वभावें ४
जसा मी तसे बंधु कांहीं करावे । गमे शक्य हें सत्कवित्व-प्रभावें
म्हणूनि कवित्व-प्रसादार्थ कांहीं । असे चालिला यत्न हा आज पाहीं ५
असे भावनातेज माझे मनांत । असें तूमचें बोलणें हें यथार्थ
परी वाणिचा बोलिलां जो प्रसाद । मला तो नसे प्राप्त, राहो विवाद ६
तुम्ही जाणतां सर्व, तुम्ही मदर्थ । जसा देतसां प्रीतिनें स्वीय अर्थ
शुभाशी तशी प्रीतिनें द्यावि मातें। "तुला प्राप्त हो सत्कवित्व-प्रभा ते" ७
असो हें, विचारा समर्थत्व काय । तरी तें अतां सांगतों मित्रराय
समर्थत्व "सत्यार्थ सर्वार्थनाश । प्रसंगीं बरा" हा सदात्मप्रकाश ८
समर्थत्व नाहीं खुळी दंडशाही । समर्थत्व नाहीं खुळी याचनाही
समर्थत्व सत्यार्थ सर्वार्थनाश । प्रसंगीं बरा हा सदात्मप्रकाश ९
असें सत्य हें तत्त्व, 'मी आणि मत्ता'। ययां सत्य हाणीत डोईत लत्ता
न माझा-तुझा हा तिथें कांहिं भाव। विदेहीपणा हाचि तत्त्व-स्वभाव १०
असें सत्य हें तत्त्व, मीत्व-प्रमाद । जईं टाकिला त्यांवरी तत्-प्रसाद
न माझा-तुझा हा तिथें कांहीं भाव । विदेहीपणा हाचि तत्व-स्वभाव ११
तुम्ही जाणतां कांहीं पंजाब-गोष्टी । किती तेथले लोक आहेत कष्टी
कसे लोटिले शेंकडों काल-गेहीं । समर्थत्व नाहीं अशी दंडशाही १२
तुम्ही जाणतां हाल काढावयासी । न राजी कुणी गेह सोडावयासी
स्वराज्यार्थ शिष्टाइ चाले तरीही । समर्थत्व नाहीं अशी याचना ही १३
समर्थत्व तो दंड जो सामगर्भ । समर्थत्व तो साम जो दंडगर्भ
समर्थत्व सत्यार्थ सत्सामदंड । मतें अन्य सारीं खुळाचें वितंड १४
समर्थत्व सत्याग्रही राहणारें । समर्थत्व सत्याग्रहाचेंचि वारें
स्वराज्यार्थ हें सत्य येईल कामीं । खुळी याचना येथ आहे निकामी १५
पुरे हें; अतां शिष्ट-शिष्टाइ घेऊं, । कसें वागणें मी बरें तेंहि पाहूं
बरें तेंचि जें सत्य-संस्थापनार्थ । असें वागणें, दूसरें तें अनर्थ १६

खुळा जाहला थोर विद्वत्समाज । खुळा जाहला लोक सामान्य आज
खुळाचा मनीं इच्छितों ध्वंस सत्य । मला पाहवेना खुळाचें असत्य १७
'असें ध्वंस हें काम सोपें जनांत' । असें कां म्हणा ? हें दिसेना यथार्थ
असो कांहिंही; दैन्य शिष्टाइ खूळ । असे पाप तें, नाश पावो समूळ १८
उगा राहुं कैसा बरें मित्रराय । खुळांचें असत्प्रेम हा अंतराय
असे लोक-उद्धार-मार्गांत ऐसें । विचारांति माझ्या मनें घेतलेंसें १९
"तुम्हांसारख्यांचेवरी भारताचा । असे हक्क; ध्या तो विचारांत साचा
बरा सर्व अंगीं उद्यांचा स्वदेश । करी, तें वदा" तूमचा हा निदेश २०
मनीं पूर्ण हा सांठवीला निदेश । यथाशक्ति गाईन जें का स्वदेश
उद्यांचा बरा सर्व अंगीं करील । जनीं सत्य साधुत्व हीं वाढावील २१
परी जाणतां, बाणतांही सुबुद्धि । न हो एकट्याचे बळें राष्ट्र-शुद्धि
मला हात द्या, मी दुज्या हात देतों । अशानेंच येथें फळा यत्न येतो २२
जसा मी तसे बंधु कांहीं करावे । सुखी, शक्य हें सत्कावित्वप्रभावें
परी प्राप्त हें व्हावया हात कांहीं । दिला पाहिजे तूमच्यासारख्यांहीं २३
असो हें; तुम्हीं सूचना पत्रिं केल्या । बहू चांगल्या त्या मनीं सांठविल्या
नसे पत्र तें सत्य 'कंटाळवाणें,। असे गोड, माझें तुम्हां जेंवि गाणें २४

(गीत)

प्रीति जेथ निर्मल वसते । गोड तेथ सर्वचि असतें
निजमत-खंडन । विमत विमंडन । साधें गायन
तेंहि तुम्हां सुमधुर गमतें । प्रेमचि हें प्रेमचि रमतें

## ६९ विद्या (श्लोक, दिंड्या)

खळबळ बहु झाली अंतरीं मन्मनाची ।
बघुनि अबलता ही माझिया या जनाची ॥
हरि मज गुण सांगे यत्न कांहीं करावा ।
स्वजन सबळ जेणें सन्मती थोर व्हावा ॥ १

\+ + +

हरिच्या आज्ञेतें मन लववुनी पाळित असे ।
नसे मातें इच्छा मुळिंहि फल भोगीं; मज पिसें ॥

जना सेवायाचें झटुनि करुनी सुंदर कृति ।
जशी मातें देई हरि सुजनतेची वर-मति ॥ २

\+ + +

गुरू हरि माझा अंतरीं रहातो । मला वदतांना मनाशीं पहातो
मला बुद्धी तो उदारशी देतो । मीहि ऐकें जें मला सूचवितो ३

\+ + +

विचारा विचारा मनाला विचारा । हरीसाठिं तुम्हां करीतों हंकारा
करा देशसेवा करा लोकसेवा । तुम्हांला जरी तो हवा मोक्ष-मेवा ४

\+ + +

ज्ञान जगताचें स्वतांचेंहि साच । सबळ होण्याचा मार्ग एक हाच
पुढें गेले ते याच पथें गेले । जाणुनी हें पाहिजे काम केलें ५

\+ + +

ज्ञानरविचा सर्वत्र सुप्रकाश । करावा हें कर्तव्य मुख्य खास
स्वजनहृदयातें उघडण्या समर्थ । असति बहु येथें परी ते प्रसुप्त ६

\+ + +

बुवा येथ आहेत; आहेत योगी । महाराज देशामधें जागजागीं
जना ज्ञान द्या, हा हरीचा किरोप । परी सर्व घेती जुनी गाढ झोंप ७

\+ + +

उठा पाहिजे हा देश सोडवीला । नको पाहणें येथ संमोहलीला
जनां ज्ञान द्या हा हरीचा निरोप । जनां ज्ञान द्या टाकुनी दुष्ट झोंप ८

## ७० कवींद्राचा अश्व (अभंग)

कवींद्रें रवींद्रें कहाणी अश्वाची । सांगीतली साची बोधपर १
बोध मला झाला भारतीय जन । न पाहे सुदिन अश्वगुणें २
अश्व कवींद्राचा वायु-आकाशाचा । तयांत तेजाचा अंश थोडा ३
अंश आप, पृथ्वी यांचा अतिसान । ऐशा गुणें दीन अश्व झाला ४
मालक मानव सोडीनाच यातें । जरी विधात्यातें इच्छा झाली ५
पांडुरंग करी स्वकीयां हांकारा । अश्वाच्या वेव्हारा टाका टाका ६

२

कवींद्रा रवींद्रा प्रणिपात माझा । जनतेच्या काजा आपणीलें १

पंजवांत झाली हकीकत ऐके । कविवर शोकें दीन झाला २
सरकारी भूषा जड पदवीची । होती ती सर्वेचि दूर केली ३
पांडुरंग म्हणे ऐसे कविवर । आहेत तोंवर आशा आहे ४

३

कवींद्राची अश्वकथा बोधपर । तियेंतील सार घ्या रे घ्या रे १
पुनर्जन्म नाहीं जोंवरी राष्ट्राचा । तोंवरी सुखाचा दिन कैंचा २
अश्वकवच हें टाकावें टाकावें । जनात्म्यानें घ्यावें अन्य रूप ३
पृथ्वी आप तेज यांचें जें प्रमाण । अश्व-रूपीं सान तें न बरें ४
वायु-आकाशाचें अश्व-रूपीं मोठें । प्रमाण तें खोटें बरें नोहे ५
पांडुरंग म्हणे करूं देहान्तर । नको हा संसार दीनतेचा ६

४

कवींद्राचा ब्रह्मा लंगडत्या अश्वा । पाहूनी मानवा-हातीं देई १
'राहो अश्वशाळे तेथेंचि हा बरा । मैदानींचा वारा यासी काय' २
कवीराय सांगे पाय बांधीयले । तें नाहीं देखीलें ब्रह्मदेवें ३
पांडुरंग म्हणे देखे ब्रह्मा तरी । अश्वाची ती दोरी सुटेनाची ४

५

अश्व अश्वपण टाकुनी देईल । संसारीं घेईल बरा देह १
तेव्हांचि तयाला आशा आहे कांहीं । येथें सत्ता नाहीं विधात्याची २
विधात्याचा पिता त्याचा हा संसार । येथें कुंभकार ब्रह्मदेव ३
देह-कुंभ आत्म्या-आत्म्यासाठीं हरि । विधात्याचे करीं घडवीत ४
जसा ज्याचा यत्न जशी ज्याची बुद्धि । तशी देहोपाधि त्यासी द्यावी ५
असा श्रीहरीचा नियम हा नित्य । अश्वपण सत्य कृत्यगुणें ६
पांडुरंग म्हणे अश्वपण आहे । तोंवरी हें वाहे ओझें बापा ७

## ७१ सत्ताग्रह व सत्याग्रह (श्लोक)

दुजा पक्ष सत्ताग्रही हा समर्थ । असे येथ सत्याग्रहीं काय अर्थ
असे बोलती, वाहती देवराया । स्वदेशासि पाशांतुनी उद्धराया १
मनीं चिंतिती देव हा चक्रधारी । अम्हांसाठिं धांवेल सत्तापहारी
परी सत्यमार्गी तयांचाचि ताप । हरी तो हरी येउनीयां अपाप २

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥
"परित्राण साधूजनांचें कराया । दुरात्म्यांसि दुष्टांसि दुर्दंड द्याया
समाजांत धर्मव्यवस्था कराया । यथाकाल मी येतसें पार्थराया" ३
असे बोल हे श्रीहरीचे सुढाळ । विचारा मनीं आजचा कोण काळ
तुम्ही हिंदवासी असा काय साधु । असे हिंदशास्ता कितीसा असाधु ४
समर्थांवरी श्रीहरी हो कृपाळ । मनीं तत्त्व हें सांठवा सर्वकाळ
सदाचार-सामर्थ्य येतां तुम्हांत । तुम्हां श्रीहरी कां न देइल हात ५
दुजा पक्ष सत्ताग्रही हा समर्थ । नसे येथ सत्याग्रहीं कांहिं अर्थ
असे घोकुनि व्यर्थ कालापहार । करा तोंवरी नाहिं हा धांवणार ६
असें सत्यसामर्थ्य सामर्थ्य जैसें । नसे अन्य सामर्थ्य सामर्थ्य तैसें
धरा या तुम्ही कास सत्याग्रहाची । पहा ना तुम्ही कां परीक्षाच याची ७
जमायास सत्याग्रही एक लक्ष । करा यत्न घालूनियां पूर्ण लक्ष
असा लक्ष लोकांत तेतीस कोटी । मिळावा अशी वाटते आस पोटीं ८
मिळो ना मिळो सत्यमार्गस्थ व्हावें । सदाचारसामर्थ्य अंगीं भरावें
असें केलिया श्रीहरी भक्त-भावें । स्वयें धांवतो हें मनीं वागवावें ९
अनेकांत हा एकटा रूप घेई । प्रसंगा परीक्षूनि बुद्धीसि देई
करी कार्य जें त्याविणें होईनाच । धरूनी मनीं हें करा यत्न साच १०

## ७२ गृहींगृहीं. (रथोद्धता)

श्रीसमर्थकृति वंदुनी मनीं । या चला धृति वरूनियां झणीं
सत्य-अर्थ गुणवान् सदाग्रही । पाहिजेत नर लक्ष संग्रहीं १
सत्य थोर जनता-स्वशासन । रूढमूल जगतांत पावन
एतदर्थ नर आग्रही इथें । लक्षही न, तंव फोल बोल ते २
लक्ष एक जन-राज्य-आग्रही । कोटि तेतिस जनांत संग्रहीं
नाहिं तोंवरि नकोच बोलणें । राष्ट्रदैन्य उघडूनि दाविणें ३
स्वीयदुर्गुणगुणें अकिंचन । त्यासि येथ उपहासिती जन
दैन्य दैवकृत त्यावरी दया । सर्व जाणत असाच या नया ४
व्यक्तिदैन्यविषयीं असा नय । रूढ येथ करि तो दयामय

आर्त-राष्ट्रविषयीं तसा हरी । लोकचित्तिं नय तोच तो भरी ५
स्वीयदुर्गुणगुणेंच देश हा । भोगितो जगतिं दुःख हें महा
यासि येथ उपहासिती जन । साधु कोण म्हणतील दुर्गुण ६
स्वार्थदास बहु नांदती इथें । तोंवरी विफल शब्द ते रिते
लोकराज्यरत सत्य-आग्रही । लक्ष एकहि न देशसंग्रहीं ७
श्रीसमर्थकृति वंदुनी मनीं । या चला धृति वरूनियां झणीं
लोकराज्यरत सत्य-आग्रही । शोधुं या जन गुणी गृहीं गृहीं ८

---

## ७३ फिरफिरून (गीत)

सुहृद्वरा ! तें फिरफिरुनी । तसेंच वदणें प्राप्त जनीं ॥ ध्रु० ॥
दिनकर हा उदया आला । कालहि हाच विधी झाला
रात्रि–आगमन । होई प्रतिदिन । तन्निष्कासन
करणें हें प्राप्तच म्हणुनी । दिनकर येतो फिरफिरुनी १
वर्षाऋतु वर्षे जल तें । तेच तसेंच महीवरतें
कुणा धान्यकण । कुणासि जीवन । कुणा रम्यवन
विहराया व्हावें म्हणुनी । वर्षाऋतु ये फिरफिरुनि २
कितीकदां प्रेमा भरतें । तेंच तसेंच पुन्हां येतें
लीलायित-मन । अनादिकारण । सृष्टिप्रजनन ।
इच्छितसे, मन्मथ म्हणुनी । मंथितसे मन फिरफिरुनी ३
लोक मान्य माझे व्हावे । तद्यश सर्वजनीं गावें
म्हणुनी मदाग्रह । जन सत्याग्रह । शस्त्र धरो, ग्रह ।
दुजे खुळे जावे म्हणुनी । तेंच वदें मी फिरफिरुनी ४

## ७४ हंसणें रडणें (श्लोक)

असें दुःख येथें बहूतापरीचें । रडावें ! कळेना हरी-अंतरींचें
असें सूख येथें बहूतापरीचें । हंसावें ! कळेना हरी-अंतरींचें १
रडूनी जगावें रडूनी मरावें । कुणा मानवा हेंचि वांट्यासि यावें
हंसूनीच संसार कोणीं क्रमावा । हंसूनी रडूनी कुणीं चालवावा २
हंसूनीच संसार होई जयाचा । मिळाला तया मार्ग सच्चित्सुखाचा

दुजे सर्व मार्गें तयाच्याच अंतीं । यथाकाल जातील पावोनि खंती ३
कळेना असें सृष्टिच्या तत्त्व पोटीं । असे त्यासि नांवें दिलीं सानमोठीं
कळेना असें जें तया सत् म्हणावें । तया आकळायासि सद्बुद्धि धांवे ४
असा यत्न सद्बुद्धिचा नित्य चाले । मनीं ज्या, जया गोड हें कार्य झालें
तया गोड संसार झाला सदाचा । महद्दुःखिही काल त्या हांसण्याचा ५
सुखीं ये हंसें दुःख लावी रडाया । नसे तत्पदीं ओढ जों कां मना या
कळेना तया तत् असें नांव सान । तिथें ओढ त्या सूखदुःखें समान ६
मना दुःख-आघात झाला, रडें ये । त्वरेनें तिथें लक्ष जाई, हंसें ये
असें कां असें कां असें शोधण्यांत । विरे दुःख, सुस्वस्थता ये मनांत ७
दिसे सृष्टि मातें दिसे मीहि मातें । असें काय माझें हिचें सत्य नातें
कळेना, तया नीटसें आकळाया । झटे, त्या सखी ही सदा सृष्टिमाया ८
असा ज्ञानमार्गी दुज्यां सूख व्हाया । महद्दुःखि टाकी उडी, दुःखमाया
न बाधी जना या; यथा सूखवाया । उभी आत्मगेहीं सदा शांति-जाया ९

## ७५ क्षत्रधन महाराष्ट्र (अभंग)

तुम्हां महाराष्ट्रजनां । माझी मूळ ही प्रार्थना
तुम्हांवरी माझा भार । माझ्या देशिंचा संसार
तुम्हांवीण कोठें जाऊं । काय कोणासी विनवूं
तुम्ही जरी आळसाल । विसराल देशकाल
तरी-पांडुरंग म्हणे । महाराष्ट्रा लाजिरवाणें १

× × ×

माझा महाराष्ट्रजन । महा थोर क्षात्रधन
क्षात्रधन हें देशाचें । महाराष्ट्र असे साचें
हेंच धन या देशाचें । दैन्य नाशील आमुचें
ऐसी विश्वासाची वाणी । बोलिलों मी सर्व जनीं
तुम्ही महाराष्ट्रजन । शिवबाचें क्षत्रधन
तुम्ही जरी आळसाल । विसराल देश-काल
तरी-पांडुरंग म्हणे । महाराष्ट्रा लाजिरवाणें २

× × ×

माझ्या महाराष्ट्रीं संत । किती जाले जातिवंत
"आनंदाचें वनभुवन" । समर्थांचें तें हें स्थान
ज्ञानदेव, एकनाथ । यांणीं केला हा सनाथ
नामदेव, तुकावाणी । यांची येथ गर्जे वाणी
म्हारविठ्याचा दामाजी । तोही येथींचाच गाजी
सजन, सांवत्या तो माळी । गोरा, चोखा येचि स्थळीं
मुक्ता, गोणाई, जनाई । यांची वस्ती याचि ठाई
गडी मावळे, शिवबा । यांची येथ पुण्यप्रभा
पर-उपकारासाठीं हरि । पडावया गाठीं
केला सर्वस्वाचा यज्ञ । ऐसे नारीनर प्रज्ञ
जाले महाराष्ट्रीं किती । ठावें सर्व तुम्हांप्रति
जातिवंत संतजन । त्यांचे कुळींचे हे जन
महाराष्ट्रीय या देशा । सोडवितील ही आशा
बोलिलों मी सर्व जनीं । तुम्हांवरी विश्वसुनी
तुम्ही जरी आळसाल । विसराल देश-काल
तरी-पांडुरंग म्हणे । महाराष्ट्रा लाजिरवाणें

## ७६ फुंकारे (आर्या)

फुंका हो फुंका हो । हृदयींचा सुप्त अग्नि फुंका हो
झेलावा कोठवरी । कोणाचाही सुधींहिं थुंका हो १
जायाचें यायाचें । देहकवच हें पुनः पुन्हा जाणा
आणा कां न मनीं तरि । हरिचा सत्याग्रही जुना बाणा २
देह नसे ध्येय कधीं । ध्येय सुधींचें सदैव सत्य असे
सत्यास्तव होमाया । देह नसे सिद्ध, तो सुधीच नसे ३
सुष्ठ सु-तत्त्वस्पर्शी । धी तुमची व्हावया किती श्रमले
ऋषि पूर्वयुगीन तसे । तच्छिष्य प्रज्ञ आणि संत भले ४
आजवरी प्रज्ञेनें । आचरणानें तुम्हां धडे दिधले
प्रज्ञांहीं संतांहीं । सर्व असे तेज काय तें विझलें ५
विझलें विझो, हरीनें । करिं माझ्या दीधली असे धमनी

आत्मस्फुलिंग फुंकुनि । अग्नि करायासि सिद्ध द्वद्ववनीं ६
उघडा हो उघडा हो । द्वद्ववनाचीं झणीं तुम्ही द्वारें
आत्माग्निकणावरती । घालूं द्या मजसि आज फुंकारे ७
'तत्त्वमसि' महावाक्यें । 'तें तूं आहेस' तत्त्व हें कथिलें
'जीवात्मा ब्रह्म' असें । संततमननेंचि संतिं पारखिलें ८
अग्नि महान् ब्रह्म असे । जीवात्मा एतदग्निकण तुमचा
गुण एक, मानभेदें । भ्रान्तान्त:करण होउनी न खचा ९
संततमननें संतीं । मानाचा भेद जो भ्रमवि चित्त
तो भेदियला कालें । मननचि दे सर्व संतजनवित्त १०
संत असंतचि होते । संत महान् जाहले असंतांचे
हें चित्तिं धरा, पथिकां । प्रोत्साहक होय गमन पुढिलांचें ११
'मी ब्रह्म–' अनुभवी ते । पूर्विल 'मी जीव अल्प' म्हणणारे
संतत-सत्तत्त्वमनन । उपकृतिपरता गुणें घडे सारें १२
सारें चरित ऋषींचें । बुद्ध-महावीर-आदिसंतांचें
सांगे तत्त्वमनन-फल । सेवा-फल संतपण असंतांचें १३
ते वीर मावळे जन । शिवबा ते ते समर्थ राम-गडी
हे थोर संत सर्वहि । गोष्टी हे प्रज्ञजनमना उघडी १४
उघडी रामगडी तो । दास-हृदय-गड चढूनियां द्वारें
विघडी भ्रम-भीति-रचित । तेथींचे थोर यवन-देव्हारे १५
शिवबा संत क्षत्रिय । संत-क्षत्रिय तसे गडी त्याचे
दुःखित-दुःख विमोचन । कार्य असें प्रमुख संत जो त्याचें १६
त्या मावळे गडयांनीं । अर्पियलीं जीवितें जनासाठीं
तेव्हांच महाराष्ट्रा । स्वराज्य-सुखराज्य तें पडे गांठीं १७
पुढिलां स्वपुत्रपौत्रां । त्रासांतुनि वांचवूं स्वतां मरुनी
ऐसा निश्चय करुनी । गेले ते मावळे गडी तरुनी १८
तरती वे, मरती जे । जन दुःखग्रस्त तारण्यासाठीं
आनंदाची हरिघरिं । ठेव पडे त्यांचिया स्वयें गांठीं १९
"धर्मासाठिं मरावें– । मारावें" हा पुराण आदेश
श्रीहरिचा शिरिं घेउनि । सोडविला त्याहिं हा महादेश २०

## ७७ हरीचा धर्म (आर्या)

हरिचा निरोप सकलां । चुकल्यां हरि-लेंकरांसि सांगावा
गावा धर्म हरीचा । मार्ग सदाचाच मुक्तिच्या गांवा १
हा एक हेत मनिंचा । जनहो ! चुकल्या मुला मज हरीनें
घेउनि जवळी कथिलें । भव दुस्तर सुतर उपकृति-तरीनें २
उपकृति-सुतरींत बसा । हरिनाविक वल्हविता इथें नित्य
नित्य सुख इथेंचि असें । सुख इतर तरींत सत्याचि अनित्य ३
उपकारधर्म जनहो ! । हरिचा हा एक सर्वयुगधर्म
प्राप्त ययाचेंचि गुणें । सकलां मुक्तांसि मुक्तिपदशर्म ४
उपकृति-उपदेश करी । हृदयीं हरि त्यास सुजन हो ! माना
कोण तरावा सांगा । हरिच्या भलत्याहि करुनि अवमाना ५
ज्ञान असो कर्म असो । नाम असो सर्वदा मुखीं हरिचें
उपकृतिविण मुक्ति नसे । मुक्ति नसे सुलभ फल हरी-घरिंचें ६
हरि-घरिं फल सर्वोत्तम । मुक्ति तया नांव ठाउकें सुजनां
जन उपकृतिपर त्यातें । लाभे तें, लाभतें न इतर जनां ७
नामादिकिं उद्धरले । ते त्या मार्गीं न पूर्ण उद्धरले
उपकृति-धर्म-परायण । झाले तेव्हांच ते पुरे तरले ८
हें नलगे सांगावें । हरिचरितहि तें मनीं बरें स्मरतां
हें स्पष्ट रहस्य निघे । मुक्तिफलद एक उपकृतीपरता ९
हरिधर्म बोलिला जो । अथवा उपकारधर्म ज्या नांव
त्याचा किंचित्कर मी । किंकर, कार्यासि लावि मज भाव १०
भाव-भुकेला श्रीहरि । तेणें मज किंकरत्वपद दिधलें
रिझलें मन बहु माझें । अंतरिं चिंताग्नि भडकते विझले ११
चिंता देश कसा हा । वरती येईल, कोण आणील
नाणील तरी पुढती । या दीन कोण कोण हाणील १२
चिंता ऐशी बहुपरि । चित्तातें जाळती जळे आंत
हातांत नसे कांहीं । लुप्त कुठें सुप्त राम लोकांत १३
चिंता ऐशी आतां । एतत्सदृशा दुज्याहि मज नसती

हरिधर्मसेवनानें । अवतरली मानसांत शांतिसती १४
राम महाराष्ट्राचा । केवल एकाच या विभागाचा
आराम भारतांतरिं । पुनरपि आणावया पुरें साचा १५
माझा शिवरायाचा । महाराष्ट्र हा समर्थ दासांचा
आहे अद्यापिहि हा । आधार स्वजन-राज्य-आशांचा १६
देशीं देशिजनांची । सत्ता हा सत्त्वशील सिद्धान्त
युद्धान्तशांतिसंसद् । वदली परवांच करुनि आकांत १७
आकान्त शान्त झाला, । आशेनें आंग्लदेशिं शिष्टाई
थोरांहीं चालविली । जनसत्ता ती पडावया ठाईं १८
ठाईं पडावया ती । राम पुरे या समर्थ-राष्ट्राचा
सत्याचि महाराष्ट्र हें । आत्मा या भारतीय राष्ट्राचा १९
राम महाराष्ट्रीं या । सुप्त असे तो कसा घगघगेल
सुप्तचि जरि राहियला । तरि कैसें भारती-जग जगेल २०
चिंता ऐशी आतां । एतत्सदृशा दुज्याहि मज नसती
हरिधर्मसेवनानें । अवतरली मानसांत शांतिसती २१

---

## ७८ उपकारधर्म (ओव्या)

नमन माझें जगदीशासी । नमन पित्यासि मातेसी
नमन सर्व नमनार्हांसी । यथाधिकार १
परोपकारधर्मप्रसार । करावा हाचि निर्धार
हाचि धर्म असे आधार । सर्व धर्मांचा २
माझी विद्या अगदीं थोडी । माझें शिक्षण बाराखडी
कक्का–किक्की हेचि जोडी । सर्व माझी ३
शक्ति तैशी जबाबदारी । मजसी बोले माझा हरी
विद्या तैशी सान चाकरी । करावी तूं ४
उपकारधर्माचा प्रसार । करावयासी अवनीवर
झटावें तूं यथाधिकार । हीच आज्ञा ५

आज्ञा हरीची पाळीन । यथाशक्ति यत्न करीन
उपकार-धर्म उपदेशीन । अवनीवरी ६
उपकारधर्माची पताका । घरोघरीं फडकेल ऐका
माझी भक्ताची हांक लोकां । जागवील ७
भूत भविष्य न जाणे कांहीं । मंत्र तंत्र कांहींच नाहीं
बाहेर तैसा अंतरींही । सामान्य मी ८
सामान्य लेंकरासी निवडिलें । उपकार-धर्म-किंकर केलें
कांहीं सज्जनां हें न मानलें । शंकित होती ९
त्यांनीं पहावें स्वान्तरांत । तेथें प्रकाशे दिव्यज्योत
उपकार-धर्म आज्ञापित । प्रत्येकासी १०
प्रत्येक नारी प्रत्येक नर । सान थोर परोपकार
करितोचि याचें प्रत्यंतर । सज्जनासी ११
परोपकार-धर्म किंकर । प्रत्येक नारी प्रत्येक नर
आहे होता आणि असणार । सर्व काल १२
बहुतां दिसांचा पापमळ । तेणें अंतर जाहलें ओंगळ
तें ओंगळ घाणेरें कर्मफळ । भोगितात १३
त्यांचे अंतरींची दिव्यज्योत । अंधुक जाहलीसे निश्चित
उपकार-धर्माची प्रचीत । अंधुक झाली १४
जाले स्वार्थाचे गुलाम । त्यांचें वागणें अधमाधम
फळही त्यांसी तैसेंच अधम । भोगणें पडे १५
दुःखाचे तडाके खाऊनी । येतील मार्गावरी सांवरूनी
उपकार-धर्माचे भक्ताग्रणी । होतील ते १६
दुःसह दुःखाचा तडाका । प्रेमळ सज्जनाची हांका
उपकार-धर्माची पताका । घेववील १७
अनेक जन्मांचे संसारीं । वडील धाकटे त्या त्या परी
धाकटे अज्ञान त्यांची चाकरी । वडिलांकडे १८
प्रेमळ सज्जनाची हांका । दुःसह दुःखाचा तडाका
त्यांकरवीं ही धर्मपताका । घेववील १९

धाकटे ते अज्ञानानें । वडील ते लंपटपणानें
करिती नको जें करणें । दुःखमूल २०
दुःखाचा दुःसह प्रभाव । आणि प्रेमळ सज्जनस्वभाव
वडिलां धाकट्यां एकचि उपाव । मार्गी येण्या २१
तुम्हांपैकीं पापी कोण । अज्ञानेंचि चुकती कोण
हें आपापलें अंतरीं पाहून । ओळखावें २२
पापी असा वा अज्ञान । तुम्हांसि देणें धर्मज्ञान
ऐसे माझिया हरीचें वचन । ऐका ऐका २३
माझा हरी तोचि तुमचा । संस्थापक सर्व धर्मांचा
प्रसिद्ध स्थाइक हृदयींचा । आज्ञापित २४
धर्मकिंकर भक्त झाले । त्यांनीं कांहीं जें सांगितलें
तें तें इष्ट त्या त्या वेळे । त्या त्या लोकां २५
जन्म हाचि एक तुम्हांला । कराल जैशी तुम्ही लीला
तैसें स्वर्गाला-नरकाला । जाल तुम्ही २६
ऐसें कोणीं सांगितलें । कोणी जन्म अनेक बोलले
तें तें इष्ट त्या त्या वेळे । त्या त्या लोकां २७
कोणी बहुत देव सांगितले । कोणी एक दैवत उपदेशिलें
कोणी मूर्तीचें स्थापन केलें । कोणी नाहीं २८
कोणी जन्मानें वर्ण बोलले । कोणी कर्मवर्ण उपदेशिले
कोणी एक-वर्ण सांगितले । मनुज सर्व २९
धर्मकिंकर जे जे झाले । त्यांनीं कांहीं जें सांगितलें
तें तें इष्ट त्या त्या वेळे । त्या त्या लोकां ३०
धर्मी ज्या कोणत्या जन्मलां । अथवा जो कोणता स्वीकारिला
त्या धर्मांच्या आचार-लीला । पहा नीट ३१
भूतदयेचे व्हा सागर । उपकार-धर्मांचे किंकर
जुन्या धर्मांचे आचार-विचार । पहा नीट ३२
उपकारधर्माशीं अविरुद्ध । ते त्याचेचि आचार सिद्ध
अन्य ते सर्वथा निषिद्ध । समजावेत ३३

शिक्षणें बुद्धि वाढवावी । आत्मचिंतनें निर्मळ करावी
भूतदया मनीं वागवावी । अपरंपार ३४
ही दयाप्रधान संस्कृत मति । दाखवील जी उपकाररीति
निर्भयपणें तियेचे संगतीं । मार्ग चाला ३५
हाचि उपकारधर्म उदार । सर्व धर्मांचें हेंचि सार
हाचि एक असे आधार । सर्व धर्मांचा ३६
प्रसिद्ध स्थाइक हृदयींचा । संस्थापक सर्व धर्मांचा
माझ्या तुमच्या त्या हरीचा । आदेश हा ३७

## ७९ मेरा वतन (गीत)

मेरा वतन भलाई । मेरा वतन भलाई ॥ धृपद ॥

अल्ला ने मुझ को जैसी विद्या है पाक सिखाई । वैसी मुझे है करनी मिहनत से कुछ भलाई ॥१॥

कोई खुदा का बंदा गाली मुझे सुनावे । कोई खुदा का बंदा दो चार गून लेवे ॥२॥

जैसी जिसे है ताकद बुद्धी की सद्गुणों की । वैसी उसे दिखेगी करतूत दूसरों की ॥३॥

अल्ला का अर्ज यंही है करते रहो भलाई । जैसी जिसी को विद्या हमने है पाक सिखाई ॥४॥

अल्ला का अर्ज सब को मिहनत से और जबांसे । मालूम करना, रिश्ता यही मेरा जिंदगी से ॥५॥

रिश्ता न लोभ का है रिश्ता न मोह का है । कुर्बान जिंदगी यह मुद्दत से कर दिई है ॥६॥

कोई डराना चाहे क्या मैं डरूंगा बंदा । मैं तो खुदा का चेला डरना ना मेरा धंदा ॥७॥

मुझ को नहीं खुदा का डर इतना सा भी बिलकुल । मैं तो खुदाका प्यारा उस के ही घर का बुलबुल ॥८॥

जिस को नहीं खुदा का डर इतना सा भी बिलकुल । वह क्या डरेगा सुनकर पानी की पास झुलझुल ॥९॥

झुलझुल डरानेहारी होगी जिसी को होगी। मुझ को नहीं रखा है इतना सुनो अभागी ॥१०॥

मिहनतसे सेवा करना अल्ला के बंदेओं की । मुझे चाल है बताई यह पाक जिंदगी की ॥११॥

इस चाल से चलूंगा सेवा नहीं भुलूंगा। चाहे सो होवो मुझ को आनंद में रहूंगा ॥१२॥

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

समाप्त

# शुद्धिपत्र

**टीपः—** पुढील पद्यांत 'दाम-यमक' (श्लोकाचे शेवटचा शब्द, अक्षर किंवा व्यंजन पुढील श्लोकाची सुरवात) आहे. पद्यांचा अनुक्रमांक दिला आहे.

[१] :— शब्द-दाम-यमक.
(१) — अक्षर-दाम-यमक.
"१" :— व्यंजन-दाम-यमक.
१ :— वरील तिन्हीपैकीं एक.

---

रत्नागिरी तुरुंगांतील कविता :— [७], [८], (९), (१०), (११) [१२], [१३], (१४), (१५), (१६), (१८), "२१", (२२), २३, "२४", "२६", "२७", "३१", "३२", "३४", "३५", "३६", "३७", ४१, "८८".

चैतन्यगाथा :— [४], [१०], [६५], [६६].

## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १ | — | २ | मोहिनीसम | मोहनीसम |
| ३ | — | ३० | "बोध | बोध |
| ३ | — | ३१ | जडाकाशीं | "जडाकाशीं |
| ३ | — | ३२ | मानव कल्पना | मानवकल्पना |
| ३ | — | ३२ | ०वल्गना | ०जल्पना |
| ८ | — | १०२ | सुशीला | सुशीला |

| पृष्ठ | ओळ | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ८ | -- | १०२ | एका | एका[2] |
| | | | हरिणी | हरिणी[3] |
| | | | दुज्या | दुर्ज्या[4] |

[ (१) सुशीला– सुशीलेचा देव (जोशीकृत).
(२) एका– बोधप्रधान प्रतिभा–प्रियास.
(३) हरिणी– आश्रमहरिणी (जोशीकृत)
(४) दुज्या– प्रतिभा-साधनकारांस. ]

| पृष्ठ | ओळ | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ९ | — | १०८ | स्वाध्य | स्वास्थ्य |
| ११ | — | १३४ | भार्थे | मार्थे |
| १२ | — | १५६ | असिघार ती | असिधार ती'' |
| १३ | — | १६९ | त्रिषा | विषा |
| १७ | -- | २२२ | ज्वर संगमीं | ज्वरसंगमीं |
| १८ | — | २३० | नटतें | नटते |
| ६५ | ५ | -- | म्हणतात. | म्हणतात, |
| ६७ | १ | -- | होतेंस. | होतेंस, |
| ६७ | २ | -- | याविषयीं | याविषयीं. |
| | | | खरोखर यांत | खरोखर मला यांत |
| ६७ | १६ | -- | वाचतो | वाचतों. |
| ६७ | ८ (खालून) | -- | डंगी | "डुंगी" |
| ६८ | १४ | -- | Superdinner | Super dinner |
| ६८ | ७ (खालून) | -- | मनुष्य स्वभावाच्या | ०समाजाच्या |
| ६९ | ९ | -- | तूं walking sleeper | तें waking sleeper |
| ७० | १२ | -- | तो तुमचा तुम्हांला | तो तुम्हांला |
| ७१ | ३ | -- | मनशक्ति | मनःशक्ति |
| ७६ | १४ | -- | पट्टयावर | भालपट्टावर |
| ७७ | १५ | -- | देव नाहीं करीत'' | नाहीं करीत देव'' |
| ७७ | २० | -- | ०द्वितीय कवि० | ०द्वितीयकवि० |

| पृष्ठ | ओळ | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ७७ | १ (खालून) | -- | ०मईति | ०मईसि |
| ८० | — | ६ | ०मन क्षुधा० | ०मनक्षुधा० |
| ८० | ६ | -- | प्रेमांचा | प्रेमाचा |
| ८१ | १ (खालून) | -- | सुख विशेष लोभें | सुखविशेषलोभें |
| ८२ | — | ११ | सुखी सुखीं | सुखीं सुखी |
| ८२ | — | १२ | ०पद बोधना | ०पदबोधना |
| | | | ०भाक्ति संचा० | ०भक्तिसंचा० |
| ८३ | — | १५ | दिन हा | दिनदा |
| ८३ | — | ७ | हवा | दवा |
| ८४ | -- | १० | तया करी | तया करीं |
| ८४ | -- | ११ | अंतरि | अंतरिं |
| ८४ | — | १६ | मज कारण | मजकारण |
| ८४ | — | २२ | असावशी | असा वशी |
| ८५ | -- | ३० | ०त्मता क्षय | ०त्मताक्षय |
| ८५ | — | ३४ | ०शित्व युता० | ०शित्वयुता० |
| ८६ | -- | ४४ | शुभ कर्म पसारे | शुभकर्मपसारे |
| ८७ | — | ३ | है सदा | है खुदा |
| ८७ | — | ४ | करजा | करता |
| ८८ | — | ७ | गोरवर्ण० | गौरववर्ण० |
| ८८ | -- | १० | ०सत्य दिन० | ०सत्यदिन० |
| | | | ०दर्य चंद्रमा | ०दर्यचं० |
| ८८ | — | १० | दिव्य साधुत्व जलद | दिव्यसाधुत्वजलद |
| ९० | — | ६ | करी यापरी | करि यापरी |
| ९१ | — | ४ | बरि | वरि |
| ९१ | — | ५ | ०हापि० | ०हादि० |
| ९१ | — | ६ | बाण | वाण |
| ९१ | — | ७ | सुमतिं कुमतिं | सुमति कुमती |
| ९२ | -- | ५ | वासवीत | वाढवीत |

| पृष्ठ | ओळ | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ९२ | — | ५ | सक्तिय | सक्रिय |
| ९२ | — | ८ | तसे | नसे |
| ९३ | — | ९ | पठवि | पढवि |
| ९३ | — | १० | मन | मज |
| ९३ | १२ | — | भक्ति योग्य | भक्तियोग्य |
| ९३ | १५ | — | सुख पर्व | सुखपर्व |
| ९३ | १६ | — | ०जन मान्य | ०जनमान्य |
| ९४ | १३ | — | विश्वाबाप | विश्वा बाप |
| ९५ | २० | — | सेना | सेवा |
| ९५ | २२ | — | आला | जाला |
| ९६ | १ | — | सिद्धिबुद्धिचा | सिद्धि बुद्धिचा |
| ९६ | १ | — | भावना वैभव | भावनावैभव |
| ९६ | २ | — | समृद्धिं | समृद्धि |
| ९६ | १० | — | सुखध्येय भूत | सुख ध्येयभूत |
| ९६ | १४ | — | दातें | दानें |
| ९६ | २१ | — | मायावळें | मायाबळें |
| ९७ | ३ | — | पोकळें | पोकळ |
| ९९ | १७ | — | शक्ति सर्व० | शक्तिसर्व० |
| १०० | ११ | — | वरें | बरें |
| १०० | ६ (खालून) | — | होय | हो |
| १०१ | १५ | — | तयाची | तपाची |
| १०१ | ५ (खालून) | — | भूत प्रेम | भूतप्रेम |
| १०१ | ३ ( ,, ) | — | ०ग्रंथ म० | ०ग्रंथम० |
| | | | सृष्टि ध्यान | सृष्टिध्यान |
| १०२ | ७ | — | बुद्धी मना० | बुद्धीमना० |
| १०२ | १४ | — | अन्य जन | अन्यजन |
| १०२ | ४ (खालून) | — | देव देव | देवदेव |
| १०३ | २ | — | रूप नाम | रूपनाम |

| पृष्ठ | ओळ | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १०३ | १३ | -- | नवपुराण | नव पुराण |
| १०३ | १९ | -- | आघार | आधार |
| १०५ | २ | — | बुद्धिकार्य | बुद्धि कार्य |
| १०६ | ७ | — | त्यानें | त्यातें |
| १०६ | ११ | -- | मोक्ष कामें | मोक्षकामें |
| १०६ | -- | १ | तयाचे | तयांचें |
| १०६ | — | ५ | तन | मन |
| १०६ | — | ६ | सामोटा | सामोरा |
| १०७ | १ | — | ०ग्रंथ म० | ०ग्रंथम० |
| १०७ | -- | ११ | सर्वांकर्में | सर्वां कर्में |
| १०७ | -- | १ | सृष्टि | सृष्टी |
| १०७ | — | २ | मरांठीचे | मराठिचे |
| १०७ | — | ३ | सेव० | सेवि० |
| १०७ | — | ८ | ०र्माण कला | ०र्माणकला |
| | | | ०तीर्शी | ०तीशी |
| १०८ | — | १४ | मन्मनाचें | मी मनाचे |
| १०८ | — | १५ | यमकांहि; होइं | यमकांहिं; होइ |
| १०८ | — | १ | जीव जडांस० | जीवजडां स० |
| १०८ | — | ४ | हरें; गुण वस्त्र० | हटें; गुणवस्त्र० |
| १०८ | — | ६ | तो एक बहु— | तो एक चाले बहु० |
| १०८ | — | ७ | गुण वस्त्र० | गुणवस्त्र० |
| १०९ | — | १५ | जादू पट, | जादू, पट, |
| १०९ | — | १५ | कवीर्ची | कवीर्ची, |
| १०९ | — | १६ | जादू० | जादु० |
| १०९ | — | १६ | मार्नी | मानी, |
| १०९ | -- | १८ | गोप । गोपीवि० | गोप-गोपी=वि० |

| पृष्ठ | ओळ | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १०९ | — | १९ | ०यास्त युक्त | ०यास्तयुक्त |
| | | | मी-मी वि० | ०मी–मी=वि० |
| ११० | — | २३ | जीव कांहीं | जीवकांहीं |
| ११० | — | २७ | तेथें | येथें |
| ११० | — | ३० | जीव | तो |
| ११० | — | ३१ | विरोधी | विरोधि |
| ११० | — | ३२ | मोहवी आणी | मोहवि आणि |
| ११० | — | ३२ | हरींची | हरीची |
| १११ | — | ३८ | तो जाणे | तो एक जाणे |
| १११ | — | ४२ | ०कास ली० | ०कासली० |
| १११ | — | ४३ | ०तुल प्र० | ०तुलप्र० |
| १११ | — | ४४ | ने | बने |
| १११ | — | ४९ | ०मंद बुद्धि | ०मंदबुद्धि |
| ११२ | — | ५२ | त्यानें | त्यातें |
| ११२ | — | ५३ | गोपी वसतांहिं | गोपीवसनांहिं |
| ११२ | — | ५६ | संनियता | संनिधता |
| ११२ | — | ५९ | ०यार्त भावें | ०यार्तभावें |
| ११२ | — | ६२ | ०मनें, मिति | ०मतें; मिती |
| ११२ | — | ६३ | जीवनाही | जीवता ही |
| १·३ | — | ६७ | येथें | यमें |
| ११३ | — | ७० | स्वार्थ निमग्ननीति | स्वार्थनिमग्ननीति |
| ११३ | — | ७१ | मनीं | मतीं |
| ११३ | — | ७४ | घटे | घडे |
| ११३ | — | ७७ | गुण-देव घेवी | गुण-देवघेवी |
| ११४ | — | ७९ | असाहि साधु | असा असाधु |
| | | | हरि नाट्य० | हरिनाट्य० |
| ११४ | — | ८३ | विकास लीला | विकासलीला |
| ११४ | — | ९० | स्वप्रस्थ | स्वप्रस्थ |

| पृष्ठ | ओळ | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ११४ | — | ९० | सुप्तार्थे | सुप्त्यर्थे |
| ११५ | — | ९४ | स्थिती० | स्थिति० |
| ११५ | — | ९५ | चिदेक रूपी | चिदेकरूपी |
| ११५ | — | ९७ | ०समान | ०समान् |
| ११५ | — | १०० | स्वप्नीय सृष्टि | स्वप्नीयसृष्टि |
| | | | स्मृति कार० | स्मृतिकार० |
| ११७ | — | ६ | गोकुल का० | गोकुलका० |
| | | | दिन या० | दिनया० |
| ११८ | — | १२ | मंगल भावन-भावन | मंगल-भावन-भावन |
| ११८ | — | १२ | तुझिही | तुझि ही |
| १२० | — | २५ | महात्मदस्थहि | महात्मपदस्थहि |
| १२० | — | २८ | बहुता परी | बहुतापरी |
| १२० | — | २९ | नट हृत्प० | नटहृत्प० |
| १२० | — | ३० | ०प्रभु सं० | ०प्रभुसं० |
| १२० | — | ३१ | हरि बं० | हरिबं० |
| १२१ | — | ३३ | खलमारिता | खल-मारिता |
| १२१ | — | ३५ | महात्म पद० | महात्मपद० |
| १२२ | — | ३८ | माथिकका० | मायिक का० |
| १२२ | — | ४३ | हरीं | हरी |
| १२३ | — | ४६ | ०सन सत्य० | ०सन-सत्य० |
| १२३ | — | ४९ | ०हित साधक | ०हितसाधक |
| १२३ | — | ५१ | हिंसन ही | हिंसनही |
| १२४ | — | ५४ | सत्य रण० | सत्य-रण० |
| १२४ | — | ५५ | ०रोकि दया० | ०रोकिदया० |
| १२४ | — | ५७ | असें | असे |
| १२५ | — | ६२ | तनु वर्धे | तनुवर्धे |
| १२५ | — | ६५ | सुमतिप्रति भान | सुमति-प्रतिभान |
| १२६ | — | ६७ | जीवनीं | जीवनी |

| पृष्ठ | ओळ | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १२६ | — | ६९ | न ये | नये |
| १२६ | — | ७३ | ननु० | तनु० |
| १२७ | — | ७५ | खलतारुजा | खलता-रुजा |
| १२७ | — | ७७ | वध चि० | वधचि० |
| १२७ | — | ७८ | 'खुल्या...सहाय' | खुला...सहाय |
| १२७ | — | ८० | वरुनि | मरुनि |
| १२७ | — | ८१ | तप च०, ०वीर रसीं | तपच०;०वीररसीं |
| १२८ | — | ८२ | जीवनीं | जीवनी |
| १२८ | — | ८३ | ०क्ति प्र० | ०क्ति-प्र० |
| १२८ | — | ८४ | हरिकरी | हरिकरीं |
| १२८ | — | १ | ०घर पायिं | ०घरपायिं |
| १२८ | — | २ | ०रि-हरी वि० | ०रि-हरी-वि० |
| १२९ | — | २ | ०तीय कविकाव्य कला० | ०तीयकविकाव्य-कला० |
| १२९ | — | २ | ०सैक सक्त० | ०सैक-सक्त० |
| १२९ | — | ३ | ०त्व साधु० | ०त्व-साधु० |
| १२९ | ८ | ४ | दिसे, न | दिसे न, |
| १२९ | — | ४ | जयासि | जयीसि |
| १३० | — | १५ | भवि | भविं |
| १३० | — | १६ | विविध प्र० | विविधप्र० |
| १३१ | — | १९ | विवरूनि | विखरूनि |
| १३१ | — | २१ | ०ताहि; ०ताहि | ०तादि; ०तादि |
| १३१ | — | २१ | ०सुखी | ०सुखीं |
| १३१ | १(खालून) | — | ०वी जनांसी | ०वी जनासी |
| १३३ | ११ | — | ०कारीं | ०कारी |
| १३३ | १५ | — | गुण खेळ | गुण-खेळ |
| १३३ | १६ | — | गुण कर्म० | गुण-कर्म० |
| १३३ | १७ | — | सदा सुख; अंगींचा | सदासुख; अंगीचा |

| पृष्ठ | ओळ | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १३४ | — | ७ | ०रक म० | ०रणम० |
| १३४ | — | ९ | ०वित ल० | ०वितल० |
| १३५ | — | २४ | ०निष्ठ मा० | ०निष्ठ-मा० |
| १३५ | — | २५ | दुःखि | दुःखिं |
| १३५ | — | २६ | कष्ट नि० | कष्टनि० |
| १३६ | — | ४० | ०प्रेम प्र० | ०प्रेम–प्र. |
| १३६ | — | ४३ | साराप० | सारा प० |
| | | | विकास श्री० | विकासश्री० |
| १३७ | — | ४६ | स्वयंभूतो | स्वयंभू तो |
| १३८ | — | ६१ | कष्ट तु० | कष्ट–तु० |
| १३८ | — | ६७ | ०ना हीना | ०नाहीना |
| १३८ | — | ७१ | ०धि सुख | ०धिसुख |
| १३८ | — | ७२ | जड जीव वि० | जड-जीव-वि० |
| १३९ | — | ७३ | पाहती | पाहतां |
| १३९ | — | ८२ | रमावाया | रमावया |
| १३९ | — | ८५ | ०न्न भू० | ०न्नभू० |
| १३९ | — | ८६ | ०भूत | ०भूंत |
| १४० | — | ९० | अन्नभूतं | अन्नभूंत |
| १४० | — | ९४ | माया ना० | माया-ना० |
| १४२ | — | ९ | ०स्तुति करी | ०स्तुतिकरी |
| १४२ | — | १२ | थोगा. | योगा० |
| १४३ | — | २१ | अनंत गु० | अनंतगु० |
| १४३ | — | २४ | वाढें; खचें | वाढे; खचे |
| १४३ | — | २७ | खुली | खुळी |
| | | | नट प्र० | नट–प्र० |
| १४४ | — | ३५ | मुक्त भो० | मुक्तभो० |
| १४४ | — | ३६ | त्वास्थ्यार्थ | स्वास्थ्यार्थ |
| १४४ | — | ४२ | ०चर्य प्र० | ०चर्यप्र० |

| पृष्ठ | ओळ | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १४४ | — | ४५ | मानी ती | मानीती |
| १४४ | १ (खालून) | — | ०मनसि | ०मजसि |
| १४५ | | ३ | तव–हरी | तव हरी |
| १४५ | | ३ | वर व० | वर-व० |
| १४५ | १ (खालून) | — | ०ननीं | ०ननी |
| १४६ | — | १७ | नितमनीं | नित मनीं |
| १४६ | — | १८ | तनु० | तनू० |
| १४६ | — | २६ | ०चार हवा | ०चारहवा |
| १४८ | — | २५ | ०ति व० | ०तिव० |
| १५१ | — | ६६ | ०वंधक० | ०बंघन० |
| १५१ | — | ६९ | हेंचि | हेचि |
| १५२ | — | ८४ | न लगे | नलगे |
| १५३ | — | ९१ | स्वतत्र | स्वतंत्र |
| | | | ०क्त मनीं | ०क्तमनीं |
| १५३ | — | ९७ | कुबेर कंगाल | कुबेर, कंगाल |
| १५४ | — | ३ | ०मेण | ०भेण |
| १५५ | — | १६ | ०ति भा० | ०तिभा० |
| १५५ | — | १६ | परध्येय | परमध्येय |
| १५५ | — | १७ | ०ज्य सि० | ०ज्यसि० |
| १५५ | — | २० | ०ष्ट्रीय स्वा० | ०ष्ट्रीय–स्वा० |
| १५७ | — | ४१ | ०जीवि करीं | ०जीविकरीं० |
| १५७ | — | ५० | बा | ना |
| १५८ | — | ५९ | शास्त्रा | शास्ता |
| | | | कां हिं० | कां न हिं० |
| १५८ | — | ६३ | देशदे० | देश दे० |
| १५९ | — | ५ | आणती | आपसी |
| १५९ | — | ८ | मुस्लिम ज० | मुस्लिमज० |
| १५९ | — | ९ | ‘जव | ‘जन |

| पृष्ठ | ओळ | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १५९ | — | १० | ०म ज० | ०मज० |
| १५९ | १ (खालून) | — | मज जें | मन जें |
| १६० | — | १९ | वरलों वरणें | वदलों वदणें |
| १६० | — | ३ | उमा | उभा |
| १६० | ४ (खालून) | — | ०तिंत्यायीं | ०तिंपायीं |
| | | | सदा ही | सदाही |
| १६१ | — | ११ | मानिली | मानिलि |
| १६१ | — | १३ | मोठ्या० | मोन्या० |
| १६२ | — | १८ | तनु | तनू |
| | | | ०हांत मार्गे | ०हात मागे |
| १६२ | — | २२ | हसे | हरो |
| १६२ | — | २५ | असाशी | असशी |
| १६३ | — | ४० | पुण्प | पुण्य |
| १६४ | — | ५ | ०वीत | ०नीत |
| १६५ | — | ११ | ०भक्ति युक्त | ०भक्तियुक्त |
| १६५ | — | १ | सोड्डनि | सोडुनि |
| १६५ | — | ४ | तनूचें | तनुचें |
| १६५ | — | १० | तुझा | तूझा |
| १६६ | — | २ | ०जे तरीं | ०जेतरीं |
| १६६ | — | २ | वृत्तिये | वृत्ति ये |
| १६६ | — | ५ | यातना | याचना |
| १६७ | — | १ | कामही | काम ही |
| १६८ | — | ६ | समाज घ० | समाजघ० |
| | | | ०हिंसास० | ०हिंसा स० |
| १६९ | — | २ | ०चीहि | ०चीही |
| १७० | — | ७ | नयना अचिंत्य | मनना अचिंत्य |
| १७० | — | ८ | सुजीर्ण व० | सुजीर्णव० |
| १७० | — | ९ | सुखिदुःखि | सुखि दुःखिं |

| पृष्ठ | ओळ | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १७० | — | ११ | ०माधि नि० | ०माधिनि० |
| | | | वांछिना | वांछि ना |
| १७० | — | १३ | कृति यो० | कृतियो० |
| १७० | — | १३ | भवयुक्त | भवमुक्त |
| १७० | — | १४ | श्रुतिकाम्यगु० | श्रुति काम्य गु० |
| १७० | — | १४ | ०र्थि का० | ०र्थिका० |
| | | | ०णार्थ भो० | ०णार्थभो० |
| १७० | — | १७ | दिव्य वि० | दिव्यवि० |
| | | | ०वर कर्म गा० | ०वरकर्मगा० |
| १७१ | — | २० | करूनि | वरूनि |
| १७१ | — | २१ | पुण्य पाप; देह | पुण्यपाप; देह |
| १७१ | — | २२ | असुखी; ०लार्षि | असुखीं; लाषि |
| १७१ | — | २३ | ०कोप रीति | ०कोपरीति |
| १७१ | — | २६ | सदाभर | सदा भर |
| १७१ | — | ३ | ०वीज | ०बीज |
| १७३ | — | २४ | योंग० | योग |
| १७३ | — | २५ | कशीती | कशी ती |
| १७३ | १२ (खालून) | — | वीहरूं | विहरूं |
| १७३ | १३ (खालून) | — | ३० | (आंकडा नको) |
| १७४ | — | ५ | कामनाती | कामना ती |
| १७४ | ५ (खालून) | — | जीवा; ०नाची | जिवा ०नाचि |
| १७५ | ५ | — | जेर्णे | जिणें |
| १७५ | ९ | — | रंगसेवा | रंग सेवा |
| १७५ | १४ | — | मजा | प्रजा |
| १७५ | १५ | — | मारी; | मारो; |
| १७५ | १ | — | तो कला | ती कला |
| | | — | शासि त्यानें | शासित्यानें |
| १७८ | १९ | — | नीती | नीति |

| पृष्ठ | ओळ | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १७९ | ४ (खालून) | — | साव | सान |
| १८० | १२ | — | देह श्रमें | देहश्रमें |
| १८१ | १२ | — | ०स्वार्थ दे० | ०स्वार्तदे० |
| १८२ | ५ | — | पूजी तो | पूजीतों |
| १८२ | १३ | — | पूर्ण अपूर्ण सं० | पूर्ण–अपूर्ण–सं० |
| १८२ | १५ | — | देशही | देश ही |
| १८२ | १७ | — | देशमूर्ति गत | देशमूर्तिगत |
| १८३ | ११ | — | अनंद | आनंदा |
| १८३ | १४ | — | देशदेव देशमाता देशपिता | देश देव देश माता देश पिता |
| १८४ | १४ | — | रात्रं दिन | रात्रंदिन |
| १८५ | १०(खालून) | — | होय | हेय |
| १८९ | टीपः–दहावा योगः–यांत १४ ओळींचे एक याप्रमाणें सात कडवीं आहेत. | | | |
| १९० | १७ | — | अ पही | अल्पही |
| १९३ | टीपः–यशोधनरागरंगः–पद्याच्या नांवापुढील कंसांतील शब्द वृत्ताचें नांव आहे. | | | |
| १९८ | ८५ | — | स्वार्घी | स्वार्थी |
| १९८ | ६ | — | विंद्या० | विंध्या |
| २०६ | २२ | २ | आणि | अगि |
| २०७ | ६ | ४ | त्यात | त्यांत |
| २०७ | १ (खालून) | — | ३१९,२८ श्लोक पहा | ३१९ ते ३२८ श्लोक पहा |
| २०८ | | १ | तें | तैं |
| २०८ | | २ | पाभरा | पामरा |
| २०९ | | ८ | अम्हांस | आम्हांस |
| २०९ | | ९ | अम्हासी | आम्हांसी |
| २११ | ३ | — | विभुक्ति | विमुक्ति |

| पृष्ठ | ओळ | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| २१३ | १ | २ | यांसी | यांशीं |
| २१६ | ५ (खालून) | — | विघीचा | विधींचा |
| २१६ | १ (खालून) | १ | असें | असे |
| २१७ | | २ | दुर्जन | दुर्जय |
| २१७ | | ३ | दोनसा | दीनसा |
| २१७ | | ५ | अनि वामि | अति वानि |
| २२२ | १६ | — | संहतीवळ | संहतीबळें |
| २२३ | | ३ | विनवनी | विनवणी |
| २२३ | १५ | — | दोत नट | दोन नट |
| २३४ | — | ७६ | विज | निज |
| २४२ | — | २०३ | प्रथा– | यथा– |
| २४३ | — | २१७ | भार्गा | मार्गा |
| २५२ | — | ३३८ | अन्यया | अन्यथा |
| २५५ | — | ३९० | ज्ञानयम्या | ज्ञानगम्या |
| २६० | — | ४६१ | आंत | अति |
| २७१ | ९ | — | शिवरावाचे | शिवरायाचे |
| २७३ | ६ | — | बघुनियां | वधुनियां |
| २८१ | ३ (खालून) | — | हाता | हातीं |
| २८२ | ५ (खालून) | — | भवीं पूज्य | भवीं भव्य पूज्य |

॥ श्री ॥

सेनापतींचा समग्र-ग्रंथ हा पद्यरूप, गहन अद्वैत तत्त्वज्ञानाच्या भूमिकेवरून प्रचलित व्यवहारांत नवीन तऱ्हेनें प्रकाश देणारा–पाडणारा असा असल्यामुळें समग्र ग्रंथाला जरी अभिप्रायाची आवश्यकता नव्हती तरी वाचकांकरितां ती आहे असें मनांत येऊन मीं मला पूज्य, विख्यात वैकुंठवासी हरिभक्त विष्णुबुवा जोग यांचे शिष्य प्रो. सोनोपंत दांडेकर यांना आग्रहाची विनंति केली. उठल्यापासून निजेपर्यंत सदा कामांत अशी त्यांची परिस्थिति मला माहीत होती. पण कांहींच अडचण न बोलतां ते पटकन ठीक आहे असें म्हणाले याचें मला नवल वाटलें व कीर्तनाकरितां दूर गांवीं जात असतांना आगगाडींत त्यांनीं हा ग्रंथ वाचून दोनतीन दिवसांत अभिप्राय दिला. त्यामुळें माझें मन त्यांजबद्दलच्या आदरानें अधिकच दडपून गेलें आहे. त्यांचे आभार शब्दांत येथें मानणें म्हणजे कांहीं तरी करणें आहे असें वाटतें. थोर हे सदैव अनुकरणीय व वंद्य आहेत.

धुं. वि. देव

---

## सन्मान्य हरिभक्त प्रो. दांडेकर यांचा अभिप्राय—

प्रस्तुत प्रसिद्ध होणारा ग्रंथ हा सेनापति बापटांच्या वाङ्मयप्रकाशनासंबंधीं श्री. धुंडिराज देव यांनीं केलेल्या संकल्पाची पूर्ति होय. सेनापतींचें वाङ्मय जरी थोडें असलें तरी तें फारच मोठ्या किंमतीचें आहे. ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे 'दीपकळिका धाकुटी । परि बहुतेजातें प्रकटी.' पांचशे मेणबत्त्यांच्या प्रकाशाइतकी प्रकाश पाडणारी विजलीची तार फार का मोठी असते ! पण तिचा प्रकाश केवढा व्यापक व डोळे दिपविणारा असतो ! तद्वतच् सेनापतींच्या वाङ्मयाचें आहे.

अशा या सेनापतींच्या वाङ्मयावर वास्तविक अभिप्रायाची जरूरी नाहीं. रत्न काय ओपसराच्या प्रकाशानें का उजाळ होणार आहे ! कापुराला

काय लावलें असतां त्याचा वास अधिक दरवळणारा आहे ! रत्न हें स्वभावतःच उजाळ आहे. कापूर हा निसर्गतःच सुवासिक आहे. बापट-वाङ्मय हें तसेंच स्वप्रकाशानें प्रकाशी होणारें आहे. पण माझे मित्र श्री. देव यांना असें वाटलें कीं, 'आपुलेंचि रत्न थितें । परि घेणें परकीयाचेनि हातें' म्हणून त्यांनीं मला म्हटलें कीं या पुस्तकावर तुमचा अभिप्राय द्या. व मींहि अधिकार नसतांना तें काम पत्करलें. कारण अभिप्रायार्थ वाचन म्हटलें कीं 'मनन' करावेंच लागतें. येऱ्हवीं आपल्याकडून मननपूर्वक वाचन कसचें होणार ! तेव्हां ह्या संधीचा फायदा घ्यावा व पुस्तक वाचून काढावें म्हणूनच हा अभिप्राय दिला आहे.

हल्लींचा काळ हा कवींचा व लघुकथालेखकांचा आहे असें म्हटल्यास हरकत नाहीं. पण हीं जीं छोटीं मोठीं काव्यें प्रसिद्ध होत आहेत त्यांत सर्वभक्षक काळाच्या दाढेंतून मागें राहतील किती याची वानवाच आहे. हें बहुतेक वाङ्मय अल्पायुषी असेंच आहे. कारण यांतील बहुतेक लिखाण हें भोजनोत्तर विश्रांतीच्या वेळीं आपण चिवडा खातों, अथवा ज्यास संवय असेल तो जेवण झाल्यावर करमणूक म्हणून विडी ओढतो, अशा प्रकारचें आहे. जीवनास नवीन वळण लावणारें, हतवीर्य झालेल्यांना संजीवनीवत् होणारें असें वाङ्मय फारच थोडें असें आहे. सेनापतींचें वाङ्मय 'चिरंजीवी' असून तें अशा या हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या थोड्या संभारांत बसण्यास योग्य असें आहे.

इतर ग्रंथ व हा ग्रंथ यांत जो फरक आहे त्याचें कारण शोधूं लागल्यास ग्रंथकर्त्यांच्या 'चमत्कारमय' जीवनांत सांपडणारें आहे. कवि, कादम्बरीकार यांना विस्मयकारक प्रसंग कल्पनेनें कल्पावे लागतात. सेनापतींच्या आयुष्यांत असे कितीतरी प्रसंग येऊन गेले आहेत, कीं ज्यांच्या संबंधानें असें म्हणतां येईल कीं वस्तुस्थिति ही कादम्बरींत कल्पिलेल्या चित्रापेक्षां अधिक विस्मयकारक होती.

सेनापतींचें वाङ्मय बहुतेक पद्यांतच आहे. म्हणून त्यांच्या वाङ्मया-संबंधीं बोलतांना काव्य असा शब्द साधारण रीतीनें वापरला तरी चालेल. सेनापतींचें काव्य ज्ञानेश्वरांनीं जें 'बरवें कवित्व' म्हटलें आहे त्यांत बसण्याच्या योग्यतेचें आहे. ज्ञानेश्वर म्हणतात— वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें

रसिकत्व । रसिकत्वीं परतत्व । स्पर्श जैसा ॥ ही योग्यता मला वाटतें अलिकडे प्रसिद्ध होणाऱ्या फारच थोड्या काव्यांस लाभेल. सेनापतींचें काव्य थोडें असलें तरी अत्यंत उच्च दर्जाचें आहे. याचीं कारणें माझ्यामतें खालील-प्रमाणें आहेत.

सेनापति हे अशा थोर विभूतींपैकीं आहेत कीं ज्यांना कर्तव्याचा ईश्वरी संदेश आयुष्यांतील पूर्वभागांतच मिळतो. ते कॉलेजांत असतांनाच एका संध्यासमयीं श्रीहरीनें त्यांना आपल्या 'मायभू'करतां सर्वस्वाचा होम करण्याचा संदेश दिला; व आज त्यांच्या वयाला साठ वर्षे झालीं तरी 'आत्मयज्ञ' अथवा 'होम' आपल्याकडून श्रीहरि पुरा कां करून घेत नाहीं याची तळमळ त्यांना आजहि वाटतच आहे. सेनापतींचें वाङ्मय दिव्य आहे याचें कारण त्यांना मिळालेला राष्ट्राकरतां—मानवांकरतां—आत्यंतिक त्यागाचा आत्मयज्ञ करण्याचा दिव्य संदेश आपल्या मुरलीच्या द्वारां राष्ट्रास द्यावयाचा आहे. 'अंतरींचें बाहेरी धांवे' असा नियम आहे. त्यांच्या काव्यांत उत्कटता, तळमळ, राष्ट्रभक्ति दिसतात याचें कारण हेंच आहे कीं त्यांना जगास दिव्य संदेश देणें आहे. त्यांचें वाङ्मय बहुतेक पद्यांत आहे याचेंसुद्धां कारण हेंच आहे. सेनापति हे प्रकृतीनें भावनाप्रधान आहेत. त्यांत त्यांना असा ज्वलत्संदेश मिळालेला. मग स्वाभाविकच तो गद्याच्या द्वारा वाट शोधण्या-पेक्षां रसमय पद्यांतूनच वाट काढणार.

दुसरें कारण असें आहे कीं, सेनापति हे उपजत अभिजात कवि आहेत. ते मुलांना पत्रें लिहितांना काव्य करतात; गूढ प्रश्नांची चर्चा, मांडणी काव्यांत करतात; तुरुंगांत, घरांत, रस्त्यांत सर्वत्र काव्य करतात. व पूर्वी-च्या कवींप्रमाणें ह्या त्या वृत्तांत करतात. 'यशोधनरागरंगा'बाबतची कथा त्यांनीं दिलेली वाचली म्हणजे काव्यदेवता त्यांच्या ताब्यांत कशी वावरत आहे हें सहज लक्ष्यांत येण्यासारखें आहे. या पुस्तकाकडे नुसती नजर टाकली तरी यांतील वृत्तांची विविधता सामान्य नवशिक्यास घाबरून सोड-णारी अशी आहे. संस्कृतची त्यांनीं शिष्यवृत्ति मिळवली असल्यानें त्यांच्या काव्यांत संस्कृत शब्द येणें अगदीं स्वाभाविक आहे.

तिसरें कारण असें आहे कीं त्यांच्या काव्यांत जीवनाची मीमांसा उच्च अध्यात्माच्या भूमिकेवरून केलेली आहे. त्यांना जो संदेश मिळाला तो

त्यांच्यांत नुसता स्फूर्तिरूपानें राहिला नाहीं. त्यांनीं तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, धर्म, काव्य इत्यादिकांवरील प्राचीन, अर्वाचीन, पौर्वात्य, पाश्चात्य असे ग्रंथ वाचले—नव्हे पचवले. अशा रीतीनें वेगवेगळ्या धर्मांचा, तत्त्वज्ञानांचा अभ्यास केल्यानें त्यांच्या मतांना एक प्रकारची व्यापकता प्राप्त झाली आहे. पण महाराष्ट्रास यांत कौतुकास्पद जर असेल तर तें हें कीं इतका सर्व अभ्यास करून सेनापति हे महाराष्ट्राची परंपरा– उपनिषदें, गीता, शंकराचार्य, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास– यांचेच सर्वस्वीं पूजक आहेत. कार्ल मार्क्स वाचून सुद्धां त्यांना आर्थिक जडवाद आवडला नाहीं. त्याचें कारण नास्तिकपणाच्या दिव्यांतून बाहेर पडून ते विचारानें आस्तिक बनले. सेनापतींच्या वाङ्मयास या संतवाङ्मयाच्या दालनांत जागा द्यावी लागेल इतकें तें उच्च आध्यात्मिक भूमिकेवरून रचलेलें आहे. भक्तिप्रधान अद्वैत, ज्ञानप्रधान क्रियाप्रयोग, व्यक्तित्वाचा प्रेममय विश्वात्मक श्रीहरींत लय इत्यादि महाराष्ट्रीय धर्माचीं जीं लक्षणें आहेत तीं आपणांस सेनापतींच्या वाङ्मयांत आढळून येतात. समर्थांच्या प्रमाणें सेनापतींना 'आदेश' राष्ट्रकार्याचा असल्यानें, हें तत्त्वज्ञान राष्ट्रसेवा, राष्ट्रोद्धार याविषयींच्या काव्यांतून बाहेर पडलेलें आहे.

सेनापतींचें तत्त्वज्ञान हें अस्सल महाराष्ट्रीय छापाचें आहे. व या ग्रंथांस विशेष महत्त्व प्राप्त होण्याचें कारण त्यांनीं हें तत्त्वज्ञान नुसतें वाक्पांडित्य, बुद्धिकौशल्य म्हणून पुढें मांडलें नाहीं, तर तें आपल्या आचरणांत आणण्याचा प्रयत्न केला आहे. तें पुष्कळ अंशीं पचवलें आहे. सेनापतींच्या अध्यात्मभूमिकेची बैठक खूप उंच अशी आहे. तेथें राहून ते जो समन्वय करतात तो सामान्य मनुष्यास उमजणेंहि कठीण आहे. त्यांनीं आपलें जीवन सर्वस्वीं श्रीहरीच्या स्वाधीन केलें आहे. ते म्हणतात, '**हरीचा मी सदा बंदी, स्वातंत्र्य मुळिं ना मशीं ॥**' तुकोबा हेंच म्हणतात. 'करिता नारायण। एवढें वेचितां वचन' यांतच खरा भक्तपणा आहे, व खरें अद्वैत आहे. तुकोबा म्हणतात,

**न करीरे संग राहे रे निश्चल । लागो नेदी मळ ममतेचा ॥**
**या नांवें अद्वैत खरें ब्रह्मज्ञान । अनुभवाचांचून बडबडती ॥**

सेनापतींच्या ठिकाणीं भक्ति, क्रियायोग व ज्ञान यांचा असा अपूर्व मिलाफ झाला आहे कीं, वर वर दिसणाऱ्या विरोधी गुणांचें एकत्रित राहण्याचें ते ठिकाण

बनले आहेत. खादीचा जाडा भरडा कपडा अंगावर व दिसण्यांत उदास पण अंतरीं मानव्याच्या प्रेमानें अंतर ओथंबलेलें, प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष पण 'बघुनि घाण जीवाला शिसारी येते' म्हणून खराटा फावडें हातांत घेऊन आळोआळींचे रस्ते साफ करणारे, एक तपावर आयुष्य बंदीखान्यांत जाऊनहि कोठेंहि बंदिवासाला तोंड देण्याचा प्रसंग आल्यास ज्यांचें पाऊल पुढें, अद्वैती आणि भक्त, त्यागी आणि प्रेमी, आपण हालअपेष्टा सहन करून पण दुसऱ्याच्या नखास सुद्धां धक्का लागला असतां सहन न होणारे, सर्व जीवन प्रेममय पहाणारे पण ज्यांच्या प्रेमाच्या तत्त्वज्ञानांत दुष्ट संहारास पूर्ण वाव आहे, अत्यंत स्फूर्तिदायक आशावादी उपदेश करणारे, तर नऊ वेळां स्वतःचा होम करण्यास तयार झालेले, सेनापति हे विरोधी गुणांची समन्वय मूर्ति आहे. एका दृष्टीनें महाराष्ट्रीय तत्त्वज्ञानाचें ते उत्तम प्रतीक आहेत.

सेनापतींच्या वाङ्मयास जो अलौकिकपणा आहे त्याला मुख्य कारण हें आहे कीं, त्यांनीं जें तत्त्वज्ञान सांगितलें तें आधीं आचरलेलें आहे. करणें एक व सांगणें एक हें त्यांना मुळांत ठाऊकच नाहीं. त्यांच्यासंबंधीं श्री. देवांनीं जें लिहिलेलें आहे कीं "आधीं केलें मग सांगितलें" तें अगदीं सत्य आहे.

येथपर्यंत त्यांच्या बैठकीचा विचार झाला. येथवर ग्रंथकर्त्याचा अधिकार व त्यामुळें त्यांच्या शब्दाला प्राप्त झालेलें वजन याचा विचार केल्यावर आतां आपण त्यांच्या वाङ्मयांतील विषयाकडे वळूं. या चारशेंवर असलेल्या पानांच्या ग्रंथांत धर्म, राजकारण, समाजकारण, अर्थशास्त्र, काव्य इत्यादि महत्त्वपूर्ण विषयांवर सेनापतींचे विचार आलेले आहेत.

सेनापति हे क्रियायोगी असल्यानें, त्यांनीं राष्ट्रोद्धाराच्या कार्यांत सर्व बाजूनें जातीनें भाग घेतलेला. यामुळें प्रचलित सर्व प्रश्नांवर त्यांचीं मतें आपणांस पहावयास मिळतात. त्यांचे या सर्व विषयांवरील विचार अत्यंत मननीय आहेत. इंग्लंड, फ्रान्स सारख्या देशांतून स्वतः राहून येऊन, प्रेम करण्याचे प्रसंग प्राप्त झाले असतां त्यांतून सहीसलामत बाहेर पडून, स्वातंत्र्याचा सर्व प्रकारें पुरस्कार करणारे असे ते असल्यानें सर्व प्रकारचें वाङ्मय वाचून त्यांनीं जें मथित काढलें आहे तें अत्यंत मननीय आहे. चैनीनें, भोगासक्तीनें राष्ट्रें लयास जातात. समाजस्वास्थ्य संयमानेंच उत्तम राहील, कृत्रिम उपायानें नव्हे, हे विचार आधुनिक तरुणतरुणींच्या समोर जितके येतील तितकें अवश्य आहे.

रूढी व शास्त्रें यांना योग्य मान द्यावा असें म्हणण्याकडे त्यांचा कल आहे. त्यांच्या शिकवणुकीचें सार असें आहे कीं धर्माचें सार परोपकार आहे. तुकोबाहि 'तुका म्हणे फार। थोडा तरी परउपकार' असेंच म्हणतात. ह्या परोपकाराकरतां अत्यंत त्यागाची तयारी पाहिजे. राष्ट्रोद्धार हा त्यागी-मरावयास तयार असणाऱ्या मंडळींकडूनच होईल, अशी त्यांची ठाम समजूत आहे. 'त्यागेनैकेनामृतत्वमानशुः' हें औपनिषदिक वचन त्यांच्या उपदेशाचें सार आहे. परोपकार करीत असतां परपीडकांस 'चोंच मारणें' हेंहि अवश्यक आहे. स्वतः आपणांस 'चोंच' मारायची तयारी पाहिजे असेंही कुठें कुठें त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे.

त्यांचीं कांहीं खाजगी 'वामन कमळी' यांना लिहिलेलीं पत्रें आहेत. तीं खाजगी कसलीं! वामन कमल यांचा जन्म होण्यापूर्वीच केव्हांच सेनापतींचा परिछिन्न गृहस्थाश्रम आटोपला होता. हीं पत्रें म्हणजे 'अर्जुनं पुरस्कृत्य' जशी गीता अशासारखींच जवळ जवळ आहेत. पत्रांतील कांहीं भाग अत्यंत हृदयस्पर्शी आहे.

काव्य या दृष्टीनें बघूं लागल्यास त्यांच्या काव्यांत राष्ट्राकरतां तळमळ हा गुण विशेष दिसतो. फुलें वेगळीं वेगळीं मोजतां येतात, तसेच हार मोजतां येतात, पण त्यांतील सुवास जसा एकच असतो, तसेंच सेनापतींच्या काव्याचें आहे. राष्ट्रसेवा, मानव्याची सेवा हा एकच सुवास त्यांच्या वेगवेगळ्या रंगांच्या काव्यकुसुमांतून आपणांस येईल. मात्र अति उच्च भूमिकेवरून काव्यनिर्मिति झाल्यामुळें काव्य कित्येक ठिकाणीं गूढ व क्लिष्ट असें झालें आहे.

सेनापतींच्या वाङ्मयाचा गुण असा आहे कीं, तें वाचीत असतांना वाचक उंच फेंकला जातो, घटकाभर बाकी सर्व विसरतो, अंतःकरणांतील खळमळ नाहींशी होते व वाचक पवित्र विचारांच्या उच्च वातावरणांत वावरूं लागतो.

असलें विदग्ध, ओजस्वी, चैतन्यमय, नवजीवनदायी वाङ्मय महाराष्ट्रापुढें आणून श्री. देवांनीं महाराष्ट्रीयांवर फार उपकार केले आहेत. कारण सेनापतींची मुरली नादान करणारे प्रेमरव काढीत नाहीं. ती सात्त्विक युद्धाचे सूर काढीत आहे. व अशा सुरांची राष्ट्रांतील तरुण पिढीस अत्यंत

गरज आहे. शिवाय सेनापति हे सर्वस्वी हरीचे बंदी असल्यानें हें वाङ्मय केव्हां प्रकाशित झालें असतें तें श्रीहरिलाच ठाऊक! महाराष्ट्र श्री. देवांच्या परिश्रमांचें चीज करील अशी आशा आहे. सरते शेवटीं श्री-ज्ञानेश्वरांनीं जें वरदान आपल्या विश्वात्मक गुरूंजवळ मागितलें त्याच शब्दांत विश्वात्मक श्रीहरीस या ग्रंथाबाबत मागणी करतों.

"आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें"
"दृष्टादृष्ट विजयें । हो आवें जी"

ता. ९।९।३९ शंकर वामन दांडेकर

दत्तो वामन पोतदार.
१८० शनवार पेठ पुणें २.

आज चाळीस वर्षे ज्यानें आपलें जीवन धगधगित पेटवून ठेवलें आहे, जगेन तर राष्ट्रासाठीं, मरेन तर राष्ट्रासाठीं अशी प्रतिज्ञा १९०२ मध्यें घेतल्यापासून प्रत्येक श्वासोच्छ्वास तदनुसार ज्याचा चालला आहे, त्याच्या लेखनाचें हें पुस्तक आहे. हें प्राणमय पुस्तक आहे. या पुस्तकांतील ओळन् ओळ केवळ पवित्र आहे. सूर्याजवळ अंधार नाहीं समुद्राजवळ थिल्लरपणा नाहीं. या संग्रहांत चाउटी वाउगी वल्गना नाहीं. ज्यानें स्वतःचें जीवनच काव्यमय केलें आहे, जो स्वतः महाकाव्याचा महान् विषय शोभेल, अशाचें लिहिणें येथें आहे. पित्यानें तुरुंगांच्या दारांतून मुलांना पाठवलेलीं प्रेमळ पत्रें यांत आहेत. राष्ट्रांतील बंधुभगिनींस दिलेली शिकवण येथें आहे. महर्षींचा प्रबोध व सेनापतींचा प्रताप या पुस्तकांत आहे. कोमलता, प्रखरता, उत्कटता, उदात्तता सारें येथें आहे. सेनापतींची ही वाङ्मयी मूर्ति आहे.

प्रस्तावना : साने गुरुजी.

# प्रकाशित

## — सेनापति बापट वाङ्मय —

| | |
|---|---|
| भाग १ ला | किं. ३ आणे. |
| ,, २ रा | किं. ३ आणे. |
| ,, ३ रा | किं. ४ आणे. |
| दे. भ. सेवानंदलिखित चरित्र | किं. १॥ रु. |
| Holy Song | किं. १२ आणे. |

टपाल हंशील वेगळें पडेल.

मिळण्याचें ठिकाणः—

१९६/९ सदाशिव पेठ, लिमये बंगला,
टिळक रोड, पुणें २.
संग्राहक धुं. वि. देव.